
करवीर रियासतीची कागदपत्रे

संपादक : स. मा. गर्गे



स. मा. गर्गे यांचे साहित्य

प्रकाशित


सुलभ राज्यशास्त्र (तिसरी आवृत्ति)
राज्यशास्त्राचा विकास (दुसरी आवृत्ति)
राज्यशासन
समाजवादी समाजरचना
जिल्हा परिषद आणि पंचायत समिती
शांतिपर्वातील कथा
स्वप्न आणि सत्य
करवीर रियासत
करवीर रियासतीची कागदपत्रे (संपादन)
अर्थशास्त्र प्रवेश (सहकार्याने)
भारतीय राज्यघटनेचा इतिहास (सहकार्याने
भारताचे लोकमत (संपादन)

आगामी

थोरले बाजीराव

(112)

महामहोपाध्याय दत्तो वामन पोतदार
यांसी
सादर भेट
स. मा. गर्गे
१ जुलै १९६०



करवीर रियासतीची कागदपत्रे

पहिला खंड

संपादक

सदाशिव मार्तंड गर्गे

'करवीर रियासत' ग्रंथाचे कर्ते

मूल्य दहा रुपये

प्रकाशक :
सदाशिव मार्तंड गर्गे
१२०५/४ शिवाजीनगर
पुणे ४

प्रकाशनकाल :
पहिली आवृत्ती
३१ मार्च १९७०

मुद्रक :
चिं स. लाटकर
कल्पना मुद्रणालय
४६१/४ सदाशिव
पुणे ३०

अनुक्रमणिका



कव्हर वरील मोडी मजकुराचे स्पष्टीकरण : राणी जीजाबाई करवीर, यांनी संभाजी महाराजांच्या हयातीत, शके १६७३ (इ. स. १७५१) मध्ये दिलेला एक निवाडा.






मेजर जनरल हिज हायनेस सर

श्री. शहाजी छत्रपती महाराज, कोल्हापूर

यांस, त्यांच्या ६० व्या वाढदिवसाच्या शुभदिनी स्नेहपूर्वक सादर

संपादक　　　　　　　　　　　　दि. ३१ मार्च १९७०



प्रास्ताविक

'करवीर रियासतीची कागदपत्रे' वाचकांपुढे ठेवताना मला अतिशय आनंद वाटत आहे. दोन वर्षांपूर्वी 'करवीर रियासत' हा इतिहासग्रंथ मी लिहिला. त्या ग्रंथाचे वाचकांनी, माझ्या अपेक्षेपेक्षा अधिक चांगले स्वागत केले. इतिहासाच्या अभ्यासकांकडून त्याचे भरपूर कौतुक झाले. वृत्तपत्रांनी त्यावर विस्तृत अभिप्राय दिले. महाराष्ट्र शासनाने त्या ग्रंथाला इतिहास विभागाचे पहिले पारितोषिक देऊन गौरविले. अशा सर्व प्रकारांनी 'करवीर रियासत' वाचकांच्या, अभ्यासकांच्या आणि त्या क्षेत्रातील जाणकारांच्या पसंतीला उतरल्याबद्दल मला आनंद वाटणे स्वाभाविक होते. पण या आनंदाबरोबरच, मनात कोठेतरी 'करवीर रियासती'तील त्रुटींची जाणीवही टोचणी देत होती. या इतिहासांतील अनेक धागेदोरे जुळविण्याचा मी आपल्या परीने नम्र प्रयत्न केला, पण तरीही अनेक धागेदोरे नीटसे उलगडू शकले नाहीत याची जाणीव इतरांपेक्षा मलाच अधिक होती. त्यातील अनेक घटनांचा तपशील, अनेक व्यक्तींच्या कामगिरीची पार्श्वभूमी, अनेक प्रसंगांचे निश्चित काळ इत्यादी मला निःसंदिग्धपणे सांगता आलेले नाहीत, हेही मी जाणून होतो. याच जाणीवेतून करवीर रियासतीच्या ऐतिहासिक साधनांसंबंधी संशोधन करावे अशी इच्छा उत्पन्न झाली आणि ती 'करवीर रियासतीची कागदपत्रे' पहिला खंड या प्रस्तुत ग्रंथाच्या स्वरूपात अंशतः पूर्ण करण्याची संधी मला मिळाली. कोल्हापूरच्या इतिहासाशी निगडित असलेली ही कागदपत्रे प्रथमच प्रकाशित होत आहेत. मराठ्यांच्या इतिहासातील अनेक घटनांचे पौर्वापर संबंध जुळविण्यासाठी या साधनांचा उपयोग होईल अशी मी आशा करतो.

कागदपत्रांच्या या संग्रहात एकूण २४१ कागदपत्रांचा समावेश केलेला असून त्यांचा कालखंड इ. स. १७३१ ते इ. स. १८८२ पर्यंतचा आहे. या दीड शतकाच्या कालखंडात सात छत्रपतींच्या राजवटी झाल्या. प्रथम पन्हाळ्याला आणि नंतर कोल्हापुरात त्यांची राजधानी होती. वस्तुतः महाराणी ताराबाईंनी इ. स. १७१० मध्ये पन्हाळ्याला आपले पुत्र शिवाजी महाराज यांच्या नावाने छत्रपतींची द्वाही फिरविली तेव्हापासूनची कागदपत्रे उपलब्ध व्हावयास हवी होती. पण अद्याप तरी करवीर छत्रपतींच्या आरंभीच्या कालातील विशेष उल्लेखनीय कागदपत्रे हाताशी आलेली नाहीत. त्या दिशेने प्रयत्न मात्र चालू आहेत.

छत्रपती शाहू महाराज आणि संभाजी महाराज, करवीर यांचा इ. स. १७३१ मध्ये तह झाला. वारणा-तह या नावाने हा तह इतिहासात प्रसिद्ध आहे. वारणा तहाप्रमाणे शाहू महाराज आणि संभाजी माहराज यांच्या राज्यांच्या सीमा निश्चित झाल्या. दोन स्वतंत्र राज्यांना एकमेकांकडून मान्यता मिळाली. त्यामुळे, शाहू महाराज मोगलांच्या बंदिवासातून सुटून दक्षिणेत परत आल्यापासून छत्रपतींच्या घराण्यात भाऊबंदकीचा जो वाद सुरू झाला होता तो एका आर्थाने १७३१ साली मिटला. वारणा तहान्वये छत्रपतींची दोन घराणी निर्माण झाली. त्यांनी सातारा आणि कोल्हापूर (पन्हाळा) येथे आपल्या राजधान्या कायम केल्या. आणि आपआपल्या मगदुराप्रमाणे तत्कालीन परिस्थीतीच्या संदर्भात राज्ये केली. त्यापुढचा इतिहास दोन छत्रपतींच्या घराण्यांचा वेगवेगळा इतिहास असून तो स्वतंत्रपणे घडलेला आहे. त्याचा तपशील येथे सांगण्याची आवश्यकता नाही. या कागदपत्रांच्या संदर्भात इ. स. १७३१ हे वर्ष कोणत्या अर्थाने महत्त्वाचे होते एवढेच येथे नमूद करावयाचे आहे. या कागदपत्रांच्या संग्रहाचा आरंभही स. १७३१ च्या पत्रापासून का केला आहे ते यावरून लक्षात येईल.

या संग्रहात समाविष्ट केलेली कागदपत्रे मला तीन ठिकाणी उपलब्ध झालेली आहेत. काही कागदपत्रे कोल्हापूरच्या अभिलेख कार्यालयातील दप्तरातून मिळाली. काही कागदपत्रे छत्रपती शहाजीमहाराजांच्या परवानगीने मी हुजूर खाजगी दप्तरातून मिळवू शकलो. आणि काही कागदपत्रे राव विश्वासराव गायकवाड घराण्याचे विद्यमान वंशज खंडेराव आनंदराव ऊर्फ नानासाहेब गायकवाड यांनी आपल्या दप्तरातून मिळवून दिली. या सर्व कागदपत्रांचा तपशील इतरत्र दिलेला आहे. येथे त्यांचा उल्लेख करण्याचे मुख्य कारण असे की या कागदपत्रांची विविधता व उपयुक्तता वाचकांच्या लक्षात यावी. कागदपत्रे निवडताना केवळ ती जुनी आणि जीर्ण आहेत, एवढीच कसोटी लावणे योग्य आहे असे मला वाटत नाही. त्यातील ऐतिहासिक आशय महत्त्वाचा असला पाहिजे. इतिहासाच्या एखाद्या प्रसंगावर, राजकोय घडामोडीवर, तत्कालीन सामाजिक घटनांवर अधिक स्पष्ट प्रकाश पडेल अशीच कागदपत्रे इतिहासाच्या अभ्यासकांना अधिक उपयुक्त वाटतील असे मी गृहीत धरतो. केवळ दानपत्रे आणि इनामपत्रे यांना आता पूर्वीइतके महत्त्व देणे इष्ट ठरेल असे मला वाटत नाही. आरंभीच्या इतिहाससंशोधकांनी अशी दानपत्रे विपुल प्रमाणात प्रसिद्ध केलेली आहेत. त्यामुळे त्यांचा ठराविक साचा लक्षात आला आहे. ज्या दानपत्रात निश्चितपणे एखाद्या कामगिरीचा उल्लेख असेल किंवा ज्या इनामपत्रात एखाद्या राजकीय घटनेचा, युद्धप्रसंगाचा किंवा मुत्सद्देगिरीचा वैशिष्ट्यपूर्ण उल्लेख असेल अशी दानपत्रे निश्चितच ऐतिहासिक महत्त्वाची ठरतात. म्हणून त्यांचा समावेश अशा संग्रहात करणे आवश्यक आहे यात शंका नाही.

इतिहासाची विश्वसनीय साधने म्हणून त्या त्या वेळच्या राजकारणात प्रमुखपणे सहभागी असलेल्या स्त्री-पुरुषांची पत्रे, तहनामे, त्यांनी दिलेल्या सनदा, त्यांच्या

समकालीनांनी लिहिलेली बातमीपत्रे इत्यादींचा उल्लेख करावा लागेल. त्याशिवाय, दुय्यमदर्जाची साधने म्हणून बखरी, कैफीयती, यादी यांनाही इतिहास लेखनाच्या दृष्टीने काही महत्त्व असते, हे नाकारता येणार नाही. अस्सल पत्रव्यवहाराच्या तुलनेने बखरी आणि कैफीयती कमी महत्त्वाच्या असतात हे खरे, पण त्यातूनही इतिहासातील काही प्रसंगांचे दुवे सापडतात, काही व्यक्तींच्या स्वभाववैशिष्ट्यावर प्रकाश पडतो. म्हणून मी या संग्रहात पत्रे, तहनामे, सनदा इत्यार्दांबरोबर काही कैफियती आणि यादी यांचाही समावेश केलेला आहे.

मूळ कागदपत्रांपैकी काही कागदपत्रे अतिशय जीर्ण झालेली आहेत. काही कागदपत्रांवर तारखा नमूद केलेल्या आहेत, तर काहींवर तारखांचा उल्लेख नाही. जुन्या कागदपत्रांवर सुहूरसन देण्याची पद्धत दिसून येते. काही ठिकाणी शालीवाहन शक, तर क्वचित ठिकाणी शककर्ते शिवाजी महाराजांचा राजशक दिलेला आढळतो. या निरनिराळ्या कालनिदर्शक पद्धतीला समान पद्धतीने मोजता यावे म्हणून त्यांचे इसवीसनात रूपांतर केले आहे. आणि तेच प्रत्येक लेखांकांच्या खाली नमूद केले आहे. काही कागदपत्रांच्या तळ टीपातही त्यांचा उल्लेख केलेला दिसून येईल. काही कागदपत्रांवर कोणत्याच प्रकारच्या तारखा दिलेल्या नाहीत. अशावेळी पत्रातील मजकुरांच्या संदर्भाने वर्ष ठरवून ते दिलेले आहे. अर्थात त्यांत चूक राहण्याचा किंवा मतभेद होण्याचा संभव आहे. या बाबतीत शक्य तितकी काळजी घेण्याचा प्रयत्न केला आहे, एवढेच मी म्हणू शकेन.

काही कागदपत्रात मूळ अक्षरे लागली नाहीत तेथे प्रश्नार्थक घालून शंका व्यक्त केली आहे. तर जेथे कागद फाटला आहे तेथे तसा उल्लेख केलेला आहे. सर्व कागदपत्रे मोडीत असल्यामुळे त्यांचे बालबोधीकरण करणे आवश्यक होते. तसे करताना मोडी लिपीतील लपेटीमुळे निर्माण होणारा अंगभूत दोष, आणि दिवसेंदिवस मोडी वाचनाची सवय कमी होत असल्यामुळे निर्माण होणारे अज्ञान, यामुळे कागदपत्रात काही चुकांचा संभव मी नाकारीत नाही. पण शक्य तो तशा चुका राहू नयेत यासाठी बालबोधीकरणानंतर पुन्हा मुळावरून कागद तपासण्याची दक्षता घेतली आहे एवढे मात्र मी सांगू इच्छितो.

राजकीय घटना

ज्या कागदपत्रावर तारखेचा उल्लेख नाही त्याचा काळ कसा ठरविला याचे एक उदाहरण येथे देणे अप्रस्तुत ठरणार नाही. लेखांक २२ हा दोन राज्यातील एक करार आहे. पण नेमका तो कोणी केला याची निःसंदिग्ध कल्पना सकृत्दर्शनी येत नाही. त्यामुळे त्याचा काळ ठरविणेही शक्य होत नाही. पण या करारात एके ठिकाणी 'कुरान्याची शपथ' असे शब्द आले आहेत. त्यांतच आणखी एका कलमात 'राजश्री रघुनाथराव पंडित यांची स्थापना व्हावी हे महाराजांचे मानस, त्यांस आम्ही साहित्य

करून मनोंदय सिद्धीस नेऊ, असा उल्लेख आहे. वरील दोन्ही उल्लेखांवरून करवीरचे शिवाजी महाराज आणि हैदरअली यांच्या दरम्यानचा हा करार असावा हे लक्षात येते. आणि मग त्यावरून त्याचा काळ ठरविणेही शक्य झाले. या कराराप्रमाणे, हैदरअलीने शिवाजी महाराजांना मदत करावी, त्याच्याच मदतीने रघुनाथरावांना पेशवेपद मिळावे आणि त्याच्या मोबदल्यात महाराजांनी तुंगभद्रेचे दक्षिणतीर पासून दक्षिणेस समुद्रपर्यंत प्रांतांच्या सनदा करून द्याव्यात; असे ठरले.

असाच आणखी एक कराराचा मसुदा लेखांक ३६ मध्ये दिलेला आहे. त्यात पहिलेच कलम, 'किल्ले सातारासुद्धा सरकारात स्वाधीन करून स्वामींचा शिक्का एक पृथ्वीवरी चालवू, ' असे आहे. कोल्हापूर आणि सातारा ही दोन राज्ये एक करण्याची कल्पना इ. स. १७४० मध्ये नानासाहेब पेशवे यांनी संभाजी महाराजांशी केलेल्या करारात नमूद झाली होती. ती कल्पना या करारातही पुन्हा स्पष्टपणे मांडली आहे. या सर्वच करारावर इ. स. १७४० च्या कराराची सहीसही छाया पडलेली दिसून येते. कराराच्या शेवटी बाजीराव बर्वे यांचा उल्लेख आहे. बर्वे हा रघुनाथराव पेशवे यांच्या नात्यातील आणि विश्वासातील माणूस; तेव्हा हा करार कोल्हापूरचे दुसरे शिवाजीमहाराज आणि रघुनाथराव पेशवे यांच्या दरम्यानचा असला पाहिजे यात शंका राहात नाही. पण तो प्रत्यक्ष झाला असावा असे मात्र वाटत नाही. कराराचा मसुदा रघुनाथरावांनी बाजीराव बर्वे याच्या मार्फत पाठविला असावा असे दिसते.

या कागदपत्रातील तोरगलकर शिंदे यांची कैफीयत (लेखांक १६५) बऱ्याच ऐतिहासिक घटनांवर प्रकाश टाकणारी आहे. तोरगलकर शिंदे यांचे करवीर छत्रपतींशी नाते होते. कोल्हापूरचे पहिले संभाजी महाराज यांची राणी जिजाबाई ही याच शिंदे घराण्यातील होती. त्याशिवाय या घराण्यात जे शूर पुरुष झाले त्यांच्या कामगिरीवरून कर्नाटकातील मराठ्यांच्या हालचालीसंबंधी बरीच नवी माहिती मिळते.

वाचकांनी लेखांक २१७ चे टिपण मुद्दाम वाचावे इतके उद्‌बोधक आहे. पारसनीसांच्या घराण्यातील गोविंद निळोजी पारसनीस यांनी त्यांच्या दप्तरी असलेल्या जुन्या पत्रव्यवहारावरून ऐतिहासिक घटनांचे हे टिपण केले आहे. त्यात शककर्ते शिवाजी महाराजांनी औरंगजेबाला लिहिलेल्या एका पत्राचा उल्लेख आहे. औरंगजेबाने जिझीया कर बसविला आणि हिंदू प्रजेचा छळ केला, या दोन्ही प्रकारांबद्दल शिवाजी महाराजांनी या पत्रात औरंगजेबाचा अत्यंत तीव्र शब्दात धिक्कार केला आहे. त्यात एके किकाणी म्हटले आहे, "हिंदू व मुसलमान वगैरे ज्ञाती ईश्वरापाशी एकरंग आहेत. मुसलमान लोक मसुदीत बांग देतात ती भगवंताची स्तुतीच होय. आणि हिंदू लोक देवळांत घंटा वाजवून स्तुतीच करतात. त्यास जातिधर्मावर जुल्रुम करणे हे भगवंताशी वैरत्व आणि अपराध व शास्त्रविरुद्ध. जगात अन्याय रीतीने जिजिया पट्टी घेणे हे योग्य नाही व शास्त्रमतेही अयोग्य आहे."

याच टिपणात कोल्हापूरचे पहिले शिवाजीमहाराज (ताराबाईंचे पुत्र) यांनी मोगलांकडे, " हजरत बादशहा यांचे दौलतीत नबाब वजीर व सरदार तमाम शुद्ध अंतःकरणे सेवा करीत आहेत, तशीच हजरत बादशाही दौलतीस शुद्ध अंतकरणयुक्त सेवा करावी अशी माझी इच्छा आहे, " अशी विनंती केल्याचा उल्लेख आढळतो.

या टिपणातील संभाजी महाराजांची पत्रेही तत्कालीन राजकारणावर प्रकाश टाकणारी आहेत. संभाजी महाराज व निजाम यांच्या दोस्तीचा उल्लेख त्यात आढळतो. ताराबाईंचे पुत्र शिवाजीमहाराज यांनी प्रजापालनात दुर्लक्ष करून सर्वत्र जुलूम केला व दौलत खराबीत आणली, असे एका पत्रात म्हटले आहे. दुर्दैवाने हे टिपण अपूर्ण आहे. त्यातील शेवटच्या वाक्यावरून ताराबाई व शिवाजीमहाराज यांना सत्तेवरून बाजूला का सारले व त्यात पुढाकार कोणी घेतला याचा ओझरता उल्लेख आहे. पण तो अपुरा असल्यामुळे राजवाड्यातील या सत्तान्तराच्या घटनेचा पुरेसा बोध होत नाही. त्याची कारणे आणि परिणामही कळत नाहीत. टिपण नेमके अशा ठिकाणी तुटले आहे की जेथे सत्तांतराचा काहीतरी उलगडा होण्याची शक्यता होती. टिपणाचे पुढचे कागद मिळावे म्हणून दप्तरखान्यात पुष्कळ शोध केला पण तो निष्फळ ठरला. त्यामुळे सत्तांतराचे गूढ तसेच कायम राहिले. त्याचे काहीसे अस्पष्ट दिग्दर्शन टिपणाच्या अखेरच्या काही वाक्यांवरून होते एवढेच.

कोल्हापूरच्या इतिहासातील अशाच आणखी एका काहीशा रहस्यमय प्रसंगावर प्रकाश टाकणारी दोन-तीन कागदपत्रे दिलेली आहेत. दुसरे संभाजी महाराज उर्फ आबा साहेब यांचा इ. स. १८२१ साली राजवाड्यात खून झाला. आणि खुनी लोक सुरक्षित-पणे शहराबाहेर निघून गेले. तसे जाण्यासाठी त्यांना संरक्षणही मिळाले. हे घडले कसे आणि घडविले कोणी ? त्यासंबंधी लेखांक १४५, १४६ व २२१ यातील माहिती उपयुक्त वाटेल अशी अपेक्षा आहे.

समाजदर्शन

इतिहासाच्या साधनात तत्कालीन सामाजिक परिस्थितीचे दर्शन घडावे अशी माझी उत्कट इच्छा होती. समाजाचा इतिहास केवळ राजकीय घडामोडींनी समजत नाही. तसेच युद्धविषयक हालचाली, राजकीय डावपेच, तह आणि करार यांवरूनही समाजमानसाचा खरा ठाव लागत नाही. त्यासाठी प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे सामाजिक जीवनातील उद्रेकांचा उल्लेख हवा असतो. पण सामाजिक रूढी, प्रथा, धार्मिक उत्सव समारंभ, विवाहादी प्रसंगांची वर्णने, चालीरीती आणि संकेत अशा अनेक गोष्टींचे उल्लेख असलेली कागदपत्रे जवळजवळ सापडतच नाहीत. समाजस्थिती आणि आर्थिक परिस्थिती यांचे ज्ञान होण्यासाठी जशी कागदपत्रे हवी असावीत, तशी मिळत नाहीत. त्यामुळे आपल्या इतिहासाचे स्वरूप प्रामुख्याने राजकीयच राहाते. राजकारणी पुरुषांचे पराक्रम

आणि त्यांना अनुलक्षून आलेले उल्लेख यांचाच प्रामुख्याने जुन्या कागदपत्रात अधिक भरणा आढळतो. अशा कागदांची गरज असते हे खरे, पण त्यावरून तत्कालीन समाज-दर्शन घडत नाही. इतिहासविषयक नव्या दृष्टिकोनाप्रमाणे समाजाचा इतिहास अधिक महत्त्वाचा मानला जातो. प्रस्तुत संग्रहात मला सामाजिक स्वरूपाची जी कागदपत्रे मिळाली ती मी समाविष्ट केली आहेत. अठराव्या व एकोणिसाव्या शतकात ग्रामपंचायती कडून निर्णय देण्याची पद्धती कशी होती ते लेखांक २ मधील निवाड्यावरून कळते. आपल्या निवेदनाची सत्यता पटविण्यासाठी किती भयंकर दिव्य करावे लागत असे याचा एक विलक्षण प्रसंग त्या लेखांकात वर्णन केला आहे. उकळत्या तेलातील सोन्याचा तुकडा हाताने उचलून घेण्याचे हे दिव्य त्यावेळी प्रचारात होते आणि त्यावरून न्याय-निवाडा करण्यात येत होता, ही कल्पनादेखील आज मनाचा थरकाप उडविणारी वाटते. अशाच काही सामाजिक प्रथांचे उल्लेख इतर चार-दोन पत्रांत आढळतात. पण अशी कागदपत्रे फार थोडी आहेत ही खेदाची गोष्ट होय. केवळ सामाजिक प्रथा, रूढी, संकेत, व्यवहार इत्यादींचा उल्लेख असलेल्या कागदपत्रांचा एक स्वतंत्र संग्रह प्रसिद्ध करावा अशी माझी इच्छा आहे. पण त्यासाठी पुरेशी कागदपत्रे मिळतील की नाही याविषयी शंका वाटते.

या संग्रहातील प्रत्येक कागदपत्राचा गोषवारा इतरत्र दिला आहे. त्यावरून वाचकांना त्यांचे स्वरूप आणि महत्त्व समजण्यास मदत होईल अशी अपेक्षा आहे. वर केवळ चार पाच उल्लेखनीय लेखांकांचा वानगीदाखल उल्लेख केला आहे. संग्रहातील सर्वच कागदपत्रे सारख्या महत्वाची आहेत असे मी म्हणू शकणार नाही. पण त्यांची निवड करताना शक्यतोवर त्यात काहीतरी नवी माहिती असावी अशी दृष्टी ठेवली होती.

या पूर्वी इतिहास संशोधक श्री. मा. वि. गुजर यानी ‘ करवीर छत्रपती घराण्याच्या इतिहासाची साधने ’ आठ भागात प्रसिद्ध केली आहेत. तरीहि अद्याप बरीच बहुमोल कागदपत्रे सरकारी दप्तरखाना व इतर खाजगी दप्तरात असंशोधीत आहेत. त्यातूनच प्रस्तूत संग्रहासाठी काही कागदपत्रे निवडली आहेत. पूर्वी प्रकाशित झालेल्या कागद पत्रातून कदाचित एखाद दुसरा कागद येथे पुनर्मुद्रित झाला असेल. असा अपवाद वगळता ही सर्व कागदपत्रे प्रथमच नव्याने प्रसिद्ध होत आहेत.

कागदपत्रांचे मूळ ठिकाण

या संग्रहातील कागदपत्रे तीन ठिकाणांहून उपलब्ध झाली आहेत. त्या ठिकाणांचा निर्देश प्रत्येक लेखांकांच्या खाली केला आहे. तसेच संबंधित दप्तरातील क्रमांकही त्यापुढे दाखविले आहेत.

(१) 'निवडी' आणि 'तोरगल' या नावाखाली असलेली कागदपत्रे कोल्हापूर अभिलेख कार्यालयातील निवडीदप्तर व तोरगल दप्तर यांतील आहेत.

(२) 'हूजूर खाजगी दप्तर' या नावाखाली असलेली कागदपत्रे कोल्हापूरच्या न्यू पॅलेस मधील दप्तरातून निवडली आहेत. ती मूळ कागदपत्रे पॅलेसच्या ग्रंथालयात जिज्ञासू वाचकांना परवानगीने पाहावयास मिळू शकतील.

(३) राव विश्वासराव गायकवाड दप्तरातील कागदपत्रे, श्री. खंडेराव आनंदराव गायकवाड, बंगला नं. ८ न्यू पॅलेस पोस्ट, कोल्हापूर यांच्याकडे उपलब्ध झाली.

इतिहासाच्या चिकित्सक अभ्यासकांना या कागदपत्रांचा उपयोग होईल अशी मी अपेक्षा करतो.

१२०५/४ शिवाजीनगर, पुणे ४
ता. ३१ मार्च १९७०

स. मा. गर्गे

ऋणनिर्देश

'करवीर रियासतीची कागदपत्रे' मी संपादन केली असली तरी ती प्रकाशित करण्याचे, वाचकांना उपलब्ध करून देण्याचे सर्व श्रेय कोल्हापूरचे विद्यमान छत्रपती शहाजी महाराज यांनाच आहे. त्यांनी प्रोत्साहन देऊन कागदपत्रांच्या प्रसिद्धीच्या कामी रस घेतला नसता तर ती प्रसिद्ध झाली असती असे मला वाटत नाही. महाराजांना इतिहासाविषयी किती सखोल आस्था आहे, याची कल्पना मला 'करवीर रियासती'च्या लेखनाच्या वेळीच आली होती. त्यानंतर रियासतीशी संबंधित असलेली कागदपत्रे संशोधित करावीत आणि त्यातील निवडक पत्रे संपादन करून प्रकाशित व्हावीत अशी मी इच्छा व्यक्त करताच महाराजांनी ती आनंदाने मान्य केली. त्यासाठी सर्वतोपरी साधनसामुग्री उपलब्ध करून दिली. वरचेवर कामासंबंधी आत्मीयतेने विचारपूस केली. त्यामुळेच मला ही कागदपत्रे प्रकाशात आणणे शक्य झाले हे मी कृतज्ञतापूर्वक येथे नमूद करतो. छत्रपती शहाजी महाराजांचा मी अत्यंत आभारी आहे.

३१ मार्च १९७० रोजी महाराजांच्या वयाला ६० वर्षे पूर्ण झाली. त्याच दिवशी हा कागदपत्रांचा संग्रह प्रकाशित करून मी त्यांना स्नेहपूर्वक अर्पण करण्याची संधी घेतो.

'करवीर रियासती'च्या निमित्ताने महाराजांनी कोल्हापुरातील इतिहासाच्या काही जाणकार मंडळींचा मुद्दाम परिचय करून दिला होता. त्यातून त्यावेळी एक अनौपचारिक इतिहासमंडळ तयार झाले. त्या मंडळाचा मला प्रस्तुत कागदपत्रांचे संशोधन करण्यापासून, प्रकाशित करण्यापर्यंत फार मोठा उपयोग झाला. या मंडळाचे एक सभासद रावसाहेब शं. ह. वर्टीकर म्हणजे इतिहासातील नावांचा आणि गावांचा मूर्तिमंत कोश. त्यांच्याच सहकार्याने मला या कागदपत्रातील कितीतरी गावांच्या आणि व्यक्तींच्या नावांचा बरोबर बोध होऊ शकला. या कामी त्यांनी दिलेल्या सहकार्याबद्दल मी आभारी आहे.

ही कागदपत्रे निवडण्याच्या कामी मला सर्वांत अधिक सहाय्य झाले ते श्री. खंडेराव आनंदराव उर्फ नानासाहेब गायकवाड यांचे. ते राव विश्वासराव गायकवाड या इतिहासप्रसिद्ध घराण्याचे विद्यमान वंशज आहेत. त्यांना इतिहासाची आवड असल्यामुळे त्यांनी आपल्या घराण्याचा इतिहासही नुकताच प्रसिद्ध केला आहे. अशा

इतिहासप्रेमी व्यक्तीचे मला सहकार्य लाभले ही अत्यंत समाधानाची गोष्ट वाटते. कागदपत्रांची निवड करणे, त्यांचे बालबोधीकरण करणे, ती कागदपत्रे पुन्हा तपासून पाहणे इत्यादी कामी मला त्यांची फार मदत झाली. त्याचप्रमाणे, कोल्हापूरच्या इतिहासात प्रसिद्ध असलेले रत्नाकरपंत राजाज्ञा यांचे वंशज श्री. र. मा. उर्फ आप्पासाहेब राजाज्ञा यांनीही कोल्हापुरातील प्रमुख घराण्यांच्या कागदपत्रांचा शोध घेण्यासाठी आणि प्रस्तुत कागदपत्रे संपादन करण्याच्या कामी मला सहाय्य केले.

श्री. गायकवाड आणि श्री. राजाज्ञा या दोन्ही मित्रांचा मी आभारी आहे.

प्रस्तुत संग्रहातील कागदपत्रांपैकी कोल्हापूर अभिलेख कार्यालयातील कागदपत्रे पहाण्याची परवानगी दिल्याबद्दल मी, संचालक पुराभिलेख व पुरातत्त्व महाराष्ट्र शासन, मुंबई यांचा मी आभारी आहे.

माझे मित्र आणि पुणे विद्यापीठातील इतिहास विभागाचे प्रमुख डॉ. अ. रा. कुलकर्णी यांनी या संग्रहाला विवेचक प्रस्तावना लिहून दिली. तसेच, पुराभिलेख व पुरातत्त्व विभागाचे संचालक व इतिहास संशोधक डॉ. वि. गो. खोबरेकर यांनी कागदपत्रांच्या संपादनाच्या कामी मला वेळोवेळी उपयुक्त सूचना दिल्या. या मित्रद्वयाचा मी अत्यंत आभारी आहे.

कागदपत्रांच्या तारखा निश्चित करण्याचे अत्यंत किचकट पण तितकेच जबाबदारीचे काम भारत इतिहास संशोधक मंडळातील श्री. नारायण केशव उर्फ नानासाहेब जोशी यांनी अतिशय आनंदाने केले. त्यांचा मी आभारी आहे.

छत्रपती शहाजी महाराजांचे चिटणीस श्री. यशवंतराव तस्ते, तसेच कोल्हापूरच्या अभिलेख कार्यालयातील सिनीयर क्लार्क श्री. शा. स. पाटील यांच्या सहकार्याचा मी आभारपूर्वक मुद्दाम उल्लेख करतो.

कल्पना प्रेसचे संचालक श्री. चिं. स. लाटकर यांनी अतिशय आकर्षक मुद्रण केल्याबद्दल त्यांचे व मुद्रणालयातील कामगार बंधूंचे मी आभार मानतो.

स. मा. गर्गे

प्रस्तावना

'करवीर रियासती'च्या सुयशानंतर 'करवीर रियासतीच्या कागदपत्रांचे' संपादन करून श्री. स. मा. गर्गे यांनी इतिहास संशोधनाच्या कार्यात मौलिक भर घातली आहे. दोन शतकाहून अधिक वर्षांचा इतिहास असलेल्या या रियासतीचा सर्वांगीण इतिहास अद्याप मुबलक प्रमाणावर उपलब्ध झालेला नाही. ही उणीव काही अंशाने भरून काढण्याचा प्रयत्न मेजर जनरल हिज हायनेस सर श्री शहाजी छत्रपती महाराज, कोल्हापूर यांच्या प्रेरणेने काही इतिहाससंशोधक करीत आहेत ही इतिहासाच्या अभ्यासाच्या अभ्युदयाच्या दृष्टीने मोलाची बाब आहे. छत्रपतींच्या वरदहस्ताने आज पावेतो 'करवीर रियासत' 'हिम्मतबहाद्दर चव्हाण घराण्याचा इतिहास' आणि 'राव विश्वासराव गायकवाड घराणे' असे काही ग्रंथ प्रकाशित झाले आहेत. कोल्हापूरच्या सत्तेखालील काही जहागीरदारांच्या दफ्तरी पडलेले कागद निवडून त्यांच्या संपादनाचे कार्य चालू आहे. करवीर रियासतीच्या कागदपत्रांचा तीन खंडांचा संकल्प श्री. गर्गे यांनी सोडलेला आहे. या सर्व कार्यामागे छत्रपती महाराजांची सक्रिय सहानुभूति सतत असल्यामुळे त्यांचे या कार्याबद्दल मनःपूर्वक अभिनंदन केले पाहिजे. त्यांच्या प्रेरणेनेच श्री. गर्गे यांच्यासारखे अभ्यासू व कष्टाळू लेखक एका नवीन दालनात, इतिहास लेखन आणि संशोधन क्षेत्रात उतरले आणि यशस्वी ठरले. श्री. गर्गे यांच्यासारखे लेखक आणि श्री. शहाजीराजांच्यासारखा गुणग्राहक पुरस्कर्ता यांच्या सहकार्याने करवीर रियासतीची अनेक अप्रकाशित साधने अभ्यासकांना उपलब्ध होतील अशी उमेद बाळगावयास हरकत नाही.

श्री. गर्गे संपादित प्रस्तुत ग्रंथाने करवीर रियासतीच्या संशोधनाला फार मोठा हातभार लावला आहे. 'आपण इतिहास लेखक आहोत, संशोधक नाही' असे श्री. गर्गे यांनी आपल्या 'करवीर रियासती'च्या निमित्ताने नम्रपणे नमूद केले असले तरी, संशोधकाला आवश्यक ती सर्व गुणवैशिष्ट्ये त्यांनी आपल्या या ग्रंथात ठिकठिकाणी दाखविली आहे. इतिहास लेखन करीत असताना 'आधार शोधण्या'साठी जी सतत धडपड करावी लागते त्यातूनच करवीर रियासतीच्या कागदपत्रांचा हा प्रपंच उभा राहिला आहे.

वारणेचा तह १७३१ साली झाला, गृहकलह संपला आणि कोल्हापूरच्या छत्रपती

पदाला शाहु महाराजांची मान्यता मिळाली, तेव्हापासून करवीर रियासतीच्या स्वतंत्र इतिहासाला प्रारंभ झाला. सातान्याची छत्रपतींची मूळ गादी १८४८ ला परराज्यात खालसा झाली. पण कोल्हापूरच्या छत्रपती शाखेने भारताचे स्वातंत्र्य पाहिले आणि ती परिस्थितिनुरूप त्यात विलीन झाली. या दोनशेहून अधिक वर्षांच्या इतिहासातील (१७३१ ते १८८२) या करवीरच्या सात छत्रपतींच्यां उज्वल कालखंडांतील कागदपत्रें प्रस्तुत संग्रहात आली आहेत. या खंडातील राजकीयदृष्टया महत्वाच्या घटनांची ओळख संपादक श्री. गर्गे यांनी आपल्या प्रास्ताविकांत करून दिली आहे. राजकीय इतिहासास उपयुक्त अशा अनेक घटना, व्यक्ती, स्थळे, तिथी या कागदपत्रांतून आल्या आहेत. पण त्याबरोबरच सामाजिक, आर्थिक, शासकीय इतिहासास उपयुक्त अशी माहितीहि या कागपत्रांतून आढळते.

गुरवाच्या कज्ज्याची विस्तृत हकीकत (ले. २), लढाईत गुंतलेल्या राजेरजवाड्यांचा भविष्यावर कसा विश्वास असे हे दर्शविणारे पत्र, ज्यात सांगलीकरांनी जंगम आणि जैन ज्योतिषांना पाचारण केले आहे (४२), श्रीमंतांच्या धराण्यातील लग्नाचा खर्च (५६), हिंदुस्थानात राहणारे शिंदे आपल्या मुलींना नवरे पहाण्याकरिता महाराष्ट्रात येतात आणि कलावंतीणीच्या मदतीने वरसंशोधन करतात (१५५), सौ. दुर्गाबाई यांच्या फलशोभनाच्या समारंभाची तरतूद (१२२), या घटना सामाजिक इतिहासास उपयुक्त आहेत. वज्रचुडेमंडित सईबाईस पुत्रप्राप्ती झाली तेव्हा संतोषाची शर्करेची पत्रे कोणाला आणि कोणत्या क्रमाने पाठविली (१४१), यावरून भोसल्यांचे कुलांचार आणि आप्तस्वकीयांची कल्पना येते. शिकारीत मारलेल्या वाघाची लांबीरुंदी एका पत्रात आढळेल (१३५), तर दुसऱ्या पत्रात महालक्ष्मीच्या पूजेसाठी म्हैसूरहून सरंजामासहित हत्ती आला त्याची माहिती दिली आहे (११६). या साऱ्या बारीकसारीक वाटणाऱ्या घटना, सामाजिक जीवनाचे आणि संबंधाचे अनेक धागे जुळविण्यास उपयुक्त ठरत असतात.

आर्थिक इतिहासाच्या अभ्यासकास उपयुक्त अशी काही माहिती या कागदपत्रातून मिळेल. १७३६ साली शंभु छत्रपतींनी वलंदेजाशी (डच) केलेला व्यापारविषयक करार (३) येथे आला आहे. वेंगुर्ल्यास डचांची एक मोठी वखार होती. त्या वखारीचा एक उत्तम नकाशा हेगच्या दफ्तरखान्यात पहावयास मिळतो. एका पत्रात हस्तीदंताच्या विक्रीचा तपशील आला आहे (९९). पकडलेल्या तारुत ५८८ हस्तीदंत सापडले. ते दात मणाच्या भावाने विकले. तारुसुद्धा विकले. सर्व मिळून सरकारास ४०७१९ रुपयांवर रक्कम मिळाली.

टंगसाळी संबंधीची या ग्रंथात आलेली माहिती उद्‌बोधक आहे. १८१५ साली पन्हाळा येथे टंगसाळ काढली. शंभू शिक्क्याचा रुपया काढला. तो रुपया पाडावा कसा

हे ठरले. मलकापुरी रुपया बंद केला. सराफ, सावकार व उदमी यांना तत्संबंधी पत्रे लिहिली (१३३). या टंगसाळीला ब्रिटिशांचा विरोध असावयाचे कारण नव्हते, कारण अद्याप कंपनीचा अंमल सुरू व्हावयाचा होता. पण पुढे १८४० साली कोल्हापुरातील टंगसाळीतून 'हुजूर सरकारातून काही व्रतबंध अगर लग्न वगैरे काही दानधर्म असे कारण उत्पन्न जाहाले म्हणजे टंगसाळ सुरू करून त्या कारणाबद्दल रुपये, अधेल्या, पावल्या वगैरे नाणे त्या खर्चापुरते करावे व दसरा, दीपावली, संवत्सर प्रतिपदा असे सणाचे दिवशी हुजूर खाजगीकडे ओवाळणीबद्दल होन व मोहरा लागतात (१८८)' या वहिवाटीस परवानगी दिली असली तरी "सरकारच्या सल्याखेरीज टंगसाळ चालवू नये हे महाराज सरकारचे ध्यानात असले पाहिजे" (१९०) अशी ताकीद दिली आहे.

सातारा, पुणें या राज्याच्या केंद्रस्थानी काही हालचाली घडत असताना करवीर रियासतीच्या क्षेत्रात त्याचे काय प्रतिध्वनी उमटत होते, कोल्हापूरकरांचे यांचे संबंध कशा प्रकारचे होते इत्यादी बाबी समजण्यास या पत्रांचा उपयोग होईल. नारायणरावांच्या खुनानंतर निर्माण झालेल्या राजकीय पोकळीतून बारभाई ही संस्था उदयाला आली. त्या बारभाई संबंधी, "बारभाईचे वर्तमान तरी पुण्यामध्ये जमा होऊन आपले आपणांस भांडतात. त्यांचा बुडाबयाचा वख्त आला आहे" असे १७७८ च्या एका पत्रात सार्थ उद्‌गार आले आहेत (२५). इंग्रज आणि मराठे यांच्यामध्ये झडलेल्या पहिल्या फेरींची माहिती काही पत्रांतून येते (२७), तर त्यांच्यामधील अखेरच्या लढतीची पार्श्वभूमी समजावून देणारी माहिती कोठे आढळते (१००). नाना फडणीसाच्या राजकारणाचे काही धागे येथे आपल्याला आढळतील (५५). करवीरकरांच्या आधिपत्याखाली असलेली जहागीरदार मंडळी आणि त्यांनी दिलेला उपसर्ग, कागल, निपाणी, तोरगल, कापशी, इचलकरंजी या संबंधी विपुल प्रमाणात कागद आढळतात. काही जहागीरदार आपल्या पदरी पेंढार, अरब स्वार (१०९; व ११५) ठेवून दंगा माजवीत. पेशवाईत सर्वांना त्रासदायक ठरलेल्या धोंड्या वाघा (पवार) संबंधीचे उल्लेख येथे आढळतील (४६, ७९, ८९). चिकोडी, मनोळी या भागांचे करवीरकर, निपाणकर, आणि शेवटी इंग्रजाकडे कसे सत्तांतर झाले हे सांगणारी पत्रे येथे सापडतील (१२, १४).

मराठी दौलत नष्ट होण्यापूर्वीपासूनच कंपनी सरकारने महाराष्ट्राच्या राजकारणात प्रवेश केला होता. कोल्हापूरच्या राजकारणात लक्ष घालण्यास १९ व्या शतकाच्या प्रारंभापासून सुरवात केली होती. यांत मुख्य उद्देश होता बाजीरावाची सत्ता नष्ट करण्यासाठी या साऱ्या मराठी सत्ताधाऱ्यांना आपल्याकडे वळवून घेणे. आणि म्हणूनच राजघराण्यांतील दुसऱ्या शिवाजीमहाराजांचा मृत्यू झाल्यावर 'माऊंट ईष्टवरीट

इर्लफिन्टन' सांत्वनपर पत्र लिहितो "चित्तास बहुत शोक व आपसोस जाहाला... होणार ते जाहाले...मृत्यूलोकीची वस्तीची हीच वाट आहे. शोक करून फळ नाही" (१२०) आणि असे सांत्वन करीत असतानाच कागल जहागीर कोणाकडे असावी या संबधीचा आपला सल्लाही त्याने दिला आहे (१२४).

१८४० नंतरच्या काळांत ब्रिटिशांचा, पोलिटिकल एजंटामार्फत करवीरच्या राज्यकारभारांत बराच हस्तक्षेप होऊ लागला. दरबारचे कारभारी नेमण्याचे काम पोलिटिकल एजंट करीत असे. एके ठिकाणी अधिकाऱ्यांना उद्देशून असे म्हटले आहे, "कोल्हापूर दौलत फार बखेडेस आली आहे. सबब आपण लोक बहुत सावध असावे. आपणाकडून दौलत अभीवृद्धी जसे होईल त्याजवर नजर ठेवीत जावे. आपणास सर्व आधार कंपनी सरकार असे समजावे" (२०७).

१८३९ साली प्रतापसिंहाला पदच्युत करून ब्रिटिश सत्ता बरीच धीट बनली होती. राज्यांतील गरीब रयतेला आपणाकडे वळवून घेण्याचा कंपनी सरकारचा सतत प्रयत्न चालू होता. हे प्रारंभीच्या त्यांच्या धोरणावरून स्पष्ट होते. सुव्यवस्थित राज्यकारभार आणि निःपक्षपाती न्यायदान या दोन बाबी सांभाळल्यास लोक ब्रिटिश राजवटी विरुद्ध बंड करून उठणार नाहीत अशी ब्रिटिशांची खात्री झाल्यामुळे सुरवातीच्या काळांत 'सुराज्य' निर्माण करण्याच्या प्रयत्नात कंपनी होती. प्रस्तुत संदर्भात अधिकारी, पाटील, कुलकर्णी यांना उद्देशून काढलेली १४ कलमी यादी (२१४), अथवा रयतेला दिलासा देण्यासाठी काढलेल्या पत्रकाचा (२०९) आवर्जुन उल्लेख करावा लागेल. सुरवातीचे कंपनीचे अधिकारी बरेचसे उदारमतवादी होते. रयतेशी कसे वागावे, सतीबंदी, गुलामगिरी या संबंधीचे या पत्रकांतून आलेले विचार प्रागतिक स्वरूपाचे आहेत.

ज्या लोकांवर आपल्याला राज्य करावयाचे आहे त्यांचा इतिहास, चालीरीती यांचे संपूर्ण ज्ञान आपल्याला असावे अशी प्रारंभीच्या ब्रिटिश अधिकाऱ्यांची धारणा असावी. बरेचसे प्रादेशिक इतिहास याच काळात निर्माण झाले. त्याच्यामागे हीच विचारसरणी असावी. कोल्हापूरचा अहवाल लिहिण्याची कामगिरी पत्करल्यावर साहजिकच कॅप्टन ग्रहॅमला दफ्तरे धुंडाळावी लागली असणार आणि असे करीत असताना गोविंद निळोजी पारसनवीस विरचित 'मोत्याची लडा' हा फारसी, अपूर्व बखरवजा ग्रंथ त्याला गवसला (२१७). या मूळ फार्सी ग्रंथाचे हिंदवी भाषेत (बहुधा मराठीत) भाषांतर कॅप्टन ग्रॅहमने करवून घेतले. या अपूर्ण बखरींतील माहिती इतर बखरीशी ताडून पाहणे उद्बोधक ठरेल.

प्रस्तुत ग्रंथांत ज्या हकीकती आल्या आहेत त्यात मोहित्यासंबंधीची हकीकत चित्तथरारक आहे. १८२१ च्या सुमारास आबासाहेब छत्रपती यांना मोहित्यांनी जिवानिशी मारले आणि एकच कल्लोळ उठला. नारायणराव पेशव्यांच्या खुनाची

आठवण करून देणारा हा प्रसंग या ठिकाणी मोठ्या विस्ताराने आला आहे. (१४५, १४६, २२१) खुनाचे कारण अगदी क्षुल्लक होते. सैन्याच्या खर्चाचा, तलबेचा फडशा करून मोहिते मागत होते. यावरून बाचाबाची झाली आणि मोहित्यांनी महाराजासकट पाचसहा इसमांचे खून पाडले. ' हे कर्म तुम्ही फार अनुचित केले. सर्व महाराठ लोकास काळुखी लाविली आणि मराठ्यांच्या अन्नात माती कालविली ' अशी मोहित्यांची निर्भत्सना झाली. पण सूड बाकी राहिला होता. छत्रपतींच्या पाठीराख्यांनी मोहित्यांवर झडप घातली आणि एकटाकीने सात असामी मारून त्यांची शिरे कापून करवीरास आणली. येवढ्यावर प्रकरण मिटले नाही. मरळी येथे काही लोक गेले. मोहित्यांच्या बायकामुलास त्यांनी पकडून आणले. काही मुलांना फासावर लटकाविले, काही बायका जिवे मारल्या, आणि काहींना कैदेत डांबून टाकले हा सारा प्रसंग इतका चित्तथरारक आहे की तो मुळातूनच वाचून पाहिल्यास त्या दुर्घटनांचे भेसूर चित्र डोळ्यासमोर उभे राहील आणि १८२१ साली देखील अशा घटना घडत होत्या याचे आश्चर्य वाटते.

१८१८ नंतर महाराराष्ट्रात केवळ राजकीय स्थित्यंतर झाले नाही. पाश्चिमात्या-बरोबर नवीन विचार येऊ लागले. त्यांचे परीशीलन होऊ लागले. वृत्तपत्रे निघाली. निरनिराळे विचार त्या माध्यमाच्या द्वारा प्रसृत होऊ लागले. संस्थाने या परिवर्तनापासून अलिप्त राहीली नाहीत. जांभेकरांच्या दर्पणातील उतारे माहितीसाठी नकलून ठेवण्यात येऊ लागले. (१६८) याच सुमारास निघणाऱ्या ' दिग्दर्शन ' नावाच्या नियतकालिका संबंधी म्हटले आहे. " दिग्दर्शन म्हणोंन चांगला चमत्कारिक ग्रंथ नवा उत्पन्न होत आहे. त्यात हरयेक बातमी व रसायण शास्त्र व भूगोल वगैरे लिहितील..." (१७२). सर नेपियर यांनी मद्रासेत हिंदुस्थानातील शिल्पशास्त्रासंबंधी दिलेल्या व्याख्यानाचा तर्जुमा करवीरच्या राणीसाहेबांच्या माहितीसाठी करवून तो पुस्तकरूपाने छापून घेण्यात आला होता (२३८).

प्रस्तुत ग्रंथातील याद्या, टिपणे, कैफियती, (१४७, १६२, २१३, २२२, २२५ २२६, २२७, २३०, २३२, २३४, २३६, २३७, २३९, २४१) या मधून वंशावळी, तिथ्या, अनेक व्यक्ती, मानकरी आणि त्यांचे किताब, तोफांच्या सलामीचे टिपण, दरबारी वर्तमानाची यादी, स्वराज्य संस्थापक शिवाजी महाराजापासून कारकीर्दीचा तपशील, महाराजांचे जवळचे दूरचे नातेवाईक यांची साद्यंत माहिती आली आहे. ' शिवाजी महाराजांचा जन्म शके १५४९ शिवनेरी येथे झाला आणि पुढे राज्याभिषेक शके १५९६ जेष्ट शु॥१३ रोज मंदवारी रायगड मुक्कामी जाहला व मृत्यू पुढे १६०२ चैत्र शु ॥ १५ रोजी रायगडी झाला ' असे आहे. राज्यारोहण आणि कैलासवास या तारखा जेधे शकावलीशी जुळणाऱ्या आहेत. जन्मतिथी मात्र चिटणीसा-वर आधारित असावी. ही हकीकत १८७१ साली लिहिली आहे (२३७).

असा विविध माहितीने भरलेला हा साधन-ग्रंथ प्रकाशित करून श्री. शहाजी राजे छत्रपती आणि श्री. स. मा. गर्गे यांनी इतिहास संशोधकांची फार मोटी सोय करून दिली आहे. ऐतिहासिक दृष्ट्या हा ग्रंथ जसा महत्त्वाचा आहे, तसा १७३१ ते १८८२ या कालखंडात मराठी भाषेत झालेल्या स्थित्यंतरांच्या अभ्यासास देखील उपयुक्त ठरणारा आहे. पेशवाईतील मराठी धाटणीची भाषा, त्यानंतर फार्सीचे धडे गिरवून आलेल्या इंग्रजांनी मराठीत परत एकदा आणलेला बोजडपणा, आणि इंग्रजी भाषेच्या अभ्यासानंतर मराठी रचनेत पडलेला फरक थोडाफार येथे पहावयास मिळेल. संपादकांनी कागदपत्रांच्या नकला शुद्ध करून घेण्याचे व त्या छापण्याचे काम कसोशीने केले असले तरी, काही चुका अभावितपणे यात राहून गेल्या आहेत. यापैकी काही मोडी-वाचनाच्या, तर काही मुद्राराक्षसाच्या आहेत. विशेषतः, फार्सी शब्दप्रयोग जेथे आले आहेत तेथे वाचनाच्या चुका अधिक आहेत. उदाहरणार्थ मज्यालसीनच्या ऐवजी पंज्यालसीत, पेशजीच्या ऐवजी पेशवो, मुदामतच्या ऐवजी सुधामत, असे शब्द आले आहेत. जुन्या कागदपत्रात सामान्यतः ' सिंदे ' असा शब्द येतो. येथे ' शिंदे ' ' सिंदे ' या दोन्हींचा वापर आहे. मोडी कागदातून विरामचिन्हे नसतात. पण येथे संपादकांनी कदाचित् वाचकांच्या सोयीसाठी त्यांचा वापर केला आहे. अर्थात या दोषामुळे पुस्तकाच्या मौलिकतेत काही कमतरता पडली आहे असे म्हणता येणार आहे.

या ग्रंथातील माहितीच्या महत्त्वाचे दिग्दर्शन थोडक्यात वर आले आहेच. यापुढील दोन खंड प्रकाशित होतील तेव्हा करवीर आणि त्याचा परिसर यांचा भूतकाल अधिक स्पष्ट दिसू लागेल. श्री. छत्रपती शहाजी महाराज आणि श्री. स. मा. गर्गे यांच्या हातून हा संकल्प नजिकच्या काळात पूर्ण होईल अशी उमेद वाटते. प्रस्तुत खंडातील कागदपत्रे छत्रपती शाहूमहाराजांच्या कारकीर्दीपर्यंत येऊन थांबतात. महाराष्ट्राच्या सांस्कृतिक इतिहासाच्या दृष्टीने शाहूमहाराजांचा काळ हा अतिशय महत्त्वाचा आहे. श्री. शहाजी महाराज यांनी शाहूमहाराजां संबंधीच्या कागदपत्रांचा एखादा खंड प्रकाशित केला तर, सामाजिक इतिहासकारांची मोठी सोय होणार आहे, असे येथे नम्रपणे सुचवावेसे वाटते.

इतिहास विभाग
पुणे विद्यापिठ

अ. रा. कुलकर्णी



पहिली रांग : करवीर छत्रपतींच्या राजमुद्रा (शिक्के)
दुसरी रांग : पत्राच्या शेवटी द्यावयाच्या मर्यादामुद्रा (मोर्तब)







संभाजी महाराज करवीर, यांनी सुलतानजी बीन नरसोजी शिंदे पाटील, मौजे तळसंते, कर्यात वडगाव, प्रांत पन्हाळा यास, राज्याभिषेक शक ७८ (इ. स. १७५२) साली दिलेले वतनपत्र. त्यावर संभाजी महाराजांचा शिक्का असून, कोनाड्यात पंतप्रधान व पंतप्रतिनिधि यांचे शिक्के आहेत.

लेखांक : १

निवडी : १२५० / ता. १६ एप्रिल १७३१

स्वस्ती श्री राज्याभिषेक शके ५७ विरोधी कृत नाम संवत्सरे, चैत्र बहुल षष्ठी भृगूवासरे. क्षत्रीय कुलावंतस श्री राजा शाहू छत्रपती यांणी गोविंदराव मोरे यासी आज्ञा केली ऐसीजे. स्वामीची व चिरंजीव राजेश्री संभाजी राजे यांची भेट जाहली. वारणेपासून तुंगभद्रेपावेतो मुलुख दरोबस्त देखील गडकोट ठाणी त्याकडे दिल्ही. किल्ले कोपल चिरंजीव राजेश्री याकडे देविले असे. तरी त्यांची पत्र घेऊन येतील त्यांचे स्वाधीन कोपल किल्ला करणे जाणीजे. बहुत काय लिहिणे. मोर्तब.



लेखांक : २

राव विश्वासराव गायकवाड दप्तर : १ / ता. १६ जुलै १७३४

स्वस्ती श्री राज्याभिषेक शके ६१ रौद्रनाम संवत्सरे आषाढ शुद्ध त्रयोदशी गुरुवासरे क्षत्रीय कुलावंतस श्री राजा शंभू छत्रपती स्वामी यानी राजश्री देशाधिकारी व कारकून वर्तमान व भावी सुभा प्रांत खटाव यासी आज्ञा केली ऐसीजे. जोत्याजी बीन रुद्राजी व कृष्णाजी बीन हणगोजी व खळोजी बीन अनसोजी व तुकोजी बीन नरसोजी यादव पाटील मौजे कडेपूर कर्यात आऊंद प्रांत मजकूर यानी हुजूर विनंती केली की आपणामध्ये व साबाजी बीन तानाजी व सिदोजी बीन डोंगरोजी व दत्ताजी बीन देलोजी व कुसाजी बीन भीकाजी गुरव मौजे मजकूर यांमध्ये मौजे मजकूरच्या रानांत श्री देवडोंगराई डोंगरावर आहे तेथील पूजा व उत्पन्नाचा कज्या लागला होता. त्यांस आपण गुरव ऐसे राजेश्री श्रीनिवासराव पंडीत प्रतिनिधी याजकडे जाऊन त्यानी आपलाले[1] करीने जाहीर

१. हकीकत.

केले. त्यांनीं मनास आणून आम्हास व गुरवास राजेश्री नागोजीराव याकडे ईन्साफाकरिता कडेगावास पाठविले. त्यानी हरदू वादी यांस थल कर्यात कऱ्हाड येथे श्री कृष्णा व कोईना संगमास बरोबर आपले कारकून व मौजे मजकुरचे बारा बलुते व भोवर गांवचे पाटील देवून पाठविले आणि त्यास सांगितले की थलचे विद्यमाने श्रीचे तीरी हरदू वादी एकीकडे बसवून साक्ष सत्य साक्षीदारास घालुन प्रथकाकार विचारणे. म्हणून त्यावरून त्यानी हरदू वादी यास थलास नेऊन संगमी श्रीचे गिरी बसवून थलकरी मौजे सैदापूरचे मुकदम यांचे विद्यमाने आम्हास व गुरवास एकीकडे बसवून साक्ष भोवर गावचे पाटील व गावचे पाटील व गावचे बलुते यांस बोलावून त्यावरी सत्य सुकृत त्यांचे वडिलांचे घालून व श्रीचे उदक माथा घालोन येकेकास साक्ष विच्यारली – साक्षदार बी॥ तपशील —

भोवर गावचे पाटील

१. बहिरोजी पाटील, मौजे नेरली
१. दत्तोजी बीन सिदोजी पाटील, मौजे सोनसल
१. केरोजी पाटील, मौजे हिंगणगांव खुर्द
१. आप्पाजी पाटील व अंबाजी पाटील, कोतवडे
१. संक्राजी बीन रुद्राजी पाटील, तडसर
१. चिलोजी बीन कृष्णाजी पाटील, मौजे सोवली
१. बहिरजी बीन भीवाजी पाटील, मौजे सरिसगांव
१. केदारजी बीन नाईकजी पाटील, मौजे बेलवडे

कर्यात नीबसोड माईणी

१. संक्राजी बीन धनाजी पाटील, मौजे सासगाव
१. नींबाजी बीन सिदोजी पाटील व खलोजी पाटील, मौजे अबदापूर
१. सिदोजी बीन बाजी पाटील, मौजे चिखली

$\overline{११}$

मौजे मजकूरचे समाकुला पांढर[1] बलुते

१. पांढरीतील सर्व लहानथोर स्त्रीपुरुष.

१. बापुजी बीन जोती सुतार
१. सुभानजी बीन धुलोजी लोहार
१. धनाजी बीन पीराजी चांभार
१. सखोजी बीन धावजी कुंभार
१. म्हाळोजी बीन नरसोजी न्हावी
१. डोंगरोजी बीन सीदोजी परीट
१. डोंगरोजी
१. रघोजी साळी
१. डोंगरोजी फुलारी
१. अनंतभट बीन जीवभट जोशी
१. संक्राजी बीन बसवया जंगम
१. सावजी बीन येमाजी गुरव
१. हुसेन बीन सैद अल्ली मुल्लाणी

१३

१. खंडसेठ बीन म्हादसेठ सेठ्या
१. आंबाजी बीन तुकोजी गोंधळी
१. तुकोजी बीन सिबजी तेली म्हेतर
१. नरसोजी बीन तुकोजी गावगुरव
१. नींबाजी बीन रुद्राजी चौगुला
१. जननाक बीन संतनाक म्हेतर माहार
१. गंगनाक बीन सपनाक आंबेड म्हेतर माहार
१. जननाक बीन भरमनाक मांग

८

एकूण २१

येणे प्रमाणे साक्षीदार यानी गोही (ग्वाही) दिली. प्रथक प्रथक लिहून त्याचा अर्थ अवघीयाचा साक्षीचा येकच जाबसालाने साक्षपत्रे व थल मौजे सैदापूरचे पाटील यांची अर्दास लिहून दिली ते घेऊन नागोजीराव याजकडेस पाठविली. त्यानी मनास आणून ती साक्षपत्रे व गोहीदार त्यास राजश्री पंत प्रतिनिधी याकडेस उंबरजेच्या मुक्कामास पाठविले. त्यांनी कागद पत्र वाचून

पाहाता साक्ष अवघीयाची लिहिली होती ती एकच की, श्री देवाचे भांडारग्रह व पुजा पुनस्कार व नैवेद्य होणे व खारीक खोबरे हे देवाचे पाटील खात आले हे आपले वडील वडीलो सांगत आले हे आपणास ठाऊक आहे. गुरवाने मुलकात श्रीचा आंगारा फिरवावा व देवापुढे पाअली तांब्याचा येईल तो घेऊन असावे. या खेरीज त्यास संमंध नाही. म्हणून साक्षी गुदरल्या. त्या पाहोन त्यानी ईन्साफ विलेस लावावा. याजकरिता त्याची चौकशी गोहीदारास बोलावून केली. त्यावरून गोहिदार बोलिले जे श्रीचे तीरी साक्ष दिली. त्यातुन दुसरी गोष्ट आपणास ठाऊक नाही ऐसे गोहीदार बोलिले व हरदु वादी यांची चौकशी करून विचारिले. त्यास आम्ही हरदु वादी बोलिलो की, गोहिदाराने साक्षी दिल्या त्या दिवाणात दाखल झाल्या. आपण आपली तक्रारी भोगवची पासी लिहून देतो, त्याप्रमाणे आपणास श्रीची क्रिया दिली तर क्रियेस राजी म्हणून बोलोन आम्ही हरदु वादी यानी आपल्या तक्रारी लिहून दिल्या बी तपशील—

तकरीर कर्दे[1] जोत्याजी बीन रुद्राजी व कृष्णाजी बीन हणगोजी व खलोजी बीन अनसोजी व तुकोजी बीन नरसोजी यादव पाटील मौजे मजकूर यानी लिहून दिली तकरीर ऐसीजे. श्रीदेव डोंगराई तुळजापुरीहून आपले वडिलांचे भक्तीस आली. आपले वडिलास दृष्टांत जाहाला की, आपली पूजा पत्री चालवणे. त्यास एक ब्राह्मण अडीसेरी देवून ठेविला. पूजा चालो लागली. मग भागाई भोरी कुलवाडणी गावात होती. ती गुप्तरुपे देवाचे भक्तीस लागली. तिची भक्ती देवास मानिली. त्यावरी देव डोंगरावरी जाहाला. आपले वडिलांनी डोंगरावर देवाची स्थापना करून देवाची पूजा करू लागले. मग कित्येका दिवसानी आगांतुक गुरव पुजेस आपले वडिलांनी मुतालकीस ठेविला. तो पुजा करू लागला. त्यावरी गावच्या गुरवानी आपले वडिलास बाजदि (?) होवून देवाचे चाकरीस आगांतुक गुरवास ठेविले, त्यास आम्ही तुमचे कदीम गुरव आहो, आपले तर्फेने आम्हास देवाची चाकरी सांगाल तर करु म्हणोन बोलिलो. त्यावरून गावच्या गुरवास सांगितले की, मुलकात आंगारा नेत जाणे व देवापुढे तांब्याचा पाअली येईल ती घेत जाणे व देवाची पूजा आगांतुक गुरव व तुम्ही करीत जाणे. पाअली आंगाऱ्यामुळे जे येईल ते दोन्ही कलमा पैकी चौथाई आगांतुक गुरवास देणे. तीन तक्षीमा तुम्ही घेणे. त्यावर आमची हक्कदारी

---

१. लिहून देणार.

देत जाणे ऐवजी मोईन करून[1] गुरवास ठेविले. त्याप्रमाणे गुरव व मौजे मजकूरचे व आगांतुक वर्तन होते त्या आलीकडे आगांतुक गुरव व गावगुरव येक होऊन आम्हासी नव दिगर[2] करून आपणच देवाचे उत्पन्न खावू लागले. गावातील गुरव व नरसोजी व रानजी यानी सांगितले की, तुम्ही पाटीलासी घासाघस लावू नका. लावाल तर आम्ही तुम्हात नाही. तुम्ही सेवट लागेल ते करणे म्हणून सांगितले. परंतू गुरवानी ऐकिले नाही. सन सबा पासून त्याचा व आमचा कज्या लागला आहे. येणेप्रमाणे आपली तक्रार आहे. म्हणून श्रीची क्रिया करून, उदक गुरवाचे हातावर घाळून खरे उतरलो तर सदरहु तक्रारीप्रमाणे पूजा व उत्पन्न अनुभवू. खोटे जाहालो तर देवाचे पूजा व उत्पन्नास संबंध नाही. गोताचे अन्याई, दिवाणचे गुन्हेगार हे तकरीर. सही छ २२ जमादिलाखर सन साल मजकूर.

तकरीर कर्दे साबाजी बीन तानाजी व सिदोजी बीन डोंगरोजी व दत्ताजी बीन खेलोजी व कुसाजी बीन भीकाजी गुरव, मौजे कडेपूर कर्यात आऊंद, लेहून दिली तकरीर यैसीजे, श्री देव डोंगराई तुळजापुरीहून भागाई भोरीचे भक्तीस कडेपुरास आली त्या पासून पूजा आपली देवाची आहे. तेथे पाटीलाची हक्कदारी बी॥ तपशील

हक्क होन २ एकूण कलम १	बकरे पडेल त्याची खुरी मुंडी १
बकऱ्याची खुरकी रुक्के ८	भक्तानी बकरे मारून नैवेद्य केला (तर)
पैकी रुके ०६ एकूण कलम १	पाटीलास जेवावयास बोलवावे कलम १
वस्त्रे देवाचे उताराची	देवाचे फुलोरा....................व निम्मे
कलम १	घ्यावे. कलम १

येकूण कलमे साहा ६ पाटीलास देत आलो. या खेरीज पाटीलास संबंध नाही. आपले वडील कुणबावा दोन चावर करीत होते, हे तकरीर श्रीचे मुखे खरी करून क्रियेनिसी देवू. क्रियेस खोटे जाहालो तर आपणास संबंध नाही. खरे जाहालो तर सदरहू प्रमाणे आपण खाऊ. हे तकरीर सही.

येणे प्रमाणे गोताचे विद्यमाने आम्हा हरदू जणाच्या तकरीरा घेवून ईनसाफ गोतावर टाकिला. गोतानी मनास आणून हरदुजणास समजावून सांगावे

---

१. ठरवून देऊन, २. अडवणूक.

अगर क्रियेस रजामंद असलीया क्रिया करवावी. त्यास क्रियेस गुरव कापो लागले. क्रियेस नीठावेनात. मग विचार करून गोतानी येवून वर्तमान दिवाणात विदीत केले. त्यावर राजश्री पंत प्रतीनिधी यानी आमचा व गुरवाचा व्येवहार, गोही साक्षी गुदरल्या त्याचा अर्थ व तकरीरा मनास आणून सदरहू गोतास बोलावून गोताचे विद्यमाने आम्हास व गुरवास फुरसीस केली की, तुम्हा हरदुजणाचा तह करून देवू. त्याप्रमाणे वर्तावयास राजी असला तर हरदुजण वादी आपलाले राजीनामे लिहून देणे. त्यावरून आम्ही हरदु वादी यानी राजीनामे लिहून दिले. त्यावर आम्हा हरदुजणास नीक्षून सांगितले की, गुरवास देवाची पुजा उत्पन्नापैकी तिजाई करार करून दिली व कुणबावाही दोन चावर पैकी तिजाई करार करून दिली. आम्हास दोन तक्षीमा पूजा उत्पन्नापैकी व कुणबावा दोन चावर पैकी दोन तक्षीमा करार करून देवून आमची व गुरवाची समजावीसी करून दिली. आम्ही व गुरवानी समजोन या प्रमाणे चालावे यैसे ठरावून दिले. त्यावर आम्ही व गुरव मौजे मजकुरास गेलो.

मागती गुरवमजकूर राजश्री पंत प्रतिनिधी मौजे किनई, संमत कोरेगाव, प्रांत वाई येथे श्री येकवीरा भवानीचे यात्रेस गेले होते, तेथे जाऊन उभे राहिले की, आपला व पाटीलाचा कुसुर उरला नाही. आपण तकरीरा डोईस बांधोन श्रीपुढे दिव्य करतो. दिव्यामुळे खरे जाहालो तरी आपले तक्रारी प्रमाणे खाऊ. खोटे जाहालो तर आपणास पूजेस व कुणबावीयास अर्थाअर्थी संबंध नाही. पाटीलानी अवघे पूजा उत्पन्न खावे. तरी आपणास रवा देवून आपला संदेह वारीला पाहिजे. म्हणून त्यावरून आम्हास पंडीत मशार नीलेनी हुजुर नेकू (?) विचारले. त्यास आम्ही बोलिलो की, गुरव दिव्यास खरा निघाला तर आपण खोटे. वतनास संबंध नाही. अवघे गुरवानी खावे. जर गुरव दिव्यास खोटे जाहाले व आपण खरे जाहालो तर देवाचे पुजा व उत्पन्न व कुणबावा सदरहू तक्रारी प्रमाणे खाऊ. गुरवास संबंध नाही. म्हणून आपण मान्य केले. मग आमचे व गुरवाचे बोली प्रमाणे घेऊन गुरवास श्री पुढे दिव्य नेऊन दिव्य घ्यावयास बराबर खंडो अनंत सुभेदार किल्ले वासगी व देशमुख व देशपांडे व हमशाही गोत व भोवर गावचे पाटील व बारा बलुते देवून डोंगराई संनीध पाठविले. त्यानी जाऊन कार्तीक वद्य नऊमी ९ शनीवारी कुसाजी बीन भीकाजी गुरव याचे हात साबणाने धुवून नखे काढून लखोटा हातास करून चौकी देवून त्यास

ठेविला. दुसरे दिवशी रवीवारी देवांचे नंदीजवळ दिव्याची सामुग्री व रवे पात्र आणून यथाविधी करून पात्र स्थापून त्यामध्ये केवडी व तेल मोइनप्रमाणे घालोन आणि भाते लावुन तापविले. मग कुसाजी गुरव अगोदर स्नान करून मंडील घालोन उभा होता. त्या देखत रवा पात्रात टाकिला. तो त्याने पाहुन तक्रारी प्रमाणे चीरपत्र मस्तकी बांधोन रवा पात्रातुन उचलुन पांच बोटाने काढुन बाहेर टाकिला. मग त्याच्या हातात रवलेती घालोन लाखोटा करून बरोबर दिवाणची माणसे देवून कुसाजी गुरव व त्याचे भावबंध गुरव व आम्हास कसबे उंबरजेच्या मुक्कामास स्वामी संनीध पाठविले. हरदूजणानी दिव्याचे वर्तमान हुजुर सांगितले. त्यावरून कुसाजी गुरव यांचा हातचा लाखोटा हुजुर तोडुन हात पंज्या लसीत पाहिला. परीक्षा करिता गुरवास रवा लागला. पांच बोटे भाजली. काळी जाहाली. याजकरिता रवा लागला म्हणून खोटा गुरव जाहाला. गुरव मजकुरास श्रीच्या पुजा उत्पन्नास व कुणबावच्यास अर्थाअर्थी संबंध नाही, म्हणून पंज्या लसीत टाळी पिटुन गुरव मजकूर लटीके म्हणून राजश्री व समस्त लोक बोलिले. गुरवास........खरा देणे म्हणून आज्ञा केली. त्यावरून गुरवाने खरा आपले नावे लिहून दिले. मनास आणिता पुरातन श्रीचे पुजारेपण यादव पाटील मौजे मजकूर याचे खरे ऐसे जाणोन स्वामी कृपाळू होवून यादव पाटील यांचे पुजारेपण असे. तरी याचे वतन पुत्रपौत्रादी वंशपरंपरेने चालवीत जाणे. सदरहु प्रमाणे तीर्थरुप राजेश्री शाहुराजे दाजी यांचे पत्र होते ते विदीत केले. त्यावरून स्वामीनी पूर्वोत्तर करीना व पत्राचा मजकूर व भोगवटा मनास आणुन श्रीचे पुजारीपणाचे वर्तन सदरहु यादवाचे खरे ऐसे पाहून यादव मशार याचे केले असे. वतन संबंधे कानु कायदे जे असतील ते पाटील मशार यास वंशपरंपरेने चालवीत जावे. प्रतीवर्षी नवीन पत्राचा उजूर न करणे. या पत्राची प्रती लिहून अस्सल पत्र परतोन द्यावे. जाणीजे. नीदेश समक्ष-

रुजू सम्मत मंत्री

(शिक्का मोर्तब)



लेखांक : ३

निवडी : १२७६ / ता. ३१ जुलै १७३४

स्वस्ती श्री राज्याभिषेक शक ६१ आनंदनाम संवत्सरे श्रावण शु॥ १२ क्षत्रीय कुलावतंस श्री राजा शंभू छत्रपती स्वामी याणी बाबूराव बिन जानोजी नलवडे यासी दिल्हे इनामपत्र ऐसाजे. तुमचे चुलते जानोजी नलवडे सरनोबत किल्ले सामान गड हे स्वामीचे सेवेकरता स्वामी कार्यावरी ताम्राचे भांडणात पडले. त्यास दत्तक देऊन सर्व प्रकारे चालविणे स्वामीस परम आवश्यक. सांप्रत समस्त किल्लेकरी याणी विनंती केली की जानोजी सरनोबत हे स्वामी कार्यावरी खर्च जाहले. त्याची स्त्री गेनुबाई यानी दत्तपुत्र घेऊन योगक्षेम चालावे असा इनाम करून दिल्हे पाहिजे म्हणोन त्याजवरुन स्वामी कृपाळू होऊन तुम्हास दत्तक घेऊन नूतन इनाम कुल बाब कुल कानू, खेरीज हक्कदार इनामदार करून मौजे हणमीनिहाळ कर्यात नूल प्रांत हुकेरी देह १ एक रास इनाम करून दिल्हे असे. तरी तुम्ही मौजे मजकूर पूर्वमर्यादेप्रमाणे चतु:सीमा आपल्या स्वाधीन करून घेऊन इनाम व सरनोबतीचे वतन तुम्ही व तुमचे पुत्र पौत्रादी वंशपरंपरेने अनुभवून स्वामीचे राजनिष्ठकरून सुखरूप राहणे. स्वामी तुम्हास सदरहू इनाम सुरक्षित चालवितील. निदेश समक्ष

बार बार



लेखांक : ४

निवडी : २४७२७ / ता. २ मार्च १७३६

स्वस्ती श्री राज्याभिषेक शक ६२ अनलनाम संवत्सरे चैत्र शुद्ध प्रतिपदा भौमवासरे. क्षत्रिय कुलावंतस श्री राजा शंभू छत्रपती स्वामी याणी वलंदेज यासी करून दिल्हा तहनामा ऐसा जे वलंदेज कुडीदोर गुलीयास........ ....खीलणेस बंदर कोची याणी जंजिरे सिंधुदुर्गचे बंदरास आपणाकडील जहाजावरून दुबानदलील व दिनदेनभाई या दोघाबरोबरी कोल्हापूरचे मुक्कामी पत्र पाठविले असता जाहला करार बी तपशील

वलंदेज बहाद्दर

महाराजा सन्नीध बसोन बोली केली की स्वामीची व वलंदेजाची गोडी व

खुलाता बळकट जाहला तो यावत् चंद्र सूर्य बरकरार चालावा. मध्ये अंतर होऊ नये. कलम

महाराजानी आपणास मालवणचे बंदरी वखार बांधावयास जागा दिल्हे आहे तो वेंगुर्लेस वखार होती त्याप्रमाणे आपला खर्च लावून बांधोन घ्यावी. वेंगुर्लेस पहिले आपले चालवीत होते तैसे चालवावे म्हणोन विनंती केल्याप्रमाणे करार असे. कलम

जहाज बंदरात येता वादळाने सिकस्त जाहले तरी आपले लोक लावून जिन्नस निघल तो आपला आपणास काढून घ्यावा. त्यास खर्च लागेल तो वरकड बंदराचे शिरस्त्याप्रमाणे वलंदेजानी आपणाकडून घ्यावा. कलम

पूर्वी वेंगर्लेस फोतोरी म्हणून वखार होती ते लुटोन नेली. त्या गोष्टीचे आपले मनामध्ये काही नाही. कलम

आणखी टोपीकर वखारीस जागा मागतील त्यास तेथे जागा न द्यावा. जहाजावरून जिन्नस उतरल त्याची व येथील जिन्नस भरती करतील त्याची जकात घेऊ नये. वेंगुर्लेस चालत होते त्याप्रमाणे चालवावे. कलम

वखारीत कोणी चोरी केली तरी त्याचे पारपत्य करावे. कोणी वखारीवरी चढाई केली तरी त्यास मारून काढावे. जे कमती (ते) आणून द्यावा. कलम

आपणाकडील माल उदमी नेतील त्याचा पैका न देता दगलबाजी करतील त्यांचे पारिपत्त्य करून पैका घेऊन आपणास द्यावा व आपले चाकर लोक कोण्ही पैके न (देता) जातील ते कबजी मुलखात उमगवील त्यास धरून आणून द्यावे. कलम

आता हे बोली. या खेरीज काही बोली असली तरी पुढे होईल. कलम

येकूण कलमे आठ शालीवाहन शके १६५८ सोलासे अठावन, जिहाबाच निगस्त अयद (?)

(शिक्का)

तारीख २९माहे शव्वाल सु।। शीत सल्लासीन मया व अलफ



लेखांक : ५

राव विश्वासराव गायकवाड दप्तर : २ / ता. १३ एप्रिल १७३७

श्री

स्वस्ती श्रीराज्याभिषेक शके ६३ पिंगला नाम संवत्सरे चैत्र शु ॥ द्वादशी भृगुवासरे क्षत्रीय कुलावंतस श्री राजा शंभु छत्रपती स्वामी यानी मुकदमानी मौजे कडेपूर कर्यात आऊंद प्रांत खटाव यास आज्ञा केली ऐसीजे – तुमचा भाऊबंद कानोजी यादव बाहेर पडोन लष्कराची स्वारी गावावरी आणून साडेसातशेहे रेगु गावाची वळून नेली. आणि लष्करचे लोकांस वाटून दिली. त्याचे सुटकेबद्दल तुम्ही प्रसिद्धगडचे मुक्कामी आलेत तेव्हा कृष्णाजी यादव पाटील मौजे मजकूर हे राजेश्री गीरजोजी यादव याजजवळ त्यांचा कारभार करीत होते. त्या जवळून गिरजोजी यादव याजजवळ रद्दबदली गुरे सोडवावयाची करविली. त्यावरून गीरजोजी यादव यास गुरे सोडवावी हे आगत्य होऊन त्यानी हुजूरकडून सरदारास हुजूरची पत्रे व हुजुरे पाठवून दिले. गुरे खंडणीविना न सुटत. तेव्हा दर गुरास रुपये दोन २ प्रमाणे साडेसातशेहे गुरास रुपये पंधराशेहे रु. १५०० केले. आणि गुरे लष्करचे लोकानी तोडाविली होती ती जमा केली. ते उपरी सरदाराकडे हुजूरचा ऐवज येणे. त्याऐवजी गिरजोजी यादव यानी हुजुरून दीड हजार रुपये बद्दल मुशाहिरा मागून घेवून सरदारास दीड हजार रुपयाची सनद पाठविली. त्यावरून सरदारानी हुजूरचा ऐवज देणे त्यात दीड हजार रुपये वजा करून साडेसातशेहे गुरे सोडून दिली, ती तुम्ही मौजे मजकुरास आणिली. सदरहू दीड हजार रुपये गीरजोजी यादव यांनी कृष्णाजी यादव पाटील मौजे मजकूर यांचेबद्दल मुशाहिरा लिहिले. या करिता तुम्ही रुपये कृष्णाजी यादव यास द्यावे ते दिले नाही. यास्तव तुम्हास हे आज्ञापत्र सादर केले आहे. ती तुम्ही हे जाणून सदरहू साडेसातशेहे गुराबाबत पंधराशेहे रुपये कृष्णाजी यादव पाटील यास देणे. काही जिकीर न करणे. जाणीजे. निर्देश समक्ष.

रुजु समत



लेखांक : ६

राव विश्वासराव गायकवाड दप्तर : ३ / ता. ७ सप्टेंबर १७३८

राजेश्री गिरजोजी यादव ता।। मोकदमानी मौजे कडेपूर कर्यात खु।। तिसा सलासीन आलफ उपरी तुमचा भाऊबंद कानोजी यादव बाहेर पडोन लष्करास जाऊन स्वारी आणुन गावची गुरे सातशेहे वळून नेली ते लष्कराच्या सरदारानी ....त्याचे सुटकेबद्दल तुम्ही रांगणीयांचे मुक्कामी येवून वर्तमान सांगितले. तुमचे भाऊ राजेश्री कृष्णाजी पाटील हे आमचे बहुता दिवसाचे कारभारी याकरिता यासही भीडेस घालून रदबदली करविली. यामुळे गुरे सोडवावी हे आम्हासही जरूर लागले. याकरिता आम्ही दिवाणात अर्ज करून दिवाणाची ताकीदपत्रे व हुजुरे गुराबद्दल पाठवून दिले. गुरे काही येके जागा नाही. चहुकडे वळोन गेली. गुरांचे सुटकेस बहुत दिवस लागले. लष्करचे लोक खंडणी घेतल्याखेरीज गुरु एकंदर न देत. तेव्हा दर गुरास खंडणी रुपये २ प्रमाणे मागो लागले. ते सरदारानी कबुल करून सारी गुरे जमा केली. त्याची खंडणी साडे सातशेहे गुरांची रुपये १५०० दीड हजार जाहाले. त्यास लष्करचे सरदाराकडे दिवाणे १ तोफी यांचा ऐवज हुजूर पोतास यावा. त्यापैकी दीड हजार रुपये वजा करून साडेसातशेहे गुरे तुमची सोडून दिली. ते गुरे तुम्ही घेवून गेला. हुजूरचा ऐवज त्यानी वजा केला. त्याचा भाग वरून घ्यावा लागला. याकरिता आम्ही दिवाणाकडे अर्ज करून दीड हजार रुपये आम्ही आपले बद्दल मुशाहिरा लिहून घेवून दिवाण या भागावरून सदरहु दीड हजार रुपये आम्ही आपणाकडून राजेश्री कृष्णाजी पाटील यादव यास बद्दल मुशाहिरा दिले आहेत. तरी हे जाणोन सदरहू ऐवजाचा निकाल करून मशारनीलेकडे भाग वरून देणे. जाणीजे छ २१ माहे जमादिलावल. सदरहु ऐवज याचे नावे खर्च पडला आहे. तरी लिहिलेप्रमाणे प्रविष्ट करणे. फिरून भोभाट येऊ न देणे – जाणीजे.



लेखांक : ७

निवडी : १३१० / ता. १९ जुलै १७५४

अखंडीत लक्ष्मी अलंकृत राजमान्य राजेश्री रामचंद्र नारायण गावसेवक. बाळाजी बाजीराव प्रधान नमस्कार सुखरुप आहे. खमस खमसेन आलफे तुम्ही

छा।. १५. रमजानचे पत्र पाठविले ते छ २४ रमजानी पावले. लिहीले वर्तमान विदीत जहाले. सप्तरुषीहून फिरोन मातोश्रींनी व बाबाजी जादव व आणखी गृहस्थाची पत्रे आली व खुणेस हिऱ्याची मुद्रा पाठविली. तुमचा मार्ग चातकन्याये पाहात आहो. खोटा दागिना तुमची हवाली करीतो. तुम्ही येथे येताच हवाली करितो. श्री कुलस्वामीची शफथ या आन्वये पत्रे आली. आम्हास पत्रे खुणा दाखविली ती ध्यावी. श्रीमंत सौ. वती बाईसाहेब याणी सांगितले की ज्याणी वीष दिल्हे त्याचे हस्ते उतार घेणे, येणे करून परिणाम उत्तम नाही. जे होणे ते प्रधानपंताचे हाते होईल. श्रीमंत सौ. बाईसाहेब याणी उभयता गृहस्थास विचारले की आम्ही पेशव्याचे भरवशावरी असता त्यासी क्रियेस उत्तम असेच म्हणतील की काय? त्याजवरी भागवतपंत व शेषोपंत बोलिले जे पेशव्यांच्या विश्वासावरी स्वामी असता स्वामीच्या मनोदयानुरूप त्याजकडूनच घडून येईल, म्हणून विस्तारे लिहिले ते कळले. येसीयासी समक्ष जे जे बोलिला त्यात अंतर तिळ मात्र नाही. जे काराग्रही आहेत ते पूर्ण लटीके. आमका बाप, आमकी आई व गाव आमका ऐसा पूर्ण पत्ता लावावा व तो जगविख्यात व्हावा. मग हा अर्थ ताराबाई करोत अथवा सौ. संपन्न जिजाबाई करोत. हा अर्थ जगविख्यात जहालीया मग आम्हास तिळमात्र अभिमान नाही. आमचे अर्ज मात्र खावंदाचे कार्य सिद्धि जहाल्यावरी आयकावे लागतील. व जे आम्हा विरुद्ध सांप्रतकालीचे सप्तरुषीतील मुख्य इच्छितील ते कर्ता येणार नाही. व खावंदाचे मनात ममता आहे, तरी असे घडणार नाही. पूर्ण कार्य सिद्धि व्हावी. आम्हांस लोकानी बेमान मात्र न म्हणावे. आम्ही भोसल्याचे वंशाचे चाकर. तेच नाहीसे जहाल्यावरी आम्हास दोष नाही. इतका मात्र आमचा अर्थ आताही व समक्ष बोलिलो तेव्हाही. विस्तारे वारंवार काई लिहणे बहूत काय लिहणे.



लेखांक : ८

निवडी : ७३६७–६८ / ता. २४ फेब्रुवारी १७६२

यादी येणे प्रमाणे सरकार निसबतीची कलम करारांत लिहून ध्यावी.

वारणे एलीकडे राजमंडळाचा तालुका जो आहे तो साहेबाकडे निर्वेध असावा.

सुदामत चालत आल्याप्रमाणे चालवू.

हुकेरी प्रांत साहेबाचे खासगीत दरोबस्त दिल्हा. त्याप्रमाणे निर्वेध साहेबाकडे चालावा.

हुकेरी प्रांत दरोबस्त निर्वेध साहेबाकडे चालवू.

सातारचे राजधानीचा खासगी खर्चाचा सरंजाम साहेबाकडे द्यावा.

जरुराती खर्चाप्रमाणे काही सरंजाम काही नक्ती नेमणूक करून देऊ.

धन्यासन्नीध लहान मोठे सेवक सेवा करून होते त्या (फाटले आहे) ते प्रमाणे चालवावे.

नुरूप समजून करू.

धणी यांचे हुजुरातीस किल्ले आहेत. त्याचा सरंजाम पूर्वील नेमणुकी प्रमाणे किल्लेचे तनखे किल्लेकडे सुधामत चालवावे.

भोगवट्याप्रमाणे निर्वेध चालवू.

सनदेने लोकास गाव इनाम दिल्हे व वतन करार जहाली असतील ती चालवावी. अंतर करू नये.

भोगवटा मनास आणवून चालवू. भोगवटा नसल्यास सनद असली तरी मनसुबेची रीतीने मनास आणून योग्य असेल ते चालवू.

सरदेश कुलकर्ण्याचे व इनाम गाव चालवावे.

सुदामत प्रमाणे चालवू.

संस्थान बिदरूर व सौंदे व सावनूर येथील तोफांचा ऐवज करार पेशवी जहाला आहे. त्याप्रमाणे साहेबाकडे निखालस पावावा.

पावत आल्याप्रमाणे ऐवज पावता होईल.

साहेबात व तुम्हात किमपी पडदा नसावा. साहेबी जे केले ते तुम्ही परिणामास नेऊन साहेबाचे लक्षानुरूप प्रांजले साहेबासी असावे.

साहेबी ल्योकाप्रमाणे येकत्यार दिल्हा आहे. बरेवाईट करावयाचा एकत्यार साहेबानी दिल्हा आहे. ऐसे असता ज्या ज्यास स्वामीस उत्तमच ते सेवकापासून होईल. साहेबांचे उत्तम लक्ष असेल त्यास अंतर होणार नाही.

सिंदे नरगुंदे व पतके हुजूर पागेचे सरदार सरंजाम सुद्धा पूर्वतात प्रमाणे धण्याचे हुजुरातीस त्याणी असावे. त्याचे सरंजाम चालविणेचा फडशा होणे तो हुजूर (फाटले आहे).

साहेबाचे मर्जीप्रमाणे हुजुरातीस करत आहे. तसे राखू.

सेनाखासकील याचा सरंजाम नेमून दिल्हा आहे. कांही चालतो. कांही चालत नाही. आगत्यवादे त्याचा सरंजाम नेमून दिल्हेप्रमाणे चालवावा.

भोगवटे प्रमाणे चालवू. जो चालत नसेल त्याची चौकशी मनास आणून चालवावया योग्य दिसल तो चालवू.

सरदेशमुखी व बाजे वतन सरकार तालुकेस आहेत. ती सरकारात असावी.

जसा दहा वीस वर्ष सरकारांत अमल असल तसा चालेल.

अंग्रेकडील पंचमहालाचा मक्ता करार केला. त्याप्रमाणे ऐवज साहेबाकडे द्यावा.

चिरंजीव भाऊनी येऊन करार केला त्या प्रमाणे प्रविष्ठ होईल.

सदरहु प्रमाणे चालवावयासी शफथ कुलस्वामिनीची. अंतर करू तर असो.

यादी लिहिली मखलासी कोल्हापुरचे मोकामी श्रीमंते केली. परंतु यादी वर साल, तारीख, महिना नव्हता. सबब शोध.

हली सन ईसने सीतेनात फाल्गून मासी मौजे वणूर प्रांत कित्तूरचे मोकामी श्रीमंत राजेश्री माधवराव पंडीत प्रधान आले तेव्हा लिहिला असे.



लेखांक : ९

निवडी : ७३६२ / इ. स. १७६२

यादी नि॥. श्रीमंत मातोश्री बाई साहेब यांजकडील कलमे करार करून द्यावी यांची सु॥ ईसने सीतईन मया व अलफ.

राज्यास अधिकारी साहेबी प्रस्तूत पुत्र योजिला आहे. त्याची स्थापना करून वंद्य करावा. करार.

हुकेरी प्रांत साहेबाकडे दरोबस्त खाजगी करून दिल्हा आहे. तेथील अम्मल निखालस करून घ्यावा. चिकोडीकराची ठाणी आहेत. ती काढून सरकारातर्फेस अमल सुधामत चालवावा. खेरीज इनाम गाव येणे प्रमाणे करार करावे. करार.

वारणे अलीकडील तालुका राजधानीचा आईसाहेबाकडे कैलासवासी नाना नी लिहून दिल्हा आहे. त्याप्रमाणे निर्वेध चालवावा. येणे प्रमाणे करार करावे. करार.

सिंदे, नरगुंदे, बावडेकरी, विशालगडकरी, सेनापती व पतके वगैरे सरदार याणी धण्याकडील लक्ष धरून हुकुमात वर्तावे. येविसी पेशजीचा करारदाद आहे. त्यास पुन्हा ताकीद होऊन हुकुमात वर्तवावे. व त्याचे पारिपत्य करून अमलात आणून घ्यावे उत्तम आहे. करार करावे. करार.

सौंधे, बिदनूर व सावनूर या तिन्ही संस्थानचे ऐवजाचा पेशजी करार दाद होऊन संस्थाने साहेबी पेशजी कैलासवासी नानाकडे दिल्ही. कराराप्रमाणे सालदरसाल ऐवज पावता करावा. तूर्त ऐवजाचा वोढा आहे. आमदानी जहाले तरी देणे ते करार करून देऊ. करार करावे पेशवी पावत आल्याप्रमाणे देऊ. करार करावे. करार.

मनोळीचा सरंजाम व ठाणे साहेबाकडे घ्यावे. राणोजी सिंदे याची स्थापना तेथे करावी. ऐसा करार पेशजी होऊन सरकारात नजर घेतली आहे. व खाली आपणही करार केला त्याप्रमाणे ठाणे सरंजाम निखालस करून घ्यावा.

येणे प्रमाणे करार करून घ्यावा. करार.

सातारीयास खोटा प्रकार जहाला आहे. सर्वांचे प्रत्ययास आला. या उपरी त्याविसीचा साक्षेप न करिता आपले विचारे बाईसाहेबी पुत्र घेतला हाच प्रति पाद्य करावा. करार करावा.

पुण्यास गेलिया नंतर विचार करून कर्तव्य ते केले जाईल. करार.

सातारीयाचा मजकूर येथास्थीत घडोनी आल्यास राजश्री नानानी तेथील राज्याचे बंदोबस्तीचे करारदाद लेहून याद साहेबाकडे दिल्ही आहे. त्याप्रमाणे चालवावे.

हाच मजकूर ठरला तरी तीर्थरुपांचे कराराप्रमाणे चालावे. येणे प्रमाणे करार.

हुकेरी रायबाग हा तालुका बाईसाहेबाकडील. याजपैकी फुटगांव फुटमोकाशाकडे आहेत. मालुमातीस सनदा करून घेऊन गाव बळकाऊन अनुभवितात. त्या दोन्ही तालुक्यातील गाव मोकासी व देशमुख कढून घेऊन

सरकारात साहेबाकडे घ्यावेत. येणेप्रमाणे करार करावेत. फौजेच्या शहाने बसतील ती बसवावी. करार करावे. करार.

सर्वाविसी साहेबासी मर्यादीस अंतर न करिता निष्ठेने असावे. येणे प्रमाणे करार करावे. करार.

कोकणच्या सनदा साहेबी करून दिल्हाचा करारदाद पेशजी दिनकर महादेव याचे विद्यमाने जाहल्या आहे. त्या प्रमाणे दरसाल दहा हजार रुपये सरकारात घ्यावे. चालत आल्याप्रमाणे चालेल. सेनाखासकेल याजकडील सरंजाम पेशजी पासून चालत आला आहे. त्याप्रमाणे सरंजाम निखालस चालवावा. सुधामतप्रमाणे चालवावे. करार करावे. करार.



लेखांक : १०

निवडी : १९७५८ / : इ. स. १७६२–६३ (१)

चिरंजीव राजमान्य राजश्री शाहाजी भोसले यासी श्रीमन्महाराज मातुश्री जिजाबाई साहेब आशीर्वाद. उपरी, साहेबास राज्यास अधिकारी करणे आवश्यक यास्तव साहेबी माहाराजांच्या वंशातील लगते पाहाता सर्वहीपेक्षा तुम्ही साहेबास जवळ, हे पाहोन मौजे खानवटहून तुम्हास आणून विचारीले. त्यावरून तुम्ही आपल्या आत्मसंतोशे विनंती केली की, आपला आहे तो साहेबाचा पुत्र. साहेबी घेवून राज्याधिकारी करावे. राज्याविषयी व पुत्राविषयी आपणास काही बोलावयास संबंध नाही. म्हणोन अर्ज केला व लिहून दिले होते. त्यावरून तुमच्या चित्ती सालसता पाहोन तुमचा पुत्र दत्तक विधीयुक्त घेवून दसरेचे सुमुहुर्ते चिरंजीव राजेश्री शिवाजी राजे सिंव्हासनारूढ केले. तुम्ही साहेबास पुत्र दत्तक दिला यास्तव तुम्हांस साहेब कृपाळू होवून मौजे खानवट दरोबस्त ईनाम व वतन देखील करून दिली असे. ते तुम्ही व तुमचे पुत्र पौत्रादी वंशपरंपरेने आनभवून सुखरूप राहणे जाणिजे.



लेखांक : ११

हुजूर खाजगी दप्तर : १ / ता. १ मार्च १७६७

राजेश्रीया विराजीत राजमान्य राजेश्री शेषो नारायण गोसावी यासी सेवक माधवराव बल्लाळ प्रधान नमस्कार उपरी येथील कुशल जाणून स्वकीय कुशल लिहीत जाणे. विशेष राजेश्री राणोजी घाटगे सर्ज्याराव कागलकर हे घरणदांज लोक याजवर धन्याची गैरमर्जी. यास्तव तुमचे विद्यमाने करार करून राजेश्री विठ्ठलराव सीवदेव पा। कागलास रवाना केले. ते दरम्यान होवून त्याचे ईनाम गाव सावर्डे सुद्धा सातव पा। मजकुरी गावगन्ना ईनाम जमीनी व हक्क कानु कायदे देशमुखी व नाडगौडीचे नेमून देवून सुदामत चालवावे ऐसा करार करून ठाणे सरकारांत दिले येविषयीच्या बोलण्यात तुम्ही व भगवंत आप्पाजी असतां मशार नीलेची वतनदारी व सावर्डे बु।। ईनाम गांव घाटगे मशार नीलेकडे चालत नाही. म्हणोन मशार नीले सरकारांत आले. त्याजवरून हे पत्र तुम्हास सादर केले असे. तरी तुम्ही धन्यास विनंती करून याचे ईनाम गांव कराराप्रमाणे व गावगन्ना ईनाम जमीन व कानू कायदे नेमून देवून सुरळीत चालते करावे. जाणीजे छ २९ रमजान सु।। सबा सीतेन मया व आलफ. बहुत काय लिहिणे.

(शिक्कामोर्तब)



लेखांक : १२

निवडी : ५८ / ता. ४ आक्टोबर १७७३

श्रीमन्महाराज राजेश्री छत्रपती स्वामीचे शेवेशी सेवक रघुनाथ बाजीराव कृतानेक विज्ञापना. येथील वर्तमान ता छ १६ रजेब पर्यंत स्वामीचे कृपे करून यथास्थीत असे. विशेष. चिकोडी व मनोळी हे तालुके व रायबाग व कागलपैकी फुटखेडी पेशजी भगवंत आप्पाजी व राजेश्री शेषो नारायण यांचे कारकीर्दीत चालले आहे त्याप्रमाणे साल गुदस्त सन सलास सबैनापासून स्वामीकडे चालले. या उपरी सांगणाराचे सांगितल्यावरून अथवा कोणेविषयी दिकत पडून विपर्यास होणार नाही. शेवेशी श्रुत होय हे विनापना.

पो।। छ १४ माहे रमजान सन आर्बा सबैन मया व आलफ.



लेखांक : १३

निवडी : ६४ / ता. १२ आक्टोबर १७७३

श्रीमंत महाराज राजेश्री छत्रपती स्वामीचे शेवेशी विनंती सेवक रघुनाथ बाजीराव विज्ञापना. सेवकाचे वर्तमान छ २४ रजब पावेतो माहाराजांचे कृपेकरून यथास्थीत असे विशेष. चिकोडी व मनोळी तालुक्यांचा फडशा करून कागद पत्र देवून राजेश्री जिवाजी भोसले व आप्पाजी शामराव व आकोजी नेवरे व वेदमूर्ती राजेश्री महादेव शास्त्री यास निरोप देवून सेवेशी पाठविले आहे. त्यांची याद अलाहीदा आहे. त्याप्रमाणे पावल्याचे सविस्तर विनंती करावयास मशारनिलेस सांगितले आहे हे विनंती.—सेवेशी श्रुत होय ही विज्ञापना—

पैवस्ता छ १४ माहे रमजान आर्बा सबैन मया व आलफ.



लेखांक : १४

निवडी : ६० / ता. २९ नोव्हेंबर १७७३

यादी श्रीमंत महाराज राजश्री शिवछत्रपती स्वामी यास राजश्री रघुनाथराव पंडित यांनी करार करून द्यावेत सु।। आबी सबैन मया व आलफ

१. साल गुदस्त सन सलास सबैनात कैलासवासी नारायणराव पंडित यांचे विद्यमान्ये तिर्थस्वरूप कैलासवासी महाराज मातोश्री आईसाहेब वर्तमान असता राजश्री जिवाजी भोसले सरकारचे व महादेवशास्त्री व आप्पाजी शामराव व आकोजी नेवरे यांचे विद्यमाने करार मदाराच्या यादी व कागद पत्र जाहले आहे. त्याप्रमाणे हल्ली करार करून कुलनिभावनी करून घ्यावी कलम.

२. साल गुदस्ता चिकोडी मनोळी तालुका वगैरे फुटखेडी महाराजास नजर केला आहे. त्यास या उपरी तुम्ही कोणे अर्थे महाराजांचे राज्यात व सदर तालुक्यात कोणे विषईचा लोभ धरू नये. व किल्ले कोटाची विघाभर जमीन किंवा पैशाचा अगर हरएक विषईचा लोभ कदापी धरू नये. कित्येकानी कित्येक अर्थ कोणे विसीची कल्पना समजाविली तरी चित्तात न आणिता निश्चयपूर्वक सदर हुकूमाप्रमाणे चालावे यात अंतर नसावे. कलम

एकूण दोन कलमे करार करून कुलस्वामींची शपथ, तुलसी घेऊन करार लिहून द्यावा.

महाराजांची कृपा अक्रीम (अकृत्रिम) आम्हांवर करावी. आम्ही त्यांचे तालुक्यास समजोन उपद्रव होणार नाही. येणे प्रमाणे करार.

शपथ असे कुलस्वामीची. शपथपूर्वक लिहीले असे. महाराजांनी आम्हास विरूद्ध ते करू नये. येणे प्रमाणे करार. स्वामीचे राज्याचा लोभ आम्हास नाही. करार.

सदरहू मखलासी रघुनाथराव पंडित याचे स्वदस्तुरची आहे. छ १४ माहे रमजान सन अर्बा सबैन मया व आलफ.



लेखांक : १५

निवडी : ६५ / नोव्हेंबर १७७३

यादी पेशजीची कैफीयत सालवार माहाराज सरकार यांची म्हणून चिकटबंदी असलेली. यातील उतारे केलेले बद्दल १ सन ईसने सिबैन मया व आलफ शालीवाहन शके १६८३ राज्याभिशेक शके ८८ वृषानाम 'संवत्सरेचे साली माधवराव बल्लाळ पंडीत प्रधान यांचे ताकीदपत्र बसव प्रभुदेसाई परगणे हुकेरी याचे नावचे. वारणेचे तहाप्रमाणे पो मजकूराची सरकार मामलत श्रीमंत मातुश्री आईसाहेबाकडे लागली. यास्तव सरकार आमचा लढा तुम्हाकडे राहिला नाही. तरी जी ठाणी दिली व बाकी राहिली असतील तीही देणे म्हणोन छ ९ साबान १ सन मजकूर व शालीवाहन शके मजकूर व राज्याभिशेक शके मजकूर व संवत्सरी मजकुरी माघ मासी रघुनाथराव पंडीत यास फौजसुद्धा शेषो नारायण यानी घेवून येवून कसबा वडगावचे ठाणे घेतले ते समई सात लक्ष रुपये देण्याची बोली भगवंत आप्पाजी यानी करून श्रीमन् माहाराज मातुश्री जिजाऊ आईसाहेब याचे दर्शनास रघुनाथराव पंडीत यास आणोन दर्शन करून परत लावून दिले, ते समई महाराज सरकारातून घेतले रुपये

२००००० श्रीमन्महाराज मातुश्री आईसाहेब माहाराज याही जामदारखानेतून रोख दिले रुपये दोन लक्ष

५०००० चिकोडी तालुका व मनोळी तालुका हे दोन्ही तालुके माहाराज सरकारातून शेषो नारायण व भगवंत आप्पाजी यानी आपले निसबतीस लावून घेऊन खातरजमा पाच लक्ष रुपयेची करून दिली.

सन आर्बा सितेन मया व आलफचे साली हरदो मशारनिले यानी साडे-पांच लक्ष रुपये घ्यावे असे ठरवून चिकोडी तालुका व मनोळी तालुका हे दोन्ही तालुके उभयता मशारनिले यानी आपले निसबतीस लावून घेऊन माहाराज सरकारात कागल वगैरे फुटगावे सव्वा लक्ष रुपयात दिले.

सन सलास सितेन मया व आलफ शालीवाहन शके १६८४ राज्या-भिषेक ८९ चित्रभानुनाम संवत्सरेचे साली माधवराव बल्लाळ प्रधान यांचे ताकीदपत्र बसव प्रभु देसाई प्रांत हुकेरी याचे नावचे परगणे मजकूर तुम्हांकडे ठाणी आहेत येणेप्रमाणे –

१ ठाणे चिकोडी	१ ठाणे वंटमुरी
१ ठाणे बागेवाडी	१ किरकोळ ठाणी
२	२

सदरहू ठाणी श्रीमंत मातुश्री आईसाहेब याजकडे देविली असेत तरी तुम्ही ठाणी याजकडे देवून राहाणे जाणिजे छ २९ माहे रजबची

१ सन सबा सितेन मया व आलफ शालीवाहन शके १६८८ राज्याभिषेक शके ९३ व्यय नाम संवत्सरेचे साली माधवराव बल्लाळ प्रधान याचे ताकीद पत्र तपोनिधी कर्णगिरी गोसावी सवंदतीकर याचे नावे. मौजे मजकूरचे ठाणे घेवून श्रीमन्महाराज मातुश्री आईसाहेब यांचे खासगीस दिल्हे ते वेळेस तुम्ही हुजूर येवून रदबदली केली. साहेबा कडील कमावीसदार राजेश्री शेषो नारायण यांचे विद्यमाने गावात घेवून गावाचा आकार होईल त्याप्रमाणे निमे ऐवज मशार निले-कडे देवू व निमे आपण घेऊ म्हणोन जाणिजे छ २५ माहे रमजान.

श्री

राजेश्री माधवराव पंडीत प्रधान यासी—

श्रीमन्महाराज मातुश्री आईसाहेब उपरी राम शेषो नारायण याजकडे हुकेरी प्रांत व मनोळी प्रांत व फुटगावे ही सरकाराची ठाणी यांची मामलत होती ते तुम्ही राजेश्री बाळाजी केशव व रामचंद्र महादेव यांचे विद्यमाने सरकारात नजर

केली. त्याप्रमाणे साहेबाचे शेवेशी ठाणी झाडेनिशी पावली. तुम्हास कळावे यास्तव आज्ञा केली असे जाणिजे छ २७ माहे रजब निशाणे मोर्तब.

श्री

राजश्रीया विराजीत राजमान्य शेषो नारायण गोसावी यास सेवक माधवराव बलाळ प्रधान नमस्कार उपरी येथील कुशल जाणोन स्वकीय कुशल लिहीत जाणे. विशेष. राजश्री राणोजी घाटगे सर्ज्याराव कागलकरांचे घर दान केला, त्यावर धन्याची गैरमर्जी. यास्तव तुमचे विद्यमाने करार करून राजेश्री विठ्ठलराव ....पाा कागलास रवाना केलेत. दरम्यान देवून त्यांचे ईनाम गाव सावर्डे सुद्धा व परगणे मजकुरी गावगना ईनाम जमीनी हक्क कानू कायदे देशमुखी व ....नेमून देवून........चालावे असा करार करून ठाणे सरकारात दिल्हे व येविषयीच्या बोलण्यात तुम्ही व भगवंत आप्पाजी असता मशार निलेकडे चालत नाही, म्हणोन मशार निले सरकारात आलेल्यावरून हे पत्र तुम्हास सादर केले असे. तरी तुम्ही धन्यास विनंती करून याचे ईनाम गाव कराराप्रमाणे व गावगना ईनाम जमीनी व कानू कायदे नेमून देवून सुरळीत चालते करावे. जाणिजे छ २९ रमजान सुा। सबा सीतेन मया व आलफ. बहुत काय लिहिणे मोर्तब असे.

१ सन तिसा सितेन मया व आलफ शालीवाहन शके १६९० राज्याभिषेक शके ९५ सर्वधारी नाम संवत्सरे भानु वासरेचे स्वस्ती श्रीचे आज्ञापत्र. समस्त सेना धुरंधर विश्वासनिधी राजमान्य राजेश्री राणोजीराव घोरपडे सेनापती यासी तीर्थरुप माहाराज राजश्री कैलासवासी आबासाहेबाची देवालय करवीरी पंचगंगा तीरी बांधून श्रीस्थापना केली आहे. तेथील पूजा उर्ज्या व इतर इत्यादीक करणे बद्दल परगणे कागल तर्फ रुकडी येथील सरनाईकीची वतन करून दिले असे हे होय गावगना बी तपसील—

श्री

श्रीमन्महाराज छत्रपती स्वामीचे शेवेशी—विनंती सेवक रघुनाथराव बाजीराव कृतानेक विज्ञापना येथील वर्तमान तागायत छ १६ रजब पर्यंत स्वामीचे कृपे करून यथास्थीत असे विा। चिकोडी व मनोळी तालुके व रायबाग व कागल व फुटखेडी पेशजी भगवंत आप्पाजी व राजेश्री शेषो नारायण यांचे कार.

कीर्दीत चालले आहे त्याप्रमाणे सालगुदस्त सन सलास सबैन पासून स्वामीकडे चालले. या उपरी सांगणाराचे सांगितल्यावरी अथवा कोणे खलित पडून विपर्यास होणार नाही. शेवेशी श्रुत होये हे विज्ञापना—

पो।। छ माहे शाबान सु।। आर्बा सबैन मया व आलफ.



लेखांक : १६

निवडी : ९८ / इ. स. १७७३–७४

राजश्रीया विराजीत राजमान्य राजेश्री दाजीपंत तात्या यासी प्रती गोपाळभट कवठेकर आनेक आशिर्वाद विंनंती उपरी येथील कुशल चैत्र त्रयोदशी मंदवासरे पर्यंत तासगाव यथास्थीत असे. विशेष ईकडील वर्तमान तरी राजश्री विठोबानाईक याजकडील व रा. सखाराम नाईक वाडकर याजकडील ऐवज राजश्री परशरामपंत भाऊ याजकडे ऐवज भरणा करून आलाहिदा पावती येथील घेवून नाईक मजकूर निले समागमे हुजूर पाठविली आहे. पाहुन प्रविष्ट जाहाली याचे उत्तर पाठवावे. व यादीही आलाहिदा पाठविली आहे तीही पाहावी. त्याजवरून ऐवजाचा तपशील ध्यानी येईल. डबा आमच्या समागमे दिला होता तो येथे येऊन लाखाले काढुन राजेश्री बाबूराव व नाईक यांच्या विद्यमाने दागिने सर्व याच्या दृष्टीस मोघम घाळून यादीही दाखविली आणि मागती डब्यास लाखाले करून पेशजीचे दागिन्याच्या संदुका आहेत तेथेच ठेवून बंदोबस्त केला आहे. आशास दागिन्याची यादी बी त।। किंमती प्रमाणे येवज सत्वर येईजे करून दागिने सुद्धा डबा सरकारचा सरकारात माघारा न्यायाविषयी दान केला (?) मात्र लागु नयेत, या प्रमाणे करार बोलणे जाहाले आहे. त्याप्रमाणे ऐवज त्वरेने यास प्रविष्ट होवून दागिने न्यावयाचे करावे. दागीने किंमती लावून सदर सराफाच्या पारखेने तुटक करावे म्हणोन बोलणेही बहुतच जाहाले. परंतू किंमत ठहरावून ध्यावयाची आज्ञा नाही. प्रस्तुत घडत नाही. म्हणोन बहुत प्रकारे समजून सांगून मोघम ठेविली आहेत. त्याचा ऐवज मात्र ठेऊन पाहवा. आणि दागिनेचे येविषयीचे वृत्त नाईक निले निवेदन करतील त्याजवरून आवगत होईल. आम्ही उदयीक निघोन लष्करास भाऊकडे जातो. समागमे दोन असामी सेखआलीकडील पाचपैकी नेले. लष्करास गेलीया नंतर ज्या प्रमाणे बोलणे होईल त्या प्रमाणे लिहून

पाठवितो. बागणी वरील फौज कुच करून गेली हे वृत्त आपणास कळले असेलच. खेडी पाडी मोकळी होणेच्या चिठ्या लष्करात जाऊन भाऊसी बोल्हन पाठवून देतो. बहूत काय लिहिणे. लोभ किजे.

छ २९ जमादिलावल आर्बा सबैन



लेखांक : १७

निवडी : ७२ / ता. १४ फेब्रुवारी १७७४

चिठी सु।। आर्बा सबैन मया व आलफ

राजेश्री रघुनाथ पंडित प्रधान वडगांवचे मुकामांस आलेवर्षी करवीरचे मुक्कामीहून हुजूर दर्शनास आले तेसमई हुजूर खुणेस पांचेची अगंठी दिली. ती देवघराकडे गु।। गंगाजी जाधव यांजकडे होती ती छ २ माहे जिल्हेजी लाखोजी निकम यांजकडे ठेवावयाजबद्दल दिली असे.



लेखांक : १८

निवडी : १९३५६ ते १९३५९ / इ. स. १७७४-७५

अखंडीत लक्ष्मी आलंकृत राजमान्य राजश्री

वगेव्हा जातूरची (?) काम पाहणार यांचे शेवेशी

शेवक आणाजी त्यागराज पंडित सरखेल कृतानेक सलाम विनंती उपरी माहाराज साहेबांचे नावाईफाने सखारामराव नारायणराव हंबीरराव मोहिते साहेब यांचे वडिल नारायणराव हैबतराव हंबीरराव मोहिते यानी कोल्हापूर इलाकेत मौजे केरले गावाची पाटीलकी जीमे भोसले याचे घराण्यासही आहे. बाकी चौथाई इकडे यांचे घराण्यासही आहे. बाकी चौथाई आपले घराण्यास इस्तकबील पासून चालत आली त्या विशेयी बाबाजी लाड यानी आपले म्हणणे होते.

सुभानराव संताजी मोहिते यास शाहालीवान शके १६९६ जय नाम सवंत्छरी सनद पत्र लिहून दिल्हे आहेत. त्या विषई त्यास ३५ वर्षा अगाऊ पींगल संवत्छरी श्री संभुछत्रपती साहेब यांनी संताजी मोहिते यास सनद करून दिल्ही आहेत. मात्र सदरहू सनद पत्र कराचे करून पुरोक्त नवे संवच्छरी श्री

शिवछत्रपत्री साहेब यांनी सनद करून देऊन त्या पाटीलकीस अर्ज इनाम बीघे १५ ही करोन दिले. आपण देशांतरास जाणे संभवल्यामुळे आपली पाटीलकी इनाम जमीन ही सरकार जप्तीत होती. ते समई परत आल्यानी मोहिते म्हणनार आलीकडे कित्येक वर्षापासून आपण दुराक्ताने स्वाधीन करून घेतले ते आम्हास वर्तमान आले आहे. म्हणून मौजे नर्तवाड येक, मौजे गीरगांव येक, हे दोन्ही गांव सन खमस सबैन मया व आलफ राज्याअभिशेक १०० जय नाम सवंच्छेर आपले आजे नरसिंगराव सुभानराव मोहिते यांस मौजे कडलगे गाव एक आणी त्यास आधले वर्षी एक गाव मौजे टीकावाडी गाव येक हे दोनी गाव आपले आजे सुभानराव संताजी मोहिते यासही शिवछत्रपती साहेब यानी इनाम देऊन सनद करून दिल्हे आहेत. त्याच रितीने मातोश्री दुर्गा आईसाहेब यानीही प्रत्येक सनदा करून दिल्या आहेत. आपण परंपरेने अनुभवीत आल्यानंतर देशांतरास जाणेस भेटल्यामुळे कितेक गाव सरकार जप्तीतही कितेक इतराचे भोगातही आहेत. म्हणून उपाया विषई कोलापुराचे सरकारात आणिले ते रुपये इनाम जाणावे. विचारणेस नेमीलेल्या हैबतराव भोसले यास केली सनद

१. मातुश्री दुर्गा आईसाहेब याणी सदरहू पाठविली व इनाम जमीन राजश्री सुभानराव मोहिते यांचे स्वाधीन करणे म्हणून मौज्यात दिली सनद सु॥ सन सलास सबैन मया व आलफ

१. मातुश्री दुर्गा आईसाहेब यांनी सदरहू पाटीलकी ईनाम जमीन मोहिते मजकुरास चालवणेस मौजे मजकुरास ताकीद कर्णेस किले पावणगडास दिल्ही सनद.

८. मौजे नर्तवडे गावाबाबती

१. राज्याभिशेक शक १०० जय नाम संवत्सरे ज्येष्ठ शु॥ तृतीया शिवछत्रपती यांनी रा. नरसिंगराव बीन सुभाणराव मोहिते यांसी सदरहू गाव तुम्हास ईनाम दिले असे म्हणून दिल्ही शिक्का सनद.

१. राज्याअभिषेक शके १०० जयनाम संवत्सरे ज्येष्ठ शु॥ द्वितीया सदरहू गांव राजेश्री नरसिंगराव मोहिते यास चालवणे म्हणोन आमात्य सुबराव पंडित यास शिवछत्रपती यानी दिली सनद.

१. सदरहू तारखेस सदरहू राजे याणी सदरहू गाव मोहीते मजकूरास इनाम दिल्हा ते चालवावे म्हणोन गाव मजकुरास सनद.

१. सदरहु तारखेस सदरहू राजे याणी सदरहु विषयास देशमुख व देशपांडे यास दिल्ही सनद.

१. मातोश्री दुर्गा आईसाहेब यानी सदरहु गाव तुम्हास नुतन ईनाम दिल्हे आहे म्हणोन मोहिते मजकुरास दिली सनद सु॥ खमस सबैन मया व आलफ छ २ रोजी.

१. सदरहु आईसाहेब याणी सदरहु विषयास आमात्य यास दिल्ही सनद सदरहु तारीख.

१. सदरहु आईसाहेब याणी सदरहु विषयास मौजे मजकुरास दिल्ही सनद सदरहु तारखेस

१. सदरहु आईसाहेब याणी सदरहु विषयास देशमुख देशपांडे यांस सनद सदरहु तारखेस

८. मौजे टिकेवाडी गावाबद्दल आधार

१. राज्याभिषेक शक १०० विजयनाम संवत्छरे वैशाख बहुल सप्तमी शिवछत्रपती यानी राजश्री सुभानजी बीन संताजी मोहिते यास तुम्हास मौजे वाडी टीका गाव इनाम दिल्हा असे म्हणून सनद.

१. सदरहु तारखेस सदरहु राजे याणी सदरहु विषयास आमात्य आबाजीराव पंडित प्रतिनिधी यास दिल्ही सनद.

१. सदरहु तारखेस सदरहु राजे याणी सदरहु विषयास मौजे मजकुरास दिली सनद

१. सदरहु तारखेस सदरहु राजे यानी सदरहु विषयास देशमुख व देशपांडे यास दिल्ही सनद.

१. मातोश्री दुर्गा आईसाहेब यांणी मौजे मजकुरास सदरहु गाव तुम्हास इनाम दिल्हा असे म्हणोन दिल्ही सनद

१. सदरहु बाईसाहेब यांणी सदरहु विषयास आबाजीराव पंडित प्रतिनिधी यास दिल्ही सनद सदरहु तारखेस. सदरहु आईसाहेब याणी सदरहु विषयास सदरहु तारखेस देशमुख व देशपांडे यास दिली सनद

८. मौजे गीरगाव बाबे आधार

१. राज्याभिषेक शक १०० जयनाम संवत्छरे जेष्ठ शुद्ध ३ शिवछत्रपती

साहेब याणी राजश्री नरसिंगराव बीन सुभानराव मोहिते यांसी मौजे गीरगाव तुम्हास ईनाम दिल्हे असे. म्हणोन दिल्ही शिक्का सनद.

१. सदरहु तारखेस सदरहु राजे याणी सदरहु विषयास आबाजीराव पंडित प्रतिनिधी यास दिल्ही सनद.

१. सदरहु तारखेस सदरहु राजे याणी सदरहु विषयास मौजे मजकुरास दिल्ही सनद.

१. सदरहु तारखेस सदरहु राजे याणी सदरहु विषयास देशमुख देशपांडे यास दिल्ही सनद.

१. मातोश्री दुर्गा आईसाहेब याणी मौजे मजकूरास सदरहु गाव तुम्हास इनाम दिल्हा असे म्हणोन दिली सनद सु।। सन समास खबैन मया व आलफ छ २ रोज तारखेस.

१. सदरहु आईसाहेब यानी सदरहु विषयास प्रतिनिधी यास दिली सनद सदरहु तारीख.

१. सदरहु आईसाहेब यांनी सदरहु तारखेस सदरहु विषयास देशमुख व देशपांडे यास दिली सनद.

१. सदरहु तारखेस सदरहु आईसाहेब याणी सदरहु विषयास मोज्या मजकुरची दिली सनद.

४. मौजे मडलगे गाव बाबे मजकुर

१. राज्याभिषेक शके १०० जयनाम संवत्सरे मार्गशीर्ष शु।। प्रतीपदा शिवछत्रपती यानी राजश्री सुभानराव बीन संताजी मोहिते यास तुम्हास मौजे मडलगे गाव देहे १ इनाम दिल्हा आहे म्हणून शिक्का सनद.

१. सदरहु तारखेस सदरहु राजे यानी सदरहु विषयास मौजे मजकूरास दिली सनद.

१. सदरहु तारखेस सदरहु राजे याणी सदरहु विषयास देशमुख व देशपांडे यास दिल्ली सनद.

१. मातोश्री दुर्गा आईसाहेब यांनी मौजे मजकूरास सदरहु मौजे मडलगे गाव देह एक तुम्हांस ईनाम दिला आहे म्हणून सनद.

निशान राजश्री आणाजी त्यागराज पंडित सरखेल.



लेखांक : १९

निवडी : १३३४ / इ. स. १७७४–७५

श्री मन्महाराजराजेश्री छत्रपती साहेबांचे शेवेसी

विनंती शेवक रघुनाथ बाजीराव प्रधान कृतानेक विज्ञापना ता॥ छ १३ जिल्काद पावेतो साहेबांचे कृपेकरून वर्तमान यथास्तीत असे. विशेष साहेबी राघो आपाजी कारकून व व्यंकोजी शिंदे व धोंडजी यादव याज बरोबरी पत्रे पाठविले ते पावोन लिहेला मनसबा याचा मजकूर लिहिला तो कलम. अशास फितूरी याचे पारीपत्य व्हावे हे स्वामीचे मानस आणि कोणाची जथ धरीत आहेत. नवाब हैदर अल्ली खान बहाद्दूरही लौकरच येऊन सामील होणार, याजवरुन संतोष जाहला. वरकड कित्येक मजकूर माणकोजी नारायण या समागमे राजश्री येसाजी सींदे यास लिहिले आहेत. याजवरुन कळेल. शेवेसी श्रुत होय ही विज्ञापना.



लेखांक : २०

तोरगल : १ / इ. स. १७७५–७६

चिरंजीव राजमान्य राजेश्री लक्ष्मणराव शिंदे सेना खासकील यासी श्रीमन्महाराज मातुश्री दुर्गाआई साहेब यांचे कृतानेक आशिर्वाद उपरी. साहेबांचे शेवेशी विनंती पत्र पाठविले ते प्रविष्ट जाहाले. बातमी वर्तमान विनंती पत्री लि॥ वरून आवगत तोफखानेत नि॥ मुदलावीकर वगैरे उपसर्ग किल्ले तोरगल तालुकेस करितात आसेत पक्षी बंदोबस्त करावयाचा केला म्हणून लिहिले. वरकड राजेश्री सरसुभेदार व गुजाजी गायकवाड यासी लिहिले आहे व मुधोळकर पत्रे पाठवितात म्हणोन लिहिले वरून आवगत जाहाले व चिरंजीव राजेश्री यशवंतराव शिंदे सरसुभेदार यानी व राजेश्री गुजाजी गायकवाड यानी विनंती केले वरून साद्यंत आवगत जाहाले असे. यासी तुम्ही किल्ल्याचा व ठाणोठाणीच्या बंदोबस्त बळकटीने करवणे. मुधोळकरास पत्राचे उत्तर देणे जे सरकारात सेवेबद्दल गेले सेवा जाहाली न जाहली. सरकारचे दागदागिने घेऊन आले. यास्तव घोडी राहिली असतील असे परस्परे आमचे ऐकण्यात आले. ये विषयी आम्हास लपवावयाचे कारण नाही. जे लिहिणे ते विनंती....ऐसे उत्तर

देणे. वरकड आज्ञेप्रमाणे चिरंजीव राजेश्री सरसुभेदार यानी व गुजाजी गायकवाड यांनी लिहिले आहे त्यावरून कळेल. जाणीजे ताा छ ५ माहे जीलकाद बहुत काय लिहिणे.

(शिक्का)



लेखांक : २१

तोरगल : २ / ता. २२ मे १७७७

स्वस्ति श्री राज्याभिषेक शके १०३ हेमलंबीनाम संवत्सरे वैशाख बहुल भौमवासरे. क्षत्रीय कुलावंतस श्री राजा शिवछत्रपती स्वामी यानी राजमान्य राजेश्री लक्ष्मणराव शिंदे सेना खासकील यासी आज्ञा केली ऐसीजे – मौजे नंदनवाडी हा गांव सेवकाकडे पूर्ववतप्रमाणे करार करून घ्यावा म्हणोन तुम्ही एक दोन वेळा विनंती पत्रे स्वामीचे शेवेशी पाठविली व राजश्री येशवंतराव शिंदे सर सुभेदार यासी व राजेश्री गुजाजी गायेकवाड यासी लिहिले. त्यानी स्वामीचे शेवेशी विनंती केली. हाल्ली स्वामी कृपाळून मौजे मजकूर पूर्ववत प्रमाणे तुम्हाकडे करार करून देवून सनदा सादर केल्या आहेत. गाव स्वाधीन करणे विषयी राजेश्री आंताजी जनार्दन यासी आज्ञापत्र सादर आहे. गाव स्वाधीन करतील त्याप्रमाणे गाव स्वाधीन करून घेवून विनंतीपत्र हुजुर पाठवून देणे ये विषयी राजेश्री येशवंतराव शिंदे सर सुभेदार व राजेश्री गुजाजी गायेकवाड आज्ञेप्रमाणे लिहितील त्यावरून कळेल. जाणीजे. बहुत काय लिहिणे.

(शिक्कामोर्तब)



लेखांक : २२

निवडी : १४५४ / इ. स. १७७७ ७८

तहनामा येणे प्रमाणे कलमे करार करून दिल्ही असेत. बीतपसीले.

तह : पूर्वेस भीमातीरपर्यंत. पश्चिमेस समुद्रतीर पर्यंत तळकोकण व सदुर्बातील किल्ले जंजिरे व गडकोट किल्ले व प्रांत अहद लिहिली आहे. त्याप्रमाणे पूर्व व पश्चिम पावेतो जरोबजरा सरकारात खासगी करून देऊ. कलम १.

दक्षिण उत्तर तुंगभद्रापासून समरुषी देखील गडकोट किल्ले व प्रांत सपूर्ण जरोबजरा सरकारात खासगी करून दिल्हे असे. कलम १.

कैलासवासी शाहू महाराज यानी सरकारकून व सरदार अवांतर हर कोणास जिल्हे मामले व परगणे दिल्हे आहेत. ते सरकारात खालसा करून घेऊ. महाराज ज्यास कृपा करून देतील त्यास करार असे. कलम १.

चंदावरचे राज्य आरकाटवाले याणी घेतले आहे. ते सोडवून दिल्हे असे. कलम १.

राजश्री रघुनाथराव पंडीत यांची स्थापना व्हावी हे महाराजांचे मानस त्यास आम्ही साहित्य करून मनोदयेसिद्धिस नेऊ. कलम १.

महाराजांचे सरदार व सरकारकून व मराठे व कारकून व राज्यातील वतनदार व पालेगार हे महाराजांचे खिदमतीत अमर्यादा करून किंवा बेमानी करून आलेस त्यासी आम्ही आश्रय देणार नाही. तैसेच आम्हाकडील कोणी बेमानी करून आलेस महाराजानी त्यास आश्रय देऊ नये. आणि हरकोणीही कित्येक प्रकारे गैरवाका समाजवितील ते उभयपक्षी न ऐकता स्नेह दढोत्तर चालवू. कलम १.

राज्यातील अवांतर कोणीही महाराजांचे खिदमतीत बदनजर धरतील त्याचे पारिपत्य उभयपक्षी ऐक्यता होऊन करू. कलम १.

महाराजांचे खिदमतिगार रघुनाथराव पंडीत याणी मर्यादेने वर्तणूक करावी. आज्ञेनुरूप वर्तन असावे व राजेश्री यशवंतराव सिंदे सरसुभेदार यानी निखालस रीतीने स्नेहभावे उभय येक्यतेत किमपी संवशय त्यानी न आणावा. येविसी पंडीत मजकुर निले यांसी आम्ही दरम्यान आहो येविसी महाराजांचा खातर जमाव करार असो द्यावा. कलम १.

राजश्री यशवंतराव सिंदे सरसुभेदार यासी सरंजाम साहेब कृपा करून देतील तो व आम्ही सरंजामाचा तहनामा लिहून घेवून करार करून देऊ तो यावत साहेबांचे राज्य आहे तो कायम चालवावे.

साहेबी व आम्हीही आमची दौलत कायम तो पर्यंत राव सुभेदार यांच्या सरंजामास व स्नेहास शफत पुरःसर अंतर कदापि न करिता चालवू. कलम १

तुंगभद्रेचे दक्षीणतीर पासोन दक्षणेस समुद्र पर्यंत प्रांताच्या सनदा साहेबी आम्हांस करून द्याव्या. कलम १.

तुम्ही लिहिले वरून राजश्री महादजी शिंदे यांचे विद्यमाने बारभाईकडील तह त्यानी म्हटले प्रमाणे जाहला. कागद पत्र व जामीन कतबे व ऐवजाच्या चिठ्या व तहाच्या यादी व ऐवज खर्च पडिला त्याची निभावणी करून देणे आपणाकडे. सौंधे व बिदनूर व अंतरोज येथील व तुंगभद्रा पलीकडील अवांतर प्रांतातील साल दर साल ऐवज रुपये ५०,०००,०० पन्नास लक्ष सुरळीत देणे देऊ व सिवाय चौथाई देत जाऊ. कलम १.

जंजिरे सिंधुदुर्ग सरकारचा जंजिरा. तेथील कौल सदुरबा मध्ये हुनावर, मंगरूल व कालीकोट येथील सावकार व कर्नाटकातील वगैरे बंदरचे सावकार पेशजी जंजिरे सिंधुदुर्गचा कौल घेऊन आमदरफ्ती करीत आले त्याप्रमाणे पुढे जंजिरेचा कौल घेऊन आमदरफ्ती करू. महाराजाकडील आरमार व आम्हा कडील आरमारासी गाठ पडलीया स्नेह भावच ठेऊ. कलम १.

वकीलीस महाराज रवाना करतील त्याचे हातून घेऊ. कलम १.

महाराजास व आम्हास ममतापुरसर आकृत्रीम स्नेहात अन्यत्र हरएकविसी इतर कल्पना चितात आणणार नाही. हरकोणाचे सांगणीवरून विपर्यास न पडता उभयपक्षी स्नेह यावत् चंद्र सूर्य तावत्पर्यंतचा ठेऊ. याविसी अंतपुरःसर परवर दिगार व कुरान्याचे शेफतेनिशी पत्रे दोन दिल्ही आहेत.

जो पर्यंत महाराजांचे राज्य कायम व आमची दौलत बरकरार तोपर्यंत हर दुतर्फेनची दोस्ती बेखिलाफ रीतीने चालेल. कलम १.

महाराजांचे राज्यावरील हरकोणीही अमर्यादेस प्रवर्तलेस आम्ही फौज सुद्धा सामील होऊ. आमचे दौलतीवरी कोणीही आल्यास महाराजानी फौज सुद्धा सामील असावे. कलम १.

राजश्री रघुनाथराव पंडीत यानी करार नामा महाराजांचे खिदमतीमध्ये इमान पुरःसरःशफतेनिसी लिहून दिल्हा. त्यात पंडीत मजकूर निले याजकडून अंतर पडलेस आम्ही निभावणीस दरम्यान असो. कलम १.

प्रतिवर्षी महाराजांचे सेवेसी नजर जडजवाहीर व हत्ती घोडे व नकद व कापड व चीजवस्तु वगैरे अपूर्व जिन्नस करू. कलम १.



लेखांक : २३

तोरगल : ३ / इ. १७७७–७८

चिरंजीव राजमान्य राजेश्री लक्ष्मणराव शिंदे सेना खासकीले यासी श्रीमन्महाराज मातुश्री दुर्गाआई साहेब कृतानेक आशिर्वाद उपरी. साहेबाचे सेवेशी तुम्ही विनंती पत्र पाठविले ते प्रविष्ट जाहाले. नबाब बाहादर गजेंद्रगडास शह देवून उतरले, किल्ले तोरगला समीप. ये विषयी त्यासी आज्ञा पत्रे सादर होवून किल्लेस उपसर्ग न व्हावा म्हणोन विनंती लि।।. त्यासी पेशजी तुम्ही विनंती लि।। होती त्यावरून तिकडे पत्रे रवाना जाहाली असेत. नंदनवाडा विषयी विनंती लि।। ऐसी ये विषयीची आज्ञा होणे ते मागाहून होईल. चिरंजीव राजेश्री यशवंतराव शिंदे सेना सो सुभा सरसुभेदार यासी व राजेश्री गुजाजी गायकवाड यासी तुम्ही लिहिले प्रमाणे मजकूर निले यानी विनंती केलेवरून आवगत जाहाले. प्रस्तुत प्रांते दंगेचा प्रकार बहुत आहे. तरी चिरंजीव सकल सौभाग्यवती संपन्न वज्रचुडेमंडीत सकवारबाई यांचे रवानगीची तयारी करून देवून आविलंबे साहेबा सन्नीध येवून पोहचते करावे. पेशजी बहुत वेळ आज्ञा पत्रे सादर जाहाली. परंतु रवानगी केली नाही. हल्ली दंगा या प्रकारचा हे जाणोन आज्ञेप्रमाणे सत्वर रवानगी करून सुरक्षित येवून पोहचते करावे. बरकड आज्ञेप्रमाणे चिरंजीव राजेश्री सेना साहेबसुभा सरसुभेदार व गुजाजी गायकवाड यानी लिहिले आहे त्यावरून कळेल. जाणीजे. त।। छ ६ माहे जमादिलावल. बहुत काय लिहिणे.

(शिक्का)



लेखांक : २४

निवडी : १६६२६–२७ / इ. स. १७७७–७८

राजश्री म्हादजी शिंदे गोसावी यांसी सकल गुणालंकार अखंडित लक्ष्मी आलंकृत राजश्री माधवराव नारायण प्रधान आशिर्वाद उपरी येथील जाणून स्वकीय लिहीत जावे. विशेष राजश्री व्यंकटराव नारायण घोरपडे यानी निवेदन केले की मौजे लाट प्रांत मिरज व मौजे रांगोळी प्रांत हुकेरी हे दोन्ही गाव

पुरातन आमचे इनाम. येविसी पेशजी राजश्री येसाजी शिंदे याणी फौजबंदी करून इचलकरंजी नजीक येऊन उतरले, तेव्हा सिबंदीमुळे पाच लक्षाचे पेचात आलो. त्यांस दोनी गावची पंचाईत सरकारात पुरंदरी वेदमूर्ती राजश्री महादेव-शास्त्री व आपाजी शामजी यांची समक्ष जाहाली. हरदुगाव आमचे ठरले. त्याजवर कोनेरराव त्रिंबक फौज सुद्धा तीकडे सरकारातून रवाना जाहले. त्यांचे व जिवाजी गोपाळ यांचे विद्यमाने येसाजी शिंदे यांचा तह सरकारातून पुरंदरचे मुक्कामाहून ठरावयाची यादी होऊन गेली. त्या अन्वये जाहला. तेव्हा लाट व रांगोळी हे दोनी गाव आमचे आम्हाकडे करून दिल्हे. हाली म्हादजी शिंदे करवीरचे मसलतीस गेले आहेत. येसाजी शिंदे यांचे तहाची बोली जाहली आहे. त्यास येसाजी शिंदे याणी सदरहु गावचा आड घातला आहे. याजकरिता येविसी आज्ञा जाहली पाहिजे म्हणोन त्याजवरून हे पत्र लिहीले आहे. तरी पेशजी पासून दोन्ही गाव व्यंकटराव नारायण याचे इनाम आहेत. त्यात सरकारातून तहपत्र करार करून पाठविले. त्या प्रमाणे कोनेरराव त्रिंबक यांचे विद्यमाने तह जाहला. त्या बमोजीब दोन्ही गाव याजकडे आहेत. त्याप्रमाणे करार करणे गाव खेडी व देशमुखी व सरदेशमुखी वगैरे वतन बाब करवीर तालुक्यात असेल ते पुरातन चालत आले प्रो चालावे. या बमोजीब कलमे तहात करार करून घेणे. छ २७ सु।। समान सबैन मया व आलफ बहूत काय लिहीणे हे आशिर्वाद मोर्तब.



लेखांक : २५

तोरगल : ४ / जून–जुलै १७७८

नवाब हाजरत बाहादर नवाब हमेशा खुसी दाम मोहतरम हुं. (एक·······मजकुर फाटून गेला आहे) गाहा आजी। दिलेयेकलास सटवाजी राव भोसले सलाम. बाजद सलाम उंकी येथील खुषी जाणोन मोहिबी आपली खैरखुषी कलमी केले पाहिजे. दिगर श्रीमंत मातुश्री आईसाहेब माहाराज छत्रपती यानी मोहिबानीला पांच हजार स्वार व दोन तीन हजार व तोफा पांच साहेबांचे जखिमतीस आम्हास रवाना केले आहे. आम्ही हुकेरीवरी येवून राहिलो आसो. राजेश्री माहादजी शिंदे यांच्या आमच्या मध्ये लोक जाया जाहले. चार महिने

वेढ्यात खराबी जाहाली. साहेबाच्या खिजमतीस पांच सात हजारानीसी जमाबंदी जाहाली. येत आसो. आणखी हरप्रकारे लोकास आणावया पाठविले आहेत. वरचेवरी जमा होत आहे. फौजेसुद्धा साहेबाच्या कदमापासी येतो. फौजेची व आमची उस्तवारी करणार आपण धनी आहोत. बारभाईचे वर्तमान तरी पुण्यामध्ये जमा होवून आपले आपणास भांडतात. त्यांचा बुडावयाचा वख्त आला आहे. कृष्णेचे पाणी येवून माहापुर आला आहे. चार महिने उतार नाही. त्याजकडून काही होत नाही. मुलुक सर करून ठाणी बसवावयाचा वख्त हाच आहे. रयतेसे कौल दिलीया रुपयाही जमा होईल. ईतका बंदोबस्त करून दिली या (अपूर्ण)



लेखांक : २६

तोरगल : ५ / एप्रिल–मे १७८०

राजेश्री आप्पासाहेब गोसावी यासी सकलगुणालंकरण अखंडीत लक्ष्मी आलंकृत राजमान्य यशवंतराव शिंदे सेनासाहेबसुभा सरसुभेदार रामराम विनंती उपरी येथील कुशल जाणोन स्वकीये लेखन करीत असीले पाहिजे. विशेष आपण पत्र पाठविले ते पावले. लिहिले वृत्त साद्यंत कळो आले. हैदर नबाब यांची धारवाडातील फौज तोफासह गंगाराम रिसालदार व व्येंकटराव सीवमोगे सवंछर प्रतीपदा करोन येवून मनोली तालुकेपैकी कणवी (?) खालील खेडी घेऊन आपली ठाणी घालुन बहुलीचे मार्गे आहेत म्हणोन लिहिले ते कळले. नरगुंद-कराचे व हैदर नबाब यांचे फौजेचे युद्ध जाहाले. गडास बाहेरला दाणा चारा बंद जाहाला आहे. रामदुर्गाकडे येणार म्हणून लिहिलेप्रमाणे बातमी वर्तमान सविस्तर कळो आले. राजेश्री धर्मराव माने यासी सोईरीक पाहिली आहे. वैशाख मासी लग्न त्यास निरोप देवून पाठवावे म्हणोन लिहिले. त्याजवरून मजकूर नीलेस निरोप देवून पाठविले आहेत. लोक पाठविणे विषयी सदु खांडेकर याने सांगितले वरून पाठविले म्हणोन आपण लिहिले. अशास प्रस्तुत ईकडील प्रकार परशराम रामचंद्र याने येवून सरकार प्रांताची खराबी करून शिरोळे घेतले हे वर्तमान आपणास परस्परे ऐकणेत आलेच असेल. आशात लोकांनी पोटासाठी दंगा करून दरवाजे बंद करून जात होते. त्यास च्यार गोष्टी समजुतीच्या सांगून ठेवून घेतले आहे. तरी च्यार महिने पोटाची बेगमी करून सत्वरी पाठवून द्यावी.

ये विषयी आपणास विस्तारपूर्वक लिहून कळवावे येसे नाही. सदरहु प्रमाणे पोटगीचा येवज सत्वरी पाठवून देवावे. कळले पाहिजे. बहुत काय लिहिणे. लोभ कीजे हे विनंती.



लेखांक : २७

निवडी : २४७७४ / इ. स. १८८०-८१

राजेश्री बाबूराव स्वामीचे शेवेशी विनंती उपरी तुम्ही छ २९ जमादिलावलची पत्रे पाठविली ती पावली. अलिकडे लोक बाजारी वर्तमान बोलतात यास्तव खरी बातमी कळवावी, म्हणोन विस्तारे लिहिले त्यास इंग्रजाकडील वर्तमान तर बदलापुरावर इंग्रज कल्याणहून आले. त्यावर ईकडील फौजेचीलढाई जाहाली दोनतीनशेहे माणूस जखमी व दोनशेहे ठार त्याकडील जाहाले. दोघे सरदार ठार पडले. नामोहरम होवून कल्याणास गेले. सरकारचेही शेपनास माणूस जखमी व ठार जाहाले. गुजराथेकडील वर्तमान तर उभयता सरदारांच्या व इंग्रजांच्या दोन चार लढाया जाहाल्या. पांच सातशेहे माणसे ठार मारिले व काही लुटून हजार बाराशे उंट व हजार घोडे व बैल आणिले. पुढे निभाव नाही असे जाणोन इंग्रज माघारे येवून सुरतेस छावणी करावया करिता फिरले. उभयता सरदार ही त्याच रोखे छावणी करितील. गणेशपंत बेहेरे सुरत आठावीसीत होते. त्याजवर इंग्रजानी छापा घातला. परंतु संभाळुन निघाले. त्यावेळेस लढाई जाहाली. गणेशपंतास दोनतीन जखमा लागल्या. हलक्याच आहेत .कोल्हापुरकराकडील सिरोळ गुमट राजश्री परशरामपंत भाऊ यानी हल्ला करून घेतले. पाचसातशेहे माणूस कापून काढिले हे वर्तमान पूर्वी तुम्हास कळलेच असेल. आलीकडे कित्तुरकर लबाडी करीत होता. या करिता गोकाकेस जावून वेढा देवून मारगिरी केली तेव्हा खासा परशरामपंत यास येवून भेटला. खंडणीचाही ठराव जाहला. श्रीमंताचा प्रताप थोर आहे. सर्वही गोष्टी उत्तमच होतील. करवीरकरासी दुसरी लढाई आलीकडेस जाहली. त्याकडील फौज लुटली. दोनतीनशेहे घोडे पाडाव आले. खासा पळून गेले. पुढे होईल ते लिहून पाठवूत॥ छ १५ जमादिलाखर हे विनंती.



लेखांक : २८

निवडी : ८७ / ता. ५ मे १७८१

तीर्थस्वरुप मातुश्री लक्ष्मीबाई घोरपडे आक्का वडिलाचे शेवेशी आपल्ये नरसिंगराव शिंदे चरणी मस्तक ठेवून दंडवत विनंती येथील क्षेम तागायत छ १० माहे जमादिलावल. वडिलांचे आशीर्वाद सुखरुप विशेष वडीली आशीर्वाद पत्र पाठविले. तेथे तुम्ही हे कर्म काय समजोन केले. तुम्हास बुद्धी देता कोण जाहाला. तुम्हाकडे काही नस्ता जे होऊ नये ते जाहाले ऐसे कितेक सदर दोष ठेवून तपसिले लिहिले ते सविस्तर कळले. आपण वडील होणे वडीलपणे बुद्धीवाद लिहिला. बहुत उत्तम. आम्हास आपणाशिवाय दुसरे वडील कोणी आहे ? आम्ही किल्लेस आलो म्हणून काही बेजबां जाहाले नाही. या राज्यात नुतनच येवून हे कर्म करितो म्हणोन बरा येता. ज्या राज्यातील त्या राज्यात आलेने चिंता नाही. धन्यानी कृपा करून पुर्ववत प्रमाणे सेवा ध्यावी. सेवकास हातचे सोडून देशांतरास लावून ध्यावे हाच लौकिक उत्तम. येसीच धन्याचे व आपले चित्तास आलीया बहुत उत्तम. हल्ली आपण वडील आहा. जेणे करून आमचे कल्याण आणि स्थापनोत्तच करतील हीच खातरजमा आहे. तेथे अधिकोत्तर लिहून कळवावेसे नाही, कळले पाहिजे. हे बहुत काय लिहिणे ही विनंती.

पो। छ १३ माहे जमादीलावल सन ईहिदे समानेन मया व आलफ



लेखांक : २९

निवडी : ८८ / ता. ८ मे १७८१

श्री

पुण्यसील मातुश्री लक्ष्मीबाई घोरपडे यासी प्रती स्नेहपूर्वक समस्त गडकरी लोक किल्ले भुदरगड कृतानेक विनंती येथील क्षेम जाणोन स्वकीय लिहीत आसिले पाहिजे विशेष. आपण बहुता दिवशी स्मरणपूर्वक पत्रे पाठविली ती पाहून बहुत संतोष जाहाला. ऐसेच निरंतर पत्र पाठवून संतोषवीत असिले पाहिजे. तदनंतर किल्लेचा मजकूर येश्या गोष्टी घडल्या येणें करून पुरातन जितके आहेत तितके सबब आला. सर्व प्रकारे धणीयाचे पायेजवळ होवून त्याची कृपा तुमचे

ठाई होवून सर्वत्राचा कलंकीचा डाग उडतो. आर्थ करावा. तुम्हास सांगणार अगर बुद्धी देणार बहुत मिळाले आहेत. परंतु निस्तरणें तुमचेच माथा आहे. ऐसे कित्येक तपसीले लिहिले. आशास ज्या गोष्टी जाहाल्या त्या आपणास परभारे ऐकणीस आल्या असतील. बहुता प्रकारे त्रासाते पावलो. यामुळे आम्हा कडून जी गोष्ट घडावयाची ती घडली. आम्ही धन्याचे पुरातन सेवक. आम्हापासून जरी अंतर पडले तरी धन्यानी माफ करून पोटासी धरावे. ते न करिता आवकृपा करून फौज रवाना करून गावगना जप्ती करून प्रांत उजाड केला. घरेदारे व गवत, कवळे, रानमाळ, डोंगर, कणगर देखील कुली जाऊन सत्यानाश केला. तो काही पत्री लिहिता पूर्वत नाही. आम्ही शेत भात केला. प्रांत फार उजाड झाला तेव्हा आमची नांदणूक राहिली. सेवकपणाचे विचार म्हणावें तर पायाचे नखापासून डोईचे केशपर्यंत आन्याईचे आहो. हात्तीस वोढावे म्हणावयास सामर्थ्य कोणास आहे ? आम्हास चोकडून समाजात बटा लावितात. बहुत उत्तम. बव्या-योग्य काही अनर्थ घडले नाही. हा काळपर्यंत ईमान साबुत राखले आहे. राजेश्री नरसिंगराव सिंदे बापु यास किल्लेस आणिले म्हणोन काही बेजबा जाहाला नाही. दर राज्यातील कोणी किल्लेवरी आले असते तरी सहजचे बरा येता हे आपणास न समजेसे नाही. आपण राज्यातील श्रेष्ठ आणि पूर्व स्नेहीत. वडिला दारभ्य हरयेक विषी ममताभीवृधी चालत आली त्याचप्रमाणे पुढे आपण ममता चालवावी हे आपणास विदीत आहे. आम्ही धन्याचे आवकृपेमुळे संकटी आलो ये विषीचा पेशांदेशी ध्यानी आणून धन्याची कृपा होणे आणि आपणास यश येई यैसे आसलीया आपणाशिवाय काय आहे ? येविषयी अधिकोत्तर कळविले नाही. कळले पाहिजे. बहुत काय लिहिणे हे विंनंती.

पो छ १३ माहे जमादिलावल सन ईहिदे समानेन.



लेखांक : ३०

निवडी : ८४ / ता. ८ मे १७८१

राजेश्री सुबराव घोरपडे गोसावी यासी सकल गुणालंकरण अखंडीत लक्ष्मी आलंकृत राजमान्य समस्त गडकरी किल्ले भुदरगड कृतानेक रामराम. विनंती उपरी येथील कुशल जाणोन स्वकीय कुशल लेखन करीत असले पाहिजे.

विशेष आपण पत्र पाठवले पावले. पत्री किल्लेस आजपर्यंत ज्या गोष्टी जाहाल्या नाहीत त्या गोष्टी आरंभून धनीयांचे किल्लेकरास वगैरे लोकांस नसता मार्ग धरविला आणि आपण सर्व प्रकारे बदलोफिकास पात्र व्हावे ही अक्कल तुम्हांस कोणी समजाविली. खोटे अंगी लावू घेउ नये. ऐसे कित्येक तपसिले लिहीले ते सविस्तर कळले. आशास आम्ही धन्याचे सेवक. वडिलादारभ्य आजपर्यंत काडीमात्र बटा लावून घेतला नाही. आणि पुढेही बटा लावून घेवू नये हेच ईमान शाबुत आहे. ऐसे आसोन बटा लाविलेस यत्न काय आहे. राजेश्री नरसिंगराव शिंदे बापु किल्लेस आणिले म्हणून काही बेजबा जाहले नाही. वरकड सविस्तर मातुश्रीचे पत्री लिहिले आहे. त्याजवरोन कळो येईल. मुख्य गोष्टी आपला आमचा श्रृणानुबंध आज कालचा आहे ऐसे नाही. पूर्व स्मरोन जेणे करून ममताभीवृद्धी होये तो अर्थ करणार आपण सर्वज्ञ आहेत. कळावे बहुत काय लिहिणे हे विनंती.

पोा छ १३ माहे जमादिलावल सन ईहिदे समानेन.



लेखांक : ३१

निवडी : ५३८२ / ता. ११ जून १७८१

श्रीमन्महाराज राजेश्री छत्रपती स्वामीचे सेवेशी सेवक खेम सावंत भोसले सरदेसाई पा। कुडाळ विज्ञापना येथील कुशल तागायत छ ९ जमादीलाखर जाणोन स्वकीये स्वानंदलेखनाज्ञा केली पाहिजे. विशेष स्वामीनी आज्ञा पत्र पाठविले ते प्रविष्ट जाहाले. किले भुदरगडकरी पांच असामी तुम्हाकडे आले होते, त्यास तुम्ही चार गोष्टी समाधानाच्या सांगोन वस्त्रे देवून खानगी केली आणि त्याचा पक्षपात धरून राजश्री विठ्ठल विश्राम यासी हेरेस पाठवायचे करून थोडाबहुत जमाव घालोन समयपरत्वे हजार पांचशेह जमाव गुदरलेस भुदरगडकरी याजकडे पाठवावा. याप्रमाणे तरतुदीत आहा म्हणोन स्वामीनी लिहीले. अशास पेशजी स्वामीचे आज्ञापत्र आले. त्यात इकडून गडकरी यांचे साहित्य केले आण जमावही पाठवला ऐसे लिहिले होते. त्यास इकडून त्याचे साहित्य अगर जमाव पाठविला नसता स्वामी लिहितात याचा भाव काय ? कोणीही मनस्वी स्वामीसी सांगतात ते स्वामी चित्ती आणोन लिहिता, हे स्वामीस उचीत नसे. कोणही गोष्ट स्वामीस

आढळ झालेवर पुर्ता शोध घेऊन मग ईकडे आरोप ठेवावा. इकडून स्वामीचे निष्ठेसी दुसरा अर्थ नाही. हा भाव स्वामीस लिहिलेने स्वामीची खातर न होय. परंतु निष्ठेचा अर्थ सहजच स्वामीचे निदर्शनास येईल. तेथे विस्तारे लिहून कळवावे असे नाही. राजश्री विठ्ठल विश्राम हेरेस जाऊन तेथून जमाव किलेस पाठवितात, येसे दर्शविले तर मशार निले दुगवाडीस गेले होते. त्याचा वसवसा स्वामीनी ध्यावा, हाही प्रकार नाही. ये विषयीचा मजकूर गंगाजी साळोखे व भीवा दळवी व खेलोजी सिंदे हुजूरे स्वामीसी निवेदन करीतील त्यावरून श्रुत होईल. बहुत काय लिहिणे. कृपा लोभ निरंतर असो दिला पाहिजे, हे विज्ञापना.



लेखांक : ३२

निवडी : ३९०९ / ता. १६ आक्टोबर १७८१

अजम यशवंतराव सिंदे सेना सुभासाहेब व सर सुभेदार सलतनत माहाराज शिवाजीराजे छत्रपती दाम मोहबत हु.

शाहामत व मवदत दस्तगाह अजी येसीक कार्ल येरीक ब्रिगेदर जनरल फौजानी सेना हजरत पुर्तगाल व सर सुभेदार अज सरकार गोवा–

मोहीबी किताबत पाठविली पोहचोन मोहीबा खुदाह हयातीने अहा म्हणोन निशा कळोन आलेवरून खुशाली हासील जाहली. सदरहु किताबतीत कलमी केले की, सरदेसाई खेम सावंत भोसले फितुर होऊन माहाराज शिवाजी राजे याजवर शमसेर धरणेचा जुल्मम करून रांगणेस माहासीरा केला. अशास हे बात अगोदर इजानीबास कळलीच होती. मजकूर निले महाराजाचा आश्रा मागणेस अयोग्य, सबब त्यास जोर नतीजा ध्यावा हेच युक्त आहे. राजेश्री विठ्ठल गोविंद येथे पावताच ईज्यानीबास जबानी सांगायाचे सांगोन यकबाल व ईजकाल पनाह गोवर्नदोर कपीता व जनराल साहेबाची मुलाजमत हासील केली. त्यानी मजकूर ध्यानात आणोन माहाराजास जबाब देखील मजकूर मुद्दे दाखल केलेस दिल्हा. त्यावरून मोहीबास सर्व माह्मम होईल. सर्वदा तुमचे खुषीचे असेल तेथे ईज्यानीबाचे दोस्तीचा निशा दावीला आहे. खुदायताला मोहीबास रखो. गोवा–

तारीख १६ माहे आक्टोबर सन १७८१

येसीक कार्ल येरीक



लेखांक : ३३

निवडी : १३ / ता. ८ नोव्हेंबर १७८१

श्रीमन्महाराज राजेश्री छत्रपती स्वामीचे शेवेशी विनंती सेवक बाजीराव गोविंद कृतानेक विज्ञापना येसीजे येथील कुशल तागायत छ २१ माहे जिल्काद पावेतो स्वामीचे कृपावलोकने करून सेवकाचे वर्तमान यथास्थित असे विशेष स्वामीनी प्रधानपंत यास आज्ञापत्रे वस्त्रे देवून राजेश्री परशुराम बलाल व महादजी हरी या समागमे पाठविली होती. त्यावरोन उभयतास येथे ठेवून घेवून आम्हास त्या प्रांतातून इकडे बोलावून आणिले तो सर्व अर्थ प्रधानपंत यांचे व आमचे बोलणे जाहाले त्यावरोन राजेश्री सेनासाहेब सुभा यांस पत्र अलाहिदा लिहिले आहे. ते सविस्तर स्वामीस विनंती करतील त्याप्रमाणे आज्ञापत्रे यावी म्हणोन स्वामीसेवा घडून येईल. मातबर फौजे सहीत शेवेशी येतो. सेवेशी श्रुत होय हे विज्ञापना.

सन ईसने समानीन



लेखांक : ३४

निवडी : ३९११ / ता. १५ नोव्हेंबर १७८१

आजम यशवंतराव शिंदे सेना महाराज छत्रपती सुभा व सरसुभेदार दाम मोहवत दौलत हु.

शाहामत व मुवदत व हशमत दस्तगाह मोहीबीकडील किताबत खुशीने मान्य क ोन येकबाल व ईजकलपनांह गोवर्नदोर कपीता व जनराल साहेबास माहाराज छत्रपतीकडील किताबती व सदरहु जाहीर करीता कुल मजकुराचा साहेबी जाबसाल केला असे. भोसलेनी आज आठ माह परीयंत बुलंद किला रांगणे माहासीरा करून वेढा बसविला असता माहाराजानी आजीला आपणा-

कडील फौजा पाठवून गनीमास उठवीत नाहीत यांचे ताअजुब दिसोन येते. सिंधुदुर्गास माहाराजाकडील सबल आरमार असताना बुडदे कडील तरांडी स्वारीस निघाली असेल त्यासही बत्ती न देता ईस्तादाकडोन कुमक व्हावा असेच लिहीतात. त्यास सदरहु डांग दुशमनावरी ईस्तादाने आपले शमशेर मारून त्याजकडील ठाणीमहाल काबीज करोन मसलहत चालवीत असता आणीक आपणास काय तो कुमक करावा आहे? बाजे मजकूर ईजत असार दादाजी पांडुरंग जबानी सांगता मालुम होईल. खुदायताला मोहीबास रखो हे नवस्तिन गोवा

तारीख १५ माहे नवंबर सन १७८१ येसीक कार्ल येरीक



लेखांक : ३५

निवडी : १५६२८ / इ. स. १७८१–८२

यादि राजमंडलाकडून करार होऊन यावयाची कलमे मु।। इहीदे समानेन मया व आलफ.

मातुश्री आनुबाई यांची वतने वगैरे पेशजी प्रो चालवावे. कलम

पेशजी वहीवाट चालत आली आहे त्या प्र।। आज्ञा करून चालेल. करार.

चिकोडीकर व कागलकर जमींदार यांची वतने आहेत ती पुरातन प्रमाणे चालवावी........कलम

कागलकर जमीदार याचे वर्तन पेशजी वैवटी चालत आली आहे त्या प्र।। आज्ञा करून चालेल. चिकोडीकर याणी आजीपर्यंत राजासी आपाय करीत आले. हाली किले भुदरगड येथे फितूर लोक आहे. तेव्हा याचे वतीने चालणार नाही. करार.

शिवाजी भोसले यास उपद्रव न व्हावा कलम

त्याणी स्वामीचे चरणासी वर्तणूक अमर्यादा करू नये अगर स्वामींचे पायासी व राज्याविसी दुष्टबुद्धि धरतील त्याचे मीलनात मिलोन गैरवर्तणूक करू नये आणि कडील बंड फितुर फाकडा करू नये. म्हणीजे यास उपद्रव होणार नाही. करार.

कसबे शिरोळ व आकीवाट येथे देवास व ब्राह्मणास जमीन सवादोन चावर दिली आहे ती चालवावी. कलम

श्री देवास जमीन दिल्ही आहे ती आज्ञा करून चालविली जावी. ब्राह्मणाचे जमीनीवीसी राजश्री बाल जोसीराव व शिवराव या उभयतास आज्ञा केली आहे करार.

राणोजी घोरपडे सेनापती याचे चालवावे. कलम

त्याणी स्वामीचे पायासी एकनिष्ठेने वर्तणूक केली तर त्याचे चालविले जाईल.

कैलासवासी नारायणराव प्रधान याचे वेळेस यादि सन सल्लास सबैनात ठरली आहे त्याप्र॥ उभयपक्षी चालावे त्यापैकी व हाली.

१ एकसंबे
१ भोज
१ बोरगाव
१ राजापूर
१ वाळवे
२ लाट व रांगोळी
१ दत्तवाड
३ ब्राह्मणाकडे देहे
११

हाली कराराप्रमाणे चालेल. एकूण सदरहु कलमे साहा असत.

सदरहु प्र॥ यादि परशुराम रामचंद्र यांजकडून आली. याजवरी सदरी प्र॥ मखलासी करून राजश्री सेनासाहेब सुभा सरसुभेदार याजकडे करवीरास पो॥ माहे रजब सन इसने समानीन



लेखांक : ३६

निवडी : १४५२ / इ. स. १७८१-८२

करारनामा येणे प्रमाणे कलमे करार करून दिल्ही असत, बीतपशील

किल्ले सातारासुद्धा....सरकारात स्वाधीन करून स्वामीचाच सिक्का एक पृथ्वीवरी चालवू. कलम १.

मुलकगिरीहून प्रतीवर्षी आलीयावरी हुजूर दर्शनास येऊ ते समई खंडणीचा ऐवज जो असेल तो वाजिबी देत जाऊ. सिवाय नजरनिस्त व जडजवाहीर व कापड व हत्ती घोडे व हरएक अपूर्व जिन्नस सरकारात नजर करू. कलम १

गोदानदी अलीकडे अहद्द तुंगभद्रा नदीपर्यंत दक्षिणेस व पश्चिमेस समुद्रापासोन पूर्वेस विजापूर पर्यंत....राज्य करून घेऊ.

सदरा खेरीज पंचवीस हजार स्वारांच्या खर्चाबद्दल स्वदेशात कबजी मुलख साहेबाच्या स्वराज्यादाखल करून देऊ. कलम १

कैलासवासी शाहू महाराज यांचे कारकीर्दीस सरकारकून व सरदार वगैरे लहान थोर सेवक याजकडे सरंजाम व गडकोट किल्ले व ठाणी होती त्यापैकी दुसरे कोणाकडे गुंतला असीला अगर खुद्द अलबाकडे खाजगीस जरी असीला तरी तो सरंजाम ठाणी व गडकोट सरकारात देऊ. कलम १

सरकारकून अगर सरदार वगैरे लहान थोर सेवक यांस जो स्वामीचे पायाशी अमर्यादा वर्तणूक करील त्यास आज्ञेप्रमाणे नसीहत पोहोचऊ. त्यास सामील अंतर्यामी अगर बाह्यात्कारे होणार नाही आणि त्याचा अर्जही करणार नाही.

आमचे मुतालीक व फडणीस सरकारात स्वामीजवळ नेहमी हुजूर सेवेसी ठेवणे. अगर दुसरे सरकारकून यानी ठेवणे येकूण अष्टप्रधान याचे मुतालीक फडणीस ठेवणे ते ज्यास साहेब मुतालीकी व फडणीसी आज्ञा करून सांगतील त्यास आम्ही करार करून ठेवावे. त्यास करार दूर करणे ते स्वामीचे आज्ञेनुरूप करावे. कलम १

जिकडे मुलुखगिरीस जाऊ, सरकारची पंचवीस हजार फौज व जरी पटका व नगारा घेऊन जाऊ. त्या बराबरी सरकारातून सरदार येतील ते व आम्ही एक विचारे चालून त्यांचे बहुमानाप्रमाणे बहुमान चालवीत जाऊ. कलम १.

ज्या प्रांतात मुलुखगिरीस जाऊ तेथील खंडणीचा ऐवज व गडकोट किल्ले व सरंजाम येईल त्यापैकी सरकारची चौथाई व सरकारची पंचवीस हजार फौज येईल त्यातून चौथाई असे दोन्ही सरकारात देऊ. कलम.

जे समई ज्यावरी साहेब आज्ञा करतील त्याचा पक्षपात अंतर्यामी अगर बाह्यात्कारे न करिता त्याजवरी मोहीम करून नसिहत पोहोचवू. कलम

झाडेनिसी गडकोट यासी सरकारने हवालदार व सरनोबत व सबनीसीस व कारखानीसीस व फडणीस, शककर्ते शिवाजी महाराजापासून चालत आले आहेत. त्याप्रमाणे पुढे ठेवावे. त्यात आपल्याकडील देखील सरंजामात याप्रमाणे ठेवावे. व त्याकडे जुन्या पैकी व कोणास नव सरंजाम साहेब कोण्हास करार करून देतील तेथेही याप्रमाणे साहेबी ठेवावे. कलम १

अष्ट प्रधान याजपाशी हुकूमदार व चिटणीस व सरकारकून स्वामीने हुकूम देतील ते असावे.

दर्शनास येऊ ते समई सरकारकडून व सरदार व अठरा कारखाने जे मामलेदार वगैरे लहान थोर स्वामीचे सेवक यांचा बहुमान सेवकाने ज्याचा त्याप्रमाणे करावा. कलम १

सरकारकून व सरदार वगैरे लहान थोर स्वामीचे सेवक आहेत. त्याचकडे गडकोट किल्ले ठाणी व सरंजाम आहे. त्याचा करार करणे तो सरकारातून करावे. त्याची रदबदली आम्ही करणार नाही. कलम १

चंदावरचे संस्थान अर्काटवाले याने जप्त केले आहे. ते संस्थान त्याने सोडोन दिल्हे जे असीले तरी उत्तम. कदाचित राहीले असीले तरी चंदावरीचे संवस्थान घेऊन सरकारात देऊ. कलम १

कलमे एकूण १५

एकूण कलमे पंधरा कराररनाम्याची आपले स्वसंतोषे साहेबाचे सेवेसी लिहून दिल्ही आहेत. त्याप्रमाणे साहेबाचे सेवेशी एकनिष्ठपणे चालवून राजेश्री यशवंतराव शिंदे सरसुभेदार यासी स्नेहभावे एक विचारे साहेबाचे आज्ञेप्रमाणे वर्तणूक करू. त्याजविषयी हरकोणी हरएकप्रकारे सांगतील ते ध्यानावरी न घेता नि:क्रित्रीम एक्यता उभयपक्षी स्नेहभावे चालू. यासी अंतर करू तरी आपले कुलस्वामीची व आपले स्वधर्माची शफ्त असे.

सदरहूप्रमाणे करारनामा बाजीराव बर्वे याजकडे पाठविला त्याची नक्कल असे.



लेखांक : ३७

निवडी : १६२ / ता. २५ एप्रिल १७८३

यादी किल्ले भुदरगडकरी लोक किल्ले खाली उतरतील त्यास गाव राहावयासी द्यावा. तेथे मुले माणसे सुद्धा राहातील. त्यांस कुटुंब माफक पोटास नेमून तेथेच द्यावे. हुकेरी तालुका सुटलेनंतर तालुकीयात राहावयासी जागा देवू. सदरहू नेमणूकेप्रमाणे पोटास देत जावे. कलम

गडकरी लोकानी हल्ली हुजूर स्वामीचे शेवेशी येवून जामीन खातरजमेचे देवून जामीन कदबे प्रथम प्रथम ईमान पत्रे लांडीलबाडी, फितुरफंद, हिला हरकत करू नये, या प्रमाणे लिहून घ्यावेत व चार महिने पोटास देणेविषयी पूर्ववत् प्रमाणे तुर्त राजेश्री विठ्ठल शेषाद्री व रामचंद्र नारायण यासी आज्ञा जाहाली आहे. आणि स्वामी आज्ञा करून ज्या गावी ठेवितील तेथे सुखवस्तु दाखल राहावे. आणि गडकरी लोकानी स्वामीचे शेवेशी येवून प्रथम प्रथम जामीन कदबे व इमान पत्रे लिहून द्यावी. स्वामीचे आज्ञेप्रमाणे गडकरी लोकांनी आज्ञा होईल तेथे सेवा करावी. उपरांतीक पोटास पूर्ववतप्रमाणे हुकेरी तालुका हुजूर सरकारात सुटले नंतर तालुके ऐवजी उभयता मशारनीलेकडून आज्ञा करून देविले जाईल. सु॥ सलास समानीन मया आलफ छ २२ माहे जमादिला



लेखांक : ३८

निवडी : १०७ / इ. स. १७८३-८४

राजश्री गुजाजी गाईकवाड सरखवास यासी–

प्रति बालजोशीराव आशिर्वाद. उपरी इकडील कुशल जाणोन स्वकुशल लिहीत असावे. विशेष आपण पत्र पाठविले ते पावले. पत्री लिहीलेने राजेश्री परशुरामपंत यांजकडून पत्र आले ते पाठविले आहे. पत्राचे उत्तर लिहीणेचा मजकूर लिहीला तो कळला. त्यास मजकूर लिहून घेऊन कारकुनाची रवानगी केली. परंतु आळतेस श्रीमन्महाराज राजश्री स्वामींचे सेवेसी विनंती केली होती. इकडील पाटील गावकरी जे असतील त्याची मखलाशी करून सोडते समयी राजेश्री बाबाजीस आज्ञाही जहाली होती. परंतू अद्याप पाठविले गेले नाहीत,

राजश्री प्रतिनिधीकडील कारकून साह असामीची याद घेऊन आला आहे. आम्ही उत्तर दिले. परंतू आणखी पत्रे यास्तव जे पाठविली असतील त्यास तस्ती करून चार रुपये घेऊन........

ची पत्रे पाठविली ती पाहिली. राजेश्री भाऊसाहेब आपण आपणाकडे पाठविली आहेत. दोन्ही पत्रे कागदाबरोबर पाठवून द्यावी. त्यावरून सविस्तर मजकूर कळले. बहूत काय लिहीणे.

लोभ असावे हे आशिर्वाद.

आरबा समानीन.



लेखांक : ३९

निवडी : १७२१५ / ता. १९ एप्रिल १७८८

महाराज राजश्री शिवाजीराजे छत्रपती ज्युदाम येकबालहू. दौलत व येकबाल पन्हाही हिशमत व शौकत दस्त गाहा निशान बुलंद मकान वालातीबर अजी दील येखलास हनराबल अंदु रामसी ईस्कायेर प्रजीपेत गोवर्नदोर जनराल जंजीरे मुंबई बादज शरे शौक मशहुद राये तवखुदु पेराये आंकी दरीविल ईजानेबास जरूर जाहाले जे दिगर दोन तरांडी इंग्रजी काले........

....निशाणे अस्ता थोडके रोजावर आशौकत पन्हाकडील आरमाराने दस्त केली आहेत. त्या बाबे आशौकत पन्हाकडून तलबा करावी. गुलाब बनाम 'रुपारेल' निसबत जमसेदजी रस्तमजी साकीन दुबे व सारंग हाजी, आज येक माहा होत आला. जंजिरे मजकुरीतुन रवा व डाळ वगैरे जिन्नस भरून तलचेरीस रवाना जाहाली होती ते व दिगर येक बोट बनाम 'येजदांबक्ष' निसबत विठ्ठल दास सुरतकर बेपारी. तिजवर सुरतचा कौल आहे, ती गोव्यास रवाना जाहाली होती. तेथुन खाली येता 'रुपारेल' दस्त केली, तेच रोजी मालवण येथील आरमाराने दस्त केली आहे. व तिसरे तरांडे निसबत गुज्यारतमांब मनोरदास रुपजी यांचे दस्त केले होते. अभा कौल पाहिल्यावर दानाईने सोडून दिले. अजी जे बात ईजानेबा बाजीद होऊन तलबा करीत असो जे सदरहु हरदु तरांडी खलास केली पाहिजेत. थोडके रोजावर आंशौकत पन्हा वर्तणूक अमलात आणिली त्यावरून

व हमेशा आहिशामत पन्हाकडून ईजानेबास मेहनत जहुरात येत आहे की हे बाबे आशौकतपन्हास पैदारके कलमी करारे व ईजानेबांचा दावा खातीरात आणीत नाही. बलकी दफुले बख्त करितात. ऐशास ईजानेबास जरूर होईल की हरघडी तर्फेने सरकारा दरम्यान येखलास व येतीमाद चालत आहे. त्याचे खिलाफ इंग्रेजी निशाणावर आशौकतपन्हाकडून शौखी होत असे, त्याचा बदला करून घ्यावा. ज्यावरून आंशौकत पन्हा बिसीयार कसाल्यात पडतील. सदरहु हरदु तरांडी व चांदभाईचे तरांडे यांजवर ह्या ईस्तादा कडील इंग्रेजी कौले आहेत, अजी सबब ईजानेबा तसदुर करितो की सदरहु तरांडी बाजलद खलास केल्या शिवाये ईजानेबाची काईम रगबानकी पिछा करून तरांडी याचे खाविंदाची खातर जमा होये ते करावे. ईजानेबा करावयास दिलगीर असो की सदरहु बेपारी यांची दाद पोहचवावयास एकच तदबीर आहे की, आंशौकतपन्हा कडील तरांडी ईजानेबांचे आरमारासी मुलाकत जाहाली यावर काबीज करावी, ऐशासच्या हाताने ह्याचा हर जबाब तुर्त रवाना केला पाहिजे. आंशौकतपन्हा बहाना दरपेश आणितात की, डिंगी चांदभाईची नव्हे. तरी ही बात कामाची नाही. सबब की, आशौकतपन्हाच कबूल होतात जे सदरहू डिंगीवर ईंग्रजी कौल होता. तेव्हा सहजच ईंग्रजी निशाणावर शौखी जहुरात आली अगर आशौकतपन्हाच्याने शाबुत करवेत की, सदरहु डिंगी ईंग्रजाचे रयतेची नाही, तरी मागाहून ह्याचे दाव्याचा जबाबस्वाल करावयाचा होता. जियादा बनून शौकतची........

आयाम बकाम बाद ता ।। छ २६ जमादिलावर हे किताबती.

सही इंग्रजी

इंग्रजी मजकूर

शिवाजी राजे ऑफ पन्हाळा

बॉम्बे ४ एप्रील १७८८

पो छ १२ माहे रजब सुमा समान समानीन मया व आलफ मु।। किले पनाला. हरी दादाजी यादव.



लेखांक : ४०

निवडी : ७०५५ ता. / १० जानेवारी १७९२

श्रीमन्माहाराजे राजेश्री छत्रपती
साहेबासी शेवेशी

आज्ञाधारक गोदाबाई गायकवाड दोन्ही कर जोडून चरणी मस्तक ठेवून विज्ञापना ऐसीजे तागायत छ १५ माहे जमादिलावल पावेतो साहेबाचे कृपावलोकने करून राजाचे शेवेशी मकर संक्रमणाचे तीलशर्करायुक्त व फराळाचा पेटारा सुमारे एक पाठविला आहे. प्रविष्ट जाहालीयाचे आज्ञोत्तर साद करणार धनी समर्थ. शेवेशी श्रुत होय हे विज्ञापना.



लेखांक : ४१

निवडी : १२४ / ता २६ ऑगस्ट १७९३

राजश्रीया विराजीत राजमान्य राजश्री बाल जोशीराव स्वामीचे शेवेशी– पो।। परशुराम रामचंद्र साष्टांग नमस्कार– विनंती येथील कुशल जाणोन स्वकीय लिहित जाणे. विशेष सावंताचा तालुका खातरजमेने सोडावयाचा मजकूर पेशजी तुम्ही लिहिला व रा।। बाबूराव नरसिंव्ह याज बराबर सांगोन पाठविला त्याजवरून हा मार सरकारात लिहून पाठविला. तेथे तुम्हाकडून चिठ्या गेल्या होत्या त्या येथे आल्या. सबब ताज्या चिठ्या व हुजरे व कारकून पाठवावयाकरिता तुम्हास दोन वेळा येथून लिहिली असोन त्या प्रमाणे न करिता लिहिता की बाबूराव यास पाठवून द्यावे. संशय धरू नये. लढा नाही. त्यास आज चवदा महिने होत आले. कोणताच शेवट नाही. तत्राप तुम्ही बोलत होता त्याचा प्रत्यय आला. फसवण्याची गोष्ट दिसते. बाबूराव यास पाठवावयाचे प्रयोजन कोणते ? दिवसगतीचा प्रकार समजला. आम्ही शेजारी असता तुमचे बरे व्हावे हे चितात आणोन तुम्हाला लिहीत गेलो, ती गोष्ट तुमच्या गावीच नाही. ईश्वर इच्छा काय आहे कळत नाही. सरकारची पत्रे वरचेवर निकडीची येतात. कोठपर्यंत वाट पाहवी. असो. चाल समजली. ये विषयीचे बाबूराव लिहितील ईश्वरईच्छा प्रमाण. छ ५ मोहरम पुण्याहून यादी आलेली पण आहे व बाबूराव लिहितील त्याज वरुन कळेल या

उपर आम्हाकडे शब्द नाही बहुत काय लिहिणे लोभ असावा हे विनंती – छ १८ मोहरम सन आर्बा तिसेन श्रावन मास



लेखांक ४२

निवडी : २०४९६ / इ. स. १७९३

शेवेशी आर्जी गोविंद दासो ठाणे आळते कृतानेक शेवेसी विज्ञापना त।। छ २९ माहे शाबान पावेतो स्वामीचे कृपावलोकने करून सेवकाचे व ठाणे मजकूरचे वर्तमान येथास्थीत आसे विज्ञप्ती ऐसीजे बातमीचे चिंतामणराव फौजे सुद्धा उदयीक रविवारी सात घटिका दिवस आले नंतर कुच करून दुदगाव येथे मु।। करणार बह्यात्कोर बोले. पण आळतेवर स्वारीची तयारी आहे. रामचंद्र परशराम व दाजी परशराम हे हरीपुरीच आहेत. उदयीक कूच जाहले नंतर रामचंद्र परशराम मिरजेस जाणार. फत्तेसिंग माने याची मु।। पालीवर आहे. त्यासी मिळून येलीकडे उतरावयाचा बेत. चिंतामणराव दाजी परशराम हे ऐलीकडे उतरणार आणासाहेब काही ऐलीकडे यावयाचे नाही. होळकराकडून दाहालक्ष रुपयेची वरात कुरांदवाड, मीरज, तासगाव या तिघाजणावर आहे. पंचवीस राऊत व दोघे कारकून आले आहेत. फत्तेसिंग माने यासी कर्नाटकाचा सुभा सांगितला आहे. त्यास फौजेचे खर्चास सदरहु ऐवज देविला आहे. माने मजकुर यानी मिरज तालुकेची खेली, आधेली, बालवडी, पर्यंत रोखलेले आहेत. होळकराकडे बोलणेस आप्पाजी नाईक सहस्त्रबुधे म्हणून मिरजेत आहेत. ते वकिलास फ।। आहेत. माझेकडेही कारकून लवकर फौज सुद्धा यावयाचे करावे, म्हणून बोलावणे पटवर्धन मंडळी कडून गेले आहे. चिंतामणराव यासी कोण एक जंगम जाणता तेरदाळाकडून किंवा हुबळीकडून आणिला आहे. त्याने सांगितले आहे की या पंधरा दिवसात जे करशील ते साध्य आहे. असे चिंतामणराव यासी सांगितले आहे. दुसरा जाणता सांगलीकर नेमप्पा जईन याने भविष्य सांगितले आहे. मिरजकरासी पैलीकडे उतरून गेले असता एक जण राजमंडळकरास हस्तगत होईल. मिरजेचे किलेवरून तोफा एक वेळ मारगिरी होईल आशी काही घडेल, याप्रकारे त्यांचे सांगणेचे भविष्य आहे. वर्तमान आले ते सेवेशी निवेदनार्थ विनंती लिहीली असे हे विज्ञापना. मदवावी वरील पेंढारी रोज गु।। सांगलीकर झाडेनिशी

येऊन उतरले आहेत. दोन प्रहरी आले. शिलेदार यानी आडती घातली आहे की रोजमुरा आपला द्यावा आणि लोक आणखी द्यावे. नंतर पैलीकडे उतरु. नाही तर उतरत नाही. आसे म्हणणे आहे. आरब लोक आणावयास पाठविले आहेत. हशम ठेवणार कळावे हे विज्ञापना.



लेखांक : ४३

निवडी : १३५ / ता. १७ जानेवारी १७९४

समस्त राजकार्य धुरंधर विश्वासनिधी राजमान्य राजेश्री प्रीतिराव चव्हाण हिम्मतबहाद्दर ममलकतमदार यासी आज्ञा केली ऐसाजे. पुणेस रवानगीस राजश्री आबाजी निकम नेमिले होते, त्यासी मशार निलेचे पुत्रांस बहुत समाधान वाटत नाही. यास्तव राहिले. राजश्री बहिरजी नाईक गायकवाड यांची रवानगी करून दिली. आपणास कळावे. वेदशास्त्रसंपन्न राजश्री बाळोजीराव व राजश्री आनंदराव घाटगे झुंझारराव अद्यापी तासगावाहून हुजूर आले नाही. कळावे. याजकरितां आज्ञा केली असे. जाणिजे. सुमा. आर्बा तिसेन मया व आलेफ छ १४ माहे जमादिलाकर बहूत लिहिणे असे. तरी सूज्ञ असा.



लेखांक : ४४

निवडी : १३६ / ता. १८ जानेवारी १७९४

समस्त राजकार्य धुरंधर विश्वासनिधी राजमान्य राजेश्री प्रितीराव चव्हाण हिंमतबहाद्दर ममलकतमदार यास आज्ञा जहाली ऐसीजे. राजश्री आनंदराव घाटगे झुंझारराव याणी मजकूर हुजूरास निवेदन केला. तो काली गुरुवारी तुम्हास आज्ञापत्री आज्ञा जाहलीच आहे, त्यास तुम्ही फौज घेऊन बाहीर गेला आहा. तिकडे आसिलेस उत्तम किंवा करविरी एकेठाईच असिलेस बरे. यात आपले विचारास कसे येते त्याप्रमाणे विनंती लिहून पाठवावी. हुजूरांचे मनास फार दूर नसावे. येकेठाईच करवीरलगत नजीक असावे. यात राजश्री रत्नाकरराम पोतनीवीस यांचे व आपले विचार कसे येते त्याप्रमाणे विनंती पत्र लिहून

पाठवावे. जाणिजे. सु॥ आर्बा तिसेन मया अलफ स. छ. १५ माहे जमादिलाकर. बहूत लिहिणे तारीख खुः



लेखांक : ४५

निवडी : १४४३९ / ता. १५ मार्च १७९४

यादी सु॥ आर्बा तिसेन छ १२ साबान

१ टोळी बा॥ दीड लाख रुपये हाली घ्यावे. तो येवज आमचे हवाली जाल्यावर राजश्री भाऊच्या पदरी ऐवज घालोन होता दिकत पडल्यास हुजूरचा ऐवज न्यावयास कोणी येईल त्याचे पदरी ऐवज घालावा. कलम.

१ तीन लक्षाची निशा सांगावयाची त्यास हुजूरच्या मामलेदार याजकडून खातरजमा करून देवावी, असा अलाहिदा करार आहे त्यास राजश्री भाऊकडे तालुका आहे तो सुटलेवर पावणा लाखाच्या निशेस जाजती तालुका निशा होऊन राहील तो हुजूर हवाली करावा. कलम.

१ स्वामीच्या आज्ञेवर सेवकाने लक्ष देवून कोणताही नफा तुर्त न पाहाता फक्त दाखल कारभार केला आहे. मोबदलीचा वगैरे आड न धरिता स्वामीच्या आज्ञेवरून काय खुलासा करून देतो याजवर भिस्त ठेवून चाकरी केली आहे. त्याप्रमाणे गावचे कार्य सेवकास लावून देवून चाकरी घेणार स्वामी समर्थ. कलम.

१ येकंदर जाबसाल आम्हाकडे सरकारातून होणारे तेव्हा दीड लाख रुपये याचे भरतीस आबाजीपंत व बच्याजीपंत याणी २९५०० साडे येकुणतीस हजार रुपये घ्यावे. त्यास जोशीराव याणी येऊन राजश्री भाऊसी बोलोन जाबसाल उलगडल्यावर येवज भरावयाचा. त्यासी उभयताकडील ऐवज आहे तो आज्ञेप्रमाणे आम्हाकडे पुरवून घेऊ. कलम.

१ महाल निशेबद्दल पावणा लाखाचा घ्यावा असा इस्तकबाल पासोन सेवकाचा मनोदय. परंतु स्वामीची मर्जी पाहिली जे सेवकास व्येतन सीबंदीचा कसर वगैरे काही या, वेळेस मिळो नये, पेस्तर विनंती करावी. त्याजवरच दृष्ट देवून हुजूरच्या मामलेदार यांचे खातरजमेवर नीशा सांगावी त्याजवरून करार केला आहे. पार पाडणार स्वामी समर्थ. कलम.

१ मौजे आरळे हजर रुपये ८०० आठशे गुजाजी गायकवाड सरखवास याज-कडे हुजूरचे येणे ते सेवकाकडून एकंदर जाबसाल होणे समई आठसे रुपये भरण्यास पुरऊन घेऊ. कलम.

येणेप्रमाणे साहा कलमे करार.



लेखांक : ४६

तोरगल : ६ / ता. २८ एप्रिल १७९४

राजेश्रीया विराजीत राजमान्य राजेश्री परशराम रामचंद्र स्वामी गोसावी यासी माधवराव नारायण प्रधान नमस्कार विनंती उपरी येथील कुशल जाणोन स्वकीय कुशल लिहीत जाणे. विशेष. राजेश्री धोंडजी वाघ यांचा संधाने येथे आला. त्यानी आपले मतलबाची याद पाठविली. त्यापैकी कलम करार करून देवून याद व खातरजमाचे पत्र आलाहिदा रामचंद्र मळेकर कारकून याजबरोबरी रवाना केले आहे. त्यांसवे त्याजकडे जावून बोलणे ठरावात करत प्रमाणे आणून सरकारची ठाणी त्यानी घेतली आहेत. सरकारात हावाली करून देतील ती हवाली करून घेणे. वाघ मजकूर हुजूर येतील त्यास येवून देणे. आडथळा न करणे. जाणीजे छ २७ रमजान सुमा आर्बा तीसेन मया व आलफ बहुत काय लिहिणे हे विनंती.



लेखांक : ४७

निवडी : १३९ / ता. २६ जून १७९४

राजेश्री गुजाजी गाईकवाड सरखवास गोसावी यांस—अखंडीत लक्ष्मी अलंकृत राजमान्य राजेश्री परशुराम रामचंद्र आशिर्वाद उपरी येथील खुशाल जाणोन स्वकीय लिहीत जाणे. विशेष तुम्ही पत्र पाठविले ते पावले. प्रांतातील वसूल वजा यावा व व्याज काढून ऐवज घ्यावा, या प्रमाणे करार आहे. त्या-अन्वये घडवावे. ओलीच्या सुटकेचा यैवज सावकारी पटवितो. त्याची सुटका व्हावी म्हणून लिहले ते कळले. बारगीर गोसावी यांच्या सांगितल्यावरून समजले. ऐसीयास प्रांतातील वसूल कोणता, कोठे आहे व व्याजाचा आशय काय हे समजण्यात आले नाही व कोणी बोलण्यातही आणिले नाही. (शिक्का). ओलीच्या

सुटकेच्या ऐवजाची वाट पहात आहे. कराराप्रमाणे ऐवज आले. आल्यानंतर काय गूंता आहे हे विसीचे बारगीर गोसावी सांगतील त्याजवरून कळेल. जाणिजे छ २७ जिल्काद खमस तिसेन मया व अलफ बहुत काय लिहीणे हे विनंती.



लेखांक : ४८

निवडी : १६६४९ / ता. २८ जून १७९४

राजमान्य राजश्री परशराम रामचंद्र यांस आज्ञा केली ऐसीजे. तहाचे बोलणे ठरल्याप्रमाणे फडशा व्हावे, त्यास राज्यावरी कसाले कसकसे पडत आले हे सर्व तुम्ही जाणतच आहात. शांत करार जाहल्यास फेर पडू नये हे जाणोन आज्ञा होऊन ऐवजाची तरतूद काही करून पाठविली. ऐवज दीड लाख घेऊन मुले सोडावी, पुढे तीन लाख रुपयेची निशा चार साला सांगोन तालुका हुजूर घ्यावा. त्या संमंधे कलमे. पाडाव सोडावी. त्या पैकी काय पावले ते पावले. बाकी जे आसेल ते सोडावे. त्यात राहीले त्यांचा पत्ता जेथे लागेल तेथे करून हुजूर विनंती लेहून पाठवावी. आज्ञा करून देविले जाईल. हुजूरून त्यास आसरा होऊ नये. तुमचे तर्फेनं उलगडून येणेचे यावे व चार साल हप्तेबंदीचा ऐवज देणे तो जे समई आज्ञा करून देऊ ते समई व्याज एकोत्राप्रमाणे काढून ऐवज घ्यावा. आजपर्यंत जाहली गोष्ट येत नाही. कोणीकडून जाहले तरी असता हुजूरच दोष येतो. बरे जाहले ते जाहले. इतक्या उपर आज्ञेप्रमाणे तोडीवरी घेऊन जाबसाल उलगडा-वयाचे हे निखालस विनंती लेहून पाठवावी. हुजूरची परीक्षा बहूत पहावी हे उत्तम नव्हे. हे जाणोन जसे सोईस पडेल तसे जाबसाल उलगडेत येत असे करावे. जाबसाल उलगडल्यानंतर हुजूरचे दर्शनाचा योग घडावा. हा योग घडले अंती परस्परे किंतू परीहार होईल. हुजूरून जाबसाल बोलोन गेले ते तीकडेच जाऊन बसले. निकडीने आज्ञा जाहली असता तपसीले विनंती लिहीतात. स्वामींच्या आज्ञेचें साभीमानी आहा. तुमचेही चित्तास दिवसगत लागोन राज्याचे चीत यावे असेच असल्यास चिंता नाही. येविसीची विनंती सविस्तर राजश्री बचाजी बलाल यांसी बोलोन हुजूर विनंती पत्र लिहून पाठवावे. अत:पर चित्तात विकल्प न धरिता जाबसाल खोल पत्रे उरकून आपले वाट्यास येई असा अर्थ करावा. इतक्या उपरी कोणत्या गोष्टीची परीक्षा आपण पाहावी हे ठीक नव्हे.

राज्याचे अकल्याण इच्छिले असता आपणास लौकिकावह नव्हे. आज्ञा अन्वये समजोन कार्याचा उलगडा करून विनंती पत्र पाठवावे. यातच आपले निष्ठेचा भाव स्वामीचे समजण्यांत येईल. जाणीजे सु।। खमस तीसेन मया व आलफ छ २९ माहे जिलकाद.



लेखांक : ४९

निवडी : १३० / मार्च १७९५

राजश्रीया विराजति राजमान्य राजेश्री भाऊ जोशीराव स्वामीचे शेवेशी—पो।। बाबू सिंदे सा. नमस्कार विनंती उपरी येथील वर्तमान ता।। छ ९ मुक्काम खरडे यथास्थीत आहे. विशेष आपण पत्र पाठविले ते पावले. येजमानास आपले पत्र प्रविष्ट करून उत्तर पाठविले आहे. पहिले पत्र एक इचलकरंजी पाठविले आहे ते आणुन द्यावे. ईकडील वर्तमान नबाबाची व श्रीमंतांची लढाई प्रहर दिवसापासून प्रातःकालच्या सुरू होऊन आस्तमानी नबाबाचा मोड जाहाला. गोटापर्यंत[1] फौज चालोन मातबर सरदार काही मारले. काही जखमी जाहाले. रात्री परतुन खरडेस गेला. चौथाई फौज पेसजी यानी वगैरे लुटून आणिली चार हजार घोडे व तोफा सुमार तीस, पाडाव चारीसे सापडले प्र।। जाहाले. मोगलास खरडेस कोंडले आहे. त्याजकडील दिवाण मशारूनमुल्लक येऊन भेटला. तहाचे बोलणे होत आहे. रुपयेस शेर व पाणी नाही, वैरण नाही. सभोवता वेढा पडला आहे. आतील माणूस बाहेर जावू पाहात नाही. असा पेच त्याजवर पडला आहे. तहही लवकरच होईल. श्रीमंत राजश्री भाऊसाहेबानी फार शर्त केली. घोडे चालवून मारीत गेले. तेथे कपाळावर जखम तरवारची....लांबीस होती. बरी झाली. आपणास कळावे. हुजूर विनंती निवेदन करावी. जोशीराव प्रमाणे मनुष्य नव्हते. बहुताचे उपयोगी. सरकार कामास येकनिष्ट. आशी रीत त्यांची होती. बरे होणार त्यास विलाज नाही. सर्वांस दुःख जाहाले. आपण विवेक करून सर्वांचे शांत्वन करून विवेक करावा. सरकार कामे येकनिष्टपणे जसे वडील करीत होते त्याप्र।। करीत जावी. बहुत काय लिहिणे कृपा करावी हे विनंती.

इती राजश्री नानास व सर्वांनाच सा. नमस्कार. कृपा करावी हे विनंती.

---

१. खर्ड्याची लढाई ११ मार्च रोजी झाली.



लेखांक : ५०

निवडी : १९२८७ / ता. २० ऑटोबर १७९५

श्रीमंत क्षत्रीय कुलावतंस महाराज छत्रपती स्वामीचे शेवेशी विंनंती शेवक माधवराव नारायण प्रधान कृतानेक विज्ञापना. सेवकाचे वर्तमान त ॥ छ ६ रबीलाखर पावेतो स्वामीचे कृपा आवलोकन करून यथास्थीत असे. विश्रेश स्वामीचे शेवेशी विजयादशमीचे पोशाख पाठविले आहेत प्रविष्ट होतील. उत्तर सादर करावयाची आज्ञा करणार स्वामी समर्थ आहेत. शेवेशी श्रुत होय हे विज्ञापणा.



लेखांक : ५१

निवडी : ७९९७ / इ. स. १७९६

श्रीयासह चिरंजीव विजयीभव राजेश्री दिनकरराव गाईकवाड आप्पा यासी प्रती हैबतराव गाईकवाड विश्वासराव आशिर्वाद उपरी येथील कुशल तागायत छ ३ माहे मोहरमपर्यंत सकल वृत्त येथास्तीत असे. विशेष. राजेश्री मानसिंग माने यासी रांड रोटी बद्दल दहा बिघे जमीन देऊन चालवावे. याप्रमाणे हूजूरून करार घेतले आहे. तरी त्यास चार गोष्टी खातरजमेच्या तुम्हास कळेल त्या रितीच्या सांगोन माने याजकडील कोणी येथे पाठवून द्यावे म्हणजे जमीन स्वाधीन करून चालवू. भोई याज कडील पालखीचे सामान खरेदीचे ऐवजाविसी हुजूर विंनंती लिहीली. त्यास तुम्हास खर्चास ऐवज पाठवावयाचा आहे. त्याज बरोबर भोईयाचा ऐवज पाठवून देतो. त्यास ये विसी सांगावे. कळावे.

राजश्री उदाजी घाटगे सर्ज्याराव यांच्या जखमा अद्यापी शेजेस आल्या नाहीत. हातावरील मात्र आल्या आहेत. उरावरील अद्यापी भरून आली नाही. कळावे बहूत काय लिहीणे.



लेखांक : ५२

निवडी : १८४२२ / इ. स. १७९६

राजश्री बाजीराव रघुनाथ प्रधान यांचे स्वदस्तुरचे पत्र

विज्ञापना साहेबा कडोन चंद्र ७ मोहरमचे आज्ञापत्र आले ते सादर

होवून लिहिले वर्तमान समजले. राजश्री रत्नाकर आपाजी याणी कृपेचे अर्थ बहुता प्रकारचे सांगितले. त्यास थोरले महाराज व मातुश्री आईसाहेब यांनी सेवकाचे वडील वडिली कृपा केली. वडिलांनी एकनिष्ठेनेच राज्यात शेवा केली. साहेबाचे पायाखेरीज दुसरे जाणले नाही. त्याप्रमाणे साहेबानी कृपा करून चालवावे. येथूनही पायासी दुसरा विचार नाही. शेवेसी श्रुत होय. रवाना चंद्र १ हे विज्ञापना.



लेखांक : ५३

निवडी : १८४१८ / आक्टोबर १७९७

[१] पौष ७ माहे जमादिलाखर सु॥ सन सिता तिसेन मया व अलफ माहाराज सरकारचा मुक्काम फौजसुद्धा ठाणे मनोळी येथे होता. मनोळी ठाणे घेतल्यावर महाराज सरकारची स्वारी करविरास राहावयाचा निश्चय ठरला इतक्यात राजश्री बाळाजी जनार्दन उर्फ नाना फडणीस याजकडून सूचना आली जे राजश्री भास्कर सखदेव मामलेदार ठाणे जमखिंडी यानी सरकारचा ऐवज घेऊन ठाणे बदलून मवसगिरी करीत आहेत. त्याचे पारिपत्य महाराज सरकारचे फौजे-कडून होऊन हल्ली येथे कारकून पाठविले आहेत. त्याचे जिमेस सदरहू ठाणे करावे. त्याजवरून हजूरची स्वारी मनोळीहून निघून यादवडीचे मार्गे येऊन यादवगड घेऊन जमखिंडीस फौजसुद्धा मुक्काम होऊन मोर्चाबंदी केली. ते समई रत्नाकरपंत आपा यांचा मोर्चा दरवाज्याचे जिनात जाऊन पोहोचला. नंतर ठाणे जेरदस्त येऊन बोलणे आले जे कौल घ्यावा म्हणजे आम्ही ठाणे सोडून बाहेर येतो. ते समई रत्नाकरपंत आप्पा यांसी पदाधिकारी राजाज्ञाचे पद देऊन वस्त्रे दिली. आणी जमखिंडीतील मामलेदार यांसी कौल देऊन ठाणेतून बाहेर आणिले व हुजूरचे लोक जमखिंडिचे ठाणेत[२] मार्गशीर्ष वद्य ५ स दिवशी जाऊन ठाणेत राहिले. पंत राजाज्ञा फौजसुद्धा व मामलेदार जमखिंडीकर यासी लोकसुद्धा बरोबर घेऊन श्री कृष्णाबाई पर्यंत जाऊन मामलेदार लोक सहित पार करून देऊन राजाज्ञा परत जमखिंडीस आलेनंतर नाना फडणवीस नि॥ कारकूनाचे स्वाधीन जमखिंडीचे ठाणे करून हुजूरची खासा स्वारी करविरास येण्यास निघाली. येते समई रामदुर्गाचे मुकामी हुपरीकर यांची समजी होऊन पुरीचे ठाणे दिले.

(१) २३ डिसेंबर १७९६, (२) ७ डिसेंबर १७९६,

१. शके १७१९ पिंगल नाम संवत्सरे जेष्ठ[1] शु॥ ११ स ठाणे सौंदलगे येथे रत्नाकर पंडित राजाज्ञा व प्रितीराव चव्हाण हिंमत बहादर हे उभयता जाऊन ठाणेस वेढा घातला नंतर पंधरा रोज लढून ठाणे घेतल्यावर

१. भीरडीचे ठाणे घेणेस राजाज्ञा व हिंमत बहादर फौजसुद्धा गेले. तेथे जाऊन ठाणेस वेढा घातला. ते समई भीरडीकर यानी बुरजात बुदले पुरून बुरूज उडविले ते समई लोक फार जखमी जाले. व काही मयत जाहले. नंतर भीरडीचे ठाणे जेष्ठ शुद्ध १५ स घेतले.[2]

१. महाराज सरकारची स्वारी फौजसुद्धा आश्विन मासी कर्नाटक प्रांती डेरे होऊन कसबा गोकाक नजिक दाखल जाहली. ते समई कसबे मजकूरची खंडणी मलकापुरी रुपये १२५००० ठरले. त्यासी निशा चिठी वेदशास्त्र संपन्न राजश्री भाऊ जोशीराव यानी महाराज सरकारात दिली.



लेखांक : ५४

निवडी : १८४१७ / ता. ११ नोव्हेंबर १७९७

श्रीमंत महाराज राजश्री छत्रपती

स्वामींचे शेवेसी. विनंती बालाजी जनार्दन कृतानेक विज्ञापना तागायत छ २१ जमादिलावल पर्यंत स्वामींचे कृपावलोकने करून सेवकाचे वर्तमान यथास्थित असे विशेष कसबे सिराळ येथे स्वामी कडील फौज येऊन ठाणे घेउन ब्राह्मणाची वगैरे घरे लुटली, आसाम्या धरून नेल्या आहेत, म्हणोन राजश्री आबाजी रामचंद्र हशमनीस यानी सांगितले त्यावरून विनंतीपत्र लिहीले आहे. तरी बापोजी रामचंद्र व बाळाबा नाईक वगैरे आसामी धरून नेले आहेत त्यास चीजवस्तु सुद्धा सोडुन द्यावयाची आज्ञा जाहली पाहिजे. घरच्या चौक्या उठविण्याची आज्ञा व्हावी. शेवेशी श्रुत होय हे विज्ञापना.

(१) ५ जून १७९७, (२) ९ जून १७९७



लेखांक : ५५

निवडी : १८२ / ता. २७ डिसेंबर १७९७

श्रीमन्महाराज राजश्री छत्रपती स्वामीचे शेवेशी

विनंती शेवक रत्नाकरराम कृतानेक शेवेशी विज्ञापणा ऐसीजे छ ८ रजेब

पुणे कडील बातमी येकली जे राजश्री नाना फडणीस याणी शिंदेस कैद करावयानमुळे एका कंपूस फितवला, दुसरेस अगणून बोलले. त्याने चार सरदारास पुसोन सांगतो याप्रमाणे सांगून शिंदेस जाहले वर्तमान सांगीतले. शिंदेनी नानास कैद करून जिवे मारावे. तो राजश्री प्रधानपंत याणी कैदेत ठेवणेविशी सांगीतले. नंतर नाना कडील दोन हजार पर्यंत फौज मारली व कंपु फितला होता त्यास तोफाचे तोंडी दिल्हा. याप्रमाणे बातमी येकेली याचे वर्तमान पक्के पुणेहून आले असलेत खैर शेवेसी श्रुत होय हे विज्ञापणा.

पौ. छ १० रजब सु॥ सिता तिसेन मया व आलफ मोजे उमगांव.



लेखांक : ५६

निवडी २४७४७ / इ. स. १७९७-९८

श्रीमंत महाराज मातोश्री माईसाहेब यांसी समस्त राजकार्य धुरंधर विश्वासनिधी राजमान्य राजेश्री बाजीराव पंडीत प्रधान यासी आज्ञा केली ऐसीजे. तुम्ही विनंती पत्र पाठविले ते सविस्तर अक्षरशा श्रवण केले. चि. भाऊचे लग्नाविषयी मनांत संशय आणणारानी काय आणिले ते मनांत येऊन त्रींबकजीपासी आपणाकडून सांगण्यात कसे आले, त्याची निराकरणें त्र्यंबकजीने कशी केली, आपली खातरजमा मग कशी जाहली हे सविस्तर लिहून पाठवावे म्हणोन लिहिले. त्यात तुम्हाकडून नवरे मुलीस आणावया करिता घोडी, माणसे व पालख्या आल्या. त्या घोड्यास गाद्या व मोतद्दार वगैरे सरंजाम नव्हता. तो करून पाठविणेविशी परशुराम रामचंद्र यास आज्ञा केली. त्यानी उत्तर केले की, लग्नाची तर्दूद आम्हाकडे नाही. नंतर निंबाळजीकडील कारकून यास बोलाऊन सांगितले की लग्नाची काम तुम्हाकडे जाहले. तरी याचा बंदोबस्त करणे. त्याणी विनंती केली की आम्हास पुणीयाहून खर्चवेच करणेविसी लिहीले आले नाही. तूर्त दहा

हजार रुपये लग्नास देविले आहेत. आम्ही पत्र पाठवून उत्तर आणवून विनंती करतो. त्यानंतर आज्ञा जाहली की तूर्त बंदोबस्त करणे. उत्तरही आणवावे त्याजवरून बंदोबस्त केला.

(अपूर्ण)



लेखांक : ५७

निवडी : २१८ / इ. स. १७९८

श्रीमान् माहाराज राजेश्री छत्रपती स्वामीचे शेवेशी. विनंती सेवक सिदोजीराव नाईक निंबाळकर देसाई पो॥ हुकेरी. दोन्ही कर जोडून विनंती विज्ञापना एसाजे. येथील क्षेम. तागायत ता. १६ माहे मोहरम पावेतो स्वामीचे कृपावलोकन करून सेवकाचे वर्तमान यथास्थीत. विशेष स्वामींनी आज्ञापत्र पाठविले ते उत्तम समई पावले. लेखनार्थ पत्री आज्ञा जे हुजूरने फौजेची रवानगी झाली आहे, तरी कराराप्रमाणे फौज व फलटन सातारीयास पाठवून द्यावे आणि स्वामीचे मनोदयानुरूप कार्यभाग घडावा ये विषयी राजेश्री जानराव जाधव व राजेश्री आकाराम यादव हवालदार यासी आज्ञा करून पाठविले आहेत. आज्ञेप्रमाणे बोलतील. त्याजप्रमाणे निदर्शनास यावे. म्हणून आज्ञा. त्याजवरून येथे बसून इकडील सर्व मजकूर उभयताशी सांगितला आहे, ते शेवेशी येऊन विनंती करतील. इकडील लक्ष स्वामीचे आज्ञेप्रमाणेच आहे शेवेशी श्रुत होय. हे विज्ञापना.
तागायत ता. १९ मोहरम सुमा तिसा.



लेखांक : ५८

तोरगल : ७ / इ. स. १७९८

आजम नवाब दुलमेज्या खां बाहादर गोसावी यासी आखंडीत लक्ष्मी आलंकृत राजमान्य श्रे॥ खंडेराव भोसले हवालदार रामराम विनंती उपरी येथील कुशल जाणोन स्वकीये लेखन करीत आसिले पाहिजे. विशेष आपणास फौज सुद्धा येणे विषयी हुजूरून आज्ञा पत्रे सादर जाहाली आहेत आणि राजेश्री

प्रीतीराव चव्हाण उमेदतुलउमराव बाहादर व राजेश्री रत्नाकरपंत राजाज्ञा या उभयतानाही येणेविषयी पत्रे पाठविली आहेत. तरी किल्ले मनोळीच्या ठाणेस चिरंजीव संताजी बरोबर आपले नावचे पत्र बहूत सावधपणे राहाणे विषयी लिहून पाठवावे आणि आपण माहाराजांचे चिरंजीव म्हटल्या प्रसंगी येऊन पोहचल्यास आपले मनात जो इरादा असेल तो सिद्धीस पावेल असा प्रसंग आहे. माहाराजांनी आपणास चिरंजीव म्हटल्यास ती गोष्टीचे रुप करून दाखविणेस आपणाकडे आहे. हा समय फिरोन यावयाचा नाही. आपणाविषयी मजला बहूत प्रकारे सांगितले आहे. शपथपूर्वक सांगितले आहे. त्याजवरून हे पत्र घरोब्याने लिहिले आहे. दरकूच करून आल्याने बहूत यश आपल्या वाट्यास येते. तरी रातबीरात करून निकडीने करविरास पोचावे. बहूत काय लिहिणे. कृपा लोभ कीजे हे विनंती.



लेखांक : ५९

निवडी : १९२३१ / जून–जुलै १७९८

श्री

राजश्री गोपालजी मोहिते गोसावी यांस अंखंडीत लक्ष्मी आलंकृत राजमान्य श्री सखाराम घाटगे सर्जेराव रामराम विनंती उपरी तुम्ही पत्र पाठविले ते पावले. लिहीला मजकुर कळला. त्यास आपण यावयास फार दिरंग लाविला. इत:पर तरी रात्रबिरात्र करून फौजसुद्धा साताराचे मुक्कामी येणे. हिकडून इसर जाला. सातारेस रवाना केलेले आहे. त्यांस ते व आपण मिळोन पेसजी राजश्री आकाराम बाबा यांचे पत्री लिहीले आहे त्याप्रमाणे कर्तव्यता करावी. कराडकरानी आपणाशी लबाडी केली त्यांस त्यांचे प्रांती घासदाणा व खंडणी घेत यावे. नदी उतरणेस सालसपणे उतरू दिल्हेस गुराम, न उतरू दिल्हेस आपण सिस्तीने व करणेल सामीलऊन उतरून लौकर यावे. प्रांताची खराबी करणे विशी आलस न करणे येविशी आकाराम बाबा यांस लिहीले आहे. बहुत काय लिहीणे.



लेखांक : ६०

निवडी : १९२११ / इ. स. १७९८

श्रीमन्महाराज राजश्री. छत्रपती स्वामीचे शेवेशी

विनंती शेवक दौलतराव शिंदे कृतानेक विज्ञापणा ता।। छ ५ मोहरम पावेतो स्वामीचे कृपे करून सुखरूप असो विशेष.

स्वामीनी दोन आज्ञापत्रे पाठविली ती पाहोन संतोष जाहाला. पत्री आकाराम यादव हवलदार हूजूर आले याणी विनंती केल्यावरून निवेदनात येऊन हुजूरून राजश्री नारायणराव घोरपडे सेनापती व चिरंजीव राजश्री रायाजी जाधव जप्तनमुल्क असे फौज सुद्धा पुढे रवाना केले असत कर्नाटकची फौज आणविली असे. तेही सत्वरच येईल. आल्यानंतर त्याची रवानगी होईल. आपणाकडील सखाराम साठे व गोपाळजी मोहिते हुजूर येऊन पोहचले नाहीत. ते हुजूर आल्यानंतर आपण विनंती लिहील्या अठवते. दिमत व स्वदस्तूरचे आज्ञापत्र असे आकाराम यादव हवलदार याजसमागमे देऊन व सदरहू उभयता मागाहून आज्ञा होऊन सत्वरच येऊन पोहचतील म्हणोन आज्ञा लिहीली. तुम्हास अंगेजना असे. पेशजी शेवेशी विनंती पत्र पाठविले आहे. त्याप्रमाणे फौजेची रवानगी सत्वर जाहाली पाहिजे. व सखाराम सीरसाट व गोपालजी मोहिते येवून शेवेशी रवाना झाले ते येऊन पोहचले असतील. पेशजी विनंती लिहील्या अन्वये श्रीमंत स्वामी स्वदस्तूरचे आज्ञापत्र आकाराम यादव हवालदार याजबरोबर पाठविले पाहिजे. स्वामी कृपाकरून हवलदार मजदूर या समागमे वस्त्रे पाठविली ती यादी प्रमाणे पावली.

शेवेशीश्रुत हे विज्ञापणा.



लेखांक : ६१

निवडी : २०८ / इ. स. १७९८

राजेश्री रायाजी जाधव सरनोबत दादा गोसावी अखंडीत लक्ष्मी आलंकृत राजमान्य राजेश्री सिदोजीराव नाईक निंबाळकर देसाई रामराम विनंती उपरी येथील क्षेम ता।। छ ३ माहे मोहरम स्वकीये लेखन करीत असले पाहिजे. विशेष

स्वामींनी फौज सुद्धा आपली रवानगी इकडे केली म्हणोन आज्ञा पत्री निरोप दिले. तरी आपण रहिमतपूरचे मार्गे येवून तेथील ठाणेचा बंदोबस्त करून सातारे मजकुरास फौज सुद्धा यावे. तेथे पेशजी बंदोबस्ता विशयी रास्त्याची फौज पुण्याहून गेली होती. ती शहरात उतरली होती. हल्ली किल्लेकरानी इकडील संधानावरी फौज शहरातील उधळून दिली ती फौज नदीवरी उतरली आहे. त्याचे पारिपत्य आपले फौजेचे हातून करून तेथेच करावा आणि ताबडतोब आम्हांकडे पत्र रवाना करावे म्हणजे इकडून कोणी मातबर मनुष्य रवाना करून देवू. ते व आपली फौज मिळून इकडील बेत लिहून पाठवितील त्याजप्रमाणे करावे. ज्या मार्गाने येणेची सूचना होईल त्या मार्गेने आपण मिळून यावे. याजप्रमाणे येथील यजमानाचा निरोप आहे व पूर्वी राजेश्री आकाराम बावासही हाच बेत सांगितला आहे. त्याजप्रमाणे करावे. आपण कोठे दम खावू नये. कुच दरकूच निकडीने यावे. बहुत काय लिहीणे लोभ कीजे हे विनंती.



लेखांक : ६२

निवडी : २०२ / ता. २८ एप्रिल १७९८

स्वस्ती श्री राज्याभिशेक शके १२४ कालयुक्त नाम सवत्छरे वैशाख शु॥ १३ मंदवासरे क्षत्रीय कुलावंतास श्री राजा शिवछत्रपती स्वामी याणी समस्त सेनाधुरंधर विश्वासनिधी राजमान्य राजश्री नारायण घोरपडे सेनापती यांसी आज्ञा केली ऐसीजे. तुम्ही स्वामी शेवेशी योग्य जाणोन पेशजी तुम्हास हुजूर येणेविशी आज्ञा होऊन हुजूर आणवीले ते समई राजश्री रामचंद्रराव घोरपडे याणी राजश्री परशराम रामचंद्र याचा आश्रय करून आडून सेनापतीची वस्त्रे घेतली. यास्तव त्याजकडील सेनापती दुर करून तुम्ही स्वामीचे शेवेशी राज्योपयोगी याजकरिता स्वामी तुम्हावर कृपाळू होऊन सेनापतीचा हुद्दा सांगोन वस्त्रे दिल्ही आणि सरंजाम तीर्थरूप कैलासवासी मातुश्री साहेब यांचे वेळेस पुर्वील वहीवाटीप्रमाणे सरंजामी गाव व वतनी गाव व शेऱ्या व सरदेशमुख्या महालानी व बाबती येगे येणेप्रमाणे करार करून घ्यावे असेत तरी तुम्ही सदरहू सरंजामी गाव व वतणी गाव व शेऱ्या व सरदेशमुख्या व बाबती तुम्ही व तुमचे पुत्र पौत्रादी वशंपरंपरेने आनभवून स्वामीची शेवा एकनिष्टपणे करून आपले शेवेचा मुजरा करून राहाणे. तुम्हास

राजश्री हैबतराव गाईकवाड सरखवास यासी हुजूर घेतले असते. जाणीजे बहुत काय लिहीणे तरी तुम्ही सुज्ञ असो.

वार.

मोर्तब

शिका



लेखांक : ६३

निवडी : १८४२५ / २० जून १७९८

श्रीमन्महाराज राजेश्री छत्रपती स्वामीचे शेवेसी विनंती शेवक दौलतराव शिंदे कृतानेक विज्ञापना. ता॥ छ ५ मोहरम पावेतो स्वामीचे कृपेकरून सुखरूप असो विशेष.

स्वामीनी दोन आज्ञापत्रे पाठविली ते पाहून संतोष जाहला. पत्री आकाराम यादव हवालदार हुजूर आले यानी विनंती केल्यावरून निवेदनांत येऊन हुजूरून राजेश्री नारायणराव घोरपडे सेनापती व चिरंजीव राजश्री रायाजी जाधव जत्पनमुल्क असे फौजसुद्धा पुढे रवाना केले असेत. कर्नाटकची फौज आणविली आहे. तीही सत्वरच येईल. आल्यानंतर त्याची रवानगी होईल. आपणाकडील सखाराम शिरसाट व गोपाळजी मोहिते हुजूर येऊन पोहचले नाहीत. ते हुजूर आल्यावर आपण विनंती लिहिल्या अन्वये शपत व स्वदस्तुरचे आज्ञापत्र आसे आकाराम यादव हवालदार या समागमें देऊन व सदरहू उभयता मागाहून आज्ञा होऊन सत्वरच येऊन पोहचतील, म्हणोन आज्ञा लिहिली त्यास उत्तम आहे. पेशजी शेवेसी विनंती पत्र पाठविले आहे. त्याप्रमाणे फौजेची रवानगी सत्वर जाहली पाहिजे. व सखाराम शिरसाट व गोपाळ मोहिते येथून शेवेसी रवाना केले. ते येऊन पोहचले असतीलच. पेशजी विनंती लिहील्या अन्वये शपत व स्वदस्तुरचे आज्ञा पत्र आकाराम यादव हावलदार याजबरोबर पाठविले पाहिजे. स्वामीनी कृपा करून हवालदार मजकूर ज्या समागमे वस्त्रे पाठविली ती यादी प्रमाणे पावली शेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.



लेखांक : ६४

निवडी : १८४२३ / ३० जून १७९८

शेवेसी बाजीराव रघुनाथ प्रधान कृतानेक विज्ञापना तागायत छ ९ पावेतो येथास्थित आहे. साहेबाचा व माझा सिलसिला पहिल्या पासून असे असतां कोणी काय गैरवाका समजाविला न कळे. लहान माणसाचे भरावर मर्जी दुसरी होऊ नये. हवा बदलून विलक्षण वारे सुटले. यात सावध राहून कायमे असणे थोरास योग्य. येथील व साहेबाचे स्वामी सेवकपणाचा अर्थ वंशपरंपरेचा हे साहेबाचे ध्यानात, इकडील बाबदाही समक्ष साहेबासी व मसी. यास्तव पुरता विचार करून कोणी चांगला विश्वांसू पाठविल्यास आज्ञा झाली पाहिजे. विंनती लिहिली आहे. सर्व प्रत्ययास येईल. उत्तराची आज्ञा सत्वर व्हावी.

शेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

पो।। छ १५ मोहरम सु।। तिसा तिसेन मया व आलफ. मुकाम लष्कर कासेगाव नजिक.



लेखांक : ६५

राव विश्वासराव गायकवाड दप्तर : ४ / इ. स. १७९८–९९

राजेश्री हैबतराव विश्वासराव सरखवास गोसावी यासी अखंडीत लक्ष्मी आलंकृत राजमान्य स्नेहांकित चत्रसींगराजे भोसले रामराम विंनंती उपरी येथील कुशल जाणुन स्वकीये कुशल लिहीत जावे विशेष तुम्हाकडून बहूत दिवस पत्र येवून वर्तमान कळत नाही. तरी असे न करित सदैव पत्र पाठवून संतोषवीत जावें. यानंतर ईकडील मजकूर तरी आधीक उणा लिहून कळवावे असे नाही. आम्ही दूर देशी आलो आहो. परंतु पूर्वील स्नेहांत अंतर नसावे. तीर्थस्वरूप माहाराज राजेश्री आबासाहेबापासी आम्हाविषयी अर्ज करीत जाणे. तुम्ही तेथे आहा त्या पेक्षी आम्ही आहो र।। छ ३ सफर बहूत काय लिहिणे लोभ कीजे हे विंनंती.



लेखांक : ६६

तोरगल : ८ / इ. स. १७९८–९९

राजश्री धोंडजीराव वाघ गोसावी यासी अखंडीत लक्ष्मी आलंकृत राजमान्य श्रे॥ रत्नाकरराम राजाज्ञा आशिर्वाद विनंती उपरी येथील कुशल जाणुन स्वकीये कुशल लेखन करीत आसिले पाहिजे. विशेष आपण पत्र चिकआळगुत्तीचे मोकामाहून पत्र पाठविले ते पावोन लिहिला मजकूर कळो आला. परशरामपंत यांचे चिरंजीव सुरापुराकडे जाणार आणि गोखले व ते मिळणार ऐसे लिहिले. त्यास ते मिळाले तरी येकच आहेत. न मिळाले तरी येकच आहेत. आपला व आमचा करार जाहला आहे त्याप्रमाणे आम्ही कुच करून रामदुर्गचे अंतर मनोळीचे बारीने पार होऊन जातो. आपण ही कुच करून खारी पार होवून नरगुंदचे सुमार जावे. मुधोळचा व रामदुर्गचा मार लिहिला ऐसीयास हुजुरचा लक्ष तिकडे आहे. त्यापक्षी दोन तालुकेस हरयेक विषयी उपसर्ग न करिता कुच करून नरगुन्दचे सुमारास बारीपार होवून जावे जमावे. आम्हीही रामदुर्गचे आंतरें मनोळीचे स्वारीत येता. त॥ छ ३ रजब बहूत काय लिहिणे. सर्वमात्रांस लक्षांत घेवून तुमचे आमचे बोलणे जाहाले आहे. त्याप्रमाणे आधी शत्रूचे पारपत्य करून उपरांतीक समक्षच बोलणे होवून बन्दोबस्त होईल. केवळ सर्वत्रावर सारखेच जाहालेस युक्तीस ठीक दिसत नाही. आचवल इंदुल ठाणे सरकारचे आहेत. त्या प्रांतात उपद्रव न लागता राखणीस राहून पाठवून द्यावे ईकडील एजपार होवून तुमची आमची गांठ नवलगुन्दचे सुमार व्हावी. एकाद्याचे सांगणीवर संशय न घ्यावा. येकवेळ सावनुरास जाऊन शत्रूचे पारपत्य करावे हे तुमचे पुरतेपणी मानस. यामुळे यावरी जपत व्हावे यैसे आहे. खेड्यावर जावून स्वतःच हक्क करणे ठीक नव्हे. हारीचे कपाळावर लागले आहेत म्हणून येकिले आपण पत्री काहीच लिहिले नाही. उतावळी न करावी. दाबानेच काम करावे. मुधोळवर उभयेताही न यावे.....सुद्धा बराबर येत आहोत. बहुत काय लिहिणे.



लेखांक : ६७

निवडी : १९७६५ / इ. स.१७९८-९९

श्रीमंत महाराज राजेश्री छत्रपती स्वामीचे सेवेसी

विनंती. सेवक नारो हरी करंदीकर दोन्ही कर जोडून कृतानेक विज्ञापना. ता। छ ९ जिलकाद पर्यंत स्वामीचे कृपावलोकने करून सेवकाचे वर्तमान मु॥ करवीर येथे कुटुंबसुद्धा क्षेम असे. विज्ञापना ऐसीजे. मी स्वामीचे चरणानिकट तीन चार वर्षे वास केला. तो कोणत्या प्रकारे हे ध्यानात आहे. आणखी हस्तक कोण कोण होते यांची ही वर्तणूकनिदर्शन निवेदनात आली. माझे चित्तात दुसरा विचार नाही. पैक्षा मी चित्तात कोणताही आंदेशा न आणता स्वस्थ राहिलो. खासगत घोडी गुरे मिळोन सात आठ आहोत. त्यास वैरणीचा संग्रह नाही. आजपर्यंत विकत मिळेपर्यंत घेतली. आता निरुपाये. दोन रोज वैरण नाही. तसाच धान्य व जिन्नस कोणताही संग्रह नाही. नित्य बाजारात खरेदी करून घ्यावे. यजमानाकडे दोन महिने माझे पत्र गेले नाही. खर्चासही आले नाही. दरमहा शंभर रुपये लागतात. राजश्री जोशीराव याजवळ पावणसे पीरखानी व राजेश्री रघुनाथराव माने याजवळ राजापुरी पन्नास व राजश्री निंबाजी बाबा यादव हवालदार याजवळ हुकेरी पन्नास येणे प्रमाणे कर्ज घेतले. ते आजयर्यंत गुजर जाली. हल्ली अगदी खर्चास नाही. लहान दोन अर्भके आहेत. त्यास वस्त्रासही समाधान नाही. यास्तव स्वामीचे सेवेसी विनंती लिहली आहे. कुटुंबसुद्धा आज्ञा जालिया मिरजेस जाईल. मर्जी असलिया कुटुंबाची रवानगी करून देवून सेवेसी येईन. मजकडून पायासी दुसरा विचार अथवा मतलब घडावयाचा नाही. स्वामीनी समक्ष खातरजमा करून घेतलीच आहे. मी सर्वस्वी पेचात आहे. हे स्वामीच्या ध्यानात आहे. यजमानाकडूनही दोन महिन्यात पत्र आले नाही. काय मर्जी समजत नाही. यजमानाचाही लक्ष आहे तोच आहे. सेवाधर्मामुळे अल्पस्वल्प पाठविले आहे. सारांश आज्ञेअन्वये वर्तणूक करीन. सेवेसी श्रुत होय. हे विज्ञायना.



लेखांक : ६८

निवडी : ३५१ / फेब्रुवारी १७९९

सेनासाहेब सुभा

विशेष अलीकडे आपणाकडून पत्र येवून वर्तमान हुजूर निवेदन होत नाही. सविस्तर लिहीत जावे. हुजूरचे खाशा स्वारीचा मुक्काम विजापुर प्रांती आहे. पुण्यशील लक्ष्मीबाई शिंदे फौज सुद्धा हुजूर आली आहेत. इकडील लक्ष आपला आहे. त्या अन्वये राजेश्री यासी फौजसुद्धा हुजूर पाठवून द्यावे. प्रमाणे राजेश्री जानराव जाधव यानी लिहिले आहे, त्याजवरून दिले. आपणाकडून पत्र येवून संतोषवीत असावे. हुजूरची खाशा स्वारीचा मुक्काम विजापूरात आहे. राजेश्री यासी फौजमुद्धा पाठवून द्यावयाचे बोलणे झाले. त्या अन्वये रवानगी करावी. पुण्यशील मातोश्री लक्ष्मीबाई शिंदे फौजसुद्धा आहेत. आपणास कळावे यास्तव लिहिले आहे. श्रीमंत महाराजांची कृपा समजावून घेवून सेवा करून कृपेस पात्र होणेचा समय जाणून लिहिले आहे. फौजेसुद्धा राजेश्री यांची रवानगी लवकर करावी.

❖

लेखांक : ६९

निवडी : १८४२४ / २१ जून १७९९

श्रीमन्महाराज राजश्री छत्रपती स्वामीचे शेवेसी विंनंती सेवक सखाराम घाटगे सर्जेराव आषाढ शु॥ ४ पर्यंत स्वामींचे कृपावलोकने करून सेवकाचे वर्तमान यथास्थित असे. विशेष स्वामी कृपाळू होऊन पत्र पाठविले ते मस्तकी वंदून सनाथ जालो. तेथे निरोपिले ते राजश्री दौलतराव बाबा यांचे पत्रावरून फौज रवाना केली आहे. व मागाहूनही रवाना करितो असे निरोपिले. त्याजवरून यजमानास बहुत संतोष जाहला. इकडूनही स्वामी सेवेस अंतर व्हावयाचा नाही. राजश्री गोपाळ मोहिते व सखाराम शिरसाट या उभयतांची लिहिल्या अन्वये रवानगीची आज्ञा व्हावी फौजेचे सामान निवड चांगले त्वरे येऊन पोहचती आज्ञा निरोपावी. शेवेसी श्रुत होय. सर्जेराव याचें दस्तुर. इकडील लक्ष दुसरे नाही. स्वामीचे कृपेकरून आता कांही मसलत अवघड नाही.

पो॥ छ ६ मोहरम सुमा तिसा तिसेन मया व आलफ

मुकाम कोकरी.

❖

लेखांक : ७०

निवडी : २०७ / ता. ९ फेब्रुवारी १७९९

राजेश्री रायाजी जाधव सरनोबत गोसावी यासी-अखंडीत लक्ष्मी आलंकृत राजमान्य राजेश्री सखाराम घाटगे सर्जेराव रामराम विंनती उपरी येथील कुशल जाणून स्वकीय कुशल लिहीत ऐसीले पाहिजे. विशेष आपण पत्र पाठविले ते पावले. लिहिला मजकूर कळला. त्यास आपण फौज घेवून जलद येणे. आपण घाटाचे मुक्कामीं आलेवर लिहिणे. म्हणजे इकडून कोणी तरी रवाना करून देतो. ३ माहे रमजान सु।। तिसा तिसेन मया आलफ. बहुत काय लिहिणे. लोभ करावा हे विंनती.

नारायणराव घोरपडे सरनोबती यासी घेवून आपण सत्वर यावे हे विंनती.

आपण रहिमतपुरचा बंदोबस्त करून सातारचे मुक्कामी येवून तेथे रास्तेची फौज दोन एक हजार आहे ती किल्लेकरानी शहरातून उधळून दिली ती बाहेर नदीवर उतरली आहे. त्याचे पारिपत्य करावे आणि तेथे मुक्काम करून ताबडतोब इकडे पत्र रवाना करावी. म्हणजे इकडून कोणास तरी पाठवू. नंतर आपण ते मिळून जसा बेत लिहून पाठवू त्याप्रमाणे त्या मार्गानेच यावे.



लेखांक : ७१

निवडी : १९२४० / इ. स. १७९९ (बहुधा मार्च-एप्रिल)

राजश्री जानराव जाधव दादा गोसावी अखंडीत लक्ष्मी आलंकृत राजमान्य यास राजश्री निंबाजी यादव हवालदार रामराम विंनती उपरी येथील कुशलता छ ६ माहे जिलकाद पर्यंत यथास्थित असे. विशेष ठाणेकडील पत्रे घेऊन बाबू चव्हाण आला, त्यास आपणाकडे पत्र आहे. पुनेच्या पत्राप्रमाणे समेटणेत आणल्यास सरकार उपयोगाचे आहे. गडी जबानी सांगाल त्या वरून कळेल. बायाचे व शिंदेचे समेटा असलेस बायाचा शोध घेऊन राजश्री यशवंतराव यासी येणेविशी हजूरने आज्ञापत्रे पाठविल्यास राजश्री यशवंतराव घोरपडे हुजूर येतील. या प्रमाणे गडीयांचे सांगणेत आहे. आमचे शरेरी स्वस्थ नाही. ज्वर येत असतो.

किंचीत उपशम जाहाले म्हणजे येतो. घरातही स्वस्थ नाही. औषध उपाये करीत आहो. बहुत काय लिहिणे. लोभ करावा हे विनंती.



लेखांक : ७२

निवडी : १८४४१ / ता. ११ मे १७९९

श्रीमंत महाराज राजश्री छत्रपती स्वामींचे सेवेसी विनंती सेवक नारो शिवराम कृतानेक विज्ञापना. येथील वर्तमान यथास्थित. ता॥ छ ५ जिल्हेज परयंत महाराजांचे कृपावलोकनेकरून यथास्थित असे विशेष. राजश्री नाना यांस महाराजानी दोन आज्ञापत्रे सादर केली. त्यांत जरूर बोलावयाचे आहे. यास्तव राजश्री बाळाजी गणेश यास सत्वर पाठविणेविशी आज्ञा व लक्ष्मीबाई शिंदे इकडे आल्यामुळे चित्तात आंदेशा येईल तरी येऊ नये. जे होणे ते तुमच्या लक्षा-प्रमाणेच घडेल म्हणोन राजश्री आबाजी पंत यास आज्ञा होऊन त्यानी पत्री लिहीले त्याजवरून कळेल. ऐशास राजश्री पंतप्रधान यासी विनंती करून बाळाजी गणेश याची रवानगी केली आहे. शेवेसी येऊन पोहोचतील यांजवळ सविस्तर सांगितले आहे विनंती करतील सारांष पंतप्रधान यांचे लक्षानुरूप आज्ञा व्हावी येविशी नाना वारंवार विनंती लिहीत गेले. तदनुसार व्हावे यात महाराजांचा उपयोग आहे. शेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

पो छ १२ मोहरम सु॥ सन मया तेन व आलफ मुक्काम लष्कर मौजे बारवाड.



लेखांक : ७३

निवडी : १८४४० / ता. १३ मे १७९९

श्रीमन्महाराज राजश्री छत्रपती स्वामीचे सेवेशी विनंती सेवक बाळाजी जनार्दन कृतानेकविज्ञापना सेवकाचे वर्तमान त॥ छ ७ जिल्काद पावेतो स्वामींचे कृपावलोकने करून यथास्थित आसे. विशेष. स्वामीनी दोन आज्ञापत्रे सादर केली ती पावली. काही बोलणे आहे याजकारिता राजश्री बाळाजी गणेश यास सत्वर पाठवणे म्हणोन आज्ञा व बाया सिंदे हुजूर आल्या

याजमुळे चित्तात आंदेशा येईल तर येऊ नये. जे होणे ते आपल्या लक्षानुरूप घडल्याप्रमाणे राजश्री आबाजी पंत यास आज्ञा जहाली. त्याजवरून त्यानी तेथे लिहिले ते सविस्तर कळले असलेस स्वामींचे आज्ञेवरून राजश्री पंत प्रधान याजवळ विनंती करून बाळाजी गणेश यांची रवानगी केली आहे. लौकरच येऊन पोहोचतील. बयाजवार आबाजी पंत यास आज्ञा झाली. त्याजविशीचा अर्थ बाळाजी गणेश यास सांगितले आहे. ते शेवेशी निवेदन करतील. ते मनात आणून पंतप्रधान यांचे मनोदयानुरूप आज्ञा व्हावी. यांतच स्वामींचा उपयोग आहे. दरम्यान कोणी काही समजावितील ते मनात न आणावे. सेवेशी श्रुत होय हे विज्ञापना.

पा।। छ १२ माहे मोहरम सु।। मया तेन व आलफ मु।। लष्कर मौजे बारवाड.



लेखांक : ७४

निवडी : २२२ / ऑगस्ट १७९९

श्रीमंत महाराज राजेश्री छत्रपती स्वामीचे सेवेशी

विनंती सेवक बाळाजी रघुनाथ कृतानेक विज्ञापना ता।। अधीक श्रावण व।। ५ पावेती स्वामीचे कृपे करून वर्तमान यथास्थीत असे विशेष. स्वामीकडून आज्ञापत्र सादर झाले की, हुजूरचे कार्यभाग स्वामीचे मनोदयानुरूप घडोन यावे ये विषयी रा।। बाजीराव पंडीत प्रधान यास आज्ञापत्र रा।। बापूजी रघुनाथ यास समागमे देऊन मशार निल्हेसी समक्ष आज्ञा होवून रवानगी केली म्हणून पत्री आज्ञा झालेप्रमाणे पंडीत प्रधान यास पत्र प्रविष्ट करून विनंती पत्र घेवून शेवेशी पाठविले आहे. सविस्तर मजकूर रा. रांमचंद्र जोशीराव यांचे पत्री लिहीला आहे विनंती करिता ध्यानास येईल शेवेशी श्रुत होय हे विज्ञापना.

सु।। तिसा तिसेन मया आलफ.



लेखांक ७५

तोरगल : ९ / ता. ९ सप्टेंबर १७९९

स्वस्ति संवत्सरे श्री राज्याभिषेक शके १२६ सिद्धार्थी नाम संवत्सरे भाद्रपद शुद्ध येकादशी इंदुवासरे क्षत्रिय कुलावतंस श्री राजा शिव छत्रपती स्वामी यानी राजमान्य राजेश्री धोंडजीराव वाघ यासी आज्ञा केली ऐसीजे. स्वामीचे शेवेशी तुम्ही विनंती पत्र छ ५ रबिलावराचे पाठविले ते छ ८ मीनहुस प्रविष्ट होवून लेखनार्थ निवेदन जाहाला. शत्रूने हुजुरचे प्रांतात उपसर्ग केला हे कळोन फौजसुद्धा नदी उतारास बुनगे वलीस (?) कडील दिले. ईतकेत राजेश्री धोंडो बल्लाळ गोखले यानी शपथ घेवून दंगा (फाटले आहे) केली. यामुळे मनोळीस आला ये विषयी तपसीले विनंती लिहिली व राजेश्री खंडेराव भोसले हवालदार व जोत्याजी खोपडे यांनी विनंती पत्रे पाठविली. त्यावरून सविस्तर निवेदनात येवून तुम्हास फौज सुद्धा जमयेत निशी हुजूर येणे विषयी आज्ञापत्र सादर जाहाले असे. तरी मार्गाचा सुपथा पाहुन सत्वर फौजसुद्धा हुजुर येणे. राजेश्री सुलतानराव लोंढे यासी तुम्हाकडे आज्ञा करून पाठविले. त्यानी आज्ञे-प्रमाणे सविस्तर मजकूर सांगितलाच असेल. तरी आज्ञा जाहाले अन्वये फौजसुद्धा त्वरेने यावयाचे करणे जाणीजे. बहुत काय लिहिणे.

(शिक्का)



लेखांक : ७६

तोरगल : १० / ता. १५ सप्टेंबर १७९९

स्वस्ति श्री राज्याभिषेक शके १२६ सिद्धार्थी नाम संवत्सरे भाद्रपद बहुल द्वितीय रविवासरे क्षत्रीय कुलावंतस श्री राजा शिव छत्रपती स्वामी यानी राजमान्य राजश्री धोंडजीराव वाघ यासी आज्ञा केली ऐसीजे तुम्हास हुजुर येणे विषयी पेशजी आज्ञा पत्र सादर जाहाले असता तुमचे येणे न जाहाले त्यावरून आज्ञा-पत्र सादर झाले आहे. तरी काय जमाव असेल त्यासुद्धा निघोन जलद हुजुर येणे विषयी क्षणाचा विलंब लावू नये. सत्वर यावें. जाणीजे. बहुत काय लिहिणे.

(शिक्का)



लेखांक : ७७

तोरगल : ११ / ता. १९ सप्टेंबर १७९९

राजमान्य राजेश्री धोंडजीराव वाघ यासी आज्ञा केली ऐसीजे स्वामीचे शेवेशी तुम्ही वि।। पत्र पाठविले ते प्रविष्ट होवून लेखनार्थ निवेदन जाहाले. सतगिरिचे ठाणे तुम्ही घेतले ते समई तुम्हाकडील लोकानी कामकाज करून खस्त मेहनत केली ते विषयी तुम्ही तपसीले विनंती लिहिली व राजेश्री खंडेराव भोसले हवालदार ठाणे मनोळी यानी तुमचे निष्ठेची विनंती केली. त्यावरून सवीस्तर निवेदनात येवून तिकडील ठाणी घालणे विषयी आज्ञा जाहाली असे. तरी आज्ञेप्रमाणे फौजबंदी करून तालुक सुरू करणे. हुजुरची खासा स्वारी गोकाक तालुकेत जाहाली यानंतर तुम्हास हुजुर येणे विषयी आज्ञा होईल. तो पर्यंत तीकडील ठाणी हुजुरची उमेदवारी विषयीची विनंती लिहिली त्यासी स्वामी आज्ञेचे लक्ष दिवसेंदिवस स्वामीसेवा करून दाखवून कृपा संपादून घ्यावी. हुजुरने राजेश्री रत्नाकर पंडीत राजाज्ञा यांची फौज सुद्धा बागेवाडीचे ठाणे सुरू करणेविषयी रवानगी व तिकडील प्रांत सर करणे विषयी रवानगी जाहाली आहे. तरी आज्ञेचे लक्ष सेवा करून दाखविणे. जाणिजे सु।। मया तेन व आलफ त।। छ १८ माहे रबिलारवर बहुत काय लिहिणे.

(शिक्का)



लेखांक : ७८

तोरगल : १२ / ता. १५ नोव्हेंबर १७९९

राजमान्य राजश्री धोंडजीराव वाघ यासी आज्ञा केली ऐसीजे तुम्ही स्वामीचे शेवेशी विनंती पत्र पाठविले ते प्र।। होवून लेखनार्थ श्रवण जाहाला. अली अकबर यानीही तुम्हाकडील विनंती केली ती निवेदन जाहाली. अशास हुजुरच्या फौजेचा मुक्काम मौजे बोरगाव, प्रांत हुकेरी येथे जाहाला आहे. तरी तुम्ही सरंजाम सुद्धा मौजे मजकूरचे मुक्कामी जलद येवून पोहचावे. वरकड मजकुराची आज्ञा मजकूर नीलेस जाहाली आहे. सांगता कळेल. जाणीजे सुमा मया तेन व आलफ छ १६ माहे जमादिलावर बहुत काय लिहिणे. (शिक्का)



लेखांक : ७९

तोरगल : १३ / ता. २ डिसेंबर १७९९

स्वस्ति श्री राज्याभिषेक शके १२६ सिधार्थी नाम सवंत्सरे मार्गशिर्ष शुद्ध शेष्ठी इंदुवासरे क्षत्रीय कुलावतंस श्री राजा शिवछत्रपती स्वामी यानी राजमान्य राजेश्री धोंडजीराव वाघ यासी आज्ञा केली ऐसीजे. तुम्हाकडून राजेश्री कृष्णराव रघुनाथ विनंती पत्र हुजूर घेवून आले ते निवेदन जाहाले. जुबानी तुम्ही सांगितल्या प्रमाणे सादयांत अर्थ मजकूर निलेने व राजेश्री खंडेराव गोविंद पारसनवीस यानी एकांती विदीत केले ते विषयाची आज्ञा करणे ती उभयता मारनीले यासी केली आहे. आज्ञेप्रमाणे लिहितील व जबानी सांगतील. त्याप्रमाणे माहाराजांचे चरणासी निष्ठा धरून वर्तणुक करून कृपा संपादन होये तो अर्थ करार जाणे. ये विषयी आज्ञा पत्री आज्ञा करून कळवावेसे काय आहे जाणीजे बहुत काय लिहिणे.

(शिक्का)



लेखांक : ८०

तोरगल : १४ / ता. ९ जानेवारी १८००

स्वस्ति श्री राज्याभिषेक शके १२६ सिधार्थी नाम संवत्सरे पौष्य शु।। चतुर्दशी गुरुवासरे क्षत्रीय कुलावतंस श्री राजा शिव छत्रपती स्वामी यानी रफअत व आवाली पनाह तहउर बजलादत दस्तगाह अजम नवाब मुलके जाहां खां ब्राहादर यासी फर्माविले ऐसीजे दौलत व रासी कुलअकीअत रत्नाकर पंडीत राजाज्ञा यांसी बमय फौज या सरहद्दे येणे बाबे हुकूम सादर जाहाला असे. मोजीबा आं रफअत पनाहानी बाफौज पंडीत राजाज्ञा या हमराह या सरहद्देस अनकरीबा यावयाचे करावे त।। छ।। १३ माहे शाबान जीयादा काय लिहिणे.

(शिक्का मोर्तबा)



लेखांक : ८१

तोरगल : १५ / ता. २९ जानेवारी १८००

स्वस्ति श्री राज्याभिषेक शके १२६ सिधार्थी नाम संवत्सरे माघ शु॥ पंचमी सौम्यवासरे क्षत्रीय कुलावतंस श्री राजा शिव छत्रपती स्वामी यानी रफअत व अबाली पनाह दस्तगाह अजम नवाब तुलके ज्याहांखाँ बाहादर यासी फर्माविले ऐसीजे. तुम्ही हुजूर येवून माहाराजासी कदमबोसी करून फरजंदगीचा ईरादा धरून माहाराजाचा मुबारक दस्त आपले शिरावरी ठेवून घेऊन अर्ज केला की बेईमान शकीस गारद करून पटणची मसलहत सुरू करून चेनीचन्नावरपर्यंत माहाराजांचा झेंडा फेरिवीन हेच माझी शर्त. यैसे बोलोन (फाटले आहे) मर्दुमकी व युद्धाची शर्त तशीच आहे आशा प्रसंगामध्ये परशराम रामचंद्र यांचे कामी दोन तीन पलटणे व फौज जमा करून अनकरिब येवून पोहचला. हे खबर तुम्हास कलमी फर्माऊन जलदीने येणे म्हणोन इनायतनामे पैदर पै रवाना जाहाले असता दो रोजाचे मार्गावरी शत्रु आला असता अद्यापी ही तुम्ही फौज सुधा येवून पोहचला नाही. हेच अनबातर व फर्जंदगीस लायक तरकी काय आल्या. फौजेचे पारपत्य जाहाल्याने पुढे महत् कार्ये घडोन येतील. फौजेचा व ईंग्रजी पलटणाचा अदमास पाहावया करिता अजम चतुरसिंग भोसले यांनी तोफखान्यावरी घोडी घातली. ते समई तोफा टाकून काही से निघोन लढाई अनुमात्र जाहाली. खुंरेजी बहुतच जाहाली. ईंग्रजांचे मारगिरीचा वहम फिटला. अशा समई तुम्ही येवून पोहचल्यानंतर हरदु फौज येकत्र होवून सहजामध्ये महत् यश बफजल हासील होत आहे. हे फते अजीमता हासील होता दुसरे दिवशी तुमची सरफराजी करून कर्नाटकच्या मनसबीयास रवानगी सत्वर केली जाईल. ईनायतनामा सादर होताच क्षणी कुच करून दो रोजाचा मार्ग येका रोजात क्रमुन निकडीने निघोन येवून मातबर फतवा घेणे येणे कडून फरजंदगीची शर्त हेच आहे. तुमचे मर्जीचा ऐसा फर्सव आसमात रोषन तर होवून मातबर तुमची कामकाजे तुमच्या हातून घडोन येतील. लढाईचा वख्त नजदीक येवून पोहचला आहे. अवकाश न घेता फरजंदगीस लाजीम तर करणे. नीकड जाणोन कलमी फर्माविले असे छ ३ माहे रमजान जीयादा काय लिहीणे.

(शिका मोर्तब)



लेखांक : ८२

तोरगल : १६ / ता. ९ फेब्रुवारी १८००

राजमान्य राजश्री व्यंकटराव भास्कर यासी आज्ञा केली ऐसीजे–अजम नवाब तुलकेज्याखां बाहादर यासी फौज सुद्धा हुजूर पण विषयी आज्ञा पत्रे सादर जाहाली आहेत तरी तुम्ही मशार नीलेस ये विषयी सांगोन फौज सुद्धा सत्वर येणे घडोन गनीमास तंबी पोहचून पुन्हा तिकडे जावयाचे करावे. हुजूरची फौज व तोफा ही मशार नीले समागेम घ्यावयाची आज्ञा होईल तरी आज्ञेप्रमाणे मशार नीलेस सत्वर फौज सुद्धा येवून गनीमास तंबी पोहचे ते करावे. यासी तंबी पोहचले नंतर सरकारची फौज देवून गोखलेचे पारपत्य विषयी सत्वरच रवानगी होईल. तरी समये निकडीचा जाणून नवाब यासी फौज सुद्धा घेवून यावे. जाणिजे सु॥ मया तेन व आलफ त॥ छ १४ माहे रमजान बहुत काय लिहिणे.

(शिक्का)



लेखांक : ८३

निवडी : १९३०० / ता. २२ फेब्रुवारी १८००

यादी महाराज सरकारातून गुजाजीराव सरखवास यास सरखवासिचा किताब मल्हारजी भोसले याजकडील काढून दिला.

१. सन तिसा सबेन मया व आलफ छ २४ माहे जमादिलावल[1] शके साली मल्हारजीराव भोसले यांजकडील सरखवासीचा किताब काढून गुजाजीराव गायकवाड यास सरखवासीचा कीताब दिला आहे.

१. सन सबान तिसेन मया व आलफचे साली आश्वीन शुद्ध १५ रोजी[2] किले भूदरगड खासबारदार लोकानी व आपाजी नलगे याणी किल्यास रात्री शिड्या लाऊन किला घेतला. त्यासाठी गुजाजीराव गाईकवाड यास विश्वासराव हा किताब दिल्हा आणि सरखवासीचा किताब हैबतराव गाईकवाड यास दिल्हा.

१. २०-६-१७७९, २. १६-१०-१७९६

१. सन तिसा तिसेन मया व आलफचे साली[1] महाराज सरकाराची स्वारी फौज सुद्धा मौजे काले नजीक कराड येथे असता अशाढमासी गुजाजीराव गाईकवाड यांस दुखणे लागून वारले. त्या साली हैबतराव गाईकवाड यास विश्वासराव हा किताब दिल्हा व दौलतराव गाईकवाड यास सरखवासीचा किताब दिल्हा आहे.

१. सन मयातेन व आलफचे साली माघ वद्य १४ रोजी[2] रेडे घाटी नजीक राक्षी येथे रामचंद्र परशराम याणी रात्री येऊन छापा घातला. त्यारोजी दौलतराव गाईकवाड सरखवास यास भालेची जखम लागुन वारले व विश्वासराव गाईकवाड हे पाडाव जाहलेवर रामचंद्र परशराम याणी गाईकवाड याचा गळा काटऊन मारविले.



लेखांक : ८४

निवडी : १९२१२ / एप्रिल १८००

राजश्री रामचंद्रपंत आपा गोसावी यास सकल गुणालंकरण अखंडीत लक्ष्मी अलंकृत राजमान्य श्री सखाराम घाटगे सर्जेराव दंडवत विनंती उपरी येथील कुशल जाणोन स्वकीय कुशल लिहीत असीले पाहिजे. विशेष आपणास पेशजी पत्रे सरकारची व आमची पाठविली असता पत्रे लक्षात न धरीता गोळा गोळी बंद न होऊन लढाई महकूब केली नाही, हे चांगले नाही. सरकारची पत्रे लक्षात धरून गोळागोळी बंद होऊन लढाई महकूब असावी ये विषी सरकारची पत्रे पाठविली आहेत. त्याप्रमाणे गोळागोळी बंद करून लढाई महकूब करावी. फीरून पत्राचा आक्षेप न करावा येविषी सांडणी पाठविला आहे. त्यास पत्राचे उत्तर सत्वर पाठवणे. रवाना छ ४ माहे जिल्हेज. बहुत काय लिहीणे कृपा लोभ करावा ही विनंती.



---

१. १७९८–९९, २. २२-२-१८००

लेखांक : ८५

तोरगल : १७ / ता. १८ मे १८००

राजेश्री धोंडजीराव वाघ गोसावी यासी अखंडीत लक्ष्मी आलंकृत राजमान्य श्रेहांकित रामचंद्र परशराम आशिर्वाद उपरी येथील कुशल जाणोन स्वकीय कुशल लिहीत जाणे विशेष. तुम्ही खत पाठविले ते पावले. मजकूर सविस्तर विदीत जाहाला. व याद कलम बंदीची ती।। राजेश्री वासुदेवपंत काका यांजकडे पाठविली होती ते ही त्यानी इकडे पाठविली. ऐशीयास यादीतील कलमे बोलण्याचे अमलात येवून ठराव जाहाला पाहिजे. या करिता तुम्ही आपलेकडील यख्तीयार कारकून रावसाहेब भास्करपंत बेडेकर यांजबरोबर ईकडे पाठवणे म्हणजे ठरावात आणिले जाईल. दोस्तीचे जागा खुदारिन (?) धरिता ईकडील सरंजामी माहालात व सावणुर तालुक्यात कोणेविषयी तोसिस न लागे ते करणे. स्नेह मानीता ते पक्षी आम्हाकडील मुलुकास अगदी उपद्रव करू नये हे दोस्तीस चांगले. ता।। छ २३ जिल्हेज सु।। मयातेन व आलफ.

पो छ २ मोहरम मोर्तब

(शिक्का)



लेखांक : ८६

राव विश्वासराव गायकवाड दप्तर : ३ / ता. २६ मे १८००

यादी

१. सन आर्बा तीसेन मया व आलफ शके १७१५ प्रमाधीनाम संवत्सरे

१. मार्गशीर्ष शुद्ध १० ते दिवशी[1] रामचंद्र परशराम यासी ठाणे माळ ते मु।। दस्त करून आणिले.

१. फाल्गुन व।। १०[2] तह होवून वाकस आसामी ६ दिली तहाची बरीने दाहा लक्ष बाल जोशीराव

१. खमस तीसेन मया आलफ शके १७१६ आनंद नाम संवत्सरे

---

१. १३–१२–१७९३, २. २६–३–१७९४

१. भाद्रपद वद्य ११स[1] दिलेल्या असामीना निरोप होऊन द्वादशीस करवीरास आल्या.

१. तेच साली नबाब आल्ली बहादर याजवर मोहीम पेशवे यानी करून.... येथे लढाई जाहाली.

१. सन सीत तीसेन मया व आलफ शके १७१७ राक्षसनाम संवत्सरे[2] आश्वीन व।। १ माधवराव पेशवे यानी सजे वरून उडी टाकली.

१. सबा तीसेन मयातेन व आलफ शके १७१८ नलनाम संवत्सरे.

१. आषाढ मास[3] राजश्री बच्याजी बल्लाळ बाजी सिनोलीकर यांचे वि।। बाळाजी जनार्दन उर्फ नाना फडणीस याचे संधाने हुजुर होवून नंतर फडणीस मशारनिले महाडचे मुक्कामास साताऱ्याहून गेले. नंतर हुजूर तीन लाख रुपये चांदवड दिले. त्यास आणावयास खास बारदार व गोपाजी वराठे गासुनी (?) झुंझार गेले होते. ते घेवून आले श्रावण अखेरीस.

१. आश्वीन[4] शु।। १५ किल्ला भुदरगड घेतला.

१. आश्वीन व।। ५ हुजुरची स्वारी जावून चिकोडीस ठाणे घेतले. दीपवाळीस स्वारी करवीरास दाखल जाहाली. पुन्हा स्वारी होवून खास गाव जाळून ठाणे मनोळीस स्वारी गेली. मनोळीहून स्वारी माघारी फिरावी तो अगोदरच बाळाजी जनार्दन याजकडून बोलणे येवून करार ठरला जे जमखंडीत आपला ऐवज घेवून ठाणे मामलेदार यानी बांधले आहे. सबब बोलावे...........जे जमखंडीचा मामलेदार मोवासगीरी करीत आहे. त्या च्यार देत करून ठाणे सरकारात घेवून आपले नीसबतीचे कारकून आले आहेत त्याचे जीमेस करावे. त्यावरून खासा स्वारी मनोळीहून यादवाडा वस्तुत जमखंडीस जाऊन लढाई होवून भास्कर सखदेव मामलेदार यासी काढून देवून मार्गशीर्ष[5] व।। ५ ठाणे घेवून फडणीस याजकडील कारकुनाचे जीमेस करून हुजूरची स्वारी करविरास येते समई रामदुर्गचा मु।। हुपरीकर याची समजी होवून हुपरीकर यानी हुपरीचे ठाणे स्वाधीन केले.

१. २०-९-१७९४, २. २८-१०-१७९५, ३. ५-७-१७९६, ४. १६-१०-१७९६, ५. ४ १२-१७९६

१. सन समानेन तीसेन शके १७१९ पिंगलनाम संवत्सरे[1] आश्वीनमास कर्नाटक प्रांती हुजुरची स्वारी जाहाली.

१ सन तीसा तीसेन मया व आलफ भाद्रपद मासी[2] व॥ ९ स सावनूरावर फौजेचा मोड जाहाला शके १७२० काल युक्ताक्षी.

१ सन मया तेन चे साली[3] भाद्रपद व॥ ४ ते दिवशी परशराम रामचंद्र याचा लढाईत पटनकुडीचे मु॥ मोड जाहाला. ते दिवशी परशराम पंत लढाईत पडले. त्याचे दहेन तेथेच जाहाले. शके १७२१ सिद्धार्थी.

१ सन मशार मार्गशीर्ष[4] श्रु॥ ७ स करवीरास वेढा आला. रामचंद्र परशराम व गणपतराव कोनेर नी॥ आलीजा बहाद्दर बरोबर पलटणे चार होते.

१ माघ व॥ १४ सन[5] मशारी रेडघाटी येथे मोड जाहाला.

१ फाल्गुन व॥ ४ सन[6] मजकूरी बाळाजी जनार्दन उर्फ नाना फडणीस यांचा काल जाहाला.

१ चैत्र व॥ १४ सन[7] मजकूरी बाळाभाऊ यासी सखाराम घाटगे सर्ज्याराव यानी आलीज्या बाहादुर यासी मुलगी देणेचा करार करून वडऊद ठाणे दिले. बाळाभाऊ पागे यासी कैद केली. ते वर्तमान येताच वैशाख श्रु॥ ३स[8] रामचंद्र परशराम करवीरास फौज सुद्धा पळुन जाऊन कोगनोली मुक्काम करून मजल दर मजल ते तासगावास गेले.

१ हुजूरची स्वारी किल्ले पनाळाहुन करवीरास वैशाख व॥ ३ स[9] दाखल जाहाली.



लेखांक : ८७

निवडी : १९७७० / ऑगस्ट–सप्टेंबर १८०० (?)

राजश्री मोरोपंत गोसावी यासी अखंडीत लक्ष्मी आलंकृत राजमान्ये राजेश्री नागोजीराव घाटगे झुंझारराव दंडवत बिनंती उपरी. येथील कुशल ता॥ छ

---

१. २९–९–१७९७, २. ४–१०–१७९८, ३. १८–९–१७९९, ४. ३–१२–१७९९ ५. ८–२–१८००, ६. १४–३–१८००, ७. २२–४–१८००, ८. २७–४–१८००, ९. २६–५–१८००.

माहे रविलावर पर्यंत जाणोन स्वामीस कुशल लिहीत जावे. विशेष तुम्ही गेल्या तागायत एकही पत्र येऊन पोहोचले नाही. अजम जोसू व युटाफ भाई यांची पत्रे आली. त्या अन्वये हुजूर महाराजांचे सेवेसी अर्ज करून श्रीमंत राजेश्री राजाज्ञा यांची पत्रे रवानगी फौजेसुद्धा सामानगडचे सरहद्देस गेली. त्यास ते मजल दरमजल भूदरगडचे सीमेवर गेले. तेथून पुढे जाणार. धोंडोजी वाघ जांबुटीस येऊन तेथून पाछापूर, गोकाकचे मार्गे यादवडावर जाऊन तेथून बागलकोटाकडे गेले. त्याचे मार्गे गोकाकचे सुमारे त्यांचे पिच्छावरी आजम कर्नल वसली बहादूर याची फौज जात आहे. याप्रमाणे वर्तमान आहे. पुढील मसलहतीचा अर्थ कसा काय हा शोध घ्यावा. वेदमूर्ति राजश्री आपाण्णाचार्य आले. त्यास कित्येक मजकूर जबानी सांगितला. त्याप्रमाणे हुजूर निवेदन केले. त्याप्रमाणे हतोटीस येऊन निदर्शनास ये ते करावे आणि प्रामाणिकपणे घडोन यावे. पेशजी आम्ही गावेस येऊन भाई यासी सविस्तर मजकूर सांगितला. जे मुख्य राज्याचे अधिकारी महाराज याज परते दुसरेस अधिकारी नाही. ऐसे असता सेवक लोकानी अमर्यादा करणेस चुकले नाहीत. माघारा नाही; कुंपणीची दोस्ती बिरादरीची बरकरार केली आहे. त्यास राज्याचा बंदोबस्त महाराजाचे मनोदयानुरूप घडोन येईल ते करावे व इंग्रजांची व महाराजांची दोस्ती. त्यात राज्याचे कल्याण तेच करून त्याही दाखवावे हे त्यास बंधुत्वास योग्य आहे. भाईही करविरास येणार आहेत. म्हणून हुजूर अर्ज केला. त्यावरून महाराजांस बहूत बहुत खुसी हासील जाहली. त्याचाही समये त्वरेने घडेल. तुम्ही वरचेवरी वर्तमान लिहून जासूद व माणसे असतील ती रवाना करीत असावी. जासूद नसलेस अजूरदार करून वर्तमान लिहून पाठवीत जाणे. परशुरामपंत याचे धाकटे चिरंजीव राजश्री हरीपंत व गोखलेचे पुतणे व मिरजकर राजेश्री चिंतामणराव हे तुर्त अजम बाहादूर यापासी आहेत. नाना प्रकारे गिला समजावून देतात. तूर्त प्रसंगी नवलगुंद प्रांतापैकी हुजूराची ठाणी व देस कुल वतनी गाव वतन तोरगलकर याजकडे सरकार तालुकेत वहिवाट चालत असता तूर्त त्याविसी पत्र आले. त्याची नक्कल पाठविली आहे. त्यावरून सर्व समजेल. त्यास हुजूरची ठाणी आहेत, त्यास उपसर्ग न लागे ते करावे ऐसे पत्र करमते (?) भाईचे घेऊन पाठवावे. राजश्री बाळाजीपंत यांची रवानगी करून पंधरा रोज जहाले. त्यास ते बहाद्दूर यांचे लष्करात जाऊन पोहोचले असतील. उत्तर येईल त्याप्रमाणे लिहून पाठवू. सर्व

भरवसा भाईचा आहे. अमर्यादा वर्तणूक करणार सेवक वगैरे बहादुर याजवळ आहेत. याचा अंदेशा आहे. त्याचा बंदोबस्त कसा करतात हे लिहून पाठवावे. नवलगुंद तालुका हुजूरचा आहे. त्यात नाही ते खटले समजोन देतात. महाराज धनी याही बंदोबस्त राज्यांचा करावा. यास झाडून तालुका प्रान्त हुजूरचा आहे. त्या प्रमाणे हुजूरचा अम्मल बसवून इंग्रजानी द्यावा. ज्यापेक्षा महाराज कुंपणीस बंधू म्हणविता त्यापेक्षा हुजूरचा अम्मल बसवून देणे हे त्यास लाजीम असे. याचा अशय भाईस विचारून सविस्तर लिहून पाठवावे. मनोळीचे ठाणेदारानी लबाडी केली. सबब त्याची तगिरी करून राजेश्री शंकरराव शिंदे सेनाखासकील याजकडे ठाणे देऊन राजेश्री खंडेराव भोसले यासी गैरमर्जी बोढून किल्ले पन्हाळीस पाठविले आहे. सुरापुरकर सरदार वगैरे हर कोणास आसरा दिला नाही. दररोज अमर्यादा वर्तणूक करणेत सेवक बहादुर यासी नालिस्त पत्र जाऊन देऊन खटला करणार याविसी त्यांचे सांगणे मनावरी न येईल ऐसे भाईचे पत्र बहादूर यासी द्यावे.



लेखांक : ८८

तोरगल : १८ / इ. स. १८००

राजेश्री धोंडजी वाघ गोसावी यास आखंडीत लक्ष्मी आलंकृत राजमान्य स्नेहांकीत रामचंद्र परशराम आशिर्वाद उपरी येथील कुशल जाणोन स्वकीय कुशल लिहीत जाणे. विशेष तुम्ही सावनुर तालुक्याचे सरदेशी आला आहा. तालुका व सरंजामी माहाल आम्हाकडील तीकडे आहेत त्यास कोणेविषयी उपद्रव लागो नये. याप्रमाणे पेशजी पत्रे पाठविलीच आहेत व ती॥ राजेश्री वासुदेवपंत काका वरचेवर तुम्हाकडे लिहीतच आहेत. त्यास तालुक्यात व सरंजामी माहालात कोणेविषयी उपद्रव न लागे ते करणे. दोस्तीचे जागा फार व लिहिणेचा छ १४ जिल्हेज सरंजामी माहालापासून खंडणी घेतली तेव्हा स्नेह तोडावा आसे तुमचे मनात आले आहे की काय ? तर जसे ती॥ राजेश्री काकाजी बोलणे जाहाले होते तशी वर्तणुक करणे. जाणीजे छ मजकुर.

(शिक्का)



करवीर छत्रपतींच्या राजमुद्रा






श्री प्रतिपच्चंद्र लेखेव वर्धिष्णुर्विश्ववंदिता
रामसुनोः शिवस्यैषा मुद्रा भद्राय राजते
(छ. शिवाजी महाराज, ताराबाईंचे पुत्र)





श्री प्रतिपच्चंद्र रेखेव वर्धिष्णुविश्ववंदिता
शंभु छत्रपतेर्मुद्रा रामसुनो विराजते
(छ. संभाजी महाराज, करवीर)




श्री शंभु राजस्य भार्याया जिजादेव्या धरातले
बालेंदुरिव वर्धिष्णु मुद्रा भद्राविराजते
(राणी जिजाबाई, करवीर)




श्री॥ चांद्री लेखेव वर्धिष्णुर्जनानंद प्रदायिनी
शिव छत्रपतेर्मुद्रा शंभु सुनोर्विराजते
(छ. शिवाजी महाराज (दुसरे) करवीर)




श्री चांद्री लेखेव वर्धिष्णुर्जनानंद प्रदायिनी
शंभु छत्रपतीर्मुद्रा शिव सुनोर्विराजते
(छ. संभाजी महाराज उर्फ आबासाहेब)

लेखांक : ८९

निवडी : १०३८० / इ. स. १८००

आजम जोसू

बंदर गोवा शादकाम बाशद शाहामतवे आवली पनाह वलादत दस्तगाह बाअदज इस्तियाक फिरवा मरामशहूद आंके अजम अजमतरीन वसली बहादुर यांचे खत पत्र अजम व्यंकटराव कृष्णा याची अर्ज दारूष फिरस्ताद केली ती महाराजाचे हुजुरात रसीद होऊन बयाजवार मजकूर माल्हम जाहले. अजम कर्नल वसली बहादुर याजकडे पेदर देखत किताबात पाठविणेवीसी लिहिले ते जाहीर जाहले आणि अजम कर्नल वसली बाहाद्दर याणी कलमी केल्या बमोजीब रासीदून अकीदत रत्नाकर पंडत राजाज्ञा यासी बामैफौज, बासरदार हमराहहून सामानगडचे सरहदेस रवाना फर्मविले आहे. ते अजम कर्नल वसली बहादुर याणी कलमीं केल्या बामोजिब धोंडजी वाघाचे पारिपत्य करतील. नमकहराम चाकर लोकांची बरोबरी करून सुलाहबाबे अज कर्नल वसली बाहादुर याणी कलमी केले. त्यास नमकहराम चाकर लोकाचा सुलाहता करणे काय आहेत. मात्र मजकूर नमकहराम चाकर लोकाविसीचा अजम नागोजीराव घाटगे झुंजारराव याणी अंदाज दिलाची खात्र दारूष करून दील्हीच आहे.



लेखांक : ९०

तोरगल : १९ / इ. स. १८००

राजेश्री बाबा वाघ गोसावी यासी अखंडीत लक्ष्मी आलंकृत राजमान्य श्रे॥ नारायणराव राजे घोरपडे रामराम विनंती उपरी येथील कुशल जाणोन स्वकीये लेखन करावे विशेष तुम्हा कडून बहुत दिवस झाले पत्र येवून काही समाचार कळला नाही. त्यासी ऐसे नसावे. पत्र पाठवून समाचार घेत जावा. याजउपरी आपली स्वारी एसर्डेस आली म्हणोन ऐकिले त्यासी हे परगणे आपले आहेत हरयेक विषयी उपसर्ग न लागे ते केले पाहिजे, याजविषयी आपलेस विस्तार पुर्वक लिहावेसे नाही. सर्व आगत्यवाद तुम्हास आहे. बहुत काये लिहिणे लोभ कीजे हे विनंती.

पो छ २१ कार्तीक.



लेखांक : ९१

तोरगल : २० / ता. १७ डिसेंबर १८०१

सेनाधुरंधर विश्वासनिधी राजमान्य राजेश्री शंकरराव शिंदे सेना खासकील यासी आज्ञा केली ऐसाजे. चिरंजीव राजेश्री हैबतराव गायकवाड विश्वासराव यासीही आपणाकडे जाणेची आज्ञा जाहाली आहे. बागेवाडीचे सुमारे येत आहेत. तेथुन तुमचे पत्र येईल त्या प्रमाणे पुढे येतील. आपण अगोदर गोखलेची भेट ध्यावी आणि विनंती पत्र पोचवावे. जाणिजे. सु॥ ईसने मयातेन व आलफ त॥ छ १० शाबान. बहुत काय लिहिणे तरी सुज्ञ असा.



लेखांक : ९२

निवडी : १९२९५ / इ. स. १८०१ – १८०२

राजश्री नारायणराव गोसावी यांस अखंडीत लक्ष्मी आलंकृत राजमान्य श्री प्रीतीराव चवान उमदेतुलउमराव बहादर रामराम विनंती उपरी येथील कुशल जाणोन स्वकीय लेखन करीत गेले पाहिजे. विशेश तुम्हाकडून अलीकडे पत्रे येऊन वर्तमान कळत नाही. तरी वरचेवरी पत्र पाठवून सर्वासार लिहित जावे. तुम्हाकडून विठोजी यादव जासूद आला. त्यानी जवानी वर्तमान सांगितले. त्यावरून कळले. तुम्ही राजश्री यशवंतराव होळकर सुभेदार आलीज्याह बहादूर यांचेजवळ वकीलीस देशकार आहा. आशास सुभेदार यांची मर्जीमय मराखेल (?) हुजूरचे जाबसाल उलघडुन येई ते करावे. हुजूरचे जाबसालीची माहिती नाही. राजश्री सखाराम घाटगे सर्ज्यािराव बापु यादव तुम्हास आहेच. त्यात हल्लीचे प्रसंगात सुभेदार यांजकडून पूर्वी तहनामा श्रीमन्महाराज कैलासवासी स्वामी महाराज याही तह ठरवून दिला आहे. त्या आन्वये तह ठरवून जाबसाल उलगडून येईतो पक्का करून लेहून पाठवावे. हाल्ली आहे त्यात लिहीलेप्रमाणे स्वामी शेवा करून दाखवणे. राजश्री विठ्ठलराव तुमचे बंधु यास आसामी रूबरू लिहीनेची करून घेऊन चालविली आहे. सुभेदार यांस पत्र पाठविले आहे ते पोहचते करून अगर घेऊन पाठवून देणे.



लेखांक : ९३

तोरगल : २१ / इ. स. १८०१ – १८०२

राजेश्री मालजी निकम काका गोसावी यांसी अखंडीत लक्ष्मी आलंकृत राजमान्य श्रे।। हैबतराव गायकवाड विश्वासराव रामराम विनंती उपरी येथील क्षेम जाणोन स्वकीये लेखन करीत असले पाहिजे. विशेष आपली पत्रे सरकारात फकीर घेवून आला तो छ ९ माहे शाबानी पोहोचला. त्याजवरून आम्हास फौजसुद्धा रवाना केले आहे त्यास येथून फौज किती घेवून निघावे त्याचे खर्चाची सोये तिकडे ध्यानात आणोन लिहून कळवावे त्याजप्रमाणे घेऊन येतो तेथे आले. नंतर राजश्री बापू गोखलेनी व आम्ही एकविच्यारे असोन स्वामी कार्य होवून शत्रूचे पारपत्य व्हावे ऐसे मानस हुजुरचे व आमचे. त्यास गोखलेची बोलणी राजश्री राव सेनाखासकील याजकडे आली आहेत. बोलणेचे पर्याय कैसे कैसे आहेत आणि आम्ही व त्यानी कसे असावे हे पुर्ते समजून ध्यावे आणि तपशीलवार लिहून कळवावे. त्याचे मानस कसे आहे हेही ध्यानात आणावे. आम्ही त्यानी एकविच्यारे कसे असावे हे तपशीलवार तुमचे पत्री व राजेश्री सेनाखासकील यांचे पत्री तपशील लिहून कळवावे. त्याजप्रमाणे आम्ही निकडीने येऊन पोहोचतो. राजेश्री गोखले व शत्रू कोणे ठिकाणी किती फौज सुद्धा आहेत तेही लिहावे व कळावे. बहुत काय लिहिणे लोभ कीजे हे विनंती.



लेखांक : ९४

निवडी : २९७ / ता. २३ नोव्हेंबर १८०२

राजेश्री देवी नाईक दुभासी गोसावी यासी

आखंडीत लक्ष्मी आलंकृत राजमान्य राजेश्री प्रीतीराव चव्हाण उमदेतूल-उमराव बहाद्दर रामराम. विनंती उपरी येथील कुशल जाणोन स्वकिये कुशल लिहित जावे. सावंत यानी लबाडी केली याकरिता यांच्या बंदोबस्तास राजेश्री रत्नाकर पंडीत राजाज्ञा यांची रवानगी फौजसुद्धा आली आहे. हा मजकूर सो महैरबां आजम कर्नल सर उलीयम कलारक बहादर यासी कळवावा. बोलणे तुम्हाशी समक्ष झाले आहे त्याप्रमाणे नमूदात आणून राजेश्री व्यंकटराव यासी पाठवून द्यावे. चिकोडी तालुकेतील गाव व मनोलीचे ठाणे व सुभे सुद्धा राजेश्री

सिदोजीराव नाईक निंबाळकर निपाणकर याजकडे आहेत. ती सुटून हुजूर सत्वर येईल ते करावे. पंडीत राजाज्ञा वरचेवर तुम्हास पत्रे पाठवितील त्याप्रमाणे जाबसाल करून उत्तरे पाठवीत जावी. कळावे. छ २६ माहे रजब. बहुत काय लिहिणे. लोभ किजे हे विनंती.

सु॥ सलास मयातेन व आलफ आश्वीन कार्तीक मास.



लेखांक : ९५

तोरगल : २२ / ता. १२ डिसेंबर १८०२

सेनाधुरंधर विश्वासनिधी राजमान्य राजश्री शंकरराव शिंदे सेना खासकील यासी आज्ञा केली ऐसीजे स्वामीचे शेवेसी तुम्ही विनंती पत्र पाठविले ते प्रविष्ट होवून लेखानार्थ श्रवण जाहाला. राजेश्री गोपाळराव शिंदे याचे बंदोबस्ताविषयी विनंती लिहिली व राजेश्री नारायणराव पाटणकर सरलष्कर व चिरंजीव राजेश्री हैबतराव गायकवाड विश्वासराव हुजूर विनंती करतील त्यावरून विदीत होईल म्हणोन विनंती पत्री विनंती लिहिली व राजेश्री नरसो महिपत यासी शेवेशी सविस्तर विनंती करणेस पाठविले आहेत म्हणून विनंती लिहिली. त्यावरून सविस्तर निवेदन जाहाले. यैसीयासी गोपाळराव शिंदे यासी सरंजामसुद्धा हुजूर पाठवून द्यावे. हुजूर आले नंतर बंदोबस्त करून देणेची आज्ञा होईल येविषयी सरलष्कर व विश्वासराव हे उभयता मनीले आज्ञेप्रमाणे तुम्हास लिहितील व नरसो महिपत यासी आज्ञा होणे ती होवून पाठविले आहेत. आज्ञेप्रमाणे सांगता कळो येईल. तुम्ही वरचेवरी बातमी वर्तमान आणवून हुजूर पाठवीत असावे आणि आपणही सरंजामसुद्धा हुजूर यावयाचे करावे. जाणीजे. सु॥ सलास मयातेन व आलफ छ १५ माहे शाबान बहुत लिहिणे तर सुज्ञ असा.



लेखांक : ९६

तोरगल : २३ / ता. ३ ऑगस्ट १८०४

राजेश्री संभाजीराव शिंदे सेना खासकील गोसावी यासी सकल गुणालंकरण अखंडीत लक्ष्मी आलंकृत राजमान्य पो॥ नारायणराव पाटणकर सरलष्कर

रामराम. विनंती येथील क्षेम ता।। छ १९ माहे सफर जाणून स्वकीये लेखनी चित्त प्रमोदवीत आखिले पाहिजे. विशेष आपण पत्र पाठविले ते पावले. चिरंजीव राजेश्री सिदोजीराव नाईक निंबाळकर यानी आपले कडील दोन गावास उपद्रव केला आहे म्हणून लिहीले. त्यासी मशार नीले हुजुरने आज्ञापत्र सादर जाहाले आहे. वरकड सरंजामाचा मजकूर लिहीला. त्यासी हुजूर विनंती करून जसा जाबसाले होईल त्याप्रमाणे आपलेस कळवितो. आपले कार्याविशयी इकडून दुसरा आर्थ व्हावयाचा नाही. निरंतर पत्री चित्त आनंदवीत आसावे. बहुत काय लिहीणे. लोभ कीजे वरकर्णी मजकुर राजश्री सुबराव घाटगे सर्जेराव यासी सांगीतला आहे. बोलतील हे विनंती.



लेखांक : ९७

तोरगल : २४ / ता. ३० सप्टेंबर १८०४

राजेश्री शंकरराव शिंदे सेना खासकील गोसावी यासी सकलगुणालंकरण अखंडीत लक्ष्मी आलंकृत राजमान्य प्रीतीराव चव्हाण उमदेतुलउमराव बाहाद्दर रामराम विनंती उपरी येथील कुशल जाणोन स्वकीये लेखन करीत असले पाहिजे. विषेष आपण पत्र पाठविले ते पावले लिहीला मजकूर कळो आला. त्याप्रमाणे हुजूर विनंती केली व सदरहु पत्रही हुजूर निवेदन केले त्यावरून हुजूरचे आपणास आज्ञा पत्र सादर जाहाले आहे. तरी हुजूरचे आज्ञेप्रमाणे राजेश्री बापाजी जगताप यासी लोक देवून हुजूर रवाना करून ध्यावे. हुजूर आलेनंतर आपणास पेशजी तैनात जाबतेची यादी हुजूरने करून दिली आहे. त्याप्रमाणे बंदोबस्त घडोन येणेचे नमोदात आले आहे. आपणास कळावे. रवाना छ २५ माहे जमादिलाखर. बहुत काय लिहिणे. लोभ कीजे हे विनंती.



लेखांक : ९८

निवडी : ११२७४ / इ. स. १८०४–५

स्वस्ती श्रीचे आज्ञापत्र भाऊ महाराज

राजश्री देवी नाईक दुभाषी यासी आज्ञा केली शेसीजे स्वामींचे सेवेशी तुम्ही विनंती पत्रे २ पाठविली ती प्रविष्ट होऊन लेखनार्थ निवेदन जाहला. तुम्ही विनंती

लिहीले जे गुराबा व गलबते पदमगडावरील काढणे विषई आज्ञा व्हावी. त्यांस पेशजी राजश्री आकाराम यादव हावलदार यास आज्ञा जाहली आहे जे आरमार साऊकारी असेल ते साऊकारीस तयार करणे. व साऊकारी गैरउपयोगी आरमार असेल ते करणे त्यास हल्ली तुम्ही गुराबा आरमारे काढणे म्हणोन विनंती पत्री लिहीले त्या सेवेसी श्री यास व राजश्री दिनकरराव गायकवाड या उभयतांस पुणेस शौकत व आबालीपनाह अजम हनराबल इलिफिंस्तन बहादर यासी हा मजुकर विचारावा म्हणोन कलमी जाहाले आहे. तिकडील उत्तर आरमार कोणे ठिकाणी ठेऊन सावकारीस पाठविणेची वहिवाट करावी याचे उत्तर येईल त्या प्रमाणे तुम्हास आज्ञा पत्री आज्ञा होईल.



लेखांक : ९९

निवडी : १९७६६ / इ. स. १८०५

जंजिरे सिंधुदुर्गास मुसुंबीचे (मोझंबिक) तारु धरिले. त्यात हस्तीचा दात होता. ते वर्तमान रघूनाथ पै मुंबई सरकार तर्फेने वकालतीस आला होता, त्याणे वर्तमान तारु धरल्याचे सांगोन सरकारात पत्रे लिहून तारु सुद्धा दात मुंबईस आणिला. मालवणातून दात हत्तीचा पाठविल्याचा तपशील.

५८८. यैन. पाचशे अठ्ठयाऐंशी हस्तीदात

३३॥। पावणे चौतीस खंडी मुंबईच्या त्याच्या सुकरती

२५।ऽ॥। सुकरतीस वजन पंचवीस खंडी, अडीचमण, दर मण रुपये ५४॥ऽ येणे प्रमाणे.

२७७१९॥।ऽ

१३००० तारु विकले त्याचे आले तेरा हजार

४०७१९=॥।=

येणेप्रमाणे चाळीस हजार सातशे एकोणीस पावणे वीस दोन आणे सरकारचे मेस्तर दिनश्यावर रघुनाथ पै कडे या उभयतांनी जमा केल्याचा शोध पै कडेस पुसावा. तारु व हस्तीदात १७९२ इंग्रज शतकात विकला. हल्ली शक इंग्रजी १८०५. वर्षे बारा तेरा जहाली. व्याज सुद्धा पैसा ज्याचे कडेस लागू होईल त्याजपासून भरून घेणार स्वामी समर्थ आहेत.

हस्तीदात मोदी अमदाबादी यास विकला. साडे चौपन्न रुपये दोन आणेचे दराने विकला.



लेखांक : १००

निवडी : २०३८० ते २०३८१ / ता. १४ मार्च १८०५

शेवेशी राघो व्यंकटेश व कृष्णाजी गोपाळ कृतानेक शेवेशी विज्ञापना ता॥ छ १२ माहे जिल्हेज मुक्काम पुणे. स्वामीचे कृपावलोकने वृत्त यथास्थीत आसे. विज्ञापना येसीजे. इकडील वर्तमान गुदस्ता माघ शुद्ध १३ मंगळवारी बारा घटका दिवस आलेनंतर राजेश्री पंतप्रधान शुक्रवारचे वाडेतून निघोन राजेश्री सदाशीवपंतभाऊ यांचे वाडेस नाना फडणीसाचे घरास येऊन चार घटका एकांत बसून भाऊचे व त्यांचे बोलणे होऊन लागलेच निघोन कोपरगावास गेले. समागमे सरदार अद्यापी कोणी गेले नाहीत. अगोदर भाऊ यासी सांगितले होते जे सरदार व फौज काही सांगाते नको. मार्गास काही भेट नाही. उगेच लोकांचे पिकाची व मळेची खराबी करितात. तेव्हा भाऊ बोलिले जे सरदार समागमे जमा होते त्यासी ताकीद करितो. त्याजवरून चिंतामणराव यास व मिरजकर व कुरुंदवाडकर यास भाऊनी वकिलास सांगून पत्रे पाठविली आहेत. मागाहून जाणार. रास्ते व विंचुरकर समागमे गेले. कित्तुरकर आपले गावास माघारे जाणार. घोरपडे गजेंद्रगडकरी व मुधोळकर हे कोपरगावास मागाहून जाणार. वरकड पाटणकर व निंबाळकर वगैरे सरदार सकाळीच समागमे गेले. कालचा मुक्काम सोळा कोशाचा दररोज याप्रमाणे दरकूच जाणार. राजश्री भाऊस काही अद्यापी स्वस्थ जाहले नाही. हलके पडले नंतर भाऊही जाणार. वरकड राजश्री रोईतकर व त्रिंबकजी डेंगळे वगैरे सर्वच समागमे गेले. भाऊही मागाहून जाणार. प्रधानपंत वैशाखमासी माघारे येणार म्हणोन बहुत वदंता आहे. निपाणीकर यास सुरापुरकरवाले बेरड याजवर रामचंद्र परशराम गेले आहेत. त्यासी सुरापुरवाले बधत नाही. याजकरिता निपाणीकरासही तिकडेच जाणेस पत्रे गेली आहेत. प्रधानपंत या समागमे इंग्रजांची पलटणे काही गेले नाहीत. राजश्री आमृतराव याजकडील वकील राजे धाकोपंत श्रीकाशीक्षेत्रास जाणेस निरोप पेशजी घेऊन आजी शहरातून बाहेर जाऊन राहणार. शिंदे यांचा मुक्काम सागरच्या अलीकडे येक मजलीवर

व होळकर यांचा मुक्काम रामपुरा-भीमपुरा येथे आहे. आम्ही उभयता परवाचे दिवशी कर्नल क्लोज याजकडे आज्ञेप्रमाणे अगोदर खुश रावजी सेटे मोधी यांचे घरास जाऊन त्यासी आज्ञापत्र होते ते घेऊन जाऊन येकांती सामोपच्यारे बोलणे जाहले. त्याचे म्हणणे हुजूरची काज कामे काही आसलेस समजावून द्यावी आम्हाकडून शेवेशी आंतर होणार नाही. कर्नेल यास आज्ञापत्र थैली आहे ती घेऊन दोन प्रहरी कर्नेल याजकडे यावे. भेटी होवून बोलणे करवितो. त्याप्रमाणे दोन प्रहरी त्याजकडे गेलो. तेथे उभयेता कर्नेल व मोधी होते. कर्नेल याची भेटी होऊन थैली दिली. पत्रातील मजकुर वाचतेसमई बहुत संतोष कर्नेल व मोधी जाइले. हुजूरचे वर्तमान संतोषाने बहुत खुष होऊन विचारले. नंतर मोधी म्हणो लागले जे काजकामाची बोलणी असतील त्याप्रमाणे समजावून घ्यावी. कर्नेल यासी सांगतो. त्यासी उत्तर केले जे आपणापासी समजोन देऊ. नंतर आपण समजोन द्यावी. आज्ञापत्राचे उत्तरही आपुन द्या. देवितो म्हणोन बोलले. नंतर निरोप घेवून आलो. रामचंद्र परसराम याजपासी तूर्त निपाणीकर याजकडील फौजसुद्धा व पेंढारीसुद्धा दोन हजार जमेत आहे. विजापुर बागडेवाडीचे ऐलेकडेच आहेत. काल रात्री भाऊकडे गेलो होतो. त्याजपाशी राघोबा दिवाण भाऊकडील बसले होते. त्यासी प्रधानपंत यानी जातेसमई सागितले होते जे बावडेहून व विशालगडाहून व विजयदुर्ग प्रांती उपद्रव करून कारकून धरून नेहला. त्याजविषयी भाऊस सांगून पत्रे पाठवून बंदोबस्त करवणे म्हणोन त्याजवरून दिवाणजीने भाऊस सांगितले होते. त्याचप्रमाणे भाऊनी आम्हास सांगितले जे दिवाणजी हा मजकुर तुम्हास सांगेल. त्याप्रमाणे तुम्ही हुजूर विनंती पत्र लिहून त्याचे काय उत्तर येईल त्याप्रमाणे सांगावे. त्यासी यातील चौकशी आसल त्याप्रमाणे बावडेस व विशालगडास आज्ञापत्रे व हुजूरे पाठवून चौकशी करणेस आज्ञा व्हावी.

गोखले वासोट्याचे किल्ल्यास शेह देऊन बैसले आहेत. तेथेच आहेत. काली प्रधानपंत निघते समई आम्ही भाऊस विचारीले जे आम्ही येकजण समागमे जावे की काय. त्यासी ते बोलीले जे आम्ही जाऊ तेव्हा समागमे चला. वकील ही कोणी गेले नाहीत. भाऊच समागमे जावे लागल. त्यासी राहुटी व खर्चाचे पाठवून देणेची आज्ञा व्हावी. वाडीकर सावंत याजकडील कैसे जाहाले म्हणोन भाऊनी विचारले. नंतर उत्तर केले जे वाडीकर प्रस्तुत बहुतच दंगा केला आहे.

त्याचे कुमकेस आजरेहुन व निपाणीकरांकडून लोकही गेले आहेत म्हणताच, भाऊ बोलिले जे आसी गोष्टी व्हावयाची नाही. आम्हास विचारिले खेरीज कुमक जावयाची नाही. याप्रमाणे बोलिले वाडीकर सावंताचे प्रकरणात बहुत आगल्याने दोन तीन वेळा विचारले आहे. वाडीकर याचे पारपत्य हुजुरने व्हावे, असा भाऊचा मनोदय फार आहे. श्री नाना महाराज महायात्रेस जाणेस निघाले ते येथेच आहेत. धाकोपंताची सोबत चांगली समागमे यात्रा व लोक हजार पावेतो आहेत. त्यांचे सोबतीने जात नाही म्हणतात. श्रीद्वारकेस जाऊन समुद्र तीरानेच जाऊ असे म्हणणे आहे. होईल तैसी विनंती लिहून शेवेशी श्रुत व्हावे ही विज्ञापना.



लेखांक : १०१

तोरगल : २५ / ता. २६ नोव्हेंबर १८०५

राजेश्री संभाजीराव बाबा गोसावी यासी श्रीसकल गुणालंकरण अखंडीत लक्ष्मी आलंकृत राजमान्य ।। सखाराम सदाशिव माहाजन रामराम विनंती येथील कुशाल तागायत छ ४ रमजान जाणून स्वकीये कुशल लिहीत असिले पाहिजे. विशेष आपले कडील कामाचा मजकूर राजेश्री तीमाजीपंत देशपांडे यांनी समजाविला त्याजवरून कलम. त्याप्रमाणे वे ।। राजेश्री बाळशास्त्री बावा व राजेश्री बळवंतराव नागनाथ व राजेश्री सदाशिवपंत भाऊ व बयाजी नाईक हे चौघांचे विद्यमाने श्रीमंत स्वामीस विनंती केली उत्तर जाहाले की स्वारी श्री पंढरीस जाती तेथून आंल्यावरी ठाणे मनोली वगैरे जाबसाल जे असेल तो उलघडून देतो म्हणून श्रीमंतांची आज्ञा जाहली आहे. स्वारी आठ चौ रोजी येणार. आल्यानंतर मनोदयारूप कामाचा बंदोबस्त होवून येईल. कामाविषयी काळजी न करावी. इतके दिवस मशारनीलेचे गांठ पडली असता काम उघडले असते. परंतु पंधरा दिवस जहाले त्यात स्वारीही गेली. त्यामुळे राहिले. वरकड मजकूर राजश्रींनी लिहिला आहे त्याप्रमाणे आपणाकडून बंदोबस्त जाहाल्यास इकडून आलेश पडणार नाही. खातरजमा असावी. आपली व आमची भेट नाही. परंतु मा ।। नीलचे सांगणेवरून भेट जहालेपेक्षा आधीक आहे. राजेश्री आमचे घरीच आहे. जासुद मात्र फार दिवस न ठेविता लवकरच रवानगी करावी. वारंवार पत्र पाठवून सांभाळ केला

पाहिजे. बहुत काय लिहिणे. या पत्राचे उत्तर आले पाहिजे लोभ निरंतर असावा हे विनंती.

पा ो छ ११ माहे रमजान सन सीत मयातेन व आलफ.



लेखांक : १०२

निवडी : ११९७६ / इ. स. १८०६ – १८०७

राजश्री या विराजीत राजमान्य राजेश्री बाळाजी पंत कोल्हापूरकर स्वामीचे शेवेशी सेवक बच्याजी अनंत जंजिरे सिंधुदुर्ग साष्टांग नमस्कार विनंती येथील वर्तमान तागायत छ माहे रजब पावेतो यथास्थीत आसे. विशेष हरजी घाग व पांडु चिंदरकर याजबरोबर परभोर हुजूर करविराम पत्रे पाठविली ती प्रविष्ट जाहाली. त्याची उत्तरे तुम्हास आज्ञापत्रे जंजिरा आली ती व आम्ही पत्रे देवून तुम्हाकडे म्हांगेरी वरून रवाना केले ती पोहचतील. येथून रवाना करून दोन रोज जाहाले. कळावे. यास्तव लिहिले आहे. नंतर गुदस्ता वाडीकर राजेश्री फोंड सावंत भोसले सरदेसाई यानी रेडीचा किल्ला आम्हाकडे देवून येथे येऊन हुजूर गेले त्या तागायत किल्ला हुजूराचे ताबीनात आहे. हे सर्व वर्तमान तुम्हास समजलेच आहे. तेथे वाडीकर यांचे आरमारी गुराबा तीन व गलबते खुसकीस धडेवर होती, ती जंजिरा आणवून धडेवर खुषकीस काढून ठेवणे विषयी आज्ञा. त्या वरून हल्ली जंजिराहून लोक दर्यावर्दी पाठवून पाण्यात लोढन गुराबास हाकारणीचा सरंजाम न करिता गुराबा गलबताच्या पागेस लावून आणीत असता जंजिराचे नस्तावर येत असता बोट व फत्तेमाऱ्या अजम इंग्रज यांच्या वाटेवरून आल्या. तेव्हा गुराबाची व फत्तेमारी बोटीची गाठ पडली. आमचे लोकांची व त्यांची बोलाबोली दोस्तीचे जागा म्हणोन होत असता फत्तेमाऱ्या बोटीने मारगिरी बहुत केली. परत आमचे लोकानी गोळागोळी केली नाही. ऐसे असता गलबत लोक सुद्धा येक पागेस बांधोन न्हेऊन गेली. गुराबावर ही मारगिरी बोटी वरून, फत्तेमारीवरून बहुत केली. त्यास बहुत हालाकीने गुराबाचे खटोर मात्र बंदर मजकुरी आले. परत मारगिरी मुळे जंजिराच्या लोकांच्या नाटवाड बहुत जाहाला. हुजुरून आज्ञा होवून रेडीहून गुराबा व गलबते आणावयाचे कारन वाडीकर सावंत याजकडून आरमाराकडून जंजिराचे बंदरची साहुकारी तरांडी यास व बाहेरील हरयेक बंदरचे साहुकारी

तरांडेस उपद्रव बहुत होतो आणि जंजिराचे आरमारचा होतो ऐसे सावकार यास नांव सांगतात याजमुळे हुजुरची आज्ञेप्रमाणे धडेवर खुसकीस आणून ठेवावी. येथील जंजिरास आमचे आरमार आज पांच वर्षे आरमार खुषकीस वर काढून ठेविले हे तुम्हास व सर्वास ठाऊकच आहे. त्यास सदरहुचा मजकुर सर्व शाहामत पन्हा जनरल जंजिरे मुंबई यास विंनंती करून गलबत लोक सरंजाम सुद्धा सोडून देणे विषयी मुंबईची पत्रे बोटीचे व गोवेचे कप्तानास सत्वर घेवून पाठवावी. सदरहु मजकुर बोटीवरील कप्तान यांचे लिहिले. परभारे दुसरे प्रकारचे जाईल. याजमुळे तुम्हास जाहाली वर्तणूक लिहून कळविली आहे. सदरहू लिहिल्याआन्वये समजून देवून बोटीस व गोवे कप्तानास मुंबई सरकारची पत्रे घेवून त्याचे फत्तेमारीवरून त्यास पोचावी आणि गलबत सामान सुद्धा सुखाने जंजिरा येई ते करावे. तेथील राजेश्री आपले व कुशे साहुकार यांची पत्रे राजेश्री रामदास सेठ यास खातरजमेची गेली आहेत. तो धर खचीतच हुजुरून आहे. किमपी फेर व्हावयाचा नाही. जाबसाल खचीतच आहे. येथील सावकार याचे पत्र हाली पाठविले आहे हे त्यास प्रविष्ट करावे आणि तुम्ही सर्व समजोन घ्यावे दोस्तीचा विच्यार म्हणोन गलबताने गोळागोळी न करावी. ....



लेखांक : १०३

तोरगल : २६ / इ. स १८०७ – १८०८

राजेश्री गोपाळराव शिंदे गोसावी यासी अखंडीत लक्ष्मी आलंकृत राजमान्य सिदोजीराव नाईक निंबाळकर सरलष्कर रामराम विनंती उपरी येथील क्षेम त॥ छ १८ माहे रजेब पावेतो जाणोन स्वकीये लेखन करीत असले पाहिजे. विशेष आपण पत्र पाठविले ते उत्तम समई प्रविष्ट होऊन संतोष जाहाला. राजेश्री बाबा-साहेब शिंदे सेना खासकील कुटुंबासुद्धा श्री चे यात्रेस गेले आहेत. इकडील बंदोबस्ताविषयी सर्व आधार आपलाच आहे. म्हणोन कित्येक मजकूर लिहीला त्यास आपण हरयेक गोष्टी विषयी काळजी न करिता स्वस्थ चित्ते असावे आम्ही येथे आहो त्यापेक्षा आपण काळजी न करावी. चौकी पाहारेचा मात्र पक्का बंदोबस्त येथास्थित राखोन सावधपणे राहून वरचेवरी इकडे सविस्तर लेहून कळवीत असावे इंग्रजाकडील मार्गाचे दस्ताना राजेश्री नरहरपंत याज समागमे पाठविले

आहे. आपणाकडे पोहचवीतील. सदरहु दस्ताना राजेश्री बाबासाहेब शिंदे सेनाखासकील याजकडे पाठवून घ्यावे—निरंतर पत्री आपले कडील कुशल लिहून चित्त संतोषवीत असावे. बहुत काय लिहिणे लोभ कीजे हे विनंती.



लेखांक : १४०

निवडी : ३२७ / ता. ३१ मे १८०८

राजेश्री समस्त गडकरी व नाना जाधव कारकून किल्ले वल्लभगड यास आज्ञा केली ऐसीजे – सु ॥ तिसा मयातेन व आलफ. हुजूरचा व राजेश्री सिदोजीराव नाईक निंबाळकर यांचा तह होऊन किल्ला मशार निलेकडे देणेचा ठराव होऊन राजेश्री मानसिंगराव पाटणकर याजकडील लोक व कारकून व हुजूरने कृष्णाजी मंडलीक आहेत याचे विद्यमाने किल्ला पाटणकर मशार निल्हे स्वाधीन करून पावती हुजूर पोहोच जाणिजे. ता. छ ४ माहे रबीलाखर लेखन सीमा. (शिक्का)



लेखांक : १०५

तोरगल : २७ / ता. १३ सप्टेंबर १८०८

राजश्री शंकरराव शिंदे सेना खासकील गोसावी यासी सकल गुणालंकरण आखंडीत लक्ष्मी आलंकृत राजमान्य श्रेय रायाजी जाधव जप्तन मुलुक रामराम विनंती येथील क्षेम ता।. २१ माहे रजेब जाणोन स्वकीये लेखन करीत आसिले पाहिजे. विशेष आपणाकडून राजेश्री नारायणराव आले त्यानी सर्व म।। सांगितला त्याजवरून हुजूर विनंती करून आपण हुजूर विनंती केलेप्रमाणे दाहा हाजार रुपये आपणास येणेस पाठविले आहेत तरी सरंजामानिसी अती सत्वर घोडेवर बसून पत्र पाहावे हा काळपर्यंत आम्ही आपले बोलणे चालोन नव्हतो. परंतू आजचे प्रसंगी आपण धनी स्वामीच्या पायापासी नाही हे उत्तम नव्हे. ऐसे जाणून आपले येणे होई तो अर्थ करून राजेश्री उदाजीराव घाटगे सर्ज्याराव व राजेश्री नारायणराव यासी पाठविले आहेत. तरी उभयता कळवीतील त्या अन्वये सरंजाम सुद्धा अती सत्वर यावयाचे करावे म्हणजे आम्हास यश दिलेसे होईल.

आपले कडील सर्व जाबसाल आमचे जीमा असते. सरकाराकडून काडीमात्र दीकत नाही. यात विस्तारे लिहून कळवावेसे नाही. बहूत काय लिहिणे कृपा कीजे हे विनंती.

पो छ १ माहे शाबान सन तीसा मया तेन आश्वीन मास.



लेखांक : १०६

तोरगल : २८ / ता. १८ सप्टेंबर १८०८

राजेश्री संभाजीराव शिंदे सेना खासकील बाबा गोसावी यासी सकल गुणालंकरण अखंडीत लक्ष्मी आलंकृत राजमान्य स्नेहांकीत माधवराव निंबाळकर ठाणे शिराळे कृतानेक रामराम विनंती येथील क्षेम तागायत छ २६ माहे रजेब पावेतो वर्तमान येथास्थित असे. यानंतर आपणाकडून राजेश्री नारायणराव तात्या आले. त्याने सर्व मजकूर राजेश्री जप्तनमुद्धक दादा यासी कळविला. त्यावरून दादा यानी हुजूर विनंती करून आपले मनोदयानुरूप बंदोबस्त करून मशारनीले यांची रवानगी करून दिली आहे. पोहचते क्षणी आपण सरंजाम सुद्धा निघोन यावयाचे करावे. यश आपण घ्यावे. आणि आपले बोलणेत दादा आहेत त्या पेक्षी कोणतीही गोष्ट आंदेशा न घेता आधी यावयाचे करावे. सर्व गोष्टी विषयी दादानी खातर जमा आपली सांगितली आहे. वरकड तात्या याचे मुखे कळो येईल. बहुत काय लिहिणे कृपा लोभ असो व्हावा. ही विंनंती.

पो छ १ माहे शाबान सन तिसा मया तेन.



लेखांक : १०७

तोरगल : २९ / : ता. ४ आक्टोबर १८०८

राजेश्री संभाजीराव शिंदे सेना खासकील बाबा गोसावी यासी सकल गुणालंकरण अखंडीत लक्ष्मी आलंकृत राजमान्य श्रे॥ नारायणराव पाटणकर सरलष्कर रामराम विनंती उपरी येथील कुशल जाणोन आपले स्वकीये लेखन करीत आसिले पाहिजे. विषेष आपण पत्र पाठविले ते पावले लिहिला मजकूर

सविस्तर कळो आला सत्वर फौज सुद्धा येतो म्हणून लि॥ त्याप्रमाणे सत्वर सत्वर यावयाचे करावे. राजेश्री रायाजी जाधव जफ्तनमुलुख यांचे पत्रावरून सर्व मजकूर कळो आला. त्यासी जप्तन मुलुख याची आपणास हाली लि॥ आहे त्यावरून कळो येईल सीबंदी वगैरे काही आपणावर पडू देत नाही. सर्व आमचे जीमा आहे. आपण कोणते विषयी काळजी न करिता यावयाचे करावे. स्वार व लोक बोल्या जाहाल्या शिवाय येत नाहीत. त्याच्या बोल्या करून घेवून येतो म्हणून लि॥ त्याप्रमाणे बोल्या करून स्वार व लोक पोख्ता जमावसुद्धा अतीसत्वर निघोन हुजूर येवून पोहचावे. आपण येणे करिता लढाईची महकुबी केली आहे. तरी हरयेक कल्पना चित्तात न आणिता आपणास आम्ही खातरजमेने लिहिले आहे, तरी जमावसुद्धा सत्वर यावे. ता॥ छ १३ माहे शाबान बहुत काय लिहिणे लोभ कीजे हे विंनंती.

पो छ १९ माहे शाबान सन तिसा मया तेन व आलफ.



लेखांक : १०८

तोरगल : ३० / ता. ४ ऑक्टोबर १८०८

राजेश्री शंकरराव शिंदे सेना खासकील गोसावी यासी सकल गुणालंकार अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्य श्रे॥ रायाजी जाधव जप्तन मुलुक व सखाजीराव यादव रामराम विंनंती येथील क्षेम ता॥ छ १३ माहे शाबान जाणुन स्वकीय लेखन करीत असिले पाहिजे. विशेष आपण पत्र छ ९ साबानचे पत्र पाठविले ते पावले लिहिला मजकूर कळला. राजेश्री उदाजी घाटगे सर्ज्याराव यांचे विद्यमाने दाहा हजार रुपये नीलकंठीची पुरवणी जाहाली दिसत नाही. अतिसत्वर जमावासह येतो ये विषयी सर्ज्याराव यानी आपणास पत्र लिहिले आहे त्याप्रमाणे आपले पत्र यावे म्हणजे जमावासह लवकरच येतो म्हणोन पत्री लिहिले आसे. तरी सीबंदी वगैरे कांही आपणावर पडू देत नाही. सर्व आमच्या जिमा आहे. आपण कोणते विषयी काळजी न धरिता यावयाचे करावे. स्वार व लोक बोल्या जाहाल्या शिवाय येत नाहीत त्यास तेथे बोल्या करून सत्वर व लोक पोख्ता जमाव सुद्धा आती सत्वर निघोन हुजूर येवून पोहचावे. आपण येणे करिता लढाईची महकुबी केली आहे तरी हरयेक कल्पना चितात वारंवार

न आणिता आपणास खातर जमेने लिहिली आहे. याजवरून जमाव सुद्धा सत्वर निघोन यावे. तरी पाच्छापुरच्या मार्गाने सामानगडाकरि निघोन यावे, लोकीकात बागेवाडीच्या मार्गे जातो. याप्रमाणे लढवून बातमी बाहेर न फुटता सामानगडच्या रोखे यावयाचे करावे. त्या मागे नदीस पाणीही थोडे आहे. आणि मार्गाला लांब मजली करून आती सत्वर यावयाचे करावे. हुजूर मर्जी आपली पत्रे खातरीने येतो यैसी आलेवर बहुत संतोष होऊन खुष मार्गी होवून आज्ञा जाहाली. आता सेना खासकील आले येविषयी हुजूर खातर जमा जाहाली ऐशी वारंवार आज्ञा होत आहे. तरी या उपरी दिवसगत न लाविता सामानगडास येवून पोहचावे. तेथून पत्र पाठवून घ्यावे त्या अन्वये बेताप्रमाणे आम्ही व राजेश्री हैबतराव गायकवाड विश्वासराव येतो. आपला सर्व जाबसाल करून देतो. बीनदिकत फौजसूद्धा यावे. बहुत काय लिहिणे. कृपा लोभ कीजे हे विनंती.

पो॥ छ १९ माहे शाबान सन तीसा मया तेन आश्वीन मास.



लेखांक : १०९

तोरगल : ३१ / ता. ६ डिसेंबर १८०८

राजेश्री शंकरराव शिंदे सेना खासकील बाबा गोसावी यासी सकल गुणालंकरण अखंडीत लक्ष्मी आलंकृत राजमान्य श्रो हैबरराव गायकवाड विश्वासराव रामराम विनंती येथील कुशल जाणोन स्वकीय कुशल लेखन करीत असावे. विशेष पेशजी आपणास काही लोक व स्वार पाठवून घ्यावे म्हणोन लिहिले होते त्यास (फाटलेले आहे) आपणास निकड पडेल ते समई जमाव पाठवून देतो ऐसे आले. अशास हाली राजेश्री सिदोजीराव नाईक निंबाळकर यानीं पेंढार व काही स्वार व जमा करून हुजूरचे प्रांतास उपद्रव केला आहे. खडक लाट ठाणे हुजूरचे येथे येऊन वेढा घालून शाहा देवून बसले आहेत. त्यास तूर्त हुजूरची खासा स्वारी घाटाखाली जाहाली आहे. मागे ऐसे केले त्याजवरून आम्ही येथून बंदोबस्त करावयाचा तो केलाच आहे. अशात आपले कडील काही लोक व स्वार पाठवून घ्यावे. म्हणजे ठीक आहे चाकरी करून कृपा संपादून घेणेचा समय आहे. हर कैही करून पाचशेहे लोक व शंभर दोनशेहे स्वार याची रवानगी करून पाठवावी ये विषयी आपणास विशेष लिहून कळवावे से नाही

छ १७ माहे सवाल बहुत काय लिहिणे लोभ कीजे. सदर पाचच्यारशेहे लोक व शेहेदोनशेहे स्वार यांची पंधरवडेची पोटाची बेगमी करून पाठवून घ्यावी. येथे आलेवरी खर्चास पोहचते होईल. अगत्य लिहिले. ध्यानात धरून रवानगी करावी हे विंनंती.



लेखांक : ११०

निवडी : १३४१-१ / इ. स. १८०८-९

यादि किले सामानगडास श्रीमंत पंत राजाज्ञा करवीराहून फौजसुद्धा येऊन किले भोवानगडास गेले. तेथे रखमाजी भोसले आनुरकर हे फौजसुद्धा तुरकवाडीवर उतरले होते ते राजमंडलचे प्रांतात येऊन उपद्व्याप करणेचे मसलती बद्दल आले होते. तेव्हा राजाज्ञा याणी भोसले यासी बोलणे लावीले जे तुमच्या आमच्या भेटी व्हाया, नंतर काय जे बोलणे ते बोलावे. असा बोलण्याचा भाव घातला तेव्हा भेटीबद्दल खातरी मागितली. ते समई किले वल्लभगड व कसबे सोनापूर हा तनखा त्रींबकराव आणा हेरवाडकर याजकडे पेशवेकडून होता तो हेरवाडकर यानी आपले नि।। भैरवराव मंगेश सीपुरकर यास भवानगडचे धंदेत सोलापुरास ठेविले होते. भैरवराव म्हणणार हे कसबे नेसरी नजीक मौजे शिपुर येथे बहूत दिवस राहील होते. नेसरीकर शिंदे याणी शिपूर हा गाव भैरवराव यांजकडून इनाम चालविला होता. सदरहु मशार निले राजाज्ञा यांचे स्वारी बराबर भवानगडास गेले होते. राजाज्ञा याणी भैरवराव यास जामीन खात्री देऊन रखमाजी भोसले यास तेथे लष्करात आणोन त्याच्या व यांच्या भेटी जाहाल्या. नंतर लष्करात डेऱ्याकडे जावयास निघाले. तेव्हा भो।। यास डोक्यावर वार मारला उपरातीक त्याचे लष्कर दरोबस्त लुटून तुरूक वाडीचे ठाणेतील तोफासुद्धा घेऊन नेसरीकर आले. तेथे रखमाजी क्षो।। यांचे धनकले तुरूक वाडीच्या तोफा सामानगडास ठेवून राजाज्ञा करवीरास गेले या प्रमाणे सन तीसा मयातेन साली.



लेखांक : १११

तोरगल : ३२ / इ. स. १८०८-१८०९

तीर्थस्वरूप राजेश्री सेना खासकील बाबा वडिलांचे शेवेशी आपत्य सकल सौभाग्यादी संपन्न वज्रचुडे मंडीत जीजाबाई साहेब व सकल सौभाग्यादी संपन्न वज्रचुडे सईबाई साहेब दंडवत विनंती आगत्य कुशल ता।। छ २५ माहे शोवाल पर्यंत वृत्त यथास्थीत असे. विशेष ईकडील मजकूर राजश्री नारायणराव घोरपडे हे राजेश्री सिदोजीराव नाईक निंबाळकर यासी मिळोन स्वार व लोक व पेंढारी ऐसा जमाव करून हुजूरचे प्रांतात व सेनापतींचे तालुकेत उपसर्ग करून ठाणे पटणकुडी व राजापूर व वालकी व चिकलव्हाळ येथे ठाणी घातली आणि कसबे लाटेवर शहा दिला. हुजूरचे प्रांतातील गुरे वळली व लुटालुट ही केली. सुभा चिकोडी येथील पेट मरळी नित्यांनी पेंढारी तालुकेत फिरत आहेत. तसेच राजेश्री बयाजी शिंदे यानी दडीत ठाणे घातले. पटवर्धन व ईचलकरंजीकर व वंटमुरीकर व तेलसंगकर व गुडध्या बेरड व कित्तुरकर यैसे सामील होवून दंगा आरंभीला आहे ये विषयीचे वर्तमान परभारे आपले ऐकणेत आलेच असेल. हुजुरची स्वारी तुर्त घाटावरी येत नाही. ईकडे तो या प्रकारचा आरंभिला आहे. आपला तो निश्चय की, हुजूरचे प्रांतास व हुजूर कोणे समई आडचण ते क्षणी जमावसुद्धा हाजीर आहे म्हणोन. याप्रकारे आपले पत्र आले. त्यावरून निवेदनात आले. अशास येविषयीची खातरजमा आपण करावी ऐसे नाही आणि येथून उपरोधीकपणे लिहून कळवावे यैसेही नाही. तरी हालीचा हली मानीचा प्रकार या प्रमाणे आहे. तरी पत्र पावेत ते क्षणी पोख्ता जमावसुद्धा रात्रीचा दिवस करून किल्ले सामानगड तालुक्यातुन सत्वरी करवीरास येवून पोहचावे. आजी-पर्यंत हुजुरचे आज्ञेच्या लक्षानुरूप सेवा करून दाखवीत आला त्यासी हुजुरची स्वारी येथे नसता लिहिले अन्वये येवून मनोदयानुरूप काजकाम करून दाख-विलेस यातच विशेष. ये विषयी वडिलास विशेष लिहून कळवावे ऐसे नाही. बहुत काय लिहिणे. लोभ करावा हे विनंती.



लेखांक : ११२

निवडी : ३८७ / ता. २४ ऑगस्ट १८०९

समस्त सेना धुरंधर विश्वासनिधी राजमान्य राजेश्रीं राणोजीराव घोरपडे सेनापती यासी आज्ञा केली ऐसीजे. त्रिंबकजी डेंगळा इंग्रज बहादर याचे कैदेतून पळून बंड करीत फिरतो. याज करिता इंग्रज बहादूर याणी राजश्री बाजीराव पंडीतप्रधान यांची पत्रे तालुके तालुकेस घेतली. त्या पैकी एक पत्र (फाटले आहे) निवेदनार्थ पाठविले. त्याची (फाटले आहे) नक्कल आपणाकडे पाठविली आहे. त्यास आपले तालुक्यातील कोणी लोक डेंगळा मजकूर याजकडे गेले असलेस त्यास आणवून घेवून हुजूर विनंती पत्री लिहून पाठवावे. गेले लोक न आलेस तालुके अन्वये त्याचे पारिपत्य हुजुराने होईल. तरी आपण तालुकेतील लोकांचा शोध करून तालुके अन्वये बंदोबस्त करावा जाणीजे. सु॥

आसर मयातेन अलफ रा. छ, १२ रजब बहूत.



लेखांक : ११३

निवडी : ४५५ / ता. २२ नोव्हेंबर १८०९

चिरंजीव राजश्री सदाशिव आनंत यासी आशिर्वाद किल्ले भूदरगड हुजुरून हुजरे व कारकून व लोक आलेत त्यांचे स्वाधीन करून तुम्ही निघोन येने म्हणून विनंती पत्र तुम्हास पाठविली आहेत. त्याप्रमाणे हुजरे कारकून व लोक यांचे हवाली किल्ला जखीर सुद्धा करून हुजरे व कारकून यांची पावती घेवून तुम्ही लोक सुद्धा निघोन येणे. दिकत न करणे. र॥ छ १२ माहे सु॥ आशिर मयातेन व अलफ. बहूत काय लिहणे. के आशिर्वाद.

छ. १३ माहे सवाल.



लेखांक : ११४

निवडी : २४७७६ / इ. स. १८०९–१०

राजेश्री सदाशीव माणकेश्वर यासी आज्ञा केली ऐसीजे आम्हा विषयी

तुमचे मनात संशय आले याजकरिता त्रिंबकजी डेंगळा याची खातर जमा केली आहे तो तुमची खातरजमा करील. आम्हाविषयी पुन्हा संशय तुम्ही आणू नये. इकडून राया विषयी संशय काही एक नाही. राया विषयी मनात संशय आणू तरी श्री कुल स्वामीची व कैलासवासी माहाराजाचे पायाची शपथ आहे. आम्हा कडील खातरजमा रायाची तुम्ही करून राव येथे सत्वर येत असे करणे. राव आम्हास सांगतील त्या प्रमाणे चालू जाणिजे. छ २१ जिलकाद.



लेखांक : ११५

निवडी : ३२९ / ता. २४ जानेवारी १८१०

श्रीमंत महाराज मातुश्री आईसाहेब यानी चिरंजीव समस्त राजकार्य धुरंधर विश्वासनिधी राजमान्य राजेश्री हैबतराव गायकवाड विश्वासराव यासी आज्ञा केली ऐसीजे साहेबांचे शेवेशीं तुम्ही विनंती पत्र पाठविले ते प्रविष्ट होवून लेखनार्थ श्रवण झाला. या मसलतीस दोन तीन शेहे अरब लोक ठेविले पाहिजेत. त्यासी बेकार अरब दोनशेहे पर्यंत निपाणीत आहेत. त्याची खातरी मानाजी जमादार याने व राजेश्री आप्पाजीराव जाधव यानी केली. याजकरिता त्यासी ठेवणेची आज्ञा झालेस ठेवितो म्हणून विनंती लिहिली. त्यासी उभयताची खातर जमा चांगली बळकट करून घेऊन ठेवावे जाणीजे. -सुमा आशर मयातेन व आलफ छ १८ माहे जिल्हेज बहुत लिहिणे तर सुज्ञ असा. (शिक्का)



लेखांक : ११६

निवडी : ३३२ / ता. २० ऑक्टोबर १८१०

राजेश्री व्यंकटराव हरिहर यानी श्रीपूर्णया नमस्कार उपरी-कोल्हापूर वकील रा. हनुमंतराव यानी म्हैसूरास आला होता. ते परतून आपले गावास जात आहे. या बराबरी कोल्हापूर श्री महालक्ष्मी देवीस एक हत्ती देवून पाठविले आहे. तरी सदरहू हात्ती व त्याचे सामान सरंजाम, घोडा, तट्ट, माणूस वगैरे नदीपार करवून पाठविणे. तेथे जावून पावलेवरी मुद्दाम जासूद जोडी बरोबरी

कागदपत्र देवून पाठवित आहे. त्यानी बरोबर आले म्हणजे कागदपत्र आणील. ते तुम्हाकडे घेवून सरकार आंची (?) वरी हुजूरास रवाना करून पाठविणेस करणे. पुन्हा तेथून कोल्हापूरचा दिवाण वगैरे मातबर गृहस्तास बोलावून घेऊन हात्ती व घोडा, तट्टू, माणूस वगैरे सामान सरंजाम सुद्धा आलीया येणे जाणेस हरकत न होईलसे, टोकरेचे हासेल न घेता नदीपार करवावून पाठविणे. जाणिजे मरकुम आश्वीन वा। ८ स्तिरवार प्रमादुत संवत्सरे व ता। छ २० माहे आक्टोबर सन १८१० इसवी.



लेखांक : ११७

निवडी ६४१९ / इ. स. १८११-१२

१ सन ईहिदे आशर मयातेन व आलफ शालीवाहन शके १७३२ राज शके १३७ प्रमादनाम संवत्सरे राजेश्री नारायणराव घाटगे बाजी नागपूर हे महाराज सरकारचे जावई. त्यानी फौज पांचच्यार हाजार घेवून कुमकेस करविरी आले. नंतर निपाणकर यांचे फौजेबरोबर माहाराज सरकारचे फौजेची व घाटगे बाजी यांचे फौजेची लढाई पाच च्यार महिने जाहाली असता निपाणकर यास जरब बसून प्रांत सुटून आला नाही. तेव्हा घाटगे-बाजी यास फौजेची खर्चाची अडचण बसून धारणी पारणी होवू लागली. ते समई हैबतराव गायकवाड विश्वासराव व घाटगे बाजी व नारायणराव पाटणकर सरलष्कर व मानसिंगराव पाटणकर वगैरे कामदार यानी श्रीबाबामहाराज यास आपले संमतात घेऊन मसलत ठरविली. जे घाटगे बाजी यांचे लोकाकडून शहरचे दरवाजेचा बंदोबस्त करणेचा वेत केला आहे. त्यास श्रीनी माहाराजास व राजाज्ञा यास आपले वाड्यात बोलावून आणावे म्हणजे दरवाजेचा बंदोबस्त करणेस घाटगे बाजी याकडील लोक पाठवितो तेव्हा श्रीनी महाराजास व राजाज्ञास बोलावणेस आपलेकडील कारकून पाठवून दिला. नंतर माहाराजांची स्वारी व राजआज्ञा श्रीचे वाड्यांत येऊन पोचले ते समई श्री आपले खोलीत बसले होते, ते उठोन बिछानेवर जाऊन निजले.

इतक्यात कारकून यानी माहाराजाची स्वारी व राजआज्ञा वाड्यात आले म्हणोन श्रीस सांगताच कारकूनास श्रीनी उत्तर सांगितले जे मला झोप लागली आहे म्हणोन विनंती कर. नंतर कारकून यानी माहाराजांचे शेवेशी येऊन विनंती

केली जे श्रीस झोप लागली आहे. आज्ञा जाहालेस उठवितो, म्हणताच जाऊन श्रीस जागे करावे म्हणोन माहाराजाची आज्ञा जाहाली. इतक्यात पदमाळेचे वेशीतील दरबान येऊन त्यानी विनंती केली जे नागपूरकर घाटगे बाजी याज-कडील लोक पन्नास दरवाजाचे चौकीस आले आहेत तेव्हा माहाराजांनी राजाज्ञा यास आज्ञा केली जे घाटगे बाजी याजकडील लोक वेशीस जावून बसणेचे कारण काय ? तेव्हा राजाज्ञा यानी विनंती केली जे स्वारी उठोन दिशेचे निमित्ये निघावे म्हणजे ये विषयीची विनंती वाड्यात करीन म्हणोन केली. नंतर माहा-राजानी हुजरेस आज्ञा केली जे दिशेकडील तयारी करवणे अशी आज्ञा करून स्वारी निघोन श्रीचे वाडेचे दरवाजेत आली. तो श्रीकडील कारकूननी येवून विनंती केली जे श्रीची स्वारी बिछानेवर जागी जाहाली आहे. त्यास माहाराजाची आज्ञा व्हावी म्हणोन विनंती करताच आज्ञा जाहाली जे दिशेस स्वारी होऊन येणार म्हणोन श्रीस विनंती करणे, माहाराजांची स्वारी वाड्यात पोचल्यावर शहरेचे वेशीने दरबान येवून विनंती केली जे वेशीस लोक पन्नास घाटगे बाजी-कडील आले आहेत तेव्हा माहाराज सरकारचे चितांत आंदेशा आला.



लेखांक : ११८

निवडी : २२५६३ / ता. ५ जून १८११

स्वस्ती श्री राज्याभिषेक शके १३८ प्रजापती नामसंवत्सरे जेष्ठ बहुल त्रयोदशी भोमवासरे क्षत्रीय कुलावंतस श्री राजा शिवछत्रपती स्वामी यानी चिरंजीव सौभाग्यवती बाईजाबाई शिंदे यासी आज्ञा केली ऐसीजे स्वामीचे शेवेशी तुम्हांकडून विनंती पत्र येवून वर्तमान निवेदन होत नाही. तरी वरचेवरी विनंती पत्री साकल्यार्थ लिहून हुजूर निवेदन होये ते करावे. राज्याचे आफतरींचा मजकूर परभारा तुम्हास कळलाच असता आज्ञा पत्री आज्ञा होणे काय असे. अशास येविषयी हुजूरन राजेश्री दौलतराव शिंदे यांसी व तुम्हांस आज्ञापत्रे सादर जाहाली आहेत त्यास आज्ञेच्या अन्वये पत्रे पाठवून हुजूरचे तालुके हुजूर सुटून येई ते तुम्ही करावे. वरकड मजकुराची आज्ञा पत्री राजश्री नारायण नरसिंगराव यास जाहाली आहे. आज्ञेप्रमाणे तुम्हास लिहीतील त्यावरून कळेल जाणिजे.



लेखांक : ११९

निवडी : २२५६४ / ता. ५ जून १८११

स्वस्ती श्री राज्याभिषेक शके :१३८ प्रज्यापती नामसंवत्सरे जेष्ठ बहुल त्रयोदशी भोमवासरे यत्रीय कुलवंतास श्री राजा शिवछत्रपती स्वामी यानी राजमान्य राजेश्री दौलतराव शिंदे यासी आज्ञा केली ऐसीजे. स्वामीचे शेवेशी आपण विनंती पत्र छ ६ शोवालचे पाठविले ते प्रविष्ठ होवून लेखनार्थ निवेदन जाहाला. पेशजी आपले विद्यमाने सखाराम घाटगे सर्ज्याराव याही हुजुरचे तहाची याद करार मदाराची राजश्री बाजीराव पंडीत प्रधान याची करून घेतली असता राज्यावरी अफ्तरीचा प्रसंग गुदरलेला मजकूर परभारा तुम्हास कळलाच असता आज्ञा पत्री आज्ञा होणे काय आहे? अशास जाहाले नावची पत्रे इंग्रज बाहादर व बाजीराव पंडीत प्रधान व राजेश्री सिदोजीराव निंबाळकर निपाणकर यासी पाठवून हुजुरचे तालुके चिकोडी व मनोळी व रायबाग व नवा तालुका पावणे तीन लक्षाचा हुजूर सुटून येई ते आपण करावे वरकड मजकुराची आज्ञा पत्री राजेश्री नारायण नरसिंगराव यास आज्ञा जाहाली आहे. आज्ञेच्या आन्वेय तुम्हास लिहितील त्या वरून कळो येईल.



लेखांक : १२०

निवडी : १७०७४ / ता. १८ एप्रिल १८१२

श्रीमंत महाराज छत्रपती साहेब

दाम आशफाक हुं

अजी हनराबल मौंटईष्टुवारीट एल्फींष्टन साहेब बाहादुर वाद सलाम आंके येथील खैरीयेत जाणून दील ताजा करीत गेले पाहिजे. दिगर दरी आयाम माहाराज शिव छत्रपती साहेब यानी नश्वर लोक सोडून आक्षई स्वर्गवास चैत्र व॥ ८ भृगुवारी केला हे वर्तमान ऐकून चित्तास बहुत शोक व आफसोस जाहाला ऐसीयासी ईश्वर सत्तेस उपाय नाही. इतक्यात आ माहाराजांचे पत्र याच अन्वये छ २१ रबिलाखरचे पावले. त्यास भवितव्यापुढे काही चालत नाही. होणार ते जाहाले. माहाराजानी काही शोक न करावा. विवेक करून चित्ताचे सांत्वन

करावे. मृत्यू लोकीची वस्तीची हीच वाट आहे. शोक करून फळ नाही. आपण सुज्ञ आहात. ज्या प्रमाणे माहाराज कैलासवासी याचे दोस्तीचा सिलशिला मुस्तकीम जाहाला आहे, तदनुसार माहाराजांचे कामास सरकार मवसुफ मुतवजे राहील. येथे श्री भाऊ माहाराज व अजम दिनकरराव गायकवाड वकील आहेत. माहाराजांचे कामास बहुत कोशीस करीत आहेत व ईज्यानीबाकडून माहाराजांचे कामकाजास काही कसुर होणार नाही. खातर जमा असो द्यावी. रवाना छ १८ एप्रील नियादयेचे अर्ज जुमायत सन १८१२ ईसवी.

सही ईंग्रजी



लेखांक : १२१

निवडी : २४७८३ / ता. १२ जून १८१२

राजमान्य राजेश्री बाजीराव पंडित प्रधान यासी आज्ञा केली ऐसीजे ती।। मातोश्री बयासाहेब यांचा काळ माहुली मुक्कामी जाहाला तेव्हा त्याजकडील जडावी व रुपयाचे दागिने मागील यादी काढून जे दागिने होते त्याची मोजदाद बयासाहेब याजकडील कारकून व जामदार व डोलाकडील कारकून व राघोबल्लाळ जोशी याचे विद्यामाने करून तुम्ही उत्तर कार्यास दोन हजार रुपये पाठविले. माहुली क्षेत्र मोठे खासी स्वारी तेथे होती. ब्राह्मण समुदाय बहुत मिळाला खाजगी काही दागिने व भांडी डोला कडील कारकून व राघो बल्लाल जोशी याचे गुजारतीने मोडून दान धर्माची वगैरे व्यवस्था केली. त्याची याद आलाहिदा राघो बल्लाळ याचे हवाली केली आहेत. तुम्हास समजावीतील. बाकी दागिने यादीस रूजू येत नाहीत. बयासाहेब यानी खर्च केले त्याची चौकशी होणे ती जाहाल्या नंतर मागाहुन लिहून पाठवू. स्वारी किल्ल्यावर येते समई बयासाहेब याचे सेवेचाकरीची माणसे व बायका होत्या त्यापैकी कार्याकारण पाहून बायका पांच ५ व हुजूरे तीन व जामदार ऐक व देवपुजा येक कामाने दोन या प्रमाणे राघो बल्लाळ जोशी यास पुसोन आणिली बाकी खाली ठेविली. ती।। राजश्री त्रिंबकजी राजे भोवाईकर कैलासवासी महाराजाचे मागे बहुता दिवशी येथे आले त्याची रवानगी महाराज असतां खाजगी खर्चाचे सरंजामातून हजार पर्यंत होत होती त्याप्रमाणे हाली रवानगी व्हावी असे मनात आहे. हे घडविणे तुम्हाकडे आहे.

ईकडील काही मजकूर बोलावयाचे आहेत. त्यास रा।। परशराम केशव यास पाठवावे म्हणजे इकडील मजकुराची आज्ञा होईल त्या प्रमाणे तुम्हांस बोलतील जाणीजे छ २ जमादिलावर सुमा सलास आशर मयातेन व आलफ बहुत काय लिहिणे सुज्ञ असा.



लेखांक : १२२

निवडी : २४२९५ / ता. २५ ऑक्टोबर १८१२

श्रीमंत महाराज मातोश्री माईसाहेब याणी समस्त राजकार्य धुरंधर विश्वासनिधी राजमान्य राजेश्री बाजीराव पंडीत प्रधान यासी आज्ञा केली ऐसीजे. तुम्ही विनंती पत्र व चिरंजीव सौ. दुर्गाबाई यांचे फलशोभनाचे समारंभाकरिता तीनशे रुपये पाठविले. त्यास समारंभाचे काम तीनशे रुपयात कसे होते? न्यून पडल्यास येथून खर्च करावा, तर येथे भोजन खर्च व वार्षीक मोहिनी खेरीज ज्याजती खर्चास ऐवज नाही. यास्तव तुम्हास पुन्हा उत्तर पाठवून मग तुमची उत्तर येईल त्या प्रमाणे करावे तर तुमचे पत्र सोळा रोजाचे आत समारंभ करावा म्हणून आले. त्याजवरून डोलाकडून दोनशे रुपयाचा सरंजाम व कापडे तीनशेहे रुपयाचे कार्याकारिता घेऊन राघो बल्लाळ जोशी व डोलाकडील कारकून यांचे गुजरातीने खर्च जाहला. त्याची याद मजकूर निल्हे तुम्हाकडे पाठवितील. यांजवरून कळेल. येथे कोणता समारंभ सांग होणे तो करणे तुम्हाकडे आहे. जाणिजे छ १९ सवाल सु।। सलास अशर मयातेन अलफे. बहुत काय लिहिणे तरी सूज्ञ असा.



लेखांक : १२३

निवडी १९९८३ / इ. स. १८१२-१३

श्रीयासह चिरंजीव सुंदराबाई वहिनी यासी आशिर्वाद उपरी येथील कुशल त।। मार्गशीर्ष बहुल आष्टमी सौम्यवासर वर्तमान यथास्थीत असे. विशेष सरूपजी खीरसागर यासी परवाचे दिवशी इंदुवारी रात्रौ वायीचा प्रादुर्भाव होवून पहाटेचे घटका रात्रीस एकाएकी देवाज्ञा जाहली. ईश्वरे आनुचीत केले.

होणारास उपाये नाही. नित्याप्रमाणे बोलत जावून सायंकाळचे दोन घटका दिवसास माघारा आला. ते समई आलेवर हवेतील वर्तमान सांगितले. नंतर च्यार घटका रात्रौस भोजन करून आपले ठिकाणास गेला. नंतर घटकेनी त्यांचा गडी सांगत आला की, वांती होवून आंगात कापरे शिरोन बेशुद्ध जाहाला आहे, तेव्हा आम्ही व चिरंजीव राजश्री दिनकरराव गायकवाड त्याचे ठिकाणास गेलो. तो अगदी बेशुद्ध होवून बरळू लागला व वांतीही जास्तच जाहाली. त्याजवरी औषध उपाय जे करावयाचे ते बहुत केले. भावना विलक्षण दिसू लागली. नंतर तेथुन उचलून आमचे ठिकाणास घेवून आलो. बहुतच प्रयत्न केले. काही एक औषध चालले नाही. वांती व हासडे देवून पहाटेचे दहा घटका रात्रीस काल जाहाला. या प्रमाणे वर्तमान जाहालेले आपणास कळावे करितां लिहिले आहे. बहुत काय लिहिणे हे आशिर्वाद.



लेखांक : १२४

हुजूर खाजगी दप्तर : २ / ता १० नोव्हेंबर १८१३

श्रीमन्महाराज छत्रपती साहेब दाम आलताफहु अजीसबब हनराबल मौंट ईष्टुवरीट ईल्फींष्टन साहेब बहादुर बाद सलाम खैरीयेत अजयांम मशाहुद बांद आंके येथील खैरीयत जाणुन हमेशा शादमानी फर्मावीत असले पाहिजे. दीगर आमाहाराजाकडील मकतुबा छ २१ शवालचा वसुल होऊन कैफियत दर्याफ्त जाहाली. आमाहाराजानी फर्माविले की, हिंदुराव घाटगे सर्ज्याराव हे पीराचे उरुसास कागलास येणार येविषयीचा बयान लिहिला तो माआलुम जाहाला. व श्री भाऊमाहाराज व दिनकरराव गायकवाड व सरुपजी रवीसागर हुजरे वकील यानी कागल प्रांती आमाहाराज हिंदुराव घाटगे सर्ज्याराव याजकडून जप्त करणार म्हणोन जाहीर केले. त्यास कागल प्रांत आमाहाराजाचा आहे. त्याजवर दावा दुसऱ्याचा नाही यास शक काही नाही. श्रीमंत राव पंत प्रधान पेशवे बहादुर यांचे सरकारात ईज्यानेबाचे बोलणे कागल प्रांताविषयी जाहाले. त्याजवरून श्रीमंताचे सरकारातून साफ जाब सांगितला की, कागल आमाहाराजाचे आहे. ऐसी यास आमाहाराजाचे मर्जीस येईल तर हिंदुराव घाटगे याजकडे ठेवावे, नाही तर ठेवू नये. याची मुखत्यारी आमाहाराजांची आहे. आमाहाराजांचे घरचे गोष्टीत

ईज्यानेबा बोल्ह शकत नाही. लेकीन ईजानेबाची सल्लाह म्हॅणाल तर, आमाहॅाचे राजांचा मुलुख बहुत खराब जाहाला आहे याज करिता पुढे दंगा बखेडा मुलुखात होवून मुलुख खराब होऊ नये. हिंदुराव यास आमाहाराजानी बोलावून न्या- आणि आमाहाराजाचे मर्जीनुरूप त्यानी चालावे. आमाहाराज कागल त्याजकडून जप्त करतील आणि मुलुकात दंगा हंगामा होईल आणि आमाहाराजांचा मुलुख खराब होईल याजकरितां ऐसे न व्हावे ही ईज्यानेबाची सलाह आहे. याजवर आमाहाराज मुखत्यार आहेत. रा। छ १० माहे नवंबर जीयादाच अर्ज जुमायेद.

पो छ २५ माहे जीलकाद.

सही ईंग्रजी

सु।। आर्बा आशर मयातेन व आलफ दर जागा करवीर.



लेखांक : १२५

निवडी : १७७९० / ता १४ डिसेंबर १८१४

राजमान्य राजेश्री जीवनराव शिंदे यास आज्ञा केली ऐसीजे. क।। नेसरी तालुके मजकूरचे निपाणीकर यांचे दंगेमुळे हालमानी जहाली होती. त्यास सालगुदस्त इंग्रज बाहादुर यांचे विद्यमाने हुजूरची ठाणी बसली. नंतर तुम्ही साल मजकुरी करविरचे मुक्कामी हुजूर येऊन राजश्री सखाजीराव यादव यांचे विद्यमाने स्वामी सन्नीध विनंती केली की सेवकाचे हातून पेशजी पासून स्वामी सेवा घेत आले. त्याप्रमाणे पुढे सेवा घेऊन ठाणे नेसरी व गावखेडी पेशजी चालत होती त्याप्रमाणे महाराज कृपाळू होऊन चालविणे म्हणून विदीत केले. त्यावरून स्वामी तुम्हावरी कृपाळू होऊन पेशजी प्रमाणे ठाणे मजकूर व गाव दुमाला केले असेत. तरी आज्ञेप्रमाणे अनभऊन एकनिष्टपणे स्वामी सेवा करून सुखरूप राहणे. जाणिजे सु।। खमस अशार मयातेन व अलफे. श।। छ १ माहे मोहरम बहुत काय लिहिणे. शिक्का आहे.



लेखांक : १२६

राव विश्वासराव गायकवाड दप्तर : ४ / ता. २१ मे १८१४

चिरंजीव राजमान्य राजेश्री हिंदुराव गायकवाड सरखवास यास आज्ञा केली ऐसीजे – हुजूर स्वामीचे शेवेशी तुम्ही विनंती पत्र पाठविले ते प्रविष्ट होवून लेखनार्थ श्रवण जाहाला. पिकले आंबे चौदा पाठविले प्रमाणे हुजूर प्रविष्ट जाहाले. तोफा राहिलेल्या घाटावर चढवितो म्हणोन विनंती लिहिली. त्याप्रमाणे तोफा निकडीने चढवून कडगावचे मुक्कामास घेवून येणे. हुजूरचे स्वारीचे कूच होऊन स्वारी होते तरी आज्ञा प्रमाणे तोफा घेवून येणे जाणी जे. सु।। आर्बा आशरीन मया तेन व आलफ रा।। छ २१ माहे जमादिला वल हुजुरची स्वारी कडगावचे मुक्कामास जाहाली. सबब निकडीने तुम्ही तोफा घेऊन येणे. जाणिजे बहुत काय लिहिणे.



लेखांक : १२७

राव विश्वासराव गायकवाड दप्तर : ५ / ता. १४ मे १८१४

चिरंजीव राजमान्य राजश्री हिंदुराव गायकवाड ,सरखवास यासी आज्ञा केली ऐसीजे हुजूरचे शेवेशी तुम्ही विनंती पत्र पाठविले ते प्रविष्ट होवून लेखनार्थ श्रवण जाहाला. तोफेचा थोरला गाडा रवाना केला आहे. मालवनाहून देवजी तोफा आणि ते समई जाहाजातून पांच सहा तोफा घालून खाडीतून आणिताना खराड याजवळ माहागीरी तोफा सुद्धा बुडाली म्हणोन ऐकिले, त्याचे बातमीस पाठविले आहेत. बातमी येताच हुजूर सेवेशी विनंती पत्र पाठवितो म्हणोन विनंती लिहिली. त्याप्रमाणे वर्तमान येताच हुजूरचे शेवेसी विनंती लिहून पाठविणे. तोफेचे लवगण मोडुन गडी दुखविला म्हणोन विनंती लिहिली ती निवेदन जाहाली. जाणीचे सुमा आर्बा आशरीन मयातेन व आलफ रवाना छ २३ माहे जमादिलावल. तुम्ही मालवणास परभारे गेला म्हणोन हुजूरचे निवेदनात आले. त्यास हुजूरची आज्ञा नसता जाणेचे कारण काय, हे हुजूरचे शेवेशी विनंती पत्री लिहिणे. तोफा निकडीने कडगावाचे मुक्कामास घेवून येणे. जाणीजे. ता।। मशार बहुत काय लिहिणे.



लेखांक : १२८

निवडी : ३६४ / ता. १८ डिसेंबर १८१४

समस्त राजकार्य धुरंधर विश्वासनिधी राजमान्य राजेश्री भगवंतराव पंडीत प्रतिनिधी यासी आज्ञा केली ऐसीजे. राजश्री बाजीराव पंडीत प्रधान यांचा मुक्काम निपाणीस झाला आहे. याजकरिता आपणकडील स्वार व सरंजाम सुद्धा राजश्री आबाजी महादेव याज समागमे पुढे रवाना करून द्यावे. आणि मागून आपण हुजर यावयाचे करावे येविसी तीर्थस्वरूप मातुश्री बाळाबाई आक्का निंबाळकर बहादूर याणी लिहिले आहे. त्या प्रमाणे पाठवून द्यावे. जाणिजे सु॥ खमस अक्षर मयातेन व अलफ छ ५ मोहरम बहुत लिहिणे. आज्ञा व्हावी.



लेखांक : १२९

निवडी : ८१६३ / इ. स. १८१४-१५

श्रियासह चिरंजीव विजयीभव राजेश्री राजे आबासाहेब छत्रपती व चिरंजीव विजयीभव राजेश्री राजे बाबासाहेब छत्रपती यासी प्रति बाळाबाई निंबाळकर बहादुर अनेक आशिर्वाद उपरी येथील कुशल. त ॥ छ ॥ २८ माहे रजबा पर्यंत सकलवृत्त यथास्थीत असे विशेष आपणाकरीता वाडियाहून खाशे विडे समवेत रेणूसा मुलदी बाक याजसमागमे पाठविले आहेत. घेऊन पावली याचे उत्तर पाठवावे. बहुत काय लिहणे हे आशिर्वाद.



लेखांक : १३०

निवडी : १८९९ / इ. स. १८१४-१५

चिरंजीव राजेश्री दिनकरराव गाईकवाड यासी आसिर्वाद उपरी येथील कुशल त ॥ छ ॥ १६. सफर वर्तमान व्यवस्थित असे विशेष.

पुण्याहून पत्रे व थैली व दस्तक स्वारी सेवेसी आले. त्याजवरून चिंचवडचे मुक्कामी चिरंजीव राजश्री तात्या व दादा यांची रवानगी करविरास करून देऊन स्वारी निघोन पुण्यास जाणे करिता गेली. तुम्हास कळावे. येतेवेळेस

येवजाची खोट पडली तेव्हा त्या चिठीवर रुपये मिरजेस घेऊन गेलो. पुण्यास गेल्यावर आठ पंधरा दिवसी ऐवज पोहोचता होईल म्हणोन श्रियासह चिरंजीव यासी सांगावे. येविसी वहिनी यासही आम्ही पत्र लिहिले आहे. व चिरंजीव राजश्री सदाशीव अनंत बोलतील त्याजवरून कळेल. बहूत काय लिहणे हे आसिर्वाद.



लेखांक : १३१

निवडी : १५२३ / इ. स. १८१४-१५

तीर्थस्वरूप श्रीमन्महाराजे मातुश्री आईसाहेब साहेबांचे सेवेशी बालक दिनकररावाने चरणावर मस्तक ठेऊन विज्ञापना. ऐसीजे ता।। छ ६ माहे सवाल पर्यंत साहेबांचे कृपावलोकनेकरून आजतागायत यथास्थीत असे विज्ञापना ऐसीजे राजश्री पंतप्रधान याणी आपले सरंजामी काही जप्ती करावयास सांगितले त्याच्या यादित होत आहेत. त्या यादित मौजे ऐतवडेचे नाव लि।। आहे म्हणोन ऐकले त्याजवरून सेवेसी विनंती हजर लिहीत आहे. तरी मौजे मा।र संबंधी सनदा पत्रे दस्ताऐवज काय असतील ते पाठऊन देणेची आज्ञा व्हावी. म्हणजे प्रसंग पडल्यास त्याप्रमाणे बोलण्यास येईल. दरबारी कोणी सनद घेऊन आल्यास त्यास गोटात न घेता त्यांस बोलावे जे पुण्यास लिहून पाठवून तेथील उत्तर येईल त्या प्रमाणे सांगू. याप्रमाणे बोलावे म्हणोन गावकर यांस ताकीद व्हावी आणि पुणेस आम्हाकडे आम्हास लिहून पाठवणेची आज्ञा व्हावी. तर्फ मालड येथे किले भरतगडाकडून उपद्रव होतो त्यास उपसर्ग न व्हावा म्हणोन बाहादुर बोलिले त्याजवरून सेवटी लिहीले आहे. तरी भरतगडास आज्ञा झाल्यावर सादर होवून बंदोबस्त व्हावा. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.



लेखांक : १३२

निवडी : ८०९५ / इ. स. १८१५

चिरंजीव राजेश्री दिनकरराव गाईकवाड यासी आशिर्वाद उपरी येथील कुशेल जेष्ट बहूल १४ वर्तमान येस्थास्थीत असे विशेष. तुम्ही व. जेष्ट षष्ठीचे

सुभाना जासूद याजबरोबर पत्र पाठविले ते पाहून लिहला मजकूर कळले. राजश्री कृष्णराव गोपाळ तेथून काही राजकारण घेऊन इकडे आले आहेत. त्यात इत्यादीक यांचीही संमते घेऊन आले आहेत. म्हणून विस्तार करून लिहिले ते कळाले. ऐसीयासी कृष्णराव येथे येऊन कोणत्या रंगाने व तेज्याने आहेत हे आम्ही पाहतच आहो. बाहादर याची भेट म्हणावी तरी दोन वेळ मात्र जहाली. त्यात राजकारणी बोलणे म्हणून काही जाहले नाही हे पक्के समजले आहे. आम्ही बेटात गेलो होतो ते समई कृष्णराव याजविसी बहादर यासी बोललो. त्याज वरून बहादर याची मर्जी कृष्णराव याजवर कायम आहे असा अर्थ नाही. आम्ही बहादर यासी कृष्णराव याणी करविरी नसावे ऐसी हुजूरची मर्जी आहे म्हणोन सक्त बोलणे घातले आहे. व बहादुर यानीही ध्यानात घेतले आहे. असे कृष्णराव यासी समजले वरून आपले ठिकाणी बहूतच कलाफथ आहे. तेव्हा त्याणी दुसरे राजकारणाचा उद्घाट करावा हा विचार समजतच आहे. इकडील विसी काडीमात्र काळजी न करिता तेथे हुजूरचे मर्जीचा डोल कायम राखून तीर्थस्वरूप श्री याचे विचारे बोध नीट चालेल असे करावे. सारांश पेशजी लिहीले प्रमाणे थैली मात्र जलद रवाना करून घ्यावी. पत्रे येथे गृहस्थाची आली ती हस्तगत करून पाठवून घ्यावी म्हणून लिहले.

त्यास तुमचे पत्र जावयाचे पूर्वीच दोन दिवस पत्रे आली आहेत म्हणून समजले होते. त्यावरून त्या पत्राचे तलासात आहोत. तालका घेऊन पाठवून द्यावयासी येतील. तुम्ही गेले ते समई तुम्हाबरोबर स्मरणार्थ कामाची यादी दिल्ही आहे. त्या पैकी कामकाजाचा मजकूर काहीच लिहून कळविला नाही. त्यास त्याप्रमाणे बोलऊन कामे उलगडावयाची. परंतु आठचार दिवस गरबडीत गेले असतील. त्या उपरी तरी कामाचे उद्योग व्हावेत. अद्यापी नाहीत. त्याजवरून लिहीले आहे. बहूत काय लिहणे हे आशिर्वाद. ❖

लेखांक : १३३

निवडी : १३८० / ता. १९ जुलै १८१५

खासुदगी राजमंडळ दिमत चिटणीस सु॥ सीत अशर मया तेन व अलफे. माहे शाबान उर्फ आषाढ मास राज शके १४२ युवा नाम संवत्सरे यातील छ. ११ रोज सोम्यवासर.

रवानगी हैबतराव गायकवाड विश्वासराव राजश्री भगवंतराव पंडित प्रतिनिधी यांचे विनंती पत्राचा जाब : किल्ले पनाळा येथे शंभू शिका रुपयाची टांगसाळ पन्हाळी चालविली आहे. तरी गावगन्ना वगैरे कडील वसूल घेणे तो शंभू शिका पनाळी घेऊन शिबंदी वगैरे खर्च करीत जावा म्हणोन आज्ञा पत्री आज्ञा जाहली. त्यासी आज्ञेप्रमाणे शंभू सिकाची चालू करतो. परंतू शंभू सिकेची आज्ञा होऊन यावे. अगर पयादे करणे (अक्षरे फाटली आहेत.) म्हणजे शंभू शिकाची टंगसाळ मलकापुरी कडील रुपयेची हकदरसी करवितो. शंभू शिका रुपयास खुऱ्याचा म्हसात किती टंगसालवर जिनस घेऊन सावकार सराफ वगैरे येतील अभयपत्र पाठवायची आज्ञा व्हावी म्हणोन विनंती पत्री लिहले. त्या वरून मलकापूर येथे शंभू सिका रुपयाची टंगसाल चालविणेची आज्ञा जाहली असे. तरी कीले पनाळा येथील मासलेप्रमाणे खुऱ्यास बारा गुंजांची आयास घालून रुपया पाडवावा. आपण विनंती लिहिले अन्वये सराफ व सावकार व उदमी यासी पत्रे सादर जाहली आहे. पाठवून देऊन टंगसालेची आमदरफ्ती महामुरी करावी. मलकापुरी रुपयेचा शिक्का पेशजीचे आज्ञापत्रा-वरून बंद करून सिके ठेवले म्हणोन विनंती पत्री लिहले. ते निवेदन जाहले. मलकापूर येथे टंगसालेस (फाटले आहे) त आणेची (फाटले आहे) प्र॥. घेऊन टंगसाळ चालू करावी. म्हणोन आज्ञा. (अक्षरे फाटली आहेत.)



लेखांक : १३४

निवडी : १३८४ / १४ ऑगस्ट १८१५

फेरिस्त पुणे मुक्कामी असता करवीराहुन पत्रे आली होती ती खाली करवीरास रवाना सुमा सीत आशेर मयातेन व आलफ

९६	हैबतराव गायकवाड
२६	उदाजीराव घाटगे सर्जेराव
१	हिंदूराव गायकवाड
२	सरकारची आज्ञाप्रकरणी
१२५	

५९ दिनकरराव गाईकवाड
१ गोदाबाई
६ आत्माराम जाधव

६६

१९१

२ सीवाय आडीच हाजार रुपये दरमहाचे खर्चाच्या यादी

१९३

येकूण येकशे त्र्याणव कागद. भानू यादव याजबरोबर करवीरास पाठविले आहेत.

श्रावण शुद्ध १०.



लेखांक : १३५

निवडी : ३८५ / तारीख २४ एप्रिल १८१६

यादी इकडील वर्तमान सुमा सीत आशर मयातीन व आलफ

१. श्रीमंतांची स्वारी नाशकाहून सप्तश्रींगीस जाताने मार्गेस झाडीतून वाघ निघोन फौजेवरी चाल्हून घेतले. ते समयी दहा वीस मनुष्य जाया केली. काही ठार व काही वाघाचे पंजे लागून जखमी जहाले. नंतर हजारो गोळ्या उडविल्यावरी वाग ठार जहाला. मग मोजून पाहिला, तो सेपटीपर्यंत सात हात वाग लांबी भरला. पुढे सेपूट सहासात हात होते. येकूण सेपटी सुद्धा चवदा हात लांब वाघ होता. या प्रमाणे वर्तमान तिकडून येथे आलेले येकले ते निवेदनार्थ लिहिले आहे. कलम

श्रीमंताची स्वारी अक्षय तृतीयेस येणे होणार ऐसी वदंता उठली आहे.

येणेप्रमाणे ऐकले ते लिहिले असे छ. २५. जमादिलावर.



लेखांक : १३६

निवडी : ४८७६ / इ. स. १८१७ अखेर

श्रीमन्महाराज राजश्री छत्रपती स्वामीचे सेवेसी

विनंती सेवक मोरो बाजीराव चिटणीस चरणावरी मस्तक ठेवून कृतानेक सेवेसी विज्ञापना तागायत छ १७ माहे रबिलावल पर्यंत स्वामीचे कृपावलोकने करून सकल वृत्त येथील स्थिर असे. विज्ञापना ऐसीजे. इंग्रज बहादर याजकडून ऐवजाचे काम करून घेणेविसी आज्ञापत्री आज्ञा होवून आज्ञा पत्र सादर जाहाले ते मस्तकी वंदून सनात जाहलो. आज्ञेप्रमाणे बाहादर याची गाठ पडले नंतरी ऐवजाविसी बोलून मजकूर होईल तो सेवेसी विनंती पत्री लिहून पाठवितो. श्री कडूनही बाहादर यांची भीड घालोन ऐवजाविसी बोलणे बोलोन होईल ते विनंती पत्री लिहून पाठवितो. बाहादर यांचा मुक्काम काल कौलापूरावर गेला. त्याचे पिछाडीस गोखले, निपाणकर विंचूरकर, त्रिंबकजी ऐसे आहेत. काल दोन प्रहरी गोळागोळी होत होती. जासूद जोडी लष्करात पाठविली आहे. तीकडून आले नंतर विनंती पत्री लिहून पाठवितो. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.



लेखांक : १३७

निवडी : २०११५ / इ. स. १८१७–१८

राजेश्री दिनकरराव आप्पासाहेब गोसावी यासी अखंडीत लक्ष्मी आलंकृत राजमान्य राजेश्री उदाजी घाटगे सेना सर्जेराव रामराम विनंती विशेष येथील कुशल ता॥ छ १९ माहे स्वकीय लेखन करीत असले पाहिजे. विशेष आपणाकडील राजेश्री मोरोपंत चिटणीस आले. त्यांनी सर्व मजकूर समजविला. त्यावरून कळो आला. त्यानंतर हुजूराचे दर्शन त्याचे जाहले आणि घरास आले. मग आम्ही व राजेश्री दादासाहेब सर्वा येकांत रा॥ बळवंतराव चिटणीस व मोरोपंत ओटीस बसून कचा मजकूर तुम्हाकडील समजोन घेतला. व आम्हाकडील सर्वपर याही त्यास समजावून दिल्हा. त्याजप्रमाणे कित्ता ठराउन परवाचे दिवशी प्रातःकाली मोरवानी हुजूर आपणाकडील राजकारणी मजकुराची विनंती केली त्यात मर्जी कायम जाहली. त्याजवरून काल संध्याकाळी हुजूरची स्वारी बाहेर उछवाच्या

छबीनेस गेली. बराबर सर्वच गेले. व मातोश्री बाळाबाई आकासाहेबही कथेस गेल्या, नंतर राजेश्री बळवंतराव व मोरोपंत व आम्ही ओटीस होतो. नंतर तर्जमा हुजूर होउन बहुतेक राजकारनी बोलणी जरबाची मोरबाजी बोलले. त्याजवर हुजूरून आशा एकच जाहली. जे इंग्रजी राजकारने प्राण गेला तरी सोडावयाचे नाही. कोणी काही सुचविले तरी त्याचे न आईकता राजकारणाच्या धोरणेच चालोन तालुका अगर खेडे न सोडला तरी चिंता नाही. परंतु दोन्ही कडून वाद येउन राजे बुडवनार नाही ही खातरजमा असावी. याप्रमाणे कित्येक निकालस्तची बोलणी जाहली. त्याचा दकल कोठवर लिहावे. सेनापतीच्या व हित्यादीक सरंजामी यांचा रूकार पडला. आपणास तर्जमा कोना येकास दाऊ नये, म्हणून आज्ञा जाहली आहे. त्याजवरून रावजी पासीच आहे. मुख्य गोष्टी हुजूरची मर्जी तुम्हावर कायम आहे. हरघडी याद करून दुखणे खधी बरे होईल म्हणत असतात. मोरोपंत यांची खानगी चार रोजाच्या आत करोन देतो. हे तेथे आल्यानंतर आपण करवीरास यावे. अगोदर मात्र येवो नये. आला असता केल्या राजकारणास बाद येऊन सर्वपरी नाश होईल म्हणून लिहले असे. वरकड मजकूर मोरोपंतानी पत्र लिहिले आहे. त्यात सर्व तपशील आहे. त्याजवरून सर्वपरी यादी ध्यानास येईल. ते पत्र कोणास न दाखविता विसर्जेन करावे. आपले लेखनेचे भावाचा मजकूर दररोजचे रोज कळवीत जावा तेनेकरून चित्ती समाधान होईल. कळावे बहुत काय लिहणे. लोभ कीजे हे विनंती.



लेखांक : १३८

राव विश्वासराव गायकवाड दप्तर : ६ / ता. १५ जून १८१९

श्रीमंत राजेश्री बापुसाहेबांचे शेवेशी विनंती शेवक राघो मल्हार कृतानेक विज्ञापना ता. जेष्ठ वद्य ८ पावेतो साहेबांचे कृपे गजेंद्रगडचे मुकामी वर्तमान येथास्थित असे विशेष. साहेबांचा निरोप घेऊन आलीया तागाईत येकही पत्रे येऊन सांभाळ होत नाही. तेव्हा चित्त उद्वीग्न असे. हमेशा पत्री परामर्ष ध्यावया साहेब समर्थ आहा. यानंतर इकडील श्रीमंत राजश्री आबासाहेब याही येलबर्गेची मसलत केली. त्यातील कारण मोगलाईतून महमद ईदरुस खां आरब यास कोपल व रायचूर वगैरे तालुकेचा सरसुभा जाहाला. ते फौजसह वर्तमान मचुंडीचे

ठाण्यास शहास गुंतले आणि जमावही ठेवीतच आहे. हे वृत्त परभारे येकण्यात येऊन येजमान साहेब याही आपले तर्फे कुमक पाठवावी ही इच्छा बाळगून संधानास नरसो देवजी कुलकर्णी याची रवानगी करून दिल्ही. त्यानी आम्हास मसलत सांगावी. पाच पंचवीस हजार रुपये पर्यंत शिबंधीस मोबदला खर्च करून कोपलचा तालुका दरोबस्त ठाणी घेतो म्हणोन वकील याचा जबानी म।। आद्यंत ऐकून घेऊन संतोष जाहाले. आमच्या भलाईची गोष्ट दोस्ती करीता करणार त्या पक्षी दुजाई नाही असे समजून आमच्या ठाई तुम्ही अगत्य आम्ही योजिलेले कार्य तुम्ही करणार त्या अर्थी अगत्य मनसबा योजिल्या प्रमाणे सिद्धीस न्याहावे, म्हणोन आरब याणी पत्र लिहीले. त्या पत्रावरून बसपा देसाई बेळवटगीकर यास सामील घेऊन त्याच्या बुद्धीवर तालुकीयातील पायदल वगैरे सुद्धा पांचशेचा भरणा जमवून शिड्या घेऊन येलबर्गेस गेले. त्या समई मसलत कधी शिद्धीस न जाता अंगावर पेच येईल या भरीस पडू नये. त्यात मोगलाई कारस्थानी आपण बुद्धीस मच्छर जोडू नये म्हणोन विंनंती केली. ती गोष्ट चित्ताचे ठाई विपरीत मानून समक्ष बोलण्यात कच्ची मसलत करीत नाही, म्हणोन बोलोन गेले व रात्रो जमीयेत शिड्या घेऊन उभयता येजमान ठाणे मजकुरास गेले. ते अर्णोदई दाखल जाहाले. ठाण्यात जागृती होऊन गोळागोळी'जाहाली. हल्ला मुरडीला राव.... तरवारीची जखम व (?) ठार पडला व होन्या कमतगी यास दगडाचा मार लागून चहुरोजानंतर ठार. याप्रमाणे वाताहत होऊन सिड्या तेथे टाकून बेदिल निघुन आले. केलेली मसलत सिद्धीस गेली नाही. चौघात उपहास-शिवाय विरूपाक्ष गोंडा कोपळचे सुभेदार त्याजपाशी सात आठशे स्वार व आरब वीदेशी भारी सरंजाम तोफा सामान सलतन लढाऊ तयार. यास वर्तमान कळताच टाकोटाक सीबंदीचे लोक बीदेशी तीनशे बरकंदाज ठाण्यात घालून बंदोबस्ती केली. आणी दोन तोफा पाचशे स्वार व पायदळ वगैरे झुजबी सरंजामसह त्रीमलराव यास सरदार देऊन आमचे पारपत्यास रवाना केले. ते पेठेवर नीट हालचाल करावी म्हणोन मसलत करून यलगडेसे येऊन दाखल जाहाले. तेथून सदरहू मर्चुंडीकडे बाहेरील फौज महमद ईदरूसखा आरब दहा हाजारानीशी शेहास होता त्याजकडे धामधुम करावी हा बेत करून येदलडोणीच्या ठाण्यास निघून गेले. इकडे कोपळाहुन फौज येऊन स्वाऱ्या सिकाऱ्या होणार. आम्हाजवळ फौज नाही. त्यात येथील कारभार साहेबास माहीत नाहीसे नाही. आपला

घरबंद आपणा राखून नेत. इंग्रज बाहादर याचा अंमल आज पावेतो पुणीयास गेले नाहीत. साहेबाची भेट घेवून सरकारी साख सुरत राखीली नाही. त्यात हा पेच या मसलतीत गुंग होऊन राहीले. चिन्ह पाहता कोपळकर हा पैकेवान ज्यापाशी करोडो रुपये खजीना नेहमी त्यास विरुद्ध जोडीला प्रसंग केवळ कठीन. हे जाणोन महमद दईदरुस आरब याजकडे पत्र पाठविले. या समई कुमक केली पाहीजे म्हणजे उत्तम. नसल्यापक्षी आमचे स्थळास उपद्रव होतो. याप्रमाणे लिहीणी घातली.

त्याचे उत्तर आले की आम्ही येथील शह उलघडून घेऊन फौजेसह येतो. तव पावेतो तुम्हास कळेल. त्याप्रमाणे करावे असी पत्रे आली. त्यावरुन निराधारी मसलत तो केली. शिबंधी ठेवावे तर आपले घर आपल्यास दिसून येते. म्हणोन बहुतम पच्छाताप प्राप्त जाहाला. त्यास महिमन बोलाऊन आज्ञा केली. पेशजीची मसलत सांगितली होती ती विस्कुळीत करून तोंडघसी दिल्हे म्हणोन तो अर्थ ध्यानी न आणिता हे कार्य करावे. दौलतीचे साभीमानी माझे दुजे न पाहता स्वरूपाची चाड बाळगून आमचा बचाव व्हाव. आणी येलबर्गेचे ठाणे घ्यावे, असी मसलत काडावी म्हणोन बहुत प्रकारे बोध करू लागले. तेव्हा माझ्या बुद्धीस इंग्रजा व्यतीरिक्त ही मसलत साधणार नाही. असे दिसून आले. बरे असो. इंग्रज याकडे माझी रवानगी करावी म्हणजे तेथील रंग कसा बोलण्यात येतो त्याप्रमाणे पुढे कर्तव्यात आणावे विनंती केली. इतकीयात शेरीप साहेब हजार स्वारानिशी बदामीस होता त्याजकडे जाऊन भेट घेतली. हकीकत झाडून जाहीर करून फौजेसह वेणच मोठेचे (?) मुकामास आणून दाखल केले. प्रकर्णी बोलण्याचा घाट समेटात होऊन मागणी येजमान साहेबाची भेट करवीली. समक्षही निदर्शनी आणून देऊन सर्वच दुसरे दिवशी फौजेसह वर्तमान येलबर्गेस गेले.

किल्यात जमाव लढाई घ्यावी या मनसब्यात होते. हे इंग्रज बहांदर यास श्रवण केले. त्या समई आपण किल्यानजीक जाऊन हरकरेची जोडी पाठविली की तुमचा दम लढाई घ्यावी. आसे असल्यास त्याप्रमाणे येकादे सरंजाम कमी असल्या करून घ्यावा. लढाई घ्यावी. नसल्या कौल देतो. जिवानीशी व हत्यारसह निघून जावे. सरकारी किला सरकारात हाजर करावे. याप्रमाणे सांगून पाठविले. त्याजवरून किलेतील सुभेदार व लोक नि॥ जमादार घाबरे होऊन हुजूर आले. हत्यारासह जातो म्हणोन कौल घेऊन किलेची कुलपे पुढे ठेऊन निघून गेले.

किला छ १४ माहे हस्तगत करून घेऊन श्रीमंतास दिल्हे, ते ठाणे निशाने लागली. मसलत शिधीस गेली. आणी इंग्रज सामील जाहाला म्हणोन चिताचे ठाई बहुतच खुषी जाहाली की, शिंधु भरते प्रीथ्वी आलेला कींवा चकोर पक्षी ज्याचे अती हर्षनीर्भरे होऊन वृंदावनी गौनार्थ कल्पून पुनस्तब्दरुपी राहीले. पुन्हा बाहेर येऊन इंग्रज बहादर यास निरोप ध्यावा हे न जाहाले. भ्रमस्तंभी नीघून गेले. आपण उभयता किल्ले मा।री राहून गावामध्ये मनस्वी लुट करून गावे खराब केले. हे वर्तमान महमद ईदरुसखां बाहादर यास कळून त्यानी पत्रे पाठविले की तुम्ही किलेत न राहाता गजेंद्रगडास असावे. तेथील बंदोबस्त चांगला राखावा. याप्रमाणे लिहीणेत आली असता पुन्हा जमाव पायदळ येऊन मनस्वी गोंधळ करू लागले. बेकायदा व्यवहार येकात येक नाही. असे होऊन शेवट आरब याचा शब्द तालुका झाडून खराब केला. शिवाय पन्नास साठ हजाराची नासाडी केली. कौलाने ठाणे इंग्रज याणी घेऊन भरले घर तुमच्या स्वाधीन केले असता असे करू नव्हत या बोलण्यात फासा घालून तीस हजार रुपयेचे पेचात आणिले. पठाणांची सोबत. त्यात महमद कनकगिरीकर हा पदोपदी गैरवाका समजवीणार. अगोदर यलबर्गे ठाणे घ्यावे, घोरपडे महा हारामजादे, असे सांगून ठाणे घेण्याविसी दोन तोफा व सरंजाम देऊन पाठविले तेव्हा अनिर्वाहपक्ष जानोन ठाणे दिल्हे. सदरहु ये मसलीताचे भरास पडून आमची गोष्ट न येकीता पेचात आले. त्या आलीकडे पुणीयाहून ईलफिंस्तन साहेब तालेकोटचे मुकामी आले. बदामीस दोन रोज होते. तेथे माझी रवानगी केली होती. इंग्रज बहादर यांची भेट घेऊन थैलीचे पत्र पोहचऊन बोलणे केले. त्यातील पर्याह पत्री लिहीता नये. गौरवाने येजमानास भेटीस घेऊन येतो म्हणोन आलो तो येथील मजकूर सुस्तीनी घेतोपर्यंत स्वारी पुणीयास जावया गेली. याजवर निघतील तर बहूतच कामे निघून येतात. नसल्या कठीण आहे. दौलतीचे अगत्य कोनासच नाही. कैलासवासी बाबासाहेबांचे पोटी जन्म घेतल्याचे काही हीर्शा बाळगावी. दौलतवंत म्हणोन घेणार पुणीया प्रांतात कोणी राहीले नाहीत. तुम्ही पुण्यशिल. बुद्धीस मच्छर न जोडीता येक वेळा आपण येथे पर्यंत यावे. अथवा तेथून पुणीयासी निघावे. याची मसलत काडावी. निघत असल्यास त्वरा करावी. नसल्या आपली मर्जी. होणारास उपाय नाही. विषाची परीक्षा करू नये. यांत सर्व समजले पाहिजे. बहुत काय लिहू शकत नव्हे. हे विज्ञापना.

ताजा कलम. इटगे मोगलानी फीतूरीने घेतले. वर्तमान कळलच असेल. उभयता बंधू येकरूपी नाहीत. खटला वारसा दिसतो. बुधी गेल्या आपणही बीनबुद्धी होऊ नये. हे विज्ञापणा.



लेखांक : १३९

राव विश्वासराव गायकवाड दप्तर : ७ / ता. ४ जुलै १८१९

राजेश्री हैबतराव गायकवाड विश्वासराव दादा यासी आखंडीत लक्ष्मी आलंकृत राजमान्य स्नेहांकीत चिंतामणराव पांडुरंग आशिर्वाद विनंती उपरी येथील कुशल जाणून स्वकीय कुशल लिहित जावे. विशेष संतु जाधव कसबे सांगली याने विदीत केले जे माझे बायकोस मल्हारी सेळका याने फिताऊन लाऊन दिली. ती जाणून आपले माहेरी कोथळी येथे राहिली. मागाहून सेळकाही जाऊन तेथे राहिला. महिना पंधरा दिवस कोथळीस होते. नंतर माझे सासऱ्याने माझे बायकोस व सेळका यास एक जागा धरून सरकारांत नेले. तेथून दोघे पळून जाऊन तीरपाळे येथे राहिले होते. हाली येवून कोथळीत राहिले आहेत. म्हणोन त्यावरून लिहिले आहे. संतु जाधव यांचे बायकोस व मल्हारी सेळका यांस आणावयास येवून प्यादा पाठविला आहे. तर त्याचे बरोबर माणसे देवून बंदोबस्तीने सांगलीस पोहचनेस ध्यावे. सेळका मजकूर चिरंजीव राजेश्री दाजीबा वैद्य भाचे याकडे चाकरीस होता. त्याचा काही ऐवज चोरून नेला आहे. त्याचाही सालबाज जाहाला पाहिजे. यास्तव बंदोबस्तीने पोहचवून ध्यावा. रा॥ छ ३० रमजान बहुत काय लिहिणे हे विनंती.

पो छ १८ रमजान आशरीन मयातेन व आलफ.



लेखांक : १४०

निवडी ४५६ / ता. ३१ जुलै १८१९

तीर्थस्वरूप श्री भाऊमहाराज वडिलांचे सेवेसी

अपत्य शुंभराजे छत्रपती चरणावर मस्तक ठेवून कृतानेक सेवेसी विज्ञापना ता। छ ८ माहे शोव्वल पर्यंत यथास्थीत असे. विज्ञापना ऐसीजे.

हुजुरचा किल्ला भुदरगड राजेश्री नारायणराव रत्नाकर याजकडे मामलतीने होता तो आपण जिमेस घेतला होता तो हल्ली हुजूरचा किल्ला हुजूर आपण राजश्री सदाशिव अनंत याजकडून स्वाधीन करून दिल्याप्रमाणे दरोबस्त किल्लासुद्धा हुजूर पावला असे. आपणाकडे किल्लेविषयी काही लढा राहिला नाही. सेवेसी श्रुत होय विज्ञापना.

सुमा आशरीन मयातीन आलफ शके १७४१ .... नाम संवत्सरे श्रावण.



लेखांक : १४१

निवडी : ९९६७ / ता. १ सप्टेंबर १८१९

यादी श्रीमन्महाराज मातुश्री आईसाहेब याजकडील आज्ञापत्रे चिरंजीव सकल सौ. संपन्न वज्रचुडेमंडित सईबाई यासी भाद्रपद शुद्ध द्वादशीस सोमवारी पुत्रोत्साह जाहला. या संतोषाची शर्करेची पत्रे सुमा अशरीन मयातेन व आलफ शके १४६ प्रमाथीनाम संवत्सरे

१. श्रीशंभू शिखर
१. श्री तुळजापूरनिवासिनी
१. श्री मार्तंड जेजोरी
१. प्रतापगड
१. राम वरदायेनी
१. संमत सेटी
१. सदाशिवराव जोती हूकेरी क ॥ नूल
१. आप्पाजी देसाई ता॥ चंदगड
१. विरगोंडा देसाई भडगाव
१. दुरसिंह देसाई तेरणीकर
१. सिदगोंडा देसाई बुगडेकट्टीकर
१. किले पनाळा
१. किले पावनगड
१. किले सिद्धगड
१. किले सामानगड
१. किले भुदरगड
१. नारो गिरमाजी
१. चिमणाजी सखदेव
१. बालजी नारायण नातू
१. सदाशिव अनंत
१. निलकंठ रघुपंत देशपांडे कमतनूरकर देशपांडे
१. गुंडेराव येशवंत मलीकवाडकर प्रांत हुकेरी

१. शिवगोंडा देसाई इदरगुचीकर
१. आबाजी भीमराव देशपांडे मुतनाळकर
१. बाळाजी गोविंद निलजीकर
१. राँचौजी देसाई प्र॥ रायबाग
१. बालो तमाजी देसाई नणंदिकर
१. विठ्ठलराव शिंदे देसाई घोसरवाडकर प्र॥ रायबाग



लेखांक : १४२

निवडी : ८१५३ / इ. स. १८१९-२०

श्रियासह चिरंजीव विजईभव राजेश्री राजे आबासाहेब छत्रपती व चिरंजीव विजईभव राजेश्री राजे बावासाहेब छत्रपती यांसी अनेक आसिर्वाद उपरी येथील कुशल त ॥ छ ॥ २० रजेब जाणोन स्वकीये लिहीत जावे. विशेष आपण विनंतीपत्र पाठविले ते प्रविष्ट होऊन लेखनार्थ श्रवण जहाला. आपण विनंती पत्री लिहिले प्रमाणे राहिलेले लोकास स्वारीत येणेविसी व लुट घेऊन येतात त्यासी जाणेविसी ताकीद करविली आहे. शिड्याविषयी विनंती लिहली. त्याजवरून कोटाकडील व कारखाने कडील सिड्या रवाना जाहल्या आहेत. येऊन पोहोचतील. तोफखानेकडे शिड्या नाहीत. वरचेवरी आपणाकडील सविस्तर वृत्त विनंतीपत्र लिहून पाठवीत जावे. आणि स्वारीत बहूत बंदोबस्ताने व सावधगिरीने राहणेविसी फौजेत ताकीद करून हुशारी असावे. कळावे बहूत काय लिहणे हे आशीर्वाद.



लेखांक : १४३

निवडी : ८१५२ / इ. स. १८२०

श्रियासह चिरंजीव विजईभव राजेश्री राजे आबासाहेब छत्रपती यांसी अनेक आशिर्वाद उपरी तागायेत

छ. १५ माहे जिल्हेज यथास्थित असे विशेष. येथे लोक नाहीत. त्यास जदीद लोक ठेवावे लगतात. त्यास पोटास पाठवून द्यावे. तोफखाना रवाना केला आहे. आजी मध्ये मुक्काम होऊन उदईक येऊन पोहोचेल. तिकडील बातमी

आणोन वरचेवर वर्तमान लिहून पाठवीत जावे. तेथे फौजेचा जमाव येकंदर जाहलेवरी मग दुसरे मुक्कामास जावयाचे करावे. बालकृष्ण पागा व दिवाण पागा परभोर गेली ती येऊन पोहोंचलीच असेल. बहूत काय लिहणे हे आशिर्वाद.



लेखांक : १४४

निवडी : ८१५० / इ. स. १८२०

श्रीयासह चिरंजीव विजयीभव राजेश्री राजे आबासाहेब छत्रपती व चिरंजीव विजयीभव राजेश्री राजे बाबासाहेब छत्रपती यासी अनेक आशिर्वाद उपरी येथील कुशल तागायत छ॥ २० रजबोजर जाणोन स्वकीये लिहणे. विशेष आपण साहेबाचे सेवेसी विनंती पत्र पाठविले ते आजी प्रातः काली पाच घटका दिवसास प्रविष्ठ होऊन लेखनार्थ श्रवण जाहला. स्वामी समागमे लोक आले आहेत. त्यांचे घरी ताकीद होऊन बुणगे पाठविणेची आज्ञा व्हावी व वाणीयाचे दुकाने पाठवून देणेची आज्ञा व्हावी म्हणोन विनंती पत्री लिहीले. त्यावरून रामचंद्र शेठ पाथरे यासी दुकाने पाठवून देणेची आज्ञा जहाली आहे व स्वामी समागमे लोक आले आहेत त्याचे घरीही बुणगे पाठवून देणेची आज्ञा जाहली आहे व सिड्या पाठवून देणे विसी विनंती लिहली. त्याप्रमाणे शिड्या पाठविणेची आज्ञा जहाली आहे. येऊन पोहोंचतील. आपण वरचेवरी क्षणाक्षणाचे सविस्तर वर्तमान विनंती-पत्री लिहून पाठवित जावे. राजश्री विठ्ठलराव दिम्मत चिटणिसी या समागमे कागद दरोबस्त रवाना करून दिल्हे आहेत. कळावे बहूत काय लिहणे हे आशिर्वाद.



लेखांक : १४५

निवडी : १७०८३-८५ / ता. ३ ऑगस्ट १८२१

मकरमत आयाद आईसाहेब महाराज दाम आस्मत हु॥

नीयाजमंद मेस्तर ताकरीन साहेब बाहादुर ॲक्टिंग सरकलेक्टर व पोलीटिकल एजंट सुभा धारवाड वगैरे. नीयाज मारूज आके २ माहे जीलकाद

पावेतो नियाजमंदेची खैरीयत रोषण होवून हमेशा अलताफ नामा पाठवून सरफराज करीत आले पाहिजे हरिविला महाराज आबासाहेब छत्रपती यासी मारवाया कामाचे सल्हेत यशवंतरांव घाटगे सामील असतील ऐसे गुमान समयनेत आहे त्याचे सबबही ऐकणेत येत आहे जे

१ महाराजांनी इंतकाल करणेचे अगोदर माडीवरी बसून शिस्त मारताना घाटगेचे महालाचे खिडकीस गोळी लागली. तेव्हा घाटगे याने आपणास माहाराजांनी मारावयाचे केले होते, लेकीन आपण गोळी चालविली असता कोल्हापूर येथील तमाम लोक आफसोस व गमी होतील. ऐसे करीन, म्हणोन आम करमत आयत यास सांगून पाठविले तेव्हा, व

१ माहाराजास मारिले नंतर मोहिते यांनी, ‘ भाऊमाहाराज यांनी घाटगेचे स्नेह राखावा, नाही तर माहाराज याचे अहवाल होईल, ’ म्हणून सांगून गेले तैसे सबब

१. माहाराज मरहुम यांनी घाटगेचे सरंजाम जप्त केलेपासून घाटगे यांनी आरब वगैरे लोक जमाव केले ते सबब

१ घाटगे यांनी आपली लेकीस माहाराज मरहुम यास देणे सांगितले. त्यास माहाराज छत्रपती सातारा यास देणेचे तजवीज केले असता हरकत व्हावया जोगे केले ते सबब.

१ मोहिते यानी घाटगेचे घरास आमदरफ बहूत ठेविले होते ते सबब

ऐसे पांच सबब आहेत. म्हणून त्याजवरी गुमानी घेतात. आणि ती कैफीयेत ईजत दस्तगाह नारो गिरमाजी वकील याची जबाबी ऐकणेत आली या करिता ईलतीमास केले असे जर कोणीही मनुष्याचे पोटात जहर व सबबेने आरंमान दौलतीत किने दीलचे लोक असणेच बरोबर आहे. त्यांस काढिले शिवाय आरामी पोहचत नाही. त्यास घाटगे वगैरे कोणावरी गुमान असेल त्याची चौकशी करून बंदोबस्त होणे जरूर आहे. अगर बंदोबस्त न होईल तरी माहाराज आबासाहेब छत्रपती यास मारविले ते गुमानी असल्याची चौकशी न जाहाली याजवरून कारभारी लोकही या कामाचे सल्हेत असतील म्हणून लोक संशय घेतील आणि पुढील कामकाजाचे बंदोबस्तीस हरकत येईल. करिता या कामाबदल कुमकेस सरकार दौलत मदार यांची फौज रवाना करणेचे ईरादा

इज्यांनीबास होते. लेकीन घाटगे वगैरे गुमानी लोकास दस्तगीर करणेचे तरतुदेत आहेत व लष्करचे कुमके शिवाय दस्तगीर करतील ऐसे वकील मजकूर जाहीर केले वरून फौजेची रवानगी जाहाली नाही. सदर प्रमाणे घाटगे वगैरे कोण कोणा वरी गुमान आहे की, त्यास दस्तगीर करून ठेवावे आणि त्याजकडील लोकास किल्लेतून बाहेर करावे व किल्लेत त्याचे ईलाका असू नये व बाहेर काही बंद उभे होईनासे बंदोबस्त राखावा. गुमानी लोकास धरिले बादज त्यांची दर्याफ्त होवून लागू जाहाल्यास त्या जोगे बंदोबस्त होऊनच ईज्यानीबास खत कलमी होणेंचे आहे. परंतु ईज्यानीबाचे लिहिणे वरून ऐसे लोकांस दस्तगरि वाल बाआदज त्याची चौकशी जाहाली येथे समजे. जो पावेतो काही नसीयेतेस हुकूम होवू नये. लष्करशिवाय त्या लोकांस धरणे न होवू शकेल व कुमक जरूर असेल तरी ईज्यानीबास बहुत जलदीने आलताफनामा कलमी व्हावा. म्हणजे शिताफीने फौज पोहचवून बंदोबस्त व्हावया जोगे केले जाईल. या मादे जीयादा ईलतीमास करणे काय असे.

ता।. ३ माहे आगष्ट १२३१ फसली

सही ईंग्रजी

लेखांक : १४६

हुजूर खाजगी दप्तर : ३ / इ. स. १८२१

सेवेशी जबानी हिंदुराव गायकवाड सरखवास सेवेशी. विज्ञापना ऐसीजे– मोहिते यानी सरकारावरी दंगा केला ते समई आम्ही घरात होतो. नंतर हे वर्तमान समजताच वाड्यात आलो. उपरांत मोहिते यासी बोलणेचा तह ठरवून उठविले. ते समई बोलीस श्री भाऊ माहाराज व नारायणराव पाटणकर सरलष्कर व यशवंतराव घाटगे सर्ज्याराव व आप्पाजीराव जाधव सरनोबत व जीजाजीराव खानवलकर व आम्हास मोहिते यांचे स्वाधीन केले. नंतर मोहिते यानी आम्हा सर्वत्रास घेवून श्री भाऊमाहाराज यांचे वाड्यात गेले. तेथे दोन घटका बसलो होतो ते समई यशवंतराव घाटगे सर्ज्याराव लघवीस म्हणोन उठोन गेले. त्याज-बरोबर माधवराव मोहिते व बापुजी मोहिते हे दोघे गेले. क्षणभर श्रीचे माडीचे जिनेत उभे राहून नंतर माघार आम्ही बैसलो होतो तेथे आले आणि बापुजी मोहिते उठोन बाबजी मोहिते याचे कानात काही बोलीले. उपरांत आपले ठिका-

णास येवून बसले. नंतर बाबजी मोहिते श्री यासी बोलिले जे माहाराजीयांची आंखं उचलली नाही, तो पर्यंत कोणताही जाबसाल, आंख उचलली म्हणजे यैसीच गत आहे. त्यास आपण व यशवंतराव घाटगे सर्ज्याराव येक विचार असावे. नाहीपेक्षा हे घाटगे आपले नातेचे आहेत. पुढे बहुत आवघड आहे. हीच गत होईल. नंतर सर्ज्याराव मोहिते यासी बोलिले जे तुमचा तुम्ही जाबसाल बोला व आमचा जाबसाल तुम्ही बोलता कशास? हे जाहालेवर श्री नी मोहिते याचे बोलणेस उत्तर केले जे आम्हात व सर्ज्याराव यात फेर कोणता आहे? आम्ही व सर्ज्याराव एकच आहो. उपरांत तेथून सर्वत्र निघोन बाहेर जावयासी पदमाळ वेशीस व आदीतवार वेशीस जाऊन शनीवार वेशीस गेलो ते दरवाजेस कुलुपे जाहाली होती. नंतर माघारा परतोन श्रीचे वाड्यात आलो. आणि तेथे घटकाभर बैसोन वाड्यात दरबानाची परवानगी आणावयासी कारकून व बाळा पुजारी यासी श्रीनी पाठविले. परवानगी येई पर्यंत तेथे बसलो होतो. ते समई बाबाजी मोहिते बोलिले जे आम्हा बद्दल सर्ज्याराव याचे वाईट होवू नये. नंतर श्रीनी उत्तर केले जे तुम्हा बद्दल सर्ज्याराव यांचे वाईट काय व्हावयाचे ऐसे म्हटले. नंतर मोहिते यानी उत्तर केले जे आम्हास घालवावयासी दरवाजे बाहेर तुम्ही सर्वत्र याल ते समई सर्ज्याराव यासी दरवाजे बाहेर ठेवून तुम्ही सर्वत्र आत जाल तरी ऐसे होवू नये, ये विषयीची खात्री करावी. ऐसे बोलिले. नंतर श्रीनी उत्तर केले जे ये विषयी तुम्ही कोणते गोष्टीची चिंता न करावी. तुम्हास दरवाजे बाहेर पोहचवुन दिले नंतर सर्ज्याराव यासी आम्ही घेऊन त्याचे वाड्यात पोहचऊन नंतर आम्ही आपले वाड्यात जावू ऐसे बोलिलेवरी मोहिते यानी ये विषयी बेलभंडार उचलोन घ्यावा म्हणोन आपले पागोटे बेलभंडार सरकार वाड्यात घेतलेला काढून श्रीचे पुढे ठेविला. तो श्रीनी उचलोन मोहिते याजपासीं दिला. इतक्यात वाड्यातून दरवाजेची परवानगीही आली नंतर सर्वत्र उठोन पदमाळ वेशीने आदीतवार चावडी पर्यंत गेलो आणि चावडीचे मागील सडकावरी बैसलो. नंतर श्रीनी आरब व सर्ज्याराव नी॥ आरब व सदोबा आबा यासी मोहिते यांचे समागमे देवून लावून दिले आणि सर्वत्र तेथून निघोन पदमाळ वेशीने गावात आलो. याप्रमाणे जाहालेला मजकूर शेवेशी निवेदनार्थ लिहीला आहे.

सेवेशी श्रुत होय हे विज्ञापना.



लेखांक : १४७

निबडी : ११३१८ / इ. स. १८२१

यादी करवीराकडील वंशावळीची त॥

श्रीमन्महाराज राजाराम साहेब माहाराज छत्रपती यांचे पुत्र श्रीमन्महाराज सिवाजी माहाराज छत्रपती श्रीमन्महाराज ताराबाई याचे चिरंजीव शके १६२३ हर्षानाम संवत्सेर[1] सुमा ईसने मया व आलफ राजशक २८ त्यासाली सिंव्हासनारूढ झाले. राज्य केले ११ साल. शके १६३३ नाम संवत्सेर[2] सुमा ईसने आशर मया व आलफ पर्यंत राज्य केले.

श्रीमन्माहाराज संभाजी माहाराज छत्रपती सिंहासनारूढ झाले शके १६३४ नंदननाम संवत्सेर[3] सुमा सलास आशर मया व आलफ पुत्र राजाराम साहेब महाराज छत्रपती यांचे व श्रीमन्महाराज सौ॥. राजसबाईसाहेब यांचे चिरंजीव.

संभाजी माहाराज छत्रपती राज्य केले. ४८ वर्षे राज्याभिषेक शक ३९ प्रारंभ

१ सौ. वती उमाबाई साहेब वाडा २ १ सौ. वती आनंदीबाई साहेब वाडा १
१ सौ. वती जिजाबाई साहेब वाडा ४ १ सौ. वती सुन्दराबाई साहेब वाडा ३
तोरगलकर सिंदे यांची कन्या १ सौ. वती सकवारबाई साहेब वाडा ५
१ सौ. वती दुर्गाबाई साहेब वाडा ६ १ सौ. वती कुसाबाई साहेब वाडा ७

शके १६८२ विक्रम नाम संवत्सेर सु॥ ईहीदे सितेन मयातेन व आलफ साली संभाजी माहाराज छत्रपती याणी कैलासवास केला मार्गशीर्ष शुक्ल द्वादशीचे दिवशी राजशक ८७ विक्रमनाम संवत्सेर[4].

श्रीमन्महाराज राजश्री शिव छत्रपती सिंहासनारूढ जाहले आश्वीन शु॥ विजयादशमी रोज इंदुवार आकरावे तासी वास्तव्य किले पनाळा छ ९ माहे रबीलावल सुह्ूरसन सलास सीतेन मयातेन व आलफ शके १६८४ चित्रभानु नाम संवत्सेर[5] राज शक ८९ आगोश्वर शु॥ ५ स दत्त विधान होऊन ज्यातकर्म केले. राजश्री शाहाजी भोसले खानवटकर यांचे पुत्र श्रीमन्महाराज मातुश्री जीजाबाई साहेब यानीं वोट्यात घेतले.

१ इ. स. १७०१, २. इ, स. १७१२, ३. इ. स. १७१३, ४. १९ डिसेंबर १७६०, ५. २० नोव्हेंबर १७६२,

श्रीमन्महाराज राजश्री शिवछत्रपती महाराज यांचे जनानखानेचे वाड्याची नावे निशी बीतपशील—

१. सौ. सईबाई साहेब : तुलजोजीराव घाटगे सर्ज्यांराव कागलकर यांची कन्या
२. सौ. वती चिमाबाई साहेब : राणोजी शिंदे चावरेकर यांची कन्या.
३. आर्क वृक्ष
४. सौ. वती सकवारबाई साहेब : लक्ष्मणराव शिंदे सेना खासकील तोरगलकर यांची कन्या
५. सौ. वती उमाबाईसाहेब : मुकुन्दराव पोवार देशाई जांबोटकर यांची कन्या
६. सौ. वती सुन्दराबाई साहेब : रत्नोजीराव खानवेलकर यांची कन्या. त्यांचे पोटी कन्या व जिरंजीव श्रीमन्महाराज राजश्री राजे संभाजी महाराज छत्रपती
   १. सौ. वती आऊबाई घाटगे : राजश्री यशवंतराव घाटगे सर्ज्यांराव कागलकर यासी दील्ही आसत.
   २. बाळाबाई निंबाळकर : सुलतानराव निंबाळकर खर्डेकर यासी दिल्ही होती, परंतु राव म॥ निले यांचा काल झाला.
   ३. सौ. वती बज्याबाई घाटगे : बुधकर बाजीराव श्री नारायणराव घाटगे बाजी बुधकर नागपुरकर यासी दिल्ही आसेत.
   ४. सौ. वती येसुबाई निंबाळकर : राजश्री सिदोजीराव निंबाळकर निपाणीकर यांसी दिल्ही होती, तिचा काल झाला.
   ५. सौ. वती चिमाबाई पाटणकर : राजश्री नागोजीराव पाटणकर यासी दिल्ही असत.
   ६. श्रीमन्महाराज राजश्री संभाजी माहाराज छत्रपती. यांचा जन्म शके १७२२ रोदनाम संवत्सेर[1] वास्तव्य करवीर. फाल्गुन व॥ ८ मंदवार संध्याकाळी प्रहर दिवसास जन्म झाला. सु॥ ईसने मयातेन व आलफ राज्याभिषेक १२७
   ७. सौ. वती आकुबाई शिंदे : राजेश्री शंकरराव शिंदे सेनाखासकील तोरगलकर याचे चिरंजीवास दिल्ही आस.
७. सौ. वती अहील्याबाई साहेब : राणोजीराव घाटगे सर्ज्यांराव कागलकर यांची कन्या.

---

१. ७ मार्च १८०१,

८. सौ. वती आनंदीबाई साहेब : जानराव पाटणकर यांची कन्या
९. सौ. वती मैनाबाई साहेब : लक्ष्मणराव शिंदे सेनाखासगील तोरगलकर यांची कन्या.
१०. सौ. वती गंगाबाई साहेब : आथणेकर देसाई पोवार यांची कन्या
११. सौ. वती सकवारबाई साहेब : खंडेराव शिंदे कित्वळकर यांची कन्या
१२. सौ. वती बाई साहेब : सयाजी घाटगे मुरगोडकर यांची कन्या
१३. सौ. आनंदीबाई साहेब : धोंडोजीराव पाटणकर यांची कन्या
१४. सौ. वती कमलजाबाई साहेब : निंबाजीनाईक निंबाळकर वैरागकर यांची कन्या. त्यांचे पोटी पुत्र श्रीमन्महाराज राजश्री शाहाजी माहाराज छत्रपती यांचा जन्म छ १ माहे शोवाल सु।। खमस मयातेन व आलफ पौष शु।। ३ गुरुवार सुर्योदय प्रातःकाली जन्म जाहाला. शके १७२५ रक्ताक्षीनाम संवत्सेर करवीरी. राज्याभिषेक शक,१३१.[1]

श्रीमन्महाराज संभाजी महाराज यांचे जनानखाने वाड्याची नावनिसी –
१. सौभाग्यवती सईबाई साहेब : राजेश्री त्रिंबकराव खानवेलकर यांची कन्या. लग्न झालेवर काल जाहाला.
२. सौ. वती जीजाबाई साहेब : धारराव निंबाळकर गजेंद्रगडकरी यांची कन्या
३. आर्कवृक्ष
४. सौभाग्यवती सईबाईसाहेब : नारायणराव शिर्के यांची कन्या. त्याचे पोटी पुत्र
५. सौ. वती उमाबाईसाहेब : त्रिंबकराव खानवेलकर यांची कन्या

श्रीमन्महाराज शाहजी माहाराज छत्रपती यांचे जनानखानेची वाड्याची नावनिशी –
१. सौ. वती आंबीकाबाई साहेब : राजश्री आप्पाजीराव नाईक निंबाळकर वाठारकर यांची कन्या. काल झाला.
२. सौ. वती आंबीकाबाई साहेब : राजेश्री दौलतराव मोहिते सावंतवाडीकर यांची कन्या
३. सौभाग्यवती उमाबाई साहेब : करवीरी जीवनराव सिर्के आहेत त्यांची कन्या

श्रीमन्महाराज शिवछत्रपती याही कैलासवास केला चैत्र व।। ८ भृगुवार सायंकाळचे तीन घटका दिवसा शके १७३४ आंगीरानाम संवत्सेर[2] सु।। सलास

---

१. ३ जानेवारी १८०५, २. ३ एप्रिल १८१२,

आशर मयातेन व आलफ छ २१ माहे राज्याभिषेक १३९. राज्य साल ५१ केले. वय येकूण साल ५९ करवीरी काल झाला.

संभाजी माहाराज यांचा काल शके १७४३ आषाढ व॥ २ सोमवार[1] सयाजी बाजी मोहीते तलबीडकर गावची कटकट जाहाली सबब त्या काली बाजी याने (फाटलेले आहे) पिस्तुल चालविले. त्याकाली भुजंगराव भोसले व एक नाईकवडा व रजपुताचा जमादार (फाटलेले आहे) प्र॥ करवीरी वाड्यामध्ये आंबाबाईचे चौकांत काल जाहाला. राज्य केले वर्षे १०. वय वर्षे २१.



लेखांक : १४८

निवडी : ७७६६ / ता. ५ एप्रिल १८२२

जाहीर नामा सरकार दौलत मदार कंपनी इंग्रज बहादूर.

तमाम लोकास महशुर व्हावयाकरिता लिहिले जावे. जे सरकार श्रीमंत महाराज छत्रपती साहेब राजे सातारा यास कुंपणी सरकारातून राज्य देऊन तहनामा जहाला त्या वेळेस ऐसे ठरले होते की, मुलकाचे आबादानी दरोबस्ता करीता व महाराज व त्यांचे अहलकार लोक बंदोबस्ताचे कामास वाकब व्हावयाकरीता काही दिवस मुलकाची वहीवाट महाराजांचे नावाने व महाराज यांचे मसलतीने इंग्रजी सरकारचे सरदार करतील. त्यास हली माहाराज यांचे सरकारातून दरोबस्त वहीवाट आजपासून होत जावी ऐसे ठरले. त्यावरून उलीयेम च्यापलीन साहेब कमीशनर बहादर याणी सातारे यास येऊन महाराज यांचे दरबारात मोठे सरदार व जहागीरदार वगैरे सारे लोक जमा होऊन राज्याची वहीवाट महाराज यांचे सरकारात सुपूर्त केली असे. तरी सरदार व जहागीरदार लहान मोठे जे महाराज यांचे इलाख्यात आहेत त्यानी व तमाम रयेत वगैरे हरऐक लोकानी महाराज यांचे सरकारचे लक्ष ठेऊन त्यांचे हुकूमात वागत असावे. मोठे सरदार व जहागीरदार याणी आपआपले यासीप्रमाणे वागावे. माहाराजांचे सरकारातून या लोकास हुकूम होते वेळेस याही प्रमाणे देत जातील म्हणोन जाहीर नामा समजोन वागत असावे. तारीख छ ५ माहे एप्रील सन १८२२ इसवी



---

१. १६ जुलै १८२१.

लेखांक : १४९

निवडी : ९४८२ / ता. २५ नोव्हेंबर १८२४

शेवेशी विनंती शेवक अनंदराव त्र्यंबक व बालकृष्ण बाबुराव मुकाम बेलगाव कृतानेक सेवेशी विनंती विज्ञापना तागायत छ ३० शव्वाल पर्यंत स्वामी कृपाकटाक्षे करून वर्तमान यथास्थीत असे विज्ञापणा येसीजे स्वामी कृपाळु होऊन छ २५ चे आज्ञापत्र सादर केले ते पावले. मस्तकी वंदून सनाथ जाहलो. आज्ञापत्री आज्ञा हुजूरची स्वारी निघणेचा बेत जाहाला आहे. तुम्हास राजश्री कृष्णराव माधव यानी बेत सांगितला आहे. त्याप्रमाणे तयार करून विनंती पत्री लिहून पाठवणे म्हणोन येविशीचा मजकूर रोज गुदस्त छ २६ मिनहुचे विनंतीपत्री लिहीले आहे. त्यांजवरून निवेदनात येईल. येथून लष्करास हुकूम होऊन येकादे दिवसात कितूरचे रोखा जाणार. सेवकासी लष्करात येणे प्राप्त याजकरता येक लहान डेरा व चांदणी, उंठ फेरास सुद्धां आणी बीदेशी लोक पंचवीस व स्वार दहा आसामी दोनदोन माहे पोटगीचा बंदोबस्त करून पाठवणेची आज्ञा व्हावी. तूर्त पगच प्रकरण कुच मुकामी चौकी पाहारा जाहाला पाहिजे जानोन शेवेशी विनंती लिहीली असे शेवेशी श्रुत होय हे विज्ञापणा पो. छ ३ माहे शोबल सुमा समस आसेरीन मयातेन व आलफे.



लेखांक : १५०

राव विश्वासराव गायकवाड दप्तर : ८ / इ. स. १८२४–२५

राजेश्री हिंदुराव बाबा गायकवाड सरखवास गोसावी यासी अखंडीत लक्ष्मी आलंकृत राजमान्य स्नेहांकित नाथाजीराव चव्हाण देशमुख पो आटपाडी रामराम विनंती. येथील कुशल जानोन स्वकीये कुशल लिहित गेले पाहिजे. विशेष आपल्याकडून राजेश्री नाना आले. त्यानी म।। कळविला. त्या आलीकडे पत्र येऊन कांहीं म।। समजला नाही. राजेश्री ताल्या पाखरे येणार त्यांची बातमी पंढरीवर येवून वगैरे मजकूर सांगितला होता. त्याप्रमाणे ते येणार ते श्री पैठणास आले आणि श्री पंढरीस येतात अशा धोरणावर मार्गशिर्ष व।। ३० आमावस्येस नाना पंढरपुरास गेले होते. तेथे राजेश्री भिकाजीपंत आणा रानडे नि।। शिंदे

आलीजा बाहाद्दुर यांची भेट जाहाली. त्यासही पुढे लिहीणेत आले होते. ते राजेश्री ताल्या पाखरे येणार त्याची बडदास्त ठेवावी म्हणोन. नंतर रानडे यांचे म्हणण्यात पाच च्यार रोजात पैठणात आले. तेव्हां देखील तुम्ही राहावे, जाऊ नये, म्हणाले. त्याजवरून नाना तेथे राहिले होते नंतर मागाहून जांब गावचा पाटील श्रीचे दर्शनास पंढरीस आला त्याने सांगितले जे पैठणाहून पाखरे मजकूर जांबगावास येवून पुढे जाणार म्हणून सरंजाम होत असता पाटील मशार श्री पंढरीस येताना वाटेत त्यांची गाठ पडली. ते जांबगावास न जाता पुण्यास गेले. तेथून श्री जोतलींगाचे दर्शनास डोंगरास आधी जाणार हा मजकूर पाटील याने वरचेवर जाताना स्वारीत विचारले. त्यास समक्ष बरोबरचे मंडळीने सांगीतले आठशे सरंजामबरोबर आहे म्हणून पाटील याने पंढरीत सांगितले. तेव्हा ते ईकडे येणार हा मजकूर सविस्तर आपणास कळवावा. सबब तपशीलवार लिहिला आहे. युक्तीस येईल तसे करावे. यानंतर मालवणहून राजेश्री हैबतराव माने यानी डाकेत पत्र लष्करात आपल्या कडील मजकूराची लिहिली होती. त्याचे उत्तर महिन्या दीड महिन्यात येईल असे नानानी सांगितले होते. पत्र जाऊन त्या बेतासच आले तेव्हां तीकडील पत्रे काय आली असतील तो मशार मालवणाकडून आपल्यास कळला असेल. हल्ली त्याजकडे पत्र पाठवावे असे आपल्या विचारास आल्यास पत्र लिहून पाठविले आहे, पुढे रवाना करावे आणि तिकडील म॥ पत्र येवून कळला असला पुढे शिपाई पाठवावयाचे कारण नसल्यास ईकडे सविस्तर मजकूर लिहून कळवावे. पाखरे व माने हे आपले भेटीस येवून तसा योग असल्यास ईकडून राजेश्री नाना यास पाठवावे म्हणून आपले पत्र आल्यास पाठवून देतो. सारांश तुमचे पत्राप्रमाणे करिता येईल. रा॥ सैदुभाईस पलीकडे पाठवावयाचे जाहलेस आपला शिपाई माहीतगार सिदबा सारखा अगर दुसरा कोणी बरोबर देवून पाठवावे. आणि तटु व गडी केरूस ईकडे परत पाठवावे. वरकड मजकूर केरू सांगता कळेल. कळावे बहुत काय लिहिणे. लोभ करावा हे विनंती.



लेखांक : १५१

राव विश्वासराव गायकवाड दप्तर : ९ / इ. स. १८२५–२६

श्रीयासह चिरंजीव राजेश्री हिंदुराव गायकवाड सरखवास यासी प्रती दिनकरराव गायकवाड अनेक आशिर्वाद उपरी येथील क्षेम ता॥ छ २९ रजेब पर्यंत ईकडील वर्तमान यथास्थीत असे. विशेष. तुम्ही बापु कणेरकर व रामा यादव याजबरोबर येकूण दोन पत्रे पाठविली ती पावली लिहिला मजकूर सविस्तर कळला. येणे विषयी लिहिले त्यास हुजुरची स्वारी मिरजहून आज दोन प्रहरी शिरोळास उभा उभी येवून माघारे लगेच स्वारी जाहाली. ते वेळेस अर्ज करून निरोप मागावा तरी, 'स्वारी, घेवून तुम्ही वाडीस जाणे, आम्ही उदयीक येवून नंतर तुम्हास निरोप देवू' याज प्रमाणे आज्ञा जाहाली. त्या प्रमाणे स्वारी घेवून वाडीस संध्याकाळी च्यार घटका दिवसास येवून पोहचली. स्वारी आलेनंतर मागाहून मजकूर होईल तो लिहून पाठवितो. तीर्थरुप मातुश्री बाईसाहेब यांची प्रकृतीचा मजकूर वरचेवर लिहून पाठवीत जावे. उदयीक स्वारी वाडीस जाहाले नंतर रिनोपाची आज्ञा घेवून निरोप जाहालेस येतो. कळावे बहुत काय लिहिणे. हे आशिर्वाद. आमचे औषध सरले आहे. त्यास पुडंलीक वैद्य याजकडून औषध आणवून पाठवून द्यावे हे आंशिर्वाद.



लेखांक : १५२

निवडी : २४९९२ / ता. १ जानेवारी १८२६

यादी अकबारनिसीवरून लिहले. सुमा सीत आशरीन मयातेन व अलफे. राज शके १५२ पार्थीव नामसंवत्सरे.

छ. २१ माहे जमादिलावल मार्गशीष व॥ ८ रविवारी हुजूरचे खासा स्वारीचे केरलेहून कूच प्रातःकाली होऊन दोन घटिका दिवसात किले पन्हाळे चे मुकामास दाखल जाहली. नंतर मागाहून अजम बेबर साहेब बाहादुर हे किल्ले मजकुरास आले. त्याचे सामोरे हुजुरची स्वारी दरवाजे नजीक जाऊन बाहादूर यासी आणिले. नंतर किल्ला पाहणे करिता हुजुरची स्वारी व बहादूर यांचे जाणे होऊन किल्ला पाहून निम्मा चार दरवाजे पासून प्रहर दिवस पर्यंत पाहून माघारे आले.



लेखांक : १५३

राव विश्वासराव गायकवाड दप्तर : १० / ता. ४ सप्टेंबर १८२६

श्रीमंत सकल गुणालंकरण आखंडीत लक्ष्मी आलंकृत राजेश्री सुभानजी पीसाळ हुजुर व कासीपंत गोसावी यासी –

अखंडीत लक्ष्मी आलंकृत राजमान्य स्नेहांकीत हिंदुराव गायकवाड सरखवास रामराम दंडवत. विनंती उपरी विशेष तुम्ही पत्र पाठविले ते पावले लिहिला मजकूर कळो आला. हिंदुस्थानाहुन राजेश्री दौलतराव शिंदे याजकडून स्वार असामी २५ पंचवीस पाईचे लोक नदी उतारास येवून बसले आहेत म्हणोन लिहिले. त्यास मजकूरचे उतारास उतरून घ्यावयाचे नाही, अैसे साफ सांगावे, ऐसे हुजूरची आज्ञा जाहाली आहे. आणि दुसरे उतारास कोणते उतरतील त्याची बातमी आणून पाठवावे. ता।। छ १ माहे सफर सन सबा आशरीन मयातेन व आलफ. बहुत काय लिहिणे हे विनंती.



लेखांक : १५४

निवडी : ६६७ / ता. १३ डिसेंबर १८२६

श्रीमन्महाराज राजेश्री छत्रपती स्वामीचे शेवेशी विनंती सेवक राणोजी दळवी, नाना जाधव व हणमंत आबाजी किल्ले पनाळा कृतानेक शेवेशी विज्ञापना ता।। छ २३ माहे पर्यंत साहेबाचे कृपावलोकन करून किल्याचे व सेवकाचे वर्तमान यथास्थीत असे. शेवेशी विज्ञापना अेसीजे. साहेबी कृपाळु होवून आज्ञा-पत्र सादर केले. ते मस्तकी वंदोन सनाथ जाहलो. वाघ दोन धरून पाठविणे विषयी आज्ञा जाहाली ते क्षणी शेवकाने रात्रंदिवस हरप्रयत्न करोन वाघ धरून शेवेशी पाठविला आहे. शेवेशी प्रविष्ट जाहाले मनजे आज्ञा पत्र सादर करणार धनी मायेबाप. सर्व प्रकारे सांभाळ करणार धनी माय बाप समर्थ. शेवेशी निवेदनार्थ विनंती शेवेशी श्रुत होय हे विज्ञापना –

पो।। छ १३ माहे जमादिलावल सन सबा आशरीन मयातेन व आलफ मु।। पुणें.



लेखांक : १५५

निवडी : ८३१८ / इ. स. १८२६

खासुदगी राजखंडी दीप चिटणीसी सु।। सीत आशरीन मयातेन व आलफ राज्याभिषेक शके १५२ पार्थीव नाम संवत्सरे शके १७४७ ज्येष्ट मास रोज व।। १० मंदवार खानिगी जिवाजी जाधव हवालदार दी।। सराफ खाना आनंदराव त्रिंबक व बाळकृष्ण बाबूराव वकील यासी राजश्री राघोजीराव पाटणकर हे हिंदुस्थानातून करविरास शिंदे याजकडून नवरे पाहाणे करिता आले होत. त्यानी जाते समई करवीर येथील प्यारी कलावंतीण खडकवाली हिजला घेऊन पुणें येथे आले आहेत. त्यास शोध करवून पाटणकर याजकडून कलावंतीणीस आणुन घेणे व तसेच पिराजी निकम यांचे पुत्र बापू निकम पुणें येथे जाऊन राहिले आहेंत, त्याचा शोध करवून त्यास तुम्हापासी आणुन ठेवणे आणि हुजुरन जासुद पाठविले आहेत, त्याजबद्दल विनंती पत्र लिहून पा।। म्हणजे लोक पाठवून देणेची आज्ञा होईल. त्या लोकाबद्दल निकम यासी व कलावंतीणीस हुजूर करवीरचे मुक्कामी पाठवून देणे विषयी.



लेखांक : १५६

निवडी : ६६६ / इ. स. १८२६

याद हुजूरची आज्ञापत्र तोरगलास पाठवणेची सन सबा आशरीन

१. समस्त इतलाख लोक किल्ले तोरगल यासी आज्ञा केली अैसीजे राजेश्री शंकरराव शिंदे व लक्ष्मणराव शिंदे सेना खासकील उभयतानी हुजूर मु।। यावे ते न करिता किल्ला सोडून दिल्लीकडे निघोन गेले, म्हणोन हुजूरचे निवेदनात आले. त्याजवरून हुजूरची स्वारी किले मजकुरात येत आहे. तर तुम्ही किल्लेचे बाहेर येवून रुजू होणे. म्हणजे पेशजीप्रमाणे चालविले जाईल. हे न करिता दांडगावा करून गोळी उडविल्यास स्पष्ट मुलाईजा होणार नाही. पारपत्य करणेचे आज्ञा होईल हे समजून बाहेर येवून रुजू होणे.

१. राजमान्य राजश्री समस्त भले लोक किले तोरगल यासी आज्ञा केली ऐसिजे. सदरहू वरील मजकुराप्रमाणे तुम्ही बाहेर रुजू न जाहाल्यास स्पष्ट मुलाईजा होणार नाही. हे समजून बाहेर येऊन रुजू होणे जाणिजे.

१. ता। समस्त सनदी लोक किले तोरगल याही आज्ञा केली ऐसीजे इतलाखाप्रमाणे.

१. समस्त वाणी व उदीमदार वगैरे पेट तोरगल यासी आज्ञा केली ऐसीजे— राजेश्री शंकरराव शिंदे व लक्ष्मणराव शिंदे सेना खासकील हे किल्ला सोडून निघोन गेले म्हणोन तुम्ही हवालदील जाहाला म्हणोन हुजूरचे निवेदनांत आले. त्याजवरोन आज्ञापत्र सादर जाहले असे. तरी तुम्ही बहुत सरसा सुखरुप राहाणे. किल्ले मजकुरास हुजूरची स्वारी होत आहे. तरी तुम्ही पेठेचे बाहेर येवून रुजू होणे. किल्लेतून गोळी न उडाल्यास तुम्हास तोसीस काही येक लागणार नाही. हे समजोन सुखरुप बाहेर येवून रुजू होणे, अभय आसे.



लेखांक : १५७

निवडी : १०२४१ / इ. स. १८२६–२७

यादी पुणें मुक्कामी राजेश्री आनंदराव त्र्यंबक व बालकृष्ण बाबुराव यानी याद करावयाची सुमा सबा अशरीन मयातेन व आलफ

१. भेटीची मंडळी हुजूरचे स्वारी समागमे किती असणेची वगैरे समक्ष आज्ञा जाहली आहे. त्या अन्वये कच्ची यादी करून तपशिलवार लिहून पाठवून देणे.

१. बिलोरी सामान झाड वगैरे काय लागेल ते शोधकरून मंडप वगैरे पाहून ठेवावे.

१. फुलारी माळी यांजकडे हारतुरे गजरे वगैरे सरंजाम आहे त्यास कळोन येऊन लागेल ते पुरवणी करावी.

१. तुम्हास राहाणे करिता डेरा एक आणवून ठेवावा. स्वारी पुणे मुक्कामी होताच लष्करात आणून द्यावा आणी लस्करात वकिलानी राहावे. डेऱ्याचा ऐवज हुजूरने देणेची आज्ञा होईल. उंट सुद्धा आणावा

१. जोती निकम हूजरे व संभाजी रघुनाथ उभयतांस आज्ञापत्र सादर जाहले आहे. त्यांस जे काम जाईल ते उभयतास सांगून करवीत जाणे

१. लस्कर उतरण्याची जागा पाहाणेकरिता हुजूर कामदार येईल. त्यास जागा दाखवून त्याचे विचारे जागा कायम होईल ती मुक्रर करणे.



लेखांक : १५८

निवडी : २४९९३ / ता. ३० जानेवारी १८२७

यादी चिटनिविसी कडील बारनिसीवरून अस्सल ताडोन मजकूर घेतला तो सुमा सबा असिरेन मयातेन व अलफे छ २ माहे रजब. रोज भौमवार. बाळकृष्ण बाबूराव वकील यास कलम बंदी याद लिहिली असे.

१. राजेश्री रामराव भिमाजी अकबर निवीस हे बाहेरून गावात येणेकरिता विजापूर दरवाजेने येत होते. तो दरवाजेत अरब लोक यांची त्यांची .... रात्रौ जाहली. नंतर ते रात्री अकबर नवीस रागे येऊन महिपतराव गोपाळ पारसनवीस यांचे घरी राहिले. नंतर दुसरे दिवशी बुधवारी प्रातःकाली तेथे होवून त्यांचे हातास धरून घरास आणून घालविले. नाराजी जाहले सारखी जाहली. परंतू निल्हे काय लिहतील हे समजत नाही. तुम्हास कळावे करिता आज्ञा जाहली आहे.



लेखांक : १५९

निवडी : ६७७ / ता. २२ फेब्रुवारी १८२७

यादी कटकोलचे ठाणे हुजुरने घेतले त्याची कलम बंदी बी॥ सबा आशरीन मयातेन व आलफ

१. छ २१ रोज रविवारी मौजे हनशाल येथून स्वारीची ताटे होवून फौजसुद्धा कुच करून स्वारी निघाली. मार्गास तोरगलकर याजकडील ठाणी होती ती सुरु केली. काही गुरे ढोरे व मेंढरे मेंढरी यांजकडून आणवून पूर्व दोन तास रात्री मौजे चंदरगी येथे येणेची यादी आलाहिदा शेवेशी पाठविली आहे त्यावरून निवेदन होईल सदरहु आपसात जाहाला आहे. कलमे १

१. छ २४ रोज सौम्यवार[1] प्रातःकालचे प्रहर दिवसात तोरगलहून

(१) २१-२-१८२७,

भुजंग रामाजी न येता गोविंदराव शिंदे व नारो गिरमाजी हुजूर आले आणि गोळी तहकूब करणेची आज्ञा व्हावी म्हणोन विनंती केली. तेव्हा ठाण्यातील गोळी बंद करणे म्हणजे हुजुरने गोळी बंद करणेची आज्ञा होईल, तेव्हा मशार निल्हे ठाण्यात जावून गोळी बंद केली. नंतर हुजूरनेही गोळी बंद करणेची आज्ञा जाहाली. सायंकाळपर्यंत गोळी बंद होती. सायंकाळपर्यंत ठाण्यातून लोक न उतरता रात्री (पुढील मजकूर पान फाटलेने गेला आहे) हुजुरने गोळा बंदुख बारदार व जासुद व लोक वीस असामी असे देवून पाठविले. त्यानी गावात नेवून हुजुरे व कारकून व जासूद या त्रिवर्गास ठाण्यात नेले व लोक पेठेचे दरवाज्यात ठेविले. नंतर स्वारी ठाण्याचे सर्ज्यायेत गोळीचा मारा चुकवून ठाणेचा मारा पाहून परत मुकामास आली. कलमे

१. छ २३ रोज भौमवारी[1] बोलण्याचा फेर करून रात्री गावातील ... काढवून गोळी मारणेचा बेत करून ठाण्यात हुशारी केली. हुजुरे यांची व लोकांची गांठ पडु देईनात. असे पाहून जीवाजी निकम यानी हुजूर आर्जी पाठविली. त्याजवरून फौजेची तयारी तोफखाने सुद्धा करून कडकोळानजीक जाऊन............केल्या आणि ठाण्यासभोवते मोर्चे देवून फौज उभी राहिली. तेव्हा ठाण्यातून मोर्च्यावर गोळी उडाली. नंतर सायंकाळचे दोन तास दिवसास तोफा सुरु जाहाल्या. सायंकाळी तोरगलहून नारो गिरमाजी हुजूर येवून दरम्यान पत्र देणेची आज्ञा व्हावी. म्हणजे भुजंग रामाजीस उदयीक हुजूर घेवून येवून जाबसाल उलगडतो म्हणोन विनंती केली. त्याजवरून राजेश्री सुबराव घोरपडे हिंदुराव व कृष्णराव माधव गर्दे यांचे दरम्यान पत्र देणे विषयी आज्ञा होवून दरम्यान पत्र घेवून गेले. मोर्चे बंदीवर गोळी चालली होती (पुढील मजकूर पान फाटून गेलेमुळे गेला आहे) मुक्काम जाहला. कलमे

१. छ २२ रोज इंदुवारी[2] स्वारीची ताटे होवून फौजेची तयारी करून स्वारी निघाली. ते समई तोरगलाहून राजेश्री सेना खासकील याजकडून राजश्री गोविंदराम शिंदे व नारो गिरमाजी यानी येवून विनंती केली जे फौजेची तहकूबी आज व्हावी म्हणजे विनंती करणे ती करितो. तेव्हा हुजूरने ठाणे जिमा करणे म्हणजे तहकूबीची आज्ञा होईल, म्हणोन आज्ञा जाहाली. तेव्हा हुजूरे व जासुद व लोक देणेची आज्ञा व्हावी म्हणजे आज ठाण्यात नेतो आणि

(१) २०–२–१८२७, (२) १९–२–१८२७.

उदयीक प्रहर दिवसाचे आत ठाणे स्वाधीन करितो, ऐसी विनंती केली. त्याजवरून खाऊन गोळी सुरू केली. (पान फाटलेने मजकूर गेला आहे) .... जाहाला. नंतर मध्यरात्रीस दरम्यान देणेची आज्ञा व्हावी म्हणजे ठाण्यातून निघोन जातो, म्हणून बोलणे आलेवर हुजूरने राजेश्री हैबतराव गायकवाड विश्वासराव व खंडेराव निंबाळकर शंकरराव हवालदार (फाटलेले आहे) स दरम्यान देऊन ठाण्यातील लोकास पार करून हुजूरचे ठाणे सुरु जाहाले. कलमे.

एकूण कलमे च्यार जाणिजे छ २५ माहे रजेब



लेखांक : १६०

निवडी : ६९६ / ता. २० जुलै १८२७

श्रीमन्महाराज राजश्री छत्रपती स्वामीचे शेवेशी विनंती सेवक भगवंतराव व आबाजी कृतानेक विज्ञापना विनंती ता।। छ २५ जिल्हेज पर्यंत स्वामीचे कृपावलोकने करून सेवकाचे वर्तमान यथास्थित असे. विशेष गोखले याज कडील फौजेची व किल्ले प्रचीतगड येथील बंडवाले यांची लढाई होवून गोखले याकडील लोक माघारे सरले. ये विषयीची विनंती पेशजीचे पत्री लिहिली आहे. त्या आलीकडील मजकुर राजश्री गोपाळ जिवाजी घोलवाडकर लोक सुद्धा माघारे सरल्यावर चरणास मुकाम करून वारणे आलीकडील गाव गना मसा (पुढे मजकूर नाही)

पो।। छ १ माहे मोहरम सन समान आशरीन मयातेन व आलफ



लेखांक : १६१

निवडी : ७०४ / २ सप्टेंबर १८२७

श्रीमन्महाराज राजेश्री छत्रपती स्वामीचे शेवेशी विनंती सेवक रतनाजीराव चव्हाण हिंमत बहादर कृतानेक सेवेशी विज्ञापना ऐसीजे येथील क्षेम तागायत छ ९ सफर पावेतो स्वामीचे कृपावलोकन करून सेवकाचे वृत्त यथास्थित असे विज्ञापना ऐसीजे इचलकरंजीत पेंडारी व स्वार शे दीडशेहे जमला आहे म्हणून बातमी आली. त्याजवरून सेवेशी निवेदनार्थ विनंती लिहिली आहे. आम्ही आज

बारवाडची नदी उतरून निघोन गेलो. वडगांव नी।। स्वार सनदी आद्यापी आले नाहीत. पाठवून देणेची आज्ञा व्हावी.

सेवेशी श्रुत होय हे विज्ञापना.

पो।। छ ११ माहे सफर भाद्रपद मास सन समान आशरीन मयातेन व आलफ मु।। लस्कर नजीक कोटीतीर्थ.



लेखांक : १६२

निवडी : २०४२८ ते २०४३१ / इ. स. १८२८

वंशावळ : मूळ पुरुष जिवाजी शिंदे हे बेदरीकर पाटील श्री करवीर मुक्काम.

हुजुर श्रीमन्महाराज केलासवासीं शाहू माहाराज याजपासी होते तेंव्हा कर्नाटकात मोगलाई राज्य होते. तेंव्हा मोगलाई सर करणेस्तव सचीव मर्जील मिराखोर सरकारचे पागे उभयतास चाकरी सांगोन बरोबर फौज देवून रवाना केले. तेंव्हा जिवाजी शिंदे मर्जील मिरा-खोर हे उभयता बरोबर होते. उभयता रवाना जाहालेनंतर वाटेस दुखणे येवून मर्जीले मिराखोर देवाज्ञा जाहाले. तेंव्हा फौजेत पेशित सरकार चाकरी करून राहावयाजोगे नाहीत, शिंदे मात्र मोठे मर्द माणूस चाकरी करणार आहेत, म्हणोन सचीव याणी विनंती पत्र लिहून पाठविले. त्याजवरून शिंदे यासी वस्त्रे देवून कर्नाटक प्रांती मर्जील मिराखोर याचें दिमतीचे पागेचे लोक शिंदे यांचे स्वाधीन घेवून जाणेविषयी आज्ञा आली. त्याजवरून सरकार चाकरी कबूल करून आज्ञा मस्तकी वंदून लोक व पागा बरोबर घेऊन सचीवसह कर्नाटकात गेले. तिकडे मोगलाई होती तेथे स्वाऱ्या शिकाऱ्या करून आणखी जाजती लोक ठेवून तोरगलचे किल्ल्याची रस्त बन्द केली. सचीव याणी बुदबालगड व नरगुन्दगड या दोन्हीची रस्त सचीव याणी बन्द केली. तेंव्हा किल्ल्यामध्ये आन्नाचा तोटा पडला. मोगलाई किल्लेदार होते. त्यानी संधान लावले की आम्हास सीबन्दी चढली आहे तितका ऐवज दिला असता किल्ला स्वाधीन करून आम्ही जाऊ. हे संधान लावले नंतर शिंदे याणी मात्र तोरगलचे किल्लेदार यास पन्नास हजार रुपये देवून तोरगल किल्ला आपले स्वाधीन करून घेतला. सचीव यानी शिबन्दी खर्च किल्लेदारास देवून बुदबालगड व नरगुन्दगड हे दोन्ही घेतले.

शिंदे यानी तोरगलात राहून जागा कायम करून स्वारी शिकारी कर्नाटकात करू लागले. नरगुन्द येथे सचीव करू लागले. तोरगल हा जागा बहुताक डोंगर व उष्णकाली तापतो. घोड्यास जागा मानत नाही. व माणसासही नीट मानत नाही सबब हे जाणोन नवलगुन्दकर देसाई यांचा उमली हा गाव को।। सिंदोगी खाले खेडे त्याजवळून मागोन घेऊन देसाई यासी मोबदला तोरगला खाले खेडे नरसापुर आहे ते दिले. मग तोरगलास आपले निसबतीचा किल्लेदार नरसोजी शिंदा यासी ठेवून आपण मनोळी येथे राहून किल्ला खंदक खांधून बांधला आणि किलेत आपलेस घर राहावयासी बांधले आणि कुटुंब मुले माणसे तेथे ठेवून आपण स्वाऱ्या शिकाऱ्या करू लागले व नवलगुन्दकर देसाई यासी लढून जेरीस आणोन किलेत गावोगावची लिहून घेऊन चवथाई अमल बसविला. मनोळीहून तुंगभद्रेपर्यंत स्वाऱ्या करण्यास पला लांब पडतो सबब ईनाम शेते नवलगुन्दकर याजपासून घेतली. त्यामध्ये गाव पडेसुर बांधले. तेथून ही पला लांब पडू लागला. सबब शिरट्टीकर देसाई याजपासून गांव कुन्डलीक कवाड ईनाम करून घेतल्यानंतर सावनुरकर नबाब यास लढाया दोन तीन जाहाल्या· त्याचें व याचे खटले चालले होते. ईतक्यामध्ये त्याचे त्यातच घर कलाफे होऊन त्यास कैदेस ठेवण्याचा बेत केला होता. तेव्हा नरगुन्दास व मनोळीस हे वेळेस समय अम्हावर आहे या समयास आमची कुमक केली पाहिजे, म्हणोन पत्रे उभयतास आंतरंगी आली. तेव्हा मनोळी व नरगुन्द येथील कुमक जाऊन त्यांच्या शत्रूचा पराजय केला ते वेळेस कोलवाड हा गाव आमच्या वडिलास ईनाम करून दिला. नरगुन्दकरास शभली हा गाव दिला.

जिवाजी शिंदे यांचे पोटी कन्या नव्हती. तेव्हा बंधूची कन्या वोट्यात घेऊन श्रीमन्महाराज शंभु छत्रपती यासी तीन लक्ष रुपये खर्च करून लग्न करुन दिले. साहेबसुभेची वस्त्रे व जरी पटका व साहेबनोबत शिंदे मजकुर यांसी दिली.

कर्नाटकात कित्तुरकर देसाई यांचे दोन हजार राऊत व बारा हजार पायदळ येऊन त्यांची व आमची लढाई जाहाली. त्यांचा मोड झाला. ते वेळेस कित्तुर प्रांती गाव कसकलगें हा गाव ईनाम करून दिला. पुढे काही दिवसानंतर त्याचा काल जाहाला. त्याचे पुत्र त्रिंबकराव शिंदे हे मनोळी व तोरगल तुंगभद्रे पर्यंत चवथाई आनभऊन होते. नंतर त्याचाही काल जाहाला. आमचे वडील सुबराव शिंदे लहान होते. आमचे पणज्याची कळवातीण हिचा लेक मीनाजी शिंदे हाता.

तो आमची आजी लक्ष्मीबाई साहेब होती तिचे आज्ञेत राहून स्वारी शिकारी करून व कारभारही करीत होता. कारकून मुत्सद्दीही होते. तेव्हा पुढे कर्नाटकात सावसी कुन्दगोळकर त्रिंबकजी घोरपडा यानी बारा हजार फौज बाळगून राज्यात खंडण्या घेत फिरू लागले. तेव्हा त्याची प्रबलता फार जाहाली. ऐसे पाहून देसाई व पाळेगार यानी त्याजवळ फिर्याद केली की शिंदे हे राज्यात स्वारी शिकाऱ्या करून खंडणी घेऊन उपद्रव करतात. त्याचे पारपत्य करून खंडणी घ्यावी असे सर्वत्रानी सांगितले वरून फौज सुद्धा दरी पलीकडे नजीक वटनाल······· येऊन उतरले आणि बोलणेस कारकून पाठवून द्यावे म्हणोन सांगोन पाठविले वरून मनोळीहून कवठेकर राजेश्री आप्पाजी पंत यासी पाठविले तेव्हा त्याणी त्यास समजावून भेटले नंतर त्याणी सागितले कीं आम्हास खंडणी द्यावी. चाकरीस यावे. नाहीपेक्षा लढाईस उभे राहावे. असे कारकून याजपासी सांगितले. त्यानी उत्तर केले की, यजमानास या प्रमाणें म्हणतात म्हणोन समजावून उत्तर काय सांगतील त्या प्रमाणें तुम्हास कळवितो, असे सांगून माघारे आले. नंतर येऊन लक्ष्मीबाई साहेब यासी विनंती केली की, लढाई पत्करावी किंवा खंडणी घ्यावी आणि चाकरी करावी असें म्हणतात. यास काय सांगावे ? असे पुसताच आपण सदरेवर बसोन आजीसाहेब यानी पुरातन मुछद्दीना (प्रश्न) केला व मीनाजी शिंदा याशी बोलावून विचारिले की यास विचार कसा करावा ? तेव्हा सर्वत्रानी विचार करून सांगितले कीं, आम्ही हुजूर सरकार राजपागेस साहेब सुभ्याची किताबत आमची. लोकाजवळ आम्ही आजपर्यंत खंडण्या घेऊन लढाई करीत आलो. पुढे ही आम्ही सर्व मंडळ जिवंत आहो तोपर्यंत खंडणी देणार नाही; आपण डोंगरावर चांदण्या देवून बसून तमासा पहावा. आम्ही पहिलेकडेस बाजूस लढावयास जातो. असे सिध्दांत करून आप्पाजीपंत यासी लस्करात घोरपडे याजकडे सांगोन पाठविले. तेथेही त्याजकडून लढणेचा तह ठरला. नंतर दुसरे दिवशी सुर्य उदयास साहेब नोबत व जरी पटका व नऊ हत्ती घेऊन लोक पायदळसुद्धा घेऊन गेले. नंतर हातीस आंदु घालून उभे राहिले. उभे राहून त्यास सांगोन पाठविले की, तुम्ही तयार होऊन यावे, आम्ही आलो असता आम्हास दगा केला असे म्हणाल म्हणोन त्याजवरून तुम्हास सुचना केली. निघोन लढाईस यावे. शिंदा याजकडील फौज तीनशेह खासे व पाचशेह बंदुक, येकूण आठशेह पर्यंत लोक व लोकास ताकीद केली की, त्याजकडून

डोचकेत हात बसतील त्या वेळेस बार काढावे. ऐसी पायदळास ताकीद [केली]. लोक यासी पायदळ याचे बार झडल्यानंतर मी उठेन तेव्हा तुम्ही सर्वांनी उठावे, ऐसी मीनाजी सिंदा यानी सर्वास ताकीद केली.

नंतर पुढे हे लढाईस सिद्ध उभे राहिले नंतर त्रिंबकजी घोरपडे यानी डेऱ्याबाहेर येऊन पाहिले. तेव्हा त्यास भासले कीं, फौझ थोडकी आहे. म्हणोन आलक्ष करू लागले. तेव्हा आप्पाजीपंत कारकून मनोळीहून गेला होता. त्याने जाबसाल केला कीं ते थोडकें आहेत. आपण फार आहो त्यापेक्षा हल्ला करावा. आनमान करू नये. ऐसे बोलताच त्यानी तयारी करून चाल्हून घेतले. हात्तीस आंदु घाल्हून बसविलें होतें तेथपर्यंत आले. तेव्हा येकसाहा पाचशेंह नळी बंदुकीची येकदाच उडाली. तेव्हा त्याजकडील दोन आडीच शेह खासे व दोन अडीच शेह घोडेही पडले. नंतर आंदू काढून हाती चालविले. आणि लोकही उठले. आणि मारामारी केली. तेव्हा त्याजकडील फौज मोडून सहा कोस हल्ला वर गेली. नंतर ईकडील लोक जाया जखमी जाहाले होते त्यास खर्चा वेचीस देऊन बंदोबस्त केला. ईतकी ही फौज डोंगरावर चांदणी देवून मनोलीचे लोक व आजीसाहेब बसून पाहात होती. तेथून मीनाजी शिंदा यानी पन्नास खासे व पंचवीस बाणदार घेऊन जाऊन दोणी हाकेवर फौज त्याची उतरली होती, तेथे जाऊन रात्री बाण टाकून छापा घातला. तेथून ही फौज कूच करून निघोन गेलेनंतर मीनाजी शिंदा माघारी आला.

पुढें काही दिवसानंतर हिलाल मोदी खान नबाब हा खंडण्या घेत मोंगलाईतून आला तो सावनुराकडून तमाम खंडण्या घेऊन त्याचे लोक व पाळेगार बरोबर घेऊन कित्तुर प्रांती आला. तेथून गोकाककडे यावे म्हणोन चलकोणच्या वाड्यावर येऊन उतरला. तेव्हा कित्तुरकरानी इतर पाळेगार यानी नबाबास विनंती केली कीं, शिंदे हे खंडणी देत नाहीत. त्याजकडून खंडणी ध्यावी म्हणोन सांगितलेवरून त्यानी पत्र पाठविले की, कारकून बोलण्यास पाठवून द्यावे म्हणोन लिहून पाठविले. त्याजवरून आप्पाजीपंत कराडे कवठेकर यास पाठविला. त्यानी जाऊन नबाबासी भेट घेतली. नंतर नबाब यानी जाबसाल सांगितला की आम्ही या प्रांती आलो आम्हास खंडणी द्यावी असे बोलले. तेव्हा आप्पाजीपंत यानी उत्तर केले की, आम्ही राज्य छत्रपतीकडील. आम्हास खंडणी घेणेची सवय आहे, देणेची सवई नाही. येसे उत्तर केले तेव्हा त्यानी बोलले की,

लढाईस उभे राहावे. तेव्हा हे बोलले कीं, आमचे घरचे काम लढावयाचे आहे. फौजेसी चिठ्ठी रात्रीच येणेची पाठवून आणऊ किंवा प्रातःकाली उदेक आणवावे, ऐसे पुसले. तेव्हा त्यानीं सांगितले की, उदेक प्रातःकाली आणावे. ऐसे सांगताच तेथे त्याचे देखतच पत्र लिहून आजीसाहेब मनोळीस लिहिले कीं लढाईचा प्रसंग ठरला आहे. त्यास फौज तयार करून सूर्य उदयास येवून पोहचावे ऐसे पाठवून द्यावे ऐसे लिहिले. आणि नबाबास अर्ज केला की आपण जनानखान्यात प्रहर दिवसा आत राहिले असता मराठे यानी दंगा केला असे शब्द आम्हास येईल, त्यास आपण सुर्योदयास फौजेची तयारी करवावी, असे सांगोन बिराडास आले.

इकडे मनोळीस पत्र पावताच फौज घेऊन जाणेस मिनाजी शिंदा यासी ताकीद केली. त्याने रात्रीस लोकास ताकीद करून जरीपटका साहेब नोबत व हाती कोतवाल व लोक पायदळसुद्धा जाऊन पोहचले. गोटाबाहेर नोबत वाजवीत उभे राहिले. तेव्हा नबाब जनानखान्यात निजले होते. तेव्हा आप्पाजीपंत घाटगे यानी वाडाबाहेर उभे राहून हाक मारिली कीं फौज लवकरा बाहेर नौबत वाजवीत उभे आहेत. आपण स्वस्थ जनानखान्यात निजला हे काय म्हणोन ? मराठे यानी दंगा केला गफलतीने म्हणोन म्हणाल. त्याजकरिता सावध होऊन बाहेर यावे म्हणोन हाक मारिली. तेव्हा नबाब उठोन बाहेर आला आणि आपले फौजेस व पाळेगार व कितुरकर यासी ताकीद केली. तयार होईजे. तोपर्यंत प्रहर दिवस आला, नंतर नबाब आंबारीत बसले. इकडील फौज पाहिली तेव्हा दृष्टीस थोडी पडली. सबब नबाबानी कितुरकरास सांगितले की दोन हजार फौज व बारा हजार पायदळ तुमचे आहे. तुम्ही त्यासी लढाई करावी. आम्ही आंबारीत बसून मौज पाहातो. तुमची लढाई जाहालेनंतर आम्ही लढू. अशी आज्ञा जाहाली. नंतर कितुरकरांची व मनोळीकराची लढाई जाहाली. पहिलेपासून त्याजवर सरच होते. हत्ती तोंडासी देवून मनोळीकर कितुरकरावर उठले. त्याची यांची लढाई जाहाली. कितुरकर पराजय पावले. त्याचे लष्करात चिलमीस एक बंदुक जाहाली. ते नबाब यानी खुष होवून व घोडे फत्तरके, खुदाके घरके शिपाई आसे म्हणोन शाहाजने वाजवून, तुमारे हमारे दोस्ती, म्हणोन सांगोन पाठविले. मग मीनाजी शिंदे यास भेटून मदत खर्चीस देवून फौजसुद्धा बरोबर घेवून येवून गोकाक घेतली. नंतर फौज उठोन माघारी गेली.

भाऊबंद मनोळीस होते. सुभानराव शिंदे हे काही खटला करावयाचे चिन्ह दृष्टीस पडो लागले. तेव्हा त्यानी त्यास निरोप देवून मनोळीतून बाहेर पाठविले. तेथून ते श्री करवीरास छत्रपती आईसा० याजकडे आले. त्यानी भुदरगड व सामानगड व नेसरी स्वाधीन केली. आणि हिंमत बहादुर किताब दिले. सुलतानराव शिंदे हे आईसाहेब यांचे भाऊबंद यांचे चिरंजीव जीवनराव शिंदे व नरसिंगराव शिंदे व राणोजीराव शिंदे व मानसिंगराव शिंदे हे चौथे होते. मनोळी संस्थान आप्तपणा कोल्हापुरी जाहाला. सातार्‍याचाही आप्तपणा असावा असे समजोन शाहू माहाराज छत्रपती यांची कन्या अहिल्याबाई साहेब हे जीवनराव नेऊन लग्न केले.

प्रथम थोरले जिवाजी शिंदे हे कर्नाटकातून जय घेऊन आले ते वेळेस खोची व बोंद्री व वासबे हे तीन्ही गाव इनाम व ढालगावची देशमुखी याप्रमाणे सनद लिहून दिली. आलीकडे आहिल्याबाईचे लग्न जाहाले. नंतर कवळे हा गाव व अर्धी बेदरी व आणखी एक गाव सातार्‍यातून त्यास इनाम पत्र करून दिले. नेसरी नरसिंगराव शिंदे याजकडे होती. तोरगलामध्ये सेना खाजगील याचे वडील नरसोजी शिंदे यासी आमचे पोटापुरते नेमणूक करून देवून ठेविले होते. त्यास पुत्र संतान नव्हते. तेव्हा देव धर्म बहुत प्रयत्न केला. परंतु संतान जाहाले नाही. तेव्हा बहुत कष्टी होवून पायउतारा श्रीव्यंकोबाचे यात्रेस गिरीस कुटुंबसुद्धा गेले. तेथे देवाजवळ स्नान करून आडवे निजले. तेव्हा देवाचे स्वप्न जाहाले की तुमचे प्रारब्धी पुत्र नाही. तेव्हा उठले आणखी स्नान करून आडवे निजले. तेव्हा प्रार्थना करून निजले असता माकडे येवून उपद्रव करू लागली निजो देईनात. तेव्हा दिलगीर होवून देवास नमस्कार करून आपले बिऱ्हाडी येवून म्हणाले की यात्रा व्यर्थ जाहाली. काही जाहाले नाही. असे चित्तात आणून कष्टी होवून हतीराम बाबा वैरागी यांचे मठास त्यांचे शिष्य होते त्याचे दर्शनास गेले. तेव्हा त्यानी पुसले की, तुमचे चित्र पाहता आती रुदनवारी दिसता. तोंडावर कळा अगदी नाही. कष्टी जाहाले सारखी तोंडावर चर्या आहे. म्हणोन पुसीले तेव्हा त्यांनी उत्तर केले की, पुत्र संतान नाही म्हणोन पायउतारी देवाचे यात्रेस आलो. येथे कार्य जाहाले नाही. असे सांगितले, नंतर त्यांनी पुसिले की देवाजवळ गेला होता? देवाने दृष्टांत काय दाखविला म्हणोन विचारले. तेव्हा देवांनी सांगितले की, तुमचे प्रारब्धी पुत्र नाही असे सांगितले.

तेव्हा त्यांनी उत्तर केले की तुम्ही इतक्या लांब आला असता श्री देवाने असे सागावे की काय? आम्ही देवास सांगू. म्हणून त्यांनी दोन नारळ आणोन यांचे वोट्यात घातले. आणि सांगितले तुम्हास दोन पुत्र होतील. ठिकाणास जावे. तेव्हा त्यानी दोन नारळ दिले. त्यांत एक नारळ चिरला होता. एक नारळ चांगला होता. तेथून निरोप घेवून आले. नंतर दोन (पुत्र) जाहले. एक लक्ष्मणराव शिंदे. चिरला नारळ होता त्यांचा पुत्र होऊन काही दिवसांनी मेला. लक्ष्मणराव याचे पुत्र दोघे, संभाजीराव व गोपाळराव. संभाजीराव याचा पुत्र वडील सेना खासकील आबाजीराव व गोपाळराव यांचे चिरंजीव आप्पाजीराव आहेत. तोरगलचा किल्ला आमचे व तुळाजीराव सुबराव शिंदे याजकडे होता.

मीनाजी शिंदा याने बदमस्त होऊन मुसलमान लोक जवळ करून येवून मराठे यासी निरोप देवून पुढे वडिलास कैद करून मुसलमान करावीया असे याचे मत. हे वर्तमान आमचे आजीसाहेब यास समजले. तेव्हा त्यास तोरगलास पाठविले. तो तेथे गेल्यानंतर किल्लेदार यास सूचना पूर्वी होती. सबब त्याने मारिला. नंतर काही दिवसांनी किल्लेदार यास दुखणे आले. त्याचे अत्यंत आवस्था जाहाली आहे, तुम्ही येवून आपला किल्ला स्वाधीन करून घ्यावा म्हणोन आमचे तीर्थरूपास सांगोन पाठविले व पत्रही पाठविले. तेव्हा आमचे वडील जाणेस सिद्ध जाहले. तेव्हा आमचे वडिलाजवळ गृहस्थ होते त्यांनी सांगितले आपण जाऊ नये. गेला असता मीनाजी शिंदा यांची अवस्था होईल आणि तुम्हास दगा होईल. पुरतेपणे पाहून जावे. असे म्हणालेवरून आमचे वडील लहान होते. चित्तात आंदेशा आणोन राहिले. गेले नाहीत. सबब शिंदे यांचा किल्ला हलेमाजी होऊन दुसरे कोणी धनी होईल, सबब नरसोजी शिंदे यांचे स्वाधीन किल्ल्याचे कुलपाचे हात स्वाधीन केले. आणि सांगितले की, मनोळीहून खासे कोणी येतील त्याचे स्वाधीन किल्ल्याचे हात करावे म्हणोन सांगोन मेला. त्या किल्लेदार याचा वंश तोरगलात बलवंतराव शिंदा म्हणोन आहे. अद्यापी तो तेथे आहे. किल्ला स्वाधीन केला हे वर्तमान मनोळीस कळले. नंतर आमचे लक्ष्मी आजी-साहेब यानी लोक पायदळ घेऊन तेथे गेले. तेव्हा त्यांनी लढून राजगडचा किल्ला घेतला. तेथून तोफा तोरगळास लावून तेव्हा किल्ला जेरीस आला. राजगडचा किल्ला जमीनदोस्त केला. तोरगलचे किल्ल्यास गोळे मारिले. ते अद्यापी आहेत.

किल्ला जेरीस आला तेव्हा त्यांनी श्री करवीरास वर्तमान लिहून पाठविले. तेव्हा टाकोटाक श्री मन्महाराज आईसाहेब छत्रपती व छत्रपती माहाराज यांची स्वारी सुद्धा घेऊन आले. नंतर आमचे आजी साहेब व आईसाहेब यांची व सरकारची भेट जाहाली. तेव्हा आईसाहेब यांनी आज्ञा केली की मला सरकारात लग्न करून तुमचे वडिलांनी दिले. हा किल्ला तुम्ही मला आंदण दिला पाहिजे, अशी आज्ञा जाहली. ती आज्ञा मान्य करून किल्ला सरकारात दिला. त्याजखाली काही सरंजाम लावून घ्यावा म्हणोन आज्ञा जाहाली. तेव्हा बनुर खालील व गोडची खेडी लावून किल्ल्याचे खर्चास दिले. नंतर तो किल्ला देवून सेना खासकील किताबत दिली. इकडे साहेब सुभ्याची किताबत आहे. सामानगड व भूदरगड व नेसरीकर यासी हिंमतबहाद्दर यांची किताबत दिली. नंतर किल्ला देवून स्वारी श्री करवीरास गेली. सरकारची व आजीसाहेब आपले लोक मनोळीस घेऊन आले. हे मनोळीस राहिले ते तोरगलात राहिले. नंतर सरनोबती सिदाराम पडवळ यासी दिली. ते यादवाड गोकाक व कवदलगी प्रांती स्वाऱ्या करू लागले. तेव्हा कवदलगीवर लढाई करोन त्यांची गुरे घेऊन गोकाक प्रांतातून जात होते. जेवरनाल हा गाव गोकाककरांचा. तेथे हजार काटकानी येवून वाट स्वारीची बांधली. तेव्हा सरनोबत यांनी विचार केला की, अडचणीची जागा आहे. दुसऱ्या वाटेने निघोन जावे ऐसी याचना करिताच भले लोक यानी बोलिले की, एक वेळ आम्ही वाकडी वाट करून काटकास देऊन गेला असता गावोगाव वाटा बांधतील. स्वारी साधणार नाही. म्हणोन नीट त्या लोकावर उठले. ते लोक तुडवून सडे घोडेनिशी वोंगरनहाल हा गांव याचे आत घोडी घालुन आतील लोक तोडीले. स्वारी घेऊन मनोळीस आले. पुन्हा स्वारी गेली असता कोणी आडवे धावणे येईना सारिखे जाहाले. याप्रमाणे खस्त मेहनत करून तुंगभद्रेपर्यंत चवथाईचा आमल वडिलानी बसविला आणि मनोळीस होते. नंतर काही दिवसांनी आमची आजी लक्ष्मीबाईसाहेबास देवाज्ञा झाली.

आमचे वडील सुबाराव शिंदे होते. त्यास दोघी स्त्रिया. वडील मातोश्री निंबाळकरांची. धाकटी मातुश्री सितोळ्यांची. वडील मातुश्रीस संतान नाही. धाकटे बाईस कन्या दोघी व पुत्र दोघे. त्याजपैकी एक पुत्र व एक कन्या देवाज्ञा झाले. वडील कन्या घोरपडे दौलतराव याचे घरी दिली, ती आहे त्यास वंशही 'आहे. आम्ही मातोश्री यांचे उदरी साहा महिन्याचे होतो, तो वडील

देवाज्ञा जाहाले. नंतर मातोश्री यानी भुदरगड राणोजी शिंदे यांचा पुत्र वोट्यात घेण्याकरिता आणिला. तेव्हा चौघे कारभारी यानी ठरविले कीं धाकटे बाईस पुत्र जाहाला असता तो शिक्याचा धनी आणिला आहे त्यानी कारभार करून राहावे. ऐसे ठरवून वोट्यात मूल घेऊन मुरारराव शिंदे ऐसे नाव ठेविले. मग आमची मातुश्री प्रसुत होण्याकरिता मांजरीस गेली. तेथे आमचा जन्म जाहाला.

पुढें उभयता मातोश्रीस विकल्प येऊन लढाई जाहाली. आमची मातुश्री यानी मनोळी घेतली. चार पाच वर्षे अनुभव केला. नंतर थोरले माधवराव पेशवे कर्नाटकात जाणे करिता आले तेव्हा त्यास गैर समजविणारानी समजावून गावास वेढा घातला आणि तोफा लाविल्या. तटाची भिंताड जमीनदोस्त जाहाली. दोन तीन हल्ले माघारी फिरविले नंतर राजेश्री गोपाळराव (पटवर्धन) मिरजकर यांचे आमचे मातुश्री यांचा कागदोपत्री बंधुत्वाचा स्नेह होता. त्यानी मध्यस्ती करून तह ठरवून चीज वस्तू सुद्धा मातोश्रीस काढून ठाणे स्वाधीन केले. नंतर आम्हास व उभयता मिळोन मिरजेस गेलो. जितके दौलतीचे भले लोक होते ते आपल्याकडे चाकरीस ठेविले. नंतर दौलतराव हिंदुराव घोरपडे यांची व माधवराव पेशवे यांची भेट जाहाली. त्या वेळेस ते बोलले कीं, पेशवाईमध्ये कोणाचे संस्थान घेतले असता त्यांच्या कुटुंब खर्चास कुटुंबाचे बंदोबस्तापुरते दिले शिवाय नाही. असे असता शिंदे मशार निले यांचे कुटुंबांस काही नेमणूक करून दिली म्हणोन बोलिले व मजकूर ध्यानी आणुन मनोळीच्या बेहड्यातून काढून सात गावे दिली. नंतर आम्ही थोर जाहालो. सोळा सतरा वर्षाचे वयात आलो. ते राजेश्री पांडुरंगपंत तात्या (पटवर्धन) कर्नाटकात मोहीमेस गेले. तेथे लढाईत वेळेस मोड जाहाला. तेव्हा तात्यास जखमा लागोन हस्तगत जाहाले. तेव्हा आम्ही उडी टाकोन उभें राहिलो. आम्हासही जखमा लागल्या. आम्ही हस्तगत जाहालो.

त्या लढाईत राजेश्री श्रीपतराव भाऊ, बहीरजी हिंदुराव आणखी पांच सात आसामी व मातबर ब्राह्मण आसामी सापडले होते. त्यासुद्धा व आम्हास श्रीरंगपट्टणास नेले. तेथे गेल्यानंतर त्यास भेटीस नेले. हैदर नबाब यानी त्यासी पुसिले कीं, कोण कोण आहा. तेव्हा तपशीलवार नावें तात्या यानी सांगितले. तेव्हा नबाबानी उत्तर केले की, कागदोपत्री मातुश्री कृष्णाबाई शिंदे यांचे आमचे नाते बंधुपणाचे स्नेह आहे. उदेयेक त्यास भेटीस पाठवावें म्हणोन तात्यास सांगोन माघारे पाठविले. नंतर दुसरे रोजी त्याकडील सुभेदार व सरकार पागेचे

घोडे काफला घेवून आम्हास बोलवावयास आले. तेव्हा तात्यानी आम्हास भेटीस जाण्यास सांगितले वरून त्यांचे वस्त्रे देवून घोड्यावर बसोन भेटावयास गेलो. (हैदर अली) डेरा देवून शाहाराबाहेर उतरले होते. तेथे गेलो. तेव्हा त्यास (हैदरास) खुरनीस करावयास शिरस्ता. आम्हास सुभेदार यानी नबाबास खुर्निशा करावया म्हणोन सांगितले. तेव्हा आम्ही त्यास बोललो कीं आमचा कायदा खुरनिशा करावयाच्या नाही. ती गोष्ट नबाब यानी आपले कानीं ऐकिली. तेव्हा आपलेकडील सुभेदार यास ताकीद केली कीं त्यास खुरनिशा करावयास सांगो नका. त्यास उगाच लावोन देणे म्हणोन ताकीद केली. नंतर आम्ही गेलो. आणि रामराम केला. त्यानीही ताजीम देवून रामराम घेतला. नंतर नबाब यांचे चिरंजीव करीमसाहेब बसला होता त्याजजवळ आम्हासही बसावयासी जागा दाखविली तेथे बसलो. नंतर आम्हास लढाई जाहाला तो मजकूर विचारिला. त्यास उत्तरही छाप ठेवून जे सांगणेचे ते सांगितले. नंतर नबाब बोलिले की चाकरी राहाण्याची मर्जी असल्यास तुमचे योग्यतेनुसार पहिली तिकडे होता त्या प्रमाणे सरंजाम देवून चाकरीस देवू. अथवा घरी जातो म्हटल्यास तुमचे मातोश्रीकडे पोहचते करून देवू. असे सांगितले. त्यास आम्ही आमचे धनी याजबरोबर सापडलो आहो त्यासही सोडून चाकरीस राहिलो असता कुळीस बटा लागेल. राहाणार नाही व घरासही जाणार नाही. असे उत्तर केले. त्याजवरून बहुत संतोष जाहाला. जवळ मुत्सदी व लोक होते त्यास सांगितले की, हा मुल होऊन खुबीची व जुरतीची गोष्ट सांगितली, असे बोलून तारीफ करून आम्हास सांगितले की, काही चिंता नाही. स्वल्प दिवसात तुमचे धन्यासुद्धा तुमची सुटका होईल. असे सांगोन ठिकाणास पाठविले. नंतर तात्यास दुखणे दाहा महिने येवून देवाज्ञा जाहाले.

पुढे परशुरामभाऊ यानी पेशवे सरकारात विनंती करून चार लक्ष रुपये देवून मंडळी ब्राह्मण सुद्धा सर्वांस सोडून आणिले. नंतर सवाई माधवराव यांचे लग्नास पुण्यास गेलो. तेव्हा सवाई माधवराव प्रधान यासी आमची भेट करविली नंतर लग्न जाहालेवर निरोप घेऊन माघारे यावयाचे समयास हिंदुराव यांचे निरोपाप्रमाणे हात्ती व सिरपेच व कंठी व चार वस्त्रे व कारकून व भले लोक बरोबरचे त्यासही वस्त्रे देवून प्रथम मेजवाणी करून निरोप दिला. नंतर खर्च खेड्यामध्ये चालत नाही सबब खाजगीचा बंदोबस्त कलोजीराव पाटणकर व

म्हालोजीराव घोरपडे सेनापती याजबरोबर खाजगी तैनातीचा बंदोबस्त व शिवाय भले लोकांचा बंदोवस्त करून देवून आपणाकडे हुजरातीत ठेवून घेतले. नंतर बदामी व आदवानी व कपन व धारवाड जागोजाग व खेडे व करवीर येथे लढाया होत गेल्या तेव्हा कामेकाजे वरचेवर घडत गेली. तेव्हा पंतप्रधान जवळ आणखी पूर्वपद्धतीप्रमाणे दुसरे वेळेस गेलो तेव्हाही हत्ती व शिरपेच व कंठी व चार वस्त्रे व मानकरी यासही आमचे बरोबर होते त्यास, व कारकूनास वस्त्रे देवून रवाना केले. नंतर परशुरामभाऊ जुन्नर किल्ल्यावर धरिले.

नंतर आम्ही पुण्यात होतो तेव्हा पंत राजाज्ञा व सरलष्कर यास हुजुराची आज्ञा होवून दोन वेळा आज्ञापत्रे करवीरास येणे विषयी आम्हास आली. तेव्हा आम्ही निघालो. मिरजेस आलो आणखी मिरजेसही आम्हास येणेविषयीचे आज्ञा-पत्र आले. करवीरास आम्ही हुजूर गेलो तेव्हा पूर्वपद्धतीप्रमाणे स्वारी शहराबाहेर आली. तेथे आम्ही जोहार केला. नंतर अंगावरील वस्त्रे घालून आम्हास गावात घेवून गेले. पुढे साहेब सुभ्याची वस्त्रे दिली. आणि पंत राजाज्ञा बरोबर कर्नाटकात गेलो. तेव्हा आम्हांस खोची गाव दिला होता. कर्नाटकात आलेनंतर खासगी खर्चाबद्दल कालेवाड व कोडोली व कवाड व उमंचणी व पेडसुर हे तीन (?) गाव आम्हास पंत राजाज्ञा यांनी आमचे आम्हांस दिलेशिवाय खासगी खर्चास शंभर होन देत होते, दर माहाचे दरमाहा. शिवाय पागेची नेमणूक प्रथम मनोळी कडकोळ प्रांतेच केली. येकांडे (?) आमचे दिमतीसच होते तेव्हा पुढे लढाई जाहाली तेव्हा आप्पाचे समक्षच पाडाव जाहाला. च्यार महिने गोखले यांचे फौजेत होतो. तेथून परशरामपंत भाऊ जुनेराहून सुटोन फौज बंदी करोन या प्रांती चिकोडीस आले. तेव्हा राजेश्री चिंतामणराव आप्पा यांनी सागितले की आमचे बंधू निलकंठराव शिंदे हे गोखल्याकडे पाडाव आहेत. त्यास सोडून आणावें म्हणोन आग्रह पुरस्कर रद्दबदली केली. त्यास भाऊंनी सांगोन पाठविले की, आमचे भाचे शिंदे तुम्हाजवळ आहेत, त्यास सोडवून आम्हाकडे पाठवाल तर आम्ही तुमची भेट घेवू, येसे सांगोन पाठविले, नंतर गोखले यांनी निरोप देवून भाऊ याजकडे पाठविले. पुढे कुच होवून कोल्हापूरकडे जाणेकरिता येऊ लागले तेव्हा आम्ही विचार केला की, हुजूरचे चाकर, याजबरोबर गेले असता शब्द येईल. ऐसे चिती आणून देवास जातो म्हणोन निरोप घेवून लष्करातून गेलो ते लष्कर चिकोडीस येई जे पर्यंत लष्करात आलो नाही. सबब आमचे

गावावरी परशराम भाऊंनी चोर घातले. तेव्हा लष्करात येऊन याची तोंडी भेटीचा जाबसाल सदाशिवपंत मनोळीकर यासी बोलोन सांगतो म्हणोन सांगून मनोळीकर केंपवाडात होते तेथे जाऊन पुन्हा घरास गेलो. ईकडे लढाई होवून परशरामभाऊ मारले गेले. नंतर आम्हास हुजूरचे आज्ञापत्र आले. कोल्हापूरास आलो.

पुढे रामचंद्रपंत आप्पा हे शिंदे यांची पलटण घेऊन करवीरास आले. तेव्हा लढाई आदीतवार पेठ पुढे जाहाली. तेव्हा दाहा पंधरा वेळेस आम्चे फौजेत उलट पालट जाहाली. ईकडील आप्पाचे फौजेत मंडळी यानी आम्हास बोलविले. नारायणराव घोरपडे सेनापती हे पाडाव झाले, सरलष्कर यास पोटास गोळी लागली. त्यास सांभाळून घेऊन आम्ही माघारे गेलो. नंतर दुसरे दिवशी सरकार स्वारी व सर्वत्र पनाळेस गेले. तेव्हा आम्हास पंत राजाज्ञा याजपासी ठेवून गेले. नंतर चार महिनेत वेढा उठला. नंतर रामचंद्रपंत आप्पा हे आमचे गावाकडे फौजसुद्धा आले. आम्ही करवीर मुक्कामी फौजेत लढलो हा चित्तात द्वेष आणोन आमचे घरी कुटुंबाजवळ दाहा हाजार रुपये घेतले आणि दोन....लुटले.

नंतर खोची हा गाव माहाराजांनी आमचा आम्हाकडे दिला. काही दिवस चालला. पुढे गाव जप्ती केली. मग निघोन आम्ही घरास गेलो. मग पलटणे घेवून निपाणीकर यानी मनोळीत ठाणे घातले, आमचे गावास उपद्रव करणेस प्रारंभ केला. तेव्हा त्याजकडेस चाकरी जाणे प्राप्त जाहाले. तेव्हा खर्च व खाजगीचा व लोकांचा लोक बरोबर होते त्यांचा बंदोबस्त करून ठेवून घेतले. काही दिवसानंतर माहाराजांचा व त्याचा तहही घडून लढाईस प्रारंभ जाहाला. एक दोन लढाया जाहाल्या. शेवटची लढाई सावगावावर जाहाली. तेव्हा सरकारचा मोड जाहाला व आम्ही बरोबर व शेदोनशेहे येकांडे होते. सरकार-स्वारी उजवी टाकोन आम्ही निघोन पुढे गेलो. अर्धे कोश सुमारे, तेव्हा राघोजीराव निंबाळकर सरनोबत स्वारीस गलबल होवून थांग नसता सापडले की काय जाहाले म्हणोन आंदेशा खाऊन घोडे टाकून माघारे आले. त्याची आमची गाठ पडली. त्यानी सांगितले की, माहाराजांची स्वारी सापडली आहे. वाटेत मला नेवून सरकार जेथे आसेल तेथे पोहचवावे म्हणोन म्हणो लागले. तेव्हा त्यास घेऊन आपले लोक-सुद्धा माघारे फिरोन यावयास आलो. ईतक्यात सरकार स्वारी पुढे....कर यांचे लोकांची निकड बसलेली होती. सरनोबत याना आम्ही पाहिली. आम्हाजवळ

लोक निपाणकर याजकडील दोनशेहे महंमदभाईबंद वगैरे होते, ते आडवे उडावयासी गडबड करू लागले. तेव्हा सरनोबत यानी आम्हास बोलले की, आडवे लोक उठले असता स्वारी सापडती. राज्य बुडते. या वेळेस आपण सांभाळले असता राज्य राहाते. असे बहुत प्रकारे सांगितले. तेव्हा आम्ही विचार केला की, निपाणकरास खास्ती समजले असता प्राण घेईल, असे चित्तात आले. परंतु जो विचार पंत राजाज्ञावर सावनुरावर गुजरला, तेव्हा (त्यांनी) आपला प्राण घ्यावा परंतु धनी रक्षावा, ऐसा विचार केला. तोच विचार सावगावावरही आणिला की, सरकार स्वारी क्षेम राहून निभाऊन गेली की तेणेकडून आमचा प्राण व गाव गेली तरी चिंता नाही. असे समजोन राघोबा देखत लोकास घेऊन दुसरे वाटेने निघोन गेलो. सरनोबत यासही पार करोन दिले.

निपाणीकर याजकडे लोकानी जनवार्ता हे वर्तमान कांही दिवसानी समजले नंतर तह जाहाल्यानंतर देवास जाणेस आम्हास निरोप देवून आमचे गावास ठाणी घातली. सात आठ वर्षे गाव अनुभऊन आमचे गाव लुटून लाखो रुपयांचे पेचात आम्हास आणिले. नंतर राजेश्री बाजीराव पंतप्रधान याजकडेस जाऊन प्रयत्न करून च्यार रुपये खर्च करून आमची गावे आम्ही सोडून घेतली. व सरकार चाकरी असताही सरकारची मर्जी रक्षुन कामकाजे केली. दुसरीकडे गेले असता सरकार लक्षाबद्दल लाखो रुपयाचें पेचात आलो ऐसे असता आम्हावर सरकारची कृपा होऊन उर्जीत व्हावे. ते न होता बेमर्जी व्हावयाचे कारण नसता बेमर्जी जाहाली. अद्यापी राघोबा सरनोबत करवीरास आहेत त्यास आपण बेलभंडार घालून विचारावे म्हणजे सत्य असेल ते सांगतील. सरकार स्वारी मनोळीस आली होती तेव्हा आम्ही गोकाक प्रांती मारुतीस गेलो होतो. एका-एकी मोगलीहाल गावावर हल्ला जाहाला. तेव्हा ठाणेतील लोकांनी गोळ्या मारिल्या. तेव्हा नाथांजी पडला....नका ही मारिला नाही. नाथाजी पडावयाचे पूर्वी पाटील व दोन चार आसामीं ठार जाहाली. नंतर गावकरांनी गोळी मारिली. तेथे गावात गुरे व चीज वस्त व गला वगैरे होता. तो लुटून गेला व दोन ग.व ईटनाळ व मुगलीहाल लुटले. तेव्हा दाहा वीस हजाराची खराबी जाहाली. पूर्व मजकूर सरकारचे ध्यानात नाही. आमचे कोणी समजून देवून विंनती करणार नाही. सबब ईतक्याही गोष्टी घडल्या. आता सर्व माहितगिरी समक्ष समजोन देवून बंदोबस्त करून घ्यावयाचे आपणाकडे आहे. 

लेखांक : १६३

निवडी : ७५७ / इ. स १८२९

यादी सु॥ तिसा आशरीन मयातेन व आलफ[1]

१ कोनेरराव गणपत पटवर्धन यांची व येसाजी शिंदे यांची लढाई मौजे भोज येथे झाली शके १६९६[2] कार्तीक मास. ते समई पटवर्धन यांच्या तोफा दोन पंचरशी आणिल्या.

२ भवानराव प्रतिनिधी कऱ्हाडकर व भगवंतराव इटेकर फौज सु॥ कसबे वडगाव येथे आलेवर लढाई झाली. ते समई हुजूरचे फौजेचा मोड झाला शके १६९६. ते समई हात्ती दोन व जरीपटका नेला.

३ रामचंद्र गणेश ढेरे मौजे कवठे येथे लढाई झाली. ते समई येसाजी शिंदे यांचा मोड झाला व कोनेरराव पटवर्धन यांचा वेढा करविरास आला. सात रोज होता. नंतर उठोन गेला शके १६९६ फाल्गुन[3] मास.

४ महादजी शिंदे फौज सुद्धा येवून करवीरास वेढा घातला माहे सु॥ ३ तीन शके १६९९ माग[4] मास हेमलंबी नाम संवत्सरे.

५ मौजे वाघापुर येथे येसाजी शिंदे यांचा मोड झाला शके १७०१.

६ शके १७०३ चैत्रवद्य आमावस्या[5] येसाजी शिंदे यांचा काल झाला.

७ रामचंद्र परशराम यासी आळते मुक्कामाहून लढाईत धरून करवीरास आणिले शके १७१५ मार्गशिर्ष मासी.[6] पुढे परशराम रामचंद्र करवीरास येऊन श्रीटेंबलाईक नजीक उतरले. फौज सुद्धा मागशुद्ध सप्तमीस[7] लढाई होवू लागली. नंतर खंडणीचे बोलणे होवून ओली घेऊन चैत्र मासी माघारी गेले.

८ रामचंद्र परशराम यासी आळते मुक्कामाहून धरून आणिले. शके १७१५ मार्गशिर्ष शुद्ध १० स करवीरास घेवून आले. नंतर पंधरा दिवस जोशीराव यांचे घरी होते. नंतर भवानी कोटी हिंमतबहादर यांचे घरानजीक होती तेथे ठेविले. तेथे होन महिने सुमारे होते. स्वारी दो चौ रोजी जात होती. जखमा

---

१. इ. स. १८२९, २. नोव्हें. डिसें. १७७४, ३. मार्च १७७५, ४. जाने. फेब्रु. १७७९, ५. ता. २३ एप्रिल १७८१, ६. डिसें. जाने. १७९४, ७. ता. ६ फेब्रु. १७९५.

नीट झालेवर आजपासून कांहीं एक उपद्रव करणार नाही म्हणोन क्रिया घेऊन तासगावास रवानगी केली. ते समई त्यास मौजे दानवाड हा गांव हुजूरुन दिला.

९ परशराम रामचंद्र लढाईत ठार झाले सु।। मयातेन व आलफ भाद्रपद वद्य ४ शके १७२०.[1] नंतर पुढे रामचंद्र परशराम फौज व फलटने घेऊन बत्तीस-शिराले येथे आले. तेथे लढाई होवून माघ शुद्ध सप्तमी रविवारी लढाई चौफाले नजीक झाली. नंतर वेढा तीन महिने बसून नाना फडणीस यांचा काल झालेवरी वेढा उठोन गेला.



लेखांक : १६४

राव विश्वासराव गायकवाड दप्तर : ११ / ता. १८ डिसेंबर १८३०

श्री राजेश्रीमंत राव विश्वासराव दादासाहेब यांचे शेवेशी ,यशवंतराव रघुनाथ नेवरेकर शेवेशी विज्ञापना त।। मार्गशिर्ष वद्य ११ पो मुक्काम मुंबई येथे सेवकांचे वर्तमान यथास्थीत असे विशेष यानंतर सालगु।। आम्ही सेख आमद जमातदार याजकडेस थैली देवून रवाना केले होते त्या उपरांत साहेबांचे आज्ञापत्र आले जे आम्ही रत्नागिरीस थैली देवून कारकून पाठविला आहे. जाबसाल होवून येईल. तो समजण्यात येईल व खर्चाची मनाई केली त्यास केवळ पत्रावर दृष्टी न देता काम करावे. त्यास आम्ही काही पगारावरच दृष्टी ठेविली नाही. आमचा लक्ष साहेबांचे चरणाजवळ आहे. धन्याचे काम जाहाले मग सहजच आमचे ही काम होईल. रत्नागिरीस थैली दिली त्याचा जबाब काय दिला व रत्नागिरीहून मुंबईस साहेबांचे लिहून काय आले हे आम्हास समजले नाही. व याविषयी आम्ही भुदरगडास व करवीरास पाच च्यार पत्रे पाठविली ती पोहचलीच असतील. परंतु पत्राचे उत्तर आले नाही. आम्ही तर येथे हमेश दरबारी जात असतो आणि येथल्या दरबारचा रांधा रांधुन तयार ठेविला आहे की, रत्नागिरीहून जाबसाल ईकडेस आला म्हणजे काम जाहाले याविषयी पत्राची मार्गप्रतीक्षा करीत आहो.

---

१. ता. २९ सप्टें. १७९८.

इकडील मशार गव्हरनर साहेब ईलाईतास जावून आज आठ दाहा रोज जाहाले. आता आठ पंधरा रोजी नवा गव्हरनर साहेब दुसरा येणार तो बरा आहे. मोठे घराण्यातील आहे. रयतेस चांगला. ह्या गव्हरनर साहेब यांनी रयतेस फार दुःख दिले व जाहागिरदार वगैरे कारकून व शिपाई यास फार दुःख दिले. यांचा बोभाटा बिलायतेस गेला. व येथील बाछाई कडून साहेब........ बाछाई कोर्टात राहातात त्याचे व यांचे आंतर्यामी वाकडे. त्यानेही मजकूर तिकडेस समजाविला. त्याजवरून लवकर बदली जाहाली. बादशाई यांचा हुकूम असा आहे की मराठी राज्याचे कामे काईम ठेवावे. परंतु आपले दाब खाली मात्र ठेवावे. परंतू त्यांचा नाश करू नये, असा आहे. येथे वकील बहुतेक लोक यांचे आहेत. कारण की दुसरा गव्हरनर साहेब येणार व येथे वकील ज्याथली (?) असल्यास बहुतेक उपयोगी पडतात. याजकरिता नेहमी वकील राहातात. दुसरी थैली एक नवा गव्हरनर साहेब येथे येईल त्यावेळी पाठवावी व रत्नागिरीस साहेब यानी काय जबाब दिला तो ही लिहून आठ पंधरा रोजात पाठवावयास आज्ञा असावी. मालवण मुक्कामी शेत घुमडे ईनाम हे गायकवाड यांचे असे. ईजमालीस व ताळेबंदास मालवणाचे गावकर व कुलकर्णी लिहित असतात हे मी आजचे नजरेने पाहिले. व गावकर कुलकर्णी यास काही आस्ता दाखवून शेत घुमडे हे ईनाम गायकवाड यांचे खरे असा जबाब कलेक्टर साहेब घ्यावा म्हणून सांगितले असता ते सांगतील. शेवेशी श्रुत हे विज्ञापना.

मुंबई
सही इंग्रजी

११ डिसेंबर १८३०
यशवंतराव रघुनाथ नेवरेकर



लेखांक : १६५

हुजर खाजगी दप्तर : ५ / १८३३-३४

दरविला विशाळगडचे पंत प्रतिनिधी यासी कोकणात गावे आहेत त्या प्रकर्णात त्यानी आमाहाराज छत्रपती साहेबांचे हुकमतातील आहेत किंवा नव्हे याचा शक आला आहे. हे शकाविषयी खबर देणेस्तव ईज्यानीबास लिहून आले आहे. करिता माहाराजास जाहीर ईजहार होत आहे, जे सदरहु मोकदमेत विशाळगडकरावरी हुकुमत आहेसे दावा करणेस काय जागा आहे ते कलमी

व्हावे. म्हणजे शंभर वर्षापासून त्याजवर माहाराजाचे दौलतीहून हुकमत चालले नाही म्हणोन जहुर जाहाले आहे. त्यास आमाहाराजांचे हुकुमत त्याजवरी आहे किंवा नाही म्हणोन शक आले. मोकदमेत दस्ताऐवजावरून अगर त्यावर हुकुमत चालत असले त्यावरून, तरीही आमाहाराजास त्याजवरी हुकुमतीचे दावा आहेसे रुजू करावे म्हणोन आबाहाद्दरानी नीगारीष केले. त्यास विशाळगड किल्ला कोकण वरघाट तनखे सुद्धा माहाराज सरकारचा व प्रतिनिधी कदीम सेवक माहाराज सरकारचे यासी तेथे ठेविल्यापासून प्रतिनिधी याजवर कोकण वरघाट सुद्धा किल्ले विशाळगडावर माहाराज सरकारचा हुकूम पुस्तदरपुस्त असता आबाहाद्दरास सदरहु मजकुराचा शक येवून शंभर वर्षे प्रतिनिधी यावर हुकमत चालल्याचा पुरावा होण्याविषयीचा मजकूर आबाहाद्दरानी कलमी केले आहे. त्याजवरून हुजूर बहुत ताजुतर जाहाले. त्याजवरून माहाराज सरकारचा पुस्तदर-पुस्त किले विशालगड प्रांत सुद्धा व प्रतिनिधी याजवरी हुकमत चालल्याचे वहिवाटीच्या यादीदास्ती दोन तयार होवून रुजू मोर्तब करून आबाहाद्दराकडे रवाना जाहाल्या आहेत. त्यास सदरहु हरदू याद दास्ती वरून बयाजवार मजमून जहूर होवून आबाहाद्दराची पुरी खातरदास्त होईल. त्यास रत्नागिरी येथील कलेक्टर साहेब बाहादुर याजकडून किल्ले विशाळगड नीसबत तनखेचे कोकण ईलाखेचे गावगनाचे अमलास अटकाव जाहाला आहे. त्यांची मोकळींक होईते आबाहाद्दरानी करावे हुजूर फैज गुनुरचे राज्याची सर्वेपरी शरम व साभीमान आबाहाद्दरास असता जियादा मरकूम कलम होणे काय आहे.



लेखांक : १६६

निवडी : ७१३ / २८ जानेवारी १८३४

यादी जबाब द्यावयाचे तपशील सु॥ अर्बा सलासेन मयातेन व आलफ् छ १७ माहे रमजान उर्फ पौषमास —

१. विशाळगडचे प्रतिनिधी यांचे हाती विशाळगड किल्ला कोणत्या कारणावरून कोणापासून, कोणत्या साली, कोणत्या पुरुषाचे हाती आला, याचे उत्तर.

श्रीमन्महाराज राजाराम साहेब छत्रपती यांचे वडील चिरंजीव श्रीमन्महाराज शिवछत्रपती संस्थान कोल्हापूर यानी परशराम त्रिंबक प्रतिनिधी यासी पदाधिकार राजशके २८ शालीवान शके १६२३ वृशनाम संवत्सरी दिला. प्रतिनिधी किल्ले विशाळगडी व किल्ले पन्हाळे मुक्कामी राहून राज्य कारभार करीत होते. त्यास पुढे श्रीमन्महाराज शाहू छत्रपती संस्थान सातारा हे दिल्लीहून राजशके ३४ शालीवाहन शके १७२९ सर्वनाम संवत्सरे सन समान मया व आलफ् साली देशी फौज सुद्धा आले. त्यानी प्रतिनिधी यास सातारे मुक्कामी कैद केले. हे वर्तमान श्रीमन्महाराज शिवछत्रपती संस्थान कोल्हापूर यासी समजल्यावरी प्रतिनिधी यांचे वडील चिरंजीव कृष्णाजी परशराम प्रतिनिधी यासी अधिकार सांगोन विशाळगडास पाठविले. त्यापासून विशाळगड वरघाट कोकण तनखे सुद्धा प्रतिनिधी याकडे पुस्तदरपुस्त चालत आहे. त्यास विशाळगड किल्ल्यावर आजपर्यंत प्रतिनिधी वहिवाट महाराज सरकारची म्हणून करीत आहेत. यासी दाखला.

१. प्रतिनिधी संवस्थानी रोजकीर्द घालीतात त्यात राजमंडळ दिमत मजमु राजेश्री पंतप्रतिनिधी मुक्काम किल्ले विशाळगड, याप्रमाणे कीर्द घालून कोकण पट्टी व वरघाटचा आमल ऐवज येतो तो सदरहू किर्दीस जमा धरीत आहेत. कलम.

१. दुसरा दाखला प्रतिनिधीचे पुस्तदरपुस्त शिक्के व वस्त्रे महाराज सरकारातून प्रतिनिधीस देतेसमयी होतात. त्या शिक्यात नाव आधी महाराजांचे नंतर प्रतिनिधींचे. याप्रमाणे सिक्का कोकण मुलुखावर प्रतिनिधी करितात. कलम.

१. विशाळगड तनख्याकडे प्रतिनिधी याचे हाती किल्ला आल्यापासून मुलुख किती होता, त्या गावची नावनिशी यांचे उत्तर :

श्रीमन्महाराज शिवछत्रपती शककरिते यांचे कारकिर्दीपासून, नवे किल्ले बांधिले त्यावेळेपासून आमल रत्नागिरी व महिपतगड व विशाळगड याप्रमाणे हिस्से करार झाले. त्याप्रमाणे प्रतिनिधीकडे किल्ला महाराज याही सांगितल्यापासून विशालगडचा हिस्सा पेशवे याचे कारकिर्दीत व आजपर्यंत आमल चालत आहे. कलम.

१. महाराज सरकार कोल्हापूर यांचा आमल कधीतरी कोकणात होता

की काय असल्यास कधी पासून कोठपर्यंत होता व तो आमल कधी हाती गेला याचे उत्तर.

श्री मन्महाराज शाहूछत्रपती दिल्लीहून देशी येतपर्यंत सरहद्द कोकण पट्टीची व वर घाट दक्षिणेपर्यंत अमल कोल्हापूर संवस्थानी चालत होता. महाराज याकडून कोकणचा आमल बावडेकरी पंत आमात्ये व आंगरे सरखेल व प्रतिनिधी करीत होते. पुढे श्रीमन्महाराज शाहू छत्रपती देशी आल्यावरी काही दिवसांनी श्रीमन्महाराज शंभुछत्रपती व श्रीमन्महाराज शाहूछत्रपती यांचा तह सुमा ईहिदे सलासीन मया व आलफ छ १६ शाबान शके १६५३ विरोधी कृत नामसंवत्सेर चैत्र वो।। २ स झाला.[1] त्यात कोकण प्रांत पैकी निमे महिपतगड व चौथाई रत्नागिरी व चौथाई विशाळगड येणेप्रमाणे हिस्से होऊन किल्ल्याचे मोबदला रत्नागिरी किल्ला शाहूमहाराज यास कोल्हापूर संवस्थानातून दिला. महिपतगड किल्ला श्रीमन्महाराज शाहू छत्रपती यांचे वाटणीत. तेव्हा रत्नागिरी व महिपतगडचा आमल श्रीमन्महाराज शाहू छत्रपती करू लागले. विशाळगडचा आमल कोल्हापूर संवस्थानकडे पूर्वीपासून आजपर्यंत चालत आहे. विशाळगड किल्ला कोकणपट्टीचा आमल सुद्धा वहिवाट प्रतिनिधी करितात. त्यास कोल्हापूर संवस्थानातून किल्ल्यास व लोकास व ईनाम गाव व वतनाच्या सनदा पेशजी पासून आजपर्यंत कोल्हापूर संवस्थानातून विशाळगड तनख्यात झाल्या आहेत व होत आहेत. कलम.

१. कोकणपट्टी पेशवे हाती कोण कोणा पासून कोणकोणत्या साली आली, त्या वेळेस विशाळगडाची हकीगत कशी होती याचे उत्तर.

श्रीमन्महाराज शाहूछत्रपती याहि राज शके ७६ शालीवान शके १६७१ शुक्लनाम संवत्सरे सन खमसेन मया व आलफ मार्गशिर्ष व।। ३ स[2] कैलासवास सातारे मुक्कामी केल्यावर महिपतगड किल्ला श्रीमन्महाराज शाहू छत्रपती याहि जगजीवन परशराम प्रतिनिधी याजकडे दिल्हा होता. तो किल्ला पेशवे यानी घेऊन आंगरे सरखेल याकडे रत्नागिरी किल्ला होता, तो घेतला. त्यापासून महिपतगड व रत्नागिरीचा हिस्सा पेशवे घेत आले. विशाळगडचा हिस्सा विशाळगडाकडे दिल्यापासून चालत आला तो आजपर्यंत चालत आहे. कलम.

---

१. ता. १३ एप्रिल १७३१, २. ता. १५ डिसेंबर १७४९.

१. विशाळगड तनख्याची पेशवे यानी आपले अमला पासून घालमेल केली होती की नाही, केली असल्यास कोणत्या पेशवेयानी, कोणत्या साली केली ? जप्ती केली होती ती कधी, किती वर्षे, कशासाठी, आणि मोकळीकीचे वेळेस तहनामा झाला असेल तो व हाल्ली हिस्सा चालतो हा कोणत्या कारणा वरून ? कधी झाला ? याचे उत्तर.

श्रीमंत माधवराव नारायण प्रधान यांचे कारकिर्दीस सन सालास समानीन मया व आलफ चे साली[1] जास्ती वहिवाट होऊ लागली. यामुळे जप्ती झाली होती. त्याची मोकळीक सन आर्बा समानीन मया व आलफ छ २९ रोजी[2] झाली आणि तहनामा झाला आहे व तहनाम्याप्रमाणे वहिवाट दुतर्फा आजपर्यंत चालत आहे. कलम.

१. विशाळगड तनखा आहे हा अवघा किंवा यातील काही गाव आंगरे व बावडेकरी अगर दुसरे कोणत्याकडे होते की काय, होते असे असल्यास सर्व चौकशी समजली पाहिजे. याचे उत्तर.

विशालगड तनखा यवनीमध्ये नव्वद गाव दरोबस्त होते. हिंदु वहिवाटीत हिस्से ठरोन वहिवाट चालत आहे. आंगरे सरखेल यांचे कारकीर्दीस काही गाव मोबदला झाले. परंतु हिस्सा चालत आहे त्या बेरजेत कमी झाला नाही. हिशा अन्वये दुतर्फा वहिवाट आजपर्यंत चालत आहे. कलम.

सदरहू कैफीयत किल्ले विशाळगडास राजेश्री गोविंद नाईक सरदेसाई याजकडे पाठविणे करिता रवाना.



लेखांक : १६७

राव विश्वासराव गायकवाड दप्तर : १२ / १८३४-३५

राजेश्री हिंदुराव बाबा गायकवाड सरखवास गोसावी यासी सकल गुणालंकरण अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्य स्नेहांकीत रामचंद्रराव नारायण राजाज्ञा आशिर्वाद विनंती येथील कुशल तागायत छ २ रोज इंदुवार दोन प्रहर

१. इ. स. १७८२-८३, २. इ. स. १७८३-८४.

रात्रपर्यंत मुक्काम ऐतवडे येथे वर्तमान यथास्थीत आहे. विशेष आजी तिसरा प्रहरी श्रीमन्महाराज छत्रपती यांची भेट घेतली. नंतर आजी रात्री घरी मेजवानी केली नंतर रात्रौच निघोन डोंगरास गेलो, स्वारी पाहाटेची येथून निघोन डोंगरास दोन तास दिवसास दाखल होणार. राजेश्री सरलष्कर यासीही डोंगरास स्वारीबरोबर येणेविषयी सरकारचा हुकूम जाहाला त्याजवरून स्वारी समागमे निघोन आले आहेत. भेट गुरुवारची व्हावी म्हणून आपण लिहिले होते त्यास करवीरी पाच मुक्काम ठरविले आहेत. त्यात एक मुक्काम कमी होतो. सबब बुधवारी भेट व्हावी ऐसी आज्ञा जाहाली आहे. वरकड मंडळी व डेरे दांडे सुद्धा करवीरास रवाना केले आहे. आम्ही भौमवारी सरलष्कर सुद्धा सायंकाळी निघोन करवीरास येतो. भेटीअंती सर्व मजकूर कळेल. कळावे बहुत काय लिहिणे. लोभ कीजे हे विनंती.



लेखांक : १६८

राव विश्वासराव गायकवाड दप्तर : १३ / ता. २३ जून १८३७

मुंबई छापखान्यातून सर्वास माळूम होण्याकरिता दर्पणातील उतारा

ता. छ २३ माहे जून सन १८३७ ईसवी सन फसली १२४१ रोज शुक्रवार धारवाडास कमीशनर साहेब याजपुढे तपास चालला आहे. त्या बाबत कित्येक बातम्या या आठवड्यात आम्हास येऊन पोहचल्या आहेत. या तपासाचा परिणाम काय होतो या वीषयी दक्षिण महाराष्ट्र देशातील लोक व जहागीरदार यासी मोठी काळजी पडली आहे व ज्या मनुष्यावर आरोप आला आहे त्याची आब्रु मोठी असता त्याजवर मोठमोठाले गुन्हांचा आरोप आहे. व फिर्याद करणारही मोठा. या सर्व गोष्टीमुळे नेटीव्ह लोकास या तपासाबाबत मोठे अगत्य पडले आहे. आमचे पत्र लिहिणाराचे कृपे करून आम्हास कमीशनर साहेब यानी केलेले चौकशी बाबत काही वृत्तांत सांगावयास शक्ती आली म्हणजे आम्ही फार खुषी जाहालो.

आम्हास ज्या बातम्या लिहून आल्या आहेत त्यातील एकीत अशी आहेत की, रामदुर्गाची बाई ईजवर जुलूम केला असा पहिला आरोप रामराव अखबर नवीसावर होता, तो साफ त्याजवर शाबुद जाहाला. परंतु दुसरे आरोप तयार करून पाठवावयास काही विलंब लागला. याजमुळेच व मुदतीचे आत साक्षीदार

हजर जाहाल्या नाहीत. सबब कमीशनर साहेबांनी चौकशी बंद केली. आणखी लिहिलेले आहे की, आणाजी नरसिंह याजवर फिर्यादी होत्या त्यांचा तपास केला नाही त्यास सबब ही की तो पटवर्धनाची रयेत. कंपनी सरकारच्या आमलातील नव्हे.

दुसरी बातमी तरफदारीशी दिसत आहे. व ती रामराव यावर जो ये लागू गुन्हा शाबीद जाहला त्याच्या निवारणार्थ लिहिले आहे असे दिसते. ती अशी की, बाईचे पक्षाचे जे साक्षी होते त्यात बहुत करून बाईचे चाकर होते व कित्येक रामराव यांचे द्वेषी होते व त्याचे इकरार येकमेकास मिळाले नाहीत व त्यातून एका दोघाना खोट्या शपथा घेतल्या असे साफ नजरेस आहे व माजी गोरनर व पोलीटिकल कमीशनर यास बाईची कित्येक वेळा भेटी जाहाल्या असताही तिने आठ वर्षे पर्यन्त फिर्याद दिली नाही. याजवरून रामराववर जो गुन्हा आला आहे तो खोटा असे दिसते.

वर लिहिले प्रमाणे फिर्यादीचे कट तयार करावयास साक्षी हजर व्हावयास विलंब लागलेमुळे जर ही चौकशी संपविली आसली तरी तेणे करून फार वाईट होईल व लोकास दुःख होईल यात अगदी संशय नाही. काही लहान गोष्टी चुकल्यामुळे किंवा असेच कोणते कारणामुळे मोठ्या चौकशा कराव्या त्या सोडून देणे ते केवळ पोरचेष्टा सारखेच दिसते. या सांप्रतचे मोकदम्याबाबत आमचे मते असे की साक्षी आपआपले संस्थानात राहात होते. त्याला केव्हा हजर जाहाले पाहिजे याबाब्रत काही जाहीरनामा ही लाविला नव्हता.

अशी आवस्था जाहाली त्या पेक्षा मुदतीचे आत साक्षीदार हजर जाहाले नाहीत. ईतके करण्यावरूनही चौकशी बंद करणे योग्य नाही. येणे करून चौकशी आरंभावयाचा मोठा उद्देशनीय जाहला तो आणाजी नरसिंह पाच्छापुरचा जमेदार आहे असे ऐकिता तो अशी गोष्ट असल्यास तो पटवर्धनाचे मुलकात राहात होता असला तरी त्याची चौकशी करावी हे योग्य आहे. कमिशनर साहेबांनी एकच फिर्यादीची चौकशी केली असली किंवा सर्व फिर्यादी चौकशी केली असली तथापी त्यानी केलेला ठराव मंजुर होण्याकरिता कौन्सीलात येणार त्यापेक्षा सेवटी जो काही निश्चय होणार त्यात काही विशेश आंतर पडावयाचे नाही. हाली फिर्यादी ज्या मनुष्यावर जाहाल्या आहेत त्यास अद्याप कायदे माफक शासन व्हावयाचे नाही. तथापी या उपर सरकार त्याजवर विश्वास ठेवणार नाही. ज्या

मनुष्याला एकदा चाकरीतून मासूफ केला होता व लक्षाविधी रुपये लाच खाल्ला आशा ज्यावर फिर्यादी आहेत व ज्यावर मोठे माणसे जहागीरदाराच्या चाळीस पन्नास तक्रारी आहेत, अशा मनुष्यावर पुन्हा विश्वास ठेवणे योग्य नव्हते. मग त्या फिर्यादी चौकशीचे मार्गाने शाबीत होऊन किंवा न होऊन हे एवढे सर्व तुफान द्वेषाने केले असावे असे संभवत नाही. व अशी जरी कदाचीत गोष्ट आसली तथापी जो मनुष्याचे वर्तणुकीमुळे सर्वांचे मनात एवढा द्वेष उत्पन्न जाहाला त्या मनुष्यास काय म्हणावे ?

आखबरनवीस यांचे काम हे की त्यानी कोल्हापुर येथील अखबर धारवाड येथे पोलीटिकल एजंट साहेबास लिहून पाठवावी असे असता त्याने पोलिटिकल एजंट याचे कृपेकरून किंवा हयगईने त्यांची कामदार मनुष्ये याचे साध्ये करून कोल्हापुर संस्थानात व तेथील जहागीरदार यांचे कामकाजात एवढा आमल चालविला की एक संस्थानच्या दिवाणास काढला, दुसरे संस्थानचे मुख्यास बंदीत घातला, तिसरे संस्थानचे गादीवर आपले कृपेतील मनुष्यास बसविले, व जो कोणी त्यास पैका दिला नाही त्याची कोगल्यातरी तऱ्हेने नाश केला. ही गोष्ट साधारणपणे विच्यार करून पाहिली असता खास दिसत आहे ही गोष्ट आमचे वाचणारास खरी तरी वाटेल. बरे सांप्रत बहुतेक ज्याहागीरदारानीं रामरावावर आरोप आणिला आहे, ती गोष्ट आम्हास माहीत आहे. व या गृहस्थास त्याचे जागेवरून काढावा येदतविषयी सर्व लोकांचा बोभाट प्रसिद्ध जाहाला आहे. त्याचे जागेवर त्याला पुन्हा नेमणे हे सर्व लोक काय म्हणतात याजवर कान न देणे असे होईल. सरकार आपले थोरपणाकरिता व दक्षिणेतील जाहागीरदाराचे बरवेपणाकरिता असी गोष्ट करणार नाहीत असे आम्हास पूर्ण आशा आहे.



लेखांक : १६९

राव विश्वासराव गायकवाड दप्तर : १४ आक्टोबर-नोव्हेंबर / १८३८

चिरंजीव विजयीभव राजमान्य राजेश्री हिंदुराव गायकवाड यासी प्रती राधाबाई घोरपडे अनेक आशिवाद. यथील क्षेम तागायत छ माहे शाबान पावेतो वर्तमान यथास्थीत असे विशेष अैलीकडे आपणाकडून बहुत दिवस पत्र येवून वर्तमान कळत नाही. तरी अैसे न करिता वरचेवर पत्र पाठवून चित्त संतोषीत

जावे. यानंतर हुजूरची स्वारी श्रींचे दर्शनास तुळजापुरास जाणार. त्या करित चिरंजीव राजेश्री नारायणराव यासी स्वारी समागमे येणे विषयीची आज्ञापत्र आले आहे त्यास पाठवणेचा अनुमान नाही. परंतु सातारेकर गोसावी यांचा तगादा येवून बसला आहे. पाणी कांजी अन्न बंद करून बसले आहेत. तो मजकूर लिहिता पुर्वत नाही. तशात च्यार दिवस फुरसत मागोन घेऊन चिरंजीवास पाठवितो. ये विषयी हुजूर अर्ज करून चिरंजीवास माघार पाठवणेचे करावे. मुल नेणते. सर्व प्रकारे भरवसा आपला जाणोन पाठवून देतो. त्यास आपले शिवाय आधार कोणाचा नाही. या करिता लिहिले आहे. सर्व मजकूर बाचणी मु।। बोललोच आहो. आपले उत्तर आले म्हणजे चिरंजीवास पाठवून देतो. मागाहून अर्जी देवून श्री मन्म-महाराज दिवाण साहेबाकडे जाणे करिता बली भानसीणीस पाठवून देतो. सरकार वाडेत बलीस नेवून अर्जी प्रविष्ट करवावी. सर्व आधार आपला आहे. पत्री अधिकोत्तर लिहून कळवावेसे नाही. वरकड मशार बापु जबानी विनंती करिता कळेल. कस्तुर कांहीसी पाठवून द्यावी. बहुत काय लिहिणे. लोभ करावा हा आशिर्वाद.



लेखांक १७०

हुजूर खाजगी दप्तर : ६/ ता. १ डिसेंबर १८३८

मुषफकाव आजमा व मुकरमा श्रीमन्महाराज आई साहेब दाम अलताफ हु।। नीयाजमंद वुलीयम सीमसनसाहेब बहादुर आक्टिंग पोलीटिकल एजंट प्रांत कर्नाटक बाद हसुल नीयाज मारुज आंके नीयाज मंदाचा अर्ज रोषन होऊन हमेषा आलताफ नामा सादर होत असले पाहिजे. दरीविला श्रीमन्महाराज छत्रपती साहेब यास ज्वरोपद्रव होवून गुरुवार तारीख २९ नवंबर सन ईसवी रोजी येवती मुक्कामी देवाज्ञा जाहाल्याचे ऐकून नियाजमंदास नीहायत गमगीनी प्राप्त झाली व आं आईसाहेब माहाराजास मोठे दुःख जाहाले व हालीचे श्रीमन्माहाराज छत्रपती साहेब यांची खुर्द झाली. अशा समई हे दुःख घडणे फार अनुचीत. परंतु देव ईच्छेस मनुष्याचा काय उपाय व यांचा शोक करूनही कांहींच उपयोग नाही. पुढे दौलतीची व्यवस्था चांगली राहावी लागते व छत्रपती साहेब लहान आहेत त्यांचे पोषण उत्तम रीतीने जाहाले पाहिजे व मरहूम छत्रपती साहेब यांचे माहलास

अपार दुःख प्राप्त जाहाले त्यास घाबरे होऊ न देता त्यांचे सांत्वन जाहाले पाहिजे. आईसाहेब वडील आहा त्यापेक्षा सर्वांचे समाधान करणे आईसाहेबाकडे आहे. माहाराज सरकारची व कंपनी सरकारची फीमाबेन दोस्ती यात माहाराज सरकारचे खैरसवाईवर कंपनी सरकारची नजर त्यापेक्षा हरयेक विषयी कंपनी सरकारातून पुस्तपन्हा राहील. या सर्व गोष्टीवर नजर फर्मावून आता हे जे दुःख लवकर विसरण्या जोगे नव्हे. तत्रापी विवेकी करून विसरणे आवश्य जाणुन हल्ली श्रीमन्महाराज साहेब छत्रपती साहेब परवर्षीवर व दौलतीची व्यवस्था चांगली राहावी याजवर तसकर (?) फर्माविले पाहिजे. कंपनी सरकार तर्फेने माहाराज सरकारात ईजतअसार रामराव भीमाजी अखबरनवीस आहेत ते नियाजमंदाकडून अर्ज करतील तो मजकूर खातरेत आणिला पाहिजे. जियादाचे अर्ज जुमायद.

सही इंग्रजी
ॲक्टिंग पोलीटिकल येजंट

थैलीचे चिठ्ठीची तारीख छ १ माहे डिसेंबर सन १८३८ ईसवी मु ॥ सन १२४८ फसली मु ॥ बेळगांव.



लेखांक : १७१

हुजूर खाजगी दप्तर : ७ / ता. १ मार्च १८३९

श्रीमन्महाराज छत्रपती साहेब दाम आलताफ हु नीयाजमंद वुलियम सीमसन् बाहादुर ॲक्टिंग पोलीटिकल एजंट प्रांत कर्नाटक नीयाज मारुज आंकी येथील खैरीयेत रोषन होऊन हमेषा अलताफनामा सादर फर्मावीत असले पाहिजे. दरीविला सरकार ईलाखेचे तालुकेस व जाहागीरदार वगैरे दीगर ईलाखेचे तालुकेस लगत आहे. त्यास सरकार ईलाखेत चोरी होवून चोर लोकच व गुमानी माल व साक्षीदार वगैरे चौकशी बदल येणेचे अगत्य असत आहे. त्याविषयी सरकार ईलाखेचे मामलेदार यांनी असिस्टंट साहेबही लोकास किंवा बाजूस अर्जी लिहून पाठवून त्यावरी जाहागीरदार ईलाखेचे वकिलास अगर जाहागिरदार वगैरेस ईकडून पत्र जावे. त्यानंतर त्याजकडून मामलेदार वगैरेस ताकीद जाऊन बादज गावकरास ताकीद होऊन असामी वगैरे पाठवावे. एक कामास दोनी तीनी विळी लेहावे असे दुबारा मेहनत होत आहे. त्याजमुळे फार उशीर होऊन ईन-

साफचे कामास खोळंबा. त्याकामात सामील असले लोकास बहुत तकलीफ गुजरत आहे. सरकार कामास मनस्वी हरकत होत आहे. असे निर्नीमित्त्य लोकांस ईजा व दुबारा मेहनत व उशीर न होई या जोगे नीयाज मंदानी जाहागीरदार लोकांस असे लिहिले आहे की

१. सरकार इलाखेत गुन्हा जाहाले प्रकर्णात मोठे योग्यतेचे माणसा-शिवाय चोर लोक आणि गुमानी माल व साक्षीदार वगैरे चौकशी बद्दल आणव-णेचे आगत्य असून सरकार ईलाखेचे मामलेदारानी जाहागीरदार वगैरे दिगर ईलाखेचे मामलेदार कामदारास पत्र लिहिले असता त्या प्रमाणे ते क्षणी कामे सररास बीनदीकत चालतील.

याप्रमाणे सर्वत्रास लिहून पाठविले आहे आणि सरकार ईलाखेचे तालुकेस आमाहाराज छत्रपती साहेब यांचे ईलाखा लगत आहे. सबब आमाहाराज छत्रपती साहेब यानी सदरी मजकूरी खातर मुबारकेस तिकडील ईलाखेचे मामलेदार वगैरे कामदारास सदरी प्रमाणे मेहेरबानगी करून हुकूम फर्माविले असता सरकारचे कामास हरकत नाहीसे चालेल. आमाहाराज छत्रपती साहेब यांनी नीयाज मंदानी मारुज केल्याप्रमाणे बंदोबस्त करतील असे उमेद आहे.

सही इंग्रजी
ॲक्टिंग पोलीटिकल एजंट

थैलीचे चिठ्ठीची तारीख छ १ माहे मार्च सन १८३९ ईसवी.



लेखांक : १७२

हुजूर खाजगी दप्तर : ८ / ता. ५ मार्च १८३९

श्रीमन्महाराज मातोश्री सईबाई दिवाण साहेब राजमंडळ करवीर दाम आलताफ हु आजी साहेब जॉन आंद्रीयु डनलॉप साहेब बाहादुर सलाम बादज सलाम आंकी येथील खैरीयत ता।। ५ माहे मार्च सन १८३९ जाणोन आपली शादमानी हमेषा कलमी करून दीलआराम करीत असले पाहिजे. दिगर, 'दिग्दर्शन' म्हणोन चांगला चमत्कारीक ग्रंथ नवा उत्पन्न होत आहे. त्यात हरयेक बातमी व रसायन शास्त्र व भूगोल वगैरे लिहितील, ते उभयता माहाराज छत्रपतीसाहेब याना पाहाण्यासाठी जातो असे समजून ईज्यानेबानी कलमी करितो की उभयता

छत्रपती साहेब याजकडून हमेशा वाचवून चांगला तरबीयत करणेचा भार आमाहाराजाकडे आहे. त्याचे वगैरे समजणे करिता छापिलेले पत्र या खतात मलफुप करून पाठविले आहे. त्याजवरून समजण्यात येईल. हर हमेषा आमाहाराजाकडून खत खडीद पाळुन दील आराम करित असिले पाहिजे. ज्यादा लिहिणेस ताकत नाही. प्यार मोहबत असो द्यावे. हे किताबत दस्तुर गोविंदराव

सही इंग्रजी

प।ो छ ८ माहे मोहरम सु॥ तीसा सलासीन मयातेन व आलफ. थैलीचे चिठ्ठीची तारीख छ ५ माहे मार्च सन १८३९ ईसवी.



लेखांक १७३

निवडी : १२४५६ ते १२४६० / ता. १६ मार्च १८३९

यादी मेहेरबान राजेश्री – पंत राजाराम यासी पावती करावी.

१. मुंबईहून यशवंतराव माजी मामलेदार याणी बेबर साहेब बहादुर यासी कलमबंदी लेहून पाठविली. त्यातील मजकुर. कोल्हापुरकर महाराज तुळजापुरास जाताना वाटेत फौत जहाले त्या समयी रामराव याणी दंडलाप साहेब यासी व गोविंदराव यास पत्र पाठविले की या समयी तुम्ही मेहनत करून दरोबस्त दौलतीचे कारभार आपले हातून चालवावा, असा हुकूम देविला असता त्यासी दौलत सरकारचे कबजेत आली असे होऊन साहेबाचीही सेवा मनोदयानुरूप शेवकाकडून घडेल. त्याजवरून डनलाप साहेब याणी त्याचे तर्फीने वाले कोंसलदार याणी रामराव याणी तेथे बंदोबस्त चांगला राखून परत स्वारी कोल्हापुरास आणिली. सबब हजार रुपये बक्षीस व दरोबस्त दौलतीचे काम त्याचे हातून चालवावे. याजप्रमाणे ठरोन हुकूम कोंसलचा करून अजम फरींस साहेब ॲगटींग गव्हरनर व ॲंडरसन साहेब याजकडे दिल्हा. तो त्याणी तहकूब ठेविला. तो सदरहू साहेबानी सैन (सही) करून ध्यावा म्हणून बोलिल्यावरून गव्हरनर याणी उत्तर सांगितले की विलायतेस लिहून पाठवितो. तिकडून उत्तर येईल त्याजप्रमाणे हुकूम होईल. अगर गव्हरनर येणार आहेत. तो आल्यानंतर जो हुकूम करणे तो ते करतील. याप्रमाणे उत्तर जहाल्यामुळे दंडलाप साहेब याचा आग्रह तूर्तच व्हावा असा बहूत पडला. यास्तव गव्हरनर साहेब व ॲंडरसन साहेब

याणी सांगितले की संस्थानांत मनुष्ये निभावणीची चांगली आहेत. आणि संस्थानांत तंटा बखेडा ही कांही नाही. तेव्हां काही सबबे सिवाय हुकूम देण्यास व विलायतीस लिहिण्यास येत नाही. पुढे तंटाबखेडा त्याणी केल्यास गव्हरनरही येत आहेत. त्याचे सल्यास येईल तसे तो करतील. हल्ली पेशजी रामराव याणी तंटे कोल्हापुरास वगैरे ठिकाणी केले. त्याज विसीचा दरयाप्ती विलायतीस चालली आहे. हे तुम्हास माहीतच आहे. असे असीने गैर माहिती प्रमाणे बोलता याजवरून फार ताजूब दिसते. नंतर हल्ली सकसीन साहेब बहादुर येथे आहे. त्याजबरोबर बापू कारकून रामराव व अप्पा याज कडून आले आहेत. ते व पहिले त्यांचे तेथील कारकून दंडलाप साहेब याणी उभयाविसी हुकूम करण्या बदले फार सांगितले. परंतु त्याणी ते मान्य केले नाही. गवरनर यासी विचारून हुकूम होईल. त्याप्रमाणे करू म्हणोन उत्तर साहेबांस सांगितले. आणि गव्हरनर यासी विचारिले की कोल्हापुरचा बंदोबस्त कैसा ठेवावा. अखबरनिसाची वर्तणूक नीट नाही. असा भाव दाखवून कैसे करण्याचे, म्हणून विचारले. तेव्हा गव्हरनर याणी सांगितले की तूर्त आहे तैसे राखावयाचे. गव्हरनर आल्यावर त्यांचा हुकूम होईल त्याप्रमाणे करणेचे आहे. परंतु डनलाप साहेब यांचे मनात गव्हरनर येण्याचे संधीस काही तंटा बखेडा व्हावा असा होत आहे. त्या प्रमाणे रामराव नसीबवान आहे. त्या पल्यास आणून रामराव यास मुखत्यार करतील यास काही संशय नाही. असे पत्र आले ते आपणास पाहणे करिता पाठविले आहे. आपण पाहून मातोश्री दिवाण साहेब यासी हा मजकुर श्रुत करून आणि मातोश्रीचे उत्तर काय होईल ते आम्हास लिहून कळवावे

१. तुम्ही यादी व राजाज्ञा साहेब यांचे थैलीचा तरजुमा पाठविला तो येकंदर कागद पावले. लिहीला मजकुर सर्व कळला. तुमचा सर्व मजकुर खरा आहे. तुमच्या यजमानाच्या कामास पेशजी पासून रामराव हरकत करीत आल्यामुळे उत्कर्ष होऊन भारी पैका संपादन केला आणि पुढे करण्याची' उमेद आसता त्यात महाराज कैलासवासी जाहले. तेव्हा त्यास लोभ जाजती जाहला. सारी दौलत आपणांस मिळावी ही इच्छा त्यांची फार. असे असतां लोभ सोडून राजाज्ञासाहेबाचे कल्याण कैसे करतील. हल्ली मातोश्री दिवाण साहेब यांजकरवी चार असामी कारभारी मुकरर करविले. त्याचे व मागील महाराज यांचे कारकीर्दीचे कारभारी यांचे लक्ष दौलतीचे व महाराजसाहेब यांचे कल्याण व्हावे

असे आहे. किंवा अकबरनिवीस याचे कल्याण व्हावे असे आहे. आणि मातोश्री दिवाण साहेब यांचे अंतःकरणापासून आपल्या दौलतीचे कल्याण व्हावे आणि हल्लीचे महाराज बाल दशेत आहेत. त्यास प्रौढ दशेत आणून मोठी सतकीर्त दरबारात व आलमात संपादावी किंवा अकबरनविसास अनुसरून दिवस काढावे, ये विसी कोण कामदार कोणा कोणाची अंतःकर्णे कैसी कैसी आहे. आणि रामराव याचे अंतःकर्णापासून कल्याण इच्छिणार कारभारी कोण कोण व दौलतीचे कल्याण इच्छिणार कोणकोण कारभारी, व हल्लीच्या प्रसंगानुरूप अनुसरून चालणार कोणकोण व आपले यजमानाचे कामास व्यतये आणणार कोण तेविसीचा बयाजवार मजकुर लिहून कळवावा आणि आपण आपले यजमानास संतोषीत असावे. फिकीर करू नये. आम्ही इरादा धरिला होता त्या प्रमाणे पोलटक (?) यास सुद्धा आम्हाकडे जाहली. गव्हर्नरसाहेब या मार्गे येणार आहेत. त्यांची भेट घेऊन आम्ही लौकरच येतो.

१. आपल्या कामात मातोश्री दिवाण साहेब अंतःकर्णापासून अनुकूल जहाली असता दौलतीचे कल्याण होऊन विलायती पर्यंत मातोश्री दिवाण साहेब यांचे चांगल्या वर्तणुकीची कीर्त होऊन कधी कधी हरकत न पडता दौलत कुंपणी सरकार मेहरबानगी करून मातोश्रीच्या कबजेत दौलत ठेवतील यास काही संषय नाही. हे न घडल्यास बंदोबस्त करणार कुंपणी सरकार आहेत.

येकूण कलमे तीन लिहीली आहेत. याचे जबाब जरूर जरूर पाठवावे. तारीख छ १६ माहे मार्च सन १८३९ इसवी.

सही इंग्रजी



लेखांक १७४

हुजूर खासगी दप्तर : ९ / ता. ४ मे १८३९

यादी सरकार श्रीमन्महाराज छत्रपती साहेब राजमंडळ करवीर सरकारात उलियम् सीमसन साहेब बाहादुर आक्टिंग पोलीटिकल एजंट प्रांत कर्नाटक याजकडून ऐसीजे रामराव अखबारनवीस यास माहाराज सरकारातून दोन गाव

ईनाम[1] मिळाले आहेत असे समजण्यात आले. ऐसीयास सदरहु गाव रामराव अखबारनवीस यास माहाराज सरकारातून काय कारणास्तवे व कधी दिले व त्या गावची वहिवाट हल्ली कोणाकडे चालत आहे याचा मजकूर तपशीलवार दाखले निशी माहाराज सरकारातून आला. रवाना तारीख ४ माहे मे सन १८३९ ईसवी वैशाख वद्य ६ शनीवार मुक्काम कोल्हापुर

सही इंग्रजी
ॲक्टिंग पोलीटिकल एजंट



लेखांक : १७५

हुजूर खाजगी दप्तर : १० / ता. ४ मे १८३९

श्रीमंत माहाराज मातोश्री राणी सईबाई साहेब दाम अलताफहु नियाज मंद वुलियम सीमसन साहेब ॲक्टिंग पोलीटिकल एंजट प्रांत कर्नाटक बाआद हुसुल नियाज मारूज आंके नियाज मंदाची खैरयेत रोषन होवून हमेषा अलताफ-नामा सादर होत असला पाहिजे. दरिविला कंपनी सरकारचे आकबरनवीस रामराव हे मागील सांप्रदाय नसता आलीकडे राजवाड्यात आराणीसाहेबाकडे व श्रीमंत माहाराज राणी ताराबाई साहेबाकडे येतात आणि एकांती भेट घेतात. गैरवहिवाट होत आहे असे आम्हास समजण्यात आले त्याजवरून हे नियाज पत्र लिहिले आहे. तरी या प्रकर्णी आराणीसाहेबांचा अभिप्राय काय असेल त्याची याद तपशीलवार लिहून मेहेरबानगी करून नियाजमंदाकडे पाठविण्यात आली पाहिजे म्हणजे त्यांचा विच्यार करावयास येईल. हमेशा अलताफनामा सादर होवून खुसी हासल करवीली पाहिजे. जीयादेचे ईलतीमास जुमायेत.

सही इंग्रजी साहेबांची

पो छ १९ माहे सफर सुरू सन तीसा सलासीन मया तेन व आलफ थैलीचे चिठ्ठीची तारीख ४ माहे मे १८३९ ईसवी मुक्काम कोल्हापूर.



१. हगतेहळळ आणि इब्राहमपूर संमत पाच्छापूर

लेखांक : १७६

हुजूर खाजगी दप्तर : ११/ ता. ५ मे १८३९

श्रीमन्महाराज मातोश्री राणी सईबाई दिवाण साहेब दाम आलताफ हु नीयाजमंद वुलीयम सीमसन साहेब बाहादुर ॲक्टिंग पोलीटिकल एजंट प्रांत कर्नाटक बाआद हुसुल नीयाज मारूज आंके नीयाज मंदाची खैरीयत रोषन होवून हमेषा अलताफ नामा सादर होत असला पाहिजे दरी अयाम आराणी-साहेबाकडून छ २९ मोहरमचा ईनायत नामा व त्याजबरोबर तीन कलमाची याद मालवणचे तिजोरीवर चोरटे लोकानी हल्ला केला त्याप्रकर्णात बावासाहेब सरनोबत व चिमाजीराव सुभेदार यास रत्नागिरीस न पाठवण्या विषयी वगैरे मजकुराची आली ती पाहून मुंबई सरकारास लिहिले असता ईकडील लिहिणे सरकारात मंजूर होवून तारीख २९ माहे एप्रील सन १८३९ ईसवीचा हुकूम बावासाहेब सरनोबत व चिमाजीराव सुभेदार याजवर पुरा मुद्दा असल्याशिवाय त्यास चौकशीस आणावयाचा ईरादा नव्हता. परंतू हे चोरटे लोक माहाराज सरकारचे ईलाख्यात जमा होवून गेले त्या कामात माहाराज सरकारचे लोकाकडून फार बंदोबस्ती घडली, असे नजरेस येते. याचा जबाब ध्यावा लागेल. म्हणोन हसील मजकुराचा आला आहे. हे आराणीसाहेबास रोषन व्हावा याकरिता ईलतीमास केला आहे. जीयादेचे ईलतीमास जुमायद.

सही इंग्रजी
ॲक्टिंग पोलीटिकल एजंट

पो छ २० माहे सफर सु॥ तीसा सलासीन मयातेन व आलफ थैलीचे चिठ्ठीची तारीख छ ५ माहे मे सन ईसवी १८३९.



लेखांक : १७७

हुजूर खाजगी दप्तर : १२ / ता. ८ मे १८३९

श्रीमन्महाराज मातोश्री राणीसाहेब दिवाण साहेब दामअलताफहु-नियाजमंद विलीयम सीमसन साहेब बाहादुर आक्टींग पोलीटीकल एजंट प्रांत कर्नाटक बाआद हुसुल नियाज मारूज आंके नियाज मंदाची खैरीयत रोषन

होवून हमेषा अलताफनामा सादर होत असला पाहिजे. दरीआयाम रामराव अखबरनवीस यानी राजवाड्यात जनानखान्याकडे जाण्याचा सांप्रदाय नसता माहाराज राणी ताराबाई साहेबाकडे जावून गुफ्तगोई केली. येणे करून अमर्यादा जाहाल्या विषयीचा ईनायत नामा छ २३ सफरचा पाठविला तो पोहचला. ऐशीयास या मजकुराविषयी सरकारास ईतला केलाच आहे. आणि आराणीसाहेबानी येकीन खियालात आणिले पाहिजे की अशी गैरचाल करणारे माणसास सरकार मार्फत कधी ठेवणार नाहीत. आणि माहाराज सरकारचे मर्यादेत कोणतेही तऱ्हेने कमतर न व्हावी अशी कंपनी सरकारातून पुरी नजर राहिल. रोषन व्हावे. हमेशा आलताफनामा ईसदार होत असला पाहिजे. जियादेचे ईलतीमास जुमायद.

सही ईंग्रजी

अॅ. पो. ए.

पो।। छ २३ माहे सफर सु।। तिसेन सलासीन मयातेन व आलफ. थैलीचे चिठ्ठीची तारीख छ ८ माहे मे सन १८३९ ईसवी.



लेखांक : १७८

निवडी : १२४६१ / ता. १२ मे १८३९

यादी श्रीमन्महाराज राजेश्री राजमंडळ हुजूर करवीर येथून अजम उलियम सीमसन साहेब बाहादूर ॲक्टिंग पोलटिकल एजंट प्रांत कर्नाटक याजकडे सु।। तीसा सलासीन मयातेन व आलफे आ साहेबाचे येणे करविरी होऊन मालवणास चोरटे गेले. त्याची चौकशी करून वाजवी प्रमाणे फैसला केला. त्याज वरून हुजूरची मुलाकात घेऊन व दौलत प्रकर्णी उत्तम प्रकारे दौलतीचा बंदोबस्त राखून चालावयाजोगा सलाह दिला. येणेकरून हुजूरच्या दिलास बहुत खुषी जहाली. राजश्री रामराव भिमाजी अखबारनवीसी कामावर होते. यांचे चाल चालणा बद्दल पेशजी भेटी जाहाली व हल्ली चौकशी चालली आहे व त्याजकडून गैर सांप्रदाय वर्तणूक जाहालेचा मजकुर छ।। २३ सफरी आवाहादराकडे थैली पाठविण्यात आलीच आहे. त्यास अशा माणसास या कामावरून मंखुबा करून दुसरा चांगला मनुष्ये कारकून अखबारी कामावर योजना होऊन आल्यास

या कारणाने हुजूर बहूत खुषी आहेत. तारीख छ २७ माहे सफर रुजू मोर्तब



लेखांक : १७९

हुजूर खाजगी दप्तर : १३ / ता. १४ मे १८३९

श्रीमन्महाराज छत्रपती साहेब दाम अलताफहू अजनीयाजमंद उलियम् सीमसन साहेब बहादुर ॲक्टींग पोलीटिकल एजंट प्रांत कर्नाटक बाअदज हुसुल नीयाज मारुज अंके नीयाजमंदाची खैरीयत रोषन होवून हमेषा अलताफनामा सादर होत असला पाहिजे. दरी अयाम गोपाळ पंत केतकर यानी मुंबई सरकारात समजाविल्यावरून सरकारचा हुकूम आला तो पाहुन ईलतीमास करण्यात येते जे मेहेरबां अमृतराव साहेब पंडीत प्रतीनिधी यांचे वय लहान म्हणोन त्यांची मातोश्री असमत पनाहा राधाबाई साहेब याजकडे संस्थानचा कारभार मुखत्यारी ने चालत आला आहे. त्यात गैर वहिवाट काहीं झाली. सबब राधाबाई साहेब यांचे अखत्यार चालतो त्यात काहीं तबदील करू नये, असा सरकार हुकुमाचा भाव आहे. येविषयी ईकडून सरकारास उत्तर लिहून जाईल. त्यास हाल्ली मेहेरबां पंडीत प्रतीनीधी साहेब यांची स्वारी करवीरी आली आहे. त्यास व जे दोन कारभारी विशालगडास कैदेत होते ते सखोपंत परांजपे व विठ्ठलपंत सबनीस यास प्रतिनिधी साहेब यानी मोकळे करून करवीरी आणिले आहेत. त्यास ईकडून दुसरा ईषारा होईतोपर्यंत विशालगडास जाण्यास माहाराज सरकारातून ईरषाद होवू नये. व हल्ली राधाबाई साहेब यांचे अखत्यारात मेहरबां अमृतराव साहेब यानी काही खलल आणिला असेल तर तसे होवू नये. जसा राधाबाई साहेबांचा अखत्यार पाहिले पासून चालत आला आहे, त्याप्रमाणे सरकारचा हुकूम होई तो पर्यंत चालविला पाहिजे व अमृतराव साहेब पंडीत प्रतीनिधी यास हाल्ली माहाराज सरकारातून वस्त्रे दिली त्याविषयी आम्ही सरकारास कळविले आहे व पंडीत साहेबांचे वय खुद्द जातीने दौलतीचा अखत्यार चालवण्याजोगे जाहाले आहे असे आमचे नजरेस आले. परंतु केतकर दुसरे रीतीने सरकारास गैर समजावितात ये विषयी माहाराज सरकारातून काहीं कळवावयाचे असेल त्या विषयी तपशीलवार

याद सत्वर पाठविण्यात आली पाहिजे, म्हणजे सरकारास लिहिले जाईल.

सही इंग्रजी

ॲक्टींग पोलीटिकल एजंट

थैलीचे चिठ्ठीची तारीख छ १४ माहे मे सन १८३९ ईसवी मु॥ नीपाणी.



लेखांक : १८०

राव विश्वासराव गायकवाड दप्तर : १५ / ता. २१ मे १८३९

राजेश्री हिंदुराव बाबा गायकवाड सरखवास गोसावी यासी अखंडीत लक्ष्मी आलंकृत राजमान्य स्नेहांकीत नारायण बाजी घाटगे रामराम विनंती उपरी येथील कुशल ता॥ छ ७ माहे रबिलावल मु॥ नागपूर येथे आपले कृपेकरून यथास्थीत असो विशेष आपणांकडून बहुत दिवस जाहाले पत्र येवून वर्तमान काही समजण्यात आले नाही. तर अैसे न करावे. हमेशा येणारा मनुष्यासमागमे पत्र पाठवून कृपेची वृध्दी करीत जावी. यानंतर महाराजांचा काळ जाहाला हे ऐकून अंत:करण बहूत उदास आहे. परंतु ईश्वर सत्तेस उपाय नाही. नेमानेम जो होण्याचा तो होतोच आहे. आस्तु. चिरंजीव भवानराव बापु यांचा सांभाळ हरएक गोष्टी विषयी आपण करीतच आहा. लिहावे अैसे नाही. मात्र आमचा मानस एक वेळा चिरंजीवाची भेट व्हावी यास्तव दसरा दिवाळी जाहालीयावर रवानगी करण्यात यावी. वरकड मशार बाळा जाधव जबानी सांगता कळु येईल. कळावे बहुत काय लिहिणे हे विनंती.



लेखांक : १८१

हुजूर खाजगी दप्तर : १४ / ता. २८ जून '१८३९

श्रीमन्महाराज छत्रपती साहेब दाम अलताफहु नीयाज मंद एडवर्ड ह्यूम टॉनसेंड साहेब बाहादर आक्टिंग पोलीटिकल एजंट प्रांत कर्नाटक नियाज मारूज आंकी येथील खैरीयेत रोषन होवून अलताफनामा सादर जाहाला पाहिजे. दरी-विला मालवण बंड प्रकर्णी कित्येक माणूस कोल्हापूर ईलाखेतून पाठविले होते.

त्या पैकी काहीं माणसावरी रत्नागिरी ईलाखेत गुन्हा केल्यान्वये पुरावा न जाहाले वरून तशा माणसास कोल्हापुरास परत पाठवणेस सरकारचा हुकूम रत्नागिरी जेलला माजिस्ट्रेट साहेब यास गेला आहे व येथेही लिहिणे. सरकारचे पत्र छ १० जून १८३९ ईसवीचा आला आहे. सबब माहाराज छत्रपती साहेब यास इलतीमास करणेचे असे की या प्रकर्णाचे माणूस रत्नागिरीहून कोल्हापुरास येतील म्हणजे माहाराज सरकारात यांचे विचार होवून त्याजवरी काय गुन्हा ठरतो त्या जोगे शिक्षा काय ठरते ते मेहेरबानी करून अलताफनामा सादर जाहाला पाहिजे. थैलीचे चिठ्ठीची तारीख छ २८ माहे जून सन १८३९ ईसवी.



लेखांक : १८२

हुजूर खाजगी दप्तर १५ / ता. १२ ऑक्टोबर १८३९

श्रीमन्महाराज छत्रपती साहेब दाम आलताफहु नीयाजमंद ईडवर्ड ह्यूम टॉनसेंड साहेब बहादुर ॲक्टिंग पोलीटिकल येजंट प्रांत कर्नाटक नीयाज मारुज आंकी येथील खैरीयेत रोषन होवून हमेषा आलताफनामा सादर फर्माविले पाहिजे. दरीविला ईचलकरंजीकर व कागलकर व तोरगलकर याजवरी माहाराज छत्रपती साहेब यांची यख्तीयारी आहे अथवा त्यानी माहाराज छत्रपती साहेब याज कडील मोख्तीयार माणूस व कागदपत्र पाठवणेस माहाराज छत्रपती साहेब यास चार पांच पत्र पाठविले आहे. सेवटास केलासवासी माहाराज छत्रपती साहेबांची स्वारी तुळजापुरास गेल्यावरून तसेच राहिले. अशास हाल्ली तसे काहीं कारण सांगणेस राहिले नाही. सबब मोख्तीयारी माणसास कागदपत्र पाठवावे म्हणून कागलकर व तोरगलकरास पत्र पाठविले आहे. व ईचलकरंजीकरांनी आपले दाखले ईकडे दिले त्याची तालीक आमाहाराज यांचे वकील सदाशीवपंत याजकडे दिले आहे. सदरी जाबसालाबद्दल माहाराज छत्रपती साहेब याजकडील दाखला वगैरे लौकर पाठवणेस हुकूम व्हावा, या कामास सुरु होवून तीन वर्षे होत आले. ईत:पर वेवधान करणेस होत नाही.

सही ईग्रजीं
ॲक्टिंग पोलीटिकल एजंट

ता॥ १२ माहे ऑक्टोबर सन १८३९ ईसवी
थैलीचे चिठ्ठीवर ता॥. व सन लिहिले नव्हते.



लेखांक : १८३

निवडी : १२३८८ / ता. ६ डिसेंबर १८३९

यादी राजमंडळ हुजूर करवीर दरबारास ॲगटींग पोलीटिकल एजंट प्रांत कर्नाटक याजकडून कलम करणेंचे ऐसाजे.

१. कोल्हापूर येथे काहीं तंटा होणेचा डौल असे म्हणून इजत दस्तगाह सदाशीवपंत वकील याणी विदीत केलेवरून हाली येथील फलटणचा सुभेदार व शिपाई लोक पाठविले आहे. याणी दिवाण साहेब यांचे हुकुमात असून त्यांचे आज्ञेप्रमाणे तेथले बंदोबस्त राखतील.

ता॥ ६ माहे डिसेंबर सन १८३९ इसवी हुकेरी ता. चिकोडी.



लेखांक : १८४

निवडी : १७५९६ / ता. १३ जानेवारी १८४०

राजेश्रीया विराजीत राजमान्य राजश्री आनंदरावजी मंत्री यासी प्रती शिवराम भट लाटकर वास्तव्य मठ करवीर कृतानेक आशिर्वाद विनंती येथील क्षेम ता॥ छ ७ जिलकाद पावेतो आपले कृपे यथास्थीत असे. विशेष आम्ही परवा दिवशी रवीवारी दोन प्रहरी येथे आलो. सालाबाद प्रमाणे पौष मास उत्साह दोन दिवस सांग जाहाले. आज गोपाळकाला. आजचा दिवसही सांग होईल. आपले जाणे तिकडे जाहाले, परंतू जातेसमई उत्साहसंबंधे सालाबाद प्रमाणे भांडी व बिछाईती सामान वगैरे काही एक न्यून पडू नये असा बंदोबस्त सांगून आपले जाणे जाहाले म्हणोन राजेश्री विसोबा नाईक व बाबाजीराव तोरगलकर यानी सांगितले. त्या प्रमाणे काही न्यून न पडता सांगता जाहाली. सारांश सर्वेपरी संस्थानचे आगत्य आपलेस तेव्हा काही येक कमी पडावयाचे नाही. येथील उत्साह पौर्णिमेपर्यंत आहे. उदेक देकार होणार. पौर्णिमा होताच येथील आटपून आपलेकडे येतो. भेटीअंती सर्व कळो येईल. श्रीचे पत्र आपले नावे आले ते

हाल्ली पाठविले आहे. प्रविष्ट होईल. निरंतर पत्र पाठवून चित्त संतोषवीत असावे. बहुत काय लिहिणे लोभ करावा हे आशिर्वाद.

पा। छ ८ माहे जिलकाद सन आर्बेन मयातेन व आलफ.



लेखांक : १८५

हुजूर खाजगी दप्तर : १६ / ता. २३ जानेवारी १८४०

सरकारचा हुकुम आला त्याचा तरजुमा

१. कागल तालुका श्रीमन्महाराज छत्रपती साहेब करवीर यांचे इलाखा म्हणणेस उभयतामध्ये विवाद उत्पन्न झाले वरून त्याची तपासणी येथे करून छ १० माहे आक्टोबर सन १८३९ ईसवी व छ २ नवंबर व छ ३० माहे नवंबर सन १८३९ ईसवी ऐसे तीन वेळा सरकारास लिहिले होते. त्यांचे उत्तर ता॥ छ ११ जानेवारी सन १८४० ईसवीचे आहे त्यात.

१. कलमात अभिप्राय की, सदरी येथील पत्राबरोबर मागील दाखला आले, याशिवाय आणखी किती येक दाखला सरकारी दप्तरी होते ते एकंदर पाहाता कागलकर यानी कोल्हापूर ईलाखा नव्हे म्हणोन जी तक्रार करीत आहे ते वृथा व निर्नीमित्त्य आहे. आणि माहाराजांची आज्ञा कागलकर यानी मानावी असे गोरनर साहेब बाहादुर यांची खातरी होवून निःसंशय ठरला.

१. तिसरे कलमात यास्तव हां मजकूर श्रीमन्महाराज छत्रपती साहेब यास व कागलकर आस्मतपन्हा सुन्दराबाई साहेब यास सुदावथीन करावे. येप्रमाणे लिहून आले आहे.

अस्मतपन्हा सुन्दराबाई साहेब घाटगे यास पत्र गेले त्याची तालीक.

दरीविला कागल तालुका कोल्हापूर माहाराज छत्रपती साहेब यांचे ईलाखा नव्हे म्हणून आपले तक्रार होती. याजवरोन याची तपासणी होवून कागल करवीर ईलाखा म्हणणेस संशय राहिला नाही. माहाराज छत्रपती साहेब आज्ञाप्रमाणे आपण वर्तणूक केले पाहिजे, म्हणून सरकारचा हुकूम छ ११ माहे जानेवारी सन १८४० ईसवीचा सादर जाहालावरून त्या हुकुमाचा तरजुमा या पत्राबरोबर आस्मतपन्हा याजकडे विदीत असावे या बद्दल पाठविला आहे. आस्मतपन्हा यानीं माहाराज छत्रपती साहेब यांचे आज्ञा मानून त्याप्रमाणे वर्तणुक केले पाहिजे

यास व्यत्यय पडू नये आणि यामध्ये महाराजांचे आज्ञापत्र माघारे टाकिले आहेसे विदीत जाहाले आहे. अशास सदरी माघारे टाकिले ते पत्र परत आणून घेवून आणखी कामाविषयी माहाराजांचा हुकूम येईल त्याप्रमाणे उलघडा माहाराज सरकारातून जाहाला पाहिजे. जर करिता आस्मितपन्हा यानीं आमान्य करून तक्रार कराल तर माहाराज छत्रपती साहेब याचे विरुद्ध व कंपनी सरकारचे सलाह न ऐकिले असे दोन्ही प्राप्त होईल. त्याहुन अस्मतपन्हा यानी नुकसान प्राप्त होईल त्यास आपण भोगणे प्राप्त होईल. पूर्वीच अस्मतपन्हा यास विदीत आसावे म्हणून ईज्यानीबानी सुलाह कलमी केली आहे. ज्यावेळी श्रम वाटेल तेंव्हा आम्हास समजले नव्हते असे म्हणू नये. सूचनार्थ लिहिले आहे.

जीयादा काय लिहिणे. हमेषा खत पाठवून दील खुषी करीत असले पहिजे. ता।। छ २३ जानेवारी १८४० ईसवी. मुक्काम कोल्हापूर

सही····हणमंतराव नेटीव्ह एजंट

सही ईंग्रजी
पोलीटिकल एजंट



लेखांक : १८६

हुजूर खाजगी दप्तर : १७ / ता. २३ जानेवारी १८४०

श्रीमन्महाराज छत्रपती साहेब दाम अलताफहु अजनियाजमंद ईडवर्ड हुयम टौनसेंड साहेब बहादुर पोलीटिकल एजंट प्रांत कर्नाटक बा आजद नियाजमारुज हसुल आंके येथील खैरीयते रोशन होवून हमेषा अलताफ नाम सादर होत असला पाहिजे. दरी आयाम कागल प्रांत कोल्हापूर ईलाखा नव्हे म्हणून आस्मतपनाहा सुन्दराबाई साहेब यानी तक्रार केले प्रकर्णी सरकारात तजबीज होवून दाखला पाहून कागल तालुका आमाहाराज छत्रपती साहेब यांचे ईलाखा म्हणणेस संशय राहिला नाही. कागलकरानी माहाराजांचे आज्ञा प्रमाणे वर्तणूक करावी म्हणून सरकारचे पत्र छ ११ जानेवारी १८४० ईसवीचे आले वरून त्या हूकुमाचा तरजुमा या नीयाजनाम्याबरोबर पाठविला आहे. मुलाहिज फर्माविला असता चित्तास श्रुत होईल. आणि याविषयी कागलकर अस्मतपन्ह-सुन्दराबाई साहेबास पत्र लिहिले त्याची तालीकही पाठविली आहे रोशन होय.

१. येन कलम.

२. ईचलकरंजीकर यानी आपण कोल्हापूर ईलाखा नव्हे म्हणून किती एक तक्रार कलम ईनियाज मंदाकडे मेहेरबा केशवराव साहेब घोरपडे यानी लिहून दिले वरून त्याची तालीक माहाराजांचे वकिलास देवून त्याविषयी छ १० माहे आक्टोबर सन १८३९ ईसवीस यादी पाठविली आहे. त्याचे उत्तर आले नाही. त्याप्रमाणे उत्तर लिहून आले पाहिजे. याविषयी छ ११ माहे जानेवारी १८४० ईसवी सरकारचे पत्र आल्यात एक कलम लिहिले आहे की, ईचलकरंजीकरांचे तक्रार ऐकूण घ्यावे. त्याचे उत्तर घेवून सरकारास लिहावे म्हणून. परंतु जो पर्यंत सरकारातून उलट दुसरा हुकूम मिळेल तो पर्यंत मागील सरकारचे ठराव प्रमाणे ईचलकरंजीकरानी माहाराज छत्रपती साहेब यांचे आज्ञा मानिले पाहिजे. याजबद्दल ईचलकरंजीकरास निराळे पत्र लिहून गेले आहे.

सही – हणमंतराव नेटिव्ह एजंट

सही इंग्रजी
पोलीटिकल एजंट

थैलीचे चिठ्ठीची ता॥ २३ जानेवारी १८४० ईसवी.



लेखांक : १८७

निवडी : १२५३० / ता. २३ एप्रिल १८४०

यादी श्रीमन्महाराज छत्रपतीसाहेब यांचे दरबारास अजम क्याम्बेल साहेब बहादुर फर्स्ट असिस्टंट कलेक्टर इन चार्ज पोलिटिकल एजंट प्रांत कर्नाटक कडून ऐसाजे.

१. सातारा इलाखा प्रचीतगडाकडे चतुरसींग म्हणणारांचे बंडास उपक्रम जाहला. त्याच्या बंदोबस्तीचे तजवीज चालू आहे. परंतु सदरहू बंड लोकांचे कुमक बद्दल आ महाराज छत्रपती साहेबांचे इलाखेतील कोणी माणूस गेले असल्यास त्याचा पक्का शोध करणेस हुकुम होऊन तसले लोकास धरून गीर करवून चांगले शासन जहाले पाहिजे.

२. विशाळगड इलाखेतून कोणी लोक या बंडास गेले असतील त्यांनाही सदरी प्रमाणे धरून गीर होऊन शिक्षा जाहल्या पाहिजे. यास्तव या कामाविषई विशाळगडकर अस्मतपन्हा राधाबाई साहेब प्रतिनिधी यांचे नावे थैली लिहून रवाना केली आहे. बाई साहेबाकडे ,पोहोचत होऊन बंदोबस्त जहालेचे उत्तर आणवून पाठविले पाहिजे.

सदरहू कलमी केल्या अन्वये बंदोबस्त जाहल्याची मेहेरबानगी करून इंज्यानिब्रास कलमी होईल अशी उमेद आहे.

जियादा काय लिहिणे. तारीख २३ माहे एप्रील सन १८४०

मुक्काम सौंदत्ती तालुका परशगड

सही–हणमंतराव

नेटिव्ह एजंट



लेखांक : १८८

निवडी : १२३७८ / ता. १६ जून १८४०

यादी राजमंडळ हुजूर करवीर सरकारातून अजम आदम क्यांबेल साहेब बहाद्दर इनचार्ज पोलीटकल एजंट, प्रांत कर्नाटक यासी १ माहे जून सन १८४० विसवीची यादी आली. त्यात कोल्हापूर येथे टंगसाळ ठेऊन आध्येल्या, पावल्या व मोहरा, होन तयार होत आहेत म्हणून खबर आली आहे. याजविसी मजकूर कसा आहे तो लिहावा म्हणून कलमी केले. त्यास हुजूर सरकारातून काही व्रतबंध अगर लग्न वगैरे काही दानधर्म असे कारण उत्पन्न जहाले म्हणजे टंगसाळ सुरू करून त्या कारणाबद्दल रुपये, अधेल्या, पावल्या वगैरे नाणे त्या खर्चापुरते करावे व दसरा, दिपवाली, संवंत्सर प्रतिपदा असे सणाचे दिवसी हुजूर खाजगीकडे वोवाळणी बद्दल होन व मोहरा लागतात त्या दर सणास सदरहू नाणे सुमारे चाळीस पन्नासीचे आत करवावे लागतात अशी वहिवाट आजपर्यंत चालत आहे. याप्रमाणे हल्लीही व्रतबंधाचे धर्मादाय वगैरे खर्चापुरते टंगसाळीत अधेल्या व पावल्या व रुपये व होन व मोहरा असे नाणे ,तयार करवून सांप्रदायप्रमाणे खर्च जहाला आहे. शके १७६२ सार्वरीनाम सवंत्सरे जेष्ठ व ॥ २ सोमवार.



लेखांक : १८९

निवडी : १२११८ / ता. १४ जुलै १८४०

यादी श्रीमन्महाराज छत्रपती साहेब करवीर यांचे दरबारांत एडवर्ड टोनसेंड साहेब पोलिटिकल एजंट प्रांत कर्नाटक याजकडून कलमी केले ऐसाजे.

१. आमहाराज छत्रपती साहेबांचे दरबारातून जेष्ठ व॥ २ सोमवारची यादी आली. त्यात महाराज सरकारात दसरा दिपवाली वगैरे सणाचे ववाळणीबद्दल अगर लग्न व व्रतबंध जहालेस दानधर्म करण्यांस रुपये व मोहरा वगैरे करणेची चाल आहे म्हणून कलमी जाहले. त्यास इंग्रजी सरकारचे अम्मल जहालेपासून कोल्हापुरात कोणते साली किती रुपये, होन वगैरे पाडून झाले. त्याची सालवार एक यादी लिहून पाठविली पाहिजे.

तारीख १४ माहे जुलई सन १८४० इसवी मुक्काम बेळगांव.



लेखांक : १९०

निवडी : १२२०५ / ता. ३ सप्टेंबर १८४०

यादी श्रीमन्महाराज छत्रपतीसाहेबाचे दरबारास कर्नाटक प्रांत पोलिटिक्याल एजंट एडवर्ड टौनसेंड साहेब याजकडून कलमी करणेचे ऐसीजे.

१. महाराज छत्रपती साहेबाचे दरबारातून जेष्ठ व ॥ २ चा[1] ता. १७ जून १८४० याद आले त्यात कोल्हापुरात टंगसाळ ठेऊन व्रतबंध व धर्मादाये खर्चापुरते आधेल्या, पावल्या व रुपये, होन व मोहरा तयार करविल्या आहेत म्हणून कलमी जाहले. अशास कोल्हापूर येथे टंगसाळेत रुपये छापिले प्रकर्णी छ २९ माहे ऑगष्ट सन १८४० इसवी सरकारचे पत्र आले आहे. त्यावरून कलमी केले जाते ते कलमात सरकारचा हुकूम असा आहे की टंगसाळेत रुपये छापणेस कंपणी इंग्रज बहादुर याचे सरकाराखेरीज दुसरे कोठेही टंगसाळ घालू नये म्हणोन त्यावरून टंकसाळ कोठेही चालविता येत नाही. यास्तव काही इतःपर करवीर येथे मोठा प्रयोजन असून रुपये वगैरे, छापण्याचे आगत्य येविसी मात्र अमूक रुपये पर्यंत, अमूक वजनाचे व किंमत अमूक रुपये दिले पाहिजे.

१ ता. १७ जून १८४०

म्हणोन प्रथम सरकारात लिहून कळवून सरकारची अंगीकरे घेऊन त्यानंतर छापीले पाहिजे. सरकारच्या सल्याखेरीज टंगसाल चालवू नये हे महाराज सरकारचे ध्यानात असले पाहिजे.

रवाना. ३ माहे सप्टेंबर सन १८४० इसवी मु ॥. बेळगांव



लेखांक : १९१

निवडी : १२४९५ / ता. १५ सप्टेंबर १८४०

यादी श्रीमन्महाराज छत्रपती साहेबांचे दरबारात कर्नाटक प्रांत पोलिटिकल एजंट एडवर्ड ह्यू टोनसेंड साहेब याजकडून कलमी करणेंचे ऐसाजे.

१. छा। ८ सपटंबर सन १८४० इसवीचा सरकारचे पत्र आले ते पाऊन आ साहेबास कलमी करणेचे असे की संस्थानात व जहागिरदाराकडे व त्यांचे इलाखेत सुद्धा जहागिरदार व संस्थानिकाचा पुत्र व जहागिरदाराचा पुत्र किंव बंधू व पुतण्या असे आप्त आणि मुख्य कारभारी व मोठा मानकरी व शिकमी सरंजामदार व जहागिरदार वगैरे मोठे लोक असतील त्यांची इसमवार याद पाहिजे म्हणून सरकारचे पत्र व त्याबरोबर नमुने बद्दल नागपूर संस्थानचे बडे लोकांचा याद सुद्धा आले वरून लिहिले आहे. मेहरबानगी करून सरकारातून सदरी लिहिणे आले प्रमाणे आ साहेबांचे इलाखेचा लोकांचे नाव निसीवार याद मेहरबानगी करून तयार करवून पाठविले पाहिजे.

रवाना छ १५ माहे सप्टेंबर सन १८४० इसवी

सही हणमंतराव नेटिव्ह एजंट.

सही इंग्रजी.



लेखांक : १९२

निवडी : १२३९५ / ता. ७ नोव्हेंबर १८४०

यादी राजमंडळ हुजूर करवीर सरकारातून अजम अलेकझांडर निसबेट साहेब बहादूर आगटींग पोलेटख्याल एजंट प्रांत कर्नाटक यासी सुमा आर्बेन इहदे मयातेन व आलफ, तारीख ७ नोव्हेंबर सन १८४० इसवीची यादी

आली. त्यात मानकरी वगैरे लोकांचे पत्रक आले ते पाहण्यात आले. त्या पत्रकावर कोणाची सही नाही करिता परत पाठविली आहे. पत्रकाखाली कारभारी याची सही होऊन आले पाहिजे. या अन्वये लिहीले, त्याजवरून लिहीले प्रमाणे सही करवून आसाहेब्राकडे पाठविले आहे. मिती पौष. शुद्ध ७ शके १७६२ शार्वरी नाम संवत्सरे छ ५ माहे जिलकाद.



लेखांक : १९३

निवडी : २३७३९ / ता. ९ मार्च १८४१

यादी राजमंडळ हुजूर करवीर सरकारातून अजम अलेकज्यांडर निसवट साहेब बहादुर ॲगटींग पोलिटिकल एजंट प्र॥ कर्नाटक यासी सुमा ईहिदे अर्बेन मयातेन व अलफे. हिंदुराव गाइकवाड सरखवास याणी फाल्गून शु॥ पौर्णिमा[1] रविवारी सेवकपणाचा इरादा सोडून हुकुमास अमर्याद वर्तणूक केली तो मजकूर.

१. पौर्णिमे दिवसी प्रतिवर्षी सर्वत्र हिंदु रिवाजाप्रमाणे होलिका पूजन अस्तमानी व्हावयाचे ते दिवशी दीडघटका रात्री पर्यंत पौर्णिमा होती. तितकेत पूजा व्हावयाची. ती हुजूरची स्वारी जाऊन करणेचा सांप्रदाय असता देवघरात उभयेता महाराजापासी सरखवास याणी जाऊन होळी पूजनास स्वारी होऊ नये, पूजा करू देणार नाही, म्हणून अडथळा केला. व आपले खासगीची माणसे हत्यार बंद दहा असामी घेऊन खटले करिता होळीजवळ आडून बसले.

१. तेच रोजी दरमहिनेचे पौर्णिमेस गोंधळ श्रीपासी देवघरापुढे होणेची चाल, त्यास अटकाव जाहला.

१. अनादी कुलधर्म प्रतिवर्षी वा पौर्णिमेस वाडियात श्रीमन्महाराज बाई साहेब याणी उपोषीत राहून अस्तमानी स्नान करून श्रीची पूजावीधी सांप्रदाय प्रमाणे करण्याची चाल. ती पूजा करू नये व पूजा साहित्य वाडीयात नेऊ नये म्हणोन देवघरचे मंडळीला जोर ताकीद करून पूजेच्या सामानापासी हत्यारबंद सिपाई बसवोन अडथळा केला व जबरीने जहालेस कलह मनस्वी वाढवावा असे तंटेस आणिले.

---

[1] ता. ७ मार्च १८४१

१. असे तंटेचा प्रकार सरकारात समजताच गोविंद शिवरामजी अकबर निवीस यासी आणून राजश्री सदाशिव याजकडे पाठवून त्यानी सरकारचे कुलधर्मास तुम्ही अडथळा करण्याचे कारण काय म्हणून विचारले. त्याजपाशी रीतीचे उत्तर न करिता सातारेहून स्वारी आली ते वेळीस परस्परे सतके म्हणून मोहोरा उतरून ठेवावयाची चाल आहे, त्या मोहरा आपलेस यावया त्या दिल्हेशिवाय पूजा करू देणार नाही. मी आपले देहावर उदार आहे. ही गोष्ट मजपासी कोणी बोलू नये. असे आग्रहाने बोलू लागले. वकील व कित्येक मंडळीनी समजावून सांगितले की महाराजांचे भेटीचा दाखला फार दिवसाचा. त्याचा शोध पाहून वाजवी असेल तेच सरकार करतील. यास जिमा आमची आहे. असी खातरी केली तरी येकेनात. सबब समक्ष बोलावून समजूत देणेकरिता राजश्री जयराम भोसले हवालदार यासी पाठवून वाड्यात बोलाविले. तो हुकुम अमान्य करून येत नाही असे निष्ठूर उत्तर करून चिडास येऊन भोसले यासी फार बेअदबी केली. तेव्हा कारभारी याचे गळेतील मोती वगैरे जिनसाची माळ पाचसेहे रुपये किंमतीची आजमासेची नेऊन देऊन चौकशीने ठरेल तसे करिता येईल, अशी समजूत कारभारी यानी करून बारा घटका रात्रीस कुलधर्म पुजा व होळी व गोंधळ चालू जाहला. परंतु अपरात्र जाहलेमुळे उपोषणाची पारणे जाहले नाही. तेणेकरून धनीपणाची मर्यादा न राहता हुकूम चालनेस व लौकिकास फार विरुद्ध केले.

एकूण कलमे चार. मिती शके १७६२ शार्वरी नामसंवत्सरे फाल्गुन व।। २ छ १५ माहे मोहरम रुजू मोर्तब श्रीमंत महाराज मातोश्री दिवाण साहेब याज कडील असे.



लेखांक : १९४

निवडी : १२१२८ / ता. १५ मार्च १८४१

यादी श्रीमन्महाराज छत्रपती साहेबाचे दरबारात आलेकझांडर निसबट साहेब बाहादुर ॲगटींग पोलिटक्याल एजंट प्रांत कर्नाटक याजकडून कलमी केली जाते जे.

१. काबूल खंदाराकडून हासन महमद याचे पत्र म्हणून घेऊन आलेले मनुष्यास चौकशी करून त्याची जबानी व त्याजकडे होते ते लखोटे सुद्धा फाल्गून शु॥ १३ चे यादी बरोबर पाठवीणे जहाले होते तर ते विसी सरकारास रिपोरट केला आहे. तूर्त त्या आसामीस कोल्हापुरात ठेविले पाहिजे.

ता॥ १५ मार्च १८४१ इसवी मु॥ १२५० फसली. मु॥ रामघाट

सही हणमंतराव.



लेखांक : १९५

निवडी : ८०३४ / ता. १३ नोव्हेंबर १८४१

पुरसीस माया बिन येंकापा धनगर शेत सनदी मौजे सौंदत्ती प्रांत रायबाग, सुमा सन अर्बान मयातेन व आलफ माहे रमजान उर्फ अश्विनमास शके १७६३ प्लवंग नाम सवंत्सरे.[1]

पुरसीस

मौजे मजकूरचे ठाण्यात तपोनिधीचे भागीरथ गिरी गोसावी याणी काही नवसीर लोक जमविले आहेत की काय ते लिहून देणे छ २२ रोज.
(ता. ७ नोव्हेंबर १८४१)

उत्तर

ठाणे प्रांत येथील व्यवस्था राजश्री आण्णा पाच्छापुरकर याजकडे आहे. त्यानी नवसीर लोक वीस असामी ठेविले आहेत. मजकुर दस्तूर रामाजी केशवराव रुईकर.

पुरसीस

ते लोक कोठील, कोणत्या गावचे आहेत ते लिहून देणे.

उत्तर

मौजे शिरगुप्पी येथील शेत सनदी असामी आठ, व मौजे कलोळ चिकोडी येथील असामी आठ सेत सनदी आहेत की इतलाख आहे हे मला ठाऊक नाही. छ॥ मजकूर दस्तूर रामाजी केशवराव रुईकर.

१. आक्टोबर १८४१

वि॥ सदरहु शिवाय आण्णाप्पा याचे कारकून यासी चार असामी. येकूण वीस आसामी आहेत. दस्तूर मशार निल्ले.

पुरसीस

हूजूर करविरास मौजे मजकूर येथींल रयता फिर्यादीस आल्या त्या पैकी जोंधळ्याची वगैरे पेवे कोणाची व घरे मोडून गोसावी याणे नेहली आहेत किंवा नाहीत ते लिहून देणे.

उत्तर

जखण्णा रयत याची दोन पेवे ज्वारीची व घरे दोन मोडून नेहली व त्याचा गुराचा कडबा झाडून लुटून नेहला. दस्तूर रामाजी केशवराव रुईकर नील्ले.

पुरसीस

जखण्णा रयत याची घरे दोन मोडून नेहली व पेवं कडबा लुटून नेहला म्हणून लिहेलेत. त्यास याशिवाय आणखी कोणास काय इजा दिल्ही आहे ते लिहून देणे.

उत्तर

१. चोळाप्पा रयत याचा कडबा लुटून नेहला आहे.

१. सल्या रयत याचे घर येक मोडून नेहले.

१. रामसिंग याचे घर मोडून येक महिना झाला.

याप्रमाणे गोसावी याणी केले आहे. यासिवाय मजला काही माहित नाही छ॥ मजकूर दस्तूर रामजी केशवराव रूईकर.

पुरसीस

जखण्णा रयत व सल्या व रामसिंग यांची घरे गोसावी याणी मोडून नेहली म्हणून सदरी जबाबात लिहून दिल्हेत. त्यास त्याचे घरातील जिंदगी लुटून नेहली आहे कि काय ते लिहून देणे.

उत्तर

जिंदगी लुटून नेहली त्याची माहीत मला नाही. दस्तूर रामाजी केशव रूईकर नि॥.

मया बिन व्यंकपा धनगर पु॥. शेत सनदी मौजे सौंदत्ती. सुमा सन आरबा माहे रमजान अस्वीनमास छ॥ २२ माहे[1].

पुरसीस

तपोनिधी जमगिरत गीरी गोसावी याणे नवे लोक ठेविले ते किती असामी होते आणि कधी ठेविले ते लिहून देणे.

उत्तर

बावा याणे नवेलोक ठेवीले ते हुजूरचे लोक जाणेचे अगोदर आसामी पंधरा सोळा ठेविले होते. ते हुजुरचे लोक जाणेचे संधीस दाहा असामी शिरगुपीचे आणविले येकूण असामी सव्वीस नवीन ठेविल्या. दस्तूर अंताजी मोरेश्वर नंदगावकर.

पुरसीस

हुजूर सरकारातून ठाणे मजकुरास हुजूर व कारकून व लोक पाठविले. त्यास गोसावी याणे मारामारी करून घालवून दिल्हेचा मजकूर कसा जहाला तो वास्तविक लिहून देणे. छ॥ २८ माहे रमजान.

उत्तर

हुजूर व लोक चावडीत होते व कारकून व जासूद भटाचे घरी होते. तेव्हा ठाणेतून माधवगिरी बाबा चावडीत येऊन हुजूर व लोक यांसी बोलिला जे तुम्ही येथून निघोन जाणे यात बरेपणा आहे. तेव्हा हुजूर बोलिले की तुम्ही आम्ही काही मजकूर बोलून उठून नंतर जाऊ, असे बोलले. तेव्हा बावा त्यांस बोलिले की उद्या लढाईस येणेचे असलेस आजच येणे परंतु येथून बरे गोष्टीने उठून जाणे, असे बोलिले. आणि जासूद व कारकून याजकडे गावंडळ लोक बावाने पाठविले होते तिकडे सरकारचे लोकांस घातले आणि धक्काबुक्कीत आमचे लोकांचे काठीचा पेट लागला म्हणून मी ऐकले. मी कांही डोळ्यानी पाहिले नाही. दस्तूर सेवेस. विंनंती. रामाजी केशव रुईकर.



---

१. ता. ६ नोव्हेंबर १८४१

लेखांक : १९६

निवडी : १२५४४ / ता. १८ नोव्हेंबर १८४१

यादी श्रीमन्महाराज छत्रपती साहेबाचे दरबाराची, अलेक्झांडर निसबट साहेब बहादूर ॲगटिंग पोलिटिक्याल एजंट प्रांत कर्नाटक याजकडून कलमी केले जाते जे.

१. श्रीमन्महाराज ताराबाई साहेब याजकडील व श्रीमन्महाराज छत्रपती साहेबाकडील पहारेस विश्वासूक असे बंदूक बारदार पन्नास असामी असत त्यास मनोहरगडचे सबबणे आणि पुष्कळ लोक असता श्रीमन्महाराजांचे व ताराबाई साहेबाचे इतिल्लेशिवाय काढले आणि पाटणकर याजवर कैलासवासी महाराजाची बेमर्जी होऊन गावातून बाहेर केले असता त्यास हल्ली कोल्हापुरास आणून महाराजांचे भेटीस दरबारास आणणेचा बेत केला. तेव्हा महाराजानी दरबारास न येणेचे मानसीक केले असता परभारी कचेरी करून..........वगैरे करून बरखास्त केली व कागलास मेहेरबान नारायणराव साहेब घाटगे यास कैलासवासी महाराजांची कन्या देणेची तजवीज जहाली आहे. त्याजवरून कागलास जाऊन मेवामिठाई वगैरे घेऊन विश्वासूक हुजऱ्या जात असता त्यास न जाणे विषयी ताकीद जाली. याप्रमाणे कारभारी लोकांकडून श्रीमन्महाराज ताराबाईसाहेब व महाराज यांची नाखुषीचे काम चालले आहे, म्हणून परभारे विदीत झाले. यावरून कलमी केले जाते जे याची हकीगत कैसी आहे ती मेहेरबानगी करून उत्तर पाठविले पाहिजे.

रवाना. ता॥ १८ माहे नोव्हेंबर १८४१इसवी मुकाम बेळगांव
सही हणमंतराव नेटिव्ह एजंट

सही इंग्रजी



लेखांक : १९७

निवडी : ७९४३ / इ. स. १८४१–४२

चिरंजीव राजेश्री सदाशिव अनंत यांसी आशिर्वाद उपरी.

तुमचे कडील पत्र येऊन कळत नाही. त्यास सविस्तर लिहून पाठवावे.

इकडील मजकूर तरी मौजे यळगूड येथील मुक्कामाहून चिकोडीचे शिपायाबरोबर पत्र पाठविले आहे. त्याजवरून कळलेच असेल. सविस्तर चिरंजीव राजेश्री बाबुराव मावळेकर यानी पत्र पाठविले आहे त्याजवरून कळले असेल. चिकोडीहून खजीणा आणावयास कारकून व लोक हुबळीस गेले होते त्यानी खजीणा घेऊन चिकोडीस आले ते बापूराव यांजपासी बोलले जे दुमालपत्रासिवाय ठाणे देऊ नये, असे आम्हास कचेरीवाले व बहादर यानी सांगितले आहे. त्यास दुमालपत्र आल्या-शिवाय ठाणे देणार नाही. याप्रमाणे बोललेवरून बापूराव याणी आम्हास लिहिले होते. त्याजवरून येच विसईचा पर्याय तुम्हास लिहीलाच आहे. त्याप्रमाणे तेथे यातील काही आंदेशा आढळल्यास शोध घेऊन रामराव यासी दुमाला पत्र घेऊन पाठवणे. जे ठाणे गावसुद्धा दरोबस्त तालुका हुजूरचे स्वाधीन करून श्री सांगतील त्याप्रमाणे दरोबस्त कलमे उलगडून देऊन निरोप देतील ते समई निघुन येणे त्याप्रमाणे एक पत्र जलद घेऊन पाठवून देणे. रामरावजी व नरसिंगराव हे उभयता बरोबर घेऊन आले ते श्री चे........उतरावयासी जागा करून देऊन उस्तावरी राखिली आहे. त्याणी तो माहितगार यात पडला नाही. सोडचिठ्ठी लिहून देतो असे बोलतात. हुबळीहून आला तो काही अद्यापी येथे आला नाही. येथे आल्यावर बापूराव याज पासी बोलले प्रमाणे असल्यास हेही दिक्कत घेतील. नसल्यास सोडचिठी देतच आहेत. परंतु जाहला मजकूर तुम्हास कळावे करिता लिहिला आहे. सारांष पत्र घेऊन पाटविलेस अती उत्तम आहे. तसेच वल्लभगडा-विसी पेशजी सिरवी कुरबावेहुन पत्र पाठविले आहे. राजश्री नीलकंठराव याची व आमची गाठ पडून बोलणी जाहली. तोही मजकूर लिहीला आहे. त्यास पंधरा दिवस सुमार होत आले. उत्तर कांहीच आले नाही. त्यास नीलकंठराव याची गाठ घालून त्याची खातरजमा करून पत्र घेऊन द्यावे. म्हणजे ठाणे स्वाधीन देईल. येथील मजकुर तरी, आम्ही यळगूडचे मुक्कामाहून निघोन मार्गात बाईसाहेबांचे वर्तमान ऐकले तेव्हा तिचेच घरास येऊन वाड्यात गेलो. चिरंजीव वहिनी व श्रियासह चिरंजीव राजेश्री छत्रपतींची गाठ पडून समाधानार्थ बोलणी जहाली. तीन दिवस गुन्ता आहे तो दूर केले नंतर बोलणी होईल. त्यामजकुरा-प्रमाणे लिहून पाठवू, सारांश मर्जी उत्तम आहे. बहूत काय लिहणे. छ २१. माहे शबाल.



लेखांक : १९८

निवडी : १९२९८ / इ. स. १८४१-४२

चिरंजीव राजश्री गोविंदराव गाईकवाड यासी प्रती दिनकरराव गाईकवाड अनेक आशीर्वाद उपरी येथील त।। १६ जिल्हेज वर्तमान यथास्थीत आसे विशेश. मुक्काम करवीराहून निघालो ते आस्तमानी साळवणास पोहचलो. सरकारात विंनंतीपत्र पाठविले आहे. हे प्रविष्ट करून आज्ञोत्तर घेऊन पाठवणे. पत्नीकरिता मोरआवळा व गुलकंद पाहिजे. त्यास सरकारात विनंती करून मागोन घेऊन पाठवून द्यावा......... विचारणार राजश्री आनंदराव मंत्री यांचे पत्री लिहीला आहे. त्या प्रमाणे मागोन घेऊन पाठवून घ्यावीत आणी तुम्ही रात्रंदिवस वाड्यात असून सरकारचे प्रकृतीचा मजकुर वरचेवर लेहून पाठवित जाणे. बहुत काय लिहीणे. गल्ला बसवीलेची दाद पाटविली आहे. त्या प्रमाणे पत्रें पाठविणेची ती डाक वरून पाठवित जाणे हे आशीर्वाद.



लेखांक : १९९

हुजूर खाजगी दप्तर : १८ / इ. स. १८४१-४२

श्रीमन्महाराज छत्रपती साहेब दाम अलताफहु नियाजमंद ईडवर्ड टौनसेंड साहेब बाहादुर ॲक्टिंग पोलीटिकल एजंट प्रांत कर्नाटक नियाज मारुज आंकी येथील खैरीयते रोषन हमेशा अलताफनामा सादर फर्मावीत असला पाहिजे. दरीअयाम आमाहाराज छत्रपती साहेब याजकडून सादर होणेचे अलताफनामा व याद्या वगैरे कागद पत्रात आरबी साल व मुसलमानी तारीख व महिना लिहित असतात, ते चाल येथे नाही. येथील रिवाज इंग्रजी साल महिना तारीख, व शके साल महिना व तिथी घालणेचे चाल आहे. याजवरून तारीखचा दाखला बराबर न पडता हरकत पडत आहे. यास्तव नीयाजमंद ईलतीमास करणेचे असे की आमाहाराज छत्रपती साहेब याजकडून ईत:पर हरएक कागद पत्र व याद्या ईकडे यतात त्यात आरबी साल व मुसलमानी महिना तारीख............ घातले तरी चिंता नाही. परंतु त्यात हींदवी शके व साल व महिना तीथी वार लिहून आला पाहिजे. (म्हणजे) ईकडे लिहिणेचे चालीस व तिकडून लिहिणे

जाहले तारखेस दाखला पडून काम खुस चालुन खातर मुबारकेस आणून याप्रमाणे वहिवाट चालवणेस हुकूम होईल अशी ईनीयाजमंदाची उमेद आहे.

सही —
हणमंतराव नेटीव्ह एजंट.

सही इंग्रजी
ॲक्टिंग पोलीटिकल एजंट.



लेखांक : २००

राव विश्वासराव गायकवाड दप्तर : १६ / इ. स. १८४०–४१

शेवेशी विज्ञापना ऐसीजे – स्वारीचा मुक्काम पंचगंगेचे काठास रुकडीचे रानात दीड घटका रात्री जाहाला.

भृगुवार प्रात:कालीचे कुच होऊन मौजे टाकवडे मुक्कामास स्वारी प्रहर दिवसाचे आत पोहचणार. स्वारीबरोबर सात आसामी स्वार दिले आहेत ऐसी आज्ञा जाहाली होती. परंतू एक देखील स्वार स्वारी बरोबर नाही. सांडी स्वार मात्र बरोबर आहे. टाकवडेस पुढे सूचना पाठवणेस स्वार पाहिजे ते रुकडी मुक्कामेचे बाळकृष्ण पागे कडील घेवून पाठविले. हाल्ली सायंकाळ पर्यंत तरी टाकवडेस मुक्कामी स्वार येवून पोहचणेची आज्ञा व्हावी. हुजुरचे पूजेस फुले ईकडे मिळावयाची नाहीत. त्यास तिकडून तजवीज असावी. वाटेचे माहीतगारीस स्वाराशिवाय फार खोळंबा होतो. सेवेशी श्रुत होय हे विज्ञापना.



लेखांक : २०१

निबडी : १२१५९ / ता. १७ मार्च १८४२

यादी रूद्राजी बिन येसाजी पाटील नि॥. नारायणराव भोसले सन १२५१ फसली लिहून दिल्ही ऐसाजे.

१. धर्मसंस्थान मामलेचे काम आमचेकडून तीन हजार रुपये घेऊन मामले मजकूरपैकी वजा घेऊन म्हणोन आमचे नाव आज्ञा पत्र खुदतीत श्रीमन्महाराज छत्रपती साहेब याणी आपले रूजूचे ता॥ छ २९ माहे जिलकाद

सु॥ सबा सलासीन मयातेन व आलफेचे साली[1] करून हे देऊन सदरहू रुपये घेतले आणि मामले मजकूरकडे वहिवाटीस आज्ञापत्र घेऊन वहिवाट आम्हांस सांगितली वरून अदमासे दीडवर्ष वहिवाट केली. तेव्हा सदरी ती। श्रीमन्महाराज छत्रपती साहेब हे श्री तुळजापुरांस गेले तेव्हा तेथे श्रीमन्महाराज बावासाहेब यांचा काल जाहले नंतर स्वारी माघारी करविरास आली. तेव्हा पुढे कारभारी याणी मामलेचे कामाची घालमील केली. तेव्हां सदरी तीनहजार रुपये सावकारी काढून दिल्हे. तो ऐवज व हल्ली सावकार लोक याचे कर्ज काढून धर्म संस्थानास खर्च केला तो ऐवज दिल्हा नाही. आणि कामही आम्हाकडे सांगितले नाही. त्यास सावकारी देणेची यादी व आज्ञा पत्र हजर आहे ते खाविंदानी पाहिले पाहिजे म्हणोन सरकारची खात्री होईल. कारभारी मजकूर याप्रमाणे मनमानेल तसे करितात. येविसीचा बंदोबस्त सरकारातून होईल. आमचा मामला आम्हाकडे सांगावा. नाही पेक्षा सावकारी देणेचा उलगडा करून देणेविसी हुकूम व्हावा. कलम.

२. परभारे सावकार यासी चितावणी करून सावकार लोक याजकडून आम्हास उपद्रव करवितात. कलम.

३. ठाणे सावर्डे इलाखा करवीर हा गाव आमचा असे असतां रयत लोक व गावकरी यांस फितवून मनमानेल तसे बखेडे करवितात. कारभारी वसुलास हरकत आणीत असोन केली त्यास येविसीचा बंदोबस्त होऊन वसूल सुरळीतपणे देणेविसी हुकूम व्हावा. कलम.

४. मातोश्रीचे व आमचे एकठिकाणी घडून येत नाही. सबब आम्ही मातोश्रीचे खर्चीस परभारे देत असतां मातोश्रीस पाठीशी घालोन तेविसी विजा फार देतात. कलम.

याप्रमाणे मजकूर आहे तो खविंदानी ध्यानी घेऊन बंदोबस्त करून देणेस खाविंद समर्थ आहेत. आम्हास इजा फार होते ती न होणेची हुकूम जाहला पाहिजे. ता॥ १७ माहे मार्च सन १८४२ इसवी.



---

१. ता. ७ मार्च १८३७

लेखांक : २०२

निवडी : ११९८२ / ता. ११ मे १८४२

श्रीमन्महाराज मातोश्री दिवाणसाहेब यांचे नावे थैली पोलिटिकाल एजंट साहेब बहादुर यासी रवाना त्याची तालीक हरविली. आबाहादरानी खलिताची थैली ता। ६ माहे मे ची पाठविली ती रसीद होऊन बयाजवार मजकूर इजहार जहाला. श्रीयासह चिरंजीव विजयीभव राजेश्री राजे बाबासाहेब छत्रपती व श्रियासह चिरंजीव विजयीभव राजे चिमणासाहेब छत्रपती यासी इंग्रजी लिहिणेचे अभ्यासाकरिता स्लेट व कलमे आबहादरानी पाठविली ती पोहोंचली. श्रियासह चिरंजीव विजईभव राजश्री राजे चिमणासाहेब छत्रपती यासी विद्याभ्यास उनाचे वेळेस मात्र करवू नये. कारण की तेंव्हा सुस्थीचा वेळ. त्यापेक्षा थंडीचे वेळी तबीयत हुशारी राहून हलके ज्याजती शिकतील म्हणोन आबाहादरानी त्या मवाफीक थंडीचे वेळी विद्याभ्यास करणेविसी आज्ञा जाहली आहे. इंग्रजी पोथी वगैरे गिरामी रुतबात गोरनर साहेब बहादुर याणी पाठवणेचे तजबीज आहे. इतकीयात श्रियासह चिरंजीव विजयीभव राजेश्री राजे बाबासाहेब छत्रपती व श्रियासह चिरंजीव विजयीभव राजश्री राजे चिमणासाहेब छत्रपती यासी इंग्रजी विद्येचा अभ्यास होऊन बुध्दी चांगली होईल, असे अजीमुशान गोवरनर साहेब यांची इच्छा आहे. म्हणून आबहाद्दरानी लिहीले त्याजवरून संतोष जहाला. हरहमेषा खलिताची थैली पाठवून संतोषवीत असावे. रवाना ता। ११ माहे मे सन १८४२ इसवी.



लेखांक : २०३

निवडी : १२१०१ / ता. २७ सटेंबर १८४२

श्रीमन्महाराज मातुश्री दिवाणसाहेब महाराजांचे नावे थैली अजम एडवर्ड ह्यू टौनसेंड साहेब बहादूर पोलिटिकल एजंट प्रांत कर्नाटक याजकडे रवाना त्याची तालीक.

आबहादरानी खलिताची थली तारीख २६ माहे ऑगस्टची पाठविली ती छ २२ माहे रजेबिला प्रविष्ठ होऊन बयाजवार मजकूर इजहार जहाला. सात

कलमाचा मजकुरी खातरेस आणून हरयेक कलमाचे बंदोबस्त जहाल्याचे खातरी उत्तर लिहून पाठविले पाहिजे. म्हणोन आसाहेबानी कलमी केले. त्याजवरून आबहाद्दराचे सलेह अन्वये बंदीवान लोकांची पुरी चौकशी करून भत्ता व मीठ वगैरेचा बंदोबस्त नोकर लोकास आज्ञा फर्मावून केला आहे. आणी कलम कलमाचे उत्तराची यादी, कैदी लोकांचे पत्र व अलताफनामेची थैली बराबर आसाहेबांचेकडे रवाना जाहली आहे. त्याजवरून, मजकूर जाहीर होईल. सारांष आबहादुराचे सल्हे अन्वये दौलतिचा क्रम चांगले रीतीने चालवून किर्ती व्हावी हाच निश्चय आहे. त्यास आ साहेबानी दिलात काही बाद आणू नये येक–बालपनाह बम्बई सरकारासही दुसरे प्रकारे कलमी करू नये. ज्याप्रमाणे आबहादराची सलाह लिहून येईल त्या अन्वये होण्यास काही आक्षेप नाही, हे साहेबानी चितात येकीन जाणावे. तारीख २७ माहे सप्टेंबर सन १८४२ इसवी.



लेखांक : २०४

निवडी : १२०३२ / सप्टेंबर १८४२

आस्मत पन्हा सईबाई दिवाण साहेब महाराज दामे इलताफे.

नियाजमंद एडवर्ड टौनसेंड साहेब पोलिटिकल एजंट प्रांत कर्नाटक नियाज मारूज हसूल आंकी येथील खैरीयत रोशन होऊन हमेशा अलफतनामा सादर फर्मावीत असिले पाहिजे. दरविला श्रीमन्महाराज छत्रपती साहेब यास विद्याभ्यास करविते वेळेस केवळ श्रम न होता दररोज सहा तासास जास्ती होऊ नये, असे तपशीलवार कलमवार यादी छ १३ ऑगस्ट १८४२ इसवीस पाठविले होते. परंतू येणेप्रमाणें अजुनी नेमास न येता पहिले प्रमाणेच चालत आहें असे विदीत होत आहें. अशास हरयेक कामास इकडून लिहून जाईल त्यास सवेच उत्तर मात्र ल्याहवे. परंतू याप्रमाणे वहिवाट मात्र होत नाही, असे वरचेवर आम्हास कळत आहे. याप्रमाणे हरएक कामास इकडून ध्यानात न आणणे हे फार आश्चर्य आहे. आणी लिहूनही फळ नाही, असे समजावे लागेल. यास एकच कारण दिसते की दिवाणसाहेब महाराजास छ ३ माहे सप्टेंबर सन १८४२ इसवीस एक पत्र लिहिले आहे येथील भाषा प्रमाणे. सिवाय दुसरे काही कारण दिसत नाही. आता तरी महाराज छत्रपती साहेबास विद्या शिकवणे प्रकर्णी छ १३ माहे आगष्ट

तारखेस सल्ला दिल्हेप्रमाणें आगत्य बंदोबस्त लिहून उत्तर मेहेरबानगी करून पाठविले पाहिजे.

सही हणमंतराव, नेटिव्ह एजंट सही इंग्रजी.



लेखांक : २०५

निवडी १०४७ ते १०५८ / इ. स. १८४२

राजमंडल चिटणीसी रवासुंदगी शके १६८ प्लव नाम सु ॥ इसन्ने आर्बेन मया तेन व अलफ.

१ किल्ले विशाळगड

१ सेनाधर व सेना लेखक व संभार लेखक व आश्वारूढ व सदर बारगिर व तट सरनोबत व नायकवाडी व समस्त गडकरी लोक किल्ले विशाळगड कोनाडा

१ आंताजी जिवाजी मु॥ प्रतिनिधी राजमान्य

१ नारोळीकरजी राजश्री

१ सखो केशव परांजपे राजश्री

१ भास्कर धोंडदेवराव राजश्री

१ गणेश प्रल्हाद सरदेसाई राजश्री

१ केकरे राजमान्य

१ नीळो कृष्ण सरमोकादम राजश्री

१ श्रीनिवास कृष्ण सर मोकादम राजश्री

पुण्यशील १ राधाबाई (भगवंतराव यांची स्त्री.)

१ सुन्दराबाई (भगवंतराव यांची स्त्री)

२ श्रीपतराव यांच्या

१ आनंदिबाई

१ सगुणाबाई

१ भवानीबाई (माधवराव यांची स्त्री)

१ जाईबाई देशपांडे कडेगावकर (माधवराव यांची कन्या)

२ कसबा कापसी

१ समस्त सेना धुरंधर विश्वासनिधी राजमान्य रामचंद्रराव घोरपडे सेनापती.

१ नारायणराव घोरपडे (मुराराव यांचे पुत्र)

१ पु॥ लक्ष्मीबाई घोरपडे (राणोजीराव यांची स्त्री)

१ संकाजीराव घोरपडे

१ सौ. रखमाबाई (संकाजीराव यांची स्त्री)

१ पु॥ राधाबाई घोरपडे (मुराराव यांची स्त्री)

१ पु॥ लक्ष्मीबाई घोरपडे (श्रीदिनकरराव यांची)

३ किले गगनबावडा

१ मानसिंगराव बोदडे मुद्राधारी कारकून किले गगनबावडा

१ समस्त गडकरी लोक किले गगनबावडा.

१ अंताजी बाबुराव वाइंगणकर राजश्री
१ धोंडो भास्कर नानिवडेकर राजश्री समस्त राजकार्य धुरदर विश्वासनिधी

१ शंकरराव पंडीत मु॥ सेळोली
१ माधवराव पंडीत मु॥ पोंभुर्ले
१ भीमराव पंडीत मुक्काम नंदगाव
१ रामचंद्रराव पंडीत.

४. चीखली व वाळवे व कागल

१ नारायणराव भाटगे सर्ज्याराव
१ जानराव घाटगे सर्ज्याराव
१ जयसिंगराव घाटगे सर्ज्याराव वजारतमाब

१ सुंदराबाई घाडगे पु॥
१ रमाबाई घाटगे वाळवेकर पु॥
१ श्रीपतराव घाटगे सर्जेराव
१ गोविंदराव घाटगे सर्ज्याराव

५. ठाणे आकीवाट

१ समस्त नाईकवाडी लोक ठाणे आकीवाट

६. ठाणे सीरोळ

१ जोत्याजीराव नाईक निंबाळकर वाठारकर
१ निलकंठराव जाधव जफ्तन–मुलुख राजमान्य.
२ राजश्री १ संक्राजी जगदाळे
१ मानाजी जगदाळे
१ समस्त नायकवाडी लोक ठाणे शिरोळ

७. किले तोरगल

१ सेनाधुरंधर विश्वासनिधी राजमान्य राजश्री लक्ष्मणराव शिंदे सेनाखासकील राजमान्य राजश्री
१ गिरधरराव शिंदे
१ सखाराम घाटगे सर्ज्याराव
१ लिंगगोंडा जायगोंडा देसाई व नाडगोंडा कोकटनुरकर मामले तोरगल
१ गोविंदराव शिंदे
१ नरसोजी शिंदे
१ लक्ष्मण पडवळ
१ नारो रघुनाथ
१ गणोजी भोसले व कारकून किले तोरगल
१ लक्ष्मणराव शिंदे सरनोबत किले तोरगल

समस्त ठाणी व इनामदार व दुमालदार वगैरे.

राजमान्य राजश्री :

१ आंताजी भवानराव बेडख्यालकर

१ सदाशिवराव रामचंद्र बेडख्यालकर

१ आंताजी विरुपाक्ष मु॥ देसाई प्रां॥ हुकेरी नेरलीकर

१ रुद्रो आपाजी मु॥ देसाई प्रां॥ हुकेरी नेरलीकर

१ हरीहरराव रघुनाथ हेखाडकर

१ यादवराव कदम रणधीर बहादर गीरवीकर

१ भोजराव सिदराव पोवार सरदेसाई पो। अथणी

८. किले पनाळा

१ राणोजी दळवी, नाना जाधव व जिवाजी बाजीराव सबनीस किले पनाळा राजमान्य.

१ राणोजी दळवी नाना जाधव; व हणमंत बाबाजी किले पनाळा

१ सेनाधर व सेनालेखक व संभार लेखक व अश्वारूढ व सदर बारगीर व तट सरनोबत; व नाईकवडी व समस्त गडकरी. लोक किले पनाळा.

१ समस्त नामजाद लोक हुजरात किले पनाळा राजमान्य राजश्री

१ हणमंतराव आबाजी किले पनाळा

१ दीनकरराव गाईकवाड व हणमंत आबाजी किले पनाळा चिरंजीव-राजमान्य

१ हिंदुराव गाईकवाड सरखवास सुभेदार किले पनाळा चिरंजीव राजमान्य राजश्री

१ हैबतराव भोसले संस्थान शिवसागर राजश्री

९. किले पावनगड

१ खंडोजी निकम मुद्राधारी व आबाजी नारायण सबनीस किले पावनगड

१ खंडोजी निकम मुद्राधारी व आबाजी विष्ण किले पावनगड राजश्री

१ सेनाधर व सेना लेखक व संभार लेखक व आश्वारूढ व सदरबारगीर व तट सरनोबत व नायकवाडी व समस्त गडकरी लोक किले पावनगड

१ समस्त नामजाद लोक हुजरात किले पावनगड

१ सुभानराव गाईकवाड व कृष्णाजी आबाजी राजवाडा, सेरी, कोठी किले पावनगड

१ बाळोजी निकम हुजरे

१ नारायण निकम व नरहर पांडुरंग राजवाडा, सेरी, कोठी, किले पनाळा

१ रावजी पाध्ये संपन्न राजमान्य
१ भाऊबाबा गुळवणी पेठ मंगळवार किले पनाळा संपन्न राजमान्य राजश्री विनंती पत्र किले सामान गडकरी
१ रामजी जाधव
१ महादजी पारखे हुजरे व रामचंद्र व्यंकटेश किले सामानगड
१ सेनाधर व सेनालेखक व सांभार लेखक व आश्वारूढ व सदर बारगीर व तट सरनोबत व नायकवडी व समस्त गडकरी लोक किले सामानगड
१ समस्त नामजादे लोक दिमत पा। हुजरात किले सामानगड
१ आपाजीराव नाईक निंबाळकर वाठारकर राजमान्य

१०. किले प्रसिद्धगड

१ श्रीदेवी रांगणाई यासी विनंतीपत्र वाकनिसी कढून
१ गोविंदजी नाईक निंबाळकर नामजाद व केसो आंबाजी वाकनीस किले प्रसिद्धगड राजमान्य
१ रामजी नाईक भोसले व बाले किला
१ सेनाधर व सेना लेखक व सांभार लेखक व आश्वारूढ व सदर बारगिर व तट सरनोबत व नायकवडी व समस्त गडकरी लोक किले प्रसिद्धगड
१ समस्त नामजादे लोक दिमत पा। हुजरात किले प्रसिद्धगड
१ रामचंद्र विसाजी क। पाटगांव कोनाडा
१ तपोनिधी राजश्री गंगागीरी गोसावी महंतमठ संवस्थान पाटगाव यासी विनंतीपत्र नेमा नारायणे

११ किल्ले वल्लभगड

१ समस्त गडकरी लोक किले वल्लभगड
१ समस्त नामजाद लोक दिमत पा। हुजरात किले वल्लभगड

१२ गजेंद्रगड :

१ भुजंगराव घोरपडे हिंदुराव
१ दौलतराव घोरपडे हिंदुराव
१ नारायणराव घोरपडे
१ व्यंकटराव घोरपडे
१ सौ. कृष्णाबाई घोरपडे (भुजंगराव घोरपडे यांची स्त्री)

१३ किल्ले विशाळगड :

१ समस्त राजकार्य धुरंधर विश्वासनिधी

राजमान्य राजश्री अमृतराव पंडित प्रतिनीधी

१ तीर्थस्वरूप मातुश्री बहीणाबाई ताई यासी विनंती पत्र मु ॥ कापसी

१ राघोजीराव पडवळ हवालदार व विठ्ठल आबाजी सबनीस किले विशाळगड राजमान्य

१४. किले सामानगड :

१ काशिगौडा देसाई मौजे तेरणी क ॥ नुल प्रांत हुकेरी

१ गुरूसिद्र गौडा देसाई मौजे तेरणी क॥ नुल

१ रायगोडा देसाई मौजे बुगडीकट्टे क॥ नुल

१ व्यंकाजी आबाजी देशपांडे मौजे मुतनाळ क॥ नूल

१ आप्पाजी देसाई ते॥ चंदगड अडकूरकर

१ लिंगगोंडा देसाई मौजे भडगाव क॥ नूल बिरादर

१ वीरगोंडा देसाई मौजे भडगांव क ॥ नुल, वडील राजमान्य नेसरीकर

१ नरसिंगराव शिंदे

१ दाजीराव व सुलतानराव शिंदे

१ चवंडोबाजी देशपांडे निलजीकर क ॥ नुल प्रां हुकेरी

१ गोविंद व्यंकोजी फडणीस किले मजकूर

१ येसाजी आबाजी

१ बापोजी बाजीराव सुभेदार

१ विठ्ठल आबाजी सबनीस

१५ दत्तवाडकर :

१ मालोजीराव घोरपडे अमीरउल उमराव

१ यशवंतराव घोरपडे आमीरुलउमराव

१ व्यंकटराव घोरपडे आमीरुलउमराव

१ दाजीराव घोरपडे लेकावळा

१६ भिरडीकर :

१ श्रीनिवास नारायण

१ बाळकृष्ण व्यंकटेश

१ श्रीपत श्रीधर

१ सेषो नरसिंव्ह

१७. किले भुदरगड :

१ रेखोजी जाधव नामजाद व चिंतामण जोशीराव किले भुदरगड राजमान्य

१ सोनाधर व सेना व सांभार लेखक व आश्वारुढ व सदर बारगीर व तटसरनोबत व नायकवडी व समस्त गडकरी लोक किले भुदरगड

१ समस्त नामजादे लोक किले भुदरगड

१ बाबुराव बल्लाळ वेंगरुळकर
१ विश्वनाथ दीक्षीत श्रोत्री व॥ बोमनाळ संपन्न राजमान्य
१ पुरुषोत्तम दीक्षित श्रोत्री व॥ बदलमुख व॥ संपन्न राजमान्य
१ प्रभाकर दिक्षित श्रोत्री तवंदिकर व॥ कडगाव तर्फ खानापूर बो संपन्न राजमान्य

१८ कीले बहीरवगड

१ मुंजाजी जाधव मुद्राधारी व आबाजी सदाशिव मु॥ सबनीस, किले बहीरवगड
१ समस्त गडकरी लोक किले बहिरवगड
१ समस्त नामजाद लोक दिमत प॥ हुजरात किले बहीरवगड

१९ किले भरतगड

१ दिनकरराव गायकवाड
१ समस्त गडकरी लोक किले भरतगड
१ समस्त नामजादे लोक दिमत पा॥ हुजारत किले भरतगड

२० किले मनोहरगड

१ गणपतराव विचारे मुद्राधारी व कारकून किले मनोहरगड
१ सेनाधर व सेनालेखक संभार लेखक व आश्वारुढ व सदर बारगीर व तट सरनोबत व नाईकवाडी व समस्त गडकरी लोक किले मनोहर
१ समस्त नामजादे लोक प॥ हुजरात किले मनोहरगड
१ येसाजी सैटगे सरनोबत राणोजीराव नलवडे मुद्राधारी व लक्ष्मण संकाजी

२१ किले सोनगड

१ केसो आंबाजी किले सोनगड राजमान्य
३ समस्त गडकरी लोक किले सोनगड
१ समस्त नामजाद लोक दिमत प॥ हुजरात किले सोनगड हवालदार नाही

२२ किरकोळ किल्लेस

१ समस्त गडकरी लोक किले पारगड
१ समस्त गडकरी लोक किले कलानिधी
१ समस्त गडकरी लोक

२३ किले भिमगड,जंजीरे सिंधुदुर्ग

१ श्रीस विनंती पत्रे वाकनिसीकडून
१ श्री रामेश्वर
१ श्री शिवसागर
१ श्री रामेश्वर आचरेस विनंतीपत्र

१ महादजी नाईक संकपाल नी॥ संस्थान सिवसागर जंजिरे सिंधुदुर्ग
१ बालकृष्ण तालोजी बी॥ म॥ चवथाई जंजीरे सिंधुदुर्ग

२४ सिरोळ

१ समस्त नायकवाडी लोक ठाणे शिरोळ
१ भवानजी निकम देशमुख मौजे कोकरुड पे॥ सीरोळ

२५ सुवर्णदुर्ग

१ आजम महंमद इब्राहीम परकार साखरोळकर खोत व मुकादम मौजे महाप्रले तालुके सुवर्णदुर्ग

२६. किले गगनगड उर्फ बावडा

१ चिरंजीव समस्त राजकार्य रघुनाथ पंडीत आमात्य
१ ठाणे साळवण
१ धोंडो भास्कर ठाणे राशिवडे राजश्री
१ रामचंद्र गुंडो राजश्री
१ मल्हार सखाराम मुजूमदार राजमान्य

२७. इनामदार व ठाणी दुमालदार

१ सखाराम घाटगे सर्ज्याराव
१ आबाजी घाटगे सर्ज्याराव
१ सेषाद्री शास्त्री वो संपन्न राजमान्य राजश्री मौजे कंदलगाव
१ आनंताचार्य पुराणीक
१ विष्णु दीक्षीत व गोविंद दिक्षीत नारायण दिक्षीत श्रोत्री नंदीकर वो संपन्न
१ वो संपन्न राजमान्य राजश्री सदाशिवराव उपाध्ये :बाबा
१ श्री ताल्या महाराज व श्री आबा-माहाराज व श्री आपामाहाराज श्रीचे सेवेसी विज्ञापना ऐसीजेत
१ ती. मातुश्री जीऊबाई बाई यांसी विनंती पत्र मौजे वळीवडे
१ रघुनाथ जोसीराव यासी वो संपन्न राजमान्य आज्ञापत्र
१ सदाशिवराव जोशी दिवाण
१ रघुनाथराव जोशी
१ रामचंद्रराव पंडित राजाज्ञा समस्त राजकार्य धुरंधर
१ केसो आंबाजी वाकनोस
१ महीपतराव गोपाळ पारसनवीस
१ गोविंदराव गोपाळ पारसनीस
१ चीमणाजी आबाजी मु॥ राजाज्ञा
१ जोत्याजीराव घाटगे झुंझारराव
१ नारायणराव जाधव हवालदार
१ बचाजीराव घोरपडे
१ खंडेराव निंबाळकर धारराव हवालदार म॥ जिलीबी पागा

१ आबाजीराव निंबाळकर धारराव
१ जीवाजीराव यादव हवालदार
जलस्थान
१ हैबतराव भोसले
१ बळवंतराव शिंदे हवालदार
१ हैबतराव भो देवघर
१ आपाभट वडणगेकर वो राजश्री
मौजे भादले
१ दाजी गोसावी तेरवाडकर हरीभक्त
परायण राजश्री
२ भाऊ गोसावी व गोसावी वाठारंकर
हरीभक्त परायण राजश्री
१ सिराज मोहीद्दीन देसाई कसबा
कपसी अजम
१ आनंद आपाजी महाजन का। नेसरी
१ राघोजीराव नलवडे हनीमनालकर
१ खंडेराव यादव सर हवालदार
मौजे काळव
१ भागोजी नाईक देसाई कुरुकलीकर
मौजे यरगट्टी
१ विरभद्र नाईक देसाई तल्लूरकर पो
मुरगुड
१ रामराव घारगे देसाई निमसोडकर
१ गोविंद मुरार देसाई आलखनुरकर
का। आडगल
१ भवानजी घाटगे देशमुख नीमसोडकर
१ लखमगोंडा बसवप्रभु देसाई व
नाडगोंडा बंटमुरीकर प्रां। हुकेरी

१ खान देसाई ता। ठाणे प्रां। पनाळा
नणदिकर प्रां। हुकेरी
१ नारो तमाजी सिक्के देसाई नणंदिकर
प्रां हुकेरी
१ नारो आनंदावर देशपांडे प्रांत
पनाळा इंगलीकर
१ विठ्ठल खंडो देशपांडे ता। असंडोली
सांगरुळकर
१ बहीरजी देसाई उंचगावकर
१ आपाजी नरसिंह देशपांडे तालुके
पाच्छापुर
१ आपाजी यादव हवालदार
खलबतखाना
१ नारायणराव भोसले आनुरकर
१ आपाजीराव भो आनुरकर
१ खुमाजपुरी गोसावी मौजे
शहापुर तपोनिधी
१ राणोजीराव व नलवडे
हनीम नालकर
१ यशवंतराव भो सुभेदार चिरंजीव
राजमान्य राजश्री
१ नरसिंगराव सुरवंशी सरनोबत दी।
जीलीबी पागा
१ रामसिंग हजारी
१ हवालदार जीलीबी पागा
१ बाबाजी विचारे
१ यशवंतराव शिंदे हवालदार

१ बापूजी सालोखे सरनोबत म॥
खास पागा
१ हैबती घाटगे सरनोबत दिवाण पागा
१ बाबाजी घाटगे सरनोबत म॥
खासगी पागा

२८. कटकोळ

१. खंडेराव नलवडे हवालदार व
लक्ष्मणराव वैद्य, संमत कटकोळ
राजमान्य
१ लक्ष्मण देसाई समत कटकोळ
राजश्री

२९. चाफळ

१ तीर्थस्वरूप श्रीस्वामीसंस्थान चाफळ वडलांचे सेवेसी आपल्य शिवराय छत्रपती चरणावरी मस्तक ठेवून दंडवत विज्ञापना ऐसीजे वाकनिसी कडील विनंतीपत्र १

३० ठाणेहुपरी

१ जनार्दन परशराम सिरगुतकर
१ गोविंद रघुनाथ नि॥ नेरलीकर
१ व्यंकाजी श्रीनिवास निलजीकर
१ यमाजी विरुपाक्ष राजगोलीकर
१ यशवंत देसाई ता॥ पेडणे
१ लिंगोजी राजे सरदेसाई तर्फ
साकळी

३१. सांगली

१ चिंताणराव पांडुरंग राजमान्य
(आपण म्हणावयाचे.)
१ मार निलेची स्त्री सौ. पार्वतीबाई
१ विनायकराव गणेश माार निलेचे
नातू याची स्त्री सौ. गंगाबाई
१ सौ. कृष्णाबाई हाली आहे
१ गोपाळ बापाजी
१ आबाजी बलाळ
१ गणेश जिवाजी
१ अंताजी हरी कानीटकर
१ हणमंतराव रघुनाथराव सरनोबत
१ बापूजी नारायण

३२. मिरज

१ गंगाधरराव गणपत
१ रामचंद्रराव गणपत
१ गोपाळराव गंगाधर
१ कृष्णराव गोपाळ यादवाडकर
१ वामनराव गोविंद सोनीकर
१ माधवराव गंगाधर
१ माधवराव वासुदेव राजश्री

३३. कुरुंदवाड व सेडबाळ

१ रघुनाथ केशव कुरुंदवाडकर
१ त्र्यंबकराव गणपत सेडबालकर
१ कोनेराव शिवराम मौजे कुदवाड

३४. इचलकरंजी

१ केशवराव नारायण घोरपडे राजमान्य
४ आजम सैद महंमद बोकारी ' पीरजादे कनवाडकर

३५. विसलांपूर

१ जयवंत राजमान्य

३६. खानवेलकर

१ बलवंतराव खानवेलकर
१ लक्ष्मणराव खानवेलकर
१ आंतोजीराव खानवेलकर
१ पु॥ राहीजाबाई खानवेलकर
१ मन्याजीराव खानवेलकर यांचे पुत्र
१ आपाजीराव खानवेलकर
१ रावजी खानवेलकर
१ रेखोजीराव हवालदार
१ सुबराव खानवेलकर राजमान्य
१ सुबराव खानवेलकर मन्याजीराव याचे त्रितीय पुत्र.

३७. सावंताची वाडी

१ पु॥ सावित्रीबाई सावंत भोसले सरदेसाई पो कुडाळ व माहाल निहाय.
१ पु॥ दादीबाई सावंत भो सरदेसाई पो कुडाल व माहालनिहाय.
१ मोहीते हंबीरराव
२ राजश्री
१ चंद्रोजी सावंत
१ संक्राजी सावंत

३८ जंजिरे विजयदुर्ग

१ कृष्णराव धुळप सुभेदार नी॥ आरमार जंजिरे विजयदुर्ग.
१ धारराव जगन्नाथ सुभेदार जंजीरे विजयदुर्ग.
१ धोंडो विश्वनाथ नी॥ जंजिरे विजयदुर्ग
१ सौ. मैनाबाई धुळप

३९ आकलूजकर

१ मालोजी नाईक निंबाळकर
१ आबाजी नाईक निंबाळकर
१ आनंदराव नाईक निंबाळकर
१ वणगोजी नाईक निंबाळकर
१ पु॥ लक्ष्मीबाई निंबाळकर

४० नलदुर्गकर

१ पुरुषोत्तम रामराव सरदेशमुख व

नाडगोंडा व देशपांडे पो हवेली राजमान्य

१ महीपत रामचंद्र राजश्री

३१ कराडकर

१ परशरामराव पंडित समस्त राजकार्य धुरंधर

१ पंडित यांच्या स्त्रीया :

१ सौ. लक्ष्मीबाई

२. सौ. रमाबाई

४२. अंजीरे रत्नागिरी

कीलवलकर राजमान्य

१ खंडेराव शिंदे

१ जोत्याजीराव शिंदे

१ तीर्थस्वरूप सो मातुश्री बचाबाई शिंदे

४३ ....

४४ नरगुंद

१ दादाजीराव व्यंकटेश

२ रामदुर्गकर

१ नारायण रामराव

१ बापूजी नारायण

४५ बागणी

१ व्यंकटेशराव भास्कर राज्यमान्य

१ रघुनाथराव त्रिंबक राजमान्य

४६ शिर्के

१ जिवनराव शिर्के

१ आपाजीराव शिर्के

१ मन्याजीराव शिर्के

४७ पाटणकर

१ द्वारकोजीराव पाटणकर

१ रघुनाथराव पाटणकर

१ ज्योत्याजीराव पाटणकर

१ बाजीराव पाटणकर

१ पु।। बायजाबाई पाटणकर ती।। मातुश्री यांसी विनंती पत्रे

१ जीजाबाई पाटणकर

१ बाळाबाई पाटणकर

१ व्यंकटराव पाटणकर

१ रामचंद्रराव पाटणकर

१ सौ. लक्ष्मीबाई पाटणकर (व्यंकटराव यांची स्त्री)

१ हिरोजीराव पाटणकर

१ लक्ष्मणराव पाटणकर (ज्योत्याजीराव यांचे पुत्र)

४८ निपाणी

१ राजश्री

१ लींगो मल्हार

१ नरहर संदलगेकर

४९ हुबळी

१ लक्ष्मणराव सुबराव

५० जांबोटीकर

१ व्यंकटराव पोवार सरदेसाई पो।
खानापूर

१ यशवंतराव पोवार सरदेसाई पो।
खानापुर

१ खलोजी पोवार सरदेसाई पो।
खानापुर

१ गोविंदराव पोवार सरदेसाई पो
खानापुर

१ उमाजीराव पोवार सरदेसाई पो।
खानापुर

१ सोमाजीराव पोवार सरदेसाई पो
खानापुर

१ पावणोजीराव पोवार सरदेसाई पो
खानापुर

५१ कुलाबा

१ मानाजी आंगरे सरखेल राजमान्य
राजश्री

१ बाबाजी श्रीधर राजश्री

१ गोपाळसेठ सावकार

१ लखुसेठ सावकार

५२ सींदखेडकर

१ आनंदराव जाधवराव चिरंजीव
राजमान्य राजश्री

१ तीर्थस्वरुप मातुश्री न्याहाल
कुबराबाई जाधव; यांसी विनंतीपत्र

१ निलकंठ आनंदराव

१ माधवराव

१ चिरंजीव सो। बायजाबाई जाधव

५३ आष्टप्रधानांची नावनिसी

समस्त राजकार्य धुरंधर

१ पेशवे

२ रघुनाथराव पंडित आमात्य चिरंजीव
समस्त राजकार्य धुरंधर विश्वासनीधी

३ रामचंद्रराव घोरपडे सेनापती समस्त
सेनाधुरंधर विश्वासनीधी

४ सचीव

५ आनंदराव यशवंत मंत्री

६ डबीर श्रीनिवासराव पंडित सुमंत

७ गोपालचार्य पंडितराव वे।। संपन्न
राजमान्य

८ श्रीकराचार्य न्यायाधीश

....

८

१ गणपतराव पंडित सुमंत वाठारकर
राजमान्य

१ जोत्याजीराव नाईक निंबाळकर
१ आपाजीराव नाईक निंबाळकर
१ खंडेराव नाईक निंबाळकर
१ माधवराव नाईक निंबाळकर
१ व्यंकटराव नाईक निंबाळकर
१ नारायणराव नाईक निंबाळकर
१ द्वारकोजीराव नाईक निंबाळकर
१ निलकंठराव नाईक निंबाळकर
१ जगदेववराव नाईक निंबाळकर
१ दाजीराव नाईक निंबाळकर

५४ बुधकर घाटगे झुंझारराव

१ जानराव घाटगे झुंझारराव
१ रामचंद्रराव घांटगे झुंझारराव

५५ घाटगे बाजी

१ नारायणराव घाटगे बाजी राजमान्य
१ दौलतराव घाटगे बाजी
२ नारायणराव याचे पुत्र
१ भवानराव घाटगे बाजी
१ माधवराव घाटगे बाजी
१ सौ. दर्याबाई घाटगे
२ राजश्री
१ गोविंदराव घाटगे
१ हरजी घाटगे

५६ सातारा

१ श्रीमन्माहाराज राजश्री प्रतापसिंह छत्रपती
१ श्रीमन्माहाराज राजश्री छत्रपती उर्फ आपासाहेब
१ बाळाजी नारायण नातु राजमान्य
१ नारायण दिक्षीत वाठार वो संपन्न राजमान्य
१ गोविंदराव विठ्ठल महाजन राजमान्य
१ बलवंतराव मल्हार चिटणीस राजमान्य
१ रतनजी कानदास
१ बापूजी महादेव.
१ बापूजी गोविंद कोगेकर
१ केसो आनंदराव कोगेकर
१ अजम मीरखान पठाण
१ विठ्ठल केशव भडोचकर
१ धागजी सेटे
१ बापूजी बालासी
१ आजम अमीनखान पठाण
१ दुर्जनासिंग
१ प्रतापराव रणी

ब्राह्मावर्त

१ बाजीराव पंडित प्रधान समस्त राजकार्य धुरंधर

५७. शिंदे कडील मुक्काम ग्वालेरी

१ जनकोजीराव शिंदे राजमान्य राजश्री
१ पुण्यशील बायजाबाई सिंदे; दौलतराव यांची स्त्री (दुसरी)
१ रमाबाई शिंदे, दौलतराव यांची स्त्री (वडील)

१ जयसिंगराव घाटगे सर्जाराव वजारतमाब राजमान्य
२ मानसिंगराव पाटणकर यांच्या स्त्रीया
    १ पु॥ गंगाबाई   १ पु॥ जीजीबाई
१ आपाजीराव पाटणकर राजमान्य
१ श्रीमन्माहाराज आनंदीबाईसाहेब यांचे नावे बायजाबाईस तीर्थस्वरूप म्हणोन विंनंतीपत्र
२ जयसिंगराव घाटगे सर्ज्याराव वजारावमाब यांच्या स्त्रीया १ सौ. लक्ष्मीबाई घाटगे (द्वारकोजीराव पाटणकर यांची कन्या)
    १—
१ सौ. सगाबाई पोवार (बायजाबाई यांची नात)
१ बकाबाई शितोळे (दौलतराव शिंदे यांची बहीण)
१ आपाजीराव खानवेलकर (मन्याजीराव यांचे पुत्र)
१ सौ. गजाबाई खानवेलकर (आपाजीराव यांची स्त्री)

५८. नागपूर

१ रघोजीराव भोसले यांजकडील भोसले सेनासाहेब सुभा यांच्या स्त्रीयाः—
    १ पार्वतीबाई
    २ बकाबाई
    ३ आंबीकाबाई भोसले
१ बाळाबाई गुजर मार निलेची कन्या.
१ पुत्र
    राजमान्य राजश्री
    १ श्रीधर लक्ष्मण
    १ गंगाधरराव माधव
    १ बाबुराव गोविंद चीटणवीस
    १ गणपतराव विठ्ठल

५९. होळकर :—

१ मल्हारराव होळकर
१ पुण्यशिल तुळसाबाई होळकर (म॥ निलेची स्त्री)
१ बालाजीराम आगरवाले कारभारी राजश्री
१ आजम मीरखान पठाण
१ गणपतराव नारायण दिवाण राजमान्य राजश्री

६० गुजराथ गाईकवाड

१ आनंदराव गाईकवाड सेनाखासकील समसेर बहाद्दर
१ जयसिंगराव गाईकवाड
१ सयाजीराव गईकवाड
१ समशेर बहाद्दर
१ बाबजी बलाळ
१ मैराळ बापोजी
१ सिताराम रावजी
१ विठ्ठलराव बाबाजी
१ बापूजी घोरपडे मुधोळकर
१ शंकराजीराव खानवीलकर
१ यशवंतराव पांढरे समशेरबहाद्दर
१ महीपतराव पांढरे
१ श्रीपतराव शास्त्री वो संपन्न राजमान्य राजश्री
१ पंडित भोगुरगांवकर
१ समस्त राजकार्य धुरंधर विश्वासनीधी पुणे.
१ आजम
१ कृष्णराव हणमंत राजमान्य
१ ककब्री कमिजीत मुनसी राजश्री
१ प्रभाकर बलाळ राजश्री
१ पांडुरंग नाईक बीदडी राजश्री
१ आंताजी गंगाधर राजश्री
१ हरेश्वरभाई राजमान्य

लेखांक : २०६

हुजूर खाजगी दप्तर : १९ / ता. २७ जानेवारी १८४३

अस्मत पनाह माहाराज सईबाई दिवाणसाहेब दाम अलताफहु नियाजमंद ईएडव ह्यूम टौनसेंड रावसाहेब बहादुर पोलीटिकल एजंट प्रांत कर्नाटक बाद नीयाज मारूज हसूल आंके नियाज मंदाची खैरीयत रोषन होवून हमेशा तलतुफनामा फिरस्ताद करून सरफराज करार असले पाहिजे. दरविला श्रीमान माहाराज छत्रपती यांचे काळ जाहालेवर त्यासी दोघे चिरंजीवाचे कल्याण व्हावे आणि दौलत चांगले रीतीने चाळून रयत लोकांची दाद घेवून हरयेक रीतीने न्याय आपणाकडून होईल असे समजून कोल्हापूर दरबारचे मोसी (?) यासी आपणास कंपनी सरकारातून सांगितले, त्यानंतर दौलतीचे क्रम चालवणेंस चांगले सलाह येथून येजंट साहेब लोकानी वरचेवरी लिहित गेले आणि दौलतीचा जमाखर्च सुद्धा जेव्हाचा तेव्हा होत असावा असेही बहुत वेळा सांगितले. परंतू तीन वर्षेपर्यंत, म्हणजे आम्ही कँपास जाणेचे पूर्वी तथीपावेतो काही एक दौलतीचा हिशोब तयार झालें नव्हते आणि दौलतीचे व्यवस्था सुद्धा काहीं नीट नव्हते. बखेडीस कारण जाहालें होते. स्वारी कँपास जातेवेळी कारभारी आमचे भेटीस आले होते. त्यावेळी दौलतीचे कल्याणाबद्दल न्यायें प्रकारे चालवणेस सुद्धा

बहुतेक प्रकारे सांगून गेलो. त्यानंतर मेहेरबां रीवीस साहेब बहादुर यानी कोल्हापुरास जावून तेथील अवस्था सर्व पाहिली आणि काही येक काम चांगलें रीतीने न व्हावे, दौलत आगदी बखेडीस आली होती, परिणाम नीट दिसत नाही, हे सर्व ध्यानात आणून सगळे हकीगत मुंबई गोरनर साहेब बहादुर यास रिपोर्ट केले. त्याजवरी असे बखेडी होणेस मूळ आजम रावजी वाकनीस. त्यानी कामात वागलेस बीलकुल बन्दोबस्त राहाणार नाही. बखेडीस कारण होईल, असे गोरनर साहेबांचे ध्यानात येवून रावजीस कामातून काढावे असे हुकूम आला.

त्यावरून या विषयी दिवाणसाहेब महाराज तीसरे सप्टेंबर सन १८४२ ईसवी तपशीलवार पत्र पाठविलें होते. त्याजवरून सर्व ध्यानात आलेंच आहे. परंतु या अलीकडेच वहिवाट पाहता पूर्वी प्रमाणेच रयताचा दाद न होता आणि कामकाज वाजवी प्रमाणे न चालता व हिशोब दौलतीचे जमा खर्चाचे तयारी न होता हरयेक कामाचे बखेडा होत आले आहे. असे न व्हावे. माहाराज छत्रपती साहेबांचे वय लहान, सबब त्यांचे हितावरी दृष्टी ठेवून नीट वहिवाट चालवावे. म्हणून येथून दरबारास पुष्कळ पत्रे व याद्या लिहीत गेले. तत्रापी त्याप्रमाणे कोणतेही निदर्शनास आलें नाही. यास्तव आमची स्वारी साल मजकूर १९ जानेवारीस कोल्हापूर मुक्कामी आले तेथील व्यवस्था समक्ष पाहिली व परभोर शोध घेतला, परंतू काहीं स्वारस्य नव्हते. व दौलतीचा हिशोब सुद्धा तयार नव्हता. या वहिवाटी वरून पाहाता सर्व बखेडा केवळ रावजी वाकनीसाचे वहिवाटीवरूनच असे सांगवत नाही. आजम दिनकरराव गायकवाड यांची वहिवाट बिलकूल नीट नाही. आणि आपण करणेचे आन्याये काम बाहेर निघतील या बेताने सरकारातून नेमले कारभारी पैकी मोरोपंतासुद्धा कामकाजात घेतले नव्हते. यास्तव ईख्यानीवानी दिवाणसाहेब माहाराजाचे प्रथम भेटी समई आम्ही व सरकारचे दप्तरदार श्रीनिवासरावाचे मार्फत सुद्धा दौलतीचे व्यवस्था नीट चालवणे बद्दल व अशी गैर वहिवाटीमुळे आपले अपकीर्ती होत आहे यास्तव, दिनकरराव यास कामातून काढून दुसरे योग्य माणसास ठेवणे उत्तम आहे असे सल्लाह दिला आणि याचे निराकरिणेचे बोलणेही पुष्कळ जाहालें, तेव्हा आमचा सल्लाह आपण तोंडाने कबुल केला, दुसरे दिवशी आम्ही भेटीस आले वेळी दिनकरराव यास समक्ष ठेविलें होते. तेव्हा पुन्हा आपणास याजबद्दल समजून सांगितले.

त्यास दिनकरराव गायकवाड यास काढणेचे कबूल होवून याचे बदली

न्यायाधीश पंडीतराव व आणखी येक माहातारा ऐसे दोघांचे नाव आपण सांगितलें. त्यास पंडीतराव हें पहिलें न्यायधीशीवर होते. या कामास ते योग्य असे आमचे खातरेस आले नाही. परंतू दुसरा माहातारा कारकूनाविषयी तजवीज करून उत्तर सांगू, असे आपणास उत्तर दिले. त्यानंतर परभारे शोध घेतांना पंडीतराव व दुसरे कारकून सुद्धा योग्य असे समजून येत नाही व त्याजकडून हें काम होणार नाही, करिता मेहेरबां राजाज्ञा, दौलतीचे प्रदरचे योग्य माणूस, त्यास कामात ठेविले असता चांगले होईल. त्यास आज ठेविले पाहिजे. भेटीचे वेळी पाहाणेत येईल, म्हणून मोरोपंत कारभारी यांचे विद्यमाने सांगून पाठविलें होते.

तिसरे दिवशी आम्ही भेटीस आलो तेव्हा राजाज्ञा यास हजर ठेविलें नव्हते, आणि त्याचे प्रस्ताव सुद्धा आपण काढले नाही, सबब आपणास वारंवार विशेष सांगितलें असता काही उपयोग नाही, असे मनात विचार करून आपणाकडून निरोप घेवून दुसरे काही न बोलता निघुन आलो. त्यावरी आम्ही, मोरोपंत कारभारी व आमचे दप्तरदार श्रीनिवासरावचे मार्फत आपणास सांगून पाठविलें होतें कीं माहाराजांचे हित व दौलतीचे कल्याणचे होणे आपलें खातरेत असून आमचे सल्ला आपले चित्तास येत असलेंस दौलतीचे काम चालवणेस प्रथम मेहरबां रामचंद्रराव साहेब राजाज्ञा व दुसरा मेहेरबां हिंदुराव गायकवाड व तिसरा मोरोपंत असें तिघास कामावर नेमावा आणि त्याजकडून काम नीट चालणेस व बखेडा वगैरे न चालावा. या जोगे मागील कारभारी दिनकरराव गायकवाड व रावजी वाकनीस व सदाशीवपंत वकील असें तिघास आपआपले गावास जाणेस सांगावे. याप्रमाणे तजवीज होवून लिखीतवार उत्तर लिहून पाठवावे. म्हणून त्याजवरून स्वारी निघणेचे संधीस म्हणजे छ २७ माहे मजकूर शुक्रवार सुमार च्यार घंटेस हिंदुराव गायकवाड व मोरोपंत दोघानी येक याद घेवून त्यात, तूर्त कारभार चालवणेस राजाज्ञास नेमिलें आहें व मागील कारभारी दोघे व वकील सुद्धा तूर्त गावास जावे असे लिहिलें होतें. परंतू तूर्त असे लिहिणेचे भाव पाहाता दिनकरराव गायकवाड यास सोडणेचे व त्या तिघास गावातून बाहेर जाणेस सांगणेचे सुद्धा आपलें चित्तात नाही, असें सांगून तूर्त म्हणणे अक्षर काढून दुसरे याद पाठवावे, म्हणून त्या दोघाबरोबर सांगून पाठविलें. तूर्त शब्द ऐकून कारभारास येणारे मनुष्य कबूल तरी कसे करतील? मोठे काम मनापासून तें कसे पाहतील? या शिवाय माजी लोक कोल्हापुरात राहिलें असता हाल्ली कारभारीकडून कसे कामे चालतील? यास्तव आमचे सल्लाह ऐकणेचे खचीत

मनात असलेस साफ करवावे, म्हणूनही त्या दोघाबरोबर सूचना सांगून पाठविलें. परंतू आजी चार रोज जाहाले आजपावेतो काहीं येक निदर्शनास आलें नाही. आमचे सल्लाह ऐकणार नाही, पुढे दौलतीचे बखेडा बन्द न व्हावा, असे आपले बेत दिसतें. सबब या विषयी दिवाणसाहेब माहाराज पुन्हा विचारणेचे अगत्य पडणार नाही. माहाराजांचे दौलतीस कल्याण होणे कुंपणी सरकारास आवश्य व हिशोब वगैरेचे बन्दोबस्त होणेचेही अगत्य आहें. सबब सरकारातून आलाहिदा कारभारी कामावरी मेहेरबा रामचंद्रराव राजाज्ञा हे प्रथम व दुसरे हिंदुराव गायकवाड, तिसरे मोरोपंत असें तिघास नेमून त्यांची नांवे आलाहिदा पत्र पाठविले आहें. करीता त्यानी मोख्तीयारी कडून कंपनी सरकार हरयेक दौलतीचे काम चालवितील. आदिवाणसाहेब माहाराजांचे सल्लाहा प्रमाणे काहीं चालविणार नाही. आपणास विदीत असावा. जीयादाचे आयाम षादमानी.

सही हणमंतराव नेटिव्ह एजंट — सही ईंग्रजी
पोलिटीकल एजंट.



लेखांक : २०७

हुजूर खाजगी दप्तर : २० / ता. ३१ जानेवारी १८४३

मेहेरबा दोस्तां रामचंद्रराव साहेब राजाज्ञा व मेहेरबां दोस्तां हिंदुराव गायकवाड व मेहेरबां मोरोपंत कारभारी नि॥ श्रीमन्महाराज छत्रपती साहेब सलामत – अजतर्फ ईडवर्डर्य साहेब पोलीटिकल एजंट प्रांत कर्नाटक सलाम आंके येथील खैरीयेत जाणोन आपले खैरीयतीचे लिहित जावे. दरिविला आपले वडिलादारभ्य श्रीमन्महाराज छत्रपती साहेबांचे सेवक आणि त्या दौलतीचे हितचिंतन करणार असे ध्यानात आणून आपणावर विश्वास ठेवून आपणास कंपनी सरकारातून कोल्हापूर दौलतीचे कारभारास नेमिले आहे. तरी विश्वासपूर्वक माहाराजाचे कल्याणावर नजर ठेवून हरयेक दौलतीचे वहिवाट वाजवी चांगले रीतीने चालविली पाहिजे. काम चालवणेत त्रिवर्गानी दरबारात बसून रयताची दाद मनास आणून पुरा विचार करून वाजवी प्रमाणे ईनसाफ करीत असावे व जमाखर्च दौलतीचे वरचेवरी हिशेब तयार करवीत जावे. आणि हरयेक कागदपत्रावर त्रिवर्गाची सही होत असावी. आपले नेमणुक विषयी

मागाहून तजवीज करून लिहून पाठविले जाईल. आणि आम्हाकडे वकिली कामावर राहाणेस योग्य माणसास नेमून पाठवावे. सरकारातून परभारे आपणास नेमिले आहे. शिवाय दुसरे कोल्हापुराहून नेमिले असे समजू नये. जसे श्रीमन्महाराज ताराबाईसाहेब यास मानमर्यादा चालविता तसे दिवाणसाहेब महाराजास मानमर्यादा चालवीत असावे. त्यांचे मर्यादेस अंतर न करावे, परंतू कामकाजात न पुसावे.

कोल्हापुर दौलत फार बखेडेस आली आहे. सबब आपण लोक बहुत सावध असावे. आपणाकडून दौलत अभीवृध्दी जसे होईल त्याजवर नजर ठेवीत जावे. आपणास सर्व आधार कंपनी सरकार असे समजावे. काम चालविणेत उशीर मात्र होवू नये. उशीर होणेमुळे दौलतीस बखेडा ज्यास्ती होणेस कारण होते. सबब लौकर उलगडा होत असावे, याविषयी आपणास जादा काय लिहिणे. ता॥ ३१ माहे जानेवारी सन १८४३ मुक्काम उदगांव.

सही इंग्रजी



लेखांक : २०८

राव विश्वासराव गायकवाड दप्तर : १७ / ता. २८ मार्च १८४३

जाहीर नामा – राजमंडळ हुजुर करवीर सरकारातून समस्त लोकांस जाहीर होणे करिता आज्ञा केली ऐसीजे – वतनदारी व देणेघेणेचे वगैरे हरयेक प्रकारचे तंटेमुळे कित्येक लोक दावेवतली करितात व कित्येक लोक परस्थळास जाऊन बसतात. असे करण्याने तंटा ज्या गोष्टीचा आसेल त्याचा ईनसाफ होवून निर्णय ठरतो असा अर्थ नाही. कदाचीत तंटा खरा असला तथापी दावेवतली करण्यामुळे चोरट्याप्रमाणे फिरावे लागते व ज्याजवर दावेवतली करितात त्यांचे विनाकारण नुकसान होते. ते न होवून रयत लोकास सुख व्हावे. तरी हरयेक तंट्यामुळे कोणी कोणावर दावावतली करू नये व परस्थलास रुसुन जावू नये. ज्याचा तंटा असेल त्याने सरकारात फिर्याद करावी. म्हणजे चौकशी होवून ईनसाफ होईल. फिर्याद कोठे करावी त्याचा तपशील –

१. हुजुर ईलाखेतील गावे असल्यास हुजुर न्यायाधीशाकडे फिर्याद करावी.

१. जाहागीरदार वगैरे लोकांचे ताबेन्यात गाव असलेस ज्याकडे गाव

असेल त्याकडे फिर्याद करावी. तिकडे दाद लागल्यास उत्तम. न लागल्यास अगर ईनसाफ बरोबर न जाहल्यास हुजुर फिर्याद करावी म्हणजे चौकशी होत जाईल.

सदरी लिहिलेप्रपाणे फिर्याद करून ईनसाफ ठरवून घ्यावा. असे न करिता जो दावावतली करील आणि तो कोणत्याप्रकाराने सरकारात हजर होवून त्यांचे तंट्याचा ईनसाफ जाहाला, तथापी दावेतली केल्याबद्दल वगैरे शिक्षा होण्यात येथून दावेतली केल्याबद्दल ज्याचे नुकसान जाहाले असेल त्याचाही जबाब घेण्यात येईल. यास्तव सदरहू म।। मनात आणून कोणत्याही प्रकारचा तंटा असल्यास सरकारात फिर्याद करून ईनसाफ ठरवून घ्यावा. तंट्याबद्दल दावेतली करू नये व परस्थलास रुसून जाऊ नये. मीती शके १७६४ शुक्रतनाम संवत्सरे फाल्गुन व।। १३.



लेखांक : २०९

निवडी : २०७६८ ते ७१ / ता. ३१ मार्च १८४३

यादी राजमंडळ हुजूर नि।। इलाखेतील जहागिरदार व इनामदार मामलेदार वगैरे हे होय गावगन्ना येथील पाटील कुलकर्णी यानी गावाची वहिवाटी संबंधें वर्तणूक कसी करावी व प्रत्येकास हरयेक विषयी उपद्रव न होऊ देता अबादीवर नजर ठेऊन बंदोबस्त कोणे रितीने ठेवावा या बाबत पक्की तजवीज पुढे होऊन ठराव करण्यात येईल तो पर्यंत वहिवाट कसी चालवावी येविषीचा ठराव केला. सु।। सल्लास आरबेन मयातेन व अलफ.

१. रयेत लोक सरकारची फाळापट्टी देऊन जमीन करीत आहेत. ती जमीन सोडण्यास रयतेची खुषी नसलेस त्याची जमीन जबरीने घेऊन दुसऱ्यास देऊ नये.

२. फाळापट्टीची वसूल घेण्याकरीता रयेत लोकास उन्हात उभे करून घोडा देणे अगर कोंडून ठेवणे अगर जुलूम जबरी काही करू नये.

३. वसूल देणे यास तक्रार करणार व वसूल घेवुन पळून जाणार अशी कुळे असतील त्याजपासून फाळा पट्टीचे ऐवजास चांगली जमीन घ्यावी व जमीन न देईल तरी शेतातील माल जप्त करू खराब अगर नुकसानी न होईल असा बंदोबस्त ठेऊन मामलेदार यासी कळवावे.

४. रयत लोकानी काही अपराध केल्यास मामलेदार याजकडे कळवीत जावे. परभारे चौकशी करवून दंड गुन्हेगारी काही घेऊ नये.

५. रयत लोक लावणी करावयासी पडजमीन अथवा घर बांधावयासी सरकारी जागा मागतील तर देण्यास हरकत करू नये.

६. रयत लोकाकडे जमीन व घर व झाडे वगैरे जे काही चालत असेल त्याजविसी दुसरे कोणी माझे म्हणोन तंटा सांगू लागल्यास त्याजला सरकारात फिर्याद करणेविसी सांगावे चौकशी होऊन ठराव जहाल्यासिवाय चालते वहिवाटीस हरकत करू नये. व जूलूम जबरी करून त्याजकडून घेऊन दुसरेस देऊ नये.

७. रयत लोकाकडे कर्जाचा ऐवज येणे असेल तो वसूल करण्याकरिता सावकार कुळास उपासी बसवून सख्त तगादा करील तर करू देऊ नये. येवज देणेस कूळ तक्रार करील तर सावकारास फिर्याद करणेविसी सांगावे. कुळाची जिंदगी व बैल वगैरे काही जबरीने सावकाराने नेऊ नये असा बंदोबस्त ठेवावा.

८. सती जाण्याचे मना जाहले आहे. त्या प्रमाणे सती जाऊ देऊ नये.

९. लहान मूल किंवा मोठे माणूस यासी कोणी विकत घेऊ नये. व कोणी खरेदीस घेऊ नये असे ठरले आहे. त्या प्रमाणे देणे घेणे होऊ देऊ नये.

१०. खून जाहला किंवा पाण्यात पडून माणूस मेले अथवा कोणी कचेरीच्या मुळ्या वगैरे विष वस्तू खाऊन मृत्यू पावला अशा प्रकाराने कोणी मरले तर जलद सरकारात कळवावे. चौकशी होऊन परवानगी होईतोपर्यंत मुडद्यास मूठ माती देऊ नये.

११. घराघरास एक माणूस या प्रमाणे गावात जितकी घरे असतील तितके माणसानी चावडीत अगर देवळात रात्रीस निजत जावे. आणि दरवडा वगैरे गलबला जाहल्यास तिकडे जाऊन चोरास धरण्याची तजवीज करावी. येविसीचा बंदोबस्त ठेवावा.

१२. गुन्हेगार कोणकोणते धरून मामलेदार याजकडे पठवावे तेविसी—

१. सेताचे कामास अगर घरास आग लावणारे.

१. वाटेत लुटून घेणारे.

१. खून करणारे.

१. जबरीने स्त्रीस व मुलीस बदकर्म करणार.
१. मारामारी करणार.
१. हातपाय व नाक वगैरे कापणार.
१. गुन्हेगारास आसरा देऊन छेपवणार.
१. दुसरेची माल मिळकत जबरीने घेणार.
१. दरवडे घालणार.
१. किरकोळ चोरी करणार.
१. बदकर्म करणार, बायको अथवा पुरूष
१. गर्भपाताचे औषध घेऊन गर्भपात करणारी स्त्री.
१. दुसऱ्याचे शरीरास डाग देणे वगैरे दुःख देणार.
१. विषाचे औषध घेऊन मरणाची उपाय करणार.
१. आणखी काही गुन्हे करील तो माणूस.
१. सदरी लिहिलेले गुन्हे करणारास मिलाफी होऊन मदत करील तो माणूस.

---

१६ सदरहूप्रमाणे गुन्हा केलेले कैदीस धरून बंदोबस्ताने मामलतदाराकडे पाठवीत जावे.

१३. जहागिरदार व इनामदार व हुजरे वगैरे कोणी रयतेवरी जुल्म जबरी केल्यास सरकारात न्यायाधीशीकडे कळवीत जावा. छेपाऊन ठेवू नये.

१४. हरएक सरकारी कामाविसी आज्ञापत्रे वगैरे येतील त्या प्रमाणे काम करीत जावी.

सदरहू चवदा कलमे लिहिली आहेत. त्याप्रमाणे पाटील कुलकर्णी याणी बंदोबस्त ठेऊन वर्तणूक करावी. सुस्ती किंवा गफलत केल्यास मनसुबा दिसून येईल. त्या प्रमाणे दंड घेणे अगर वतन जप्त करणेची तजवीज होईल. मिती चैत्र शु॥ १ शके १७६५.



लेखांक : २१०

हुजूर खाजगी दप्तर : २१ / ता. २९ फेब्रुवारी १८४४

श्रीमन्महाराज छत्रपती मातोश्री महाराज राणी सईबाई साहेब दाम अलताफ हु अज जानीब ईडवर्ड ह्युम टौनसेंड साहेब बहादुर पोलीटिकल एजंट प्रांत कर्नाटक सलाम अंकी येथील खैरीयत जाणून आपली षादमानी कलमी करीत असले पाहिजे. दरीअयाम आसाहेबानी छ ७ माहे सफरचे पत्र पाठविले ते पावले. पाहुन बहुत संतोष जाहाला. मुंबईस जाण्याची निकड म्हणोन परभारे सांगलीवरून जाणे जाहाले. याजकरिता करवीर मार्गाने येणे जाहाले नाही. आसाहेबास विदीत व्हावे. हरहमेषा खतखडीत पाठवून दीलखुषी करीत असले पाहिजे. वा। ता। २९ माहे फेब्रुवारी सन १८४४ ईसवी मु। सांगली.

सही इंग्रजी
पोलीटिकल एजंट



लेखांक : २११

हुजूर खाजगी दप्तर : २२ / ता. २५ आक्टोबर १८४४

श्रीमन्महाराज छत्रपती साहेब दाम आलताफहु नीयाजमंद उरुम कर्णेल साहेब बाहादुर बादनीयाज मारुज हसुल नीयाजमंदाची खैरीयेत रोषन होवून हमेशा तलतुफ नामा फिरस्ताद करून खत राज करीत असले पाहिजे. दरिवला माहाराजाची व ईज्यानीबाची चिंचवडास मुलाखत होवून करवीरी दाखल होण्याचे दरम्यान बाबाजी आयरेकर हा दोनशेहे स्वार व पाचशेहे पायदे लोक व दोन तोफा आणि बारुत गोळा येणेप्रमाणे घेवून भुदरगडचा मार्ग धरून गेला अशी इकडे पक्की खबर समजल्यावरून माहाराज सरकारांत विदीत करण्यात येत आहे कीं, माहाराजाकडून अजम गुलाम गौसखा खानबाहादुर याज समागमे आबाजी सदाशीव येवून त्यास सविस्तर मजकूर सांगण्यात आला व माहाराजाचे थैलीचे उत्तर ता। २२ माहे आक्टोबर सन १८४४ चे लिहिण्यात आले. त्या अन्वये माहाराजांचे हशमचे लोक यानी करवीराहून जाणेचे कारण नसता सदर अन्वये त्याजकडून वहिवाट जाहल्याचे समजून येते. त्यास आता बाबाजी

आयरेकर याजसमागमें माहाराजाकडील कदीम लोक गेले असतील त्यानी गोळा व तोफा नेल्या असतील त्या परत आणाव्या आणि जदीद लोक जमले असतील त्यानी एकदम जिकडील तिकडे आपआपल्या घरी निघुन जावे असे व्हावे. जर करिता या प्रमाणे न होवून ते गेले लोक जमावनिशी बारुत गोळ्या सहीत तिकडे हुकुमावरून हुकुम अमान्य राहातील तर माहाराज व कंपनी उभय सरकारचे दुष्मन आहेत असा सर्वास महशूर होण्यास जाहीरनामा प्रसिद्ध करून त्याची बंदोबस्त करणे जरूर. यास्तव कितीक लोक कसे सरंजामाने निघोन गेले व आता ते कोणत्या मुक्कामी असोन सदर लिहिले अन्वये जदीद जिकडील तिकडे बरबाद होवून कदीम माहाराजाकडे ईजीर होतात या नाही, या विषयीचा सविस्तर मजकूर माहाराजाकडून फारच जरुर कळला पाहिजे.

सही
इंग्रजी

ता. २५ आक्टोंबर सन १८४४
मु।। कोल्हापूर



लेखांक : २१२

तोरगल : ३४ / इ. स. १८४४

शेवेशी शंकराजी सखाराम फडणीस मु।। करवीर कृतानेक विनंती विज्ञापना ऐसीजे येथील क्षेम ता।। चैत्र वद्य ३ विज्ञापना ऐसाजे मेहेरबानाबरोबर वकील आहेत, प्रसंग सापडतो की वकील असते तर प्रसंगोपात उत्तर देणेस नीट होते. साहेबाचे आनुग्रहे करुन सुखरुप असो. विशेष साहेबांचा निरोप घेवून निघालेप्रमाणे सुखरुप येवून पोहचलो. ईकडील मजकुराची विनंती –

१. साल गुदस्ता आखबरनीवीस यांची व गैर लोकांची कटकट जाहाली ती साहेबास विदितच आहे. अलीकडे प्रकार तर बाजारी आवाई होती ती काही खचीत नसता लटकी आवाई उठली होती. शिवाय दगड वगैरे मारामारी होवून खटला काहीं येक जाहाला नाही.

१. काल मेहेरबान नरवीसीन साहेबाची स्वारी निपाणी व कागलचा मुक्काम करून च्यार घटिका दिवसास येवून दाखल जाहले. जीतीच्या ओढेवर

उतरले आहेत. बरोबर खटले विशेष नाही. काल रात्री वाड्यात राजेश्री आखबर-नीस काशीनाथपंत तात्या असता याद आली. त्यात पूर्वी श्रीमंत राजेश्री रामचंद्रराव बापु राजाज्ञा व हिंदुराव गायकवाड याजकडे दौलतीचे काम पाहाणे विषयी सांगितले असता दौलतीची आबादानी व फिर्यादी चौकशी वगैरे बरोबर जाहाली नाही. हाल्ली कारभार करणेबद्दल राजेश्री दाजी गणेश पंडीत यास पाठविले आहे. ते एकंदर कामे पहातील व काशीनाथपंत यानी व हिंदुराव त्रिवर्गाने काम पाहावे. पंडीत यासी दरमाहा सुरती गाडी रुपये पांचशेहे व आखबरनीस यास दोनशेहे रुपये याप्रमाणे द्यावे. राजाज्ञानी कामात येणेचे कारण नाही म्हणाले असा मजकूर होता. साहेबाची स्वारी तिसरे प्रहरी राजवाड्यास आली. आत्तर गुलाब होवून यादी प्रमाणेच बोलणे होवून पंडीत याजकडून काम घ्यावे आसे उत्तर करून दोन घटिकानंतर निघोन पूर्वस्थळास गेले. साहेबाचे पाच मुक्काम होणार असे आहे. वरकड मंडळी कामात वागणेला दिसत नाही.

१. राजेश्री आप्पा देशपांडे यास पत्र पोहचविल्यावर मौजे तोरणगट्टी हा फिर्याद करणार होता त्यास दोन गोष्टी सांगोन पत्र देवून तोरगळास पाठविले आहे असे आप्पानी सांगितले. साहेबाकडे आला असेल.

१. कडकोलचे मामलतविषयी हिशेबाअंती निघेल ते आपण बावास द्यावे असे बोलणे होवून सावकारी निशा सरकारानी घेतली आहे. रयतो वगैरे साहेबाकडे फिर्याद करणेचा मनसुबा दिसतो. कसे होईल पाहावे. राजेश्री सटवाप्पा निकम हे देवास आले आहेत असे येकितो. परंतु खचीत म्हणोन संपन्न नाही.

१. राजश्री खंडेराव निंबाळकर यांचे पत्र पोहचवणे करितां दोन वेळा गेलो होतो. त्याचे प्रकृतीस ज्वराचा उपद्रव होवून घरीच असताना भेट जाहाली नाही. पत्र पोहचुन उत्तर देतो.

येणेप्रमाणे मशार निल्हे तोरणगट्टीकर प्यादेस ठेवून घेतले आहे. आणखी मशार कसा होता तो विनंती लिहून पाठवितो विशेष विनंती लिहिणेस शक्ती नाही. शेवेशी श्रुत होय हे विज्ञापना.



लेखांक : २१३

निवडी : ११२९३ ते ११२९५ / इ. स. १८४४

यादी

१. सु॥ सलासीन मयातेन व आलफ चैत्रमासी[1] राजेश्री रामराव अखबरनवीस यानी राजाज्ञा याची मेहेरबा निसबेटसाहेब बहादूर यांची थैली आणिली जे दौलतीचे काम अखबारनिवीस याचे इतक्याने पाहात जावे आणी लकडखानेत संत्री लोक पाहारेस पन्नास होते ते तुटून बाहेरील लष्कर छावणीत जहाले न्हेले नंतर राजाज्ञा याणी सरकार दौलतीचे काम पाहिले नाही. पुढे रामरावजी यानी दौलतीचे काम पाहणेस राजेश्री जिवराव जाधव वगैरे मंडळी नेमली ती.

१. मुख्य जिवराव जाधव
२. जमिनीचे कामावर
१. रावजी वाकनीस
१. सदाशिवराव दिवाण

१. पोवार खासबारदार
पंडितराव काशीपंत
न्यायाधिसीकडे

येणेप्रमाणे आसामी नेमून दौलतीचे काम चालविले.

१. सन इहिदे सलासीन पौष्य मासी[2] श्रीमन्महाराज छत्रपती बाबासाहेब व चिमणासाहेब यांचा जन्म जाहला.

१. तेच साली श्रीमन्महाराज छत्रपती यांची स्वारी बेळगावास जाहाली निसबेटसाहेब हावा खाणेस गोमंतक मार्गानी निघून जाणार याजकरिता गेली. भेटी समई बेळगांव मुक्कामी पिस्तुलाचा बार जाहाला, भेटीचा समारंभ जाहला नाही. दुसरे दिवशी स्वारी निघोन माघारे आली.

१. सन ईसने सलासिन साली[3] करवीर मुकामाची छावणी इंग्रज बहादर यांची होती. ती उठोन गेली.

१. सन खमास सलासीन साली पौष्य मासी[4] नरसिंगराव सांडूरकर अमलदार निशीचे कामावर आले.

---

(१) मार्च-एप्रिल १८३०. (२) डिसेंबर १८३०, (३) इ. स. १८३१-३२
(४) डिसेंबर १८३४,

१. सन मजकूर साली पंत राजाज्ञा यांची व रामराव अखबारनिवीस यांची कमेटी धारवाड मुक्कामी होत होती. ते समई बेबरसाहेब हवा खाणेस निघोन गेले. यामुळे कमेटी राहिली. पुढल्या कामावर पडकबसाहेब मुंबईत येऊन सन सित सलासिन बेळगाव मुक्कामास आले. राजाज्ञाही धारवाडहून तेथे आले. त्यांची व साहेबांची भेट जाहली. पुढे पडकब साहेब करविरास येणेस निघोन राजाज्ञाला बरोबर निघोन करविरास आले. नंतर हुजूरची भेट जाहाली. आठ दहा दिवसपर्यंत मुकाम होता. नंतर रामरावजी सांगली मुकामी परभारे धारवाडहून आले होते. त्यास आणवून अखबारीचे काम पूर्ववत प्रमाणे पौष्य मासी सांगितले. सन सित सलासीन[1].

१. सन सबा सलासीन साली हुजूरची खासा स्वारी श्रावण मास[2] किले मनोहरगड येथील गडकरी यानी बढाई केली. सबब जाऊन किला सर करून गडकरी यास जमीन घेऊन किलेवरील तोफ होती ती काढून करविरास आणिली.

१. तेच साली माघ मासी शिरोळे मुकामी गोरनर साहेब यांची भेट जाहली. नंतर श्रीपाद वाडीस आले. तेथे मुक्काम होऊन फालगुण शुद्ध पौर्णिमा ते दिवशी रात्री करविरास स्वारी येऊन दाखल जाहाली.

१. सन समान सलासिन सालीचे चैत्रमासी नारायणराव पंडित राजाज्ञा यांची स्वारी धारवाडास होऊन रामरावजी याची कमेटी होत होती. इतक्यात राजाज्ञा यांचा काल ज्येष्ठ मासी[3] जाहला.

१. सन तिसा सलासीन साली कार्तीक मासी[4] हुजूरची खासा स्वारी श्री तुळजापुरास जाणेस निघून गेली. मार्गास जाते समई यवतीमुकामी वायूचा उपद्रव होऊन मार्गशीर्ष शुद्ध १३ दसीस[5] काल जाहला आहे. तेथेच दहन होऊन दुसरे दिवशी रामरावजी आखबारनिविस यानी उभयता महाराज, दिवाण साहेब, स्वाऱ्या घेऊन करविरास आले.

१. तेच साली पुढें वैशाख मासी शके १७६० आकबारनिस याचे मुलाची मुंज व लग्न जाहाले. आबा खासबारदार व अबाजीपंत कुंभोजकर यानी कार्याचे खर्चाचे पुरावा केला.

(१) जानेवारी १८३६, (२) ऑगस्ट १८३६, (३) मे–जून १८३७, (४) नोव्हेंबर १८३८, (५) १६ डिसेंबर १८३८.

१. तसेच वैशाख मासी अखेरीस बेळगावाहून समसिन साहेब करविरास आले. तेच दिवशी रामराव वाईत गेले. नंतर त्यांचा रुमाल व बराबर चफरासी होते ते व पागेचे घोडे सुद्धा काढून घेऊन पायउतारा गावात आले. फिरून साहेब व अखबरनिस यांची भेट नाही.

१. दुसरे दिवशी समसिन साहेब गावांत येऊन हुजूरची भेट घेऊन दोन घटका बसून माघारे डेरेस गेले.

१. आणखी पुढे दोन रोजी हुजूरची व श्रीमंत महाराज मातुश्री दिवाण साहेब यांची भेट घेऊन कारभारी जिवराव जाधव करुन वकील सदाशिवपंत यास ठरवून गेले. नंतर जिवराव जाधव यास स्वस्थ प्रकृतीस नव्हते. याजबद्दल निघून श्रीपादवाडीस गेले. पुढे दौलतीचे काम दिनकरराव गाईकवाड व रावजी वाकनिस पाहू लागले. सदाशिव अनंत बेळगावास वकिलीस गेले. ते तिसा सलासिन अखेरीपर्यंत.

१. सन अरबेन साली[1] अवलीस रामराव अकबरनिस याची व राजाज्ञा यांजकडील वकील यशवंतराव जनवाडकर यांची कमेटी होऊन इंग्रजीत रामरावजी यास काम मिळावयाचे नाही असे जाहीर जाहले.

१. तेच साली उभयतां छत्रपती महाराज यांची मुंज्य वैशाख शुद्ध दशमीस[2] जाहाली.

१. सन इहीरे अरबेन सालात सातारकर महाराज यांची स्वारी माघ मासी[3] करविरास मुक्कामी आली. सनईसने अरबेन साली रावजी वाकनिस मनोहर गडकरी यानी बढाई केली सबब घेऊन भाद्रपद मासी आले. ते आश्विन २ दिवशी करविरास आले. शेवगाव मुक्कामाहून निघोन गेले.

१. सन सलास अरबेन साली पौष अखेरीस[4] मेहेरवान टाणंसर साहेब बहादूर येऊन राजेश्री रामचंद्रराव नारायण राजाज्ञा व मोरोपंत व हिंदूराव गायकवाड यासी पंत अकबरनिवीस याजकडे सरकार दौलतीचे कारभार सांगून साहेबजी निघोन गेले. व बेळगावास वकिलीस राघोपंत गेले. तेच साली पुढे यशवंतराव जनवाडकर गेले.

....

(१) इ. स. १९३९-४०, (२) ता. ११ मे १८४०, (३) ता. २३ जानेवारी १८४१, (४) ता. ३० जानेवारी १८४३,

१. तेच साली माघ शुद्ध ५ स श्रीपादवाडीस स्वारी जाहाली. चार दिवस राहून माघारे आली.

१. सन अरबा अरबेन साली माघ मासी[1] अखेर सातारकर महाराज यांची स्वारी करवीर मुक्कामी आली.

१. सन मजुकरी राजेश्री दाजी पंडित चैत्र मासी इंग्रज बहादूर यांजकडून मुख्य कारभारी आले.

१. सन खमस अरबेन अवल साली पटे होऊन मामलेदार नेमुन दिल्हे. पंडित मुख्य कारभारी यानी.



लेखांक : २१४

हुजूर खाजगी दप्तर : २३ / ता. १२ एप्रिल १८४५

अस्मत पन्हा माहाराज ताराबाई साहेब दाम अलताफहु नियाजमंद कपतान ग्रॅम साहेब बाहादुर ऑन स्पेशल डयुटी बादनीयाज माहाराज हसुल आंके नीयाज मंदाची खैरीयेत रोषन होवून हमेशा तलतुफ नामा फिरस्ताद करून खत रवाना करीत असिले पाहिजे. दरविला मेहेरबा साहेब ईस्कोर ऑन स्पेशल डयुटी याजकडून यादी नंबर २३ तारीख १० माहे अेप्रील सन १८४५ ईसवीची मेहेरबा पोलीटिकल एजंट साहेब प्रांत कर्नाटक यांचे नावे आमाहाराजाकडून कैदी दिनकरराव गायकवाड व आनंदराव यशवंत मंत्री कज्यात सरकारी तर्फेने व कैदीतर्फेने माहिती पाहिजे म्हणून मजकूरची आल्यावरून ईज्यानीबाकडून लिहिण्यात येते की तपशील –

१. कैदी दिनकरराव गायकवाड व आनंदराव यशवंत मंत्री या उभयतास कोल्हापुरी आणिल्या बाबत त्याही व छत्रपती माहाराज याही म्हणोन येजंट साहेब व गोरनर कोंसलांचे नांवची थैली पत्रे पाठविली आहेत ती त्याही आत्मसंतोषाने लिहिली आहेंत की काय ?

१. कोल्हापुर आमलात बंड जाहाले ते मोडण्याकरिता त्यांचे दोस्त मुंबई सरकारचे लष्कर येणार त्याजबरोबर लढाई करण्यास सर्वही एकदील

---

(१) ता. १८ फेब्रुवारी १८४४.

असावे म्हणोन सरकारी वाड्यात क्रीया जाहल्या त्या करण्यास कैदी दिनकरराव गायकवाड व आनंदराव यशवंत मंत्री यापैकी मंत्री मजकूर हजर होते की नाही ? हजर असल्यास त्या उभयतानी अगर एकटे गायकवाड याही प्रथम काहीं हरकत केली होती की काय ? केली असल्यास ते समई बाबाजी आयरेकर याने काहीं धमकी दिली होती की काय ? दिली असल्यास कोणती धमकी दिली ?

१. अजम दाजी पंडीत कारभारी यास कैद केल्यावर त्यांचे हाताखालचे करवीर व आळते व भुदरगड पेठ्याचे मामलेदार वगैरास बंडवालें लोकही कैद केले होते किंवा नाही ? केले असल्यास त्याजला रुपये देण्याविषयी बंडवाले लोकांचा तगादा लागला होता काय ? लागला असल्यास इतर कोठील रुपयें बंडवालें लोकास देवून मामलेंदार लोकांची सुटका करून घेण्यास आबाईसाहेंब माहाराज यांची आज्ञा जाहाली होतीं की काय ?

१. सदरहु बंडाईत छत्रपती माहाराजास किंवा आबाईसाहेंब माहाराजाकडे खर्चाकरिता रुपयाचें मागणे व तगादा बंडवाल्याही केला होता किंवा नाही ? केला असल्यास त्याचा निर्गम करण्यास आबाईसाहेंब माहाराजानीं कैदीस सांगितले होतें की काय ?

१. बंडाईत एकंदर जमा आली व खर्च जाहाला त्याचे हिशोबावर श्रीमन्माहाराज छत्रपती साहेंब यांची रुजु आहे ती त्याही आबाईसाहेंब माहाराजासी विचारून केली होती किंवा नाही व कोणाचे विनंतीवरून कशाकरिता रुजू करणेस आली ?

१. श्रीमन्महाराज छत्रपती साहेबांची व आबाईसाहेब माहाराजांची स्वारी चिंचवडास मेहेरबा उटरुम साहेबांचे भेटीस गेली त्याचे आगोदर येक दोन दिवस दोन हाजार रुपये सरकारी खजिन्यातून बाबाजी आयेरेकर यास दिलें तें हिशोबास खर्च लिहिलें आहेंत तेंथें असा तपशील लिहिला आहें की, हुजूरची स्वारी ईंग्रज बाहादुर यांचे मुलाखतीस चिंचवड मुक्कामी जाण्याची तयारी जाहाली ते समई लोकास खर्चास दिल्याविना त्याची समजूत पडेना सबब रोख दिले म्हणून लिहिले आहे. ते रुपये श्रीमन्महाराज छत्रपती साहेब किंवा आबाईसाहेब माहाराजांचे आज्ञेने दिले की काय ? सदरहु रुपये देण्याविषयी खानसाहेब कागलकर यानी छत्रपती माहाराज किंवा आबाईसाहेब यास विनंती केली होती किंवा नाही ?

१. कोल्हापुर आमलात बंड झाले दिवसापासून किल्यानिहाय बंदोबस्त नाही. याजकरिता तेथे मामलेदार नेमावे म्हणून मेहेरबा ऊटरुम साहेबांचे थैली पत्र किंवा तोंड जबानी निरोप अजम गुलाम गौसखा कागलकर याजबरोवर आला होता किंवा नाही ? आला असल्यास किल्यानिहायचे मामलेदार नेमण्याविषयी उभयता कैदीस आबाईसाहेब माहाराजाही किंवा श्रीमन्महाराज छत्रपती साहेबही सांगितले होते किंवा नाही ? सांगितले असल्यास काय सांगितले होते ?

१. एकंदर जमाखर्चात १४०५ रुपये खर्च लिहिले आहेत. तेथे असा तपशील लिहिला आहे की, लोकास समजून देणे करिता अजम गुलाम गौसखां बाहद्दर गेले ते समई खर्चास दिल्याविना लोकांची समजूत पटेनासी जाहाली. सबब ऐवज दिला म्हणोन लिहिले आहे. त्यास हे रुपये श्रीमन्महाराज छत्रपती साहेब किंवा आबाईसाहेब यांचे हुकुमाने दिले किंवा कसे ?

१. मेहेरबां ऊटरुम साहेबाचे तर्फेने कागलकर खानसाहेब, छत्रपती माहाराज व आबाईसाहेबाकडे बोलावयास येत असत किंवा नाही ? येत असल्यास त्याजकडे बोलणे कैदी दिनकरराव गायकवाड व राजश्री वाकनीस यांचे मार्फतीने हिंदुराव बाबा व हिंमत बाहादर व सरलष्कर यांचे समक्ष बोलत असत किंवा नाही ?

१. पंडीत कारभारी यांचे कागदाचे रुमाल सरकारी वाड्यांत होते त्यात छत्रपती साहेब यांचे हातच्या चिठ्या पाहाण्या विषयी खानसाहेब यानी आबाईसाहेब माहाराजास विनंती केली होती किंवा नाही ? केली असलेस आबाईसाहेबानी काय हुकूम दिला होता ?

१. थैली पत्राखेरीज ऊटरुम साहेब यांचा निरोप खान बहादूर हे तोंड जबानी (फाटले आहे) असत की नाही ?

१. कैदी दिनकरराव गायकवाड व आनंदराव यशवंत मंत्री यांस बंडाईस कोल्हापुरास आणल्यापासून त्यांची चाल वर्तणुक आबाईसाहेब माहाराजांचे नजरेस कशी आली ? म्हणजे ती छत्रपती माहाराज सरकारची व कंपनी सरकारची दोस्ती कायम राखण्याविषयी झटत असत किंवा बंडवाल्याचे तर्फेने वागत असत ?

येणे प्रमाणे बारा कलमी लिहिल्याचे उत्तर लौकर ईनायत झाले पाहिजे. म्हणजे मेहेरबा लॅमस्डन सासेब बाहादुर याजकडे लिहिणेस येईल.

सही इंग्रजी
डुपरी

ता। तारीख १२ माहे एप्रील सन १८४५ ईसवी मुकाम बावडेनजीक लष्कर व कोल्हापुर.



लेखांक : २१५

हुजूर खाजगी दप्तर : २४ / ता. २५ एप्रिल १८४५

अस्मत पन्हाह माहाराज ताराबाई साहेब दाम अलताफहु नियाजमंद कपतान ग्रेम साहेब बाहादुर बाद नीयाज माहाराज हसूल नीयाज मंदाची खैर-येत रोषन होवून हमेषा तलतुफ नामा फिरस्ताद करून खुष राज करीत असले पाहिजे. दरविला मेहेरबा साहेब बाहादुर ईस्कॉयर लमसडैन याजकडून याद नंबर ३५, २५ एप्रिल सन १८४५ ईसवीची. कैदी रताजीराव चव्हाण हिंमत बाहादुर व हिंदुराव गायकवाड सरखवास यांचा कच्या पक्के चौकशीस आला. त्यात फिर्यादी व कैदी तर्फेने कागदपत्र व माहाराजाकडून माहिती आणविण्यात आली पाहिजे. म्हणोन मजकुराची मेहेरबां पोलीटिकल येजंट साहेब बहादुर प्रांत कर्नाटक यांचे नावे आल्यावरून ईज्यानीबाकडून लिहिण्यात येते की तपशील.

१. कोल्हापुरास गर्दी झाल्यावर दुसरे दिवशी रताजीराव चव्हाण हिंमत बहादुर हे कोल्हापुरी आले तेव्हा आपणास बाबाजी आयरेकर याने व पतकाचे लोकानी तसदी करून करवीरास आणिले म्हणोन बाईसाहेब यास त्यानी जाहीर केले होते किंवा नाही ? जाहीर केले असल्यास काय जाहीर केले होते ते सविस्तर लिहून आले पाहिजे.

२. सरकारी वाड्यात गर्दी झाल्यावर शफतेचा क्रम जाहाला त्यात शफता करण्यास हिंमत बाहाद्दर रताजीराव चव्हाण व हिंदुराव गायकवाड सरखवास याजवर किंवा हरदुतून कोणास बाबाजी आयरेकर याने धमकी दिली होती की

काय ? धमकी दिली असल्यास कोणते प्रकारची दिली ते सविस्तर लिहून आले पाहिजे.

३. रामचंद्र केशव पडवळ यास तुम्ही लष्करकडचे काम पूर्ववत प्रमाणे पाहात जावे म्हणोन श्रीमन्महाराज छत्रपती साहेब यांचे समक्ष हिंमत बाहाद्दर रताजीराव चव्हाण यांनी सांगितले होते की काय ?

४. दाजी पंडीत कारभारी याजवर गर्दी जाहाले दिवसापासून हिंमत बाहाद्दर रताजीराव चव्हाण व हिंदुराव बाबा गायकवाड सरखवास याची वर्तणूक बाईसाहेब माहाराजांचे नजरेस कशी आली ? म्हणजे आपले कज्याविषयी मेहनत घेत असत किंवा बंडवाल्याचे तर्फेने वागत असत ?

येणेप्रमाणे च्यार कलमाची उत्तरे लौकर ईनायत व्हावी, म्हणजे मेहेरबां लमसडैन साहेब बाहादुर ऑनस्पीसीयाल ड्यूटी याजकडे जबाब पाठविणेस येईल.

सही इंग्रजी



लेखांक : २१६

तोरगल : ३५ / ता. २६ सप्टेंबर १८४५

साहेब मेहेरबां दोस्तां लक्ष्मणराव शिंदे सेना खासकील सलाम अजतर्फ कपतान ग्रेहेम साहेब बहादुर पोलीटिकल सुपीर्रीडेंट कोल्हापूर सलाम. येथील खैर जाणून आपले खैरीयत हमेशा कलमी करून दील आराम करीत असले पाहिजे. दरिवीला आपण छ १० माहे रमजानचे पत्र पाठविले त्यात कैलासवासी माहाराज छत्रपती साहेबानी पेशजी कडकोळ व नंदनवाड व खोची अशी तीन गावे घेतली ती मोकळीक व्हावी म्हणून कलमी जाहाल्यास पत्रातील मजकूर सर्व समजला व आपले वकील यानी जाहीर केला आहे या विषयी तपास होऊन मागाहून उत्तर करण्यात येईल जीयादा काय लिहिणे. ता॥ छ २६ माहे सप्टेंबर सन १८४५ ईसवी मोहबत असावी हे किताब

सिताराम गोपाळ सिरस्तेदर हुजूर

सही इंग्रजी



लेखांक : २१७

निवडी : २०१३३ ते २०१५२ / इ. स. १८४५

हकिगत कैलासवासी श्रीमन्महाराज शिवछत्रपतीसाहेब शककर्ते यांचे कारकीर्दीपासून. पादशाहा ज्याहानाबाद उर्फ दिली यांचे जनाबेत विनंतीपत्रे नबाब वजीर व नबाब वजीर हैदराबाद व नवाब सावनुर व उमराव व सरदार वगैरे यांसी पारसी भाषेचे महाराज सरकारात आले त्याचे बारनिशीचा किताब मरहूम गोविंद निळोजी पारसनवीस यांनी लिहून सदर किताबाचे नाव 'मज्मूअलगवाहर' म्हणजे 'मोत्याची लडा' म्हणून टेविले. त्या किताबेचा तरजुमा हिंदवी भाषेने करून घ्यावा म्हणून अजीमुशान मेजर ग्रेहेम साहेब बहादूर सुपरिंटेंडेंट पोलिटिकल ईलाखा श्रीमन्महाराज राजश्री छत्रपती साहेब सरकार करवीर यांनी राजश्री दाजीसाहेब पंडित मुख्य कारभारी रावबहादूर यांचे समक्ष महिपतराव व गोपाळ पारसनवीस हे गोविंद निळोजी पारसनवीस यांचे पणतू यास हुकूम फर्माविला. त्यावरून सदर किताबेचा तरजुमा कलमबंदीत लिहीला आहे.

(१) जग उत्पन्न करणारा यजीद म्हणजे ईश्वर याची स्तुती करितो की ज्यांनी आकाशात नवे उपन्न करण्याच्या शक्तीने उत्तम प्रकाराचे पुतळे, एकमेकांच्या उपमेस नाहीत असे रीतीचे करून पायावर कायम केले आणि चार तत्वाचे जे प्रकार भिन्न भिन्न आहेत त्यास बराबरीच्या पाषाणाबरोबर उत्पन्न करण्याच्या ताजव्यात मनुष्य व जनावरे व पक्षी व झाडे व पाषाणवत या सर्वास कायापुरात आणिले. आणि वाईट स्थळास नवे रम्य स्थळ करून त्या स्थळास प्रकाशदायक केले. खुदापरस्त म्हणजे ईश्वराची प्राप्ती करून घेणारा ज्ञानी मानव लोक यानी ईलाही म्हणजे ईश्वर याची स्तुती कायावाचामने करून निरंतर करावी म्हणोन लिहिले आहे.

(२) कैलासवासी श्रीमन्महाराज शिवछत्रपती शककर्ते यांचे कारकिर्दीत निळोजी येसाजी पारसनवीस यानी पारसी भाषेनी विनंतीपत्र व पत्रे लिहिली त्यांचा तपसील :—

पादशाहा शाह आलमगीर शाहज्याहनाबाद उर्फ दिल्ही याचे मुछदी याचे नावे लिहीले आहे आणि त्यातील मजकुर :— उमराय कामगार व उमराय नामदार या मुलकांत येऊन तीन वर्षे जाली कारण खाली दावदगे तिसी तानी

म्हणजे पादशहा याचे चित्तात मजलाउलमुलीक घ्यावा असे आहे व किल्ले जप्त करावे म्हणोन हुकूम येतो त्याचा जवाब लवकरच फत्ते होईल म्हणोन अर्ज लिहितात. त्यास या कामकाजाचा शोध करण्यास अकलेचा घोडा थकलेला आहे आणि किले घेणे ही कठीण हे जाणत नाही. सबब आश्चर्य वाटते यातील (खोटे) अर्ज्या लिहिण्यानी फळ काय होईल याचा विचार न करता खरेपणा जो मोकळीकीस कारण आहे तो घालवितात. कारण :सदर वर्तन हे किला कल्याण व किला बिदर मोठे मैदानात आहे. त्याजवर मोर्चे लाऊन हक्क करावयासी जातात. तसे नाही. हे मोठे डोंगर दोनशे कोश लांब व चाळीस कोश रुंदी आहे. जागोजागी मोठे कठीण वाढेबुलंद अवघड आहेत. मोठे किले मजबूत बांधिलेले आहेत. त्याहुन काही दर्याकिनारी आहेत. तसाच आफजलखान अदालतखान पनाह म्हणजे विजापूरचे पादशहाकडून पुष्कळ फौजेसह जावळीचे मुक्कामी येऊन पोहोचल्यावर लढाईत फौजेचा नाश होऊन अफजलखान मैत जाहला.

खरा मजकूर जनाब मुबारकेस जाहीर न करता प्रांत घेऊन फत्ते करितो म्हणून बातील लिहित आहेत. पहाड म्हणजे डोंगर थोर व दरे गहरे खोल फार बहुत आहेत, ते किल्ले घेण्याविषयीं लष्कर सुद्धा येऊन तीन वर्षेपर्यंत फार मेहनत केली. अशास वतनाचा मुलुख याची खबरदारी ठेवणे जरुर आहे. विनाकारण मुलुकविषयी खटला उत्पन्न करणारास यश आले नाही म्हणोन माघारे फौजेसुद्धा उठोन गेले. हे अलमात जाहीर जाहले आहे.

प्रतापराव गुजर सरसेनापती यांचे नावचे पत्र बंदर सुरतेस लिहीले ह्यातील मजकूर मुछदियान व कानूगोयान म्हणजे पाटील व देसायांना व देशपांड्यांना व सावकारांना व शेटे महाजन दाखल व सर्वत्र राहाणार बंदर सुरत यांस महाराज सरकारांनी सेवकास हुकूम फर्मावून रवाना केले आहे. जे दरसाल चवथाईचा ऐवज बंदर सुरत येथील यावयाचा राहिला आहे त्याचा हिशेब चौथाईचा ऐवज घेऊन यावा म्हणोन सेवकास आज्ञा जाहली आहे. याजकरिता हा तपसीलवार मजकूर तुम्हास लिहिला आहे. त्यास आपले शुभास्ते द्वारा चौथाईचा ऐवज बाकी राहिले सुद्धा पाठवून द्यावा. तुम्ही या हुकमाची वाट करण्याच्या रीतीने करावी म्हणजे फार उत्तम आहे. चौथाईचा ऐवज बाकी सुद्धा गुमास्तेबरोबर इकडे पाठवून द्याल तर बरे. नाही तर थोड्या दिवसात फौज त्या देशी येईल आणि नासाडी होईल. कारण दोन वेळा त्या मुलकात यशस्वी फौज जाऊन

खराबी जाहालीच आहे. तेव्हा तुमची बिशाद काय आहे ? दिलेरखान उमराय पादशहा याचा सेनापती या प्रांती फौज घेऊन आले होते. त्यांचा नाश लढाईत होऊन पळून गेले. हे वर्तमान तुम्हास कळविलेलेच आहे. अशास पुरते समजून लिहिले अन्वये चौथाईचा ऐवज बाकीसुद्धा गुमास्ते बरोबर घेऊन पाठवून द्यावा. म्हणजे मुलखाची खराबी व ताराजी होणार नाही.

पादशहा अलमगीर शाहा यांचे जनाब मुबारकेस विनंतीपत्र. अर्जदास्त कल्याण इच्छिणार दृढ निश्चय आची सेवेविषयी मजबुत चरणी शिवाजी छत्रपती अर्ज करतो जहां सेवक पादशहाचे दौलतीचे कल्याणाची इच्छा करणार. प्रारब्ध योगे करून पादशहा यांचा निरोप न घेता आलो. परंतु सेवेविषयी तत्पर आहे. आणि सर्वांवरी पादशहा यांची कृपेची छाया कायम असावी व पादशहा यांची कीर्त संबंध जगात प्रसिद्धी. या करिता कितीयेक लहान थोरांचे कल्याणाचे आहेत. ते अर्ज करितो जे या काळी ऐकवेत आहे की सत्वरच पादशहाची मोहीम मजवर........त्यास द्रव्य व सामान खजानेत नसल्यामुळेही लोकांकडून जेजीये (जिजीया) म्हणजे पटी घेऊन दौलतीचे सामान तयार करावे. त्यास या विषई मी अर्ज करितो की हजरत अकबर शाहा बादशाह यानी बावन्न वर्षे दौलत करून सर्व प्रजेचे संरक्षण करून शेवा घेतली. आणी सर्व ज्ञातीस आपआपले स्वधर्माप्रमाणे वर्तविले. याजमुळे बादशाह यास जगात 'मिरोह' हा किताब करून किर्ती सर्व अलमात जाहली. व जिकडे इच्छा करीत यश व ऐश्वर्य प्राप्त होऊन सर्वास हुकमत बांग दिले. हजरत नुरुद्दीन ज्याहांगीर पादशाह यानी तक्तावर बावीस वर्षे दौलतचे ऐश आराम करून सर्व प्रजेचे संरक्षण केले. तसेच आपले वडीलानी काही दिवस करून कीर्त संपादन केली. नंतर बाकीचे आयुष्य तपश्चर्या करून खुदापरस्तीत घालविले आहे. येणे करून सत्कीर्ती तमाम आलमात प्रसिद्ध जाहली आहे. असे असून ते दस्तुर सोडून दर्यादिल पादशाहानी जेजियेपट्टी घेणेस आरंभ केला आहे. हे फार आश्चर्य आहे. आणी सर्व जाती आपआपले स्वधर्मे चालत असता परधर्म चांगला हे चित्तातही आणीत नाहीत. कृपा व परोपकार या पृथ्वीत राहाणार पादशहाची स्तुती लहानथोरांचे मुखी सदोदीत राहणार असे जे स्थान तेथूनच प्रजेस उपद्रव होणेची इच्छा जाहली आहे. त्यास रयत दौलतीदाखल व वृद्धीही दौलतीची आहे ती रयत सुखी असून स्वकार्याचे होई तत्पर असावी. हजरत अकबर पादशहा यांचे वेळी किले व

मुलुख गेला, ज्यानी घेऊन खराब केला त्यांचा अन्याय पादशहाकडे नाही. जेथे लाख रुपये यावयाचे तेथे एक हजार रुपये येणे कठीण पडले. या संकटाचे कारणाने एकाएकी दौलत निर्मनुषी होऊन पातशहा खलीप व शाहजादे मात्र वाडेत राहते झाले. त्या समईचे अमीर उमराव व मनसबदार हल्ली हजर आहेत त्यास माहीत आहे. शिपाई हिंदु मुसलमान वगैरे अन्नास महाग होऊन रोज दुखात असतात. प्रसंग गुदरला असता श्रीईश्वरकृपेकरून सर्व प्रांत हुकमतीने येऊन सत्कीर्ती जगात जाहाली. ते शूरत्व प्रजेस ऐश्वर्य देणारे. हल्लीचे कृत्यास कशी योग्यता करील ? जिजीया पट्टीचे उपद्रवाची किर्ती याप्रमाणेचे पूर्वेपासून पश्चिमेपर्यंत जाईल व बखरीतही लिहीणेस दाखल होईल. ती अशी की, दक्षणेचा पादशाहा याचे दौलतीत सर्व जातीचे लोक अन्नासाठी नोकरी करीत आहेत. ते फकिराचे कचे कोल अन्वये (कचे कोल म्हणजे तुकडे) भिन्न भिन्न जातीचे गरीब लोक व सेवक आहेत. त्यांना जातीत लजित करून ब्राह्मण, योगी व संन्यासी व बैरागी व शेवडे म्हणजे जैन व गरीब व हरिहरि व संकटात पडलेले व कंगाल याजपाशी जेजीया पट्टी घेणे व गरीब लोकास पुरुषार्थ दाखविणे हे अयोग्य व हजरत तेमूरशहा बादशाह याची सत्कीर्ती प्रसिद्ध आहे ती बुडविली अन्वये होते. हजरत सलामत किताब अस्मानी व कलाम।। बानी म्हणजे कुरान शरीफ, त्यात ' रबुल आलमिन ' म्हणोन आहे. म्हणजे ' ईश्वर ' म्हणून आहे. ' रबूल मुसलमिन ' म्हणजे ' ईश्वर मुसलमानाचा ' असे लिहीले नाही. हिंदु व मुसलमान वगैरे ज्ञाती ईश्वरापाशी एकरंग आहे.: मुसलमान लोक मसुदीत बांग देतात. ती भगवंताची स्तुतीच होय. आणी हिंदू लोक देवळात घंटा वाजवून स्तुतीच करीतात. त्यास जाती धर्मावर जुल्म करणे हे भगवंतासी वैरत्व आणि अपराध व शास्त्रविरुद्ध व जगात अन्याय रीतीने जेजिया पट्टी घेणे हे योग्य नाही. व शास्त्रमतेही अयोग्य आहे.

पूर्वी हजरत सुलतान अहमदशहा गुजराथी याच्या मनात असाच विकल्प आला होता. परंतु पातशाहनीचे चित्तांत विवेक करून सोडून दिला. याचे कारण या करल्यानी ईश्वराचे अपराधी व्हावे हे पुरुषार्थास विदित नव्हे. यास दृष्टांत-अग्नी राळास त्वरित भस्म करितो हे सर्वांस माहीत आहे. परंतु मनुष्यास विनाकारण उपद्रव केला असता त्याचा द्रोहाग्नी राळापेक्षाही जलद दौलत भस्म करितो. या सबब सर्व काल हेच उत्तम आहे की जो विकल्प जुलुम करणेचा बादशाह

जाहांपनाहाचे चित्तांत आला आहे तो दूर करावा. आणी सेवक लोकांनी नेहमी नोकरीवर नजर ठेवावी. व हजरत पादशहानी त्याजवर कृपा करावी. मदुम आजारी म्हणजे प्रजेस दु:ख देणे याचा विचार करून कृपा करावी. जिजीया पट्टी घेणेची इच्छा असेल तर, मजपासी घ्यावी. मजला काही कठीण नाही. शेवे-विषयी हजर असे. तमाम शेवक लोक दौलतीतील कीटक न्याये गरीब आहेत. हा शेवक हुजूर पुरनुरचा आहे. सबब पादशहाचे दौलतीचे कल्याणार्थ अर्ज करितो जे हिंदू लोकांस दु:ख दिले असता त्यांचे द्रोहाग्नीने दौलत भस्म होईल. यास्तव हा अर्ज शेवकाचा मान्य करून जिजीयापट्टी माफ करणे विषयी हुकूम फर्मावा व हजरत पादशाह जाहांपनाह आफताब म्हणजे सूर्य दौलतीच्या तेजस्वाने सर्व जगावर तेजस्वी असो.

(३) कैलासवासी श्री मन्माहाराज राजाराम साहेब छत्रपती यांचे वडील पुत्र कैलासवासी श्री मन्माहाराज शिवछत्रपती यांचे कालकीर्दीत बाळाजी निळोजी पारसनवीस यानी पारसी भाषेनी विनंती पत्रे व पत्रे लिहीली त्याचा तपशील.

पादशहा आलमगीर शाह दिल्ली याचे हुजूरात विनंती पत्र लिहिले जे शेवक दरगाह पादशाही पूर्वापार वडिलावडिली पादशाही दौलतीची शेवा एकनिष्ठेनी करून फराज होत आलेला आहे. दरी आयाम फताव रोजी येऊन मुलखाचा बंदोबस्त जाहाला आहे. त्यास हा कमतरीन शेवक याचा इरादा कायम आहे जो खिजमत करून दक्षिण प्रांतातील मुलखाचा बंदोबस्त करून पादशाही दौलतीत सरफराज व्हावे ये विषयीचा मजकूर आजीमुशान म्हणजे श्रेष्ठ किताबवाले नवाब जमदतुले मुल्लख व नवाब बक्षीग्युल मुमालिक जनाबिली मुबारकेत मरुज करतील त्या अन्वये दक्षिण प्रांतातील मुलुखाचा बंदोबस्त करणे विषई शेवक यांस हूकूम व्हावा. अफताबी म्हणजे सूर्य प्रतापाचा व कीर्तीचा जगात सर्वकाल रोशन असावा ही आज्ञा म्हणजे उमेद आहे.

आजीमुशान म्हणजे श्रेष्ठ किताब नवाब खान दिवाण पादशाह यांचे नावे पत्र लिहिले जे, सेवक पादशाही माझे चित्तात खिदमत म्हणजे सेवा पादशाही करून सरफराज व्हावे. हा इरादा कायम आहे. याजकरिता पेशजी हर सर्व मजकूर बामारीफत दैवबान शूर संक्राजीपंत यानी तपसीलवार नवाब साहेबास लिहून पाठविलाच आहे, त्यावरून जाहलाच असेल.

मताल्लमदास व सुजपाअतशाआर म्हणजे जवांमर्द खंडेराव दाभाडे याची मुलाकात जाहाली ते समई सर्व मजकूर नबाबास मालुम जाहालाच आहे. त्यास सर्वोपरी इकडील बंदोबस्त पादशाही जनाबेहून करून घेऊन सरफराज होय ते नवाबसाहेबांनी करावे. दक्षिण प्रांताचे मुलकाची बंदोबस्ती करून देण्याविषयी नबाब साहेबाकडून अलक्ष होऊ नये. पादशाही दौलतीत सर्वत्रांचे कार्यभाग व सरफराजी करण्याचा भार श्री ईश्वरानी अनवाबसाहेबास दिला आहे त्या अर्थे विस्तारे लिहीण्यास ताकद नाही.

समुआलमकान म्हणजे श्रेष्ठ किताब वजिरीचा नबाब निजामन मुलुक साहेब बहाद्दर यांचे नावे पत्र लिहीले जे, नवाबाकडील नवाबामारीफत आली म्हणजे जेव्हा मर्द झुंझारराव घाडगे या समागमे पाठविले त्या पत्रात हकिगत— उमेद म्हणजे इच्छा नवाबसाहेब यांच्या कृपेची आहे जे सेवा रुजू करून पादशाही दौलतीत सरफराज व्हावे येविषई नवाब साहेबाकडून दस्तगिरी जी होणे ती होईल. त्यास या राज्यास सर्वेपरी वसिला पुस्तपन्हाह नवाबसाहेब याचा आहे. आणी वडीलवडिली पादशाही दौलतीत सेवा करून सरफराजी मिळविली आहे. त्यास ईश्वर कृपेनिहाचे इरादा कायम आहे. जेव्हा मुकदमा जे बंदोबस्त मुलुक दक्षणचा व्हावा म्हणोन नबाबसाहेबाचे चित्तात आले आहे, त्यास उभयेपक्षी हा मनसबा कबूल नेकनामीचा आहे. सदर मनसुबा अलमात जाहीर व प्रसिद्ध व्हावेचे लाजीम व योग्य आहे. ये विषीचा मजकूर तपशीलवार शूर मल्हारपंत यास कलमी केला आहे. त्यावरून नबाबसाहेबास जाहीर होईल. मोतमिद म्हणजे विश्वासू बाबूराव वकील इकडील मजमून नवाबसाहेबास रोशन करतील जियादा काय लिहीणे. अफताब म्हणजे सूर्यप्रतापाचा व किर्तीचा अलमात प्रसिद्ध असावा.

रफिउशमान म्हणजे श्रेष्ठ किताब वजिरीचा नबाब निजामन मुलुख साहेब बहाद्दर याचे नावे पत्र लिहीले आहे जे, दरी आयाम मुस्तह सुजुल खिदमत म्हणजे विश्वासू सेवक नारोपंत येकनिष्ठ या राज्यातील आहेत व सुरनविसीची आणी मुत्सद्दीपणाची आसामीतील आहेत. त्यास उभयपक्षी अहितार्थाचा मजकूर नाही. उभयपक्षी एकदिली आहे. त्यास पंत मशार निलहे हरहरबाबा नवाब साहेबाचे हुजूरात विनंती व पत्रे लिहीतील. त्या मजकुरास नवाब साहेबानी नजर मेहेरबानीची व दोस्तीची देऊन या राज्याची आभिवृद्धी व जियादती होय ते नवाब

साहेबानी करावे. जियादा काय लिहीणे. अफताब म्हणजे सूय प्रतापाचा व किर्तीचा जगात प्रसिद्ध व्हावे.

नबाब आल्ली जनाब नबाब निजामन मुलखसाहेब बहादूर यांचे दिवाणांचे नावे पत्र लिहीले जे, आपण पत्र पाठविले ते पोहोचून कलमी केला मजकूर मालुम होऊन शादमानी हासिल जाहली. नबाबाला जनाब यांची स्वारी थोडके दिवसात दक्षिण प्रांतातील फंद व फिसालत करणार या लोकांचा बंदोबस्त करणे करिता निघणार याजकरिता बाबुराव वकील यासी पेशजी पाठविले आहेत. कारण हरहरबाबा मदत व कुमक करणे विषई मशार निले वकील यानी कामाविषई कोसीस करून सरंजाम पाठवून देण्याविषई नवाबाला जनाब यांचे हुजरातून जवाब घेऊन पाठवावा. म्हणजे मातबर सरदारांबरोबर पागा व फौज रवाना करून देतो ये विषईचा मजकूर इजत आसार संक्राजीपंत वकील जुबानी सांगतील त्याजवरून मालुम होईल. जियादा काय लिहिणे ?

नवाबाला जनाब नवाब निजामन मुल्लुम साहेब बहादर यांचे व दिवाणाचे नावे पत्र लिहीले आहे जे दरीआयाम इकडील मतलब मजकूर सर्व कामे आपण ध्यानात घेऊन करण्याचा निश्चय केला आहे. ये विषई इजतआला बाबूराव वकील यानी कोसीस व मेहनत बहुत करून सर्व कामे नमादात आणली आहेत. म्हणोन जाहीर जाहल्यावरून शादमानी जाहली आहे. आणि इजत आसार संक्राजीपंत वकील व मशार निलहे वकील यांच्या लिहीण्याप्रमाणे पागेची व फौजेजी सरंजामची तयारी केली आहे त्यास आपणाकडून दोस्तीने भरलेले पत्र येऊन पोहोचताच इकडील पागेची व फौजेची रवानगी आपल्याकडे करून देतो. ये विषई वकील मशार निलहे यास तपशीलवार कलमी केले आहे. पागेचे सरदार व फौजेचे सरदार आपणाकडे रवाना होणेचे त्यास समक्ष आज्ञा जाहली आहे जे साहेब बहादराचे हुकूमाप्रमाणे नोकरी बजावून आलमात लौकिक व कीर्त होई ते करावे. श्री ईश्वर कृपेनी मुलाकात इकडील व मौला अलकाब नवाब साहेब बहादर याची जाहल्यावर कोणत्याही गोष्टीचा अंदेशा राहणार नाही. हे साहेबानी यकीन जाणावे वरकड तपसिलवार मजकूर मशार निल्हे वकील रोशन करीतील. त्याजवरून साहेबास जाहीर होईल. जियादा काय लिहीणे ?

नवाबाला जनाब जुलफीकारखान बहादर याचे पुत्र नवाबवाला जनाव आसदखान दिवाण बहादर यासी पत्र लिहीले आहे जे, नवाब साहेबानी या

राज्याची सर्वेपरि शरम धरुन जियादती म्हणजे अभिवृद्धी होण्याविषई हजरत पादशाह याचे मुबारकेत बहुत कोशिश म्हणजे पराकाष्टेचा यत्न केला आहे. आणी सर्वेपरी वसिला म्हणजे साभिमान नवाब साहेबानी त्र्यंबकराव यांचा धरून या राज्याचे आभिवृद्धीचे कार्यभाग नमोदात आणिले आहेत. ये विषईची खुषखबर वकील यांचे लिहीण्यावरून जाहीर होऊन निहायत संतोषवासी जाहली आहे. त्याचा विस्तार करणेची ताकद नाही. श्री ईश्वर कृपेनी वजिरीषणाचे प्रतापाचा सूर्य व कार्यभाग करण्याची यश किर्ती सर्वकाल जगात प्रसिद्ध असावी हेच सदोदित ईश्वरापाशी इच्छित आहोत. आम्ही पूर्वापार एकनिष्ठ बहादर शाहे दौलत शहानशाही म्हणजे पादशाहीचे आहो. याजकरिता आमचे राज्याचे जियादतीचा मजकूर जो चित्तात आहे तो हजरत पादशाह याचे विनंती पत्रात लिहून पाठविला आहे व तपसीलवार मजकूर नवाब साहेबास जुहूर होण्याकरिता वकील मजकूर यासी कलम केला आहे. त्याजवरून आनवाब साहेबास सर्व मजकूर रोशन होईल. आमची अर्जू म्हणजे उमेद आहे जे हजरत पादशाह याचे दौलतीत नवाब वजीर व सरदार तमाम म्हणजे सर्व शुद्ध अंतःकरणे सेवा करीत आहे तसीच हजरत पादशाही दौलतीत शुद्ध अंतःकरणयुक्त मी सेवा करावी अशी माझी इच्छा आहे. ही इच्छा पूर्ण करणेस जनाव साहेबाकडे असता जियादा लिहीणेस ताकद नाही.

नवाबाला जनाब जुलफिकारखान साहेब बहादर दिवान हजरत पादशहा दिली यांचे नावे अर्जदास्त म्हणजे पत्र तिमाजीपंत डबीर निसबत महाराज सरकार किल्ले पन्हाळा यानी लिहीले आहे जे, दायमुल आवकात म्हणजे सर्वकाल निजध्यास पादशाही दौलत जियादा होणेविषई ईश्वरापासी मी करीत आहे. दरीआयाम इलाहतालाने म्हणजे ईश्वराने आनवाब साहेबास इतबार हजरत पादशाही सलतनतीचा दिला आहे हा सदोदित कायम असावा. हेच ईश्वराजवळ मी इच्छित आहे. श्रीमन्महाराजे यानी विनंतीपत्रें हजरत पादशाहा यांचे जनाबेत लिहीली आहेत व इजत आसार हरिहरराव पिंगले प्रधान यासी नबाब यांनी साहेबास आपले नावचे विनंती पत्र पाठविले. त्यास आदमासे दहा आकरा महिने होत आले असता अलताफ नामा म्हणजे हजरत पातशहा याचे कृपेचे आज्ञोत्तर येऊन सादर जाहाले नाही आणि नबाब साहेब महाराज सरकारचे राज्याची आभिवृद्धी करून येण्याविषई हजरत पादशहा याचा हुकुम घेतला आहे. म्हणोन

वकील यानी महाराज सरकारात लेहून पाठविले आहे. त्यास नवाबसाहेब बुजर्ग या राज्याची तरकी व जियादती करून देणार कायम असता महाराजाचे चित्तात काही अंदेशा राहिलेला नाही. आणी नबाब साहेबास महाराजानी बजाय बुजुर्गान सलीम मानीत आहेत. दरिवीला चंद्रसेन जाधवराव वगैरे सरकार सरदार यानी फौज घेवून येवून किले पन्हाळे सारिखा किल्ला खेलना उर्फ विशाळगड घेतला आहे. आणी बहुत फिसाद व फितना प्रांतात चालविली आहे. आणी महाराज सरकार दौलतीची सर्वेपरि शरम व साभिमान नवाब साहेब यांस असता जियादा कलमी करण्यास ताकद नाही. अशास महाराजांचे राज्यातील संकटे निवारण करण्याचा अखत्यार ईश्वरानी नवाब साहेबांस दिला आहे. त्यास या वक्ती नवाब साहेबानी महाराजांचे राज्याची मदतगारी व पुस्तपन्हा हरहरबाबा करून सत्वर बंदोबस्त होय ते करावे हेच नबाबसाहेब दरियादिलास वाजीब आहे. वरकड मजकूर राजेश्री त्र्यंबकराव वकील यास लिहीले आहे. त्यास बयाजवार मजकूर वकील मजकूर मारूज करतील. त्याजवरून नबाब साहेबास रोशन होईल. जियादा लिहीण्यास ताकद नाही.

हजरत पादशाही सलतनीत वजिरीपणाचा चंद्र पौर्णिमेसारखा सदोदित प्रसिद्ध होऊन अलमात हमेशा नवाब साहेब कृपा करणार कायम असोत.

(४) कैलासवासी श्री मन्महाराज राजाराम साहेब छत्रपती यांचे दुसरे चिरंजीव कैलासवासी श्रीमन्माहाराज शंभू छत्रपती यांचे कालकिर्दित गोविंद निळोजी पारसनवीस यांनी पारसी भाषेनी विनंती पत्रे लिहीली त्याचा तपसील :

पादशहा आलमगीर शाहा दिल्ली याचे हुजुरात अर्जदारात म्हणजे विनंती पत्र लिहीले आहे जे, मी फिदवी म्हणजे शेवक एकनिष्ठेने पूर्वापार दौलतीत सेवा करीत आलो आहो. त्या अन्वये पादशाहाचे सलतनीत सेवा करून सरफराज होणेचा निश्चय माझा कायम व बरकरदार आहे. दक्षिण प्रांतातील सुभेदार यासी दोस्ती ठेऊन फौजदार व ठाणेदार यास मदत, तसेच पादशाहाच्या मुलखाची निगाबाजी करण्यात मजकडून कसूर होत नाही. तसेच आरजी म्हणजे विनंतीपत्रे, हकीकत इरादा म्हणजे भाव व अकिदत म्हणजे विश्वास, हालीचा व पुढील आहे. तो बामारीफत नवाबामौला आलफा व मालीक हजरत पादशाही जनाब मुबारकतेत लेहून पाठविलेच आहे.

तीर्थस्वरूप श्रीमन्महाराज राजश्री शाहू छत्रपती साहेब हे आमचे चुलत

बंधू, यानी आदमतुल्लाखान यांचे मारीफत पैगाम हजरत पादशाही दौलतीत चालविला आहे. दरिविला फिदवी कडील सरदारान बाजमीयत म्हणजे फौजेनिसी व पालेगार श्रीरंगपट्टण वगैरे यानी इलाज सोडून जास्त कदम ठेऊन प्रांतात शरारत करू लागले. सबब वीस हजार स्वार व एक लक्ष प्यादे जमा केले होते. मुकाविला हरदो लस्कराचा होऊन लढाई जाहली. त्या लढाईत पालेगार यांचे फौजेची शिकस्ती होऊन ताराजी जाहली. हजरत पादशाहे यांचे कृपेकरून हा सेवक एकनिष्ठेने फौजेची नसरतमंदी म्हणजे फत्ते जाहली आहे. ही तमाम हकीकत व शेवकाचे सरदारानी लढाई कोसीस करून जवानमर्दी केली आहे, तो मजकूर खातरखवा हे मजमून सर्व खानसाहेब मशार निल्हे यास कलमी केले आहे. त्यास खानसाहेब जनाब मुबारकेत विनंती करीतील, त्याजवरून जाहीर होईल. बंदा म्हणजे शेवक यासी उमेद म्हणजे इच्छा आजफजर म्हणजे हजरत बादशहा याची होऊन एकनिष्ठपणानी पादशाही दौलतीत शेवा जाहलेली किर्ती अलमात प्रसिद्ध व्हावी हीच आहे. हमेशा दक्षिण प्रांतातील पालेगार व ठाणेदार सरकशान म्हणजे मगरुर व बदनियत यांचे बंदोबस्ताविषई हुकूम खानसाहेब यांचे मार्फत पादशाही दौलतीत शेवा आजदिल व जान कोशीश करून दाखवण्यास शेवक अंतर करणार नाही. अफताब म्हणजे सूर्य पादशाही दौलतीचा सर्व जगावर थोरपणाचा तेजश्री कायम असो.

नबाबवाला जनाब निजामन मुलुक फत्तेजंग सिपसालर असफजहान उर्फ किलीजखान बहादर हैदराबाद यास पत्र लिहीले आहे जे, ईश्वर समर्थ, विश्वाचे पालन करणार, त्या ईश्वराने हजरत पादशहा म्हणजे ईश्वराची प्रतिमा व नवाब व अमीर राजे होय व उमराव व सरदार थोर रुतबेचे निर्माण करून अलमपरवरी चालण्याचा दस्तुर करून देऊन प्रजापालण करावे म्हणोन ईश्वराचा हुकूम सर्व अलमात कायम म्हणजे शाश्वद आहे. असे असता तीर्थस्वरूप श्रीमन्महाराज राजश्री शिवछत्रपती महाराज यानी दस्तुर मवाफिक प्रजापालन करण्याचे सोडून प्रजेस दर एक निमित्त्ये जुल्म करू लागले. सर्वत्र राज्याची ताराजी होऊन दौलत खराबीत आली, हे कदीम शेवक लोकानी चित्तात आणून तिर्थस्वरूप श्रीमन्महाराज राजश्री छत्रपती यांसे खासगी चिठीचा— (अपूर्ण)



लेखांक : २१८

राव विश्वासराव गायकवाड दप्तर : १८ / ता. १८ ऑक्टोबर १८४७

राजेश्री हिंदुराव गायकवाड सरखवास यासी प्रती जानकीबाई आमात्य आशिर्वाद विनंती उपरी येथील कुशल जाणोन स्वकीय लेखन करीत गेले पाहिजे. विशेष सरकारचे आज्ञेवरून माधवराव लक्ष्मण नंदगावकर यांचे चिरंजीव राजेश्री रामराव यासी आश्वीन श्रु ॥ १० भोमवासरे शके १७६९ रोजी संस्थानी दत्तक घेण्यात येवून समारंभाची शर्करा पाठविली आहे. पावलेचे लिहून यावे. रवाना छ ८ माहे जीलकाद. बहुत काय लिहिणे. लोभ कीजे हा आशिर्वाद.



लेखांक :२१९

निवडी : १९९१ ता. ८ एप्रिल १८४८

श्री मन्महाराज राजश्री छत्रपती स्वामीचे

शेवेशी विनंती सेवक रामचंद्रराव घोरपडे सेनापती चरणावर मस्तक ठेऊन शिर साष्टांग दंडवत विनंती विज्ञापणा तागायत चैत्र श्रु॥ ५ शनीवार शके १७७० पर्यंत स्वामीचे कृपाआवलोकने करोन शेवकाचे वृत्त यथास्थीत असे. विज्ञापना ऐसीजे स्वामी कृपाळु होऊन छ ९ शोवाल शके १७६९ चे आज्ञापत्र पाठविले ते मस्तकी वंदून सनाथ जाहालो. त्याजविशी विनंतीपत्र जावयाचे त्यास लग्नाची गडबड होती करीता आवधी जाहाली. नंतर इकडील वकीलानी मेहरबान सुपरीनटेंडेंट साहेब बहादूर इलाखा करवीर यांचे हुजूर यादी दिल्यापासून लिखानाचा कोल भुदरगड मामलेदार याजकडून फौजदारी नंबर ९८ चा शेरा आला त्याजवरून विनंती लिहिली आहे असीकी—

१. हे संस्थान प्राचीन पासून बावडा विशाळगडचे अधिकाराप्रमाणे सर्वकार्यास मुखत्यारीने वहीवाट जाहाली. दिवाणी फौजदारी आंमल पूर्वी फार दूर नव्हता. चालत्या वहिवाटी प्रमाणे सर्व काम इकडेच फडशा होऊन दंडाचा वगैरे पैसा इकडे जमा होत होता. आमलदार दूर वहीवाट जाहाली त्या प्रमाणे सर्वत्रास वागणे प्राप्त. परंतु सरकार पूर्वमर्यादा मोडीत नाहीत व कुंपणी सरकारातून ही आमलदर्जी लोकास दिवाणी फौजदारी अखत्यार देणे वहीवाट दिसता

त्याप्रमाणे सरकारनी वहिवाट देणेविशी सालगुदस्ता आज्ञापत्र सादर केले. परंतु जहागीर व जमेदार सर्वत्र सुद्धा एकाच पंधरा रुपये आखत्यार आणिता पैसा सरकार जमेस यावे म्हटल्याने ज्याचे त्याचे आधिकाराआन्वये ठराव होत नाही. त्याजकरिता स्वामी कृपाळू होऊन अधिकार देणे तो पूर्वीपासून चालत आल्या-अन्वये दंडाचा आखत्यार व कैद ठरवणे.

२. सनद देणे ती कारकुनाचे नाव म्हणोन त्यास प्राचीन अखत्यार असता सालगुदस्ता माहीती बद्दल मसुदे पाठविले. त्याचे जमाव करून चालते काम बंद करून आता नवीन वहिवाट कारकूनाचे नावे दिल्यात. पूर्व वहिवाटीस वाद येतो व नवी वहीवाटही नाही. मालकाचे नांव ठराव होऊन त्यानी कारकून नेमावे असे दाखले दिसतात. त्यास स्वामी कृपाळू होऊन त्याप्रमाणे सेवकाचे नावे सनद देवीली पाहिजे म्हणोन दरमुरा प्रमाणे वहीवाट होईल.

३. ठरावात गावगन्ना नमूद केले व हिशेब मामलेदाराकडे घ्यावा असा आहे. म्हणोन वकीलानी कळविले. त्यास पूर्वी पासून संस्थानचे नाव किती सरकारात जाहीरच आहे. त्यापैकी इकडून ज्यास इनाम दिले ते व भावबंदाचे खर्चाबद्दल गाव दिलेत. येणेप्रमाणे ताब्यात धरीले पाहिजेत. कारण ठराव वारंवार होणे नाही. सबब आता ठराव होतो. त्यास दाखल केल्या पाहिजे.

४. दिवाणी कामाबदल ठराव आज्ञापत्रात लिहीला नाही. त्यास तो ठराव होऊन आला पाहिजे. मेहेरबानाकडून अखत्यार असल्यावर आज्ञापत्र मागवावयाचे कारण काय म्हणोन अभिप्राय. त्यास सालगुदस्त पासून इकडील काम बंद करून मामलेदार ताब्यात दिले. सबब आज्ञापत्र मागवायचे.

५. मामलेदाराकडे हिशेब देणेत कंपेशेपणा आहे. करिता सालगुदस्त मसुदे प्रमाणे हुजूर हिशेब देऊ.

एकूण पाच कलमी मजकूर जाहीर होऊन जरुर आज्ञा जाहाली पाहिजे. शेवेशी श्रुत होय हे विज्ञापणा

ता. १४ माहे एप्रील सन १८४८ शके १७७०.



लेखांक : २२०

निवडी : १०९३ / ता. २५ जानेवारी १८४९

याद राजश्री चीटणीस व पारसनवीस याजकडे सुर सन तीसा आर्बेन मयातेन व आलफ सन १२५८ फसली पाठवण्याची ऐसाजे मेहेरबा पोलिटीकल सुपरिंटेंडेंट साहेब बहादुर प्रांत कोल्हापूर यांजकडून मु॥ आवक नंबर २२०० चा रोखा आल्यावरून आपल्यास लिहिण्यात येते की राजश्री नरसिंगराव शिंदे व ाजीराव शिंदे नेसरीकर यापैकी वडील कोण व हे सगे कसे प्रकाराचे आहेत, त्याची माहिती फार लैाकर समजली पाहिजे कळावे व॥ १५ दिजंबर सन १८४८ इ॥ छ १९ मोहरम १७७०

गोविंद अमृत जबाबनीस

दाजी कृष्ण पंडीत मुख्य कारभारी

उत्तरी विज्ञापना ता॥ २५ जानेवारी सन १८४९

मूळ नरसिंगराव शिंदे यासी पहीले पुत्र नारायणराव व दुसरे दुर्गोजीराव व तीसरे गोविंदराव चौथे सुबराव व पांचवे जीवनराव असे पांच पुत्र असोन त्यापैकी वडिल पुत्रास ठाणेत न राहता चीजबस्त सुद्धा जांबोटीस निघोन जाणेविसी सन समान तीसेन मया व आलफचे साली[1] हुजूरून पत्र सादर झाले. नंतर ते निघोन गेल्यावर बाकी तीघे बंधु थोरले असता माहाराज सरकारातून सरंजामाचा अधिकार न देता चौथे बंधु जीवनराव यास सन खमस आशर मैया तैनचे साली[2] नेसरीचे ठाणे सुद्धा देहून चालविले. पुढे जीवनराव यांचा काल लाटेच्या मुक्कामी जाहल्यानंतर सुबराव शिंदे थोरले बंधु होते. परंतु त्यासही सरंजामचा अधिकार न देऊन जीवनराव याचेच ओव्यात दुर्गाजीराव थोरले बंधु यांचे चिरंजीव नरसिंगराव यास आसरीन मैया तैनचे साली[3] देहून सरंजामाचा अधिकारही त्यांजकडेसच चालविला. तेव्हा भाऊपणाचे नातेने मात्र वडील सखे चुलत बंधू सुबराव यांचे चिरंजीव दाजीराव हे होतात. परंतु सरकारातून त्यास सरंजामाचा अधिकार न मिळाल्यामुळे वडील म्हणण्यास हरकत आहे. श्रुत होय.

बाजीराव बल्लाळ चीटणीस

महीपतराव गोपाळ परसनीवीस

(१) इ. स. १७९७–९८, (२) इ. स. १८१४–१५ (३) इ. स. १८१९–२०



लेखांक २२१

निवडी : ११९४ / ता. २६ जुलै १८४९

कैलासवासी श्रीमन्महाराज शिवछत्रपती साहेब यांचे कारकिर्दीत राजेश्री बाजीराव पंडित प्रधान याणी परशरामपंडीत पंप्रतिनिधी कराडकर यांचा प्रांत जप्त करणेचा बेत करून बापू गोखले यास फौज सुद्धा कराड प्रांती पाठविले. ते समई पंडीत प्रतिनिधी यानी लढाई केली. तेव्हा पंडीत प्रतिनिधी यांचे उजवे हातास वार लागून हात जाया होऊन लढाईचा मोड जाहला. नंतर म॥निले गोखले याणी पंडीत प्रतिनिधी कडील सर्व प्रांतात ठाणी घालून प्रांताची जप्ती केली. पुढे काही दिवसानी महाराज सरकारात सयाजी मोहिते कराड प्रांतातुन नोकरीत येऊन राहिले. त्यास नोकरीचे तैनात ऐवजी मौजे भोगाव व मौजे मरळी हे दोन गाव दिले होते. पुढे कैलासवासी श्रीमन्महाराज शंभुछत्रपती राजे यांचे खारकिर्दीत हरी निकम हुजुरे नोकर होता. त्याणी मेव्हणा नाना सिंदे नाईकवाडी बत्तीस सिराळकर यास महाराज सरकारात हुजुरचे नोकरीवर आणून ठेवून मौजे मरळी येथे पांच बिघे जमिनीची सनद करून घेतली. आणि शिंदे नाईक वाडी याने सनद घेवून गावास जाऊन जमीन पदरी घालणे विषयी मोहिते यास निकड केली. तेव्हा मोहिते मरळीहून करविरास येऊन महाराज सरकारात अर्ज केला जे आमचे तलबेचा फडशा करून निरोप द्यावा. अगर पाच बिघे जमिनीची मनाई देणे विषयी आज्ञा व्हावी. आम्ही काही जमीन शिंदे हुजुरे यासी देणार नाही. हा हुजुऱ्या तंटेखोर आहे. यांचे आमचे बनावयाचे नाही. ते समई कारभारी याणी मोहिते याची दाद घेतली नाही. हा खटला दोन तीन महिने चाललाच होता. पुन्हा सिंदे हुजरे याची माणसे जावून जमीन पदरी घालणे विषयी मोहिते यास निकड केली.

नंतर मोहिते मरळीहून महाराज सरकारात येवून पुन्हा महाराज सरकारात अर्ज केला जे सदरहू जमीनीची मनाचिठी देणेविषयी आज्ञा व्हावी. आगर आमचे तलबेचा फडशा करून निरोप द्यावा, आम्ही काही जमीन सिंदे हुजरे यास देणार नाही. ते समईही कारभारी यानी मोहिते यांची दाद घेतली नाही. तेव्हा मोहिते यानी श्री भाऊ महाराज व हैबतराव गाईकवाड विश्वासराव व यशवंतराव घाटगे सरजेराव व नारायणराव पाटणकर सरलष्कर व आबाजीपंत मामले-

दार पनाळकर व भुजंगराव यांचे घरास जावून सांगत होते की महाराज सरकारात अर्ज करून पाच बिघे सनदेची मनाचिठी द्यावी. अगर आमचे तलबेचा फडशा करून निरोप द्यावा हे चांगले आहे. हे तुम्ही न केलेस आम्ही आपले प्राणास उदार होऊन सरकार येवून धरण्यास बसणार. असे सर्वांस आठराव सांगत होते. परंतू कोणी ही दाद लावून समजूत केली नाही.

मोहिते याणी सरकारच्या वाड्यात धरणेस येणेचा निश्चय आषाढ व॥ २ रोज ईंदुवार शके १७४३ सन इसने आशरीन मयातेन व आलफचे रोजी आपले बिऱ्हाडी जेवण करून हत्यार व पिस्तुलचा बार करून आठवे तास सरकार-वाड्यत आले. मोहिते व त्याचे पुत्र तीन बाबाजीराव व आमृतराव व बाजी पुतण्या एक व भाऊ एक व भाचा माधवराव एक एकूण आसामी सात चौकात आली. ते समई महाराजांची स्वारी श्रीच्या चौसोपीचे उत्तरेस सोपीचे खाली बसली होती. जवळ कारभारी कोणी नव्हते. मोहिते सात असामी हात्यार घेऊन तयारीनिसी धरणे देणेस आले, हे महाराजानी व जवळ बसणारे लोक याणी पाहिले असता काहीच विचार केला नाही. महाराजांची स्वारी खोलीतून निघून खोलीचे दरवाजेजवळ येताच सयाजी मोहिते आडवे दारात उभे राहून अर्ज केला जे महाराजानी मनाचिठ्ठी देणेची आज्ञा करावी. आगर फडशा करून निरोप द्यावा. नंतर महाराजांची स्वारी खोलीचे दाराबाहेर यावी म्हणताच ते कावरे बावरे येऊन मनात कोणीच न आणता महाराजास राग मर्जी फार रूष्ट झाली. आणि जवळचे मंडळीस आज्ञा केली जे मोहिते यास धक्के देवून वाड्याबाहेर घालवावे. ते समई खोलीचे दारातच खटलेस प्रारंभ झाला. महाराजांची स्वारीही रोषाने खोलीचे दाराबाहेर आली. मोहिते यानी तेव्हा महाराजास सदरेवर बसवून पिस्तुल पोटास लावून बसले. तथापी काही मनात आणिले नाही. कोणी मातबर जवळ असते तरी तो प्रकार पाहून समजुत होती. तशा संधीस पुतणेचे हाती पिस्तुल असलेले घोड्यास धक्का लागून बार झाला. गोळी महाराजांचे पोटात राहिली. तेवेळी अस्तमानचा चार पाच घटका दिवस होता. महाराजांचे जखमेतून रक्ताचे पाट वाहू लागले. हे सयाजी मोहिते यानी पाहून आपले अंगावरील सेला काढून महाराजांचे पोटास गुंडाळुन महाराजास धरून बसले.

महाराजास जखमेचे मारणाने तृषा लागली असता पाणी पिवू दिले नाही. राणम अपाय म्हणोन जवळ आणून ठेविले. नंतर आबा भोसले आले. त्यानी

मोहिते याचे पायावर डोई ठेवून बोलिले जे महाराजास सोडून द्यावा. तुमच्या तलबेचा फडशा मी करून देतो. असे म्हणताच मोहिते यांचा भाचा माधवराव याणी बरचिचा वार मारून आबा भोसले यास ठार मारिले. तो इतक्यात भुजंगराव भोसले पागेतून वाड्यात आले. यानी मोहिते यास सांगितले जे, तुम्ही म्हातारे मनुष्य. वडील होऊन महाराजावर गर्दी करून बसविले हे चांगले की काय. आता तुम्ही महाराजास सोडून द्यावे. तुमचे तलबेचा पैका आम्ही देतो, म्हणताच मोहिते यांचे चिरंजीव धाकटे बाजी मोहिते याने भुजंगराव भोसले यांचे पोटात जंबया मारून जमीनीस पाडले. नंतर भोसले यांचे लोकाने ,भुजंगराव भोसल्यास वाडेतून उचलून जिलीबी पागेत घेवून चेनसिंग जमादार यांचे लोकांनी बंदुकीचा बार मोहिते यांचे लोकावर टाकिला. तो बार लागला नाही. नंतर मोहिते याचे लोकानी चेनसिंग जमादार यास वार करून ठार मारिला व बापु खासबारदार हा कैलासवासी श्रीमन्महाराज बाबासाहेब छत्रपती यांच्चे खोली बाहेर होता, त्यासही मोहिते यांनी ठार मारिला व कृष्णाजी साळुंके हुजूरे यांचे पाठीवर मोहिते यांनी तरवारीचा वार मारिला.

नंतर कैलासवासी श्रीमन्महाराज बाबासाहेब छत्रपती यांची स्वारी अग्नी होणेचे खोलीत होती त्या खोलीची खिडकी हुजरे यानी पितळेचे समईने पाडुन खिडकीतुन महाराजाची स्वारी बाहेर निघोन पायउतारा श्री भाऊ महाराजांचे बाड्यास जाऊन श्रीभाऊमहाराजास घेऊन महाराजांची स्वारी हुजुरपागेचे दरवाज्याचे बगलेवर आली. इतक्यात हैबतराव गाईकवाड विश्वासराव घरातून सरकारच्या वाड्यांत येवून श्रीआंबेच्या चौकात जोत्यानजीक उभे राहून सयाजी मोहिते यासी बोलिले जे तुम्ही वृद्ध आणि वडील असता महाराजावर गर्दी करून धरून बसला हे कर्म तुम्ही फार अनुचीत केले. सर्व महराठ लोकास काळुखी लाविली आणि मराठ्यांच्या अन्नात माती कालिवली. आता तरी महाराजास सोडुन द्यावे. तुमच्या तलबेचा फडशा आम्ही करून देतो, म्हणताच सयाजी बाजी मोहिते यानी उत्तर केले जे आमचे जिवाचे बरेवाईटाविषयी जामीन श्रीभाऊमहाराज व यशवंतराव घाटगे सर्जाराव व नारायणराव पाटणकर सरलष्कर या त्रिवर्गास द्यावे. म्हणजे आम्ही महाराजास सोडून देतो. असी बोलणे ठरले.

श्रीभाऊमहाराज व यशवंतराव घाटगे सर्जेराव व नारायणराव पाटणकर सरलष्कर हे त्रिवर्ग वाड्यात येऊन मोहिते यास दरम्यान होवून सयाजी बाजी

मोहिते व त्यांची मंडळीसह घेवून वाड्यातून अस्तमानी हुजूर पागेत आणिले व महाराज सरकारची स्वारी श्रीआंबेच्या चौकातून वाड्यात परदेशी यांचे पाहरे-नजीक खोलीत नेवून मिराबाई हाकीम यास आणुन महाराजांच्या जखमा शिवल्या. नंतर महाराजांचे कंबरेचा काच्या सोडला. ते समई तास दीड तास रात्र जाहली होती. काच्या सोडल्यावरी महाराजास एक दोन गचके येवून महाराजांचा कैलासवास जाहला. तेव्हा सर्वत्रास दुःख झाले. त्याचा पार नाही.

आज समय प्राप्त होगेस सुज्ञ मनुष्य जवळ नसले मुळे श्रीभाऊमहाराज व मा।। निले घाटगे व मा।। निले सरलष्कर यानी मनात विच्यार केला जे महा-राजानी कैलासवास केला तेव्हा मोहिते यांचा बच्याव आपले हातुन होत नाही. सबब मोहिते यांस गावातुन पार करून द्यावे. असा बेत करून मोहिते यासी बसण्यास घोडी श्रीनी व मा।। निले घाटगे व मा।। निले सरलष्कर यानी दिल्ही व श्रीनी आपले निसबत राजेश्री सदाशिव अनंत यास बराबर दिल्हे व मा।। निले घाटगे याजकडील पन्नास आरब जमादार सुद्धा मोहिते बराबर देवून प्रहर रात्री करवीरचे दरवाजे उघडून मौजे यलगुड हा गाव श्री बाबा महाराज याजकडे होता त्या गावापर्यंत पार करून द्यावा असे ठरवून पाठविलेवर मोहिते व लोक कोस दोन कोस गेले असे श्रीमन्महाराज मातुश्री आईसाहेब यास कळल्यावर मोहिते यास मंडळी सुद्धा ठार मारून शीर कापून आणावी असा हुकूम श्रीमन्म-हाराज मातुश्री आई सो यांचा जाहला.

ते समई खासबारदार व बंदुक बारदार व ईटी व हाशम पतकापैकी लोक पाच सातशेहे व पागेचे स्वार दोन आडीचशेहे व मानकरी राजेश्री जिवाजीराव खानवेलकर व आप्पाजीराव जाधव जप्तनमुलुख एकांडे स्वार दोन आडीचशेहे मौजे यलगुडास रातोरात रवाना झाले ते पहाटेची तास रात्र आहे तो मौजे यलगुडास पोहचून गावास वेढा घालुन गाव घेरला. गावातील वेशीचे चावडीत सयाजीराव बाजी मोहिते व सदाशीव अनंत निसबत श्री होते. व मोहिते याचे लेक व पुतणे व नातु व भाचा हे घोड्यावरच स्वार होते. आर्णूदोय होताच खासदार व बंदुक बारदार व इटीचे लोक व हाशेमाचे लोक गावात शिरून गावचे कुसवावर चढले आणि वेसीचे कुसवाचे जंगीयातून बंदुका सयाजी मोहिते याजवर सदाशीव अनंत याचा बच्याव करून सयाजी मोहिते गोळी घालून ठार मारिलेवर सदाशीव आनंत यास युक्तीने वेसीचे दिंडीतून गावात घेतलेवर महाराज सरकारचे स्वारीने व

मानकरी यानी जलदी करून मोहिते मंडळी सात आसामीस ठार मारून सात आसामींची शिर कापून दुसरे दिवशी मंगळवारी प्रहर दिवसास करवीरास आले व मौजे मरळी येथे मोहिते यांची कुटुंबाची मुले माणसे होती त्यासही सरकारातुन लोक जावून कैद करून करवीरास आणोन त्यापैकी काही मुले फाशी दिली, काही बायका मारिल्या, बाकी राहिली ती किल्ले पनाळेवर कैदखानेस ठेवणेस पाठविली होती.

सदरहु प्रकरणीत लोक वार्ता काय ? म्हणजे या कामात कोणी मोठा माणूस मोहिते यास आनुकूल होते अगर नव्हते ? त्यास जे समई मोहिते खोलीचे दारास जाऊन स्वामीचे आडवे उभे राहिले तेव्हा महाराजानी, तुमचे तलबेची बाकी काय राहिली आहे त्याचा हिशोब लवकर जावून करावा, अशी आज्ञा जाहली असती तर खटला होत नव्हता. महाराजास राग येवून मोहिते यास धक्का देवून वाड्याबाहेर घालवावे म्हणोन आज्ञा जाहल्यामुळे जवळचे मंडळीने सबोरी न करिता सयाजी मोहिते यास धक्काबुक्की करून पागोटे पाडलेमुळे मंडळीस राग येवून तमंचेचा बार मारल्यामुळे घात जाहला.

अगोदर मोहिते मंडळी सर्वश्री व घाटगे व पाटणकर सरलष्कर व गाईकवाड विश्वासराव व आबाजीपंत मामलेदार पनाळकर व भुजंगराव भोसले यांचे वाड्यास राजरोस उघड सांगत होते जे आम्ही धरण्यास सरकार वाड्यात बसणार यास आपण महाराजांचे कल्याण करणार याज करिता महाराज सरकारात आमचा अर्ज करून मना चिठ्ठी देववावी. अगर तलबेचे रुपये बाकी जे निघतील व देवून निरोप द्यावा. त्यावेळी श्री व सदरहु मंडळी यानी विचार करून महाराज सरकारात मोहिते यांचा मजकूर जाहीर करून समजुत केली नाही व सदरहु मंडळी यानी आपले मनात महाराजांचे कल्याणाकरिता जातीवर हजार पाचशेहे रुपयेचे नुकसान करून मोहिते यास तलबेबद्दल हजार दोन हजार रुपये महाराज सरकाराचा सरंजाम खाऊन दिल्हे नाहीत. ईश्वरानी महाराजास दुरधर प्रसंग आणल्यामुळे कोणास महाराजांचे कल्याणाची बुद्धी सुचली नाही व या कामात कोणी मोठे माणूस मोहिते यास आनकूल होते अगर नव्हते हे मोहिते मंडळी यास मारल्यामुळे उघड झाले नाही असेही लोकवार्ता होती.

सदरहु कैफीयत लिहून दिल्ही श्रावण शु॥ ७ शके १७७१ मु॥ तारीख २६ माहे जुलई सन १८४९ इसवी.



लेखांक : २२२

निवडी ११०३ । ता. १६ मे १८५०

यादी श्री हरीहर पंडित उर्फ ताल्या महाराज यांचे :घराण्याची एकंदर माहिती समजणे करिता लिहिली ती सुमा खमसेन मया तेन व आलफ शके १७७२ साधारणनाम सवंत्सरे

१. मुळ पुरुष आमचे आजे सिधेश्वरबोवा महाराज हे औरंगाबाद प्रांती ....गावी राहून विद्या आभ्यास आपण करून त्याप्रमाणे लोकाकडूनही करवीरात होते व ब्राह्मण आदीकरून सर्व लोकांस अन्नमुदक देत होते. नंतर श्रीक्षेत्र काशीस जाऊन आणखी विद्याआभ्यास करून तीर्थयात्रा करीतकरीत कराड प्रांती श्रीकृष्णातिरी क्षेत्र नरसिंहपुर येथे येऊन तपश्चर्या बहुत केली. जे बोलावे ते व्हावे, असाध्य रोगी दर्शनास आले त्याचे रोग व संमंधादीक उपद्रव वगैरे कोणतीही संकटे आशिरवादे करून परिहार झाली.

असे बहुत प्रकारे चमत्कार सिधी होत होत्या. साक्षात ईश्वरी स्वरूप, मोठे अवलिया ब्रह्म रूप होते. हा लौकीक तमाम मुलकात प्रसिद्ध झाला. हे ऐकून श्रीमन्महाराज छत्रपती व पेशवेपर्यंत प्रतिनिधी व शिंदे वगैरे लोक थोर थोर दर्शनास येऊन आज्ञेने वागून सत्कार करू लागले व श्रीमन्महाराज शिवाजी महाराज छत्रपती यानी क्षेत्र करवीरास श्री देवीचे दर्शनास यावे म्हणून विनंती करून मोठया समारंभाने क्षेत्रास आणोन आपल्या वाड्यात ठेवून घेतले आणि बहुत प्रकारे सेवा करून अनुग्रह घेतला. पुढे इनामगावे व जमीनी व हक्क व वतने व घर जागा वगैरे इनाम धर्मादाय करून दिले. नंतर छत्रपती महाराज यांचे दौलतीस सिलसिले लागून मोठी संकटे पडली. तेव्हा श्री बोवा महाराज याजपासी येऊन विनंती केली. त्याजवरून संकटे निवारण होतील अशी आज्ञा केल्या वरून संकटे निवारण झाली. पुढे तमाम मुलुखात इंग्रजी राज्य होणार आहे तुम्ही यासी स्नेह करावा, म्हणजे तुमचे चांगले होईल, असे पंचवीस तीस वर्षे आज्ञा झाली होती. त्याजवरून छत्रपती यांनी आज्ञेप्रमाणे स्नेह करितो, अशी विनंती केली. पुढे छत्रपती यानी पुत्र संतती व्हावी म्हणून विनंती केली. त्याज वरून दोन पुत्र होतील म्हणोन सांगितले, त्याप्रमाणे दोन पुत्र झाले. त्या वेळेस शिवाजी महाराज यासी मोठा आनंद होवून आमचे आजे श्री सिधयेश्वर बोवा

महाराज हे गुरूस्थान जाणोन त्यांची मोठी सत्कारपूर्वक पूजा करून चौघडा व मोरचले व आणखी इनाम गावे व जमीनी इनाम धर्मादाय करून दिल्हे. आणि नित्य प्राप्त काळी दर्शनास येवून नंतर भोजन करीत होते व बहुत सेवा करून आज्ञेत वागत होते.

पुढे आमचे आजे श्रीसिधेश्वरबोवा महाराज यांनी शके १७२३ साली वती नाम संवत्सरे वैशाख वा ।। ६ सोमवारी परधामवास करून समाधीस्त झाले. त्यांची समाधी क्षेत्र करवीर पंचगंगा तीरी बांधून पादुका स्थापन करून त्यांची पुजा अर्च्या व नैवेद्य, नंदादीप व सालाबाद रथोत्साह व छबिनाची पालखी वगैरे मोठा समारंभ छत्रपती महाराज आपण खुद्द येऊन करीत होते. हल्लीही त्याप्रमाणे चालले आहे. त्यासी पुत्र त्रिवर्ग बंधु आमचे तीर्थरूप श्री .... पंडित उर्फ भाऊमहाराज व आमचे चुलते श्री रामचंद्र पंडित उर्फ बाबामहाराज व श्री नारायण पंडित उर्फ नाना महाराज असे त्रिवर्ग मोठे विद्वान लौकिकवान होते.

पुढे शिवाजी महाराज यानी आपले पुत्र आबासाहेब महाराज छत्रपती यासी आमचे चुलते श्री बाबा महाराज याजकडून अनुग्रह देविला. त्यावेळेस ईनाम गावे दिल्ही आणि नित्य त्यांचे व आमचे तीर्थरूप यांचे दर्शनास पेशजी प्रमाणे आबासाहेब महाराज छत्रपती व बावासाहेब महाराज छत्रपती असे उभयताही येत होते. पुढे निपाणीकर यांनी महाराजांचे मुलुखात सिलसिला लावून दौलत बहुत खराब जाहली. तेव्हा आमचे आजे श्री. बोवा महाराज यांनी शिवाजी महाराज यासी 'इंग्रजी सरकारचा स्नेह करावा म्हणजे बंदोबस्त होईल' म्हणून आज्ञा केली होती. ते छत्रपती यानी मनात धरून आमचे तीर्थरूप श्री-भाऊ महाराज याजकडे येवून मजकूर सांगून विनंती केली की, मीच साहेबा-कडे जावे, परंतू आमचा वृद्धापकाळ, प्रकृतीही नीट नाही आणि सर्व भरंवसा आपल्यावर आहे. दौलतीचे संरक्षण झाले पाहिजे. याजकरिता माझे ठिकाणी आपण साहेबाकडे जाऊन दौलतीचा बंदोबस्त करावा. असे बोलून मालवण किल्ला इंग्रजी सरकारात दिल्हा, नंतर मेहेरबान एल्फिंस्तन साहेब बहादुर यासी थैली "माझे ठिकाणी श्री भाऊसाहेब महाराज आले आहेत", अशी दिल्ही. ते समई महाराज छत्रपती यासी संकट जाणोन आमचे तीर्थरूप साहेबाकडे गेले. साहेबानी सर्वांपेक्षा मानमरातब चांगला राखून बंदोबस्त करून देतो म्हणोन बोलोन ठेवून

घेतले व महाराज छत्रपती यांचा व इंग्रजी सरकारचा तहनामा आमचे तीर्थरूप यांचे विद्यमाने झाला.

पुढे साहेबानी पेशवे सरकारात बोलुन निपाणकराचा सिलसिला दूर करून काही मुलुकही वसुल सुद्धा निपाणकर यांजकडून माघारे देविला. पुढे चिकोडी मनोळी तालुके पेशवाई अखेर झाल्यावर आमचे तीर्थरूप यांचे विद्यमाने महाराज छत्रपती यासी दिल्हे ते वेळेस आम्हांस इंग्रजी सरकारातून ईनाम गावे करून दिल्ही. आबासाहेब महाराज छत्रपती यानीही आणखी ईनाम गावे व जमीनी व वतने व हक्क व घर जागा व वाडे वगैरे ईनाम करून दिल्हे. त्यांच्या सनदापत्रे पुत्र-पौत्रादी वंशपरंपरेने ईनाम धर्मादाय चालले म्हणोन करून दिले आहेत व आमचा मानमरातब आम्ही अगर आमचे घराण्यातील खासी मंडळी कोणी करवीरा गेली असता महाराज छत्रपती समारंभाने सामोरे येवून ठिकाणास पोचऊन जात असतात. व आमचा मरातब सर्व प्रकारे वडिलाप्रमाणे करितात व पत्रेही वडिलाप्रमाणेच लिहितात व आमचे ईनाम गावचे हरएक खटले इनसाफ आमचा आम्ही पाहतो व हल्लीही पाहात आहो व आम्हांस स्वास्थ महाराज सरकारातून व कंपनी सरकारातून आहे. त्याशिवाय पंतप्रतिनिधी व पंत अमात्य व सेनापती यानी ईनाम गावे व जमीनी व हक्क वगैरे ईनाम करून देवून सनदा करून दिल्या. त्यास छत्रपती महाराज यानीही दुमाल राजपत्रे करून दिली आहेत. व देशमुख व देसाई व देशपांडे वगैरे वतनदार यानीही ईनाम जमीनी व हक्क व घर जागा वगैरे ईनाम करून दिल्हे आहे व कराड प्रांती क्षेत्र नरसिंहपूर येथे शेवेकरी याणी वाडा बांधून देवून गावगन्ना ईनाम जमीनी मळे वगैरे करून दिले. श्री कृष्णेस घाट बांधून दिला व वाड्यात श्रीच्या पादुका आहेत तेथेही पूजाअर्चा नैवद्य नंदादीप वगैरे हल्ली चालले आहे. याप्रमाणे आम्हांस ईनाम गावे जमीनी व हक्क वगैरे ईनाम धर्मादाय पुत्रपौत्रादी वंशपरंपरेने स्वास्थ चालत आहे. त्याचा अनुभव आम्ही करीत आहो. त्याची यादी तारीख वार सनदा पत्रे पेशजी धारवाड मुकामी सर कलेक्टर पोलीटिकल एजंट बेबरसाहेब बहादुर यांनी मेहरबान गव्हरनर ईलफिंस्टन साहेब बहादुर यांचे हुकमावरून पाहून सनदावर सही करून, सनदा बरहुकूम करून आपले सही सुद्धा थैली बरोबर इकडे पाठविली व त्याप्रमाणे रजिस्तर यादीचा दाखला कंपनी सरकारात मुंबईत व बेळगावात ठेवून छत्रपती महाराज सरकारात ही दिला आहे. यादीबरहुकूम इंग्रजी

सरकारची बहादारी पुस्तदरपुस्त ईनाम धर्मदाय चालवावे असे श्रीमन्महाराज बाबासाहेब महाराज छत्रपती व कंपनी सरकारचा तहनामा अलीकडे झाला त्यात आहे व सरकारातून इकडील नावे अव्वल दरजात दाखल आहे.

मेहेरबान एलिफिंस्तन साहेब बहाद्दर गव्हरनर यांनी आमचे तीर्थरूप यासी पुण्यास आगत्याने बोलावून नेऊन घेतले आणि तेथे बंगल्याचा बाग वगैरे बक्षीस ईनाम धर्मादाय करून देऊन सनदा करून दिल्या आहेत. व मानमरातब सालाबाद अखेरची रोजी पोषाख शालजोडी वगैरे साडेतीन सणगे देऊन हरएक प्रकारे चांगला राखीत होते. त्याप्रमाणे आजतागायत हल्ली सरकारातून चालले आहे. याप्रमाणे आमचे आजे श्री सिद्धेश्वर बावामहाराज याजपासून बडती व लौकिक महशूर होऊन आजतागायत सरकारातून मानमरातब व मुखत्यारी वगैरे सर्व यथास्थीत चालले आहे. पुढेही वंशपरंपरेने चालवणे सरकाराकडे आहे. मिती वैशाख शु।। ५ रोज गुरुवार मोर्तब खुद्द

सही मोडी
श्री तात्या महाराज



लेखांक : २२३

निवडी : ११०४ / ता. २० मे १८५०

यादी किल्ले रांगणा व निरसिंगगड व भरतगड येथील तनखेचे ठरावाविषयी इंग्रज सरकारातून थैल्या हुजूर आल्या. त्या असल थैल्या व थैल्याच्या नकला राजश्री मुख्य कारभारी यास दाखविणेस काढल्या. सु।। खमसेन मयातेन व आलफ छ ७ माहे रजब उर्फ वैशाख मास शके १७७२.

१. थैली अजम उलीयम च्यापलीन साहेब बहादुर कमीशनर यांची आली पा। छ २० माहे रबिलावल सु ।। ईसने असरीन मयातेन व आलफ मु ।। करवीर मार्गशीर्ष व ।। ८[१]

१. श्रीमन्महाराज मातुश्री आईसाहेब यास हनराबल माऊंट इस्टवरट ईलफींस्टन प्रजिदेत गव्हर्नर बहादुर जंजिरे मुंबई यांची आली. करवीर

१. ता. १६ डिसेंबर १८२१

संस्थान व वाडी यामध्ये लढा पडून लढाईचा मुकदमा चालला होता. तो फैसल करून घ्यावा यास्तव फार दिवस सरकार ईंग्रजाकडून तजवीज चालली आहे. परंतु त्या लढ्याविषयी कोणतेही संस्थानाकडून वाजवी हिशेब मिळाले नाहीत. म्हणोन हाली कितेक साली भोगवटा चालला आहे. तो वाजवीचे सहीने इन कौन्सील होवून खचीत केला आहे. किले नरसिंव्हगड व प्रसिद्धगड व भरतगड हे करवीरकर यांचे असे ठरवून दिल्हे ते तहाचे ९ कलमाचे करारावरून वाजवी प्रमाणे आहे. म्हणोन छ. १३ माहे रमजान सु॥ ईसने आसरीन मयातेन व आलफ जेष्ट श्रु॥ १५ मु॥ करवीर.

१. हुजूर अजम उलीमय च्यापलीन साहेब बहादुर कमीशनर यांची थैली छ ४ सव्वाल तारीख पत्र वाडीकडून जितका ऐवज महाराजाकडे वसुल पडला त्याचे सरासरी प्रमाणे गांव तोडून द्यावे म्हणोन ठराव होता, त्याप्रमाणे उलगडा करून वकिलास ताकीद करून फैसल होई जैसे करविले पाहिजे असे कलमी करणेत आले होते. आलीकडे पक्के चौकशी करून ठरविले की रुपये ७८३४२ वाडीहून महाराजाकडे येण्याचे आहे म्हणोन.

१. हुजूर थैली अजम ताकरीन साहेब बहादुर सर कलेक्टर व पोलिटिक्याल एजंट सुभा धारवाड वगैरे यांची आली. दरिविला महाराज याणी वाडीवालेस कित्येक गाव वगैरे होणेचा ठराव झाले. त्याप्रमाणे जिम्मा करवणे .... रवाना झाले त्या .... सुपूर्द झाले नाही. सदरहू काम वगैरेचे उलगडा होई जे पावेतो महाराजांचे ईलाखेतील मुरगोड तालुकेचे हसुर १, हिरखाणे १, चिलकाणे १, हाटाकाणे १, कुटकाणे १, काटेमनी १, असे ६ गाव जप्त करणेबद्दल श्रीनिवासराव मामलेदार त॥ परसगड यास रवाना केले आहे म्हणोन ता.॥ ३ माहे जुलई फसली—पो॥ छ १ जिल्हेज सु॥ आर्बा मयातेन व आलफ मु॥ करवीर.

१. हुजूर थैली अनराबल माऊंट इस्टवारीट इलफिन्स्टन साहेब बहादुर याची दिगर भरतगडचे वर्तमान ईजत असार कृष्णराव गोपाळ यास लिहील्या वरून जाहीर झाले त्यास खत पावता क्षणी गोवा बंदर येथे कपतान ईस्कलर साहेब बहादुर याजला व दुर्गाबाईस भरतगड फिरोन देण्याकरिता बहुत अगत्य वादे लिहिले की, अस्मतपन्हा दुर्गाबाई साहेब सावंत याजला ताकीद करून निकडीने किले मजकुर खाली करून देण्याविषयी पत्रे रवाना झाली आहेत. यकीण

असे की....चांगल्या प्रकारे यासी बोलोन,किला लौकरच देवीतील. आमहाराजानी खातरजमा असल घ्यावी. श्री भाऊमहाराज व दिनकरराव अप्पा वकील वगैरे हमेशा ईज्यानीबाकडे येऊन महाराजांचे कामाविषयी....फार करारी आहे. ईज्यानिबासी बदला दिला पासूनच आलताफ गुप्तराचे कामामध्ये गुंतवणेस कसूर करीत नाही. ईनशाआलाह्नताला महाराजाकडून कामे लवकर नमुदात येतील तारीख छ २३ फेब्रुवारी सन १८१२

तालीक

१. श्रीमन्महाराज मातुश्री आईसाहेब यास थैली हनराबल माऊंट ईष्टुवरट ईलफिंस्टन प्रजोदत गवरनर बहादूर जंजिरे मुंबई यांची आली त्याची तालीक

१. श्रीमन्महाराज मातुश्री श्री आईसाहेब यांचे नावे हर जबाबाची थैली हनराबल मौंट ईष्टुवरर्ट ईलर्फिस्टन प्रजोदत गव्हरनर बाहदर जंजिरे मुंबई यास लिहिली. सन सलास आसरीन मयातेन व आलफ रवाना छ २ माहे त्याची तालीक

१. हुजूर थैली हनराबल माऊंट ईष्टवरीट इलफिन्टन साहेब बहादुर यांची थैली .... छ २३ फेब्रुवारी सन १८१२ ईसवीची आली त्याची तालीक.



लेखांक : २२४

निवडी : ४० / आक्टोबर १८५०

यादी निळकंठराव जाधव जत्पनमुलुक याजकडून जावयाची सुा इहिदे खमसेन मयातेन व अलफ सन १२६० फसली येसाजे हुजूरवून नंबर ८४ ता. २ माहे आगत्बंर सन १८५० ई।। ची यादी आले ते आपल्याकडून वंशावळ आली. त्यात मुळ पुरुषापासोन आज परयंत किती पुरुष जाहले आणी जे जे पुरुष जाहले त्या पौ। कोण कोणी किती किती दिवस परयंत काम केले त्याचे सन शके व ते मयत जाहले त्याचे सन शके सुधा समजावे लागते म्हणोन वगैरे हे लेहून आलेवरून तपास करीता हासल जाहला तो मजकूर खाली लिहिले प्र।।

१ मुळ पुरुष रखोजी बिन नरसोजी जाधव याणी कैलासवासी श्रीमन्माहाराज शंभू छत्रपतिसाहेब सरकार करवीर यांची सेवा यकनिष्टपणे करीत असता

माहाराज कृपाळू होऊन स्वास्त करून दिले ते. ७।। क।। करवीर येथे जमीन बिघे तीस पैकी भाऊ हिशेस जाऊन बाकी खूद आम्हाकडे ०१।।।=।। दर ४ प्र।। राजारामसाहेब शिवाजी दोन्ही महाराज चंदी प्रांती आसता बहूत सेवा केली सबब राज शक ४७ साली इनाम घेऊन सनदा दिल्या आहेत. १०० जकायत क।। 'करवीर येथे दर बैली यक पैसा प्र।। राज शके ४७, ७४३।। मौजे कांडगाव त।। ठाणे राजशक ५७ नक्त व गला कूरण सुधा दरोबस्त गाव इनाम.

५ मौजे बालींग त।। हवेली येथील कूरणापैकी भाऊवाटणी वजा जाऊन बाकी गवत आदमास ५००० दर १००० प्र।। स।। आजमास वर्ष १३०.

८५६

येणेप्रमाणे संपादन करून बहूतेक दिवस सरकारचे कामकाजाचे उपयोगी पडून सेवाचाकरी केली तें कधी मृत्यू पावले त्याचे शक सन लागत नसलेमुळे साल नमूद करीता येत नाही. पण त्यानी आदमास २४।२५ वर्ष कालकिर्द भोगली आसे ऐकनेत आहे. त्यास पुत्र पाच होते. त्याचा तपशील खाली दूसरे कलमी लिहिला आसे कलम.

२ पहिले आपाजीराव, दूसरे संभाजीराव, तिसरे सुबानजीराव, चवथे कृष्णाजीराव, पाचवे नरसोजीराव जाधव· येणेप्रमाणे पाच पुत्र होते. त्याणीही सरकारची सेवा चाकरी करवून विश्वासुपणात वागोन होते. ते कधी मृत्यू पावले त्याचे राज शक लागत नसोन सदर पै।। आपाजीराव याणी पंधरा वर्ष कालकिर्द भोगली ऐसी माहिती मिळती. कलम.

३ दुसरे कलमी वडील आपाजीराव लिहिले. त्यास पुत्र वडील नरसोजीराव, दुसरे सुलतानजीराव, तिसरे नरोजीराव, चवथे जानराव असे चौघे पुत्र असता, दूसरे सुलतानराव याणी सरकारची सेवा चाकरी करून........वागत असता जंजिरा सिंधू दूर्ग येथे यशवंतराव शिंदे सुभेदार याजबरोबर हुजरून नेमीले. तेव्हा सुभेदार याजवरी कोठला प्रसंग गूदरला त्या वक्ती सुलतानराव याणी मोठी मर्दमी करून सुभेदार यास काही तोसिस लागू न देता किला सांभाळून सरकारचे मनोगतानरूप चाकरी केलेली सर्व पराक्रम सुभेदार याणी महाराजास विदित केलेवरून सरकारास मोठा संतोष होऊन स्वास्त करून

देऊन किल्ले मजकूरचा मामला सांगीतला आणी स्वास्त करून दिले त्याचा तपशील.

२७२।= मौजे मोरेवाडी ता। खानापूर नक व गला तूप सुधा. दरोबस्त: गाव शंभू छत्रपति माहाराज याणी राज शके १०४ चे साली इनाम करून देऊन सनदा दिल्या आहेत.

१० मौजे बालींग्य बिघे ०१० जिजासाहेब माहाराज याणी सन सब्र तिसेन मयातेन व अलफ साली इनाम करून दिल्हे. आदमास ८५ वर्ष होतील. त्या पौ भाऊ वाटणी जाऊन हाली आम्हाकडे खुद ०२।। दर ४ रु।। प्रमाणे प्रतीचा चालत आहे कलम

२८२।=

येणे प्र।। संपादन केले आणि मामलेचे काम करीत असता श्रीबाळ-कृष्णाची मूर्ती यक पीतीलेचा किले म।। त्यास सापडली. ती त्यानी आणोन सरकारास देताच तेच समय मूर्ती परत देऊन श्रीचा उछव व गोकूळ आस्टमीचा प्रती वर्षी तूम्ही करीत जावे, त्याचे खर्चाबाबत सरकारातून प्रतीवर्षी साहाशे ६०० रु।। देवीले जातील अशी आज्ञा होऊन पहिले वर्षी रोख रु।। देबीले. पूढे मामले निहाय कोणते तरी मामलेकडे खर्ची घाढ्न देणेची वहिवाट आसता अलीकडे कैलासवासी बाबासाहेब माहाराज याणी किले मनोहरचे बेहडेस खर्च घाढ्न देऊन सालास किले मजकूराकडूनच रु।। देवीत होते. ते मृत्यू पावले पासून दिवाणसाहेब माहाराज याणी आपले कालकीर्दीस बंद केले. पण पूर्वीपासून चालत आले अन्वये आज पावेतो श्रीचा उत्सव सतत चालत आहे. सूलतानजीराव हे कधी मृत्यू पावले त्याचे सन शके लागत नाही. पण त्याणी आदमासे वीस वर्ष कालकीर्द भोगली असावी. तसेच त्याचे तिघे बंधूही एकत्र असोन सरकारची सेवाचाकरी करून मृत्यू पावले. त्याचे शक सन लागत नाहीत. त्यानी आपले नाव काही संपादन केलेचा दाखला नाही. सबब कालकीर्द समजत नाही. कलम

४ तिसरे कलमी सुलतानजीराव लिहिले त्यास वडील पूत्र रायाजीराव व दुसरे हिंदूराव आसे दोघे होते. पैकी वडील रायाजीराव याणी आपले वडील आसताच लहानपणीच सरकारची स्वारी पनाले मुक्कामी किलेवरी असता तेथे बहूतेक प्रकारे शेवा करून श्रीमन्माहाराज छत्रपती शिवाजीराजे यांची मर्जी संपादन करून लोभात वागो लागले. तेव्हा सरकारचा विश्वास त्याजवरी बसून खासगी कोतवाल पागेचा कारखाना पाहाणेस आज्ञा जाहली. नंतर स्वारी करवीरी आलेवरी आणखी जाजती घोडी त्याचे ताबेत देऊन हजार बारासे राऊत नेमून त्याची सरदारी सांगोन जेथे बलकूबल पडल तेथे येखादे वेळे स्वता:, येखादे स्वारीस रत्नाकर आपा राजाज्ञे याजबरोबर पाठवू लागले. त्या काळी मोठे मोठे प्रसंगी कर्नाटक प्रांती व फत्तेसिंग माने बडे होळकर कडील वडगावावरी मारून पाचचारसे आदमास घोडा पाडाव करून आणिले इत्यादी. बहुतेके स्वाऱ्या मोठ्या शूरत्वाने करीत असता पूर्वी सरनोबतीचा किताब देऊन पुढे कर्नाटकाहून परत आलेवरी, मरदूमी करून सरकार चाकरीवरी मोठे पराक्रम करून कामकाजाचे उपयोगी पडले हे सर्व सरकारास श्रुत होताच सरकार कृपाळू होऊन स्वामी कामास पडले बाबत सन सब तिसेन मयातेन[1] आलफ साली जप्तनमुल्क असा किताब दिला त्यास अदमासे ५४ वर्षे जाहली. नंतर सिधोजीराव देसाई निपाणीकर यांचा व महाराजांचा द्वेष पडून सावगाववर लढाई वक्ती अखेर मोड होऊन स्वारी परतले वेळी फौजेत मोठा दंगा होऊन, युद्धाचा बिघाड होऊन फौज पळून जाता महाराजांची स्वारी घोडेवरून येताना बरोबर जप्तनमुल्क होते. त्या प्रसंगी मार्गी वोढेचे अडचणीत सरकारचा घोडा फसून पडला. तेव्हा जप्तनमूलुख यानी महाराजास आपले घोड्यावर घेऊन येत असता बरोबरचे हुजरेपैकी यकास धका लागून पडला. त्याचे हातात नंगी तरवार होती. ती महाराज व जप्तनमुलुक ज्या घोड्यावर बसले होते त्याचे पायास लागून घोड्याच्या पायाच्या दोन शिरा तुटल्यावर घोडा लटका पडला. सबब तो घोडा ठेवून दूसरा घोडा सुलतानजी मान्या बारगिर हुजूरपागेतील राऊत होता त्याचा घोडा घेऊन पुन्हा स्वार होऊन महाराजास पाठीसी घेवून येका घोड्यावरून मोठ्या जुरतीने आपले बरोबरीने मंडळीस सांभाळून यळगूड

१. इ. स. १७९७

मुक्कामास येवून तेथे पालखी वगैरे सरंजाम आपले स्वार पाठवून आणवून महाराजास काही इजा होऊ न देता स्वपराक्रमाने बच्याव करून करवीरास आले. आसे कितेक कामकाजे केली. त्यास सरकारानी कृपाळू होऊन स्वास्त ईनाम सरंजाम करुन दिले ते—

३४५।। मौजे सांगवड येथे वतन नाईकीचे सन तिसेन मयातेन व अलफ साली करून दिला त्यास आदमासे ५५ वर्षे होतील.

१५० सदर गावी जमीन बिघे ३० सन सब तिसेन साली दिली त्यास वर्ष ५५

६० मौजे कळंब ता। ठाणे येथे इनाम जमीन बिघे ६१० दिली त्यास अदमासे ६५ वर्षे

१०० मौजे बालींग ता। हवेली येथे जमीन स।। ७५ व कुरण २५ यरा। आकाराचे, वर्षे ६०

१०० मौजे उचगाव येथे जमीन बिघे ८२० दिली त्यास वर्षे अदमास ५२

६० मौजे मुडसिंगी येथे बिघे ०११ त्यास वर्षे अदमास ६३

४५ क।। वडगाव येथे जमीन बिघे नवू सूमार वर्ष ४७

३५ मौजे चिचवाड येथे जमीन बिघे ८५ सुमार वर्षे ६०

३५ मौजे शहापूर येथे जमीन बिघे ८५ वर्षे ४५

४० हातकणंगल व तीळवणीचे सीवेची जमीन बिघे ०१० वर्षे ५५

१५ क।। करवीर येथे जमीन वा जोटे बाबत डाग बिघे ८५ वर्षे ४५

२४ मौजे सोळांकूर ता।। तारळे येथे जमीन बिघे ८४ किलेदारी बाबत वर्षे ६५

५० मौजे उदगाव येथे कुरण दिलेस गवताची बेरीज आकार अदमास वर्षे ६५

४९२ पेठ सिवापूर उर्फ शनिवार क।। करवीर हे पेठ ईनाम आदमास वर्षे ६०

३५० वाडी उजळाई दरोबस्त इनाम प्राचीन दिवसाची त्याचे शक सन लागत नाही

१८८ वाडी टेंबलाई सदर प्र।।

२००१।।

येणेप्रमाणे संपादन करून त्यानी आदमासे ३९ च्याळीस वर्ष आपले कारकिर्दीत सेवा करून सन तिसा आशर साली मृत्यु पावले. त्यांचे बंधू हिंदुराव मृत्यु पावले त्याचे सन शक लागत नाही.

५ चवथे कलमातील रायाजीराव जाधव जप्तनमुल्क (त्याना) पूत्र वडील गोपाळराव, दूसरे आप्पाजीराव, तिसरे दौलतराव असे तिघे होते. पैकी वडील गोपाळराव यास जप्तनमुल्क असताच सरनोबतीचा किताब सरकारातून देऊन जप्तनमुल्क याणी पागेचे काम स्वाधिन केले. त्यांनी सरकार हु।। प्र।। पागेचे काम करीत असता जप्तनमुल्क होते तो सन सब आशर साली मृत्यु पावले.

१ दुसरे आप्पाजीराव आमचे ती।। त्यास कैलासवासी बावासाहेब महाराज याचे कारकिर्दीस जप्तनमुल्कीची वस्त्रे दिली त्यानीही सरकारची मर्जीनुरुप माहाराजांचे आज्ञेप्र।। सेवा चाकरी केले कारणाने स्वामी कृपाळू होऊन सरकारातून इनाम सरंजाम करून दिलेचा तपसिल—

० क।। कब्रूर इलाख चिकोडी हा दिलेला पाच साल आपलेकडे होता नंतर चिकोडी ता।। इंग्रज सरकारात स १२३७ साली गेला त्या कारणाने जप्त जाहला सबब

५० क।। आळते येथे जमीन बिघे ८६ सु।। इसने आसरीन मयातेन आलफ साली दिला त्यास वर्ष आदमासे ३०

३० मौजे बावड व।। हवेली जमीन बिघे ८१० सन लिसा समान मयातेन व आलफ साली निकाल त्यास वर्षे अदमासे ६२

५३५।।= मौजे परटवंदळे ता।। कल्हे हा गाव दरोबस्त इनाम सन समान आसरीन नपा १ आलफे साली त्यास वर्षे २४ झाली

८६४।।= मौजे सोळांकूर ता।। तारळे हा गाव नक्ती गला तुप सुधा दरोबस्त इनाम सन सलास सलासिन साली वर्षे २३

८०९ मौजे गुडाळ ता तारळे गाव सदर साली सदरहु प्र।। दरोबस्त इनाम

२२८९।

येणे प्र।। संपादन करून आमचे तीर्थरुप याणी सरकारची सेवा आदमास २३ वर्षे केली ते सन आरबेन मयातेन व अलफ साली मृत्यु पावले. नंतर दुसरे

साली आमास हुजूरन जप्तनमुल्लक किताब दिला. वडिलांचे आलीकडे आम्ही अदमासे ११ वर्षे सरकारची शेवा चाकरी करीत आलो. आम्हास येक पुत्र सुलतानराव आहेत.

२ सदर पाचवे कलमी आवल आमचे वडील चुलते गोपाळराव म्हणोन लिहिले त्याचे पुत्र सयाजीराव त्यास सरकारानी सरनोबतीचा किताब देऊन पागेचे काम व सिरोळ मामलेची वहिवाट सांगोन मौजे आर्जनवाडचे गावी जमीन बिघे ४० इनाम करून दिली सन आरब सलासीन साली शिरोळचे बेहडेस खर्ची घालून दिले प्रा। चालत आसोन आलीकडे सनद नसले करीता अमानत आहेत. सन खमस सलासीन साली मयत जाहले त्याचे पुत्र आपाजीराव यासी सरकारातून सरनोबतीचा किताब दिला ते हाली सरकारची सेवा करीतच आहेत.

३ तिसरे दौलतराव आमचे चुलते सरकार चाकरी करीत होते ते खमास आशरीन साली मृत्यु पावले त्यास पुत्र हाली गोपाळराव हे सरकारसनिध सेवा करीतच आहेत.

येणेप्रमाणे सदरी पाच कलमी लिहिले अन्वये स्वास्त संपादन जाहले बाबत कैफियत दिले प्रा। बितपसिल

२२०९।· जप्तन मुलकी बाबत आमचे नाव चालत आहे वा। कैफियत
१७०० नक्त रुपये ४७६॥ गले बा। ३२॥।· तूप

३२१९॥।= सरनोबती बदल रायाजीराव जाधव सरनोबत याचे नाव कैफियतीत
दाखल जाहले प्रा।
२८६२ ॥।· नक्त रुपये १७६ गले बाबत ११०= तुप १७०
कूरण बाबत

———————
५४२९०=

पाच हाजार च्यारसेहे यकूनतिस रुपये दोन आणे हे उत्पन्न मिळाले पासून सतत आम्हाकडे चालत आहे.

लेखांक : २२५

निवडी १५६८० / इ स. १८५०

नंबर ६

कृष्णराव पंडीत प्रतीनिधी

१ परशराम त्रिंबक यानी सन १६९७ ईसवी साली संपादन केल्यापासून सन १७०२ पर्यंत वर्ष ६ वहिवाट करून मयत जाहाले.

० पुढे सन १७०३।४ दोन वर्षे काम मन्माहाराज शाहू माहाराज सातारकर यांचे हुजुरून पाहाण्यात आले आहे.

२ कृष्णाजी परशराम यानी सन १७०५ ईसवी पासून सन १७३८ पर्यंत ३४ वर्षे वहिवाट.

३ सदर नंबरचे पुत्र दोन—

१ गंगाधर कृष्णराव यानी सन १७३९ ईसवी पासून सन १७४८ पर्यंत वर्षे १० वहिवाट करून मयत जाहाले.

२ अमृतराव कृष्ण यानी १७४९ ईसवी पासून सन १७६० पर्यंत वर्षे १२ वहिवाट करून मयत.

४. कृष्णाजी अमृतराव यानी सन १७६१ ईसवीपासून सन १७६७ पर्यंत वहिवाट करून मयत झाले.

५. आबाजी कृष्णाजी यानी सन १७६८ ईसवी पासून सन १७९२ पर्यंत वर्ष २५ वहिवाट करून मयत झाले.

६. सदर नंबरचे पुत्र २

१. आनंदराव आबाजी यानी सन १७९३ ईसवी पासून सन १८०५ पर्यंत वर्ष १३ वहिवाट.

२. भगवंतराव आबाजी यानी सन १८०६ पासून सन १८१८ पर्यंत १२ वर्ष वहिवाट.

७. भगवंतराव आबाजी यासी पुत्र २

१. माधवराव यानी सन १८१९ ईसवी पासून सन १८३१ पर्यंत वर्ष १३ वहिवाट करून मयत झाले.

२. अमृतराव यानी सन १८३२ पासून सन १८४२ पर्यंत वर्षे ११ वहिवाट करून मयत झाले.

८. कृष्णराव अमृतराव यानी वर्षे १८ वहिवाट.

एकूण वहिवाट १४४ वर्षे.

नंबर ७

पंत आमात्य संस्थान बावडा

१. निळो सोनदेव यानी अवल संपादन सन १६६० ईसवी सालात केले. त्याची वहिवाट सुरू सन १६७३ ईसवी पर्यंत वर्षे १४ चवदा करून मयत झाले.

२. रामचंद्र निळकंठ यानी सन १६७४ ईसवी सालापासून सन १७२० पर्यंत वर्षे ४७ सत्तेच्याळीस करून मयत झाले.

३. भगवंतराव रामचंद्र यानी सन १७२१ ई॥ पासून सन १७५० पर्यंत ३० वर्षेपर्यंत वहिवाट करून मयत झाले.

४. कृष्णराव भगवंत यांनी सन १७५१ ई॥ सन १७६२ ईसवी पर्यंत वर्षे १२ काम करून मयत झाले.

५. सुबराव कृष्ण यानी सन १७६३ ईसवी पासून सन १८१० ई॥ पावेतो काम करून मयत झाले. वहिवाट वर्षे ४८ आबाजी शिवराम नंदगावकर याचे चिरंजीव.

६. त्यांचे चिरंजीव आसामी दोन

१. रामचंद्र सुबराव यानी सन १८११ ई॥ पासून सन १८१२ ई॥ पावेतो काम करून मयत जाहाले. वर्षे २.

लक्ष्मणराव व्यंकटेश यांचे चिरंजीव

२. मोरेश्वर सुबराव यानी सन १८१३ ई॥ पासून १८२५ ई॥ पर्यंत वर्षे १३ तेरा पर्यंत काम करून मयत जाहाले वर्षे २५.

भास्करराव मोरेश्वर यांचे चिरंजीव

७. गोविंद मोरेश्वर यानी सन १८२६ ई॥ पासून सन १८३४ पर्यंत वर्षे ९ काम करून मयत मार्च ११, १८३५ ई. गोविंद हे भिमराव भास्कर यांचे चिरंजीव

८. रघुनाथराव यानी सन १८३५ ई॥ पासून सन १८४५ पर्यंत वर्षे ११ काम करून मयत

रघुनाथ हे माधवराव लक्ष्मण यांचे चिरंजीव

९. रामराव यानी सन १८४७ ई॥ पासून सन १८४९ ई॥ पावेतो वर्षे तीन वहिवाट करून मयत जाहले.

रामराव हे शंकरराव रामचंद्र यांचे चिरंजीव

१०. मोरेश्वरराव सन १८४९ पासून १८६२ ईसवीपर्यंत काम करून मयत झाले.

नंबर ८

रामचंद्रराव घोरपडे सेनापती

१. संताजीराव बीन म्हाळोजीराव घोरपडे सेनापती यानी सन १६८७ ई॥ पासून सन १७१४ ई॥ (?) पावेतों वर्षे २७ काम करून मयत झाले.

२. पिराजीराव बीन संताजीराव घोरपडे यानी १७१५ ई॥ पासून सन १७२८ ई॥ पावेतो वर्षे १४ काम करून मयत झाले.

३. राणोजीराव बीन पिराजीराव यानी सन १७२९ ई॥ पासून सन १७८१ ई॥ पावेतो वर्षे त्रेपन्न काम करून मयत जाहाले.

४. संताजीराव राणोजीराव घोरपडे यानी सन १७८२ ई॥ पासून सन १७९५ ई॥ पावेतो वर्षे १४ काम करून मयत झाले.

५. रामचंद्रराव बीन संताजीराव घोरपडे यानी सन १७९९ ई॥ पासून सन १८०८ ई॥ पावेतो वर्षे १३ तेरा काम करून साव गावचे लढाईत मयत झाले.

पुढे निपाणीकर यांचे जोरावर बीरादार नारायणराव यानी सन १८०९ ईसवी पासून सन १८१८ ईसवी पावेतो दहा वर्षे वहिवाट केली. ती पुढे हुजूरून रद्द होवून ईकडील अधिकार पुरातन चालत आल्याप्रमाणे आम्हाकडे वहिवाट चालू जाहाली ती खाली लिहिल्या प्रमाणे –

६. संताजीराव घोरपडे यानी सन १८१९ ई॥ पासून सन १८३५ ई॥ पावेतो वर्षे १७ वहिवाट करून मयत जाहले.

७. रामचंद्रराव घोरपडे सेनापती हे सन १८३५ ई॥ पासून सन १८५० पर्यंत वर्षे १५ काम करीत आहेत. एकूण वहिवाट वर्षे १६३

नंबर ९

गणपतराव पंडीत सुमंत

काम किती दिवस केले व मयत कधी जाहाले ते लागत नाही —

१. नारायणराव पंडीत मुळ पुरुष

२. रघुनाथराव पंडीत वडील पुत्र

३. जनार्दनपंत द्वितीय पुत्र

४. तिमाजी रघुनाथ यासी सन १७०१ ई॥ साली सुमंतपणाचा अधिकार मिळाला. पण काम किती दिवस केले हे कळत नाही.

५. गंगाधरराव तिमाजी पंडीत

६. नरसिंगराव गंगाधर हे सन १८०२ ईसवी सालात मयत झाले. पण काम किती दिवस केले हे कळत नाही.

वहिवाट वर्ष समजत नाहीत.

अलीकडील—

७. श्रीनिवास नरसिंव्ह यानी सन १८०३ ईसवी पासून सन १८४२ पावेतो वर्षे ४० काम करून मयत झाले.

८. गणपतराव श्रीनिवास पंडीत सुमंत हे हल्ली सन १८४३ ई॥ पासून सन १८५० ईसवी पावेतो वर्षे ८ काम करीत आहेत. एकूण वहिवाट वर्षे ४८.

नंबर १०

गोपाळाच्यार्य पंडीतराव

१. हरिहराचार्य बीन श्रीरामाचार्य यासी मोघर्डे ताो तारळे हा गाव राजशके ५८ सालात शंभु छत्रपतीनी दिला असे. पंडीतराव यांनी सन १७३४ ई॥ पासून सन १७४२ ई॥ पावेतो वर्षे ९ नऊ काम केले.

२. रामचंद्रच्यार्य यांनी सन १७४३ ई॥ पासून सन १७९३ ईसवी पावेतो ५० वर्षे काम केले.

३. श्रीकराच्यार्य यानी सन १७९४ ईसवी सालापासून सन १८०८ ई॥ पावेतो वर्षे १५ पंधरा काम केले.

४. माधवाचार्य यानी सन १८०९ ई॥ पासून सन १८१४ ईसवी पावेतो ५ पांच वर्षे काम केले.

५. गोपाळाचार्य पंडीतराव हे सन १८१५ ई॥ पासून सन १८५० ई॥ पावेतो काम करीत आहेत.

नंबर ११

रमाबाई घाटगे सर्ज्याराव

१. अवल संपादक चहोजीराव याजपासून साहावे पुरुष जयाशिंगराव पर्यंत कोणी किती दिवस काम केले त्याजबद्दल कागदपत्र नसल्यामुळे समजत नाही व संपादन कोणते साली काय जाहाले हेही समजत नाही.

७. विश्वासराव बापु य्रांनी हल्लीच....संपादन सन १७९० ईसवीपासून सन १८२४ ईसवी पावेतो वर्षे ३५ काम करून मयत झाले.

८. सदरहु मयताच्या स्त्रीया ३ पौ। बाळाबाई लगेच पंधरा दिवसांनी मयत झाली. बाकी २

१. रमाबाई साहेब सन १८२५ ईसवीपासून सन १८३१ ईसवी पावेतो साले ७ काम करून मयत झाले.

२. हाल्ली रमाबाई साहेब ही सन १८३२ ईसवी पासून सन १८५० ईसवी साले १९ पावेतो काम करीत आहेत. एकूण वहिवाट २६ वर्षे

नंबर १२

रताजीराव चव्हाण हिंमतबाहादर

१. वालोजीराव चव्हाण यास नक्तीने खर्चास पावत असलेने काम किती दिवस केले याचा ठिकाण लागत नाही.

२. राणोजीराव चव्हाण यास नक्ती खर्चास पावत असलेने किती दिवस काम केले हे कळत नाही. पण सन १६७५ ई सवी साली कोकणांत गोवळ-कोटवरी लढाईचे प्रसंगात कैलासवासी जाहाले.

३. विठोजीराव यांनी सन १६७६ ईसवी पासून सन १६९७ ईसवी पावेतो वर्षे २२ काम करून वेंगरूळ तालुक्यात लढाई जाहाली त्यात मयत जाहाले.

४. उदाजीराव चव्हाण यानी सन १६९८ ईसवी पासून सन १७६४ ईसवी पावेतो वर्षे ६७ काम करून आकलकोटकर यांसी लढाई जाहाली त्यात मयत जाहाले.

५. प्रीतीराव चव्हाण यानी सन १७६५ इसवी पासून सन १८१० ईसवी पर्यंत वर्षे ४६ काम करून कोगनोळीवर लढाई जाहाली त्यात जखमा लागोन त्या दुखण्याने पुढे मयत जाहाले.

६. उदाजीराव चव्हाण यानी सन १८११ ईसवी पासून सन १८२५ ईसवी पावेतो वर्षे १५ काम करून सन १८४२ ईसवी साली मयत जाहाले.

७. रताजीराव चव्हाण हिंमत बहाद्दर यांनी सन १८२६ ईसवी पासून २५ वर्षे काम करीत आहेत. एकूण वहिवाट १७५ वर्षे.

नंबर १३

हणमंतराव निंबाळकर सरलष्कर बहादुर

१. सुलतानराव निंबाळकर यानी सन १७९९ ईसवी पासून सन १८०६ ईसवी पर्यंत वर्षे ८ वहिवाट करून मयत जाहाले.

२. स्त्री ब्राळाबाई यानी सन १८०७ ईसवी पासून सन १८१९ ईसवी पर्यंत वर्षे १३ वहिवाट करून मयत जाहाले.

३. हणमंतराव निंबाळकर सरलष्कर बहादुर हे सन १८२० ईसवी पासून १८५० ईसवी पर्यंत वहिवाट करीत आहेत. एकूण वहिवाट वर्षे ५२

नंबर १४

नारायणराव घोरपडे आमीरुलउमराव

१. कागद पत्र दग्ध झालेमुळे दाखला लागत नाही. मुळ पुरुष, माहालोजीराव, २ संबाजीबाबा, ३ माहालोजी बाबा, ४ माळोजी बाबा, ५ सिवाजी बाबा, ६ मालोजीराव, ७ यशवंतराव. एकूण सात पुरुषांपैकी कोणी कीती दिवस वहिवाट केली यांचा दाखला लागत नाही.

८. मालोजीराव यानी सन १८१९ ईसवी पासून सन १८४४ ईसवी पावेतो वर्षे २६ काम करून मयत जाहाले.

९. नारायणराव साहेब घोरपडे हे सन १८४५ ईसवी पासून सन १८५० ईसवी पर्यंत वर्षे ६ वहिवाट करीत आहेत.

नंबर १५

दत्ताजीराव गायकवाड विश्वासराव

१. यशवंतराव गायकवाड यानी सन १७२१ ईसवी पासून सन १७५३ ईसवी पर्यंत वर्ष ३३ वहिवाट अजमासे केली.

२. संताजीराव यानी १७५४ ईसवी पासून सन १७७६ ईसबी पावेतो वर्ष २३ काम करून मयत जाहाले.

३. गुजाजीराव यानी सन १७७७ ईसवी पासून सन १७९८ ईसवी पावेतो वर्ष २२ काम करून मयत जाहाले.

४. हैबतराव यानी सन १७९९ ईसबी पासून सन १८३६ ईसवी पर्यंत वर्षे ३८ काम केले.

५. दत्ताजीराव गायकवाड विश्वासराव हे सन १८३७ ईसवी पासून सन १८५० ईसवीपर्यंत वहिवाट वर्ष १४ करीत आहेत.

एकूण वहिवाट वर्षे १३०

नंबर १६

नीलकंठराव जाधव जप्तनमुलुख

१. रघोजीराव यानी सन १७२० पासून सन १७४३ ईसबी पावेतो आजमासे वर्षे २४ वहिवाट केली.

२. आप्पाजीराव यानी सन १७४४ ईसवी पासून सन १७५८ ईसवी पावेतो आजमासे १५ साले वहिवाट केली.

३. सुलतानराव यानी सन १७५९ ईसवी पासून सन १७८१ ईसबी पावेतो आजमासे २३ साले वहिवाट केली.

४. सयाजीराव यानी सन १७८२ ईसवी पासून सन १८१८ ईसवी पर्यंत वर्षे ३७ वहिवाट करून मयत जाहाले.

५. आप्पाजीराव यानी सन १८१९ ईसवी पासून सन १८३९ ईसवी पावेतो वर्ष २१ वहिवाट केली.

६. नीलकंठराव जाधव जप्तनमुलुख यानी सन १८४० ईसवी पासून सन १८५० ईसवी पावेतो ११ वर्षे वहिवाट करीत आहेत.

एकूण वहिवाट वर्षे १३१.

नंबर १७

यशवंतराव माने भीमबहादूर

१. रघुनाथराव माने भीमबहादूर यानी सन १७८७ ईसवी पासून सन १८०८ ईसवी पावेतो वर्षे २२ काम करून सावगावचे तळावर निपाणकर यांचे लढाईत तोफेच्या गोळ्याने मयत जाहाले.

२. सखारामराव भीमबहादर यांनी सन १८०९ ईसवी पासून सन १८३९ ईसवी पावेतो वर्षे ३१ वहिवाट करून मयत जाहाले.

३. यशवंतराव माने भीमबहादर हे सन १८४० ईसवी पासून सन १८५० पावेतो वर्षे ११ वहिवाट करीत आहेत.

एकूण वहिवाट वर्षे ६४.

नंबर १८

शहाजीराव भोसले खानवटकर

१. मालोजीराव यांचे वडील बंधु शिवाजीराजे हे जिजाबाई साहेब माहाराज यास दत्तक दिलेवरून त्यांनी स्वास्थ दिले. त्यांची वहिवाट मालोजीराव यानी सन १७६८ ईसवी पासून सन १७९९ ईसवी पावेतो वर्षे ३२ वहिवाट केली.

२. शाहाजीराव भोसले हे सन १८०० ईसवी पासुन सन १८५० ईसवी पावेतो वर्षे ५१ वहिवाट करीत आहेत एकूण वहिवाट वर्षे ८३.

नंबर १९

भास्करराव पंडित

१ ते ३ कोणी किती दिवस वहिवाट केली ते समजत नाही. ते बीतपशील.

१. निलो सोनदेव

२. रामचंद्र निलकंठ

३. मोरेश्वर यांचे कारकीर्दीत बावडेकर याजसी सन १७२३ ईसवी साली विभक्तपणा जाहाला. वहिवाट त्याआगोदर किती दिवस केली ते समजत नाही व मयत कधी जाहाले ते ही समजत नाही.

४. व्यंकटराव मोरेश्वर यानी सन १७३७ ईसवी पासून सन १७८४ ईसवी पावेतो वर्षे ४८ काम करून मयत झाले.

५. लक्ष्मण व्यंकटेश यानी सन १७८५ ईसबी पासून सन १८२६ ईसबी पावेतो वर्षे ४२ वहिवाट करून मयत जाहाले.

६. माहादेव लक्ष्मण यानी सन १८२७ ईसवी पासून सन १८४४ ईसवी पावेतो वर्षे १८ वहिवाट करून मयत:जाहाले.

७. भास्करराव माधव हे सन १८४५ ईसवी पासून सन १८५० ईसवी पावेतो वर्ष ६ वहिवाट करीत आहेत.

नंबर २०

रामचंद्रराव पाटणकर

१. नागोजीराव पाटणकर यानी सन १८०९ ईसवी पासून १८२१ ईसवी पावेतो वर्ष १३ वहिवाट करून मयत जाहाले.

२. स्त्री चिमाबाई यानी सन १८२२ ईसवी पासून सन १८३३ ईसवी पावेतो वर्ष १२ वहिवाट करून मयत जाहाले.

३. चिरंजीव २

१. व्यंकटराव पाटणकर यानी सन १८३४ ईसवी पासून सन १८४० ई॥ पावेतो ७ वर्षे वहिवांट करून मयत जाहाले.

२. रामंचद्रराव पाटणकर हे सन १८४१ ई॥ पासून सन १८५० ई॥ पर्यंत वर्ष १० वहिवाट करीत आहेत. एकूण वहिवाट वर्ष ४२.

नंबर २१

जिज्याजीराव खानवीलकर

१. रत्नाजीराव यांचे नक्त पगार वगैरे देवून चालवीत होते. पण काय देत होते समजत नाही. सुमारे २५ वर्षे काम करून मयत जाहाले.

२. बाजीराव खानवीलकर यानी सन १७८५ ईसवी पासून सन १८२५ ईसवी पावेतो वर्ष ४० वहिवाट करून मयत जाहाले.

३. जिजाजीराव खानवीलकर हे सन १८२६ ईसवी पासून सन १८५० ईसवी पावेतो वर्ष २५ काम करीत आहेत.

एकूण वहिवाट वर्ष ९०.

नंबर २२

जोत्याजीराव नाईक निंबाळकर

१. आप्पाजीराव नाईक निंबाळकर व स्त्री भवानीबाई यासी नेजगाव सन १८१२ ईसवी साली मिळाला.

२ जोत्याजीराव नाईक निंबाळकर हे सन १८१२ ईसवी साली गाव मिळाला त्या सालापासून सन १८५० ईसवी पावेतो वर्षे ३९ वहिवाट करीत आहेत.

एकूण वहिवाट वर्षे ३९.



लेखांक : २२६

निवडी : १०३६३ / इ. स. १८५१

श्री

यादी किले पनाळेहून राजश्री नानाभाई रेठर यानी यादी हुजुरास पाठविली त्या यादीचे मजकुराची उत्तरे सुमा ईहिदे खमसेन मयातेन व आलफ शके १७७३ विरोधी कृत नाम संवत्सरे.

१. किले विशालगड तालुकेत कैलासवासी आबाजीराव पंडीत

१. मौजे कोथळी तर्फ चंदनगड तालुके पाच्छापुर येथे श्री देव माउली. या देवाजवळ दिव्य होणेची चाल वीस वर्षांचे मागे होती ते खालीलप्रमाणे :

१. प्रथम दिवशी रवा काढणाराने उपोषण करावे. दुसरे दिवशी देवापुढे तळी आहे त्यात स्नान करून देवापासी येवून हात पसरून उभे राहावे. नंतर

टीप : या लेखांक २२५ मधील १७ घराण्यांची माहिती काळ ठरविण्याच्या दृष्टीने उपयुक्त आहे. पण काही ठिकाणी गफलत झाली असावी असे दिसते. उदाहरणार्थ, परशराम त्रिंबक प्रतिनिधी यांचा मृत्यू १७०२ साली झाल्याचे म्हटले आहे. पण ते १७१८ साली मयत झाले. संताजी घोरपडे यांच्या मृत्यूबाबतही या टिपणात निराळी माहिती आहे. संताजी १७१४ पर्यंत जिवंत होते, असे या लेखात म्हटले आहे. पण ते चूक वाटते. ते १६९७-९८ साली मरण पावले.

हातावर विडेचे पान, त्याजवर लोण्याचा गोळा ठेवून लोखंडाचा गोळा तापवून सांडसाने उचलून लोण्यावर ठेवावा. खरा असल्यास डाग पडत नाही. जर तो मनुष्य खोटा असल्यास हातावर मसुरे येवढा काळा डाग पडतो. असा दिव्य करणेचा मजकूर आहे.

१. क॥ जुगोल प्रांत हुकेरी येथे दिव्य करणेची चाल. प्रथम दिवशी गावांत सर्वत्रानी उपोषण करून दुसरे दिवशी श्री मासाप्ती देवी आहे, तिजकडे कृष्णेचे स्नान करून हात जोडून जावे. खरा असल्यास देवी पर्यंत जातो. खोटा असल्यास येक दोन पायरी चढताना उलथुन पडतो, ज्या साली असे दिव्य कोणी करील त्या साली त्या गावचे रानात पीक कमतर होते.

२. किल्ले वगैरे ठिकाणी जिवंत मनुष्य पुरण्याची चाल कशी आहे त्याचा तपशील खालील लिहिलेप्रमाणे :

१. किल्ले पनालेचे दरवाजाचे दक्षिण भागी वाटे नजीक बुरुज आहे त्या बुरुजाखाली बाळंतीण बायको घातली आहे म्हणोन लोक बोलतात आणि तेथून अैलीकडे नवरानवरी बुरुजाजवळून गेली असता नारळ फोडून टाकतात व किल्ले तोरगूल येथे बाळंत बुरुज म्हणून आहे तेथे बाळंतीण घातली आसे लोक बोलतात. हल्ली त्या बुरुजानजीक वाद्य न वाजविता घस्त जात असती.

१. करवीर येथील चने चोरटीचा बुरुज म्हणजे पंचगंगेचे वेशीचे पश्चिमेस आहे. तेथे त्या बुरुजाखाली कोरवीण जिवंत घालुन बुरुज प्राचीन बांधिला होता असे बोलतात. त्या बुरुजानजीक हाल्ली वाद्य न वाजविता घस्त जात असती.

१. किल्ले विशालगड तनखेतील मौजे माण ता। मलकापूर येथील पाटील याची वतनासंबंधी पंचाईत कैलासवासी आबाजीराव पंडीत प्रतिनिधी यांचे कारकिर्दीत होवून दिव्य जाहाले ते समई पंचरसी गोळा आग्नीत तप्त करून पाटील याचे हातास लोणी लावून त्याजवर पिंपळाचे पानास कोरे सुताचे लपेट सात गुंडाळुन ते पान त्याचे हातावर ठेवून त्याजवर गोळा सांडसाने उचलून ठेविला. तो गोळा दोन्ही हातावर घेवून सात पावले पाटील पंचात चालीला. हे सर्व पचांनी पाहून सदर गोळा खोट्याचे हातावर देत असता त्याने घेतला नाही. सबब पंचाईतानी तो गोळा भुमीवर टाकविला तो गोळा जमीनीत येक हात गेला. परंतु पाटील यांचे हातास व पिंपळाचे पानास व सुताचे दोऱ्यास धक्का लागला

नाही म्हणोन अैकिणेस आहे. कलम.

१. किल्ले मजकुरी हजरत पीरमलीक राहान याची गुमज आहे. तेथे दिव्य करण्याची चाल अशी आहे. जे वादी प्रतिवादी यानी स्नान करून पीरा समोर जाउन पायावर डोई ठेवून हातात व पायात लोखंडाची बेडी व खोडा घालून पिरास प्रदक्षिणा घालून पिरासमोर येवून उडी उचलून देताच बेडी व खोडा खऱ्याचा आपले आपण तुटून पडतो तो खोट्याचा न तुटता तसाच राहतो याप्रमाणे होत आहे.

० याप्रमाणे कलमे दोन यांची माहिती अैकित्र लिहीली आहे परंतू राजश्रीवी येविषयीची पक्की माहिती विशालगड कारभारी याजकडे लिहून गेले म्हणजे खुलासा होवून येईल.

० किल्ले पनाळा येथे हजरत पीर सादुधीन खताळ यांची गुमज आहे तेथे दिव्य करणेची चाल वादी प्रतिवादी यांच्या नावच्या चिठ्या वतनदार यानी पिराचे दर्ग्यात जावून लिहून पिराच्या गलिफाखाली घालाव्या आणि त्या चिठ्यापैकी येक चिठ्ठी पांच सात वर्षांचे मुलाचे हातून आणवावी. ज्याचे नावची चिठ्ठी निघेल तो खरा अशी चाल आहे.

१. करवीरी हजरत बाबू जमाल यासी गुंबज आहे. तेथे दिव्य करणेची चाल. वादी प्रतिवादी यांच्या नांवच्या चिठ्या वतनदार यानी पिराचे दर्ग्यात जावून लिहून पिराचे गलीफाखाली घालाव्या आणि त्या चिठ्यांपैकी एक चिठी पाच सात वर्षीचे मुलाचे हातुन आणवावी. ज्याचे नांवची चिठ्ठी निघेल तो खरा अशी चाल आहे.



लेखांक : २२७

निबडी : १४४१८ ते १४४२१ / इ. स. १८५१–५२

श्री

यादि श्री स्वामी जगद्गुरु व सीष्ट ब्राह्मण व अष्टप्रधान वगैरे सरदार मानकरी लोकांस किताब केव्हा आले त्याजबद्दल सालवारची सुमा॥ इसने खमसेन मैया तेन व आलफ.

१. श्री स्वामी जगद्गुरु अवतार श्री शंकराचार्य युधिष्ठीर शके २७२३ सर्वधारीकाम संमछरी जाहाला.

२. श्री रावजी महाराज यांचे पणजे श्री शिध्देश्वर महाराज याजकडून कैलासवासी श्रीमन्महाराज शिवछत्रपती याणी गुरोपदेश सन १७७७ इसवी म्हणजे शालिवाहन शके १६९९ नाम संवतसरी घेतला. त्यावेळेपासून महाराज असे म्हणो लागले.

३. श्री तात्या माहाराज यांची हकीकत नंबर २ प्रमाणे

४. सदाशिवराव राजोपाध्ये यांचे निपणजे सदाशिव भट बीन लक्ष्मण भट यासी राजोपाध्ये॥ सन १७१५ इसवी म्हणजे शालिवाहन शके १६३७ व राज्याभिषेक शके ४२ मन्मथ नाम संवतछरी मिळाला.

५. बाबाजी जोसीराव याचे पूर्वज बाल जोसीराव यांसी जोसीराव हा किताब शालिवाहन शके १६१७ युवानाम संवसरे राज्याभिषेक शके २२ सालात मिळाला व इसवी सन १६९५

६. कृष्णराव पंडित प्रतिनिधी यांचे पूर्वज परशराम त्र्यंबक यासी प्रतिनिधी पदाधिकार सन १६९७ इसवी म्हणजे शालिवाहन शके १६१९ ईश्वरनाम संवच्छरी मिळाला. राजशक २४ सालात.

७. मोरेश्वरराव पंडित अमात्य यांचे पूर्वज रामचंद्र निलकंठ यांसी अमात्य पदाचा अधिकार सालिवान शके १५९६ आनंदनाम संवसरे सन १६७४ इसवी सालात म्हणजे राजशक १ सालात

८. रामचंद्रराव घोरपडे यांचे पूर्वज संताजी बीन बालोजी घोरपडे यांसी पदाधिकार शके १६१० शालिवान शके राजशक १५ विभवनाम संवसरी दिला व सन १६८८ इ॥ या सालात.

९. गोपाल पंडितराव यांचे पूर्वज श्रीकराचार्य बिन नरसिंह यांसी पदाधिकार शालिवान शके १६१० व राजशक १५ विजयनाम संवतसरे व सन १६८८ इ॥ या सालांत दिल्हे.

१०. गणपतराव पंडित सुमंत यांचे पूर्वज जनार्दन हणमंत यासी पदाधीकार शालीवान शके १५९६ आनंदनाम संवसरी म्हणजे राजशके १ व इसवी १६७४ या सालांत दिल्हे

११. नारायणराव घाटगे सर्जाराज यांचे पूर्वज यासी शाहाजी माहाराज यांचे वेलेपासून सर्जाराव हा किताब चालत आहे

१२. जयसिंगराव घाटगे सर्ज्याराव वजारतमाब ऊर्फ हिंदुराव घाटगे यांचे पूर्वजास कैलासवासी श्री शाहाजी माहाराज यांचे कारकिर्दिपासून सर्जाराव हा किताब चालत असून पुढे मशारनिले जयसिंगराव घाटगे यासी कैलासवासी श्रीमन्महाराज शिवछत्रपती यानी वजारतमाआब किताब सन तीसा मयातेन व आलफ म्हणजे शालीवान शके १७३० व राजशक १३५....नाम संवसरे व इसवी सन १८०८ या सालात दिल्हा असे.

१३. केशवराव नारायण घोरपडे इचलकरंजीकर यांचे पूर्वज नारो माहादेव यासी पीराजी घोरपडे सेनापती यांचे कारभार करणेविसी कैलासवासी श्रीमन्महाराज शिवछत्रपती याणी राजशक ३० सुभानी नाम संवतछरे म्हणोन शालिवान शके १६२५ या सालात आज्ञापत्र दिल्हे असे इसवी सन १७०३ सालात.

१४. रत्ताजीराव चवाण हिंमतबहादर यांचे पूर्वज विठोजीराव चऱ्हाण यांसी हिंमत बहादर हा किताब शालिवान शके १६०९ प्रभाव नाम संवत्सरे, म्हणजे राजशक १४ इसवी सन १६८७ सालात.

१५. ज्योत्याजीराव चवाण ममलकतमदार यांचे वडील नारायणराव चवाण यांसी ममलकतमदार हा किताब मयातैन व आलफचे साली म्हणजे शालिवान शके १७२१ संवत्सरे राजशक १२६ साली मिळाला.

१६. जीवनराव चवाण उमदेतुलउमराव यांचे वडील उदाजीराव चवाण यांसी उमदेतुलउमराव हा किताब होता तो ते मैत जाल्यावर त्याचे चिरंजीवास तोच किताब श्रीमन्महाराज मातुश्री दिवाण साहेब यांचे कारकिर्दीत म्हणजे शालिवान शके १७६५ साली दिल्हा.

१७. लक्ष्मणराव शिंदे सेना खासकील यांचे पूर्वज सुभानराव शिंदे यासी सेना खासकीलीचा पदाधीकार राजाभिषेक शके ५९ म्हणजे शालिवान शके १६६४ म्हणजे सन १७३२ इसवी सालात दिल्हा म्हणोन दप्तरी दाखला लागत आहे. परंतु सेना खासकील यांजकडोन कैफीयत आल्यास शके १६३० साली दिलेला आहे. त्याजवरून २४ वर्षांचा अंतर दिसतो.

१८. दौलतराव घोरपडे हिंदुराव यांचे पूर्वज बहीरोजीराव बीन

म्हाळोजीराव घोरपडे यांसी हिंदुराव हा किताब शालिवान शके १६१० म्हणजे राजशक १५ विजईनाम संवतसरे इसवी सन १६८८ या सालात दिल्हा,

१९. नारायणराव व व्यंकटराव घोरपडे आमीरूल उमराव यांचे पूर्वज मालोजी बीन म्हाळोजी घोरपडे यासी किताब मीळाला ता।। नंबर १८ चे सदरात साल नमुद आहे.

२०. हणमंतराव निंबाळकर बहादुर सरलष्कर यांचे पूर्वज सुलतानराव निंबाळकर यासी कैलासवासी श्री मन्महाराज शंभु छत्रपती याणी आपले कारकिर्दीत सरलष्करीचा किताब सन १७२१ इ।। सालात दिल्हा तो त्यांचे राहणे पुढे मोगलाई इलाख्यात झाल्यामुळे कैलासवासी श्री मन्महाराज शिवछत्रपती याणी नारायणराव पाटणकर यासी सरलष्करीचा हुद्दा दिला. पुढे सन १७९९ इसवी सालात मशारनिले निंबाळकर यांचे वडील सुलतानराव यांसी आणोन कैलासवासी श्री मन्महाराज शिवछत्रपती याणी आपली कन्या मातुश्री बाळाबाई अका यासी शके १७०१ साली फालगून मासी देऊन लग्न करून दिले. नंतर पुढे सन आशरीन मयातैन व आलफ साली कैलासवासी श्री मन्महाराज बोवासाहेब छत्रपती याणी हणमंतराव निंबाळकर बहादुर सरलष्कर यांसी १७४८ शालिवान शकात किताब सरलष्करचा दिल्हा.

२१. हिंदुराव गायकवाड सरखवास यांचे आजे गुजाजी बीन संताजी गायकवाड यासी सरखवासीचा किताब श्री मन्महाराज शिवछत्रपती याणी शके १७०० विलंबी नाम संवसरे म्हणजे सन १७७८ इसवी सालात दिल्हा.

२२. दत्ताजीराव गायकवाड विश्वासराव यांचे आजे गुजाजी बीन संताजी गायकवाड यासी शालिवान शके १७१८ सालात म्हणजे सन १७९६ इसवी सालात दिल्हा.

२३. नीलकंठराव जप्तनमुलुख यांचे आजे रायाजी जाधव यासी जप्तन मुलुख हा किताब शालिवान शके १७१८ सालात दिल्हा.

२४. यशवंतराव माने भिमबहादर यांचे पूर्वज यास कैलासवासी श्री. मन्महाराज शंभु छत्रपती यांचे कारकिर्दीत भिमबहादर हा किताब मिळाला.

२५. बहिरवराव रामचंद्र राजआज्ञा यांचे पणजे रत्नाकरराम यासी कैलासवासी श्री मन्महाराज शिवछत्रपती याही आपले कारकिर्दीत शालिवान शके

१७१८ नवनाम संवतसरे सन १७९५ सालात राजआज्ञा पदाधीकाराची वस्त्रे दिल्ही ती जमखिंडी मुक्कामी जाली. राजशक १२३

२६. नारायणराव पाटणकर सरलष्कर यासी किताब सन १७९५ इसवी सालात दिल्हा.

२७. शामजी शेषाद्री नाईक यांसी शालीवान शके १६१४ आंगिराराम संवतसरी दिमत राजाराम छत्रपती याणी चंदिचे मुक्कामी दिल्हा आहे. पुढे त्यांचे पोटी पुत्र जाहले त्याचा तपशील.

२. रामचंद्र शामजी यासी शालिवाहन शके १६२५ पनाले मुक्कामी शिवाजी महाराज दिल्हे.

३. शामजी रामचंद्र यासी संभाजी माहाराज याणी पनाल मु॥ १६४८ शालीवान शकात दिल्हे.

४. मोरो शामजी यासी शिवछत्रपतीनी दिल्हे.

५. शेषो मोरेश्वर नाईक यांसी शिवछत्रपतीनीच दिल्हे.



लेखांक : २२८

निवडी : ११२३ / ता. २६ जानेवारी १८५३

श्री

यादी सुमा सलास खमसेन मयातेन व आलफ छ १५ माहे रविलाखर उर्फ पौष मास तारीख २६ माहे ज्यानेवारी सन १८५३ इसवी शके १७७४ नाम संवत्सेर

१. कैलासवासी श्रीमन्महाराज मातोश्री जिजाईसाहेब यांचे कारकीर्दीत माधवराव बल्लाळ पंडीत प्रधान याणी तहनामा करून दिल्हा सुरु सन सलास सबान मया व आलफ छ २५ माहे शबाल शके १६९४ पौष मास[1] त्या सालीच पेशजी महाराज सरकारातून सेवक लोकानी हरमतलबानी गाव इनाम करून घेतली. त्याप्रमाणे शेवक लोकाकडील गाव परत पंडित प्रधान याणी घेऊन महाराज सरकारात दिल्ही. त्याचा तपशील तहनामेत नांवनिशीवार आहे.

---

१. १९-१-१७७३.

१. सदरहू तहनाम्यात सेवक लोकाकडे महाराज सरकारची गावे राहिली आहेत त्याचाही तपशील नावनिशीवार आहे.

१. शके १६९७ राज्याभिषेक शके १०२ मन्मथ नाम संवत्सरेचे साली यशवंतराव शिंदे सेनासाहेब सुभा सरखुभेदार यानी महाराज सरकारातून शेवक लोकानी ईनामगाव पेशजी घेतली होती त्या प्रमाणे गाव महाराज सरकारात परत घेतले—

१. मौजे हरले प्रांत पनाळा भगवंत आप्पाजी बेडक्याळकर याजकडील ५०००

५.	शेषो नारायण भिरडीकर याजकडील	पांच
	१. मौजे आकुळ प्रांत हुकेरी	४०००
	१. मौजे बालेकुड प्रांत मा।	२५००
	१. मौजे रुई प्रांत कागल	४५००
	१. मौजे पडलीहाल प्रांत हुकेरी	५००
	१. मौजे प्रांत कागल	५००
६	५	१२०००

१. सन ईहिदे समानीन मया व आलफ् छ २६ माहे मोहरम शके १७०२ शार्वरी नाम संवत्सर पौष मासी[1] महाराज सरकारांत माधवराव नारायण पंडित प्रधान याणी तहनामा करून दिल्हा त्या तहनाम्यात कलमे

१. आजपावेतो भगवंत आप्पाजी व शेषो नारायण व आप्पाजी शामजी यानी गैरवाखा हुजूर विनंती करून व हुजरचा गैरवाखा समजावून देऊन राज्याची खराबी केली. आणी तुलबाविसी विपरयास घातला. याजमुळे राज्याची खराबी झाली. त्याचा दिलावा त्यानी भरून द्यावा लागेल कलम

१. पंडित प्रधान यानी मशारनिल्हे विषयी तहनाम्यात लिहिलेले कलम येकविषयी स्वामीनी त्याचे हातून शेवा घ्यावी शेवेअंती जी आज्ञा कर्णे ती करावी येणे प्रमाणे करार कलम

---

१. २२-१-१७८१.

१. सन समान तिसेन मया व आलफ् शके १७१९ राज्यभिषेक शके पिंगलनामसंवत्सरे

१. ठाणे सवंदलगे प्रांत हुकेरीचे बेडक्याळकर याजकडे होते ते ठाणे घेणेस महाराज सरकारातून रत्नाकर पंडित राजाज्ञा व प्रीतीराव चव्हाण हिंमत बहाद्दर याजसमागमे फौज देवून रवाना झालेवर ठाणेस मोर्चाबंदी करून वेढा घातलेवर सवंदलगेतील लोकानी गोळी मारून पंधरा रोज लढले. नंतर ज्येष्ट शु॥ ११ रोजी[१] ठाणे घातले.

१. पंडीत राजाआज्ञा व हिंमत बहाद्दर फौजसुद्धा भिरडीचे ठाणेस गेले ते समई व्यंकटराव दिनकर भिरडीकर यानी गोळी मारिली. सबब मोर्चेबंदी करून बसले. तेव्हा भिरडीकर यानी बुरजात दारूचे बुधले पुरून हाल्लेचे वेळेस दारूच्या बुधल्यास जामगेच्या बत्त्या लावून बुरुज उडविला. ते समई महाराज सरकारचे फौजेपैकी लोक बहुत जखमी झाले व काही लोक दारूचे बुधले उडविले मुळे दगड धोंडे लागून मयत झाले. नंतर भिरडीचे ठाणे ज्येष्ठ शु॥ १५ पौर्णिमे रोजी घेतले.[२]

१. सन ईहिदे मयातेन व आलफ् छ १९ जिलकादी[३] चिरंजीव राजेश्री सखाराम घाटगे सर्ज्याराव यानी करविरचे मुक्कमी विनंती केली जे सिदोजीराव नाईक निंबाळकर देसाई सरनाईक प्रांत हुकेरी याजकडे प्रांत मजकुर यातील खेडी पुरातन चालत असता दंग्यामुळे चालत नाही. या करिता नुतन सनदा देवून चालविले पाहिजे. मशार निल्हे राज्याचे उपयोगी एक निष्ठपणे सेवाचाकरी केली आहे. ते समई आज्ञापत्र. मोर्तबी सादर जाहाली आहे.

१. शाहालीवान शके १७२९ राज्याभिषेष शके १३४ प्रभव नाम संवत्सरी महाराज सरकारातून सिदोजीराव नाईक निंबाळकर देसाई निपाणकर यानी नवीन सनदा स्वती श्रीच्या श्रावण शु॥ २ भौमवत्सरी[४] करून घेतल्या त्या सनदेतील मजकुर हुजूरची स्वारी पेशजी येऊन अकुलचे ठाणे घेतले ते समई घर जिनगानी गेली. तेव्हा सनदा गेल्या म्हणोन महाराज सरकारातून नवीन सनदा करून घेतल्या

३. मौजे निपाणी कसबा लाट प्रांत हुकेरीच्या सनदा

१. ५-६-१७९७. २. ९-६-१७९७, ३. ४-४-१८०१, ४. ५-८-१८०७

१. मौजे मजकुरचे नावची

१. देसाई यांचे नावची

१. देशमुख व देशपांडे यांचे नावची

३. मौजे शिरगुप्पी प्रांत लाट सदरहु प्रमाणे सनदा

३. मौंजे बालकुड का। प्रांत हुकेरी सदरहु प्रमाणे

लेखांक : २२९

हुजर खाजगी दप्तर : २५ / ता. ३१ डिसेंबर १८५३

यादी छत्रपती माहाराजांची स्वारी करवीराहून लग्नास बडोद्यास येतील तेव्हा त्यांची प्रथम मुलाखत माहाराज गायकवाड सरकार घेतील ते येणे प्रमाणे-

१. छत्रपती माहाराजांची स्वारी करवीराहून निघाल्यापासून वकील बरोबर राहील.

१. बडोद्यापासून सुमारी तीन मजलीवर पहिले प्रतीचे कारभारी सामोरे येवून छत्रपती माहाराजास सांप्रदायाप्रमाणे मुजरा करून स्वारी बरोबर राहतील.

१. बडोद्यापासून येक मजली म्हणजे तीन कोस सुमारी माहाराज छत्रपतीचा मुक्काम होईल तेथे गायकवाड सरकार खुद मानकरी वगैरे संभावीत मंडळीसह सामोरे येवून छत्रपतीची भेट रामराम करून घेतील. तेथे खुर्च्यांवर बसणे होवून परस्पर कुशल प्रश्न जाहाल्यावर आपआपले वाहनावर बसून लग्न समारंभाचे सांप्रदायाप्रमाणे जिलीबा वगैरे छत्रपतीचे स्वारी बरोबर चालून माहाराज गायकवाड सरकारची स्वारी आलग चालेल. शाचे (?) ठिकाणी दाखल जाहाल्यावर खुर्च्यांची कचेरी होवून परस्पर मानकरी ज्याचे त्याचे बाजूस असोन छत्रपती माहाराजांनी स्वहस्ताने पान सुपारी वगैरे गायकवाड सरकारास देवून कचेरी बरखास्त व्हावी.

सदरहु प्रमाणे प्रथम मुलाकत जाहालेवर लग्न संबंधी मानपान वगैरे रीती प्रमाणे राहातील ता। ३१ डिसेंबर सन १८५३ सवी मुक्काम कोल्हापूर वामनराव धोंडदेव साठे नि। सरकार गायकवाड सेनाखासकील समशेर बहाद्दर.



लेखांक : २३०

तोरगल : ३६ / इ. स. १८५४-५५

यादी येथील हाल्ली जाहालेले दरबारी वर्तमान सुमा खमस आर्बेन मया तेन व आलफ.

१. प्रथम येक याद करून पाठविली होती. त्याजवर जाहालेले येथून करवीरचे लोकही गेले होतो आणि कंपनी सरकारातून दोन पलटणे (फाटलेले आहे) व लोक सोजीर ३०० साहेब लोक आणि कामाची खोरी कुदळी सुद्धा या प्रमाणे आले आहेत. तेथे येवून दोन तीन दिवस राहून गडकरी यास विचारले की तुम्ही पेट्याखाली वागता किंवा नाही या प्रमाणे विचारले. त्यांनीं सांगितले आम्ही काही पेट्या खाली वागणार नाही. म्हणताच लष्करी साहेब येक आसामी व चेपरासी ४ आसामी व चेटेकरी चोवीस २४ आसामी याप्रमाणे गुरुवारी उजाडते प्रहरी सुमा सम....गडावर चढावे म्हणोन गेले तेव्हा गडकरी यानी माहाराज (मजकूर फाटून गेला आहे) गेले तेव्हा कंपनी सरकारची दुराई घातली तेही मानली नाही. तेव्हा गडकरी यानी साहेबाची घोड्याच्या लगामास हात घातला. तेव्हा साहेबांनी त्यास कराचलीने मारिला तो जखमी जाहाला नंतर गडकरी यानी साहेबास गोळीनी मारिले. तो फार जखमी जाहाला आणि चेटेकरी व छपरासी पो दाहा आसामी ठार जाहाले. बाकीचे लोक जखमी जाहाले. त्याजवरून येथे कारभारी यास लिहिणे आले. तोही भृगुवारी सायंकाळी गेला तो ते दिवशी प्रहर रात्रौपासून तोफेचा मारा सुरू केला तो रविवारी प्रहर दिवस पावेतो येक सारिखे तोफा उडाल्या. रविवारी रात्री च्यारपाच शेहे लोक जखमी जाहाले. आणि शंभर दोनशेहे ठार जाहाले. याप्रमाणे रविवारी माहाराज सरकारास थैली आली. त्याजवरून ईकडून जखमी लोक आणावयाकरिता डाल्या २५ व मेणे १० पाठविले आहे आणि तोफा पाच पाठविल्या आहेत. याप्रमाणे जाहालेला मजकूर लिहिला आहे. कलम

१. मिरज येथे दाजी पंडीत यांचा भाऊ यत्कींचींत काम करण्यास्तव गेला होता. मिरजकर यानी गावात घेतले नाहीत. तुम्ही कशास्तव आला म्हणोन विचारले. त्यांनी सांगितले की, येथील वहिवाट पाहाणेस्तव आलो आहो, म्हणताच, मिरजकर यानी सरंजाम सुद्धा बाहेर येवून उतरले आहेत. मुंबईस

लिहिणे घातले आहेत. तिकडून हुकूम तुम्हास कारभार करणे म्हणोन आलेस तुमचे स्वाधीन किल्ला करून निघोन जावू आणि तुमचे नावे मनाई आल्यास तुम्ही जावे, या प्रमाणे मिरजकर यानी दाजी पंडीत यांचे भावास सांगितले म्हणोन पंडीत यास त्यांचे भावाचे लिहिणे आले. कलम

१. येथून मानकरी लोक आसामी गेले होती त्यापैकी रावसाहेब खर्डेकर यास जखम फार जाहाली आहे. आणि हिंमतबहादर यासही मारिले आहेत. त्याचे घोडी वगैरे घेवून गडकरी यानी गेले. याप्रमाणे करवीरकर लोकांचे फार नासाडी जाहाली. तिकडून आलेले लोकां पो शंभर माणुस ठार जाहाले. बाकी २०० राहिले आहेत. याप्रमाणे माहाराज सरकारास लिहिणे आले. कलम



लेखक : २३१

निवडी ११२८ / ता. १४ फेब्रुवारी १८५५

यादी सरकार पेटा किल्ले भरतगडास जावयाची लक्ष्मण गोविंद पाटणकर याजकडून सुरू सन सलास खमसेन मयातेन व आलफ सन १२६४ फसली तारीख ७ जानेवारी १८५५ इसवीचा नंबर २४० चा झाला त्याचा जबाब—

१. माझे शरीरी फार समाधान नाही. समक्ष सिपाईयाणे पाहिले आहे. हुकुमाप्रो॥ येणेचा नाविलाज.

२. किल्ले भरतगडची वहिवाट गायकवाड याजकडे किती साली, ते गांव कोणते तर्फेतील त्यांची माहिती समजून घेणे आहे, तर माहितीचे कागदपत्र असतील ते घेवून फार सत्वर यावे. हुजूर हुकुमाचा जबाब जाणे जरूर आहे. म्हणोन आज्ञा. त्यास आम्हाकडे कागदपत्र मुळीच राहिले नाही. जप्तीस गेले ते हुजूर सरकारात जप्तीखातेकडेस आहेत. त्यातील एक सुडबंद आणला असता जमाबंदी वसुली सु....बेरीज समजेल, गाव गन्नाचे जमाबंदीस सालोसाल कम-ज्याजती असे नाही.

३. किला गायकवाड याजकडेस दिल्हा तो कोणते साली? कोणास? कशा कारणाने? दिल्हा म्हणोन लिहिले. त्यास शके १७२९ भाद्रपद मासी श्रीमंत कैलासवासी हैबतराव दादा साहेब गायकवाड विश्वासराव यासी ईनामत

दिल्हे. त्यावेळी मसुरे तर्फेतील दहा गाव चालत होते. त्यांत एक मसुरे गाव हा दोन तक्षिमा भरतगडास व एक तक्षिम जंजीरे मालवणाकडेस. वरकड गाव निम्मे निम्मे श्री भरतगडाकडे व मालवणाकडे चालत असता मसुरे गावचा निम्मा निम ठरवून मालवणास दिल्ही. त्यात भरतगडचा ऐवज कमी जाहल्याबद्दल मालवण तर्फेचे गांव आठ भरतगडास दिल्हे ते जुजबी लावणीने चालत असता पुढे मालवणांत इंग्रजी झाली ते समई आठ गावची चौकसी होणेची म्हणोन अजम डनलाप साहेब बहादुर यांनी मालवण तर्फेतील आठगावचे वसुलाची महकूबी केली. बाकी दहा गावची मात्र जमाबंदीचा भरतगडचे जमाबंदी गाईकवाड याजकडेस चालत होती. ते गाव दरोबस्त मसुरे तर्फेतील सु॥ १० पो॥ वजा श्री बाबा महाराज यास मौजे आंबेरी हा गाव इनाम भरतगड मारफत बाकी गाव सुमारे ९ नऊ, त्यात निमे मालवण बाकी निमे भरतगड. ते गाव बी तपसील कसबा मसुरे एक १, मौजे वरळे २, मौजे मालवण ३, मौजे आंबडोस ४, मौजे देवली ५, मौजे ठवली ६, मौजे कांदलगाव ७, मौजे खेडी ८, मौजे घाडी ९, एकूण दहा गाव. भरतगडचा निमे आमल जमाबंदी सालोसाल एकच कमज्याजती होत नाही. जे कमीजाजती होणे ते एक दारूगुत्तेचे जमाबंदीस व शेरी ठिकाणाचे जमाबंदीस मालवणाहून सालोसाल लिलावामुळे होत होते आम्हापासी कागदपत्र मुळीच राहिले नाहीत. सदरहु आम्ही लिहिले हे सरासरी स्मरणाने आहे. निवेदन व्हावे. १४ माहे फेब्रुवारी सन १८५५ इसवी मिती माघ व॥ १२ शके १७७६ आनंद नाम संवत्सरे.



लेखांक : २३२

निवडी : १३८०९ / ता. २७ सप्टेंबर १८५५

टिपण तोफेचे बार होणेचे माहिती प्रकर्णी

१. पुण्यास शके १७४८ ईसवी सन १८२६ सालात जाहले वेळेस मेहेरबान अलीपीष्टन साहेब बहादुर गोरनर तेथे असलेमुळे :

२१ स्वारीस डेरेत दाखल झाले वेळेस साहेबाकडून.

१०० साहेब माहाराजांचे भेटीस आले वेळेस इकडून.

५० स्वारी साहेबांचे भेटीस गेले वेळेस साहेबाकडून.
५ स्वारी पर्वतीस गेले वेळेस इकडून परवती जवळ.

१. बेळगाव व धारवाडास मेहेरबा येजंट साहेब याजकडे स्वारी आली ते वेळेस—

१ धारवाडास सन खमस आशरीन म्हणजे ईसवी सन १८२४ साली
२१ स्वारी डेरेत दाखल झाले वेळी साहेबाकडून
२५ माहाराजांचे मुलाखतीस साहेब आलेवेळेस इकडून
२५ मुलाखतीचे वेळेस साहेबाकडून.

१. बेळगावास सन सलासीन ईसवी सन १८२९ व ईसने सलासीन ईसवी सन १८३१ साली सदर.

१. मेहेरबा गोरनर साहेब आलेवेळेस त्याजबरोबर तोफा नसलेमुळे इकडून—

१ करवीरास मेहेरबा मालकम साहेब बहादुर सन तीसा आशरीन सन १८२८
१५ साहेब करवीरी आलेवेळेस डेरेत दाखल होताना
५० स्वारी साहेबाचे डेरेस गेले वेळेस
१०० माहाराजांचे मुलाखतीस आलेवेळी

१. वाडी नरसिंह येथे--

१ मेहेरबा आलीपीष्टन साहेब बहादुर
१ मेहेरबा आपुकनेर (?) साहेब
सदरहु प्रमाणे

१. मेहेरबा एजंट साहेब बहादुर करवीरास येतात तेव्हा होतात. हे येणे हमेष होत होते व पोलीटिक्याल सुपरिंटेंडेंट साहेब आले असता सरबत्ती होणे ती

५ करवीरी डेरेत दाखल जाहलेवेळी
१० साहेब वाडीपत आलेवर
१५ स्वारी भेटीस गेले वेळी.

१. पुत्रोत्सव वगैरे शुभ कार्यास सरकार हुकूम होईल तैसे आवाज होणेची वहिवाट आहे. परंतु २५ हुन जाजती होतात.

१. वार्षीकी—

५ तुळशीचे लग्नाबद्दल	१३ मोहरम महिनेत आलवे बा॥
५ शिवरात्र	५ गोकुळ अष्टमी
५ हुताशनी	५ रामनवमी
१० सीतालिंगमातुलिंग	१० मार्गशीर्ष मास उत्साह
५ सखाईस (?) स्वारी होते वेळेस	१५ मारग मळते वेळेस
५० चैत्र वा॥ ८ चे उत्साहाबद्दल.	१३६ शारदीय नवरात्राबद्दल
१६ सटीचे उछाहाबद्दल	

१. स्वारी बडोद्यास सन १८७४ ईसवी साली गेली तेव्हा—

३५ पुणे मुक्कामी मुलाखतीचे वेळेस
२१ साहेबाकडील सलामी बद्दल
१५ ईकडील

३६ बडोदे मुक्कामी उटरम साहेबाची भेट झालेवेळेस वर लिहीले प्रमाणे.

३६ सातारेस आले वेळेस सदर प्रमाणे

१. सातारकर माहाराज यांची स्वारी ईहिदे आरबा ईसवी सन १८४० व सन आर्बा आर्बैन ईसवी सन १८४३ साली करवीरास आले वेळेस हुजूर स्वारीची भेट झाल्यासमई सलेने हुकमा प्रमाणे बार जाहले ते—

२१ सातारेकडील भेटीचे वेळेस

१०५ ईकडील भेटीचे वेळेस. वाड्यात दाखल जाहलेवर ५

१. अष्टप्रधान व सरदार मानकरी लोक १० यांची व साहेबाची भेट झाल्यास व ते करवीरी आले असता तोफा होत नाहीत, वहिवाट नसलेमुळे.

१. दुसरे साहेब लोक आल्यास तोफांचे आवाज होणेची वहिवाट नाही.

१. साहेब लोकाकडून खुशाली बद्दल इकडे लिहून आलेस

१ गडानी किल्ला सन आर्बेन ईसवी सन १८३९ सालात सर केले बद्दल पाच

१. विलायत राणीसाहेब यास पुत्रोत्साह जाहाले बद्दल १० दहा आवाज सन १८४२ ईसवी सालात

१. येथुन कोठे मोहिमेस किंवा हरयेक कारणाने जाणे जाहल्यास जाताना व येताना ५ पाच बार होणेची वहिवाट आहे.

१. कोणी कैलासवासी जाहलेस दर ५ प्रमाणे आवाज होणेची वहिवाट आहे.

येणे प्रमाणे माहिती वरून तयार केले असे. परंतु दुसरे कडून आवाज झाले बद्दलची माहिती तिकडून समजणे आहे. तारीख २७ माहे सपटेंबर सन १८५५ ईसवी.

याशिवाय--

१. हुजूरची स्वारी विशालगड, बावडा व शिरोळ वगैरे ठिकाणी आलेली असता तेथील तोफेचे आवाज होणेची वहिवाट आहे.

१. संस्थानात उत्साहा बद्दल आवाज होणेचे.

१. श्री करवीर निवासिनीकडे भृगुवार व नोरात्राबद्दल मिळोन ६०

१. श्री वाडी नरसिंह येथे गोपाळ काल्याचे वेळेस ५

१. ठाणे शिरोळ येथे तख्त असलेबद्दल दसरे दिवशी सीमा उल्लंघना बद्दल ५

१. किले विशाळगड येथे शारदी नोरात्राबद्दल २५

१. बावडा येथे श्रीराम नवमीचे उत्साहा बद्दल २५



लेखांक : २३३

निवडी १७८९० / ता. २० आक्टोबर १७६२

श्रीमन्महाराज मातोश्री जिजाबाई साहेब याणी राजेश्री आपाजी यादव व नाना जाधव कारकून जंजिरे सिंधुदुर्ग यासी आज्ञा केली ऐसेजी. सुमा. वेद-शास्त्र संपन्न राजश्री चिंतामण जोशीराव यासी सरजोतीषपणाचे वतन पूर्व

महाराज राजेश्री स्वामींनी करून दिल्हे आहे. त्याचा सनदा अलाहिदा सादर आहेत. त्या सनदेप्रमाणे जंजिरे म।। च्या तनखेच्या गावगन्ना ताकीद करून हक्क इनाम कानू कायेदे व।। कड सुरळित चालत जाणे. सालदरसाल ताजे सनदेच्या उजूर न करिता आज्ञेप्रमाणे वतन बाब सुद्धा चालवणे. या पत्राचे तालीफ लिहून घेऊन अस्सल पत्र व।। कडे भोगवट्यास परतोन देणे जाणिजे. रा।। छ २ माहे रबिलावर.



लेखांक : २३४

निवडी : १०३६९ / ता. २९ आक्टोबर १८६६

टिप्पण माहिती प्रकर्णी सेख १२७६ फसली शके १७८८. पुणे येथे दरबार जालेबद्दल.

१. ता.।। २९ अकटंबर सन १८६६ इसवी, मिती आश्विन व।। ६ ची सेक्रेटरी याचे बंगलेलगत मोठे मैदानात मोठे डेरे अकरा, दर खुर्च्यांच्या वोळी ८ पैकी चार बडे नेटिव्ह व नंबर १३ व चार बडे युरोपीयन मध्ये दोन खुर्च्या महाराजांची व गव्हरनर यांची–उंची तांबडी सकलाद घातलेल्या–नबाब, पटवर्धन वगैरे सर्व आलेवर महाराजांची स्वारी बराबर चार वाजता बराबर मातोश्री राणी व मातोश्री सौ. आक्कासाहेब घाटगे व पंत आमात्य यांचे कुटुंब येऊन पाठीमागे डेऱ्यात पाहणेस बसले. स्वारी जवळ येताच सामोरे सेक्रेटरी येऊन घेऊन गेले. सर्वांनी उठून मुजरा केलेनंतर गव्हरनर साहेब आले. सलाम झालेवर तोफा १७ जहाल्यानंतर थैली पत्र, कंठी सिरपेच, मलगी, तलवार, मंदील, दुपेटा १ शालजोडी, किनखाब, ओटी १ येणेप्रमाणे देणेत येऊन तोफा सतरा १७ केल्यावर स्वारी बराबर पंतप्रतिनिधी, पंत आमात्य, सरनोबती, सेनाखासकील, सरलस्कर, मामासाहेब घाटगे, आबासाहेब घाटगे, रामदास नरसिंह कारभारी, वासुदेव रामराव तपासनीस, इचलकरंजीकर, दत्तवाडकर असे आकरा होते. पान सुपारी जाहल्या नंतर गव्हरनर साहेब आधी उठून गेले. नंतर स्वारी उठून बाहेर आली. बरोबर पोचविणेस सेक्रेटरी सामोरे आले. सलामी जहाली.

स्वारी परत येतेवेळी आमात्य पंत बसले. उठल्यावर तोफा सतरा जहाल्या.

१. सनगे दागिने

1 कंठी मोत्याची हीरचे

1सीरपेच कलगीसह माणीक

सनगे

1 मंदील

1 चिरा

1 शालजोडी

1 किनखाब

1 नग जरीटोप

1 दुपेटा



लेखांक : ३२५

निवडी / १०३६८ ता. २७ नोव्हेंबर १८६६

यादी हुजूरची स्वारी पुणेस गव्हरनरसाहेबांचे भेटीस माहे नोव्हेंबर सन १८६६ इ. महिनेत जहाली ते वेळी नजरेबद्दल मोहरा व पुतळ्या आल्या. त्याची तारीख

२. भेटीचा मोठा समारंभ ता ॥ २९ अगटंबर रोजी जहाला. त्यापूर्वी तेच दिवशी इचलकरंजीकर भेटीस आले वेळी पुतळ्या १९ त्याचा तपशील

५ नोव्हेंबर मुंबईस स्वारी जातापूर्वी मोहरा.

४ कुरंदवाडकर.

५ जमखिंडीकर.

४ धोंडीराम चिंतामण सांगलीकर

४ मिरजकर.

1 मुधोळकर घोरपडे.

1 विंचूरकर.

१९ एकूण

१६. हुजूरचे स्वारी समोरे आलेवेळी

५ कराडकर प्रतिनिधी.
१ विशाळगडचे प्रतिनिधी.
५ सचीव भोरकर.
५ अमलकीटकर.

१६ एकूण

येणेप्रमाणे दाखला खजिन्याकडे देऊन ता ॥ २७ नोव्हेंबर पान ४४४ याजवर आहे.



लेखांक : २३६

हुजूर खाजगी दप्तर : ३६ / ता. १३ आक्टोबर १८७१

अस्मत पन्हा माहाराज गीराणी अहिल्याबाई साहेब दाम आलताफहु अजनीयाजमंद कर्नल जॉर्ज स्लेगो अलेक्झांडर अंडरसन साहेब पोलीटिकल एजंट प्रांत कोल्हापूर व कर्नाटक. बाआदज नीयाज मारूज हासुल अंके येथील खैरीयेत रोषन होवून हमेषा अलताफनामा सादर होत असले पाहिजे. दरीआयाम कोल्हापूर छत्रपती सरकारचे दौलतीच्या गादीस दत्तक होण्याचे बाबतीत राणीसाहेबाकडील अनुमन घेवून ईज्यानीबाकडून मुंबई सरकारास लिहून गेले होते. त्यास काल तारीख १२ आक्टोबर सन १८७१ ईसवी रोजी सरकारातून तारायंत्र द्वारे मेहेरबान दिनकरराव साहेब भोसले खानवटकर यांचे चिरंजीव मेहेरबान नारायणराव साहेब यास दत्तक घेण्यास मंजुर केल्याचे लिहून आले आहे. हा दत्तकाचा उमारंभ तारीख २३ माहे मजकुरी विजयादशमी रोजी यथामुक्त व्हावयाचा. मेहेरबान मुधोजीराव साहेब निंबाळकर यासी श्रीमंत ताराबाई राणीसाहेब यासी घेवून येण्यास्तव तारायंत्र द्वारे व थैली पत्राने फलटणास कळविण्यात आले आहे. आराणीसाहेबाकडून दौलतीचे सरदार व मानकरी वगैरे सर्व लोकास आमंत्रणे दौलतीच्या सांप्रदायप्रमाणे होण्याची ती होवून समारंभ सांग होण्यास

श्रुत केले आहे. हा सर्वांस अतीशय आनंद होणारा मजकुर राणी साहेबा यास श्रुत करण्यास ईज्यानीवासी खुषी जाहाली आहे.

सही इंग्रजी

पोलीटिकल एजंट



लेखांक : २३७

निवडी : २१०७२ ते ७४ / इ. स. १८७१

श्रीमन्महाराज शिवछत्रपती याजपासून कारकिर्द होत आल्या
त्याचे करवीर सरकारचा तपशील

नंबर	नावनिसी	कारकीर्द शके	वय वर्षे	कारकीर्द वर्षे	महिने	दिवस	मु. पुरुष
१	श्रीमन्महाराज शिवछत्रपती शककर्ते यांचा जन्म शिवनेर मुक्कामी शालीवाहान शके १५४९ सालात जहाला. पुढे राजाभिषेक शके १५९६ जेष्ट शु॥ १३ रोज मंदवारी रायगड मुक्कामी जाहला.तो पुढे शके १६०२ चैत्र शु॥ १५ कैलासवासी रायगड मुक्कामी जहाले त्यांस पुत्र दोन २.	१५९६ ते १६०२	५३	६	१०	३	१

नंबर	नावनिसी	कारकीर्द शके	वय वर्ष	कारकीर्द वर्षे	महिने	दिवस	मु. पुरुष
२	जेष्ठ चिरंजीव श्रीमन्हाराज शंभु छत्रपती यांचा जन्म शके १५७९ साली जाहाला. त्याचे कारकिर्दीस प्रारंभ चैत्र व॥ १ शके १६०२ तागायत शके १६१० जेष्ठ १२ पर्यंत करून पुढे तुळापूर मुक्कामी कैलासवास केला.	१६०२ ते १६१०	३१	८	१	२७	२
३	कनिष्ठ चिरंजीव श्रीमन्महाराज राजाराम छत्रपती याचा जन्म शके १५९३ साली जाहाला त्यांची कारकिर्द प्रारंभ जेष्ठ शु॥ १३ शके १६१० तागायत शके १६२१ फालगुण व॥ ८ स सिंहगड मुक्कामी. कैलासवास केला यांस पुत्र २	१६१० ते १६२१	३८	२१	९	२१	३
४	जेष्ठ चिरंजीव श्रीमन्महाराज शिव छत्रपती भ्रातस्त यांचा	१६२१ ते १६२८	०	७	८	७	४

नंबर	नावनिसी	कारकीर्द शके	वय वर्षे	कारकीर्द वर्षे	महिने	दिवस	मु. पुरुष
	जन्म शके १६१३ साली जाहाला. पुढे कारकिर्दीस प्रारंभ फाल्गुण व॥ ९ शके १६२१ तागायत शके १६२८ फाल्गुण व॥ ३० पर्यंत. त्यास पुत्र १ श्रीमन्महाराज रामराजे छत्रपती म्हणोन होते. श्रीमन्महाराज शाहूछत्रपती हे श्रीमन्महाराज शंभु छत्रपती यांचे चिरंजीव याही दत्तक घेतले. सातारी यांस						
५	श्रीमन्महाराज शाहुछत्रपती हे श्री मन्महाराज शंभुछत्रपती यांचे चिरंजीव याचा शके १६०२ सालात जाहाला. त्यांची कारकिर्द शके १६२९ चैत्र शु॥ १ तागायत शके १६३३ पालगुन व॥ ३ पर्यंत एकवांत राजे करून नंतर श्रीमन्महा-	१६२९ ता॥ १६३३ पर्यंत	०	५	०	०	५

नंबर	नावनिसी	कारकीर्द शके	वय वर्ष	कारकीर्द वर्षे	महिने	दिवस	मु. पुरुष
	राज शाहुछत्रपती यांचा श्रीमन्महाराज शंभू छत्रपती यांचा तह शके १६५२ सालात होवून ते सातारेस राज करू लागले.						
६	कनिष्ठ चिरंजीव श्रीमन्महाराज शंभु छत्रपती यांचा जन्म शके १६१५ साली जाहाला पुढे कारकिर्दीस प्रारंभ चैत्र शु॥ १ शके १६३४ तागायत १६८२ मार्गशिर्ष शु॥ १२ स किले टोपास जाहाला.	१६३४ ता॥ १६८२ पर्यंत	०	४८	८	१२	६
७	खानावटाहून शहाजी भोसले यांचे जेष्ठ चिरंजीव यांचा जन्म शके १६१५ साली जाहाला. त्यांस पनालेस श्रीमन्महाराज मातुश्री जिजाआई साहेब याणी आणोन दत्तक १६८४ आश्विन शु॥ १० स	१६८२ ता॥ १७३४	०	५१	४	११	७

नंबर	नाकनिसी	कारकीर्द शके	वय वर्षे	कारकीर्द वर्षे	महिने	दिवस	मु. पुरुष
	घेतले ते शिवछत्रती शके १७३४ चैत्र व॥ ८ स करवीर मुक्कामी कैलासवासी जाहाले. त्यांस पुत्र २						
८	जेष्ठ चिरंजीव श्रीन्महाराज शंभुछत्रपती यांचा जन्म शक १७२२ सालात जाहाला कारकिर्दीस प्रारंभ शके १७३४ चैत्र व॥ ९ तागायत शक १७४३ आशाढ व॥ २ पर्यंत.	१७३४ ता॥ १७४३ पर्यंत	०	९	२	२४	८
९	कनिष्ठ चिरंजीव श्रीमन्महाराज शाहाजीछत्रपती यांचा जन्म शके १७२५ पौष शु॥ ३ त्रीतीयेचे दिवशी होऊन कारकिर्दीस प्रारंभ शके १७४३ आशाढ व॥ ३ ता॥ शक १७६० मार्गशीर्ष शु॥ १३ स येवती मुक्कामी काल जाहाला त्यास पुत्र २	१७४३ ता॥ १७६० पर्यंत	०	१७	४	२६	९

१०

श्रीमन्महाराज राजश्री शिवछत्रपती उर्फ बाबासाहेब जेष्ठ चिरंजीव याचा जन्म शके १७ पौष शु।। १२ दिवसी जाहला कारकिर्दीस प्रारंभ शके १७५० मार्गशिर्ष श्रु।। १४ त जाहला असे व दुसरे चिरंजीव श्रीमन्महाराज राजश्री शाहूछत्रपती उर्फ चिमासाहेब यांचा जन्म शके १७५२ पौष वद्य १० दिवसी जाला असे शिवछत्रपती यांचा काल त।। ३ आगस्ट सन १८६५ म्हणजे आषाढ व।। ८ शुक्रवार चंपा अटवेतासी रात्रो उदमास मंदवार शके १७८८.

११

रामचंद्रराव पाटणकर याशी आऊबाई अका ही देहूब त्यांचे चिरंजीव तत्यासाहेब पाटणकर यासी त।। १ आगस्ट सन रोजी बुधवार दिवशी दोन प्रहरी सुमारे दत्तविधान होऊन नाव राजारामसाहेब ठेविले. हे विलायेतेस देश पाहणे करिता निघोन जाऊन देशपाहून परत येत असता इटाली शहरात त।। ३० नवंबर सन १८७० मार्गशीर्ष शु।। ८ बुधवार शके रोजी दोन प्रहरी कैलासवास जाहले पुढे त्यांचे जेष्ठ पत्नीचे मांडीवर दत्तक दिल्हे.

१२

दिनकरराव भोसले सावर्डेकर यांचे चिरंजीव नारायणराव यासी आश्विन शुद्ध दशमी इंदुवासरे दि व सी मातुश्री ताराबाई साहेब याचे मांडीवर बसवून दत्तविधान केले. नाव शिवछत्रपतीच ठेविले आहे. ता।। ३ आगटंबर १८७१ इसवी.



लेखांक : २३८

राव विश्वासराव गायकवाड दप्तर : १९ ता. १६ मार्च १८७२

मेहेरबान दोस्त दत्ताजीराव भाऊसाहेब गायकवाड सलामत अर्जा साहेब वुलियेम हेन्री ह्यावलाक साहेब बाहादुर बाद सलाम खैरीयेत अजयाम आंके येथील खैर सलाह जाणून आपली शादमानी हमेशा कलमी करीत असावी. दीगर नेक नामदार लॉर्ड नेपीयर साहेब बाहादुर यानी मद्रासेत असता हिंदुस्थानातील शिल्प शास्त्रसंबंधी दिलेले व्याख्यानाचे ईज्यानीबानी माहाराष्ट्र भाषेत भाषांतर करून त्याचे एक लहानसे पुस्तक छापून अस्मत पन्हा खासी बाई राणी साहेब संस्थान कोल्हापूर यास नजर केले. त्यातील विषयाची आमेहेरबानास माहिती असणे आवश्य जाणोन त्या पुस्तकाच्या प्रती १ आमेहेरबानास पाठविल्या आहेत. फुरसदीच्या वेळी यातील विषय मननात यावे, अशी ईज्यानेबाची ईच्छा आहे. रवाना तारीख १६ माहे मार्च सन १९७२ ईसवी. ज्यादा काय लिहिणे मोहबत आसो दीजे हे किताबत.

सही इंग्रजी



लेखांक : २३९

निवडी : १४३०१ ते १४३०५ / ता. १७ फेब्रुवारी १८७३

श्रीमन्महाराज छत्रपती साहेब सरकार करवीर यांचे घराणेतील माहिती

तक्ता मेहेरबान पोलिटिकल एजंट साहेब बहादुर इलाखा करवीर यांजकडून मुकदमा नंबर ६१५ सरकार करवीर यांचेबद्दल माहिती लिहून पाठवावी म्हणून आलेबद्दल. ता. ३१ जानेवारी १८७३

कलम हुकुमातील प्रश्नाचा उतारा समग्र हुकुमातील समग्र उत्तरे

१ हल्लीचे इसमाचे नाव
शिवछत्रपती महाराज

२ किताब जो काय असेल तो सर्व लिहावा.
श्रीमन्महाराज क्षत्रीय कुलावंतस छत्रपती साहेब सरकार करवीर, या-

प्रमाणे लिहीण्याचा पाठ असोन तक्तावर व दरबारात स्वारी बसल्याचेवेळी वगैरे महालदार चोपदार पुकारतात तेव्हा, महाराज छत्रपती हिंदूपद पादशहा असे म्हणण्याचा संप्रदाय पूर्वीपासून आहे.

३ सलामीबद्दल तोफा किती देत असतात ?
तोफा एकोणीस (१९) देतात.

४ जन्मदिवस तारीख महिना सन इंग्रजी असावा.
शके १७८५ चैत्र वद्य १ ता. ५ माहे एप्रिल सन १८६३ इसवी,

५ गादीवर कधी बसले ती तारीख, अल्पवई असल्यास अधिकारी कोणत्या तारीख महिना सनास जाहाले.
शके १७९३ अश्विन शु।। १० तारीख २३ माहे ऑक्टोबर सन १८७१ इसवी रोजी मेहेरबान दिनकरराव भोसले सावर्डेकर यांचे पुत्र विधानपूर्वक दत्तक समारंभ होऊन गादीवर बसले. अल्पवई असल्यामुळे अधिकार प्राप्त होणे आहे.

६ पत्नीचे नाव
विवाह होणे आहे. सबब कॉलम ६ पासून १० पर्यंत खुलासा लिहीणेचे कारण नाही.

७ पत्नीचे वडिलांचे नाव, अडनावासह

८ लग्नाची तारिख महिना सन.

९ मुलांची नांवे

१० मुलांची वये

११ मालकाचे भाऊबंद, बंधू, चुलते वगैरे जवळचे कोण कोण आहेत ?
जवळचे भाऊबंद चुलते कोणी नाही. लांबचे भाऊबंद आहेत. त्याचा खुलासा पुढील बारावे कलमात आहे.

१२ कुळाची मूळ पिठिका. राज्य, जहागीर, मूळ संपादन कशी जाहली वगैरे हकीगत इंग्रजी आमल सुरू होईपर्यंत थोडक्यात म्हणजे इसवी सन १८१९ सालापर्यंत
राज्य संपादक उदेपूरचे घराणेपैकी भोसाजी महाराज म्हणून एक पुरुष जाहले, त्याजपासून भोसले असे म्हणू लागले. त्यांचे पुत्र देवराजजी

महाराज सन १२७८ इसवी साली दक्षिणेत आले, त्यापासून पुरुष जाहले ते.

१ देवराजजी माहाराज भोसाजीचे पुत्र.
२ त्यांचे पुत्र इंद्र सेनजी माहाराज
३ त्यांचे पुत्र शंभू कृष्णाजी माहाराज
४ त्यांचे पुत्र रुपसिंहजी महाराज
५ त्यांचे पुत्र भूमिंद्रजी महाराज
६ त्यांचे पुत्र धाकजी महाराज
७ त्यांचे पुत्र माहादजी महाराज
८ त्यांचे पुत्र खेलाजी महाराज
९ त्यांचे पुत्र कर्णसिंहजी महाराज
१० त्यांचे पुत्र संभाजी महाराज
११ त्यांचे पुत्र शिवाजी उर्फ बाबाजी राजे.

बाबाजी राजे हे वेरोळी राहात असून त्यास पुत्र ज्येष्ठ मालोजी, कनिष्ठ विठोजी राजे. पैकी विठोजी राजे यांस ८ पुत्र. त्यातून कांही पुत्रांचा वंश त्याप्रांती असल्याचे माहितीवरून समजते. जेष्ठ मालोजीराजे अहमदनगरीस सन १५७७ इसवी साली आले. आणी मुर्तूजा निजामशा पादशा यास भेटून तेथे राहिले. नंतर त्यांचे सरदार लोकात हे मोठे होऊन काही मुलुखही त्याजकडे होता. त्यास पुत्र जेष्ठ शहाजी राजे व कनिष्ठ शरफजी राजे. त्यांचा वंश पुणे जिल्ह्यात खानवट गांवी आहे व करवीर इलाख्यात आहे. शहाजी राजे यासी अहमदनगरीस वजिरी सन १६१९ इसवी साली मिळून तेथे असता सर्वाचे विरुद्ध. त्यामुळे तेथून निघून विजापूरचे महंमद आदिलशाहा बादशाहाकडे १६२५ इसवी साली आले. तेथेही मोठ्या योग्यतेने सरदारी करीत असता त्याजकडे पुणे, बारामती, इंदापुर प्रांत होता.

त्यांचे चिरंजीव जेष्ठ संभाजी राजे यासी संतती नाही. दुसरे शककर्ते श्रीमन्महाराज शिवाजीराजे. व्यंकोजी राजे तंजावरचे गादीवर होते. शककर्ते महाराजांचा इरादा पादशाहाचे अनुमते वागणेचा नाही. सबब शहाजी राजे याही

त्यास पुणे येथे ठेविले. तेथे फौजबंदी करून पादशाही किल्ले व मुलुख घेऊन राज्य बळाविले. त्यास ज्येष्ठ पुत्र श्रीमन्महाराज शंभू छत्रपती उर्फ संभाजी महाराज गादीवर सातारा व कनिष्ठ राजाराम छत्रपती गादी करवीर.

राजाराम छत्रपती यांचे जेष्ठ चिरंजीव शिवछत्रपती व कनिष्ठ शंभू छत्रपती. शिवछत्रपती यासी १ पुत्र एक रामराजे. ते साताराचे गादीस दत्तक सन १७४९ इसवी साली जाले. शंभूछत्रपती यासी खानवटकर यांचे घराणेचे शाहजी भोसले यांचे पुत्र शिवाजी महाराज सन १७६२ इसवी साली दत्तक होऊन सन १८१२ इसवी साली कैलासवासी जाहाले. तेव्हा त्यास पुत्र जेष्ठ श्रीमन्महाराज शंभूछत्रपती उर्फ आबासाहेब व कनिष्ठ शहाजी महाराज छत्रपती उर्फ बुवा साहेब. हे उभयता सन १८१९ साली होते.

१३ इंग्रजी अमल सुरू जाहले वेळी पुरुष कोण होते. त्यांचा सन आजपर्यंत जाहले त्यांची नावे.

इंग्रजी आमल सुरू सन १८१९ इसवी साली जाला. त्याजपासून पुरुष जाहले ते—

१. श्रीमन्महाराज शंभूछत्रपती उर्फ आबासाहेब. यासी संतती नाही.

१. श्रीमन्महाराज आबासाहेब यांचे धाकटे बंधु शाहाजी महाराज छत्रपती उर्फ बुवासाहेब यासी ज्येष्ठ पुत्र शिवछत्रपती उर्फ बाबासाहेब व कनिष्ठ पुत्र शाहू छत्रपती उर्फ चिमासाहेब यासी संतती नाही.

१. श्रीमन्महाराज बाबासाहेब यानी आपले भगिनीचे पुत्र दत्तक घेतलेले राजाराम महाराज छत्रपती

१. श्रीमन्महाराज राजाराम छत्रपती यासी दत्तक जाहलेले शिवछत्रपती महाराज गादीवर आहेत.

येणेप्रमाणे आहे.

१४. सदरहू इसमांची लग्ने कोणाची किती जाहली ते—

आबासाहेब महाराज यांच्या चार, बुवासाहेब महाराज आठ, बाबासाहेब महाराज दोन, चिमासाहेब एक, राजाराम साहेब महाराज यांची दोन, अशी लग्ने जाहली आहेत.

१५. यानी आपला अधिकार जाहागिरीचा कोणत्या तारखेपासून कोणत्या तारखेपर्यंत किती दिवस चालविला ते

आबासाहेब शके १७३४ चे चैत्र वद्य ८ तारिख ५ माहे एप्रील सन १८१२ इसवी तागायत शके १७४३ आषाढ वद्य २ ता. १७ माहे जुलई सन १८२१ पर्यंत, नऊ वर्षे, दोन महिने, बावीस दिवस.

सदर मितीपासून बुवासाहेब शके १७६० मार्गशीर्ष शु॥ १३ तारीख २९ माहे नव्हेंबर सन १८३८ इसवीपर्यंत, सतरा वर्षे, चार महिने, सव्वीस रोज.

पुढे बाबासाहेब लहान असल्याकारणाने आले. ब्रिटिश सरकारचे महाराज सरकारचे कदीम दोस्तीवर नजर देऊन दौलतीचे हिताकरिता कारभारी ठेऊन काम चालविले. नंतर तारिख १८ माहे नोव्हेंबर १८६३ रोजी मुखत्यार जाले-पासून तारीख ४ माहे ऑगष्ट सन १८६६ इसवीपर्यंत, दोन वर्षे, आठ महिने, सतरा दिवस काम चालविले.

पुढे राजाराम छत्रपती काही उत्तम प्रकारचा विद्याभ्यास करून इंग्लंडास स्वारी जाहली. तिकडून आलेवर आधिकार प्राप्त होणेचा असता परत येताना मार्गात इटाली देशात फ्लॉरेन्स शहरी कैलासवासी जाहले.

शिवछत्रपती यांचे पश्चात कनिष्ठ बंधू शंभूछत्रपती उर्फ संभाजी महाराज गादीवर बसले. सबब राजाराम महाराज याजपासून संभाजी महाराज पर्यंत सिधे वारस संबंधे अधिकार प्राप्त झाला. पुढे संभाजी महाराजासी दत्तक पुत्र शिवछत्रपती यासी दत्तक संबंधाने अधिकार मिळाला. नंतर त्यांचे ज्येष्ठ पुत्र आबासाहेब गादीवर बसले. त्यास जाहालेली संतती अल्प काळातच नष्ट जाहली. सबब आबासाहेब महाराज यांचे पश्चात त्यांचे धाकटे बंधू बुवासाहेब महाराज. त्यांचे पश्चात त्यांचे ज्येष्ठ पुत्र बाबासाहेब महाराजापर्यंत सिधे वारस संबंधाने व त्यानंतर राजाराम महाराज व त्यांचे पश्चात हल्ली छत्रपती शिवाजी महाराज यासी दत्तक संबंधाने अधिकार प्राप्त जाहले आहेत.

१७. नजराना कोणते संबंधी व किती काय देणेचा संप्रदाय आहे ?

नजराणा कधीही देणेचा संप्रदाय नाही.

१८. सदरहू मालकास विराजे किताब अलिकडे मिळाला किंवा कसे, प्रतिष्ठेचे चिन्ह, मानपान मिळाले असल्यास

अलिकडे बाबासाहेब महाराज यासी महाराणी सरकारातून ऑनर आफ बंदुका असा किताब लिहून आलेला आहे. प्रतीष्ठेची चिन्हे सूर्यपान मोर्चले चार व चवऱ्या चार व जरी पटके व साहेब नामा वदबत्तीवरील व ४ महालदार व ४ चोपदार सोन्याच्या काठीचे, अशी आहे. या नांवी मुळारंभापासून आहेत.

१९. ज्याहागीर किती आहे त्याची लांबी रुंदी क्षेत्रफळ ?

२०. उत्पन्नाचे ठिकाण कोठे आहे. त्याची हद्द दाखवून खालसा अमलात वगैरे असेल तर तेही नमूद करावे.

२१. वसुली बेरीज अजमासे

२२. प्रजा संख्या
याचा खुलासा हुजूर दप्तरांतून देणेचा आहे.

२३. मुख्य राहात याचे ठिकाणाचे नाव
राजधानी शहर करवीर.

२४. आधिकार कोणते प्रकारे, दिवाणी, फौजदारी, मुलकी वगैरेबद्दल.
अल्पवई असले, तथापी तहनाम्यावरून आधिकार या घराण्यातील पुरुषास किती आहे ते लिहावे.

२५. इंग्रज सरकारांस अगर दुसरे कोणास कारभाराबद्दल किती काय देत असतात ?

२६. दुसऱ्याकडून यास कारभार काय मिळत असते ?
कलम २४, २५ २६ या, कलमांचा खुलासा हुजूर दप्तरातून होणेचा आहे.

येणेप्रमाणे असे. ता. १७ माहे फेब्रुवारी १८७३ इ.

पारसनीस



लेखांक : २४०

हुजूर खाजगी दप्तर : २७ / ता. १६ मे १८७८

श्रीमन्महाराज मातोश्री अहिल्याबाई साहेब यानी राजमान्य राजेश्री तुकोजी-

राव होळकर सुभेदार यासी आज्ञा केली ऐसीजे. श्रीयासह विजयीभव राजे शिवछत्रपती यांचे विवाहाचा निश्चय वैशाख वद्य ५ भोमवारी दिवस तीन घटकेस होवून वधु रो।। वाघोजीराव शिर्के कुटरेकर यांची कन्या नेमस्त केली आहे. या समारंभास येण्याची आज्ञा जाहाली असे. तरी आज्ञेप्रमाणे येणेचे करावे. जाणीजे सुरू सन समान सबेन मया तेन व आलफ रवाना छ १२ माहे जमादिलावल. बहुत काय लिहिणे मोर्तब असे.



लेखांक : २४१

निवडी दप्तर : १९३८५ / इ. स. १८८२

श्रीमन्महाराज शाहाजी छत्रपती उर्फ बोवा साहेब म्हणजे शिव छत्रपतीचे दुसरे पुत्र यासी स्त्रिया

१ आंबिका बाईसाहेब ही आपाजीराव नाईक निंबाळकर वाठारकर यांची कन्या.

२ सकवारबाई साहेब उर्फ आंबिकाबाई साहेब ही दौलतराव मोहिते यांची कन्या.

३ सगुणाबाई साहेब उर्फ बबाईसाहेब ही जीवनराव शिर्के यांची कन्या.

४ आनंदीबाई साहेब उर्फ ताराबाई साहेब ही नागोजीराव पाटणकर यांची कन्या. यांचे पोटी श्रीमन्महाराज शिव छत्रपती उर्फ बावासाहेब छत्रपती यांचा जन्म शके १७५२ पौष शुद्ध २ स जाहाला.[1] व कन्या जाहाल्या त्याची नावे –

१ आऊबाई आकासाहेब यांचा जन्म शके १७५५ कार्तीक वद्य १४ जानेवारी जाला.[2] ही रामचंद्रराव दादासाहेब पाटणकर यांसी दिली. यांचे पोटी राजाराम साहेब महाराज जाले आहेत तो तपशील खाली लिहिला आहे.

२ बाळाबाई आकासाहेब यांचा जन्म शके १७५८ अश्वीन वद्य ६

---

१. ता. १७ डिसेंबर १८३०, २. ता. १० डिसेंबर १८३४

रवीवारी.[1] ही नारायणराव साहेब घाटगे सर्जेराव कागलकर यासी दिल्ही. याप्रमाणे आहे.

५ श्रीमन्महाराज मातुश्री राजसबाई साहेब ही मन्याजीराव खानवेलकर यांची कन्या. हाली आहेत.

६ नर्मदा बाईसाहेब ही माधवराव घाटगे सर्जेराव पारगावकर यांची कन्या. यांचे पोटी श्रीमन्महाराज शाहु छत्रपती उर्फ चिमणासाहेब यांचा जन्म पौष वद्य १० शके १७५२ सालात जहाला.[2]

७ उमाबाई साहेब—येशवंतराव घाटगे कागलकर यांची कन्या.

८ कमलजाबाई साहेब ही मन्याजीराव इंगळे यांची कन्या.

श्रीमन्महाराज शिवछत्रपती उर्फ बाबासाहेब महाराज यांसी स्त्रिया –

१ सुंदराबाई साहेब ही पीराजीराव पाटणकर यांची कन्या. विवाह शके १७६९ प्लवंग नाम संवत्छरे वैशाख शु॥ ११ रोजी जाहाला.

२ श्रीमन्महाराज मातुश्री अहील्याबाई साहेब ही गुणवंतराव गाईकवाड सेना खासकीले समशेर बहादर यांची कन्या. यांचा विवाह वैशाख बहुल ५ शके १७७६ आनंद नाम संवत्छरे सालांत बडोदे मुक्कामी जाहाला.

यासी पुत्र जहालेले अल्पवयात कैलासवासी जाहाले. त्यावरून नावे लिहीलेली नाहीत. औरस संतती नाही. रामचंद्र दादासाहेब पाटणकर म्हणजे आऊबाई आक्कासाहेब यांचे भ्रतार यांचे चिरंजीव नागोजीराव साहेब पाटणकर याना बाबासाहेब महाराजानी दत्तक आषाढ व॥ ५ शके १७८८ बुधवार रोजी[3] घेऊन गादीस आधिकारी केले. नाव राजाराम साहेब महाराज असे ठेविले. त्यांचा जन्म अधिक वैशाख शु. १ शके १७७२, तारीख १३ एप्रील १८५० रोजी झाला.[4]

श्रीमन्महाराज शाहू छत्रपती उर्फ चिमणासाहेब यासी, म्हणजे बुवासाहेब महाराज यांचे कनिष्ठ पुत्र यासी स्त्री

१. सकवारबाई साहेब. नरसिंगराव शिंदे नेसरीकर यांची कन्या. विवाह वैशाख व॥ १ रवीवार शके १७३९ पलभोनाम संवत्सरी जहला.

---

१. ता. ३० ऑक्टोबर १८३६, २. ता. ८ जानेवारी १८३१, ३. ता. १ ऑगस्ट १८६७, ४. ता. १३ एप्रिल १८५०.

कैलासवासी श्रीमन्महाराज राजाराम छत्रपती यांचा जन्म तारीख १३ एप्रील रोजी जाहला आहे. यासी स्त्रिया —

१. ताराबाई साहेब – ही मुधोजीराव नाईक निंबाळकर फलटणकर यांची कन्या. विवाह फाल्गुन वद्य १ गुरवारी शके १७८८ रोजी जाहला.

२. श्रीमन्महाराज मातुश्री सकवारबाई साहेब – हणमंतराव उर्फ रावसाहेब निंबाळकर बहादूर सरलष्कर यांची कन्या. विवाह मार्गशीर्ष शु. १५ बुधवार शके १७८९ तारीख ११ दिजंबर १८६७ रोजी जाहला. हल्ली आहेत.

येणे प्रमाणे असोन राजाराम साहेब महाराज सन १८७० इसवी साली इताली देशात कैलासवासी जाहाले. त्यास औरस संतती नाही. सबब दत्तक मेहरबान दिनकरराव साहेब भोसले सावर्डेकर यांचे चिरंजीव राजश्री नारायणराव साहेब यासी विधानपुर्वक आश्वीन शुद्ध दशमी शके १७९३ इंदूवासरे रोजी श्री मन्महाराज ताराबाई साहेब यानी आपले मांडीवर घेऊन राज्यास अधिकारी केले. नाव श्रीमन्महाराज शिवछत्रपती असे ठेविले आहे. यांसी वाघोजीराव शिर्के कुठरेकर यांची कन्या देऊन विवाह वैशाख बहुल पंचमी शके १८०० बहुधान्य नाम संवत्छरे भोमवारी जाहाला. नांव श्रीमन्महाराज सकल सौभाग्यादी संपन्न वज्रचुडेमंडीत मातोश्री आनंदीबाई साहेब असे ठेविले आहे.

सदरहुप्रमाणे मिळालेली माहीती नमूद केली आहे. तारीख २ माहे मे सन १८८२.

सही

चिटणीस

नाम-सूची

(सूचीतील नावापुढील आकडे लेखांकांचे आहेत.)

आणखी काही स्त्रीपुरुषांचे एकत्र उल्लेख—



कोल्हापूर संस्थानचे राज्य गीत

हे जग दी श्वर जग दं बा वर करू णे शा

भक्त प्रिय कर शं भो

कर वी र नृप छ त्र पती तें

ठे वि निरा मय आयु र्बल जय

दे ऊनी अ क्ष य

हे जग दी श्वर जग दं बा वर करू णे शा

करवीर रियासतीची कागदपत्रे : पहिला खंड

[' करवीर रियासतीची कागदपत्रे, ' पहिला खंड यातील सर्व कागदपत्रांचा इंग्रजी गोषवारा क्रमवार खाली दिला आहे. इतिहासाच्या अभ्यासकाना, विशेषतः मराठीतर इतिहास संशोधकांना तो उपयुक्त वाटेल अशी अशा आहे.

कागदपत्रांचा गोषवारा इंग्रजी भाषेत असावा अशी सूचना, माझे मित्र आणि पुणे विद्यापीठाच्या इतिहास विभागाचे प्रमुख **डॉ. अ. रा. कुलकर्णी** यांनी केली. आणि प्रत्यक्ष गोषवारा तयार करण्याचे परिश्रमही त्यानी घेतले. त्याबद्दल मी त्यांचा अत्यंत आभारी आहे.

स. मा. गर्गे]

Karvir Riyasatichi Kagadpatre : Vol 1

SUMMARRIES

1. Shahu writes that the Koppal Fort be handed over to Sambhaji as per the terms of the Warna Treaty.

2. An account of the ' Rava ' Ordeal, followed in a dispute.

3. The widow of the Qilledar of Samanagad was permitted to adopt a son and the Watan of Sornobat was granted to her

4. A commercial treaty with the Dutch concluded by Sambhaji.

5. A warning given by Sambhaji to the village officers to release the cattle of the ryots and pay the amount collected in this respect to Krishnaji Yadav.

6. The amount mentioned in No. 5 was paid to Yadav.

7. An important letter from Nanasaheb Peshwa regarding the adoption of Ramaraja of Satara. When Jijabai (Kolhapur) reminds him of the earlier promises, the Peshwa writes to her that they would be fulfilled only if either Tarabai or Jijabai puts forth evidence to set aside the adoption.

8. An agreement with Jijabai probably during the period of Nanasaheb Peshwa and perhaps accepted later by Madhavrao I.

9. An agreement between Madhavrao I and Jijabai. The Peshawa gives his consent to the adoption. The idea of union of the parts of the Maratha State once again discussed here. Madhavrao replies that when he would go back to Poona, he would carefully think over it and do the needful.

10. Khanwat was granted as Inam to Sahaji Khanwatkar.

11. Madhavrao Peshawa writes that Ranoji Ghatge Sarjerao should remain uudisturbed in his Inam village.

12. Raghunathrao writes to Shivaji of Kolhapur that Chikodi, Manoli and Raibag should remain with the Karvir Chatrapati as before.

13. A letter of Raghunathrao mentioning that the places referred to in No. 12, be retained with the Karvir Chatrapati.

14. Same as in No. 13.

15. Raghunathrao meets Jijabai. Reference to Madhavrao's letter of warning. Details of the Mortgage of Chikodi and Manoli with a moneylender.

16. Details of remittance to Parshurambhau Patwardhan.

17. Mentions the meeting between Raghunathrao and Shivaji Maharaj.

18. A Sanad granted to Santaji Mohite by Sambhaji. Details of the Inams secured by the Mohites– from time to time.

19. Raghunathrao expresses his delight over the news of Haidar Ali's joining the Karavirkar.

20. Disturbances at the Torgal fort.

21. Laxamanrao Shinde secures a village in Inam from the Chatrapati.

22. An important letter giving details about the agreement between Chatrapati and Haidar Ali. The Peshwaship was assured to Raghunathrao. Haidar was to get area lying between the south bank of the Tungabhadra to the sea–coast. Mutual military assistance was assured.

23. Durgabai informs Laxamanrao Shinde that she has written to Haidar not to disturb the fort Torgal.

24. Madhavrao II writes to Mahadji Shinde that he should proceed to Karvir as Yesaji Shinde was to capture Lat and Rangoli villages of the Ghorpade of Ichalkaranji.

25. Haidar informs Satvoji Bhosale that he would assist the Karvir Ruler. His reference to the state of affairs of the Barbhai in Poona is significant.

26. Yesaji Shinde informs about the fight between the Nargundkar and Haidar, and that Parashurambhau took possession of Shirole.

27. It refers to the 1st Anglo—Maratha war and the defeat of the English therein.

28. Narsingrao Shinde writes to Laxmibai Ghorpade abou the displeasure of the master.

29. The Gadkari of Bhudargad writes the same as above to Laxmibai.

30. Same as No. 29 to Subarao Ghorpade.

31. Khem Sawant writes to Chatrapati about the loyality of the Gadkari of Bhudargad.

32. The Governor of Goa to Yesaji Shinde informing him to warn Khem Sawant, the traitor invading the Rangana fort.

33. Chatrapati sends orders and robes to Peshava Madhavrao II

34. Chatrapati seeks the Portuguese help to counteract the eight month long besiege of Rangana by Khem Sawant.

35. Yesaji Shinde conveys the opinion of Chatrapati to Parashuram Bhau regarding the treaty. It recommends that Ranoji Ghorpade Senapati, should enjoy his status.

36. Raghunathrao sends the term of agreement to the Chatrapati. It includes the assurance from Reghunathrao that the fort of Satara would be handed over to him and his authority and seal would be respected in the dominion.

37. The Gadkaris of Bhudargad were pardoned by the Chatrapati and maintenance grants were made.

38. Bal Joshi to Gujajirao mentions about the letter to Parashuram bhau.

39. The Governor of Bombay claims damages from the Chatrapati as the Karvir navy had plundered some English ships.

40. Godabai Gaikwad sends 'Tilgul' and fruits to the Chatrapati.

41. Parashurambhau complians to Bal Joshirao that the Karvirkar is not observing the treaty.

42. Details of Patwardhan's movements and preparations for an attack on Alta.

43. Chatrapati sends Bahirji Naik Gaikwad to Poona.

44. Chatrapati suggests that Pritirao Chavan should remain in the vicinity of Karvir. Ratnakarpant was consulted in this behalf.

45. A note on the agreement with Parashurambhau Patwardhan regarding the Karvir transactions.

46. Dhondoji Wagh sends his terms of friendship to Peshava Sawai Madhavrao.

47. Parashurambhau writes to Gujajirao Gaikwad to send the amount due to hostages.

48. Chatrapati orders Parashuram Ramchandra, to execute the terms of treaty, reminds him of the difficulties of the state Boys detained as hostages be released on payment of Rs. 1½ lakhs.

49. Narration of the Battle of Kharda, the valour of Parashurambhau and the hardships of the forces of the Nizam.

50. Sawai Madhavrao writes to Chatrapati that the customary garments of the Vijaydashmi day have been despatched.

51. Haibatrao Gaikwad writes to Dinkarrao Gaikwad that Mansing Mane has received Inam land from him.

52. Bajirao II to Chatrapati Shivaji requesting him to be as kind as he was to his father Raghoba.

53. The corces of Karvir attack Jamkhandi as per Nana Phadanavis's orders. Ratnakarpant was designated as Rajadnya.

54. Nana requests the Chatrapati to release the important people captured by him.

55. Ratnakarpant writes to Chatrapati about the disturbed state of affairs in Poona. Daulatrao Shinde inprisons Nana.

56. Satara Chatrapati writes to Bajirao II about his financial difficulties.

57. Sidhojirao Naik Nimbalkar writes to Chatrapati that he should send his forces to Satara as decided before, and act according to the wishes of Swami.

58. It seems to be a letter addressed to the Nawab of Savnur, asking him to reach Karvir immediately.

59. Sakharam Ghatge writes to Gopalji Mohite to reach Satara immediately. He was instructed to collect Ghasdana and Khandani from the Karadkar, who had proved to be disloyal.

60. Daulatrao Shinde writes to Chatrapati about the movements of the army of the Peshava.

61. Sidhojirao Naik Nimbalkar to Rayaji Jadhav Sarnobat about the forces of Raste sent to Satara by the Peshava.

62. Narayanrao Ghorpade receives the robes of Senapati from the Chatrapati

63. As in No. 60 with some changes perhaps a copy of the same.

64. Bajirao II to Chatrapati to remove misunderstanding about him.

65. Chatursing Raje Bhosale to Haibatrao Gaikwad Vishwasrao soliciting strong bonds of friendship and favour from the Chatrapati.

66. Ratnakarpant Rajadnya to Dhondji Wagh. Reference to Karnatak expedition, battle of Savnur, etc.

67. Karandikar, a clerk of the Patwardhans who used to supply information about Kolhapur secretly, begs help from the Chatrapati by pointing out his difficulties and hardships.

68. Shivaji leads an expendition in the Bijapur territory. Laxmibai Shinde with her forces came to see the Maharaja.

69. Sakharam Ghatge to Chatrapati assuring him the necessary military assistance.

70. Rayaji Jadhav to Sakharam Ghatge asking him to report immediately with his forces to defect the forces of Raste. Requested to bring Narayanrao Ghorpade Sarnobat also.

71. Nimbaji Yadav Havaldar suggests that, in the interest of Kolhapur state, a compromise between the ladies from Shinde family and Daulatrao Shinde be effected.

72. Naro Shivaram refers to the correspondence between Nana, Bajirao II with the Chatrapati.

73. Nana Phadnis to Chatrapati. Balaji Ganesh was sent to Kolhapur with the approval of Bajirao II to discuss policy matters with the Chatrapati.

74. Peshava replies to a letter from Chatrapati regarding perhaps the expedition of Parahsurambhau in the Karnatak.

75-79 Letters to Dhondji Wagh from Chatrapati requesting to join him. Promises made by the Chatrapati.

80. Savnur Nawab was ordered to send forces to assist the Rajadnya.

81. A similar letter to the Nawab of Savnur.

82. As above; suggested to join against Dhondopant Gokhale.

83. A note showing the titles, the time of their issue to Gujajirao Gaikwad and his descendants.

84. Sakharam Ghatge to Ramchandra Patwardhana, requesting him to close fighting at Kolhapur.

85. Ramchandra Patwardhan to Dhondaji Wagh asking him to send his clerk for negotiations for friendship.

86. Important issues between 1793 to 1800 A. D. collected in this letter.

87 Nagojirao Ghatge Zunzarrao writes to Moropant about the movements of Rajadnya, Dhondji Wagh, Wellesly, Bapu Gokhale in Karnatak. It mentions Chatrapati's friendship with the Company.

88. Ramchandrapant requests Dhondji Wagh not to disturb the Saranajami Mahals.

89. As per instructions of Wellesly, Rajadnya's forces were sent towards Samangad to defeat Dhondji Wagh.

90. Narayanrao Ghorpade writes Dhondji Wagh not to disturb.

91. Chatrapati informs that Haibatrao Gaikwad has been sent to assist Shankarrao Shinde, the Sena Khaskhel.

92. Pritirao Chavan suggests to find out the replies of the Huzur from Yeshawantrao Holkar. It mentions that a separate letter has been sent to Holkar.

93. Refers to the contents of No. 91, Haibatrao Gaikwad writes that he and Bapu Gokhale are unanimous on defeating the enemy and furthering the cause of the master.

94. Pritirao Chavan writes to Devi Naik, the interpreter that efforts be made to get Chikodi and Manoli released from Sidhojirao.

95. Chatrapati asks Shankarrao Shinde to send back Gopalrao Shinde with his troops.

96. Narayanrao Patankar to Sambhajirao Shinde about the disturbances caused by Sidhojirao.

97. Pritirao Chavan assures Tainat to Shankarrao Shinde.

98. Bhau Maharaj writes to Devi Naik the interpreter, to find out from Elphinstone whether the naval ships be permitted to carry goods.

99. A Portuguese ship from Mozambuque, containing ivory was detained at Sindu Durga. The matter of reparation was discussed thirteen years after the event.

100. The Vakil of the Karvirkar at Poona supplies information of the movements of the Peshava, Ramchandra Parasharam, Sidhojirao, Bapu Gokhale etc.

101. Bajirao assures to settle the issue of Manoli.

102. Firing between the Naval forces of Kolhapur and the British while carrying the Gurabs of Phond Sawant to Sindhu Durga.

103. Sidhojirao writes to Goapalrao Shinde, not to worry about the security arrangements.

104. An agrement between Chatrapati and Sidhojirao by which the latter gets the Vallabhagada.

105 Rayaji Jadhav asks Shankarrao Shinde to report immediately with his saranjam.

106. Madhavrao Nimbalkar writes similarly to Sambhajirao Shinde, the Sena Khaskhel.

107. Narayanrao Shinde also writes the same to Sambhajirao Shinde.

108. Same as 105.

109. Haibatrao Gaikwad to Shankarrao Shinde.

110. Ratnakarpant Rajadnya besieges Bhawangad. He kills Rakhamaji Bhosale Alurkar, plunders cannon and returns to Karvir.

111. Shinde Senakhaskhel was requested to assist in checking the disturbances of Sidhojirao.

112. An order to arrest Trimbakji Dengale who had escaped from the British custody.

113. Sadashiva Anant was asked to hand over Bhudargad to the Chatrapati.

114. Sadashiva Mankeshwar was told that Trimbakji Dengale would convince you that we do not suspect the Raya i.e. Bajirao.

115. Haibatrao Gaikwad's suggestion to keep two to three hundred Arabs in service is accepted.

116. An elephant was sent to the Mahalaxmi temple from Mysore.

117. An account of the sitting in restraint (Dharane) by Narayan Baji Ghatge of Nagpur, to get the expenses of the army.

118. Chatrapati writes to Bayajabai Shinde to get released Chikodi and Manoli Talukas from the Nipankar.

119. A similar letter with many details to Daulatrao Shinde.

120. A letter of condolence from Elphinstone on the death of Shivaji.

121-122. Letter from Satara to Bajirao II exps essing difficulties regarding expenditure on religious and domestic issues.

123. An account of the death of Swarupji Kshirasagar at Poona.

124. Elphinstone writes to Maharaja that the Kagal Prant belongs to him and he should make arrangements according to his choice.

125. Chatrapati issues an order to Jivanrao Shinde that Nesari and Gaokhedi would continue as before.

126. Hindurao Gaikwad was asked to bring the artillery immediately to Kadgaon.

127. Some pieces of cannon were drowned in the sea while carrying them in ships. A news item.

128. An account of Bajirao's camp at Nipani.

129. Balabai Nimbalkar sends special betelleaves to Abasaheb and Buwasaheb.

130. Bhau Maharaj to Dinkarrao Gaikwad about domestic affairs.

131. The sanads relating to village Aitawade were to be sent to Poona.

132. It was suggested to Elphinstone on behalf of the Chatrapati that Krishnarao Gopal be not appointed as Vakil in Karvir.

133. A mint at Panhala issuing Shambhu rupees and contents of the Shambhu rupee mentioned.

134. A list of letters sent to Poona from Karvir.

135. An interesting account of tiger shot by the Shrimant.

136. Morobaji Chitnis writes to the Chatrapati that he was trying to get the important work done from the English. A reference to the battle between Bajirao and the English.

137. Chatrapati orders that the friendship with the English be retained at any cost.

138. Chatrapati Abasaheb captures the fort of Elbarga with the help of the English.

139. A complaint of abducation.

140. Chatrapati gets back the Bhudargad fort.

141. An account of distribution of sugar on the occasion of the birth of a male child in the Royal family.

142. Ladders and other equipment sent to Abasaheb when he lead an expendition.

143. Artillery was also sent to him.

144. Shopkeepers were also sent for the army.

145. An account of the murder of Abasaheb. Yeshawantrao Ghatge was suspected. Reasons given.

146. Statement from Hindurao Gaikwad regarding the murder of Abasaheb.

147. Details about the family of the Chatrapati.

148. Proclamation by the British transfering power to Pratapsingh, Raja of Satara.

149. Buwasaheb Maharaj was to lead his forces towards Kittur.

150. A letter to Hindurao Gaikwad regarding the movements of certain important persons.

151. Camps of Buwasaheb Maharaj at ShiroWladi and other places.

152. Weber visits Panhala.

153. Hindurao Gaikwad suggests that no fordable place in the riverbed be given to the forces of Daulatrao Shinde.

154. A tiger was sent to the Chatrapati.

155. Raghojirao Patankar comes to Karvir to search for a bride-groom on behalf of the Shindes. He has been requested to send back the courtean, assisting him in this work.

156. Buwasaheb attacks Torgal and assures protection to the people provided they surrender themselves to him.

157. Work to be done in Poona during Buwasaheb's visit to that place.

158. A tussle between Ramrao Akhabarnavis and the Arab Watchmen.

159. An account of the capture of Katkol by Buwasaheb.

160. A skirmish between Gokhale (?) and the rebels of Prachitgad.

161. Ratajirao Chavan informs the Chatrapati that Pindhars and swars had gathered in Ichalkaranji.

162. An account of Torgalkar Shinde. Refers to many important events and personalities.

163. An account of important events from 1774 to 1797.

164. The Vakil of Karvir in Bombay writes about the policy of the British regarding native Marathi states.

165. Chatrapati sends one document giving information about his control over the Vishalgad fort and the Pratinidhi.

166. Details of No. 165. Important information about the sway of Kolhapur over the Konkan in the past.

167. Buwasaheb visits to the temple of Jyotiba and returns to Karvir.

168. An extract from " Darpan " a periodical, about the native states.

169. Suggestion that Narayanrao Ghorpade should accompany Buwasaheb in his visit to Tuljapur.

170. A letter of condolence from the Political Agent on the death of Buwasaheb.

171. The company made certain suggestion with a view to bringing some discipline in the working of Mamltdar and other state officials.

172. " Dig-Darshan " a periodical was sent to Babasaheb & Chimasaheb by the Political Agent.

173. The English were dissatisfied with the work of Ramrao Akhabarnavis. A note on the arrangements of administration.

174. The political Agent asks for an explanation why certain villages were given to the Akhbarnavis.

175. Akhbarnavis holds discussion with Tarabai in the palace. Saibai Diwansaheb has been asked to supply more information in this behalf.

176. The Govt. Treasurey of Malwan was attacked by the thieves.

177. Same as No. 175.

178. The Rajmandal suggests that the present Akhbarnavis be removed, and a new be appointed in his place.

179. An account of dispute between Amritrao Pratinidhi and his mother.

180. A letter of condolence by Baji Ghatge on the death of Buwasaheb.

181. About punishments to those who participated in the Malwan revolt.

182. The political agent suggests that evidence in support of the claim of Kolhapur on Ichalkaranji, Kagal and Torgal jagirs be put forth.

183. It was suspected that the people of Kolhapur would rise in revolt. British forces were sent to meet the situation.

184. An account of a festival in Kolhapur.

185. The company Govt. was convinced that Kagal belongs to Kolhapur.

186. The political Agent asks the Kagalkar and the Ichalkaranjikar to obey the orders of the Chatrapati.

187. Chatur Singh's revolt on the Prachitgad.

188. Mint for religious and charitable purposes.

189. Same as 188

190. An order was issued that no mint be started without the sanction of the Company's Govt.

191 Company wants to compile information about jahagirdars, sardars and privileged persons in the state.

192. A reply to letter No. 191. It was sent ba ck for want of autograph.

193. A complaint that Hindurao Gaikwad misbehaved with the Chatrapati.

194. A person coming from Kabul Kandahar was not to be allowed to leave Kolhapur.

195. An account of a plunder.

196. The politiccl agent demands explanation from the Karbharis who were working against the wishes of Tarabai.

197. A narration of the difficulties involved in getting Chikodi.

198 A suggestion to look after the health of the Chatrapati.

199. The political agent suggests that instead of Arabi year Christan and Hindu years be put on official letters.

200. A request to send qualified troopers to assist the Chatrapati.

201. A Patil requests to restore the business of a monastery. Information about the sufferings of ryot at the hands of money-lenders and Govt officials.

202. The political agent sends material for training Chatrapati Babasaheb and Chimasaheb in English language.

203. The political agent writes to the Diwan Saheb that she should seek the advice of the English in the administration of the State.

204. A suggestion that the Chatrapati should be made to study for six hours per day.

205. Information about the fort officials.

206. The administration and financial management of the govt. are not satisfactory. As the state was in difficulties, Dinkarrao Gaikwad was removed from his officc, Diwan Saheb was set aside from administration and the responsibility of Govt. was entrusted to new persons.

207. Suggestions to the trio that they should be judicious, maintain correct accounts, etc.

208. The new policy and regulations of the East India company regarding judicial and land revenue administration.

209. Instructions to the village officials Patil and Kulkarni regarding village administration.

210. The political agent informs that he could not touch Kolahpur on his return journey.

211. The revolt of Babaji Airekar against the Company Sarkar.

212. Daji Pandit was appointed for Kolhapur administration.

213. A list of administrators in Kolhapur from 1830-1843.

214. A questionnarie regarding the revolt against the Company Sarkar in 1844.

215. Same as above

216. Captain Graham replies to the complaints of Laxmanrao Shinde.

217. A Chronicle of Kolhapur (incomplete) prepared by Parasnis at the instance of Captain Graham. It begins with Shivaji, the Great, and ends with Sambhaji of Karvir.

218. Janakibai Amatya adopts the son of Nandagaonkar.

219. A statement from Kapashikar Ghorpade about his family practices. Demands civil and criminal jurisdiction.

220 Information about the succession of Narsingrao Shinde.

221. Details about the murder of Abasaheb Maharaj by Sayaji Mohite

222. A satatement from the family of Siddeshwar Maharaj

223. Details of correspondence with the company regarding Rangana, Narsinghgad and Bharatgad forts.

224 An account of the family of Nilkantrao Jadhav, Japatan Mulukh.

225. A Chronological account of the powers, tenure of office of the seventeen Sardars connected with the Karvir State.

226. Important information about the origin of ordeals.

227. A chronological account of the titles of various officials of the State.

228. A brief summary of the major agreements with the Peshwas between 1773 to 1807.

229 Babasaheb Maharaj goes to Baroda to attend a royal marriage. Instructions are given to him regarding his first visit to Gaikwad.

230. An account of the skrimosh between the Gadkarls and the company Sarkar.

231. An account of how the Gaikwads took possession of the Bharatgad fort.

232. A statement regarding the manner of guard of honour on various occasions.

233. Chintamanrao Joshi, accomplished in Vedas, was given a Vatan of Sarjotishi.

234. An account of the Darbar held at poona during the period of Rajaram's visit to that place.

235. Presents in the from of Mohars, received from many states during his stay at Poona,

236 The company Sarkar gives consent to the proposal of adoption put by Tarabai the wife of Rajaram. Narayanrao Bhosale Khanwatkar was selected for adoption.

237. A Chronological account of the Bhosales from Shivaji the Great to the fourth Shivaji Maharaj of Karvir.

238. A Marathi translation of Lord Napier's lectures on sculpture delivered at Madras, was sent by the political agent to Maharaja of Kolhapur with a request to study it.

239. A personal account of Shivaji the fourth and other members of the royal family of Kolhapur.

240. The date of marriage oı Shivaji the fourth was fixed.

241. An account of the wives and children of the Chatrapati from Buwasaheb to Shivaji the Fourth.


शि.प्र. मंडळी द.वा. पोतदार ग्रंथसंग्रह

स. मा. गर्गे यांच्या खालील तीन ग्रंथांना महाराष्ट्र शासनाने, त्या त्या विषयातील पहिली पारितोषिकें देऊन गौरविले आहे.

राज्यशास्त्राचा विकास

राजकीय तत्त्वज्ञानाचा इतिहास

स्वप्न आणि सत्य

रशिया व पूर्व युरोपचे प्रवासवर्णन

करवीर रियासत

कोल्हापूर राज्याचा साधार व विस्तृत इतिहास

मराठ्यांच्या इतिहासातील — प्रामुख्याने, दक्षिण महाराष्ट्र, कोकण आणि कर्नाटक प्रदेशात घडलेल्या इतिहासातील — अनेक महत्त्वपूर्ण घटनांवर प्रकाश टाकणारे काही प्रमुख इतिहासग्रंथ.

प्रकाशित

करवीर रियासत
स. मा. गर्गे

राव विश्वासराव गायकवाड घराण्याचा इतिहास
खं. आ. गायकवाड

हिंमतबहाद्दर चव्हाण घराण्याचा इतिहास
क. वा. वि. खरे

करवीर रियासतीची कागदपत्रे, पहिला खंड
स. मा. गर्गे

आगामी

करवीर रियासतीची कागदपत्रे, दुसरा खंड
स. मा. गर्गे

कापशीकर सेनापती घोरपडे घराण्याची कागदपत्रे
शं. ह. वर्टीकर

करवीर सरदारांच्या कैफियती
खं. आ. गायकवाड

रत्नाकरपंत राजाज्ञा
स. मा. गर्गे